
२५३
१

# गांधी-पर्व

त्र्यं. वि. पर्वते

ग्र 253/9



महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र 253/2
मंत्रालय

# गांधी-पर्व

लेखक

त्र्यं. वि. पर्वते

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

प्रथमावृत्ती – २ ऑक्टोबर, १९८५.

प्रकाशक – **श्री. सु. द्वा. देशमुख**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
मंत्रालय, मुंबई–४०० ०३२.

© – **प्रकाशकाधीन**

मुद्रक – **मायक्रो ग्राफ**
रामदूत, दुसरा मजला, डॉ. भालेराव मार्ग,
गिरगांव, मुंबई–४०० ००४.

मुखपृष्ठ – **पांडुरंग जयतापकर**

किंमत – रु. ४०/–

कै. इंदिरा गांधी

यांच्या स्मृतीस समर्पण

# नि वे द न

चालू वर्ष हे अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या शताब्दीचे वर्ष आहे. महाराष्ट्राचे आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे ही हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. असे महत्त्वाचे योग एकत्र आल्यामुळे या वर्षी भारताच्या आणि महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य-लढ्याच्या इतिहासाच्या विकासाचे विश्लेषण करणारी पुस्तके काढण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने घेतला आहे. या निर्णयानुसार स्वातंत्र्याच्या इतिहासावरील तसेच महाराष्ट्राच्या आणि भारताच्या भावी विकासाला उपयुक्त होतील अशी पुस्तके साहित्य संस्कृती मंडळातर्फे यंदा प्रकाशित होत आहेत.

महाराष्ट्राच्या आणि भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी एक नवीन पर्व सुरु केले. १ ऑगस्ट, १९२० ला लोकमान्य टिळकांचे निधन झाल्यानंतर स्वातंत्र्याच्या चळवळीची धुरा महात्मा गांधीजींच्या खांद्यावर आली आणि ३० जानेवारी, १९४८ ला त्यांची हत्या होईपर्यंत ते राष्ट्राचे एकमेव असे नेते राहिले. त्यांच्या हयातीतच सामुदायिक असहकाराची चळवळ, मिठाचा सत्याग्रह, भारत छोडो इत्यादी चळवळी झाल्या. आणि शेवटी त्यातून भारताला स्वातंत्र्य मिळाले. महात्मा गांधीनी केवळ राजकीय चळवळी केल्या नाहीत तर सामाजिक चळवळीही फार मोठ्या प्रमाणात करण्याचे श्रेय त्यांचे आहे. चरखा संघ, ग्रामोद्योग संघटना, कुष्ठरोग निवारणाची चळवळ इत्यादी अनेक विधायक चळवळी पण त्यांनी सुरु केल्या. १९२० ते १९४८ हे भारताच्या नव्हे तर जगाच्या इतिहासात "गांधी-पर्व" या नावाने नेहमीच ओळखले जाईल.

श्री. त्र्यं. वि. पर्वते यांच्या सारखे ज्येष्ठ पत्रकार आणि राष्ट्रीय कार्यकर्ते ज्यांनी हा गांधीपर्वाचा इतिहास घडत असताना प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहिला, या युगाची पार्श्वभूमी आणि या युगाचा उत्तर काळ पण अनुभवला, अशा मोठ्या तपस्व्याने आमच्या विनंतीला मान देऊन हे पुस्तक लिहून दिले याबद्दल त्यांचे आभार.

११ सप्टेंबर, १९८५.
विनोबा जयंती,
४२, यशोधन, मुंबई–२०.

**सुरेन्द्र बारलिंगे**
अध्यक्ष,
**महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.**

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | पार्श्वभूमी | ... | १ |
| २. | असहकारितेच्या आंदोलनाचा प्रारंभ | ... | १७ |
| ३. | असहकारितेला चढलेला जोर आणि आलेला वेग | ... | ४३ |
| ४. | हिंसाचारामुळे पिछेहाट–स्वराज्य पक्षाचा विजय | ... | ७६ |
| ५. | असहकारितेचे पुनरुत्थान – मिठाचा कायदा तोडला | ... | ११३ |
| ६. | कायदेमंडळातील कामकाजाची फलश्रुती | ... | १४९ |
| ७. | वैयक्तिक कायदेभंग – सुभाषचंद्र बोस गुप्त झाले- छोडो भारत आंदोलनाचा आरंभ | ... | १८४ |
| ८. | सत्तांतराच्या वाटाघाटी – स्वातंत्र्यप्राप्ती व देशाची फाळणी | ... | २२७ |
| ९. | निर्वासितांचा लोंढा – अखेरचे उपोषण – गांधी गेले | ... | २६९ |

# भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनांतील गांधीपर्व

## १ - पार्श्वभूमि

सामान्यतः सन १९२० पासून १९४७ सालापर्यंत म्हणजे हिन्दुस्थान देश राजकीय स्वातंत्र्यसंपन्न होईपर्यंतचा कालखंड म्हणजे स्वातंत्र्यआंदोलनातील गांधीपर्वच होय. कारण गांधीजींचें नेतृत्वच या कालांत सर्वात प्रभावी होतें आणि इतर सर्व पुढारी राजीखुषीनें आपल्याला त्यांचे दुय्यम म्हणवीत. यांमध्यें जवाहरलाल नेहरू व सुभाषचंद्र बोस यांचाही अंतर्भाव होतो. स्वातंत्र्याच्या आंदोलनांतील यापूर्वीचा, सन १८८५ पासून म्हणजे इंडियन नॅशनल कॉंग्रेसची स्थापना झाली तेव्हांपासून १९२० साली टिळकांचा १ ऑगस्ट रोजी मृत्यु होईपर्यंतचा कालखंड हा टिळक-पर्व म्हणून ओळखला जाणें हे औचित्यपूर्ण होईल. गांधीजींचे नेतृत्व जसें इतर सर्वांनी, आपण ज्याला गांधी-पर्व असें संबोधीत आहो त्या कालखंडात निरपवादपणें मान्य केलें होतें, तसें टिळकांचे नेतृत्व इतरांनी मान्य केलेलें नव्हते हें मात्र टिळक-पर्व असें ज्या कालखंडाला आपण संबोधित आहों त्या संबंधाने लक्षांत ठेविले पाहिजे. नेमस्त म्हणजे मॉडरेट आणि जहाल किंवा मिलिटंट असे नेतृत्वातील दोन भेद तेव्हां स्पष्ट होते. तथापि टिळक हे सर्वांत जास्त कणखर व लढाऊ असे नेते असल्यामुळे राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून तिचे पुढारीपण १९२० साली असहकारितेच्या चळवळीत महात्मा गांधीकडे जाईपर्यंतच्या काळाला टिळकपर्व असे म्हणण्यात काहीं वावगे नाहीं. तसें पाहिले तर गांधीपर्वात देखील मुस्लीम लीग, हिन्दुसभा, दहशतवादी, क्रांतिकारक वगैरे नांवाखाली चळवळी करणारे पक्षही आपण देशाच्या स्वातंत्र्यासाठी झटत आहों असेंच म्हणत होते. आपल्याला मुख्यतः गांधीपर्वातील घटनांचा व घडामोडींचाच प्रामुख्याने विचार करावयाचा आहे. गांधीपर्व सुरू होऊन अत्यंत प्रभावि ठरलें ही घटना कांही अवचितपणें घडलेली नाहीं. ते पर्व सुरू व्हावे म्हणून कांहीं पूर्वतयारी कित्येक वर्षे होत होती. तिची तयारी, दूर दक्षिण आफ्रिकेत होत होती व महात्मा गांधी यांचेकडूनच ती होत होती. मुख्यतः मजूर अथवा व्यापारी म्हणून बरेच हिंदी लोक दक्षिण आफ्रिकेत गेले होते. त्यांना साधी माणुसकीची वागणूक देखील तेथील राज्यकर्त्यांकडून मिळत नव्हती.

ती मिळावी म्हणून महात्मा गांधींनी १९१५ सालाच्या जानेवारी महिन्यात ९ तारखेला हिंदुस्तानांत परत येण्यापूर्वी, मोठा लढा दिला. पॅसिव्ह रेझिस्टन्स

अथवा सत्याग्रह असे त्या लढयाचे नांव प्रसिद्ध आहे. जाणूनबुजून. सांगूनसवरून अन्याय्य कायद्यांचा व हुकुमांचा भंग करणें आणि त्यांसाठी होईल ती शिक्षा अहिंसक, निःशस्त्र प्रतिकार करून भोगणे असें या लढयाचे स्वरूप होतें. या लढयाला हिंदुस्तानांतील कॉंग्रेसनें व इतर राजकीय संस्थांनी वारंवार पाठिंबा दिला. पण त्याचें हें स्वरूप प्रायः नैतिकच होते. कोणीही थोर भारतीय पुढाऱ्याने दक्षिण आफ्रिकेत जाऊन गांधीची साथ केली नाहीं. गांधी मात्र तशी मागणी सतत करीत होते. परंतु १९१२ साली पब्लिक सर्विसेस कमिशनचे सभासद म्हणून इंग्लंडमध्यें काम करीत असता नामदार गोपाळराव गोखले यांनी गांधीच्या कामाची जागेवरच पाहणी करून त्यांना मदत करण्याचे ठरविले व ते तेथे गेले. गोखले यांना गांधी आपले राजकीय गुरु मानीत असत आणि 'दि मोस्ट पर्फेक्ट मॅन ऑन दि पोलिटिकल फील्ड' असे त्यांना समजत असत. गांधीबद्दल गोखले यांना काय वाटत होते हे त्यांनी १९०९ सालच्या लाहोरच्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात दक्षिण, आफ्रिकेबद्दलचा ठराव मांडताना जे उद्गार काढले त्यांवरून स्पष्ट होईल. गोखले म्हणाले, " It is one of the privileges of my life that I know Mr. Gandhi intimately and I can tell you that a purer, a nobler, a braver and a more exalted spirit has never moved on this earth. Mr. Gandhi is one of those men who living an austerely simple life themselves and devoted to all the highest principles of love to their fellow-beings and to truth and justice, touch the eyes of their weaker brethren as with magic and give a new vision. He is a man who may well be described as a man among men, a hero among heroes, a patriot among patriots and we may well say that in him, Indian humanity, at the present time, has really reached its high water-mark. " त्याचप्रमाणे गांधींची गोखले यांजबद्दलची भावना काय होती याची नोंद करणे देखील आवश्यक आहे. नेक नामदार श्रीनिवास शास्त्री यांनी गोखले यांजबद्दल वेळोवेळीं जे लिहिले अथवा उद्गार काढले त्यांचा संग्रह त्यांनी 'माय मास्टर गोखले' या पुस्तकांत केला व महात्मा गांधी यांनी त्याला प्रस्तावना लिहिली. त्या प्रस्तावनेत गोखले यांचे वर्णन गांधीजींनी 'गोखले दि गुड' असे केलें आहे. म्हणजे 'गोखले दि ग्रेट' असे म्हणण्यांतच त्यांची योग्यता कमी केल्याप्रमाणे होते असा ध्वनि त्यांतून निघतो. सन १८९६ साली दक्षिण अफ्रिकेतून गांधी थोडे दिवस हिन्दुस्तानांत आले होते. तेव्हा रानडे, फिरोजशाह मेहता, टिळक व बद्रुद्दिन तयबजी यांच्या भेटी त्यांनी घेतल्या आणि त्या सर्वांबद्दल गौरवाचे उद्गारच काढले. पण गोखले यांची भेट झाल्यावर

त्यांनी जें लिहिले ते अगदी विलक्षण आहे. त्यांनी म्हटले की, "I had many heroes but no king. It was different with Gokhale. It was meeting like an old friend or better still, a mother after long separation. His gentle face put me at ease at once. He was concerned about how I spoke, dressed, walked and ate. My mother was no more solicitous about me than Gokhale. There was, so far as I am aware, no reserve between us. It was a case of love at first sight and it stood the severest strain in 1913. He seemed to me all I wanted as a political worker-pure as crystal, gentle as a lamb, brave as a lion and chivalrous to a fault. It does not matter to me that he may not have been all these things. It was enough for me that I could discover no fault in him to cavil at. He was and remains for me the most perfect man on the political field. Every word of Gokhale glowed with his tender feeling, truthfulness and patriotism. I believe, he had the capacity cheerfully to mount the gallows for the country's sake, if necessary."

Gandhiji regarded Gokhale as a man of religion and once remarked :" He did not wear his religion on his sleeve; he lived it."

गोखले व गांधी यांचे संबंध अशा प्रकारचे असल्यामुळें, गांधी हिन्दुस्तानात परत आल्यावर ते सर्वस्वी त्यांच्या तंत्रानेच चालणार होते. गोखले यांच्या पश्चात सर्वंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे अध्यक्षपद गांधीकडे जावे अशी गोखले यांची इच्छा होती, त्यांसाठीं त्यांना प्रशिक्षण देण्याला गांधी येथें पोंचल्याबरोबर त्यांनी प्रारंभ केला! त्यांच्यावर गोखले यांनी असें बंधन घातले कीं एक वर्ष पुरें होऊन जाईपर्यंत कोणत्याही राजकीय प्रश्नावर यांनी मतप्रदर्शन जाहीरपणें करावयाचें नाहीं. या मुदतीत त्यांनी देशातील सर्व प्रांतांत फिरावे, अवलोकन आणि निरीक्षण करावे, लोकस्थितीचा अभ्यास करावा आणि त्यावरून जे काहीं निष्कर्ष त्यांनी काढले असतील त्याचा अहवाल गोखले यांना सादर करावा. सर्वप्रथम तेव्हां मुंबई इलाख्याचे गव्हर्नर असलेले लॉर्ड विलिंग्डन यांनी गोखले यांच्या सांगण्यावरून गांधींना भेटावयास बोलाविलें. या भेटींत गांधीनीं गव्हर्नर साहेबांस असे सांगितले कीं, गोखले माझे राजकीय गुरू आहेत आणि मी त्यांचा अनुयायी व शिष्य आहे. याच अर्थाची विधाने पुढे अनेकवार गांधींनी जाहीरपणे केली. गांधीवर एक वर्ष राजकीय व सार्वजनिक प्रश्नांवर मतप्रदर्शन न करण्याचे बंधन गोखले यांनी घातले होते तें त्यांनी तंतोतंत पाळले. दुर्दैवाने ही मुदत संपण्यापूर्वी म्हणजे गांधींना हिन्दुस्तानात येऊन दोन महिने

पुरे होतात न होतात तोंच, गोखले यांचे देहावसान झाले. तारीख १९ फेब्रुआरी १९१५ हा तो दुर्दिन होता. त्यांचा जन्म ९ मे १८६६ रोजी झाला होता. म्हणजे अंतकाळी त्याना पुरती पन्नास वर्षे देखील झाली नव्हती. पण इतक्या अल्प आयुष्यात त्यांनी केलेली देशसेवा अलौकिक होती आणि त्यांचे चहाते व विरोधक यांचे या बाबतीत पूर्ण मतैक्य होते. पण त्यांच्या मृत्युमुळें गांधीजी एका अर्थी निराधार झाले. सर्वंटस ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद त्यांनी व्हावे किंवा नाहीं हा प्रश्न गोखले यांच्या मृत्युमुळें सोसायटीचे इतर सभासद आणि गांधी यांनी सोडविण्याचा प्रश्न होऊन बसला. गांधी आता आपल्याला बरोबर वाटेल त्या रीतीनें वागण्याला मुक्त झाले होते.

सभासदत्वासाठी सोसायटीचे दार त्यांनी ठोठावले परंतु श्रीनिवास शास्त्री, गोपाळराव देवधर, अमृतलाल ठक्कर, नटशराव द्रवीड, नारायणराव जोशी, डॉ. हरीभाऊ देव वगैरे सोसायटीचे ज्येष्ठ सभासद अशा मताचे होते की गांधी सोसायटीच्या सभासदांमध्ये मिळून जाण्यासारखे नाहींत. त्यांच्याबद्दल सर्वांना आत्यंतिक आदर होता, पण ज्या पद्धतीने सोसायटीचे विविध प्रकारचें देशकार्य चालत असे त्या पद्धतीनें गांधीना वागणें जमेल असा विश्वास त्यांना वाटेना. यामुळे त्यांनी गांधीना अशी विनंति केली की त्यांनी सभासदत्वासाठी अर्जच करू नये. गांधीनी हें मानले आणि आपल्याला अनिर्बंधपणें, आपण मनात आणू तसें वागायला मिळणार याबद्दल आनंदच मानला. गोखले यानी त्यांच्या जाहीर मतप्रदर्शनावर घातलेली बंदीची मुदत संपण्यापूर्वी खाजगी चर्चा कोणाबरोबर करू नये असा निर्बंध नव्हता. म्हणून या मुदतींत गांधी टिळकांना मात्र सिंहगडावर भेटले होते व कित्येक दिवस तेथे राहून त्यांनी टिळकांबरोबर अनेक विषयांवर मनसोक्त चर्चा केली. या नंतर देखील, म्हणजे टिळकांचा १ ऑगस्ट १९२० रोजी मृत्यु होईपर्यंतच्या पाच वर्षाच्या काळांत त्यांच्या अनेक भेटी व चर्चा झाल्या. त्यांत देशांतील प्रचलित प्रश्न होते त्याचप्रमाणें तात्विक विषयही होते. सत्य व अहिंसा या तत्वांच्या व्यावहारिक आचाराबाबत सुद्धा त्या दोघांनी खूप उलटसुलट चर्चा अत्यंत मोकळेपणानें केली आणि उभयतांना परस्परांबद्दल वाटत असलेला कमालीचा आदर त्या चर्चेमध्यें कोणत्याहीं प्रकारचा संकोच उत्पन्न करू शकला नाहीं. अखेरपर्यंत या विषयांतील तात्विक मतभेद मिटले नाहीतच आणि तरी देखील उभयतांमधील सौहार्द व सहकार्य कायम राहिले.

कांही उदाहरणे देऊन हें विशद करणें योग्य होईल. गोखले यांच्या मृत्यूनंतर हिन्दुस्तानांत गांधीजीनीं केलेल्या कांही उद्योगांवर टिळकांची बारीक

नजर होती. बिहारमध्ये चंपारण्यात निळीच्या मळचात काम करणाऱ्या शेतकऱ्यांची व कष्टकऱ्यांची दु:स्थिति सुधारण्याकरिता त्यांनी केलेलें आंदोलन, त्या कामात राजेंद्रप्रसाद व मझर-अल-हक अशा सारख्यांचीं मिळविलेली मदत, तेथें करावा लागलेला कायदेभंग आणि केलेली गरीब जनतेची सेवा व अवंतिकाबाई गोखले यांच्यासारख्या समाजसेविकेचे शिक्षणप्रसारासाठी तेथें मिळविलेलें सहकार्य या गोष्टी त्यांच्या नजरेतून सुटल्या नव्हत्या. तसेच गुजरातेतील खेडा जिल्ह्यात सरकारने जमीनमहसुलात अन्याय्य वाढ केली ती रद्द व्हावी म्हणून तेथील शेतकऱ्यामध्ये केलेली जागृती टिळकांनी ध्यानांत घेतली आणि तेव्हां त्यांना आपण अशीच चळवळ महाराष्ट्राच्या ठाणें व कुलाबा (रायगड) जिल्ह्यांत केली होती हें आठवले असेल. पहिले महायुद्ध चालू असतांच लॉर्ड चेम्स्फर्ड या राजप्रतिनिधीकडून फिजी बेटांत गेलेल्या हिंदी मजुरांना जी मुदतबंदीची मजुरीची पद्धति लागू होती ती रद्द करण्याचा हुकूम मिळविला होता याकडे टिळकांचे लक्ष न जाणे अशक्यच होते. अहमदाबादचे गिरणीमालक व कामगार यांमध्ये तंटा उत्पन्न झाला तेव्हां लवादाने तो मिटविला जावा म्हणून उभय पक्षांची संमती त्यांनी मिळविली ही गांधींची कामगिरी त्यांच्या चांगली मनांत भरली होती. लॉर्ड विलिंग्डन् यांनी युद्धनिधीला मदत मिळविण्यासाठी बोलाविलेल्या परिषदेंत गांधींनी निधि जमविण्यां-साठीं व सैन्यभरतीसाठी कोणतीही शर्त न घालता अनुकूल बोलण्याचे ठरविले होतें, पण टिळकांच्या सांगण्यावरून तो आपला बेत त्यांनी फिरविला हें टिळक विसरणे अशक्य होतें.

सन १९१६ साल अखेर लखनौ येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाचे वेळीं विषयनियामक समितीवर टिळकांचे सर्व उमेदवार निवडले गेले. नेमस्त पक्षाच्या उमेदवारात गांधींचे एक नांव होते. पण त्या पक्षाचा कोणीच उमेदवार निवडून येण्याचा संभव नसल्यामुळे टिळकांनी आपल्या एका उमेदवाराला आपली उमेदवारी मागें घेण्याला सांगितले व त्यांच्या जागी गांधींना मुद्दाम निवडून घेतले. लखनौ काँग्रेसमध्ये होणाऱ्या ठरावांवरील चर्चेत गांधींचे म्हणणे विचारांत घेतले जाणें आवश्यक आहे असे वाटत असल्यामुळें टिळकांनी ही योजना हेतुपूर्वक केली. बनारस हिंदू विद्यापीठाच्या स्थापनेच्या वेळीं एक आमंत्रित या नात्याने गांधींजींनी केलेलें कमालीचें स्पष्ट वक्तृत्व अवलोकन केल्यावर तर टिळकांना मनोमन असे पटले असले पाहिजे की अत्यंत नम्रतापूर्वक बोलणाऱ्या पण अतिशय निर्भीड व बेडर अशा या माणसाचे तेज कांही आगळेंच आहे. तेथे जमलेल्या, अंगावर भरजरी अंगरखे घातलेल्या व तुर्रेबाज मंदिल मस्तकावर बांधलेल्या संस्थानिकांची व राजेरजवाड्यांची हिरेमोत्यांचे

दागिने घालून मिरविल्याबद्दल त्यांनी चांगली कानउघाडणी केली. बनारस हिंदु विद्यापीठाचे प्रमुख संयोजक पंडित मालवीय व डॉ. ॲनी बेझंट यांच्यासारखे त्यांचे सहाय्यकही गांधींजीच्या स्पष्ट वक्तृत्वामुळे बरेच अस्वस्थ झाले होते आणि गांधींजीनी असे भाषण करण्यांत सभ्यतेच्या, सदभिरुचीच्या आणि औचित्याच्या मर्यादांचे उल्लंघन केले असेंच त्यांना वाटले. तथापि टिळकांना मात्र गांधींच्या भाषणांत आपल्या गरीब व असहाय्य बांधवांच्या हिताबद्दलची निरतिशय आस्था, त्यांच्या दु:स्थितीबद्दलची सहानुभूति आणि त्यांच्या सामाजिक व आर्थिक उद्धाराबद्दलची कळकळच ओतप्रोत दिसून आली.

' हा कोण संप्रति नवा पुरुषावतार ' असेंच गांधींजींच्या या हालचाली व कृती पाहून टिळकांना वाटले. त्यांना दडपून टाकणें शक्य नाहीं आणि इष्टही नाहीं अशी टिळकांची खात्री पटली आणि अखिल भारतीय नेतृत्वाच्या कामी त्यांना प्रतिस्पर्धी न मानतां त्यांना हरप्रकारे पाठिंबा देऊन त्यांच्या सामर्थ्याची वाढ होण्यासाठींच आपण झटलें पाहिजे, इतका फरक टिळकांच्या मनोवृत्तीत त्यांचा मृत्यू महिनापंधरा दिवसांवर आला असतांना पडला होता. या विधानाला भरभक्कम आधार म्हणजे दोन आहेत. एक आधार म्हणजे अवंतिकाबाई गोखले यांनी गांधींजींचे जे चरित्र १९१८ साली लिहून प्रसिद्ध केले त्या चरित्राला टिळकांनी लिहिलेल्या प्रस्तावनेचा आणि दुसरा आधार म्हणजे १९२० च्या जुलै महिन्यांत टिळकांची व काकासाहेब खाडिलकर यांची जी तत्कालीन राजकीय परिस्थितीबद्दलची दोन तास चर्चा झाली त्या चर्चेचा खाडिलकरांनी लिहिलेल्या त्याबद्दलच्या हकीकतीचा. अवंतिकाबाई गोखले यांच्या गांधी-चरित्राला लिहिलेल्या प्रस्तावनेत टिळकांनी म्हटले आहे कीं थोडी अधिक स्वस्थता व फुरसद या कामासाठीं मिळाली असती तर बरे झाले असते. पण अशी फुरसद मिळाली असती तरी आशयाच्या दृष्टीने त्यांनी लिहिलें असतें त्याहून काही निराळे लिहिले असते असें वाटत नाहीं. कारण टिळकांच्या विचाराचा गाभा नेहमी ठाम व दृढ असे. तसेच खाडीलकरांनी 'खुद्द टिळकांचेच उद्‌गार' या मथळ्याखाली, २० जुलै १९२१ च्या 'लोकमान्य' दैनिकाच्या अग्रलेखांत केलेले लेखन अगदी स्वच्छ, साफ, ठाशीव, असंदिग्ध असें असून ते शंभर टक्के विश्वसनीय आणि म्हणूनच शब्दरूप पावलेले टिळकांच्या तत्कालीन मनोव्यापारांचे प्रतिबिंबच मानलें पाहिजे.

प्रथम गोखलेबाईंच्या गांधीचरित्राला लिहिलेल्या टिळकांच्या प्रस्तावनेत काय लिहिलें आहे ते पाहू या. टिळक म्हणतात, "महात्मा गांधी यांचे चरित्र बोधप्रद आणि अनुकरणीय का व्हावें याची कारणे शोधून काढण्याला माझ्या

मते फार परिश्रम नको आहेत.........शील किंवा चारित्र्य, ज्यामुळें या कर्ममय भूमीत मनुष्याची सभोवतालच्या वस्तुस्थितीवर सत्ता चालू शकते आणि ज्यामुळें निरनिराळ्या गोष्टींबद्दल केलेल्या प्रयत्नास सिद्धि प्राप्त होण्याचा संभव उत्पन्न होतो तें शील व चारित्र्य, ज्या उदाहरणांवरून आपल्या प्रत्यक्ष निदर्शनास येईल अशी चरित्रें आमच्याकडे फारच कमी दृष्टोत्पत्तीस येतात. गांधींच्या चरित्राचे जें कांही वैशिष्टय आहे तें हेंच होय. त्यांचे चरित्र सामान्य मनुष्यास खरोखरच आदर्शभूत होण्यासारखे आहे.........देशाच्या उन्नतीसाठी जे कांही प्रयत्न करावयाचे त्याला काळाची कांही विशिष्ट मर्यादा असते असें नाहीं. पूर्वीच्यांनी असे प्रयत्न केले नसले तर पुढच्या लोकांनी करू नयेत असें नाही. आज केले नाही तर उद्या करू नयेत असे नाही. आणि उद्यां केले नाहीत तर परवा करू नयेत असेंहि होत नाही. अशा तऱ्हेचे प्रयत्न करणें हे आपले कर्तव्य आहे आणि ही कर्तव्यजागृति ज्याच्या ज्याच्या मनांत ज्या क्षणी होईल त्या त्या क्षणीं त्यांने हें आपले कर्तव्य बजावण्यास निरलसपणे स्वार्थत्याग करून, निष्काम बुद्धीने कामाला लागलें पाहिजे हा यांतील सारभूत सिद्धान्त आहे. महात्मा गांधी यांच्या चरित्रावरून जो कांही बोध घ्यावयाचा त्यापैकीं मुख्य बोध हा होय.

"अलीकडे दुसरी एक अशी समजूत होत चालली आहे की, हिन्दुस्तान देशाची स्थिति सुधारण्यास प्रथमतः हिंदी समाजाची स्थिति सुधारली पाहिजे आणि ही सुधारेल तेव्हां मग पुढे राजकीय गोष्टींचा विचार करण्याची वेळ येईल. महात्मा गांधी यांच्या चरित्रावरून वरील मत किती अयथार्थ आहे हे वाचकांस सहज कळून येणारे आहे. देशांतील सर्व सुधारणा घडवून आणण्यास देशांतील सत्ता, पूर्ण नाही तरी बऱ्याच अंशाने देशांतील कर्त्या आणि विचारी पुरुषांच्या हातांत असावी लागते. महात्मा गांधीचे असे मत नसते तर ते राजकीय सुधारणेंत बिलकूल पडले नसते. आफ्रिकेंतील वसाहतीत गेलेल्या हिंदी मजुरांच्या कल्याणार्थ त्यांनी जे प्रयत्न केले ते केवळ सामाजिकच होते असे नाही. आफ्रिकेतील राज्यव्यवस्थेशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध होता. किंबहुना, आफ्रिकेंतील जुलमी राज्यव्यवस्थेमुळेंच तेथील हिंदी मजुरांवर हा प्रसंग ओढवलेला होता असे म्हटले तरी चालेल. याचा गांधी यांच्या मनावर स्वभावतःच असा परिणाम झाला कीं, राज्यव्यवस्थेत, सुधारणा झाल्याखेरीज आफ्रिकेतील हिंदी लोकांची स्थिति सुधारणार नाही. इंग्रजी साम्राज्याचे जर आम्ही भागीदार आहों तर या साम्राज्यांत गोऱ्या प्रजेला जे हक्क आहेत तेच हिंदी प्रजेसही असले पाहिजेत हें न्यायदृष्टया स्पष्ट व उघड आहे. पण आफ्रिकेंत मागे नीग्रो लोकांस ज्याप्रमाणे ते वागवीत होते त्याचप्रमाणे हिंदुस्तानांतील काळ्या

लोकांस मजूर म्हणून तेथे नऊन केवळ पशूंप्रमाणे त्यांस वागविण्याची आणि त्यांच्या परिश्रमांवर आपण समृद्ध होण्याची वसाहतवाल्यांनी कल्पना काढली आणि आमच्या हिंदुस्तानांतील नोकरशाही वसाहतवाल्या बांधवांचीच असल्या-मुळें वसाहतींतील हिंदी मजुरांच्यां शोचनीय स्थितीकडे हिंदुस्तान सरकारचे जावें तितके लक्ष गेलें नाहीं. ही शोचनीय स्थिति हिन्दुस्तानांतील पुढारी लोकांच्या लक्षांत येऊन गेल्याला पुष्कळ वर्षे झाली. पण गांधींसारखे पुरुष पुढें येईपर्यंत तिचे अल्पदेखील निवारण झालें नाही. या कुचंब्यातून लोकांना बाहेर काढून गांधींनी आपल्या उदाहरणानें सुधारणेचा मार्ग दाखविला,

"आफ्रिकेंतील हिंदी लोकांस त्यांच्या विपन्नावस्थेतून सोडविण्यास गांधी यांनी काय केले याचेंहि जरा सूक्ष्म रीत्या अवलोकन केले पाहिजे. एखाद्या ठिकाणच्या राज्यव्यवस्थेत सुधारणा करण्याचा प्रयत्न करणें हा काही न्याय-दृष्टचा राजद्रोह होऊं शकत नाही. याला राजद्रोह म्हणणे हें राज्यकर्त्यांना न्याय नको, नीति नको, अन्यायाचा प्रतिकार करावयास नको, आपल्या प्रजेस समतेचे हक्क द्यावयास नकोत, असें म्हणण्यासारखें आहे. आम्ही असें समजतो कीं, प्रजेचे कल्याण हेंच राजसत्तेचे खरे ध्येय व सामर्थ्य आहे. हा सिद्धांत एकदा पतकरला म्हणजे मग ज्या ठिकाणीं अन्याय आहे तेथे त्याचा प्रतिकार करून तो दूर करणे म्हणजे एक प्रकारे राजसत्तेच्या ध्येयाची अमल-बजावणी करण्यास मदत करणें होय असा त्यापासून सहजच दुसरा सिद्धांत निघतो. पण पूर्वसंचितामुळें आलेले दुराग्रह अगर स्वार्थबुद्धि यांमुळे प्रजाजनां-पैकीं कांही विशिष्ट व्यक्ती, जाती किंवा वर्ग कधी कधीं इतके पछाडले जातात कीं त्यांना हीं न्यायाची तत्वे दिसेनाशी होतात अर्थात् अशा वर्गांचा इतर लोकांवर एक प्रकारे जुलूम होऊ लागतो. अशा वेळीं राज्यकर्त्यांनी त्यांत एकदम हात घातला आणि अन्यायाच्या गोष्टी बंद केल्या तर या दुराग्रही व स्वार्थी पण परंपरागत वजनाने प्रतिष्ठित बनलेल्या वर्गास दुखवावे लागते, त्यामुळें शांततेची चालत असलेली घडी विस्कळीत होते. यास्तव अशा प्रकारच्या स्थितींत ज्यांच्या वर जुलुम होतो त्यांच्याकडून निकराचे प्रयत्न झाल्याखेरीज राज्यकर्ते प्राय: त्यांत मन घालीत नाहीत. प्रजेच्या दुःखाची किंवा गाऱ्हाण्याची किंवा त्यावर होणाऱ्या जुलमाची स्थिति बदलून शेवटी राज्यकर्त्यांकडूनच सुधारणा घडवून आणणे हें प्रत्येक देशभक्ताचे हरएक प्रसंगी कर्तव्य आहे आणि हे कर्तव्य गांधी यांनी उत्तम प्रकारे बजावले यामुळेंच ते सर्व लोकांच्या स्तुतीस व आदरास पात्र झाले आहेत. परंतु, गांधींच्या या अडवणुकीच्या मार्गाचे खरे रहस्य सांग-ण्यास आणखी दोन शब्द सांगितले पाहिजेत. देशांत शांतता राखण्यासाठी जे कायदे केलेले असतात त्यांत राज्यकर्त्या अंमलदारांशी दांडगाई करणें अगर

त्यांचा हुकुम तोडून बंड करणे या गोष्टी कितीही सद्बुद्धीने केलेल्या असल्या तरी स्वभावतःच त्या बेकायदेशीर मानल्या जातात. अशा वेळी ज्या देश-भक्ताला आपली इच्छित सुधारणा कायदेशीर रीतीने अंमलांत आणावयाची असेल त्याच्या मार्गात अनेक अडचणी उपस्थित होतात. मन जळत असतें. सुधारणा करण्याची उत्कट इच्छा असते. कायद्याच्या मर्यादेचे उल्लंघन करणें गैरशिस्त होय अशी खात्री असते, पण उपाय सुचत नाही. गांधी यांनी स्वीका-रलेला निःशस्त्र प्रतिकाराचा, अडवणुकीचा किंवा त्यांच्या भाषेंत बोलावयाचे तर सत्याग्रहाचा मार्ग अशा प्रकारच्या अडचणींतच त्यांना सुचलेला असून त्यांनी अनेक अडचणी सोसून, त्या मार्गाचा अवलंब केल्यामुळे तो आतां शास्त्रपूत झाला आहे. हा मार्ग, सर्व प्रसंगी, सर्व काळी अवलंबिण्यासारखा असला तरी तो हरएक प्रसंगी उपयोगात आणावाच किंवा नाही हें निश्चयानें सांगणे कठिण आहे. तथापि, त्या मार्गाची योग्यता मोठी आहे हे सर्वांस कबूल करावें लागेल. राजाने केलेल्या कायद्याप्रमाणे सर्व प्रजेनें वागावे म्हणूनच प्रत्येक काय-द्याच्या मागें तो उल्लंघन करणाऱ्यास शासन सांगितलेलें असतें. हें शासन प्रायः अशा प्रकारचे असते कीं, त्यामुळें मनुष्यमात्राची प्रवृत्ति नीतीने वागण्या-कडे व्हावी. नीतीचा मार्ग सुखाचा, समाधानाचा, आणि शांततेचा असतो. आणि त्या मार्गाने जाण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तींत जर स्वार्थामुळे थोडी चलबिचल होण्याचा संभव असला तर हे कायद्याचे शासन ती चलबिचल काढून टाकून मनुष्याची सन्मार्गाकडे असलेली स्वाभाविक निष्ठा दृढ करण्यास कारणीभूत होते. पण त्याच्या उलट स्थितींत म्हणजे जेव्हां कायद्याने, ठरविलेली, मर्यादा धर्ममूलक अगर न्यायमूलक नसून केवळ कायद्यांत सांगितलेल्या शासनामुळेंच ती अंमलात यावी असा प्रचलित कायद्यांचा परिणाम होऊं लागतो तेव्हां कायद्याने दिलेले शासन सोसून धर्मतत्वावरची अथवा न्यायतत्वावरची आपली सत्यनिष्ठा कसोटीला लावावी अथवा कृत्रिम कायद्यांतील शासनाच्या भीतीनें ईश्वरनिर्मित न्यायतत्वाचा अव्हेर करण्यास प्रवृत्त व्हावें असा शहाण्यासुर्त्या मनुष्याच्या डोळ्यापुढेंही एक महत्वाचा प्रश्न उभा राहातो.

"सत्यनिष्ठ आणि न्यायनिष्ठ माणसें कायद्याचा कृत्रिम निर्बंध अशा वेळीं पाळणें युक्त नाही असे सांगतात. पण हें सांगणें अंमलांत येण्यास सत्या-वरील व न्यायावरील निष्ठा इतकी तीव्र असावी लागते की स्वतःच्या किंवा आपल्या बायकामुलांच्या सुखासुखाचा, बलाबलतेचा विचारही मनांत न आणता मनुष्य आपले कर्तव्य करण्यास झट्दिशी प्रवृत्त होईल. ज्याला मानसिक धैर्य, ख़री सत्यानिष्ठा, किंवा सात्विक शील अथवा दानत म्हणतात तें हेंच होय. हा गुण केवळ विद्वत्तेने येत नाहीं, केवळ चांगल्या कुळांत उत्पन्न झाल्यानेंहि

येत नाही, आणि केवळ बुद्धिमत्तेनेंहि येत नाही. खरे आत्मबल हेंच होय. आणि उपनिषदांतील, "नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुधा श्रुतेन" हें तत्व नीट लक्षांत ठेविलें पाहिजे, पण अशा प्रकारचे आत्मबल नुसत्या विद्वत्तेनें अगर बुध्दिमत्तेने प्राप्त होण्यासारखें नसून तें नैसर्गिकच पाहिजे हा सिद्धांत जरी खरा असला तरी निश्चयी मनुष्याला हा गुण गीतेंत सांगितल्याप्रमाणें अभ्यास आणि वैराग्य यांच्या योगानें, क्रमाक्रमानें नेहमी प्राप्त होण्यासारखा असतो हेंही विसरतां कामा नये. थोर व उदार पुरुषांची चरित्रें शीलचारित्र्यसंवर्धनास उपयोगी पडतात यांतील बीज हेंच होय. ज्याचा स्वभाव निसर्गतःच सात्विक असतो त्याला आपल्या स्वभावाची पूर्ण ओळख पटण्यास, किंवा त्याची पूर्ण वाढ करण्यास थोर पुरुषांच्या चरित्रांचे वाचन हें एक उत्तम साधन होते इतकेंच नव्हे तर ज्यांचा स्वभाव अगर प्रकृति जन्मतःच अपरिपक्व असेल त्यांसहि सदर प्रकृति परिपक्व दशेस आणण्याला थोर विभूतींच्या चरित्रांचा चांगला उपयोग होत असतो. म्हणून महात्मा गांधी यांचे चरित्र या व्यापक दृष्टीने सर्वांनीं वाचावे अशी त्यांस आमची शिफारस आहे".

सन १९१८ मध्यें १६ मार्च रोजी टिळकांनी ही प्रस्तावना लिहिली तेव्हां ते चिरोल खटल्याच्या निमित्ताने इंग्लंडला जाण्याच्या तयारीत गुंतले होते. जॉइंट पार्लमेंटरी कमिटीसमोर मॉंटेग्यू यांच्या राजकीय सुधारणाबाबत कॉंग्रेसतर्फे साक्षहि त्यांना द्यावयाची होती. तथापि गांधीच्या तेथपर्यंत झालेल्या सर्व हालचालींचा त्यांचा अभ्यास संपलेला असल्याने त्यांनी गांधींचे मोजमाप कसें व किती कुशलतेने घेतलेले आहे तें या प्रस्तावनेवरून चांगले समजून येते. हिंदुस्तानाच्या सार्वजनिक जीवनांत व राजकारणांत आपल्या स्वतंत्र तेजाने तळपूं लागलेल्या या नव्या ताऱ्याचे स्वागत त्यांनी मनःपूर्वक केले, त्यांच्या नव्य सत्याग्रह मार्गाची काळजीपूर्वक समीक्षा करुन त्याचे शुभचिंतन केले आणि त्यांच्या चरित्रावर अनुकरणीय व बोधप्रद असा शिक्का मारला. त्यांचा इंग्लंड-मध्ये मुक्काम होता त्या काळांत, रौलट कायद्यांच्या विरुद्ध जप्त केलेल्या राज-द्रोही वाङ्मयाची उघडपणे विक्री करण्याचा जो सत्याग्रह गांधीनीं आरंभिला त्याला पूर्ण पाठिंबा द्यावा असे संदेश त्यांनी आपले अनुयायी नॅशनल युनियन व होमरूल लीगच्या मुंबई शाखेचे सेक्रेटरी डॉ. दिनकर धोंडो साठये यांना व तेव्हां 'केसरी'चे संपादक असलेले खाडीलकर, व 'मराठा'चे संपादक असलेले बाबुराव गोखले यांना पाठविला आणि इंग्लंडहून परत आल्यावर त्यांच्या स्वागतासाठी मुंबईस भरलेल्या जाहीर सभेत असे उद्गार काढले की गांधींनी जेव्हा रौलट कायद्याविरुद्ध सत्याग्रह केला तेव्हां मी हिंदुस्तानात त्यांत सामील होण्याला नव्हतों याबद्दल मला खेद वाटतो. या काळांतच केव्हां तरी दादासाहेब

खापर्डे एकदां टिळकांना असे म्हणाले कीं, 'बळवंतराव, हा गांधी आपला माणूस नाहीं'. त्यावर टिळकांनी त्यांना असे सुनावले कीं, 'तो आपला नसला तर त्याला आपलासा केला पाहिजे. हें पाणी कांही निराळेंच आहे आणि त्याचा राष्ट्रकार्याला उपयोग झालाच पाहिजे!'

गांधीजी आणि त्यांचा हिंदुस्तानच्या सार्वजनिक जीवनांतील प्रवेश व वागणूक यांविषयी टिळकांची अशी मनोवृत्ति असतां १९१९ च्या डिसेंबर महिनाअखेर अमृतसर येथे झालेल्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं अधिक निकट असा संबंध उभयतांचा आला आणि थोडा संघर्ष देखील झाला. नव्या राजकीय सुधारणांबाबत काँग्रेसने कोणते धोरण अनुसरावे हा प्रश्न विषयनियामक कमिटींत विचारासाठी आला तेव्हां महात्मा गांधींचें म्हणणें असे होतें कीं सुधारणांचा उपयोग करावयाचा तर हातचे कांही राखून न ठेवता मनापासून त्या स्वीकाराव्या आणि पूर्ण सहकार्य करावे. नेमस्तांची विचारसरणी अशीच बिनशर्त सहकार्याची होती. देशबंधु चित्तरंजन दास यांच्या मते या राजकीय सुधारणा अपुऱ्या, निराशाजनक व असमाधानकारक' असल्यामुळे त्यांचा धिक्कारच केला पाहिजे व त्या जितक्या लवकर संपविता येतील तितक्या लवकर संपविल्या पाहिजेत अशी भूमिका त्यांनी घेतली. काँग्रेसच्या अधिवेशनासाठी अमृतसरला जात असतां, बादशहांचा राजकीय कैद्यांची सुटका करण्याचा व नोकरशाहीला सहकार्याचे धोरण अंमलांत आणण्याचा आदेश देणारा जाहीरनामा प्रसिद्ध झाला, तेव्हां त्याचे स्वागत टिळकांनी 'प्रतियोगी सहकारिते'ची तार पाठवून केले. ही तार नवीन राजकीय सुधारणांचा स्वीकार करण्याबाबत नव्हती हे वरवर पहाणाऱ्यांच्या लक्षांत आले नाहीं. पण विषयनियामक कमिटीत हा खुलासा होऊन गांधी, दास व टिळक या सर्वांचा समन्वय होण्याच्या दृष्टीने सुधारणांबाबतच्या ठरावांत इतकेंच म्हणण्यांत आले कीं त्या आपल्या उन्नतीसाठी व हितासाठी राबवाव्या.

पण पुढें प्रकार असा झाला की पंजाबांत जालियनवाला बागेंत निरपराध लोकांची कत्तल झाली आणि मुसलमानांची पवित्र स्थळें तुर्कस्थानच्या बादशहांच्या हातातून म्हणजे खलिफांच्या हातांतून काढून घेण्यात आली. यामुळें हिन्दुस्तानांत मोठा असंतोष माजला आणि महात्मा गांधी इतके बदलले कीं मनापासून सहकारिता करण्याची भूमिका सोडून ते ब्रिटिश सरकाराशीं असहकारिताच केली पाहिजे असे म्हणू लागले. त्यांनी असहकारितेचा म्हणून जो कार्यक्रम मांडला त्यात नव्या सुधारणाकायद्याखाली स्थापन होणारी कायदेमंडळें पूर्णपणे बहिष्कृत करावी, न्यायकोर्टांवर वकील मंडळींनीं बहिष्कार घालावा आणि शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक संस्थांवर बहिष्कार घालावा, तसेंच

ज्यांना पदव्या, पदके वगैरे सरकारी मानचिन्हे मिळाली आहेत त्यांचा त्यांनी त्याग करावा. पायरीपायरीने ही असहकारिता वाढत जावी आणि सरकारला कर भरण्याचे लोकांनी बंद करावें. असा मतप्रचार गांधी करू लागले व लोक-मताच्या या कार्यक्रमाला पाठिंबा मिळावा म्हणून झटूं लागले. गांधींच्या या नवीन उद्योगाला टिळकांचा पाठिंबा केव्हांच मिळाला नसता असें मत टिळ-कांचा १ ऑगस्ट १९२० रोजी मृत्यू झाल्यानंतर पुष्कळ लोक मांडीत असत. परंतु याला खुद्द टिळकांच्या उद्‌गारांत मुळींच आधार सांपडत नाही. असहका-रितेच्या आंदोलनाबद्दल बनारस येथे जून १९२० मध्ये भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या सभेत बोलतांना व इतर प्रसंगी अभिप्राय देतांना माझे सर्व आयुष्य असहकारितेच्या तत्वाने व्यापलेले आहे अशा तऱ्हेचे स्पष्ट उद्‌गार टिळकांनी काढलेले आहेत. महात्मा गांधी टिळकांच्या मृत्यूपूर्वी पंधरा दिवस टिळकांशी बोलत असतांना टिळकांनी स्वच्छपणाने आणि मोकळ्या मनाने गांधींना सुचविले की तुमच्या चळवळीचीं तत्वें मला पूर्णपणे मान्य असून या चळवळींने हिंदुस्तानचें खरेंखुरे कल्याण जरूर होईल हें मला कबूल आहे. पण लोकांकडून या तत्वांचे आचरण होणे अवघड असल्यामुळें आपण जर तसें करू शकलां तरच यशाचे वाटेकरी व्हाल.

"म्हणजे असहकारितेची तपश्चर्या अल्पावकाशांत लोकांच्या हातून पार पडेल किंवा नाही याविषयी टिळकांच्या मनांत संदेह होता असें वरील उद्-गारांवरून स्पष्ट होते. पण संदेह होता एवढ्यामुळे त्यांनी लोकांना असहकारितेचीं तत्वें उचलण्यास सांगितलें नसतें असें मुळींच म्हणता येत नाही.अपयश येईल म्हणून खबरदारी घेणे व सतत उद्योग करणें हा भाग निराळा व अपेशाचा संभव आहे म्हणून उद्योगाची दिशा फिरविणें हा भाग निराळा. यश किंवा अपयश याविषयीं आसक्ति न ठेवतां, आज नाहीं उद्यां, एक वर्षात नाहीं तर दोन वर्षात, एका पिढीत नाहीं तर दोनचार पिढ्यांत यश येईलच येईल अशा दृढ भावनेने व श्रद्धेने करीत असलेल्या उद्योगाच्या मनोवृत्तीला चिकाटी असें म्हणतात आणि टिळक तर अशा चिकाटीचे मूर्तिमंत पुतळाच होते. तेव्हां महात्मा गांधींच्या असहकारितेच्या चळवळींत पूर्ण स्वराज्याच्या प्राप्तीसाठी जितक्या देशभक्तांनी मनोभावाने पडावयास पाहिजे तितक्या देशभक्तांची संख्या वर्ष दोन वर्षांत भरणार नाही या शंकेमुळें टिळकांनी माघार घेतली असती असें मुळींच संभवत नाहीं. असें म्हणणे म्हणजे टिळक हे टिळक नव्हते अशा तऱ्हेची टिळ-कांची निंदाच करणें होय. वर्तन, उद्‌गार व त्यावरून निघणारी अनुमानें या बाबी एका बाजूस ठेविल्या तरी शेवटच्या दोनचार आठवड्यांतील टिळकांचे वर्तन व उद्‌गार विशेष महत्वाचे आहेत " असे खाडीलकर म्हणतात. याच

सुमारास कलकत्यास भरणाऱ्या जादा राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान आपण स्वीकाराल का अशी विचारणा खाजगी पत्राने देशबंधु चित्तरंजन दास यांनी टिळकांकडे केली होती. दोनही बाजूंनीं दोनचार दिवस बरीच चर्चा होऊन टिळकांनी अखेरीस हें अध्यक्षपद आपणांस नको असें दासबाबूंना कळविले होते. पुणे सोडून मुंबईस जाण्याला निघण्याच्या शेवटच्या दिवशी टिळकांनी खाडीलकरांना बोलावून घेतले. कारण ते आपल्या आजारी असलेल्या वडील बंधूंना भेटण्यासाठी सांगलीस जाणार होते व टिळकांना मुंबईस जावयाचे होतें आणि तत्कालीन परिस्थितीबद्दल खाडीलकरांशी खल करण्याची त्यांची इच्छा होती. कलकत्याच्या जादा काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्षस्थान आपण का नाकारले हें सांगण्यालाच टिळकांनी खाडीलकर आल्याबरोबर सुरुवात केली.

टिळक म्हणाले, "महात्मा गांधी यांची असहकारितेचीं तत्वें कोणाहि विचारी पुरुषास अमान्य होण्यासारखी नाहीत. तथापि निरनिराळ्या व्यवसायांच्या आणि दर्जाच्या लोकांत ती निरनिराळ्या प्रमाणांत अंमलांत येण्याचा संभव असल्यामुळें प्रमाणाच्या भेदाला अनुसरुन कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेंत दोनचार तट दृष्टीस पडल्यावाचून राहाणार नाहींत; आणि कदाचित या तटांमुळे कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेचे दोनतीन तुकडे होण्याचा संभव आहे. हे तुकडे होऊ नयेत म्हणून त्यावेळीं मोठ्या जोराची खटपट करावी लागेल आणि निरनिराळ्या पक्षांना राष्ट्रीय सभेच्या चारपांच वर्षे संघटित झालेल्या राजकीय शक्तींत कमीपणा आणूं नका असे आग्रहपूर्वक सांगून राष्ट्रीय सभेची शक्ती या नात्याची जूट कायम ठेवण्याचा उद्योग मला करावा लागेल. निरनिराळ्या तटांची ही तोंडमिळवणी तडजोडीने व मोकळेपणाने मला करतां यावी म्हणून मी अध्यक्षपद स्वीकारले नाहीं. मवाळ निघून गेल्यानंतर राष्ट्रीय सभेंत पुन: दुसरा भंग होण्याची ही वेळ असल्यामुळें राष्ट्रीय सभेची शक्ति कमी होऊन देण्याचे काम अध्यक्षांच्या कामाहून मला अधिक महत्वाचे वाटत आहे. राष्ट्रीय सभेंत मतभेद असले तरी राष्ट्रीय सभेच्या हल्लींच्या अनुयायांनी एकोप्याने वागूनच नोकरशाहीशीं झुंजले पाहिजे; एरवी स्वराज्याचे पाऊल पुढें पडणार नाहीं. मी कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभचें अध्यक्षस्थान स्वीकारीत नाही याचे कारण हा असला एकोपा राखण्याला माझा उपयोग अधिक होईल असे मला वाटत आहे. कोणत्याहि एका मताचा अभिमान मी या वेळी धरता कामा नये; आणि राष्ट्रीय सभेचे सर्व अनुयायी एका मार्गाने वागतील अशी खबरदारी घेणे या प्रसंगी मला अधिक कल्याणप्रद वाटत आहे".

अध्यक्षस्थान नको म्हणण्याच्या वेळचे टिळकांचे वरील विचार ज्यांना ज्यांना माहीत आहेत त्यांना त्यांना कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेनंतर राष्ट्रीय

पक्षाने कौन्सिलात जाण्याचे नाकारलें तें टिळकांच्या तोंडच्या खुद्द आज्ञेमुळेंच नाकारलें याविषयी बिलकूल संशय नाही. कलकत्त्याच्या कॉंग्रेस-नंतर महात्मा गांधी यांची चळवळ फार जोरावर येईल आणि या चळवळींत आपल्याला महात्मा गांधीप्रमाणें फार जोराने पडावे लागेल हे टिळकांना पूर्णपणे मान्य होते. सदर संभाषणाच्या वेळीं त्यांनी तसें बोलून दाखविले होते. अशा रीतीने एकदोन महिन्यातच चळवळ जोरावर आल्यावर गांधी व टिळक या दोघांनाहि नोकरशाही अटकेंत ठेवील असा खुद्द टिळकांचा अंदाज होता; आणि या अंदाजाच्या दृष्टीने स्वतःच्या वर्तनासंबंधाचे विचार त्यांनी खाडील-करांपुढें मांडले होते. अशा रीतीने नोकरशाहीच्या अटकेंत पडण्यापेक्षां विलायतेंत वर्ष सहा महिने जाऊन राहाणें बरें असें मला वाटतें असें टिळक म्हणाले आणि म्हणून मुंबईस गेल्यावर तशा व्यवस्थेला मी अंशतः लागणार आहे असें त्यांनी सांगितले. विलायतेंत किंवा युरोपात जाऊन पडण्यापेक्षा येथे अटकेंत जाऊन पडलां म्हणून काय बिघडले अशी शंका विचारली असतां टिळक खाडीलकरांना म्हणाले, "अटकेंत शरीराचे हाल होतील किंवा एकांतवासानें त्रास होईल म्हणून मी अटक टाळू पाहातो असें नाहीं. कारण अटकेंत ठेवण्यात शारीरिक दुःखे सोसावयाला लावण्याचा नोकरशाहीचा हेतूच नाही. या हेतूनें अटक करण्यांत येईल असे मला वाटत नाहीं. महात्मा गांधी यांच्या इच्छे-प्रमाणें जर खिलाफतीची आणि असहकारितेची चळवळ चांगली जोरावर आली तर पूर्ण स्वराज्याच्या हक्कासंबंधाने लोकांशी बोलणे लावणें नोकरशाहीला भाग पडेल आणि अशा बोलण्याच्या वेळी कॉंग्रसनें तडजोडीला यावे म्हणून अटकेंत ठेवलेल्या पुढाऱ्यांना सोडून देण्याचे मधाचे बोट जसे नेहमी पुढें करण्यांत येते तसे मधाचे बोट तयार करण्याकरिता आम्हांला अटकेंत ठेवण्यांत येईल असे मला वाटते. आणि मग या मधाच्या बोटाला भुलून पूर्ण स्वराज्याची मागणी न करतां अर्धवट तडजोडीला पुढाऱ्यांवरील प्रेमामुळे अनुयायी तयार होतील अशी मला भीति वाटत आहे. काही कमकुवत लोक तर अशा बोल-ण्याचालण्याच्या वेळी अगदी थोडक्यावरच खूष होतील आणि पुढाऱ्यांना सोडविण्याकरिता आम्ही असे केले असा बहाणा करुन आपल्या बुद्धीचा दुर्बल-पणा झाकूं लागतील. तसें होऊं नये अशी माझी उत्कट इच्छा आहे. दुर्बल-पणाने बिलकूल कमी माप घेता कामा नये. पुरें माप पदरात न पडण्यास माझी अटक कदाचित कारणीभूत होण्याचा संभव मला दिसत असल्यामुळें ती मी टाळू पाहात आहे".

तशा प्रसंगी हिंदुस्तानांत अटकेंतच आपण असल्यावर आपणाशीच तडजोडीचे बोलणेंचालणें करण्यास नोकरशाहीला ठीक पडणार नाही काय?

असा प्रश्न खाडीलकरांनी विचारला तेव्हां टिळक म्हणाले, "माझ्याशीं सलोख्याचे बोलणें नोकरशाही कधीं काळीं बोलेल असें कोणीहि मनांत आणूं नये. ज्याच्या मनांत असे येईल त्याला मनुष्यस्वभावच समजत नाहीं असें मी म्हणेन. असल्या कामाला माझा हा देह पूर्वचारित्र्यामुळें आतां निरुपयोगी झाला आहे. किंबहुना, मी सल्लामसलतींत आहे असे पाहून हट्टाहट्टाने नोकरशाही प्रसंग आला असताहि असल्या बोलण्याचालण्यापासून पराङ्मुख होईल. तेव्हां ते काम आपल्या नशींबी असणें शक्य नाहीं असें समजूनच, अटकेंतून सोडविण्याच्या मोहास अनुयायी बळी पडूं नयेत म्हणून महात्मा गांधी यांची चळवळ जोरांत आल्यावर मला हिंदुस्तान सोडून बाहेर जाणें भाग आहे. ही चळवळ जोरावर येईल आणि नोकरशाहीला स्वराज्याचे बोलणें लोकांशी करायला भाग पडेल असें मला स्पष्ट दिसत आहे. तसला तो प्रसंग समीप आल्यानंतर सलोख्याच्या वाटाघाटीचे वेळीं हिंदुस्तानांत माझा उपयोग कांहीच नाहीं हे ओळखून मी आहे. येथे काम नाही तर येथे राहा कशाला? उलट अटकेंत राहून अपुरे माप हिंदुस्तानाच्या पदरात पडण्याला मी कारणीभूत होण्याची भीति पर्यायाने मला वाटत आहे. म्हणून कांहीं महिन्यांनीं हिंदुस्तानाच्या बाहेर जाण्याच्या विचारांत मी आहे."

खाडीलकरांच्या 'लोकमान्य' दैनिकांत २० जुलै १९२१ च्या अंकांत हा मजकूर अग्रलेखाच्या रूपात प्रसिद्ध झाल्यानंतर टिळकांनीं गांधींच्या असहकारितेच्या मोहिमेला पाठिंबा दिला असता किंवा नाहीं याबद्दल वाद माजण्याचे आणि डॉ. पट्टाभि सीतारामअय्यासारख्या कॉंग्रेसचा इतिहास लिहिणाऱ्या गृहस्थाला याबद्दल विस्मयांत पडण्याचे कारण नव्हते. पण कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पक्ष काढन त्याच्यातर्फे मॉंटेग्यू कायद्याखाली होणाऱ्या निवडणुका लढवून शक्य तितके जास्त उमेदवार निवडून आणून त्यांच्यामार्फत नव्या सुधारणांचा अपुरेपणा व कृपणता दाखवून देऊन त्यांच्या जागीं अधिक भरीव अशी स्वायत्ततेची योजना करणें सरकारास भाग पाडण्याचा डाव टिळकांनी मांडला असल्यामुळे व बऱ्याच उमेदवारांची नांवेसुद्धां प्रसिद्ध केली असल्यामुळे त्यांनी असहकारितेच्या कार्यक्रमांतील निदान कौन्सिल-बहिष्कारांचे कलम तरी गांधींना रद्द करावयास लाविले असते असें बऱ्याच मंडळीस वाटत होते. लोकमान्य टिळक व देशबंधु दास यांनीं एवढे गांधीजींच्या गळी उतरविले असते आणि कौन्सिलातील अडवणुकीच्या या धोरणाला म्हणजेच मॉटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांमधील प्रांतांतील द्विदल राज्यपद्धतीला मूठमाती देऊन अधिक भरीव, जवळजवळ पूर्ण प्रांतिक स्वायत्तता मिळविण्याच्या धोरणाला, तो असहकारितेचाच प्रकार आहे असा युक्तिवाद करून, त्याला गांधीजींची मान्यता त्यांनी मिळविली असती असें म्हणणें

सयुक्तिक दिसते. कारण पुढें अशा कार्यक्रमाला, देशबंधु दास व पंडित मोतीलाल नेहरू यांनी काढलेल्या स्वराज्य पक्षाला, काँग्रेसचीच निराळ्या क्षेत्रांत काम करणारी एक शाखा अशी मान्यता देण्याला गांधीजी तयार झाले हें मशहूरच आहे.

खाडीलकरांच्या उपरिनिर्दिष्ट निःसंदिग्ध साक्षीवरून, टिळकांनी गांधीचे, राष्ट्राच्या स्वराज्य संपादनाच्या आंदोलनातील स्थान कोणते कल्पिलेले होतें हें स्पष्ट होतेंच. त्याजबरोबर ते स्वतः किती निरहंकारी आणि राष्ट्रहितासाठी पडेल तो त्याग करण्याला तयार होते हें देखील स्वच्छपणें दिसून येतें. टिळ-कांच्या चारित्र्याची अशी बरोबर जाण असल्यामुळेंच त्यांच्या एका पुण्यतिथीला आचार्य विनोबा भावे यांना श्रीमद्‌भगवद्‌गीतेमधील अठराव्या अध्यायां-तील पुढें दिलेल्या एका श्लोकांची आठवण झाली असावी. विनोबा म्हणाले, सदरहू श्लोक जणूं काहीं लोकमान्य टिळकांचे यथातथ्य वर्णन करण्यासाठींच रचला गेला आहे. हा श्लोक असा :–

मुक्तसंगोऽ नहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ।
सिद्धसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्विक उच्यते ।।

# २. असहकारितेच्या आंदोलनाचा प्रारंभ

अमृतसर येथे काँग्रेसचे दरसाल भरणारे अधिवेशन १९१९ डिसेंबरअखेर पार पडलें आणि याच अधिवेशनामध्ये पास झालेल्या ठरावांत त्यावेळी येऊ घातलेल्या मॉंटेग्यू-चेम्सफर्ड राजकीय सुधारणा 'अपुऱ्या, असमाधानकारक आणि निराशाजनक' आहेत असें त्यांचे वर्णन करण्यांत येऊन त्यांची जी कांही किंमत असेल ती लक्षांत घेऊन त्या राबवाव्या असें ठरलें. ही सगळी भाषाच असें दाखविते कीं हा ठराव म्हणजे गांधीजी, नेमस्त व डॉ. बेझंट यांचे अनुयायी आणि टिळक व चित्तरंजनदास यांनी मांडलेल्या तीन मतप्रवाहाचे मारून-मुटकून केलेले मेथकूट होतें. गांधीजींच्या मतें सरकाराशीं सहकारिता करावयाची तर ती प्रामाणिकपणें, हातचे कांही राखून न ठेविता केली पाहिजे. बेझंट यांचे अनुयायी व नेमस्त असेंच म्हणत होते. पंडित मदनमोहन मालवीय देखील याच मताचे होते. परंतु लोकमान्य टिळक व देशबंधु दास यांना मात्र मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा म्हणजें ब्रिटीश नोकरशाहीने सहकार्याच्या अपेक्षेने पुढें केलेला हात आहे असें मुळीच वाटत नव्हतें आणि प्रस्तुत देऊं केलेल्या सुधारणांचा उपयोग अशा तऱ्हेनें केला पाहिजे कीं ज्यामुळें त्यांचा अंतकाळ लवकर जवळ येऊन त्यांच्या जागी प्रांतामध्ये संपूर्ण स्वायत्तता यावी आणि त्यांमध्ये देऊं केलेल्या द्विदल राज्यपद्धतीचा म्हणजे राखीव आणि सोपीव असा केलेला खात्याखात्यांमधील भेदभाव नष्ट व्हावा. 'केसरी'च्या १९ माहे जानेवारी १९२० च्या अंकांत स्वतः टिळकांनी 'काँग्रेसचा तिहेरी लढा' या मथळ्याखाली जो लेख अमृतसर काँग्रेसला हजर राहून परत आल्यावर स्वतः लिहिला त्यावरून हे सर्व अगदी स्पष्ट दिसतें.

जे महात्मा गांधी अमृतसर काँग्रेसच्या वेळी मनापासून सहकार्य नोकरशाहीबरोबर करण्याच्या मताचे होते ते पंजाब व खिलाफत हे प्रश्न समाधानकारकपणें सोडविण्याला नोकरशाही तयार होत नाहीं असें दिसून येतांच पूर्णपणें असहकारितां करण्यासाठीं प्रवृत्त झाले आणि अशा असहकारितेची सुरुवात कशी करावी याचा कार्यक्रम लोकांपुढे मांडीत 'यंग इंडिया' व 'नवजीवन' या पत्रांतून व जाहीर सभांमधून तसा प्रचार करूं लागले. अमृतसरच्या काँग्रेसनंतर बनारस येथे ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची सभा त्यांच्या या असहकारितेच्या कार्यक्रमाचा विचार करण्याकरितां २७ मे १९२० रोजी भरविण्यांत आली.

पण तेथें कांही निर्णय न होता सप्टेंबर महिन्यात १९२० साली कॉंग्रेसचे खास अधिवेशन भरवावें आणि तेथे काय तो निर्णय राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधींनीं करावा असें ठरलें. महात्मा गांधींचा प्रचाराचा धडाका मात्र सुरू होता. टिळकांचा मृत्यू मुंबईस सरदारगृहामध्ये १ ऑगस्ट १९२० रोजी झाला. जुलै महिनाभर त्यांची प्रकृती ठीक नव्हतीच. त्यांच्या मृत्यूपूर्वी पंधरा दिवस आधी झालेल्या टिळकांबरोबरच्या भेटीत व चर्चेत टिळकांनी गांधींना सांगितले होतें कीं माझे सर्व आयुष्य असहकारितेनेंच भरलेलें आहे. तेव्हां तुमच्या कार्यक्रमांत मला चुकीचें कांहीं दिसत नाही. पण एवढी मोठी उडी जनतेला एकदम झेपेल किंवा नाहीं यांबद्दल मला साशंकता आहे, म्हणजे ते या चळवळीच्या विरुद्ध मुळींच नव्हते आणि गांधींजींना या मोठ्या कार्यांत यश यावें आणि त्यासाठीं आपण होईल ती सगळी मदत करावी अशा मताचेच ते होते.

स्पेशल कॉंग्रेसच्या वेळी ते जिवंत राहून हजर राहिले असते तर त्यांनी गांधींच्या कामांत मोडता घातला नसता असें अनुमान अगदी सयुक्तिक आहे. बनारसला चर्चेचा सगळा भर पंजाबांत झालेल्या जालियनवाला बागेंतील जनरल डायरचे अत्याचार आणि खिलाफतीबाबतचा विश्वासघात यांवरच होता आणि या दोनही बाबतींत गांधी व मुसलमान जें काहीं ठरवितील त्याला मान्यता देण्याचे टिळकांनी ठरविले होते. परंतु असहकारितेच्या कौन्सिल बहिष्काराच्या कलमाबाबत टिळक, दास, लजपतराय व पटेल यांनीं बहुधा गांधी यांची समजूत घालून कायदेमंडळाच्या निवडणुकी लढवून बहुमत मिळविण्याच्या प्रयत्नाला संमती मिळविली असती. पण ही चर्चा व्यर्थ आहे. कारण टिळकांच्या मृत्यूमुळे सप्टेंबर १९२० मध्यें कलकत्त्यास लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अधिवेशनात सगळे चित्रच बदलून गेले. या अधिवेशनापूर्वीच्या चारपाच महिन्यांत गांधीजींनी असहकारितेचा कार्यक्रम म्हणजे असहकारिता प्रत्यक्ष व्यवहारात कशी आणावयाची याबद्दलच्या अनेक कल्पना सतत अविरतपणें जाहीर सभांतून सगळ्या देशभर मांडीत राहाण्याचा धडाका चालू ठेविला. यांत अस्पृश्यतानिवारण, स्वदेशी, मद्यपानप्रतिबंध, गोरक्षण वगैरे बाबींवर त्यांना कोणी विरोध केला नाही. सूतकताई आणि हातमागावर विणलेले कापड यालासुद्धा कोणाचा विरोध नव्हता. पण शाळा, विद्यालयें, विद्यापीठे तसेंच न्यायालयें आणि विशेषेंकरून प्रांतीय व केंद्रीय कायदेमंडळें यांजवरील बहिष्कार डॉ. बेझंट व श्रीनिवास शास्त्री प्रभृती नेमस्तांना मान्य नव्हताच. पण पंडित मालवीय, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, चित्तरंजन दास, रवींद्रनाथ ठाकूर, जीना, बॅपटिस्टा, रंगस्वामी अय्यंगार, केळकर, जयकर वगैरे कॉंग्रेसमधील नेत्यांना देखील मान्य नव्हता. गांधी व ही मंडळी यांमध्ये

याबद्दल उत्तरे-प्रत्युत्तरे चालू राहिली.

कलकत्यास सप्टेंबर १९२० मध्ये झालेली कॉंग्रेस भरेपर्यंत हा काथ्याकूट चालूच राहिला आणि गांधी आपल्या असहकारितेच्या कार्यक्रमांत कांहीं देखील फरक करण्यास तयार होईनात. ते सर्वांशी लेखी व तोंडी संवाद अत्यंत संयमित-पणें आणि आदरपूर्ण शब्दांत करीत राहिले. पण आपली भूमिका बदलण्याला मुळींच तयार झाले नाहींत आणि आपल्या कार्यक्रमाला सर्व देशाचा पाठिंबा मिळविण्यासाठी ते सर्वत्र प्रचार करीत फिरत राहिले. तेव्हाच्या ब्रिटिश सर-कारचा उल्लेख ते सतत रावणराज्य असा करीत राहिले आणि आपल्याला स्वराज्याची म्हणजे न्यायनिष्ठ व सत्यनिष्ठ राज्याची प्रस्थापना करावयाची आहे असे सारखे प्रतिपादन करीत राहिले. ब्रिटिश व इंग्रज माणसांशी आपले वैर नाही; त्यांच्या राज्य करण्याच्या रीतीशीं आणि त्यांच्या क्रूर व अमानुष कृतींशीं आपले वैर आहे असें मात्र ते काळजीपूर्वक स्पष्ट करीत असत. प्रसिद्ध अमेरिकन तत्त्वज्ञ थोरो यांजपासून स्फूर्ती घेतलेले गांधीजी असहकारिता आणि सविनय कायदेभंग यांचे जे तात्त्विक समर्थन करीत ते इंग्रजी शिकलेल्या सुशिक्षितांच्या देखील डोक्यावरून जात असे. पण गांधीजी समोर जसा श्रोतृ-वृंद असेल तशी सोपी व व्यावहारिक भाषा आपल्या विवेचनांत वापरीत. भाषण उत्तर हिन्दुस्तानांतील मुसलमान समाजापुढें असो अथवा मद्रास प्रांतां-तील इंग्रजी शिकलेल्या लोकांसमोर असो, त्यांना समजेल असें बोलण्याची धाटणी त्यांना अवगत होती.

जुलै महिन्यांत अमृतसर, लाहोर, रावळपिंडी, कराची व हैद्राबाद (सिंध) या शहरी गांधीजी लोकांना असहकारितेचे तत्त्व व ते अंमलांत आणण्यासाठी ताबडतोब अंगीकारण्याचा सुरुवातीचा कार्यक्रम समजावीत होते. त्या कार्यक्रमांत ब्रिटिश युवराजाच्या दौऱ्यावर बहिष्कार, शाळा व महाविद्यालयांवर घालण्याचा बहिष्कार, हायकोर्टे व कायदेकौन्सिले यांवर घालण्याचा बहिष्कार, पदव्या, पदकें व मानसन्मान ब्रिटिश सरकारने केले असल्यानें त्यांचा परित्याग, परदेशी कापडाचा बहिष्कार; सरकारला देण्याचीं कर्जे व सरकारचे लष्कर यांवर बहिष्कार असे विषय होते. हिंसेचे व्यावहारिक परिणाम व निःशस्त्र असताना शौर्यानें व धैर्यानें मृत्यूला तोंड देण्याचे महत्त्व यांवर ते जोर देत असत. उदाहरणार्थ, रावळपिंडी येथे बोलतांना ते म्हणाले, “सरकारास जाहीरपणे सांगा कीं आम्हांला बेशक फांशी द्या. तुरुंगात डांबून ठेवा. पण आमचे सहकार्य तुम्हांला मिळणार नाही. कारागृहात किंवा फाशीच्या तख्तावर मिळेल, पण

फौजेच्या पलटणींत मिळणार नाहीं. कायदेमंडळात अथवा सरकारच्या निरनिराळ्या खात्याच्या सेवेतही सहकार्य मिळणार नाहीं."

१२ ऑगस्ट रोजी प्रेसिडेन्सी कॉलेजच्या समोरच्या वाळूच्या मैदानावर मद्रास येथे त्यांनी एक प्रदीर्घ भाषण असहकारितेच्या कार्यक्रमावर केले. त्यात प्रारंभी त्यांनी १२ दिवसांपूर्वी स्वर्गवासी झालेल्या टिळकांचे गुणगान केलें आणि स्वीकृत कार्यासाठी कमालीचा त्याग करणें या त्यांच्या गुणावर विशेष भर दिला. नंतर त्यांनी खिलाफतीबद्दलचे मुसलमानांचे गाऱ्हाणें काय याचा खुलासा केला. ब्रिटिश मुख्य प्रधानाने खिलाफत कायम टिकविण्याबाबतच्या आपल्या आश्वासनांना बिनदिक्कतपणें हरताळ फांसला व हिंदुस्तानांतील मुसलमानांचा विश्वासघात केला, असे सांगून सर्व हिंदी जनतेनें त्याजबरोबर तदात्म झालें पाहिजे असा उपदेश केला. दुसरा विषय त्यांनी चर्चिला तो म्हणजे, जालियनवाला बाग येथे जनरल डायर व त्याच्या हाताखालच्या सर्व नोकरांनी हिंदी लोकांवर केलेल्या अत्याचारांचा. पार्लमेंट, भारतमंत्री मॉटेग्यू, व्हाइसरॉय चेम्सफर्ड या सर्वांनी भारतीयांचा उपमर्द केलेला आहे. कारण या अत्याचारांचे समर्थनच सर्वांनी केले आहे. हंटर कमिटीनेंही चौकशी करण्याचा आव आणून सारवासारव केली आहे. आणि आपली चुकी झाली आहे असा अनुताप कोणालाच झालेला नाही. याबाबत न्याय मिळविण्यास असहकारितेशिवाय दुसरा मार्ग मला सुचत नाहीं आणि म्हणून असहकारिता, अहिंसात्मक मार्गांनी अनुसरावी, असें सांगून त्या कार्यक्रमाचे गांधींनी विवेचन केले.

अहिंसक असहकारितेमध्ये बेसनदशीर असें काहींच नाही असें पुढें गांधीजींनी परोपरीनें सांगितले आणि अमृतसर काँग्रेसच्या वेळी बिनशर्त सहकारितेसाठीं आर्जवे करणारा मी, खिलाफत व पंजाब या दोन प्रकरणानंतर निखालस असहकारितेचा प्रचार करणारा कसा बनलो यांचे विवेचन केले आणि सप्टेंबरात होणाऱ्या काँग्रेसच्या खास बैठकीपर्यंत थांबण्याचे आपल्याला कांहीच कारण दिसत नाही असें त्यांनी सांगितले; कारण या जादा काँग्रेसने जरी त्यांना पाठिंबा न देतां असहकारितेचा कार्यक्रम नामंजूर केला असता तरी आपल्या निर्धारापासून मागे फिरण्याचा आपला मुळीच विचार नाहीं असें त्यांनी स्पष्ट केले. नंतर त्यांनी १९२१ च्या प्रारंभी सुरू होणाऱ्या सर्व कायदेकौन्सिलांवर निःसंदिग्ध व परिपूर्ण बहिष्कार घालावा व अखिल राष्ट्राने त्यांत सामील व्हावे असे प्रतिपादन केले. कौन्सिले म्हणजे सार्वजनिक कार्यकर्त्यांना सांपळ्यांत पकडून, निरनिराळे मोह त्यांजपुढें उभे करून, त्यांना भ्रष्ट करून सहकार्य करावयास लावण्याचा कावा किंवा डाव आहे आणि त्याला बळी पडू नये असे

गांधीजींचे स्वच्छ सांगणें होते. पुढें पुढ त्यांनी कायदेमंडळांना माया, मृगजळ वगैरे उपमाही दिल्या. कौन्सिलांत जावयाचे पण तेथे गेल्यावर राजनिष्ठेची शपथ घ्यावयाची नाही व बाहेर पडावयाचे अथवा तेथे अडवणुकीचा कार्यक्रम अंमलांत आणावयाचा हे मार्ग गांधी त्याज्य व अव्यवहार्य मानीत होते.

कौन्सिलांच्या बहिष्काराइतकीच लोकांच्या गळी उतरविण्याला कठीण अशी बाब म्हणजे वकिलांनी आणि कायदेपंडितांनी न्यायकोर्टावर बहिष्कार घालण्याची, गांधींच्या मते हा बहिष्कार आवश्यक होता याचे कारण वकील-वर्गामार्फतच सरकार आपली सत्ता टिकवून धरीत होते. अनेक विख्यात व समर्थ कायदेपंडितांनी लोकांची बाजू उचलून धरून सार्वजनिक कार्य निष्ठा-पूर्वक केले हे गांधींना मान्य होते. पण सरकारचे कंबरडे मोडण्याचा प्रश्न जेव्हां उभा राहतो तेव्हां हा कायदेपंडितांचा वर्ग स्वतःची इभ्रत व स्वाभिमान सांभाळ-ण्यासाठी सरकारलाच उचलून धरतो, म्हणून त्यांनी आपला धंदा बंद करूनच सरकारची आबरू चवाठ्यावर आणली पाहिजे. वकिलांना कोर्टाचे अंमलदार असें मानण्यांत येते व त्यांच्यावर सरकारास शिस्त धरता येते आणि तीच आपण मानीत नाही असें कायदेपंडितांनी सरकारास जाणविण्यासाठी असहकारि-तेच्या चळवळींत सामील झाले पाहिजे. याच असहकारी वकिलांकडून खाजगी लवाद स्थापन करून लोकांचे न्यायनिवाडे, तंटेबखेडे निकालात काढतां येतील व स्वदेशी न्याययंत्रणा अस्तित्वात येईल; वकीलवर्गाने आपली प्रॅक्टिस थांब-वावी याचा हा अर्थ आहे, असे गांधीजींनी मद्रासच्या या सभेंत प्रतिपादन केले.

सरकारी शिक्षणसंस्था आणि ज्या शिक्षणसंस्थावर सरकारचा ताबा आहे अशा सर्वांमध्यें शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनीं त्यांतून बाहेर पडावे आणि सोळापेक्षा ज्यांची उमर कमी असेल अशांना त्यांच्या पालकांनी त्यांना बाहेर काढावे व सरकारशी असहकार पुकारावा, असा प्रचारही गांधीनीं गांवोगांवी चालविला होता, तसा तो मद्रासच्या या सभेंतही केला. ज्या सरकारावरील आपला विश्वास संपुष्टांत आलेला आहे त्या सरकारच्या शिक्षणसंस्थांमधून सर्व विद्यार्थ्यांना सर्व हिंदुमुसलमान पालकांनी बाहेर काढावें हें त्यांचे कर्तव्यच ठरते; या संस्था म्हणजे सरकारी कामकाज चालविण्यासाठी कारकून व हमाल तयार करण्याचे व त्यांच्यामार्फत लोकांचे सहकार्य मिळविण्याचे कारखाने आहेत अशी त्यांची निंदा करून गांधी म्हणाले कीं, असहकारितेच्या तत्त्वावर विश्वास ठेवणें आणि आपले पाल्य सरकारी शिक्षणसंस्थांत ठेवणें या गोष्टी म्हणजे विसंगत वर्तनाची कमाल आहे. सरकारने दिलेली मानचिन्हें, पदव्या व पारितोषिकें परत करण्याचे आवाहन आपल्या असहकारितायोगाचे उघड

लक्षण म्हणून सर्व लोकांस केले व १ ऑगस्ट रोजी आपल्याला मिळालेली झुलु व बोअर बंडात मिळालेली आणि भारतांत परत आल्यावर लॉर्ड हार्डिंज यांच्या कारकीर्दीत मिळालेले कैसरहिंद ही सुवर्णपदकें गांधीजींनी परत केली.

मद्रास येथेंच दुसऱ्या एका सभेंत बोलतांना ते म्हणाले, आपल्या पदव्या-पारितोषिके-प्रशस्तिपत्रे यांचा त्याग करणे हा असहकारितेचा पहिला टप्पा आहे. सर्व सरकारी नेमणुकांचा त्याग करणे हा दुसरा टप्पा आहे आणि लष्करी सेवेंतून मागे फिरणें आणि सर्व प्रकारचे कर देण्याचे नाकारणे व सरकारी कर्जे विकत घेण्याला नकार देणे हा तिसरा टप्पा आहे. अशा रीतीने असहकारिता पूर्णपणें अंमलात आणली म्हणजे सरकारास राज्यकारभार चालविणें अशक्य होईल. या कार्यक्रमाचा अंमल रागानें अथवा द्वेषाने करावयाचा नसून प्रेमानेंच करावयाचा आहे. ब्रिटिश लोकांबद्दल प्रेम व विश्वास होता म्हणूनच त्यांनी केलेल्या अन्यायांबद्दल व वचनभंगाबद्दल त्यांना जाणीव करून देऊन न्याय देण्याला व वचनें पाळण्याला लावायची, अशी ही असहकारितेची प्रक्रिया आहे. ब्रिटिश युवराजाच्या दौऱ्यावरील बहिष्कार हा त्या व्यक्तीवरील बहिष्कार नव्हे, तर त्या व्यक्तीला पुढें करून आपल्या अन्याय्य वर्तनावर सफेती करू पाहणाऱ्या नोकरशाहीवरील बहिष्कार आहे आणि या असहकारितेच्या प्रयोगाचा केवळ प्राणच अहिंसेचे आचरण आहे. क्रोधाविष्ट होऊन किंवा भान हरपून, भूल पडून, भ्रम होऊन हिंसाचार कोठेही, कदापि होता कामा नये

उपरोक्त दोन भाषणें म्हणजे गांधीनीं केलेल्या असंख्य भाषणांतील केवळ मासलेवाईक उद्‌गार आहेत. जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यांत आपले या भाषणांत व्यक्त झालेले विचार शेकडों सभांतून आणि यंग इंडिया व नवजीवन या पत्रातून, कमालीची पुनरुक्ती करून मांडले. याखरीज देशांतील इंग्रजी व देशी भाषांतील दैनिक व साप्ताहिक वर्तमानपत्रांनीं त्यांच्या उद्‌गारांना व विचारांना सतत व भरपूर प्रसिद्धी दिली. कस्तुरीरंगा अयंगार व रंगस्वामी अयंगार या 'हिंदु' व 'स्वदेशमित्रन्' या इंग्रजी व तमीळ दैनिकांच्या संपादकांनी असहकारितेच्या कार्यक्रमावर जे आक्षप घेतले त्यांना त्यांनी उत्तरे दिली. कोर्टे-कॉलेजे–कौन्सिले यांजवरील तिहेरी बहिष्कारावर प्रचारांत मुख्य भर होता. कौन्सिल बहिष्काराला प्राधान्य होते. कारण निवडणुका लवकरच होऊन १९२१ सालापासून मॉटेग्यू-चेम्सफर्ड राजकीय सुधारणांद्वारे अंमलांत येणारी नवी राज्य-व्यवस्था सुरू होणार होती. पण मतदारांनी व उमेदवार होऊं इच्छिणारांनी त्यांवर कडक बहिष्कार टाकून त्यांचे प्रातिनिधिक स्वरूपच नाहींसे करून टाकावे म्हणून ही बाब ताबडतोब हातांत घेणें आवश्यक होते. शाळाकॉलेजांवरील बहिष्कारांत

विद्यार्थी, पालक आणि शिक्षक या तिघांना प्रत्यक्ष कृती करावयाची होती. विद्यार्थ्यांनीं स्वयंसेवक होऊन देशकार्य करावे आणि राष्ट्रीय शिक्षणसंस्थांची जसजशी व्यवस्था होत जाईल तसतशी त्यांत अध्ययनाची सोय लावावी. हा कार्यक्रम दीर्घ मुदतीचा असणार होता आणि नेहमीच चालविण्याचा होता. कोर्टावर बहिष्कार वकिलांनी, अशिलांनीं व न्यायाधीशांनी देखील घालावयाचा होता. म्हणजे हे कार्य सुद्धा लवकर संपणारे नव्हते व दीर्घकाल चालणार होते. हे सर्व मुद्दे गांधीजी सर्वत्र स्पष्ट करून सांगत असत. तमीळनाडूचा दौरा संपवून केरळ व आंध्र प्रांतांतही गांधींचा असाच प्रचार ऑगस्टअखेर व सप्टेंबरच्या सुरुवातीला चालला. ऑगस्टच्या २७-२८-२९ तारखांना गुजरात प्रांताची राजकीय परिषद झाली आणि त्या परिषदेत असहकारितेला पूर्ण व स्पष्ट पाठिंबा व्यक्त करण्यांत आला.

यानंतर सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात कलकत्ता येथे कॉंग्रेसचे खास अधिवेशन झाले. तेथे गांधींनी सुचविलेल्या असहकारितेच्या कार्यक्रमाला तो अव्यवहार्य आहे म्हणून खूप विरोध मालवीय, जीना, मिसेस बेझंट, चित्तरंजन दास, बिपिनचंद्र पाल यांच्याकडून झाला. परंतु त्यांचा ठराव प्रचंड बहुमताने कॉंग्रेसच्या प्रतिनिधींनी मंजूर केला. त्यावर 'यंग इंडिया' मध्ये गांधींनी लिहिलेला अग्रलेख १५ सप्टेंबर १९२० रोजी प्रसिद्ध झाला. त्या लेखात गांधीजी म्हणतात: लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॉंग्रेसच्या खास अधिवेशनात जितक्या दूरगामी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले तितक्या महत्त्वाचे निर्णय घेण्याचा प्रसंग कॉंग्रेसवर या पूर्वी कधीही आला नव्हता. असहकारितेच्या ठरावाला जसा ठासून विरोध करण्यात आला तसा विरोध देखील कॉंग्रेसने कोणत्याही प्रस्तावाला झालेला पूर्वी पाहिला नव्हता. तसाच आदर दर्शवून व चित्त एकाग्र करून बहुसंख्य लोकांनी जसा विरोधकांचा युक्तिवाद ऐकला तसा, माझ्या आठवणींत पूर्वीच्या कोणत्याही कॉंग्रेसच्या बैठकीत ऐकिला नाही, त्याचप्रमाणे विषयनियामक समितीत असहकारितेच्या ठरावाला जसा एकजुटीने विरोध झाला तसा पूर्वी कधीं झाला नाहीं, असें गांधींनी लिहिले.

"श्रीमती ॲनी बेझंट यांनी हिन्दुस्तानाची सेवा केली आहे, तिची मोठीच नोंद इतिहासाने केली आहे. पंडित मदनमोहन मालवीयजींचे नांव सर्व भारतांत सर्वांना अत्यंत आदरणीय आहे. अत्यंत शुद्ध चारित्र्य आणि अनेक वर्षांची अविरतपणें केलेली सेवा त्यांच्या नावावर जमा आहे. सामर्थ्य आणि वजनदारी सतत वाढत असणाऱ्या माणसांच्या फळीचे श्री. चित्तरंजन दास हे पुढारी आहेत. अशा वेळी मला लोकमान्य टिळकांची कॉंग्रेसमधील गैरहजरी अत्यंत

तीव्रतेने जाणवली. दख्खनचें नेतृत्व श्री. बॅप्टिस्टा यांनी केलें. मद्रासच्या राष्ट्रीय पक्षाचे नेतृत्व 'हिन्दु' पत्राचे कर्तृत्वसंपन्न संपादक श्री. कस्तुरीरंग अयंगार यांनी केले. या सर्वांनीं आणि इतर पुष्कळ पुढाऱ्यांनी असहकारितेच्या ठरावा-विरुद्ध निकराने लढा दिला. मी अधिवेशनातील सर्व प्रतिनिधींना बजावून सांगितले की, मी मांडलेल्या असहकारितेच्या कार्यक्रमामुळेंच खरी असहकारिता शक्य होईल अशी खात्री झाली असेल व त्यासाठी दु:ख सोसण्याची तयारी असेल तरच माझा प्रस्ताव स्वीकारा. पण श्रोत्यांना कृती करणें व दु:ख सोसणेंच हवें होते. मतदान कसें झालें तें अगदी तपशीलवार व खाराखुशीनें नोंदून घेण्यांत आले. मतदानासाठीं कॉंग्रेसचा मंडप मोकळा करण्यांत आला आणि त्या सर्व कारभारावर लाला लजपतराय स्वत: देखरेख करीत होते. सहा तास हे काम चालू होते. सेंट्रल प्रॉव्हिन्सेस आणि वऱ्हाड हा एक अपवाद सोडून सर्व प्रांतांनी माझ्या ठरावाला अनुकूल मत दिलें. त्या प्रांताने मला ३० आणि बिपिनचंद्र पाल यांच्या उपसूचनेला ३३ मतें दिलीं. बाकीचे मतदानाचे आकडे पुढीलप्रमाणे :—

| प्रदेश | ठरावाला अनुकूल | ठरावाला अनुकल |
|---|---|---|
| मुंबई | २४३ | ९३ |
| मद्रास | १६१ | १३५ |
| बंगाल | ५५१ | ३९५ |
| यू.पी. | २५९ | २८ |
| पंजाब | २५४ | ९२ |
| आंध्र | ५९ | १२ |
| सिंध | ३६ | १६ |
| दिल्ली | ५९ | १२ |
| बिहार | १८४ | २८ |
| ब्रह्मदेश | १४ | ४ |
| सेंट्रल प्रॉव्हिन्सेस | ३० | ३३ |
| वऱ्हाड | ५ | २८ |
| एकूण | १८५५ | ८७३ |

"माझ्या ठरावांत खिलाफत कमिटीचा सर्व कार्यक्रम आणि कर देण्याचे नाकारणे या सर्व असहकारितेच्या अंगोपांगांचा अंतर्भाव होता. तावडतोब हातीं घेण्याच्या बाबी म्हणजे पदव्या-पारितोषिकें परत करणें व सर्व सन्मानदर्शक पदें नाकारणे, कोर्टावर वकिलांनीं व अशिलांनीं बहिष्कार घालणें, शाळा-कालेजांमधून

विद्यार्थ्यांनी बाहेर पडणें व मॉंटफर्ड सुधारणामुळें यऊ घातलेल्या कायदेकौन्सिलांच्या निवडणुकांवर उमेदवारांनी व मतदारांनीं बहिष्कार घालणे, अशा होत्या. बिपिनचंद्र पाल यांची सूचना होती कीं आपल्या मागण्या एका शिष्टमंडळाने विलायतेस जाऊन मांडाव्या आणि मध्यंतराच्या काळांत राष्ट्रीय विद्यालये स्थापन करावीं, लवाद न्यायमंडळें स्थापावीं आणि कायदेमंडळांवर बहिष्कार घालू नये. त्यांच्या अशा प्रकारच्या उपसूचनेचा परिणाम, ती पास झाली असती तर परिणामत: असा झाला असता की निवडणुका लढवाव्या व कायदेमंडळात अडवणुकीचे धोरण अवलंबावे. म्हणून विरोधकांचा मुख्य भर कौन्सिल बहिष्काराच्या मुद्द्यावर होता. आणि कॉंग्रेसने तर प्रचंड बहुमताने कौन्सिलांकडे ढुंकूनही पाहू नये असा ठराव पास केला आहे. स्वराज्यसंपादन कौन्सिल बहिष्कारामुळे लांबणीवर पडेल असे ज्यांना वाटत नसेल ते सर्व सामर्थ्यानिशी कॉंग्रेसचें उद्दिष्ट सिद्ध होण्याला झटतील अशी मला आशा आहे.

"या मतदानाचें पृथक्करण असे दाखवितें की देशाला असहकारिता हवी आहे. मिसेस बेझंट यांनी मोकळेपणें, सुसंगतपणे व निर्भयपणे असहकारितेला विरोध केला, पण त्यांना अनुयायी फारसे मिळालेच नाही. तूर्त त्यांच्या म्हणण्याच्या योग्यायोग्यतेविषयी मी काहीच बोलत नाही, माझा युक्तिवाद विद्यालये, न्यायालये, कायदेमंडळ यावद्दल जो काही आहे तो गेले कित्येक आठवडे देशासमोर प्रकटपणे आलेला आहे. हा मार्ग अनुसरण्यापासून मला पराङ्मुख व्हावे असे वाटण्याजोगे मी कॉंग्रेसच्या व्यासपीठावर कांही देखील श्रवण केलें नाही, पण बहुमतवाले व अल्पमतवाले यांना उद्देशून मी आदरपूर्वक चार शब्द सांगू इच्छितो.

"बहुमतवाल्यांना मी असें म्हणेन की आपल्या फार मोठ्या यशाची वेळ ही आपण अत्यंत नम्रपणे वागण्याची वेळ आहे. बहुमतवाल्यांनी आपल्या शिरावर मोठी जबाबदारी घेतली आहे. माझ्या ठरावाला पाठिंबा देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने आपल्यावर एक बंधन घालून घेतले आहे. अशी व्यक्ती जर पालक असेल तर तिने सरकारी धोरणाने चालणाऱ्या शिक्षणसंस्थांमधून आपल्या मुलांना अथवा पाल्यांना बाहेर काढले पाहिजे अशी व्यक्ति जर वकील असेल तर तिने शक्य तितक्या लवकर आपला व्यवसाय बंद केला पाहिजे आणि खाजगी लवादामार्फत तंटेबखेडे सोडविण्याच्या उद्योगाला लागले पाहिजे. अशी व्यक्ती मतदार अगर उमेदवार असेल तर तिने मतदान करता कामा नये अथवा आपली उमेदवारी मागे घेतली पाहिजे, अशा प्रत्येक व्यक्तीने हाताने कातलेल्या व हाताने विणलेल्या सुताच्या कापडाने आपले देह झाकले पाहिजेत व या

उद्योगांना उत्तेजन दिले पाहिजे. अशा प्रत्येक व्यक्तीने अहिंसा, स्वार्थत्याग व शिस्त यांचा स्वीकार करूनच असहकारिता अंमलात आणावयाची आहे आणि अल्पमतवाल्यांबरोबर न्यायाने व आदराने वर्तन केले पाहिजे. शारीरिक व शाब्दिक हिंसेचा अवलंब त्यांच्याविरुद्ध करता कामा नये. अल्पमतवाल्यांचे परिवर्तन बहुमतवाल्यांनी आपल्या वर्तनाने व काटेकोर, सन्माननीय पद्धतींनेच घडवून आणिले पाहिजे. ज्यांनी अल्पमतवाल्यांबरोबर मतदान केले ते दुर्बळ होते किंवा त्यांची तयारी नव्हती. कित्येकांना मुलांना शाळेतून बाहेर काढणें बरोबर वाटले नाही. पण त्यांना जेव्हा शाळा रिकाम्या झालेल्या व राष्ट्रीय शाळांचा उदय होत आहे असे दिसेल आणि वकिलांनी आपला व्यवसाय थांबवल्यावर त्यांची उपासमार होत नाही असे दिसेल आणि कायदेमंडळे सुद्धा उत्तम राष्ट्रभक्तांच्या गैरहजेरीमुळे ओस पडलेली दिसतील तेव्हा त्यांचा माझ्या कार्यक्रमावर विश्वास बसेल आणि ते त्याचा स्वीकार करतील. म्हणून बहुमतवाल्यांनी अधीर होण्याचे कारण नाही. अल्पमतवाले लवकरच बहुमतवाल्यांसारखेच होतील.

"अल्पमतवाल्यांना मी असे म्हणेन की, त्यांचा एका सरळ सामन्यात पराजय झाला आहे. एखादी बाब त्यांच्या सदसद्विवेक बुद्धीलाच पटत नसेल तर गोष्ट वेगळी. एरवी त्यांनी आता असहकारितेच्या कार्यक्रमाचा पाठपुरावा जोराने करण्याला कंबर कसली पाहिजे. ज्यांना असें वाटत असेल की बहुमतवाल्यांनी फार मोठी चूक केली आहे, त्यांना अर्थातच त्यांचे मतपरिवर्तन करण्यासाठी मोहीम चालू ठेवावी लागावी यात काही गैर नाही. पण अल्पमतवाल्यांपैकी किती तरी प्रतिनिधींनीं राष्ट्रीय शाळा स्थापन करण्याला व खाजगी लवादकोर्टे स्थापण्याच्या तत्त्वाला मान्यता दर्शविली आहे. त्यांना फक्त कौन्सिलांवर बहिष्कार घालण्याचा विचार पुढे ढकलणें योग्य होईल असे वाटत होते, त्यांना मी असे सुचविण्याचे धाडस करतो कीं बहुमताने आता असहकारितेच्या चळवळीचा वेग वाढवावा व तिला जोर आणावा असे ठरविले असल्यामुळे त्यांनी हा निर्णय स्वीकारावा आणि पास झालेला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कटिबद्ध व्हावें.

"परदेशी मालावरील बहिष्काराला माझ्या ठरावात जागा मिळाली आहे त्याबद्दल मला खेद वाटतो. त्याला ही जागा कशी मिळाली हे मी सांगणे ठीक होणार नाही. पण त्याचा माझ्या सदसद्विवेक बुद्धीशी संघर्ष होत नाही. आणि माझा समंजसपणा दाखविण्यासाठी, हा ठराव मांडण्याचें मी मान्य केलें. पण त्या ठरावाचे संगीत त्यात एक विसंवादी सूर शिरल्यामुळे बिघडले आहे.

स्वदेशीमध्ये परदेशी कापडावरील बहिष्काराचा अंतर्भाव होतो. सर्वच परदेशी मालावर बहिष्कार घालावा ही सूचना वेडेपणाची आहे. कारण ही गोष्ट अशक्य आहे. पण या सूचनेच्या स्वीकाराने जर अनावश्यक आणि चैनीच्या वस्तूंचा उपयोग टाळण्याला जर आपण प्रवृत्त होणार असू तर त्याने एक चांगली हेतुपूर्ती होईल. अनावश्यक अशा प्रत्येक परदेशी गोष्टीचा त्याग करणें हें आपले कर्तव्य आणि आपला हक्कच आहे आणि जर आवश्यक अशी प्रत्येक गोष्ट आपण येथे निर्माण करू शकलो तर त्यात वाईट काहीच नाही."

या लेखात गांधीजींना आश्वासन मिळाले की देशातील बहुसंख्य लोकांचे प्रतिनिधी म्हणून आलेल्यांपैकी बऱ्याच मोठ्या संख्येच्या प्रतिनिधींनी आपल्याला म्हणजे आपल्या असहकारितेच्या कार्यक्रमाला पाठिंबा दिला आहे. त्यांना अशी खात्री देखील वाटत असल्याचे दिसते, की उरलेले अल्पसंख्य देखील आपले अनुयायी होणार. त्याप्रमाणें नागपुरास काँग्रेसचें नेहमीचे अधिवेशन १९२० सालच्या डिसेंबरअखेर झाले. त्यांत त्यांच्या कलकत्त्यास असलेल्या पुष्कळच विरोधकांचा पाठिंबा मिळाला. कलकत्त्याच्या बैठकीतच गांधींनी असे म्हटले की, जर माझ्या असहकारितेच्या कार्यक्रमाला पुरेसा पाठिंबा मिळाला तर एक वर्षात स्वराज्यसंपादन घडून येईल. या त्यांच्या घोषणेचा पुष्कळ उपहास झाला. पण थट्टा करणाऱ्यांनी 'पुरेसा पाठिंबा मिळाला तर' ही जी शर्त घातली होती तिकडे मात्र दुर्लक्ष केलें. स्वराज्य म्हणजे इंग्रजांच्या अस्तित्वावाचून आपण आपले अस्तित्व टिकविणें, आपल्या असाहाय्यतेचा शेवट करणें असा 'एक वर्षात स्वराज्य' याचा अर्थ 'यंग इंडिया' मध्ये २२ सप्टेंबर १९२० रोजी प्रसिद्ध झालेल्या लेखात त्यांनी सांगितला. या लेखातील पुढील काही वाक्य अतिशय अर्थपूर्ण आहेत. "It is as amazing as it is humiliating that less than one hundred thousand white men should be able to rule three hundred and fifty million Indians. They do so somewhat undoubtedly by force but more by securing our cooperation in a thousand ways and making us more and more helpless and dependent on them as time goes forward. Let us not mistake reformed councils, mere law-courts and even governorships for real freedom or power. They are but subtler methods of emasculation. The British cannot rule us by mere force. And so they resort to all means, honourable and dishonourable, in order retain their hold on India. They want India's billions and they want India's manpower for their miperialistic greed. If we refuse to supply them with men and money, we achieve our goal, viz. Swaraj, equality, manliness."

या लेखात गांधींनी आपला दृढविश्वास व्यक्त केला आहे की ज्या तिहेरी बहिष्कारावर त्यांनी भर दिला आहे तो पूर्णत: व्यवहार्य आहे आणि तो पाळला गेल्याखेरीज स्वराज्यप्राप्ती होणार नाही. कॉलेजे-कोर्टे-कौन्सिले यांच्या मायाजालातून आपण बाहेर पडलेंच पाहिजे आणि त्याच्या जोडीला स्वदेशीचा अवलंब केला पाहिजे. हाताने कातलेल्या सुताचा वापर हातमागावर करून आपण वस्त्रस्वावलंबी होऊन आपली आर्थिक गुलामगिरीमधून मुक्तता करून घेतली पाहिजे आणि या सर्व शर्ती पुऱ्या करणे म्हणजे शिस्त, स्वार्थत्याग, गरजा कमीत कमी ठेवणे, संघटनाकौशल्य, आत्मविश्वास आणि धैर्य यांचा अवलंब करणे. एक वर्षभर समाजातील जे लोक लोकमत तयार करतात त्यांनी जर हे गुण आपल्या ठिकाणी वसत आहेत असें दाखविले तरच स्वराज्य मिळेल. नाही तर इंग्रज जे काही करीत आहेत त्याबद्दल त्यांना दोष देता येणार नाही. आपली मुक्तता करून घेणे सर्वस्वी आपल्याच हाती आहे, असे म्हणून हा लेख गांधीजींनी संपविला आहे.

यानंतर काँग्रेसचे नागपूर येथील नेहमीचे अधिवेशन होईपर्यंतच्या मुदतीत गांधींनी प्रचारकार्य धडाक्याने चालूच ठविलें होतें. नागपुरास देशातील सर्व लोकांचा पाठिंबा आपल्या कार्यक्रमाला फिरून प्रतिनिधींच्या बहुमतान आणि कदाचित मतैक्याने देखील मिळाल्यावाचून राहाणार नाहीं अशी अपेक्षा त्यांच्या मनात उत्पन्न झालीच होती. तिहेरी बहिष्कारावरोबर चरखा-खादी आणि अस्पृश्यतानिवारणाची मोहीमही त्यांनी चालू केली. असहकारितेचा सगळा कार्यक्रम अंमलात आणून स्वराज्य संपादन करणे हें गांधींचे उद्दिष्ट होते आणि ते साध्य होण्यासाठी ते क्षणश: आणि कणश: झिजत होते व सर्व भारतीयांचे ते उद्दिष्ट असल्यामुळे त्यांनी सुद्धा झटावें असा त्यांचा अविरत प्रयत्न चालू होता. त्यांच्या अपेक्षेप्रमाणें नागपुरास कस्तुरीरंग अयंगारांसारखे विरोधक समर्थक झाले आणि असहकारितेचा कलकत्त्याचा ठराव जरूर तेथे वाढवून व सुधारून एकमताने स्वीकारला गेला. नागपूरची काँग्रेस भरण्यापूर्वी कायदेमंडळाच्या निवडणुका होऊन गेल्या आणि तेव्हा उमेदवारांमध्ये केवळ सरकारजमा आणि राष्ट्रीय अथवा नेमस्त म्हणविणारे काही लोकच फक्त होते. उदाहरणार्थ, मिसेस बेझंट यांचे नेतृत्व मानणारे जमनादास द्वारकादास धरमसी हे सेंट्रल असेंब्लीत गेले व श्रीनिवास शास्त्री, सर्वंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे अध्यक्ष, हे कौन्सिल ऑफ स्टेटमध्ये गेले. परंतु कौन्सिलांवर बहिष्कार टाकणे चुकीचे आहे असे मानणारे जीना, बॅप्टिस्टा, जयकर, दास वगैरे मात्र उमेदवार म्हणून उभेच राहिले नाहीत. नागपूर काँग्रेसमध्ये काँग्रेसच्या ध्येयात बदल करण्यात आला. 'लीगल व कॉन्स्टिटयूशनल' साधनांनी स्वराज्य मिळविण्याऐवजी ते

'पीसफुल व लेजिटिमेट' म्हणजे शांततापूर्ण व न्याय्य साधनांनी मिळवावें असा ठराव झाला आणि जी नवी घटना काँग्रेसचे दैनंदिन कामकाज उरकण्यासाठी तयार करण्यात आली व भर अधिवेशनात सर्व प्रतिनिधींनी स्वीकारली तिच्यात काँग्रेसचे ध्येय म्हणून त्या ठरावाला मान्यता देण्यात आली. एक कोटी रुपयांचा लोकमान्य टिळक स्वराज्य मेमोरियल फंड म्हणून निधी उभारण्याचें ठरले व काँग्रेसच्या कार्यक्रमाच्या यशासाठीच तो खर्च करण्याचे ठरले. मॉटफर्ड सुधारणा सुरू करण्यासाठी म्हणून ब्रिटिश साम्राज्यशाहीचे प्रतीक या नात्याने येऊ घातलेल्या ड्यूक ऑफ कॉनॉट ऊर्फ बादशहांचे काका यांच्या सर्व कार्यक्रमांवर आणि समारंभावर बहिष्कार घालण्याचे ठरले. हाच प्रकार पूर्वी ब्रिटिश युवराज आले तेव्हा करण्यात आला होता. मात्र ही असहकारिता पूर्णपणे अहिंसक होती.

कित्येक वर्षे ब्रिटिश काँग्रेस कमिटी या नावाने काँग्रेसची एक शाखा लंडन येथे काम करीत होती. वेडरबर्न व दादाभाई यांसारखे लोक तिचे काम पाहात. 'इंडिया' या नावाचे एक लहानसे इंग्रजी साप्ताहिक ही कमिटी चालवीत असे. लोकमान्य टिळक जेव्हा काँग्रेसचे व होमरूल लीगचे डेप्युटेशन घेऊन लंडन येथे गेले आणि तेरा महिने तेथे राहिले तेव्हा त्यांना असे दिसून आलें की काँग्रेसचे मुखपत्र म्हणून त्याचे काम चालत नाही तेव्हा त्यांनी व विठ्ठलभाई पटेल यांनी असा दावा केला की काँग्रेस त्या कमिटीचा व 'इंडिया'चा खर्च चालविणार तर काँग्रेसचे मतच तेथे प्रभावी झाले पाहिजे. त्याप्रमाणे अखेर झाले. 'इंडिया' चे संपादक पोलक यांनी राजीनामा दिला व मिस हेलीना नॉर्मन्टन यांची त्याचे जागी नेमणूक झाली आणि श्री. न. चिं. केळकर यांस विलायतेत त्यांचा मुक्काम असेपर्यंत असोशिएट एडिटर म्हणून नेमण्यात आले. यानंतर 'इंडिया' चे काम टिळक व पटेल यांना हवे होते तसे होऊ लागले. पण असहकारितेच्या नव्या पर्वात 'इंडिया' हा पांढरा हत्ती पोसण्याचे काही प्रयोजन नाही असे ठरून ब्रिटिश कमिटी व 'इंडिया' या दोहोंची इतिश्री झाली. दरसाल ४५ हजार रुपये त्यांवर खर्च होत होता. तो यापुढे अनावश्यक आणि अनाठायी आहे असे गांधीजी व काँग्रेस यांनी ठरविलें. गांधींच्या मतें आपले कार्य हीच आपली उत्तम जाहिरात आहे. 'इंडिया' चा काहीच म्हणण्यासारखा परिणाम ब्रिटिश जनतेवर होत नव्हता आणि होणें शक्यही नव्हतें. पंजाबवरील अत्याचारांची चौकशी करून गांधीजींनी एवढा रिपोर्ट तयार केला. त्याची ब्रिटिश पार्लमेंटने व भारतमंत्री मॉटेग्यू यांनी कितीशी कदर केली, असा त्यांचा अखेरचा प्रश्न होता. ब्रिटिश अपप्रचाराची बरोबरी अथवा त्यावर सरशी फक्त अमेरिकनच करू शकतील. त्याजबरोबर आपल्याला स्पर्धा करता येणार नाही. आणि ती आपण करून स्वत:ची नीतिमत्ता बिघडवून घेण्याचे कारण

नाही असे गांधीजींच्या म्हणण्याचे तात्पर्य. परराष्ट्रांमध्ये प्रचार करण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे. त्याऐवजी ते पैसे यथेच खादीप्रसाराच्या कामी लावावे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

गांधीजींची अपेक्षा होती त्याप्रमाणे नागपुरास ३० डिसेंबर १९२० रोजी असहकारितेची चळवळ जोराने पुढे चालविण्याबाबत पुढीलप्रमाणे ठराव झाला. मूळ इंग्रजीत असलेल्या या ठरावाचे समग्र भाषांतर पुढे दिल्याप्रमाणे आहे :

"ज्याअर्थी सध्या अस्तित्वात असलेल्या हिंदुस्तान सरकारने या काँग्रेसच्या मताप्रमाणे देशाचा विश्वास गमाविलेला आहे आणि ज्याअर्थी हिंदुस्तानच्या लोकांचा स्वराज्य स्थापन करण्याचा निर्धार झालेला आहे आणि ज्याअर्थी काँग्रेसच्या जादा अधिवेशनापूर्वी, आपली अनेक गाऱ्हाणी व तक्रारी विशेषत: पंजाबातील अत्याचार व खिलाफत या बाबतीतील अन्याय, काँग्रेसने अनुसरलेल्या पद्धतीनीं दूर करण्याच्या कामी अपयश आलेले आहे, त्याअर्थी कलकत्त्यास भरलेल्या जादा काँग्रेसच्या अधिवेशनात मंजूर झालेल्या अहिंसात्मक असहकारितेच्या ठरावाचा पुनरुच्चार करून ही काँग्रेस जाहीर करते की, अहिंसात्मक असहकारितेची समग्र योजना अथवा त्यातील काही भाग अंमलात आणण्यासाठी देश तयार करण्याकरिता पुढीलप्रमाणे परिणामकारक पावले उचलण्याचें ठरवीत आहे. यामध्ये एका टोकाला सरकारशी सर्व प्रकारचे स्वखुषीने होत असलेले साहचर्य बंद करणे आणि दुसऱ्या टोकाला कर देण्याचें बंद करणें यांचा समावेश होतो. काँग्रेस किंवा तिची ऑल इंडिया काँग्रेस कमिटी या बाबतीतील निर्णय वेळोवेळी घेईल.

(अ) सोळा वर्षांखालील मुलांना त्यांच्या मातापित्यांनी अथवा पालकांनी सरकारी अथवा सरकारी मदतीने चाललेल्या अथवा सरकारी धोरणाला अनुसरून चालणाऱ्या सर्व शैक्षणिक संस्थांमधून काढून घ्यावे व राष्ट्रीय शाळांत त्यांना दाखल करावे अथवा इतर कोणत्या मार्गाने त्यांचें शिक्षण चालू ठेवावें.

(ब) सोळा वर्षांवर उमर असलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी शाळा-कॉलेजांमधून बाहेर पडावे, मात्र त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीला असे पटत असले पाहिजे की सरकारी हुकमतीखाली अथवा धोरणाने चालणाऱ्या शैक्षणिक संस्थात राहाणे हे त्या संस्था नष्ट करण्याच्या असहकारितेच्या धोरणाशी विसंगत आहे. अशा विद्यार्थ्यांनी असहकारितेच्या कार्यक्रमात सेवा करावी अथवा ज्या राष्ट्रीय शैक्षणिक संस्था निघतील त्यांत विद्याभ्यास चालू ठेवावा.

(क) सरकारी अथवा सरकारी मदतीने चाललेल्या शिक्षणसंस्थांमधील विश्वस्त, व्यवस्थापक आणि अध्यापक यांनी म्युनिसिपालिटीचा व लोकल बोर्डांनी चालविलेल्या शाळांचे राष्ट्रीय शाळांत रूपांतर करावे.

(ड) वकिलांनी आपला व्यवसाय बंद करण्याचा आणखी प्रयत्न करावा आणि आपल्या वकील व अशीलबंधूंना कोर्टावर बहिष्कार घालून खाजगी लवादामार्फत तंटेबखेडे सोडवून घेण्याच्या उद्योगाला नेटाने लागावे.

(ई) व्यापारी व दुकानदार यांनी परदेशांशी असलेले व्यापाराचे संबंध हळूहळू कमी करावे आणि हिंदुस्तानाला स्वतंत्र व स्वयंपूर्ण करण्यासाठी हाताने सूत कातण्याच्या व हातमागावर त्या सुताचे कापड विणण्याच्या उद्योगाला उत्तेजन द्यावे आणि त्यासाठी ऑल इंडिया काँग्रेस कमिटीने विशेषज्ञांची समिती नेमून आर्थिक बहिष्काराची योजना तयार करून परदेशी मालाचे उच्चाटण करावे.

(फ) असहकारितेच्या चळवळीच्या यशासाठी स्वार्थत्याग अत्यंत आवश्यक असल्याने देशातील प्रत्येक स्त्री-पुरुषाने आपल्याकडून होईल तेवढा स्वार्थत्याग करून राष्ट्रीय चळवळ बळकट करावी.

(ग) असहकारितेच्या आंदोलनाच्या प्रगतीसाठी ग्रामीण भागात व शहरी भागात ग्राम समित्या आणि प्रांतिक समित्या, काँग्रेसच्या शाखा स्थापन कराव्या आणि त्यांच्यामार्फत असहकारितेचा पाठपुरावा करावा .

(ह) इंडियन नॅशनल सर्विस या नावाची राष्ट्रसेवकांची सेना स्थापन करावी व तिच्यामार्फत असहकारिता आंदोलनाला जोराची गती द्यावी.

(आय) ऑल इंडिया टिळक स्मारक स्वराज्य निधी उभारून असहकारितेच्या आणि राष्ट्रीय सेवादलाच्या कामासाठी तो वापरावा. यासाठी परिणामकारक उपाय त्वरित योजावे आणि एक कोटी रुपये जमवावे.

आतापर्यंत असहकारितेची, विशेषत: कायदेमंडळावर बहिष्कार घालण्याच्या कार्याची जी प्रगती झाली आहे त्याबद्दल ही काँग्रेस राष्ट्राचे अभिनंदन करते आणि असा दावा करते की ज्या परिस्थितीत ही कायदेमंडळे अस्तित्वात आणिली आहेत ती परिस्थिती लक्षात घेता ती देशाचे प्रतिनिधित्व करीत नाहीत आणि असा विश्वास बाळगते की बहुसंख्य मतदारांनी मतदानावर बहिष्कार घातला असता देखील जे लोक निवडून गेले आहेत असें समजले जाते त्यांनी आपल्या सभासदत्वाचा राजीनामा द्यावा. जर त्यांनी तसें केले नाही व आपल्या बहुसंख्य मतदारांच्या म्हणण्याचा धिक्कार केला आणि लोकशाहीचे तत्त्व इतक्या

उघडपणे धाब्यावर बसविले तर त्यांच्या मतदारांनी त्याजकडून कसलीही सेवा घेण्याचे जाणूनसवरून नाकारावे.

ही काँग्रेस लोक आणि पोलीस व लष्कर यांमधील वाढत असलेल्या मैत्रीला मान्यता देते अणि अशी आशा करते की आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे हुकूम पाळण्यासाठी आपले ब्रीद व आपला देश यांची पायमल्ली करणार नाहीत आणि जनतेशी नम्रतेने आणि विवेकाने पोलीस व लष्करी लोक वागतील आणि लोकांच्या भावभावनांची त्यांना काही पर्वा नाही असा जो आरोप त्यांच्यावर केला जातो तो धुवून टाकण्याला ते तयार होतील. आणि ही काँग्रेस सरकारी नोकरीतील लोकांना असे विनविते की, काँग्रेसने त्यांना तुमच्या नोकऱ्या सोडा अशी जाहीर विनंती करीपर्यंतच्या काळात त्यांनी आपल्या वागणुकीत प्रामाणिकपणा व दयाळूपणा आपल्या देशबांधवांशी असलेल्या संबंधात विशेष रीतीने दाखवावा आणि निर्भयतेने व उघडपणे लोकांच्या सभांत व जमावात सक्रिय भाग न घेता वावरावे आणि राष्ट्रीय चळवळीला उघडपणे पैशाची मदत करावी.

ही काँग्रेस अहिंसेवर खास भर देऊन असे सांगू इच्छिते की वाणीत व कृतीत सर्वांनी अनत्याचारी राहाणे आवश्यक आहे. सरकार व जनता यांमधील असहकारितेची ही अवश्यमेव शर्त आहे, की असहकारिता शांततापूर्ण, अहिंसा-पूर्ण असली पाहिजे. या काँग्रेसचे असे मत आहे की अत्याचाराचा किंवा हिंसेचा कोणताही प्रकार लोकशाहीची वाढ करण्याच्या संकेताला घातक आहे आणि असहकारितेचे यापुढील टप्पे गाठण्याच्या व ओलांडण्याच्या कार्यक्रमाला सुद्धा त्यांचा अडथळाच होईल.

अखेरीस या काँग्रेसचे असे म्हणणे आहे की खिलाफत व पंजाबातील अत्याचार या संबंधात न्याय होण्यासाठी व एक वर्षांत स्वराज्य प्राप्त होण्यासाठी सर्व सार्वजनिक संस्था, मग त्या काँग्रेसशी निगडित असोत किंवा नसोत, त्यांना अशी विनंती आहे की, त्यांनी आपले सर्व लक्ष शांततापूर्ण असहकारितेचे कार्य करण्याकडेच एकत्रित करावे, कारण लोकांमध्ये संपूर्ण सहकार्य आणि सौहार्द असेल तरच असहकारिता यशस्वी होईल. हिंदु-मुसलमानांमधील एकता व हिन्दूंमधील अनेक वर्ण व ज्ञाती यांमधील ऐक्य, ब्राह्मण–ब्राह्मणेतरांमधील दुरावा दूर करणे व अस्पृश्यतेचा हिंदूधर्मावरील कलंक धुवून काढणें अवश्य आहे. हिन्दुंच्या धार्मिक नेत्यांनी हिंदुधर्म सुधारण्यासाठी व दलितांना मिळत असलेल्या वागणुकीत बदल करण्याची तेवढीच जरुरी आहे."

हा ठराव, एकमताने पास झाला, गांधींनीच तो मांडला. त्यावेळी केलेल्या भाषणात टिळक स्वराज्य निधीविषयी ते चार शब्द बोलले तेव्हा भारतीय सँडो राममूर्ती यांनी या निधीसाठीं रु. १००१ ची देणगी जाहीर केली आणि कोणी अनामिकाने सोन्याच्या दोन आंगठ्या गांधींकडे पाठविल्या. आजारीपणामुळे बिछान्यावर पडून असलेल्या शेठ जमनालाल बजाज यांनी एक लाख रुपयांची देणगी दिली व तिचा उपयोग असहकारिता करणाऱ्या वकिलांसाठी व त्यांनी राष्ट्रसेवक व्हावे म्हणून वापरावा असे सुचविले. शावकशा बमनजी या पारशी दात्याने दरमहा दहा हजार रुपये देण्याचे जाहीर केले व स्वराज्य मिळेपर्यंत ही देणगी चालू राहील असे कळविले. मंडपात जागच्या जागी या देणग्या मिळाल्या व पुढे हा निधी एक कोटी रुपयांची मर्यादा ओलांडून गेला. त्याचा विनियोग असहकारितेच्या चळवळीसाठीं सर्वस्वी खर्च करण्यात आला. असहकारितेच्या ठरावाच्या अंगोपांगावर कॉंग्रेसच्या अधिवेशनात व नंतर अनेक जाहीर सभांत गांधी सतत बोलत होतेच, पण अधिवेशन संपल्यावर 'यंग इंडिया'त त्यांनी स्वतःच्या सहीने जो लेख लिहिला त्यात त्यांचे सर्व इंगित आले असल्यामुळे तो येथे समग्र देणे योग्य होईल :–

## नागपूर कॉंग्रेसची फलश्रुति

कॉंग्रेसने काय केले ? आपण काय करावयास पाहिजे ? अहमदाबादने काय केले पाहिजे ? हे तीन प्रश्न प्रत्येक व्यक्तीने स्वतःला विचारले पाहिजेत. कॉंग्रेसने आपल्याला नवीन घटना दिली. आणि एकमताने शांततामय असहकारितेचा ठराव पास केला. कॉंग्रेसचे एवढे प्रचंड अधिवेशन यापूर्वी कधीच भरविण्यात आले नव्हते आणि इतक्या गंभीरपणे कोणत्याच प्रश्नाचा विचार केल नव्हता. घटनेमध्ये अत्यंत महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. कॉंग्रेसच्या उद्दिष्टांवर प्रदीर्घ चर्चा झाली आणि दोन रात्री व एक दिवस खूपच वाद-विवाद होऊन प्रांतवारीने मते घेण्यात आली आणि सुचविलेले बदल प्रचंड बहुमताने मंजूर झाले.

शक्य तर ब्रिटिशांशी असलेला आपला संबंध कायम ठेवून, पण तो जर आपल्याला पाहिजे तशा प्रकारे राहाणार नसेल तर तो तोडून टाकून मिळणारे, आपल्याला पसंत असणारे स्वराज्य संपादन करणं हे आपले नवे उद्दिष्ट ठरले. हा संबंध जर पुढे टिकवायचा असेल तर, कॉंग्रेसचे उद्दिष्ट ज्या स्वरूपात सिद्ध होऊ शकेल असाच आकार त्या स्वराज्याला यावा लागेल. म्हणजेच ब्रिटिशांनी स्वतःहून आमचे वरिष्ठ म्हणून वागायचे सोडून दिले पाहिजे

मूठभर इंग्रज आमच्यावर राज्य करीत आहेत असे आपणांस वाटत राहील तोवर ब्रिटिशांचा संबंध आम्हांला असह्यच वाटणार. काँग्रेसने स्वराज्य संपादन करण्याचे साधन देखील सुचविले आहे. शांततापूर्ण व शुद्ध मार्गांनी ते प्राप्त करून घ्यावयाचे आहे असे काँग्रेसने ठरविले आहे. येथे असत्य, भामटेगिरी, दांभिकपणा, फसवणूक वगैरे प्रकारांना जागा नाही. आम्ही न्याय्य मार्गच अनुसरणार व तसे करताना इतरांची हत्या करण्यापेक्षा आम्ही आपले प्राण देऊ. 'मरून जगण्या'चे रहस्य आपल्याला शिकावयाचे आहे. या नियमाचे पालन करूनच जग जगत आले आहे. जेव्हा बीज नष्ट होते तेव्हाच धान्य उत्पन्न होते. मरणप्राय यातना माता सोसते म्हणूनच मुलाचे जीवन शक्य होते. यज्ञ केल्याशिवाय जर आपण अन्न खाल्ले तर चोरीचे अन्न खाल्ले असा अर्थ होतो. त्याग करूनच स्वराज्य प्राप्त होईल; ईश्वराला शुद्ध व पवित्र असणारे हौतात्म्यच स्वीकरणीय होईल.

एक महत्त्वपूर्ण बदल असा आहे की, पूर्वी कोणाही आणि कितीही व्यक्तींना काँग्रेसचे प्रतिनिधी होता येत असे; यापुढे तसे होता येणार नाही. प्रत्येक एक लाख नागरिकांना दोन प्रतिनिधी यापुढे पाठविता येतील. याचा अर्थ असा की, सगळ्या देशाला यापुढे सहा हजार प्रतिनिधींची निवड करता येईल. माझ्या मताने ही संख्या देखील फार मोठीच आहे. यामुळे एक अनिष्ट परिणाम घडून येईल, जेथे काँग्रेसचे अधिवेशन भरेल तेथे लोकसंख्येच्या प्रमाणात मिळणाऱ्या संख्येने सर्व प्रतिनिधी येतील, दूरच्या प्रांतांना पुष्कळ प्रतिनिधी पाठविणे अशक्य होईल, तरी पण एक मर्यादा घालण्यात आली आहे. ही सुधारणाच झाली असे म्हटले पाहिजे. निवडणुकीच्या पद्धतीतही बदल करण्यात आला आहे. यापुढे लक्षावधी लोकांच्या पसंतीने प्रतिनिधींची निवड होईल आणि आता असे सक्तीने ठरविण्यात आले आहे की मुसलमान, स्त्रिया, अस्पृश्य आणि इतर जे काँग्रेसच्या कामात लक्ष घालीत नव्हते त्यांना तसे करण्यास लावण्यासाठी प्रयत्न व्हावा. काँग्रेसचे उद्दिष्ट मान्य करून व वर्षाकाठी चार आणे फी भरून कोणालाही काँग्रेसचे सभासदत्व मिळेल. वेगवेगळ्या दृष्टिकोनाच्या लोकांना प्रतिनिधित्व म्हणून अन्य देय मतांची सुधारणा करण्यात आली आहे. भाषावार प्रांतरचना करण्यात आली आहे. प्रत्येक प्रांतात जर घटनेत दाखवून दिले आहे त्याप्रमाणे काम चालेल तर आपल्याला पुष्कळच प्रगती करता येईल, कारण एकजुटीने काम करून व संघटित होऊन जर आपण काम केले तर आपण स्वराज्य मिळवू. त्यासाठी जनतेच्या सर्व भागविभागांत राष्ट्रीयत्वाची जागृती उत्पन्न करण्याची जरूर आहे.

काही थोडी भर घालून कलकत्त्याच्या खास अधिवेशनात मंजूर झालेला शांततामय असहकारितेचा ठराव नागपूर येथे कायम करण्यात आला. ज्यांनी हा ठराव मान्य केला आहे, त्यांनी पुढील गोष्टी केल्याच पाहिजेत :–

१. ज्यांनी पदव्या-पदके घेतली आहेत त्यांनी त्यांचा त्याग केला पाहिजे.

२. पालकांनी व मातापित्यांनी सरकारी हुकमतीच्या शाळांमधून मुले काढून घेतली पाहिजेत आणि त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था घरीच अथवा राष्ट्रीय शाळांत केली पाहिजे.

३. सोळा वर्षांवरील विद्यार्थ्यांची तर अशी खात्री पटली असेल की सरकारच्या सावलीखाली शिकणे हे पाप आहे तर त्याने इतर कोणत्या कामात स्वतःला गुंतवून घेऊन विद्यालयातून बाहेर पडले पाहिजे.

४. वकिलांनी व्यवसाय बंद करून ताबडतोब लोकसेवेच्या कार्याला स्वतःला. वाहून घेतले पाहिजे.

५. विलायती मालाचा व्यापार व्यापाऱ्यांनी बंद केला पाहिजे आणि ताबडतोब हातसुताच्या व हातमागावर विणलेल्या कापडाला उत्तेजन दिले पाहिजे.

६. मतदारांचा विरोध असताही ज्यांनी कौन्सिलप्रवेश केला आहे आणि राजीनामे देण्याचे नाकारले आहे, त्यांजकडे मतदारांनी कोणत्याही राजकीय कामासाठी जाऊ नये.

७. पोलिसांनी व इतर सरकारी नोकरांनी सभ्यपणे, सत्याला स्मरून व प्रेमाने लोकांशी वागावे ; त्यांनी राजकीय सभांना हजर राहावे, पण तेथे भाषणे करू नयेत आणि स्वातंत्र्याच्या चळवळीला उघडपणे पैशाची मदत करावी

८. आपला देश अगर धर्म यांपेक्षा पोलिसांनी आपली नोकरी अधिक महत्त्वाची समजू नये आणि आपल्या चांगल्या वर्तनाने ते भाडोत्री नोकर आहेत हा त्यांच्यावर करण्यात येणारा आरोप खोटा पाडावा आणि आपल्या समाजाला आपण मानतो असे दाखवावे.

९. प्रत्येक स्त्रीने आणि पुरुषाने शक्य तेवढा त्याग करण्याला सिद्ध असावे.

१०. शांतता राखण्यामध्ये आपले यश आहे हे प्रत्येकाने समजून असावे आणि याची जाणीव स्वजनांशी तसेच सरकाराशी वागताना ठेवावी. शांतता राखणे म्हणजे केवळ शारीरिक हिंसा टाळणे नव्हे, तर अपशब्द सुद्धा वापरू नयेत.

११. सर्वांनी हिंदु-मुसलमानांचे ऐक्य अधिक बळकट करावे आणि देशातील वेगवेगळ्या विभागांत वसत असलेली कटुता संपवावी. ब्राह्मण व अब्राह्मण यांमधील भांडणे संपवावी आणि अस्पृश्यतेचे पाप पुसून टाकावे.

हे सर्व जर आपण एक वर्षात करू शकलो तर त्या मुदतीत आपल्याला स्वराज्य मिळल आणि ते जर आपण लांबणीवर टाकले तर स्वातंत्र्यही लांबणीवर पडेल. आपले कर्तव्य काय हे अगदी स्पष्ट आहे. प्रत्येकाने करता येईल त्या त्यागाला तयार राहिले पाहिजे, इतरही तसेच करतील यासाठी झटले पाहिजे आणि नव्या धोरणाला अनुसरून सभा भरविल्या पाहिजेत. पुढील वर्षाची काँग्रेस भरेल तेव्हा कोणीही प्रतिनिधी असा येता कामा नये की ज्याने आपली मुले सरकारी हुकमतीखाली चालणाऱ्या शाळेतून काढली नाहीत अगर ज्याने आपला वकिलीचा व्यवसाय बंद केलेला नाही अथवा ज्या कोणाला लागू होणारी इतर कोणतीही अट त्याने पाळली नाही. म्हणूनच प्रत्येक स्त्री अगर पुरुष प्रतिनिधींने हातसुताचे हातमागावर विणलेले कापडच आपल्या अंगावर घातले पाहिजे. असे सहा हजार प्रतिनिधी व इतर कार्यकर्ते जर आपल्याजवळ असले तर आपली स्थिती कशी असेल याची कल्पना करणे कठीण नाही.

अहमदाबाद शहराने पुढील काँग्रेसच्या अधिवेशनाला निमंत्रण दिले आहे आणि नव्या घटनेचे यश सिद्ध करण्याची शपथच अहमदाबादेने वाहिली आहे असे म्हणण्याला हरकत नाही. अहमदाबादेने मोठा मान मिळविण्या-साठी चंग बांधला आहे आणि त्याकरिता मोठी जबाबदारी शिरावर घेतली म्आहे. अहमदाबादेचा सन्मान म्हणजे गुजरातचा सन्मान व गुजरातचा सन्मान वेहणजे देशाचा सन्मान. आजपासून जर आपण तयारी करू लागलो तर पळच्या वेळी ती आपण पुरी करू शकू. त्याकरिता काय काय करावयास पाहिजे ते आपण पुढे पाहू. (हा लेख गांधीजींनी 'नवजीवन'मध्ये ९ जाने-वारी १९२१ रोजी प्रसिद्ध केला.)

गांधीजींनी भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वावर काँग्रेसच्या नव्या घटनेप्रमाणे निर्माण करण्यात आलेल्या प्रांतांना आपल्या प्रांतिक संघटना बांधण्यासाठी घटनेचा नमुना 'यंग इंडिया' मधील एका लेखात पुरविला. 'एक वर्षात स्वराज्य' ही त्यांची घोषणा ते अगदी शंभर टक्के गंभीरपणे पुनःपुनः उच्चारीत होते व लोकांनी त्यांच्या हाकेला साद द्यावी म्हणून किती कसोशीने प्रयत्नशील होते हे यावरून आणि त्यांच्या एकूण खटपटीवरून पूर्णपणे ध्यानात येते. असहकारितेचा अर्थ स्वतःचे शुद्धीकरण असा त्यांनी एका लेखात सांगून ते म्हणतात, "हिंदुस्तानात परदेशी कापड खपते याचे कारण आपल्याला त्याचे आकर्षण वाटते. ते आकर्षण बाजूला सारून सूतकताई व हातविणाई यांचाच आश्रय सर्वांनी बिनतक्रार करावा अशी त्यांची सारखी मागणी होती. सरकारला आपण पापी, सैतानी असे म्हणतो तर आपण पापा-

चरणापासून पूर्णपणे निवृत्त झाले पाहिजे, म्हणजे पिकल्या पानाप्रमाणे सरकार गळून पडेल अथवा त्याला पश्चात्ताप होऊन ते शुद्ध होईल. विद्यालये, न्यायालये, पदव्या-पदके आणि कायदेमंडळे ही स्वभावतः पापी नाहीत. सध्याच्या पापमय परिस्थितीची ती केवळ चिन्हे आहेत. मुद्द्याची गोष्ट ही की, आपण पापाचरण सोडले पाहिजे. लोक जर मद्यपान करतील, सट्टे-जुगार खेळतील, चोऱ्यादरोडे घालतील, व्यभिचार करतील, एकमेकांचा द्वेष करतील तर असहकारितेची प्रगती होणार नाही. कारण सरकार आपल्या या वाईट संवयींचा फायदा घेऊनच आपल्यावर राज्य करीत आहे."

२७ जानेवारीच्या १९२१ सालच्या 'नवजीवन'च्या अंकात गांधीजींनी वरील प्रकारचे विचार व्यक्त केले आहेत.

यवतमाळचे तपस्वी बाबासाहेब परांजपे उपहासपूर्वक म्हणत असत की, काँग्रेस राजकारण सोडून सद्गुणसंवर्धक संस्था बनली आहे. यात थट्टा करण्यासारखे काय होते? पण जीवनविषयक गांधींचा समग्र दृष्टिकोण त्यांना समजला नाही इतकेच त्यावरून दिसून येते. खरे तर गांधींनी सद्गुणी होता होताच परिणामकारक राजकारण करता येते हे उत्तम रीतीने दाखविले आहे, किती लोकांच्या किती पत्रांना उत्तरे देऊन त्यांनी त्यांचे शंकानिरसन केले, किती विक्षिप्त आणि पूर्वग्रहदूषित व अज्ञानी टीकाकारांची समजूत घातली, याची असंख्य उदाहरणे त्यांचे सर्व लेखन एकत्र करून हिंदुस्तान सरकाराने ऐंशीहून अधिक ग्रंथांत छापले आहे त्यावरून कोणाही अभ्यासकाला पाहता यईल. असहकारितेच्या पहिल्या वर्षात तर या बाबतीत त्यांनी पराकाष्ठा केली आहे. त्यांचे हे सर्व लेखन म्हणजे महासागर आहे. त्यात बुड्या मारणारे पाणबुडे थकून जातील, पण त्याच्या पोटातील रत्नांचे साठे कधी संपणार नाहीत. काही लोकांची समजूत घालण्यासाठी गांधीजी विशेष काळजी घेतात. 'सर्वंट ऑफ इंडिया' या साप्ताहिक इंग्रजी पत्राबद्दल त्यांना खास जिव्हाळा असल्यामुळे गांधीजींनी 'माझी जबाबदारी' या मथळ्याखाली जो एक लेख १० फेब्रुवारी १९२१ च्या 'यंग इंडिया' च्या अंकात लिहिलेला आहे, तो वाचनीय व मननीय असल्यामुळे येथे त्याचे भाषांतर दिले आहे :–

पुण्याच्या एका असहकारितेत सामील झालेल्या गृहस्थाने केलेल्या शेरेबाजीकडे लक्ष वेधून 'सर्वंट ऑफ इंडिया' मला असे सांगत आहे की सगळे असहकारी-प्रेमाने अथवा अहिंसेने नाहीच प्रेरित झालेले, पण उत्कट द्वेषाने प्रेरित झालेले आहेत. मला याबद्दल केव्हाच शंका नव्हती. उलटपक्षी मी हें मान्य केलेले आहे की पुष्कळ द्वेषानेच प्रवृत्त आलेले आहेत, बहुतेक लोक न्याय मिळावा या भावनेने असहकारवादी झालेले आहेत आणि फारच थोडे

प्रमाच्या अथवा अहिंसेच्या भावनेने या आंदोलनात आलेले आहेत. पुण्यातील काही सत्य गोष्टी सांगून 'सर्वंट ऑफ इंडिया'ने मला एक चपराक पण लगावली आहे. या लेखकाने अखेर असे लिहिले आहे :

" To enrol under the banner of love and peace the forces of hatred and violence, to believe that a simple doctrine of non-cooperation can convert every heart into the purest gold, to persist in smoking a peaceful pipe on a stack of hay and in apparent innocence to disclaim all responsibility for the consequences is amazing conduct even in a prophet. "

मला असे सांगण्यास वाईट वाटते की तीन असमर्थनीय गोष्टी गृहीत धरून माझ्यावर हा कोरडा उडविला आहे. प्रेम व शांतता यांच्या निशाणाखाली मी द्वेष व हिंसा यांना पोसणाऱ्या शक्तींना जमविलेले नाही, पण न्यायाच्या निशाणाखाली मात्र ज्यांना तो मिळविण्याची इच्छा आहे त्यांना जमविलेले आहे आणि असे करताना एक व्यवहारी सुधारक म्हणून जे द्वेषाने प्रवृत्त झालेले आहेत त्यांना देखील आश्रय दिला आहे. त्यांना सुद्धा न्याय मिळणे हा त्यांचा हक्क आहे. मात्र मला एवढी काळजी घेतली पाहिजे की त्यांची द्वेषभावना कृतीमध्ये परिवर्तित होत नाही. माझा असा दावा आहे की, या द्वेषवादी लोकांपैकी बहुतेक आमच्यामधील संकेताचे प्रामाणिकपणे पालन करीत आहेत. कारण त्यांना समजते की अहिंसात्मक आचार हेच देशाला एकमेव उत्तम धोरण आहे आणि नुसती रागाने आग पाखडण्यात काही अर्थ नाही. म्हणून एका साध्या तत्त्वाने प्रत्येक हृदयाचे बावनकशी सोन्यात परिवर्तन होईल असा विश्वास बाळगण्याची मला मुळीच गरज नाही. पण मला असा जरूर विश्वास वाटतो की प्रत्यक्ष अनुभवाने धोरण हेच ब्रीद बनेल. कारण माझा असा विश्वास आहे की लोक मूळ स्वभावाने प्रेमळ व शांतताप्रेमीच असतात. तसेच गवताच्या गंजीवर बसून, वरवर दिसणाऱ्या भोळसरपणाने थंडपणे चिरूट शिलगाविलेला नाही आणि परिणामांची जबाबदारी पण झटकून टाकीत नाही. उलटपक्षी एखाद्या निष्णात कोळशाच्या खाणीत काम करणाऱ्या माणसाप्रमाणे भडका उडू नये म्हणून चांगला सुरक्षित असा दिवा घेऊन, गॅसने भरलेल्या खाणीत मी वावरत आहे आणि माझ्या जबाबदारीची बरोबर जाणीव मला आहे आणि मला हे माहीत आहे की माझ्या हातातील दिवा जरी सुरक्षित आहे तरी खाणीतील गॅसचा दुसऱ्या कोणत्या गूढ कारणाने भडका उडणे कोणत्याही क्षणी शक्य आहे. तसे झाले तर मी जबाबदारी झटकणार नाही. मी ईश्वराची माफी मागेन, मात्र सूड घेऊ इच्छिणाऱ्या संतप्त देश-बांधवांची नव्हे. ईश्वराला माझा हेतू माहीत आहे आणि त्याला हे पण माहीत

आहे की त्यांने माझ्या रूपाने चुकी करण्याला पात्र असणारा एक दुर्बळ मानव निर्मिलेला आहे आणि तरीही त्याने त्याला सारासार विचाराने कृती करण्याची शक्ती दिली आहे. मी एक शिपाई आहे आणि शिपायाने जर धीटपणे धोका पत्करायचा नसेल तर तो शिपाई कसला? सर्वंट ऑफ इंडियाने मला प्रॉफेट म्हणजे ईश्वराचा प्रेषित ठरवून एक निष्ठुर घाव घातला आहे. त्या पत्रात लिहिणाऱ्या लेखकांना माहीत असावयास हवे की प्रॉफेट असल्याचा माझा दावा नाही. परंतु माझा असा दावा अवश्य आहे, की या देशाचा मी एक परम भक्त आहे आणि ज्या जोखडाखाली त्याला पोक आलेले आहे त्यापासून त्याला मुक्त करण्यासाठी माझ्या चित्तांत ज्वलंत आकांक्षा उद्भवलेली आहे. कधी कधी या देशालाही आपल्या या स्थितीची जाणीव नसल्यासारखे दिसते.

'सर्वंट ऑफ इंडिया' ने हातसुताच्या चळवळीवरही एक फटकारा ओढला आहे आणि मी आताच दाखवितो की वस्तुस्थितीच्या अज्ञानामुळे त्याने तसे केले आहे. हाताने सूत काढण्याने स्त्रीला आपली आबरू खचित रक्षण करता येते. कारण हल्ली रस्त्यावर काम करणाऱ्या स्त्रीच्या आबरूवर घाला पडण्याचा धोका सदैव असतो आणि तो चुकविण्याकरिता मला तरी चरख्यावर सूत काढण्या-खेरीज दुसरा व्यवसाय तिच्याकरिता दिसत नाही. या चेष्टेखोर लेखकाला मी असे कळवू इच्छितो की अनेक स्त्रिया आता आपल्या घरीच बसून सूत काढण्याचे काम करीत आहेत आणि त्या असे म्हणतात की, हा उद्योग म्हणजे आपल्याला एक वरदानच मिळाले आहे. चरख्याविषयी माझे असे आग्रहाचे म्हणणे आहे की त्याच्या अंगी एकाद्या संगीत वाद्याचे गुण आहेत, कारण पिआनोच्या सुराच्या साथीबरोबर नाचण्याचे, कोणी वस्त्रहीन व भुकेली स्त्री नाचण्याचे नाकारील, पण या गावंढळ चरख्याच्या संगीताबरोबर ती सूत कातील. कारण तो तिची भूक शमवील व तिला अंगभर वस्त्रही देईल.

होय, हिन्दुस्तानची नेहमीची गरीबी तो दूर करील आणि दुष्काळाच्या आपत्तीचेही निवारण करील. पाटबंधाऱ्याच्या व दुष्काळ निवारणाच्या कामां-मध्ये कसल्या प्रकारच्या घाणेरड्या भानगडी चालतात ते या चेष्टेखोर लेख-काला कदाचित ठाऊक नसेल. पण ही कामे म्हणजे प्रायः बनवाबनवी व फसवणूक असते. पण मला उपदेश करू पाहणारे शहाणे जर प्रत्येक घरात चरखा सुरू करण्याकडे लक्ष पुरवितील तर दुष्काळ निवारण्याचा तो एक उत्तम उपाय होईल हे त्यांना कळून येईल. ऑस्ट्रियाचा दाखला पुढे करण्यात काही मतलब नाही. माझ्या देशबांधवांचे दारिद्र्य व मर्यादा मी चांगल्या जाणतो. मला भारताची कामधेनू हवी आहे आणि ती चरख्याच्या रूपानेच मला दिसत आहे. कारण ईस्ट इंडिया कंपनीचे येथे आगमन होण्यापूर्वी घरोघरी चरखा

होता. हिंदुस्तान हा कापूस पिकविणारा देश असल्यामुळे, परदेशांतून एक वारभर कापड देखील आयात करणें हा गुन्हाच समजला गेला पाहिजे. 'सर्वट ऑफ इंडिया' च्या लेखकाने उद्धृत केलेले आकडे गैरलागू आहेत.

सन १९१७-१८ साली ६२.७ कोटी रत्तल सूत तयार होऊनही हिंदुस्तानने कित्येक कोटी परदेशी सूत आयात केले आणि येथे गिरण्यांनी व मागांनी त्यांचे कापड विणले. या लेखकाला हे देखील माहीत दिसत नाही की गिरण्यांपेक्षा विणकरच या देशात अधिक कापड विणतात, पण त्याकरिता वापरले जाणारे सूत मात्र परदेशांतून येते आणि म्हणून आपले विणकर परदेशी सूत कातणारांना पोशीत आहेत. त्याऐवजी आपण दुसरे काही करीत असतो तर मला त्याचे काही मोठेसे वाटले नसते. परंतु जव्हा सूत कातणे थांबले जबर-दस्ती होऊन, तेव्हा फक्त गुलामगिरी व रिकामटेकडेपणा उरला. आपली गरज भागविण्याइतके कापड आपल्या गिरण्या निर्माण करू शकत नाहीत आणि समजा, त्यांना ते जमले तरी सक्ती केल्याखेरीज त्या किंमती खाली करणार नाहीत. सांगून सवरून पैसे मिळविण्यासाठीच गिरण्या चालविल्या जातात आणि म्हणून देशाच्या गरजांना अनुसरून किंमतीचे नियमन त्या करणार नाहीत. म्हणून खेडेगावांतील लोकांच्या हातात लक्षावधी रुपये पडावे म्हणून सूतकताईची योजना करण्यात आली आहे. प्रत्येक कृषिप्रधान देशाला शेतकऱ्याला फुरसदीचा वेळ कामी लावण्या-साठी जोडधंदा हवा असतो. हिंदुस्तानात सूतकताई हाच धंदा चालत आलेला होता. एका काळी सर्व जगाला हेवा वाटण्याजोगे कापड तयार करण्यात अपूर्व कौशल्य दाखविलेल्या भारतासारख्या देशात विनाशाला पोचलेल्या व त्यामुळे गुलामगिरी आणि दारिद्र्य आले असता त्या प्राचीन उद्योगाचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न म्हणजे एक स्वप्नातले ध्येय आहे काय?

आणि आता थोडे आकडे देतो. एखादा मुलगा दररोज चार तास काम करील तर पाव रत्तल सूत कातील. म्हणून ६४ हजार विद्यार्थी १६ हजार रत्तल सूत काततील आणि जर एक विणकर दोन रत्तल सुतांचे कापड बनवील तर आठ हजार विणकरांचा निर्वाह होऊ लागेल. पण या शुद्धीकरणाच्या वर्षात विद्यार्थ्यांनी, तपश्चर्या म्हणून सूतकताईचा सर्वत्र फैलाव करून ती लोकप्रिय करण्याकरिता अधिक वेळ या कामाला दिला पाहिजे. राष्ट्राला हे करण्याचे जमणार नाही. पण सर्वांनी या कामाला हातभार लावण्याचे ठरविले तर ते अगदी सोपे होईल आणि साठ कोटी रुपये दरवर्षी परदेशी जातात ते वाचतील. याबद्दलची चर्चा मी काही गिरणीमालक, कित्येक अर्थशास्त्रज्ञ आणि व्यापारी अशांबरोबर केली आहे आणि येथे मांडलेल्या परिस्थितीवर कोणीही कसलाही आक्षेप घेऊ शकलेला नाही. म्हणून माझी अपेक्षा एवढीच की या गंभीर

विषयाची चर्चा 'सर्वंट ऑफ् इंडिया'ने त्याला साजेशा गांभीर्याने आणि सत्य माहिती घेऊन करावी. (हा लेख 'यंग इंडिया' मध्ये गांधींनी १६ फेब्रुवारी १९२१ रोजी प्रसिद्ध केला.)

नागपूरची काँग्रेस भरण्याच्या सुमारास टाइम्स ऑफ इंडिया पत्राने गांधीजींची मुलाखत घेतली. त्या पत्राच्या प्रतिनिधीबरोबर झालेली प्रश्नोत्तरे खाली दिली आहेत. त्यावरून त्यांच्या मनात व डोक्यात चाललेले व्यापार उत्तम प्रकारे व्यक्त करतात.

**प्रश्न :** गेल्या तीन महिन्यांत आपल्या ज्या हालचाली झाल्या त्याचा आपल्या मनावर झालेला परिणाम काय आहे ?

**उत्तर :** गेल्या तीन महिन्यांतील विस्तृत अनुभवांवरून माझा असा बळकट ग्रह झाला आहे, की असहकारितेची चळवळ चांगली मुळे धरून आहे. ती एक शुद्धीकरणाची चळवळ आहे. मिसेस् बेझंट वगैरेच्या भाषणांच्या वेळी दंगली करून सभा मोडण्याचे वगैरे प्रकार मुंबईस, दिल्लीस, कलकत्त्यास, गुजरातमध्ये सुद्धा झाले ते जमेस धरूनही माझे हे मत बनले आहे. शांततामय असहकारिता लोकांनी जरी आपले ब्रीद म्हणून स्वीकारली नसली तरी अपरिहार्य धोरण म्हणून अहिंसेचे तत्त्व सर्वांस मान्य आहे. जर सरकारची निखालसपणे आम्ही खात्री पटविली की आम्ही कोठेही, केव्हाही हिंसाचार करणार नाही तर सरकार सुद्धा आपले स्वरूप नकळत आणि नाखुषीने पण खात्रीने बदलील.

**प्रश्न :** कोणत्या दिशांनी हे स्वरूप बदललेले दिसेल ?

**उत्तर :** आम्हाला अपेक्षित असलेल्या दिशेनेच; आम्ही सरकारने जसे बदलावे म्हणतो तसेच

**प्रश्न :** हे थोडे खुलासेवार सांगाल ?

**उत्तर :** माझे म्हणणे असे की, लोकांना निर्धारपूर्वक वागण्याने, त्यागाने खिलाफत व पंजाबचे अत्याचार या बाबतीत न्याय मिळून व आमच्या पसंदगीचे स्वराज्य आम्हांस मिळेल अशा दिशांनी सरकार बदलेल.

**प्रश्न :** पण तुमचे स्वराज्य म्हणजे काय ? व सरकारचा संबंध त्यात कोठे यतो ? सरकारचे स्वरूप बदलेल म्हणजे काय ?

**उत्तर :** सध्या तरी, आधुनिक कल्पनांशी सुसंगत पार्लमेंटरी पद्धतीचे स्वराज्य हिंदुस्तानास मिळेल आणि ते ब्रिटिशांच्या मैत्रीपूर्ण वागणुकीने मिळेल किंवा त्यांचा संबंध राहाणार नाही.

**प्रश्न :** त्यांचा संबंध राहाणार नाही म्हणजे काय ?

**उत्तर :** ब्रिटिश सरकारचें जवळजवळ प्रत्येक कृत्य स्वार्थीपणा व लोभ यांच्या पोटी केलेले असते. माझे हे सध्याचे आंदोलन सरकारचे दोष काढून टाकण्याकरिता आहे. समजा, त्यांच्याबरोबर असणारे सगळे साहचर्य निपटून काढून

आम्ही त्यांच्या लोभीपणाला अवकाशच ठेविला नाही. अशा स्थितीत त्यांना हिन्दुस्तानात राहण्याची इच्छा राहाणार नाही. सोमालीलँडमध्ये असा प्रकार घडला. तेथील राज्यकारभार आपल्याला लाभदायक होत नाही असे दिसून आले तेव्हा ते तेथून निघून गेले.

**प्रश्न :** प्रत्यक्ष व्यवहारात हे कसे घडून येईल?

**उत्तर :** तुमच्यापुढे मी जो आराखडा ठवला आहे तो अखेर जी शक्यता मला वाटते तिचा आहे. पण माझी अपेक्षा या प्रकारचे काही होणार नाही. ब्रिटिश लोकांच्या स्वभावाची मला जी जाणीव आहे तीप्रमाणे जे अपरिहार्य होते त्याचा स्वीकार ते करतात. लोकमत जेव्हा खरे व समर्थ होते तेव्हा त्याला ते मान्यता देतात, तेव्हा आणि तेव्हाच फक्त त्यांच्या ध्यानात येईल की त्यांच्या नावाने साम्राज्याच्या मंत्र्यांनी आणि त्यांच्या हिंदुस्तानातील प्रतिनिधींनी केवढे हिडीस अन्याय हिंदुस्तानातील लोकांवर केलेले आहेत. म्हणून मग ते लोकांच्या इच्छेप्रमाणे खिलाफत व पंजाब या बाबतीतील अन्याय दूर करतील आणि हिंदी लोकांच्या निवडक पुढाऱ्यांनी व्यक्त केलेल्या इच्छांना अनुसरून स्वराज्याची घटना देऊ करतील.

**प्रश्न :** हिंदुस्तानात राहाणे लाभदायक नाही म्हणून येथून निघून जाण्याचे ब्रिटिश सरकारने ठरविले असे समजू या. त्यावेळी हिंदुस्तानात काय स्थिती असेल?

**उत्तर :** अशा वेळी, हिंदुस्तानने अलौकिक आध्यात्मिक उंची तरी गाठलेली असेल अथवा हिंसाचाराविरुद्ध हिंसाचार भिडविण्याची शक्ती संपादन केलेली असेल. तोपर्यंत देशाने उच्च प्रतीचे संघटनाकौशल्य संपादन केलेले असेल आणि कोणत्याही प्रसंगाला तोंड देण्याची त्याची तयारी राहील.

**प्रश्न :** निराळ्या शब्दांत तुमची अशी अपेक्षा आहे की ज्या क्षणी ब्रिटिश येथून निघून जाण्याचे ठरवितील, आणि असा प्रसंग उभा ठाकलाच तर त्या क्षणाला हिंदुस्तानची तयारी, सामर्थ्य, व एकंदर स्थिती अशी असेल की ब्रिटिशांकडून हिंदुस्तानचा राज्यकारभार चालत्या दुकानाचा ताबा घ्यावा, तसा हिंदी पुढाऱ्यांना घेता येईल आणि तो हिंदुस्तानच्या हितासाठी व प्रगतीसाठी चालविता येईल.

**उत्तर :** गेल्या काही महिन्यांतील अनुभवाने माझे मन इतके आशापूर्ण बनलेले आहे की चालू वर्षाच्या उरलेल्या, नऊ महिन्यांत स्वराज्य मिळेल आणि खिलाफत व पंजाब प्रकरणात देखील न्याय मिळेल आणि लोकमताला अनुसरून स्वराज्यसंस्थापना होईल.

**प्रश्न :** नऊ महिन्यांच्या अखेर सध्याचे सरकार कोठे असेल?

**उत्तर :** सिंह व कोकरू एकमेकांशेजारी पहुडलेले असतील.

# ३. असहकारितेला चढलेला जोर आणि आलेला वेग

'एक वर्षात स्वराज्य' ही केवळ एक घोषणा नव्हती. प्रामाणिकपणे दिलेले गांधीजींचे ते आश्वासन होते. पण ते बिनशर्त मात्र दिलेले नव्हते. धोरण म्हणून का होईना, पण कायावाचामनेकरून अहिंसेचे, शांततेचे, अनत्याचाराचे पालन प्रत्येक असहकारितावादी म्हणविणाराने केले पाहिजे आणि जो कार्यक्रम ठरविला होता त्याचे आचरण केले पाहिज ही शर्त होती. मार्च महिन्यात त्यांनी बेझवाडा येथे जो कालबद्ध कार्यक्रम टिळक स्वराज्य निधी जमविण्या-बद्दल, काँग्रेसचे सभासद नोंदविण्याबद्दल आणि चरख्यांची संख्या पुरी करून सूतकताई वाढविण्याबद्दल सर्व प्रांतांना ठरवून दिला होता तो कसा पुरा होत आहे याचा अजमास ते घेत होते. पूर्ण अहिंसा आणि हिंदु-मुस्लिम ऐक्यसंवर्धन याही त्यांच्या कसोटचा होत्या. गांधींचा विरोध ब्रिटिश राज्यपद्धतीला होता. 'हिंदुस्तानात प्रत्येक इंग्रज माणसाला विज्ञप्ती' या लेखात ते म्हणतात, "ज्या पद्धती माणूस अंमलात आणतो त्यापेक्षा तो श्रेष्ठ असतो. येथे हिंदुस्तानात तुम्ही अशा एका पद्धतीचे गुलाम आहा की जिचे वर्णन दुष्टपणाच्या मर्यादे-बाहेर गेले आहे. त्याचे वर्णन करणे अशक्य आहे. पण त्या मर्यादेचा अत्यंत जोरदारपणे धिक्कार करीत असता तुम्ही मूलत: वाईट नाही असा विचार मी करू शकतो. आपले एकत्र जीवन हे परस्परांवरील अविश्वास व परस्परां-बद्दल वाटणारी भीती यांवर आधारित आहे. तुम्ही हे कबूल कराल की हे मर्दपणाला साजेसे नाही. तुम्हांला व मला खाली खेचणाऱ्या या पद्धतीचा विनाश करण्याला तुम्ही मला येऊन मिळा." गांधींचे उद्दिष्ट असे होते की, अनेक राष्ट्रांनी एकत्र यावे आणि जगाच्या हितासाठी आपल्यापाशी जे काही उत्तमोत्तम असेल ते द्यावे आणि जगातील गरीब व दुर्बळ राष्ट्रांना व मानव-वंशांना पाशवी शक्तीने नव्हे, तर स्वत: दु:ख सोसून संरक्षण द्यावे.

स्वराज्याची संस्थापना कशी होणार? इतिहासाच्या अभ्यासाने गांधींचे असे मत झाले होते की, ब्रिटिश लोक नुसत्या साध्या व शुद्ध न्यायापुढे मान झुकवीत नाहीत. जेव्हा भारतीय लोक पुरेसा दृढनिर्धार दाखवितील आणि त्याग करतील किंवा न्यायासाठी सामर्थ्य दाखवितील तेव्हाच ते साद देतील. हे

सामर्थ्य आधिभौतिक आहे की आध्यात्मिक आहे याबद्दल त्यांना काही पर्वा वाटत नाही. पण आपण फक्त शांततापूर्ण असहकारितेचेच सामर्थ्य उपयोगात आणणार याबद्दल गांधींचा मार्ग निश्चित झाला होता. गुप्तता, कटकारस्थाने व हिंसाचार यांवर आधारलेल्या पद्धतीबद्दल त्यांना घृणा होती व त्यांचा त्यांनी केव्हाच परित्याग केला होता. गुजरात राजकीय परिषदेमध्ये १ जून १९२१ रोजी त्यांनी असहकारितेचा ठराव मांडला, त्यावेळी गुजराती लोकांनी आपले कर्तव्य वक्तशीरपणे बजावले नाही, असा ठपका त्यांचेवर ठेवून गांधीजी म्हणाले, "इतर प्रांत काय करीत आहेत याचा विचार करीत न बसता माझ्या बंधुभगिनींनी दहा लाख रुपये टिळक स्वराज्य निधीसाठी जुलै महिना उजाडण्यापूर्वी जमा करावे, एक लाख चरखे घराघरांतून आपले संगीत सुरू करतील असे पाहावे आणि तीन लाख काँग्रेसचे सभासद नोंदवावे. सूतकताई व हातमागावरील कापडाचे उत्पादन आपण ठरल्याप्रमाणे करून स्वदेशी व्रताचे बरोबर पालन केले की सरकार आपल्यापुढे गुडघे टेकते की नाही ते पाहा."

चरख्याच्या मदतीच्या बळावर स्वराज्य मिळविण्याची कल्पना म्हणजे एक चमत्कार आहे असे कोणी तरी मौलाना महमदअली यांजपाशी कलकत्त्याला म्हटले. त्यावर त्यांनी उत्तर दिले की, तो एक चमत्कार आहे, पण त्याच्यापेक्षा मोठा चमत्कार हा आहे की, सहा हजार मैल दूर राहाणारे मूठभर गोरे लोक तेहतीस कोटी लोकांवर राज्य करतात. स्वराज्य संपादनासाठी आपल्याजवळ आत्मविश्वास असला पाहिजे आणि आपणांमध्ये ऐक्य नांदले पाहिजे. गुजराती स्त्रियांना आपल्या दागिन्यांचा त्याग करण्यास त्यांनी कळकळीचे आवाहन केले आणि पुरुषांना आपल्या पत्नींना व भगिनींना देशासाठी, स्वराज्यासाठी हा तात्पुरता त्याग करण्यास प्रवृत्त करण्यास सांगितले. स्वराज्यप्राप्तीनंतर त्यांनी पुनः सोन्याचे व हिऱ्यामोत्यांचे अलंकार घालण्यास त्यांची हरकत नव्हती. नर्मदामाईचा निरोप घेताना (कारण तिच्या काठी वसलेल्या भडोच शहरी गुजरात राजकीय परिषद चालू होती) एवढा निर्धार करा, असें गांधी म्हणाले अहिंसेच्या ठरावावर बोलताना ते म्हणाले, ठरल्याप्रमाणे निधी जमविणे, चरखे चालू करणे व सभासदांची नोंदणी करणे या गोष्टी बरोबर पार पाडल्या की नाही हे तपासून पाहाता येते, पण अहिंसा आपल्या चित्तात व वागण्यात किती बाणली आहे हे मोजून पाहाता येत नाही. डोळ्यांना दिसत नाही. तिचा संबंध प्रत्येकाच्या हृदयाशी आहे. जीवनाला श्वासोच्छ्वास जितका अवश्य आहे तितकीच अहिंसा असहकारितेच्या आंदोलनाला अवश्य आहे. आपण जर हिंसाचाराने, विमानांच्या सहाय्याने स्वराज्य मिळविण्याचें मनात आणिलें तर

शंभर वर्षांत सुद्धा ते शक्य नाही. पण अहिंसा बरोबर पाळली तर ठरलेल्या मुदतीत तें शक्य होईल. मालेगांवी कॉंग्रेसजन म्हणविणारांनी स्वराज्याच्या घड्याळाचे काटे मागे सरकवून त्याचा वेग खंडित केला आहे. आपल्यावर बंदुकींच्या गोळ्यांचा वर्षाव झाला अथवा आकाशातून बॉंबगोळे बरसले तरी आपण शांतपणे आपले काम करीत राहिले पाहिजे आणि कोणा सरकारी अधिकाऱ्याला मारण्यासाठीं धाव घेता कामा नये अथवा पोस्ट-ऑफिसांना आगी लावता कामा नये. एक अहिंसेचे सामर्थ्य आपण संपादन केले की आपल्याला कोणी सुद्धा जिंकू शकणार नाही. भडोच येथे झालेल्या या राजकीय परिषदेनें नागपूर कॉंग्रेसच्या सर्व ठरावांचा पुनरुच्चार केला.

या परिषदेपूर्वी गांधीजी गुजरात व महाराष्ट्र या प्रांतांचा दौरा करण्यात गुंतलेले होते. बलसाड, नवसारी, सिसोद्रा, रास, बोरसद, हालोल वगैरे अनेक ठकाणी दिवसातून दोनदोन, तीनतीन ठिकाणी ते भाषणे करीत, कपरवंज, काठलाल या ठिकाणी ते गेले. महाराष्ट्र प्रांतिक परिषदेत वसई येथे त्यांनी भाषण केले. मध्येच अलाहाबाद व सिमला यथे जाऊन आले. भुसावळ, संगमनेर, सोलापूर, बार्शी, पंढरपूर, विजापूर, पुणे इत्यादि जागी ते जाऊन आले. पुण्यास टिळक महाविद्यालयाला भेट देऊन तेथे त्यांनी भाषण केले. तेथे असहकारी विद्यार्थ्यांची सोय, धंदेशिक्षणाची व्यवस्था करण्यात आली होती तिचा खास उल्लेख त्यांनीं केला. ते पुढे म्हणाले की राष्ट्रीय विद्यालये सरकारी शाळांच्या केवळ प्रतिकृती होतील ही 'टाइम्स ऑफ इंडिया' ची टीका टिळक महाविद्यालयाने खोटी ठरविली आहे. यापूर्वी जून महिन्यात एक आठवडा सिंधमधील दौरा गांधींनी केला, तो बराच घाईगर्दीचा झाला. हैदराबाद, कराची, लारखाना, शिकारपूर, सक्कर, रोहरी, कोत्री, मिरपूरखास, इतक्या शहरांना भेटी देऊन त्यांनी भाषणे केली. यावेळी काम अर्धेमुर्धेच होत आहे, असे सक्करचे वकील मूळचंद म्हणाले तेव्हा दुसरा एक मित्र म्हणाला, 'सबंध भाकरी न मिळाली तर अर्धीवरच संतोष मानला पाहिजे.' सिंधमध्ये माणसें, पैसा व कर्तबगारी आहे, असे मत गांधींनी व्यक्त केले.

१५ एप्रिल १९२० रोजी बरेलीचे अहमद हुसेन यांनी गांधींना एक पत्र लिहून मौलाना महंमदअली यांनी मद्रासला केलेल्या एका भाषणाकडे त्यांचे लक्ष वेधून बरेच प्रश्न विचारले. त्याची उत्तरे गांधींनी सविस्तर दिली. महंमदअली या भाषणात असें बोलल्याचें प्रसिद्ध झालें होतें की, ज्या ब्रिटिशांनी इस्लामला दुर्बळ बनविले आहे व मुसलमानांची पवित्र क्षेत्रे अन्यायाने आपल्या ताब्यात ठेविली आहेत त्या ब्रिटिशांवर जर अफगाणिस्तानच्या अमीराने स्वारी

केली तर मी त्याला उघडपणे मदत करीन. महंमदअली असे बोलले किंवा नाही ते गांधींना माहीत नव्हते. पण त्यांनी म्हटले की जर ब्रिटिश सरकाराविरुद्ध अफगाणिस्तानच्या अमीराने युद्ध पुकारले तर एका अर्थाने मी त्याला अवश्यमेव मदत करीन. म्हणजे याचा अर्थ असा की, मी माझ्या देशबांधवांना असे सांगेन की, या सरकारला अमीराशी होणाऱ्या युद्धात मदत करणे हा गुन्हा होईल. कारण त्याने आमचा विश्वास सर्वस्वी गमाविला आहे आणि त्याला सत्तेवर राहण्याचा काही अधिकार नाही. पण हिंदी लोकांना अमीराला मदत करण्यालाही मी सांगणार नाही. कारण तें आमच्या अहिंसेच्या ब्रीदाशी विसंगत होईल. मी म्हणतो याच अर्थाचे महंमदअली बोलले असतील. तथापि मी माझ्या वाचकांना इशारा देतो की, अफगाण स्वारीच्या या बागुलबोवावर तुम्ही मुळीच विश्वास ठेवू नका. त्यांच्याच लष्करी प्रश्नांवर लिहिणाऱ्या लेखकांनी आम्हाला विश्वासात घेऊन सांगितले आहे की आपल्या सैनिकांना प्रशिक्षण देण्यासाठी अथवा त्यांना कामात गुंतवून ठेविण्यासाठी अनेक सरहद्दीवरील स्वाऱ्यांवर त्यांना पाठविण्यात येत असे. आम्हा शस्त्रहीन, असहाय्य व भोळसर हिंदी लोकांना, हें सरकार आपल्या दडपणाखाली ठेविण्यासाठी काय काय करते हे समजत नाही. परकीय स्वाऱ्यांपासून आमचे संरक्षण करण्याकरिता लष्करी खर्च सारखा वाढता ठेवण्यात आला आहे. मला असे सुचवायचे आहे को, आमच्या शीख, गुरखा, पठाण, रजपूत यांजवर विश्वास नसल्यामुळे लष्करी खर्च सतत वाढत राहिला आहे. अफगाण अमीराबरोबर तह करण्याचे कारण रशियन स्वारीची भीती हें नसून येथील देशी लष्करावर भरंवसा नाही हे होय. आज रशियाचा बागुलबोवा अगदीच अविश्वसनीय आहे. बोल्शेविकांपासून आपल्याला भीती आहे यावर माझा कधीच विश्वास बसला नाही. समाधानी व सामर्थ्यसंपन्न, विशेषतः ब्रिटिशांचा दोस्त असताना हिंदुस्तान कोणत्याही स्वारीशी मुकाबला करू शकेल. पण या सरकाराने जाणूनबुजून आम्हांला षंढ बनविले आहे आणि आमच्या शत्रूंचे व जगाचे भय आम्हांला दाखविण्याचे काम चालू ठेविले आहे आणि आमच्या संपत्तीची लयलूट चालविली आहे. त्यामुळे आम्ही आत्मरक्षणाला असमर्थ झालो आहो आणि आमच्या दारिद्र्याचा साधा प्रश्न सुद्धा आम्हांला सोडविता येत नाही. म्हणून मला आशा आहे की, अमीरसाहेब या सरकाराशी कसलाही करार करणार नाहीत असा कोणताही करार हिन्दुस्तान व इस्लाम यांच्याविरुद्ध केलेला अपवित्र करार होईल. या सरकारला ओडवायरवादाचा त्याग करावयाचा नसल्यामुळे मुसलमानांना दिलेला शब्द पाळण्याची जरूर वाटत नाही आणि हिन्दुस्तानालाही आपली स्वाभाविक उंची गाठू द्यावयाची नाही व त्यासाठी अफगाणि-

स्तानाशी करार करावयाचा आहे. असहकारितावाद्यांचे मत एकच व एवढेच आहे की आम्ही स्वतःच सहकार्य करण्याला नाखूष असताना इतरांनी सरकार-जवळ सहकार्य करावे अशी इच्छा करणे शक्य नाही.

अहफद हुसेन यांचा दुसरा प्रश्न होता की, फक्त ईश्वराला मानणाऱ्या लोकांनाच असहकारितेच्या आंदोलनात सामील होता येते काय? गांधींनी सांगितले की, असहकारितावादी होण्यासाठी कोणालाही आपला धर्म जाहीर करण्याचे प्रयोजन नाही. अहिंसेवर विश्वास असणाऱ्या व असहकारितेचा कार्यक्रम मान्य असणाऱ्या कोणालाही असहकारितावादी होता येते. तिसऱ्या मुद्द्याचे उत्तर देताना गांधींनी सांगितले, "कोणाही सरकारी नोकराला आपल्या नोकरीचा राजीनामा देता येईल, पण तशी हाक मी सध्या दिलेली नाही. संपूर्ण असहकारिता एकदम न करण्याचे कारण इच्छेचा अभाव हे नसून स्वतःचे सामर्थ्य किती याची खात्री करून घेऊन मगच संपूर्ण असहकारिता करावी असे आहे. कोठेही हिंसेचा वा अत्याचाराचा उद्रेक होऊ नये याची काळजी घेणे फार आवश्यक आहे. चवथा प्रश्न स्वराज्याच्या अर्थाबद्दलचा होता. कोणतेही बाह्य नियमन किंवा निर्बंध नसता आपला कारभार करणे हा माझा स्वराज्याचा अर्थ आहे. आपला लष्करी खर्च आणि उत्पन्न वसूल करण्याची आपली पद्धती आपणालाच ठरविण्याची आहे. कोठूनही आपले शिपाई काढून घेण्याचे सामर्थ्य हिंदुस्तानच्या अंगी असले पाहिजे. एक वर्षाच्या आत जर स्वराज्यस्थापना झाली नाही तर एकाही विद्यार्थ्याला परत शाळेत जाता येणार नाही व एकाही वकिलाला आपला व्यवसाय पुनः सुरू करता येणार नाही.

बडोदे संस्थानच्या सरकारने एक असा हुकूम काढला की, परवाना दिलेल्या देशी दारूच्या दुकानात दारू पिण्याच्या उद्देशाने शिरत असलेल्या कोणालाही त्रास देऊन त्याला प्रतिबंध करण्याला मनाई आहे. त्याच्या मद्य-प्राशन स्वातंत्र्यावर हा घाला कोणी घालू नये. यावर गांधीजी लिहितात, "चोराला चोरी करण्याचे स्वातंत्र्य आहे यात काही संशय नाही. पण कोणा प्रामाणिक माणसाला ही चोरी थांबविण्याचा हक्क नाही काय? कायदा लोकांना चोरी करणाराला मार देऊन हाकून लावण्याचाही हक्क देतो. मग चोरी करण्याच्या हक्काचे येथे रक्षण कोठे होते? उलटपक्षी, मद्यपानप्रतिबंधक फक्त दारूच्या दुकानात शिरणाऱ्याला विनंती करून दारू पिण्यापासून परावृत्त करू पाहातात. स्वच्छ शब्दांत बडोदे सरकारचा हुकूम मद्यपान सद्गुण समजतो आणि दारूची दुकाने लोकांच्या हितासाठीच उघडलेली आहेत असे मानतो असे दिसते. जर एखाद्या मद्यपी माणसाला अथवा दारूच्या दुकानदाराला शिवीगाळ केली अथवा मारपीट केली तर असे करणाऱ्यावर बडोदे सरकारने

काम चालविले अथवा त्याला शिक्षा केली तर त्या कृतीचे समर्थन करणे बरोबर आहे. पण दारूच्या दुकानाशी उभे राहून आत शिरणाराला विनंती करून आत जाऊ नको म्हणून म्हटले आणि त्याबद्दल त्याला शिक्षा होऊ लागली तर बडोदे सरकारचे धोरण मद्यपानाला उत्तेजन देण्याचे आहे असेच म्हणावे लागेल. पण इतके लांच्छनास्पद धोरण बडोदे सरकार ठेवणे शक्य नाही. हा हुकूम कोणी दडप्या अधिकाऱ्याने काढलेला दिसतो आणि तो मागे घेतला जाईल अशी मी आशा करतो." पुढे गांधींनी म्हटले की, स्वराज्यात मद्यपानबंदी शंभर टक्के असेल याबद्दल आमचा निश्चय पक्का झालेला आहे.

जळगावचे फिरोजशाह तेमुलजी मिस्त्री यांनी गांधीजींना पत्र पाठवून कळविले की ते एक दारूचे दुकान चालवितात. लहानपणापासून त्यांचा तोच एक उद्योग आहे. त्यांचे वय एकावन्न वर्षांचे असून एका मोठ्या कुटुंबाचे भरणपोषण या त्यांच्या उद्योगामुळेच होऊ शकते. मी जर हा धंदा सोडून दिला तर चार हिंदू माणसे तो चालवायला पुढे येण्याला टपून बसलेली आहेत. अशा स्थितीत मी तो सोडून देण्यात काय अर्थ आहे? असे त्यांचे म्हणणे एकून गांधींनी त्यांच्याबद्दल सहानुभूती दाखविली. पण पुढे असे म्हटले की, अशा संकटातून वर येण्यातच खरा पुरुषार्थ आहे. दारूचे दुकान चालविणे हे खरोखर पाप वाटत असेल तर ते पापाचरण बंद केलेच पाहिजे. इतर ते पाप करतील मग आपणच ते करीत राहण्याने काय बिघडते असे म्हणून चालणार नाही. स्वयंसेवक म्हणविणारांनी मद्यपी लोकांचा अपमान करून त्यांना शिवीगाळ अथवा मारहाण करून मद्यपानबंदी घडवून आणण्यात मतलब नाही. एकाची गाढवावर बसवून गावभर धिंड काढली असे गांधींना समजले तेव्हा त्यांनी या प्रकाराचा धिक्कार केला व असे प्रकार थांबलेच पाहिजेत, असे जरबेने सांगितले. आपण जर अत्याचार करून पापाचरणाचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न करू तर सरकाराला आपण ज्या कारणासाठी सैतानी म्हणतो त्याच कारणासाठी आपण सैतानी बनू. स्वराज्यात दारूच्या उत्पन्नावर आपल्याला शिक्षणाचा खर्च भागविण्याचा सैतानी प्रकार करावयाचा नाही हे सर्व शांतता-पूर्ण मार्गांनी असहकारितावाद पतकरलेल्या स्त्री-पुरुषांनी विसरून चालणार नाही, असे गांधींनी स्पष्ट केले.

'आपली कसोटी' या शीर्षकाखाली 'नवजीवन' मध्ये लिहिताना सर्व असहकारितावाद्यांना ते बजावतात की, (९-६-२१) हिंदुस्तानने दोन महिन्यां-पूर्वी बेझवाडा येथे प्रतिज्ञा केली की, ३० जूनपूर्वी टिळक स्वराज्य निधीसाठी एक कोटी रुपये जमा करू, एक कोटी काँग्रेसचे सभासद नोंदवू आणि वीस लाख चरखे चालू करू. यांतील काही अल्पांशानेही शिल्लक राहिले तर सर्वांचीच

लाज जाईल. आतापर्यंत सर्व देशातून वीस लाख रुपये देखील जमविलेले नाहीत. गुजरात मनात आणील तर एकटाच ऐंशी लाख रुपये देईल, पण गुजरातने कंजुषपणाने आपल्याकरिता दहा लाखांची मर्यादा घालून घेतली आहे. भरूच परिषदेत गुजरातचा वाटा पुढीलप्रमाणे ठरविण्यात आला आहे. दहा लाख रुपये, तीन लाख सभासद आणि एक लाख चरखे चालू करणे. काही मित्रांशी चर्चा केल्यावर गांधींनी सुचविले की, दरमहा पगार मिळविणाराने आपल्या पगाराचा दहावा भाग द्यावा; व्यापारी, वकील, डॉक्टर यांनी गेल्या बारा महिन्यांत झालेल्या प्राप्तीचा एकदशांश टिळक स्वराज्य निधीला द्यावा. स्थावर मिळकतीतून भाड्याच्या रूपाने व रोख रकमा गुंतवल्या असतील त्यावर येणाऱ्या व्याजाच्या रूपाने जे उत्पन्न घेतात त्यांनी आपल्या उत्पन्नाचे अडीच टक्के द्यावे. असे जर प्रत्येक जण करील तर एक कोट रुपये केव्हाच जमतील.

काँग्रेसची वर्किंग कमिटी व तिचे कार्य या विषयावर गांधींनी 'यंग इंडिया' मध्ये २९ जून १९२१ रोजी लिहिले. त्या लेखात ते म्हणतात, न्याय्य व शांततापूर्ण मार्गांनी स्वराज्य संपादन करणे हे काँग्रेसचे ध्येय आहे. या ध्येयाच्या दिशेने जलद वाटचाल व्हावी म्हणून झटणे हे वर्किंग कमिटीचे कर्तव्य आहे. काँग्रेसची घटना अशी केलेली आहे की राष्ट्राची स्वयंशासनाची शक्ती तीमुळे जोखली जावी आणि सिद्ध व्हावी. खुषीने पत्करलेली बंधने म्हणजे लोकमत आणि लोकांची मान्यता. काँग्रेस ज्याअर्थी सध्याची सरकारी पद्धत नष्ट करण्यासाठी झटत आहे त्याअर्थी काँग्रेसचा अधिकार जितका वाढेल तितका सरकारचा कमी होईल हे उघडच आहे. जेव्हा काँग्रेसला पूर्ण लोक-विश्वास आणि खुषीने लोकांनी केलेले आज्ञापालन लाभेल तेव्हाच पूर्ण स्वराज्य मिळेल. कारण त्यावेळी काँग्रेसमार्फत व्यक्त झालेले लोकमत मानले पाहिजे अथवा आत्महत्या केली पाहिजे एवढेच सरकारला करण्यास शिल्लक राहाते. म्हणून काँग्रेसने पराकाष्ठेचे ऐक्य राखले पाहिजे, अत्यंत बलवान झाले पाहिजे व देशातील सर्वश्रेष्ठ संघटना असे स्थान संपादन केले पाहिजे. म्हणून काँग्रेसच्या धोरणाला बिनतक्रार मान्यता मिळाली पाहिजे.

काँग्रेस वर्षाकाठी एकदाच भरते तेव्हा धोरणे कायम करण्यात येतात. काँग्रेसने केलेले ठराव ऑल इंडिया काँग्रेस कमिटीने अंमलात आणावयाचे असा संकेत आहे. काँग्रेसइतक्याच अधिकाराने सर्व ठरावांचा अर्थ सांगण्याचे व नवे प्रश्न उद्‌भवतील ते हाताळण्याचे काम या कमिटीने केले पाहिजे. सभासदांनी अर्थ लावण्याबद्दल चर्चा हवी तितकी करावी, पण एकदा निर्णय झाल्यावर तो बहुमताचा निर्णय सर्वांनी पाळला पाहिजे. जाहीरपणे त्याच विषयांची चर्चा पुनः कोणी करणे चुकीचे ठरेल. ही कमिटी कार्यक्षम व्हावी

म्हणून पंधरा इसमांची वर्किंग कमिटी, या कमिटीकडे सोपविलेल्या कामांची वासलात लावण्यासाठी निवडण्यात आली आहे. व्यवहारत: वर्किंग कमिटीकडेच सर्वाधिकार राहतात. पैशाचा सर्व व्यवहार तीच करणार. प्रधानमंडळाचा व पार्लमेंटचा जो संबंध तोच वर्किंग कमिटीचा व ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचा संबंध. या वर्षात घटनात्मक सरकार जर आपण उभे करणार तर वर्किंग कमिटी सर्वाधिकारी असलीच पाहिजे. वर्किंग कमिटी एकमताची असली पाहिजे व तीमध्ये गट अथवा पक्ष असून चालणार नाहीत. तिचे सर्व निर्णय शक्यतोवर एकमताचेच असावयास हवेत. एखाद्या सभासदाला हे परवडेनासे झाले तर राजीनामा देण्याला तो मोकळा आहे. पण कमिटीत अडवणूक अथवा अडथळा आणणे अथवा वर्तमानपत्रात निर्णयांची चर्चा त्याने करणे अनुचित होईल. वर्किंग कमिटीचे काम पसंत नसेल तर ऑल इंडिया काँग्रेस कमिटीला तिच्यावर अविश्वासाचा ठराव करून काढून टाकता येईल. ऑल इंडिया काँग्रेस कमिटी वर्किंग कमिटीचे ठराव बदलू शकेल. माझे नम्र मत असे आहे की, वर्किंग कमिटीचे लोकांवर वजन नसेल तर चालू वर्षात स्वराज्य मिळविणे अशक्य होईल. म्हणून आपल्यापैकी प्रत्येकाने काँग्रेसचे ठराव अगदी बारीकसारीक तपशील पाळून अंमलात आणलेच पाहिजेत. सरकार अखेरीस जे अधिकाराच्या व सत्तेच्या बळावर करते तेच काँग्रेस प्रेमाच्या बळावर करू पहात आहे. सरकारने लोकांच्या मनात भीती व जरब बसवून पार पाडण्याचा क्रम ठेविला आहे, त्याऐवजी आपल्या तत्त्वांना व धोरणांना स्वखुषीची मान्यता लोकांकडून मिळवून काँग्रेस पार पाडण्याचा प्रयोग करीत आहे. अशा रीतीने लोकांच्या कार्यक्रमात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीत अहिंसा व अनत्याचार आहे. लोकांचे सहकार्य कोणत्याही संघटनेला मिळणे अत्यंत आवश्यक आहे. एक वर्षात स्वराज्य मिळविण्याचा जो निर्णय नागपुरास काँग्रेसने केला आहे त्यासाठी काँग्रेसच्या निर्णयांशी एकनिष्ठ राहणे ही अपरिहार्य शर्त आहे.

'चरख्याचा संदेश' या मथळ्याखाली 'यंग इंडिया' मध्ये गांधींनी एक लेख लिहिला. त्यावर तारीख आहे २९-६-१९२१. ते लिहितात : चरख्याच्या प्रशंसापर असे एक लहानसे टिपण 'इंडियन सोशल रिफॉर्मर' पत्राने प्रसिद्ध केले आहे. त्यात ते म्हणतात कंटाळा येणार नाही अशाप्रकारे सूत काढण्याचे काम संघटित केले जाईल. अमृतलाल ठक्कर यांनी 'सर्वंट ऑफ इंडिया' या पत्रात लिहिलेल्या आपल्या लेखात म्हटले आहे की, काठेवाडात सध्या ते जो एक प्रयोग करीत आहेत त्यात असे दिसून आले आहे की, तेथील शेतकरी स्त्रियांनी चरख्यावर सूत काढण्याला प्रारंभ केला आहे. त्यांना चरखा कंटाळवाणा वाटण्याचा संभव नाही. पूर्वी तो त्यांच्या चांगल्या माहितीचा होता व आता तो उपजीविकेचे साधन

या नात्याने उपयोगी पडत आहे. तेथील चरखे बंद पडले याचे कारण त्यांनी काढलेल्या सुताला मागणी येईना. केवळ एक विरंगुळा अथवा फॅशन म्हणून ज्यांनी सूत काढणें सुरू केले असेल अशा शहरातील लोकांना त्याचा कंटाळा येण्याचा संभव आहे. देशाचे आज अत्यंत उपयुक्त कार्य म्हणून कर्तव्यबुद्धीने ते त्यांच्याशी निष्ठापूर्वक वागतील व आपला फावला वेळ सूत काढतील. शाळांत जाणारी मुले हा कातणारांचा एक तिसरा वर्ग आहे. राष्ट्रीय शाळांमध्ये चरखा चालू करण्याच्या प्रयोगापासून फार मोठी फलनिष्पत्ती होईल अशी माझी अपेक्षा आहे. हा प्रयोग शास्त्रीय पद्धतीने चालविला तर मुलांचे शिक्षक, हिंदुस्तानातील साडेसात लक्ष खेड्यांतील मुलांना उत्तम प्रकारचे शिक्षण देतील, त्यांना त्याचा कंटाळा वाटणार नाही आणि लोकशिक्षणाचा सार्वत्रिक प्रयोग सिद्धीस जाण्यासाठी आवश्यक तेवढे द्रव्यही संपादन करतील. त्याकरिता जादा कर बसविण्याचे कारण पडणार नाही व अनैतिक (मद्यप्रसारासारख्या) उपायांकडे वळण्याचेही कारण पडणार नाही.

'इंडियन सोशल रिफॉर्मर' मधील लेखकाची अशी सूचना आहे की चरख्यावर बारीक धागा काढण्याचा प्रयत्न करण्यात यावा. त्याच्या माहितीसाठी मी सांगतो की, ती प्रक्रिया अगोदरच सुरू झालेली आहे, पण डाक्क्याच्या मलमलीसारखे किंवा वीस नंबरी सूत निघू लागण्याला थोडा वेळ लागेल. गेल्या सप्टेंबर महिन्यातच सूतकताईला प्रारंभ झाला आहे हे लक्षात घेता आणि हिंदुस्तानाचा थोडाफार भरंवसा बसायला डिसेंबरातच सुरुवात झाली हे पाहता झालेली प्रगती पुष्कळच झाली आहे असे समजण्यास हरकत नाही.

या लेखकाची तक्रार अशी आहे की, जेवढे जलद सूत कातून जमा होत आहे तितक्या गतीने ते मागावर विणले जाण्यासाठी त्याचा उठाव होत नाही. अंशतः हे म्हणणे खरे आहे. पण त्यासाठी हातमागांची संख्या वाढविणे हा खरा उपाय नव्हे, तर असलेल्या हातमागांनी विदेशी सूत विणायला न घेता चरख्यावर कातलेले सूत विणायला घेणे हा खरा इलाज आहे. विणकाम हे सूत कातण्यापेक्षा बरेच गुंतागुंतीचे काम आहे. सूतकताईप्रमाणे विणकाम हा काही एक जोडधंदा नव्हे. तो उपजीविकेचा एकमेव धंदा आहे. परदेशांतून होणारी कापडाची सर्व आयात थांबविता येईल इतके विणकर व माग हिंदुस्तानात उपलब्ध आहेत. जपानमधून व मँचेस्टरहून येणारे बारीक सूत वापरून कापड विणणारे हजारो माग मद्रास, महाराष्ट्र आणि बंगाल प्रांतांत विणकर चालवीत आहेत हे आपण समजून घेतले पाहिजे. या सर्वांचा उपयोग हाताने काढलेले सूत वापरण्यासाठी होणे अत्यंत आवश्यक आहे आणि त्यासाठी राष्ट्राने आपली तलम, दिखाऊ आणि निरुपयोगी कापड वापरण्याची लावून घेतलेली

संवय सोडून दिली पाहिजे. जी मलमल शरीर झाकण्याऐवजी उघडे पाडते असली मलमल विणण्यात मला तरी काही कला दिसत नाही. कलाविषयक आपल्या रुचीमध्ये बदल होणें जरूर आहे. पण बारीक सुताचे कापड तयार करणें सामान्य काळात इष्ट आहे असे जरी मानले तरी सध्याच्या घटकेला आपण स्वावलंबी होण्याच्या कामात गुंतलेले असताना, हातसुताचे कापड म्हणजे खादी वापरण्यावरच संतुष्ट राहिलें पाहिजे. म्हणून एकीकडे फॅशनेबल लोकांना जाडेभरडे कापड वापरण्यातच समाधान माना असे सांगत असता दुसरीकडे सूत कातणारांना बारीक सूत व सारखे सूत काढण्याला शिकवीत राहिले पाहिजे.

गिरणीमालक आपल्या कापडावर ज्या किंमती लावतात त्यात त्यांनी कपात करावी असे या 'सोशल रिफॉर्मर'च्या लेखकाचे म्हणणे आहे. जेव्हा स्वदेशीचे प्रेमी खादी वापरणें हें आपले कर्तव्य आहे असे समजून तसे वागतील आणि इष्टसंख्येने चरखे सूत काढू लागतील आणि विणकर आपल्या मागांवर त्या सुताचा उपयोग करून कापड विणतील तेव्हा गिरणीमालकांना आपल्या मालाच्या किंमती उतरविणे भागच पडेल. ज्यांचा मुख्य उद्देश आपल्या उद्योगा-तून आपला नफा वाढविणें हाच आहे त्यांच्या देशाभिमानाला आवाहन करून किंमती उतरविण्यास विनंती करणे व्यर्थ आहे असे मला वाटते.

सार्वजनिक उत्सवप्रसंगीच फक्त खादीचे कपडे घालायचे आणि एरवी इंग्रजी कपडयांचा पेहराव करावयाचा, तसेच खादीचे कपडे चढवून किमती चिरूट शिलगावून फिरायचे असले विसंगत वर्तणुकीचे प्रकार या लेखकाने दाखविले आहेत. पण कालांतराने नव्या फॅशनी आल्यावर ते बंद पडल्यावाचून राहाणार नाहीत. माझा दावा असा आहे की, परदेशी कापडाचा बहिष्कार पूर्णपणे अंमलात आणलेला असेल त्यावेळी असले मूर्खपणाचे प्रकार बंद होऊन आपल्या वागणुकीला साधेपणाचे आणि सामान्य जनतेच्या अंगी भिनलेले घर-गुतीपणाचे वळण आपोआप लागेल. पृथ्वीवरील दुर्बल राष्ट्रांच्या व मानव-वंशाच्या शोषणावर आधारलेल्या साम्राज्यवादात गुरफटून न पडता आणि आरमार व हवाई दल यांवर अवलंबून असणाऱ्या ऐहिक संस्कृतीचा स्वीकार न करता आपण त्यांपासून मग दूर राहू. उलटपक्षी या साम्राज्यवादाला आपण सुधारू व त्यांतून राष्ट्रसमूह असा निर्माण करू की त्याच्या विद्यमाने पृथ्वीवर दुर्बल राष्ट्रांना अथवा मानववंशांना पाशवी बळाने नव्हे, तर स्वतः दुःख सोसून आपणापाशी जे उत्तम असेल त्याच्या साह्याने रक्षण देऊ करू. विचारविश्वात क्रांती घडवून आणणे हे असहकारितेचे उद्दिष्ट आहे. चरखा व सूतकताई यांचा पूर्ण विजय झाल्यावरच एवढा मोठा बदल घडून येऊ शकेल. मोहजालात

न फसता जेव्हा हा संदेश जगाला देण्याला हिंदुस्तान लायक बनेल व विदेशी हल्ले परतवून लावील आणि अन्न आणि वस्त्र या दोन गरजा भागवून जेव्हा हिन्दुस्तान स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनेल तेव्हाच हे शक्य होईल.

परदेशी कापडावरील बहिष्कार ही प्रक्रिया म्हणजे कोणत्याही एका परकीय राष्ट्रावर द्वेषाने किंवा आकसाने सूड घेण्याची प्रक्रिया नाही. जीवनाला श्वासोच्छवास जेवढा आवश्यक आहे तेवढाच राष्ट्रीय जीवनाला परदेशी कापडावर पूर्ण बहिष्कार आवश्यक आहे. म्हणून जितक्या लवकर हे घडून येईल तितके चांगले. त्याच्याशिवाय स्वराज्याची संस्थापना होऊ शकणार नाही आणि झाली तरी ते स्वराज्य टिकणार नाही. येत्या ऑगस्टच्या पहिल्या तारखेपूर्वी असा बहिष्कार कसा अंमलात येईल हे जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे म्हणून गांधींनी जुलैच्या प्रारंभी एक पत्रक काढून ते सर्वत्र प्रसिद्धीसाठी पाठविले. त्यांनी पुढे म्हटले, 'हा बहिष्कार त्वरित सिद्ध होण्यासाठी (१) गिरणीमालकांनी आपल्या कापडाच्या किंमती व नफे नियमित केले पाहिजेत व कापडाचे उत्पादन फक्त स्थानिक व देशी बाजारपेठसाठीच केले पाहिजे. (२) आयातदारांनी परदेशी माल आणण्याचे बंद केले पाहिजे. याची सुरुवात तीन व्यापाऱ्यांनी केलीच आहे. (३) गिऱ्हाईकांनी परदेशी कापड मुळीच न घेता, शक्य तेथे सर्वत्र खादीच वापरली पाहिजे. (४) कापड घेणारांनी खादीच फक्त घेऊन गिरणीचे कापड गरीब लोकांना घेण्यासाठी ठेविले पाहिजे. त्यांना स्वदेशी व परदेशी यांतील फरक मुळीच कळत नाही. (५) खादी वापरण्यातही स्वराज्यस्थापना होईपर्यंत किमान गरज भागविण्याइतकीच खादी घ्यावी. (६) गिऱ्हाइकांनी परदेशी कापड नष्ट करावे व मद्यपान न करण्याची शपथ घेतात तशी परदेशी कापड न वापरण्याची शपथ घ्यावी, किंवा त्याचा वापर परदेशात व्हावा म्हणून ते तिकडे रवाना करावे. याप्रमाणे सर्वांनी करावे. दृढनिश्चयाने परदास्याचें हे चिन्ह अंगावर ठेवायचे नाही असा निर्धार हवा.

कापडाच्या गिरण्यांच्या मालकांना उद्द्शून गांधींनी एक पत्रक ६ जुलै १९२१ रोजी काढले. त्यात ते म्हणतात, "असहकारितेच्या चळवळीवर कदाचित तुमचा विश्वास नसेल. मला माहीत आहे की, आपणांपैकी काही जणांना वाटतें की चळवळीची अखेर हिंसाचारात होईल आणि याचा अर्थ, आपल्या हातातील सत्तेचा त्याग करण्याला नाखूष असलेले सरकार हिंसाचार करील असा असेल, तर तुमचे म्हणणे बरोबर आहे, काँग्रेसच्या सेक्रटरीचा रिपोर्ट जर विश्वसनीय मानायचा असेल तर धारवाडास घडलेला प्रकार हे त्याचे उदाहरण आहे. काहींच्या मताने या चळवळीला यश येवो किंवा अपयश येवो, तिच्यामुळे देशाच्या कल्याणाला हानीच पोचेल. क्षणभर अहिंसेचा विचार तुमच्या

मनातून काढून टाका. परदेशी कापडावरील बहिष्कारावरील चळवळीला आलेला जोर ध्यानात घेऊन त्याचा अभ्यास करा. जेव्हा मी बंगालमध्ये जातो तेव्हा बंगाली लोक मला नेहमी सांगतात की, वंगभंगाच्या वेळी त्यांनी चालविलेल्या चळवळीत गिरणीमालकांनी काही मदत तर केली नाहीच, पण कापडाच्या किमती वाढवून त्यांनी बंगाली लोकांशी दगलबाजी केली आणि स्वदेशीच्या नावाखाली परदेशी कापड त्यांच्या गळचात बांधून त्यांना फसविले. या आरोपांमध्ये तथ्य किती आहे हे मला माहीत नाही. पण ते जर खरे असतील तर ते गिरणी-मालकांना भूषणास्पद नाहीत हे तुम्ही मान्य कराल.

"आता देशावर पूर्वीपेक्षाही मोठे असे ते संकट कोसळलेले आहे, त्या-प्रसंगी तुम्ही कसे वागाल याविषयी जर मी निःशंक असतो तर या जुन्या आरोपांची आठवण मी केली नसती. पुष्कळ मित्रांनी मला सांगितले आहे की, तुमच्यापासून राष्ट्राने कसली देखील अपेक्षा करू नये. ते असे नजरेस आणतात की, एकदोन सन्माननीय अपवाद वगळता तुमच्यापैकी कोणीही टिळक स्वराज्य निधीला काही मदत केलेली नाही. सदसद्विवेक बुद्धीचे कारण नसेल तेव्हा तुम्ही असे वागण्याचे कारण तुमचा बुजरेपणा व भित्रेपणा असू शकेल असे तुमचें समर्थन मी केले आहे. जेव्हा तुमच्या मदतीची फार गरज लागेल तेव्हा व्यापारी लोक म्हणून तुम्ही मदत करणार नाही असे मला माझ्या मनात आणवत नाही. पण परदेशी कापडाचा व्यापार करणारे व्यापारी जेव्हा मी त्यांना देशातील लोकांच्या भावना लक्षात घ्यायला सांगतो आणि परदेशातून कापड आणू नका असे म्हणतो, तेव्हा म्हणतात की त्यांनी दिलेल्या प्रतिसादाचा परिणाम इतकाच होईल की तुम्ही तावडतोब तुमच्या मालाच्या किंमती वाढवाल आणि त्याच्या समर्थनासाठी मागणी व पुरवठा यांचा अर्थशास्त्रामधील सिद्धांत त्यांच्या तोंडावर फेकाल. म्हणजे स्थिती सध्या आहे त्यापेक्षा वाईट होईल. हे व्यापारी मला असे सांगतात की, परदेशी कापडाचा व्यापार करण्याचे ते आनंदाने सोडून देतील. पण त्यांना असे आश्वासन मिळाले पाहिजे की मागणी-पुरवठ्याची सबब पुढे करून तुम्ही आपल्या मालाच्या किंमती वाढविणार नाही. तुमच्यापैकी काही जणांनी १९१९ साली मला असे सांगितले होते की यामुळे गिऱ्हाईकांचा काही फायदा न होता फक्त दलाल लोक त्यांना पिळून काढतील. हुशार असलेल्या तुमच्यासारख्या धंदेवाल्यांनी असा युक्तिवाद करावा हे खरोखर तुम्हांला शोभत नाही. तुमचा माल गिऱ्हाइकापर्यंत पोहचेपर्यंत सगळे टप्पे तुम्ही चांगले नियंत्रणाखाली ठेवू शकाल. फक्त आपल्या उद्योगात थोडा राष्ट्रीय बाणा आणिला पाहिजे.

"तुम्ही परोपकारी व्हावे असे माझे म्हणणे नाही. अर्थात परोपकार व धंदा यांची सांगड तुम्ही घातली तर त्यात काहीच गैर नाही. पण केवळ स्वार्थ-परतेने धंदा न करता तो देशभक्तीच्या बाण्याने चालवावा असे मी अवश्य म्हणतो. आपल्या भागीदारांचे व आपल्या देशाचे हित पाहाण्याने माणूस कमी हुषार धंदेवाला होतो असे मला वाटत नाही. म्हणून असहकारितेबद्दल तुमचे मत काहीही असो, तुम्हांला माझी एवढीच विनंती आहे की, व्यापाऱ्यांनी अथवा गिऱ्हाईकांनी तुम्ही आपल्या मालाच्या किमती वाढविणार नाही असे आश्वासन द्यावे, आणि परदेशी कापडावर बहिष्कार घातला जात आहे व तुमच्या मालाला जास्त मागणी होत आहे हे त्याला कारण नसावे. किमान-पक्षी देशाला आपल्याकडून इतके मिळण्याचा खचीत हक्क आहे."

याचप्रमाणे कापडाच्या व्यापाऱ्यांना उद्देशून गांधीजींनी एक अनावृत पत्र पाठविले, त्यात त्यांनी म्हटले, "काल मी गिरणीमालकांना आवाहन केले आहे की त्यांनी परदेशी कापडाच्या बहिष्काराच्या चळवळीत मदत करावी. ते मदत करतील किंवा करणार नाहीत. पण मला आशा आहे की ते मदत करतील. पण तुम्हांला मात्र या चळवळीपासून लांब राहाता येणार नाही. कारण तुम्हांपैकी पुष्कळ खात्री पटलेले असहकारितावादी आहेतच. टिळक स्वराज्य निधी ही बेझवाडा कार्यक्रमातील एक बाब पुरी करणे तुम्ही शक्य करून दाखविले आहे. पण कदाचित तुम्ही म्हणाल की निधीला वर्गणी देणे ही तुम्ही एक किरकोळ गोष्ट समजता, पण तुमचा व्यापार म्हणजे जीवन-मरणाचा प्रश्न आहे. हा असला भ्रमच आपल्यापासून स्वराज्य दूर ठेवीत आहे. तुमचा व्यापार ही जर जीवनमरणाची बाब असेल तर देशहित ही तशीच एक बाब नाही काय? स्वराज्य म्हणजे त्यासाठी तुम्ही व मी आपला धंदा त्यापुढे तुच्छ समजावा. परदेशी कापडाची आयात तुम्ही बंद करावी याचा अर्थ तुम्ही आपला वैयक्तिक लाभ देशहितापुढे तुच्छ लेखावा.

"इंग्लंड, जपान किंवा अमेरिका येथून एक यार्ड कापड आयात करणे म्हणजे तुमच्या देशबांधवांपैकी एकाला काही न देता त्याच्याजवळचे तीन आणे काढून घेण्याप्रमाणे आहे. याचा मला नीट खुलासा केला पाहिजे. हिंदु-स्तानच्या खेड्यापाड्यांत असंख्य लोक बेकार पडलेले आहेत. यांना पूर्वी सूत कातण्याचे व त्याचे कापड विणण्याचे काम होते. परदेशी कापड येऊ लागल्या-पासून त्यांजवर बेकारीची सक्ती झाली, आणि गेली कित्येक वर्षे त्यांना दुसरा काहीच व्यवसाय मिळाला नाही. दुष्काळ हिंदुस्तानात नेहमीचाच झाला आहे. आपण उपासमार सोसून त्याचे परिणाम भोगीत आहोच. दीर्घकाळ बेकार राहिल्याने आपली सहनशक्ती संपुष्टात आली आहे. आपल्या दहाबारा

मोठ्या शहरात येऊन त्या सर्वांना कामधंदा मिळेल अशी कल्पना करू नका. केवळ सूतकताईचा धंदा पुनरुज्जीवित केल्यानेच व हातमागावर सूत विणल्यानेच त्यांच्या डोळ्यांत पुनः पूर्वीचे तेज दिसू लागेल. आणि मी जर तुम्हांला असे सांगितले नाही की गिरणीमालकांपेक्षा व्यापारीच त्या खेड्यांतील लोकांच्या दारिद्र्याला जबाबदार आहेत तर मी तुमच्याशी खोटेपणाने वागलो असे होईल. ते दारिद्र्य गिरणीमालक आपल्या कापडाच्या किंमती वाढवून आणखी दुःसह करतात यात काही शंका नाही. पण तुम्ही इतके जबाबदार आहां की तुम्ही जर परदेशी कापडाची आयात थांबवाल तर आपला प्राचीन व मानाचा धंदा जो सूत कातण्याचा त्याचा तुम्ही पुनरुद्धार कराल व हातमागाच्या धंद्यालाही उत्तेजन द्याल.

"आणि खरोखर, हिन्दुस्तानची इतकी हानी करणारा हा धंदा बंद करणे तुम्हांपैकी पुष्कळांना जीवनमरणाचा प्रश्न का वाटावा? खात्रीने तुम्हांला व देशाला फायदेशीर होणारा दुसरा कोणता तरी धंदा शोधून काढण्याइतके तुम्ही हुशार आहा. ही कापडाची आयात थांबविणे म्हणजे साठ कोटी रुपयांची बचत करणे आहे. पण याहूनही मोठ्या भांडवलावर अनेक उद्योग सुरू करणे असा त्याचा अर्थ आहे. याचा अर्थ कापसावरील सर्व प्रक्रिया याच देशात होऊ लागतील. याचा अर्थ तुमचा धंदा वाढेल. तुम्ही हाताने सूत काढणे व हातमागावर त्याचे कापड विणणे संघटित केले पाहिजे. मग तुम्ही माझ्याप्रमाणे जाड्याभरड्या खादीवर समाधान मानणार नाही. तुमच्या कताई कामगारांनी बारीक व पीळदार सूत कातले पाहिजे असा आग्रह तुम्ही धराल आणि विणकरांनी डाक्क्यासारखी मलमल विणली पाहिजे असे म्हणाल, मग त्यात तुम्ही मोठमोठ्या रकमा गुंतवाल आणि मी मात्र तुम्ही दिलेल्या थोड्याशा हजारो रुपयांच्या दानाच्या मदतीने आपल्या भगिनींना दररोज चारदोन आणे मिळवायला मदत करीत राहीन. तुम्हांला परदेशी कापडाचा अपवित्र व्यापार करण्याचे थांबवायचे आहे आणि येथे कातलेल्या सुताचे उत्पादन व वाटप संघटित करावयाचे आहे. तुमच्या देशाभिमानाला शोभेसे हे काम आहे. तुम्ही म्हणाल या कामाला काही वर्षे लागतील. तुमची जर खात्री झाली असेल की तुमच्या व्यापाराने हिंदुस्तान दरिद्री व गुलाम झाला आहे तर तो नष्ट झाल्यामुळे काय परिणाम होतील याचा विचार करीत बसू नका. वाटेल ते झाले तरी त्याला तुम्ही सोडचिठी द्या.

"आणि याची किंमत तरी कितीशी आहे? फार नाही. यापुढे परदेशी सूत व कापड आणण्याचे करार करावयाचे नाहीत. यात काहीच नुकसान नाही. हल्ली असलेल्या साठ्याची वासलात फक्त लावायची आहे. दुनियेचे सर्व बाजार

त्यासाठी खुले आहेत. मॉरिशस, दक्षिण आफ्रिका, ईस्ट आफ्रिका येथे आपला खास माल खपेल. तुमचे सध्याचे शिलकी साठे कसे निकालात काढायचे त्याचा थोडा विचार मला करू द्या.

" गिऱ्हाईकांच्या गरजांच्या काळजीने तुम्हांपैकी काही लोक व्यग्र झाले आहेत. माल कमी झाला तर तो आपले कसे तरी भागवून घेईल आणि तुम्ही उत्तम खादी सर्व प्रकारची, तलम आणि रंगीत देऊ लागला म्हणजे तोच तुमचे गुण गाईल. गिऱ्हाइकावर फार दाब तुम्ही आणू नका. कॅलिको किंवा पातळ जपानी धोतराच्या स्वरूपात गिऱ्हाईकाला मोहात पाडणे हे ठीक नाही. खादीमधील कलाकुसर जाणून घ्यायलाच उलट तुम्हीं त्याची रुची बदलून समर्थ करा. रेशमी धाग्यांपासून बनविलेल्या गुलाबाच्या कृत्रिम फुलात खरे सौंदर्य नसते. कारण त्यात जीव नसतो. पण बागेतून खुडून आणलेले फूल, जरी त्याच्या काही पाकळ्या गळून गेल्या असल्या तरी सुंदर दिसते. माझी अशी इच्छा आहे, हिंदुस्तानातील व्यापारीवर्गाने, पैशाचा मोह सोडून आपल्या जुन्या कलेचा अभ्यास करून तिला, नवजीवन द्यावे. त्यात तुम्हांला व देशालाही द्रव्यप्राप्ती होईल. सर्वांत मोठ्या अशा ज्या कलेचे पुनरुज्जीवन करावयाचे आहे ती म्हणजे स्वराज्याची कला. आणि स्वदेशीविना स्वराज्य अशक्य आहे. आणि स्वदेशी म्हणजे हिंदुस्तानच्या दृष्टीने विदेशी कापडावर पूर्ण बहिष्कार घालणे. या कामी तुम्ही पुढाकार घ्यावा असें माझे आवाहन आहे. कारण तुमच्याजवळ ते सामर्थ्य आहे. असा पुढाकार घेण्याची शक्ती व शहाणपण ईश्वर तुम्हांस देवो."

भायखळा मदनपुरा येथे विणकरांची एक मोठी सभा १७ जुलै १९२१ रोजी झाली. हे विणकर बहुतेक मुसलमान आहेत. दोन वर्षांपूर्वी गांधींनी त्यांच्या अशाच सभेत भाषण केले होतें. तेव्हा ब्रिटिश पंतप्रधान लॉइड जॉर्ज यांनी खिलाफतीचे संरक्षण करण्याचे आश्वासन त्यांना दिले होते. पण ते मोडल्या-मुळे यावेळी त्यांच्यामध्ये फार अस्वस्थता होती. तसेच पंजाबातील अत्याचारां-मुळे सुद्धा त्यांची मने दुःखपूर्ण होती. ब्रिटिशाकरिता लढण्यासाठी एक सुद्धा शिपाई मिळू द्यायचा नाही असे जोपर्यंत आपण घडवून आणीत नाही तोपर्यंत आपल्याला खरी सत्ता प्राप्त झाली असे होणार नाही, असे गांधींनी या सभेत सांगितले. असहकारिता हे मोठेच साधन आपणापाशी असल्यामुळे आपण अखेर ते करू; पण अजून बऱ्याच लोकांनी आपल्या पदव्या टाकल्या नाहीत, मुलांना शाळांतून काढले नाही आणि वकिलांनी कोर्टांवर बहिष्कार घातलेला नाही. म्हणजे लोकांनी अजून आपले कर्तव्य बजावले नाही. तरीही सरकारच्या दबदब्याला मोठा धोका मिळाला आहे. विणकरांचे कर्तव्य अगदी स्पष्ट आहे.

स्वदेशी चळवळीला शक्य तेवढी जास्त मदत करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. त्यांनी तसे केलें तर देशाची पुनः भरभराट होईल. विणकर परदेशी सुताचा वापर करतात ही दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यांनी फक्त स्वदेशी व हाताने कातलेले सूतच वापरावें, जाडेभरडे असले तरी ते सूत वापरावे. दुसऱ्या कोणत्याही देशात गिरण्यांनी काढलेलें सूत कोष्टी वापरत नाहीत. बारीक व जाडे सूत ते वापरतात व ते हाताने काढलेलेच असते. गांधीजी म्हणाले, मी स्वतःला विणकरच म्हणवितो आणि मला याचा अभिमान आहे. मला कोणी विचारले तर मी शेतकरी, सूत कातणारा व विणणारा आहे. बॅरिस्टर नाही, असे सांगतो. जगात कोठेही, जपानात सुद्धा भारतीय विणकरांसारखे कुशल विणकर नाहीत. हातसूत वापरण्याने त्यांचे काही नुकसान होणार नाही. स्वराज्य मिळेपर्यंत व पंजाब आणि खिलाफतीचे अन्याय दूर होईपर्यंत आपण जाडेभरडे कापडच वापरले पाहिजे. ऑगस्टच्या १ ल्या तारखेपर्यंत सर्वांनी विदेशी कापडाचा त्याग केलाच पाहिजे. त्या दिवशी चौपाटीवर परदेशी कपडे घातलेला कोणी मनुष्य मला दिसणार नाही, अशी मी आशा करतो, असे गांधी म्हणाले व विणकरांना त्यांनी सांगितले की, तुमच्या काही अडचणी असल्या तर महमदअली व खत्री यांना भेटा. ऑगस्ट संपण्यापूर्वी परदेशी कापडावर संपूर्ण बहिष्कार पडला तर स्वराज्य मिळालेच म्हणून समजावे.

जुलै महिन्यात पंडित मोतीलाल नेहरू आजारी होते आणि प्रकृती सुधारण्यासाठी रायगड येथे केवळ एक नोकर घऊन राहिले होते. तेथून त्यांनी एक पत्र गांधींना लिहिले. ते गांधींना मजदार व बोधपर वाटले की पंडित-जींची संमती घेऊन त्यांनी ते 'यंग इंडिया'त प्रसिद्ध केले. पंडितजींसारख्या विलासी राहण्यात आयुष्य घालविलेल्या मनुष्याच्या बाबतीत अनत्याचारी असहकारितेने केवढा बदल घडवून आणला होता हे त्या पत्रावरून चांगले समजते. पंडितजी लिहितात :-

"या लहानशा टेकडीवर केवळ एक नोकर बरोबर घऊन मी राहण्याला आलो तेव्हापासून येथील हवेने व भोवतालच्या वातावरणाने मला फारच बरे वाटू लागले आहे. अजून दमा व खोकला आहे, पण प्रकृती सुधारून जसजशी शक्ती येईल तसतसा दमा लवकरच पार नाहीसा झाल्यावाचून राहाणार नाही. पण पीडा अशी आहे की बरे वाटू लागल्यावर मला थोडी सुद्धा विश्रांती मिळणार नाही, आणि माझ्या व्यवसायातील मागील पापे जी शिल्लक आहेत ती माझा पाठलाग अजून करीत आहेत. मी जेव्हा वकिलीचा धंदा बंद केला तेव्हा शेकडो प्रकरणे माझ्याकडे होती. पण दोन अशी होती की मला ती टाकता येणे शक्य झाले नाही. यांपैकी एक सरूपच्या (विजयालक्ष्मी) लग्नापूर्वी

आलेले होते. आणि त्यामुळेच माझी प्रकृती बरीच बिघडली आणि दुसरे प्रकरण माझ्या विश्रांतीच्या व लवकर बरें होण ह्याच्या आड येत आहे. हे बरेच जुने प्रकरण आहे व ५ जुलैला ते पुढे येणार आहे. तीनचार दिवस त्याचा नीट अभ्यास करण्याला लागतील. ला होणाऱ्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सभेपर्यंत ते बाजूला टाकण्याचा प्रयत्न मी करीत आहे. पण तूर्त ३० जूनला रायगड सोडायचा असे मी ठरविले आहे. मला आणखी दोन आठवडे जर विश्रांती मिळेल तर मी बैलासारखा मजबूत होईन असे तुम्हांला खात्रीपूर्वक सांगतो. पण कदाचित अहिंसक असहकारितावाद्याने इतके मजबूत होणे बरोबर नाही.

माझी कालक्रमणा येथे कशी चालते हे समजून तुम्हांला मौज वाटेल. पूर्वकाळी डोंगरावर राहायला जाणे म्हणजे देशी व इंग्रजी पद्धतीची खाण्यापिण्याची व्यवस्था करावी लागे. सकाळी न्याहारी झाल्यावर आम्ही बंदुका, शॉटगन्स व दारूगोळा घेऊन जंगलात शिकारीला जात असू आणि केव्हा केव्हा निरपराधी पशुपक्षी मारीत असू. मुक्कामावर परतल्यावर उत्तम मेजवानी आमच्या-साठी तयार असे आणि मग चांगली झोप काढायची आणि आता फक्त पितळेचा एक कुकर माझ्याजवळ आहे, फक्त एक फार तरतरीत नसलेला नोकर आहे. तीन लहान पिशव्यांत डाळ, तांदूळ आणि मसाला आहे. त्या परदेशी कापडाच्या आहेत. खादीच्या नाहीत याबद्दल कमलेला मी कधीच क्षमा करणार नाही. आता भात, वरण, खीर, पुष्कळ फळे व एकाददुसरे मिळाल्यास अंडे यावर निर्वाह करतो. शिकारीऐवजी लांब फिरायला जाणे व बंदुकांऐवजी पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे असतात. जेव्हा खूप पाऊस पडतो तेव्हा आताच्या सारखी पोरकट पत्रे लिहितो. केवढा हा अधःपात ! पण इतका मजेत मी केव्हाच वेळ घालविला नाही. फक्त आता तांदूळ संपले आहेत आणि जगतनारायणकडे ब्राह्मण भिक्षांदेहि म्हणायला जात आहे, कारण तो येथे जवळच राहातो. (पंडित जगतनारायण हे हंटर कमिटीचे सभासद व उत्तर प्रदेशात चिंतामणी यांजबरोबर मिनिस्टर झाले होते.)

'सिमल्याची छाया' या शीर्षकाखाली 'यंग इंडिया'मध्ये २१ जुलै १९२१ रोजी एक लेख लिहून हिन्दुस्तानात स्थायिक झालेल्या व पक्का असहकारिता-वादी झालेल्या एका इंग्रजाने वेठबिगारीच्या जुलमाविरुद्ध चालविलेल्या कामगिरीचा गौरव केला आहे. त्याचे नाव स्टोक्स असे आहे. हिमालयातील जंगलात राहाणाऱ्या गरीब गिरिजनांवर बड्या अंमलदारांचा शिकारीचा शोक पुरविण्यासाठी रान उठवून जंगली पशुपक्ष्यांची दाणादाण उडविण्याचे काम लादून जुलूम करण्यात येतो. लॉर्ड रेडिंग व्हाइसरॉय यांच्या नाकासमोर हे

घडत आहे आणि त्यांना ते थांबविता येत नाही. खालसा मुलुखापेक्षा देशी संस्थानिकांच्या प्रजेवर हा जुलूम त्यांच्यामार्फत आपण नामानिराळे राहून सरकारी अधिकारी करतात. सिमल्याच्या डप्युटी कमिशनर ऑफ पोलीस या अधिकाऱ्याच्या दडपणाने हे काम चालते. लोकांवर काळ्यापाण्याची शिक्षा मिळेल अथवा बंदुका रोखल्या जातील असे सांगून त्यांना कामाला जुंपण्यात येते. या गिरिजनांचा पुढारी कपूर सिंग याला कुलूपबंद करून ठेवण्यात आले होते. पण स्टोक्स यांच्या प्रेरणेने ते आपला लढा यश यईपर्यंत चालवितील. ड्यूक ऑफ कॉनॉट यांच्या भेटीच्या वेळी या जुलुमाचा कहर झाला. हा वेठबिगारीचा जुलूम बंद झाला म्हणजे बड्या लोकांचा हा शिकारीचा, निरपराधी पशुपक्ष्यांची हत्या करण्याचा निरर्थक खेळ बंद पडेल. देशी राजेरजवाडे प्राचीन काळापासून हा शिकारीचा खेळ खेळत आहेत, हे रामायण-महाभारताचे दाखले कोणी माझ्या तोंडावर फेकू नये. असल्या अनैतिक दाखल्यांचा गुलाम मी होऊ इच्छित नाही, असे गांधींनी या लेखात स्पष्टपणे म्हटले आहे.

समाजातील स्त्रियांचे स्थान हा विषय २१-७-१९२१ रोजी गांधीजींनी आमूलाग्र चर्चिला आहे. पुरुष व स्त्री यांचा दर्जा जीवनात समान असलाच पाहिजे. प्रत्यक्ष व्यवहारात स्त्रिया पुरुषांचा भोगविषय बनलेला जगातील सर्व देशांत दिसून येतो आणि हिंदुस्तान त्याला अपवाद नाही. पुरुषांच्या विषयवासनाशमनासाठीच वेश्याव्यवसायाने मानवी समाजात कायमचे स्थान आजतागायत मिळविलेले आहे. आधुनिक औद्योगिक प्रगतीने आणलेल्या राहणीत ते स्थान आणखीनच बळकट केलें आहे. आपल्या स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे हे मी अगदी जिवाभावाने मानतो. बालविवाहांचा मी कडक निषेध करतो आणि बालविधवांची असहाय स्थिती माझ्या मनाचा थरकाप करते. आपल्या मुली वाढवायच्या आणि कोणा तरी सुस्थितीतील तरुणांना देऊन टाकण्याची खटपट करायची हा बाजारी प्रकार मला मुळीच संमत नाही. स्त्रियांना मतदानाचा हक्क व कायदेशीर समतेचे स्थान मिळालेच पाहिजे यात शंका नाही. पण प्रश्न इतक्यावर संपत नाही. त्यांना उपजीविकेचे स्वतंत्र साधन असले पाहिजे व पुरुषावर आपण अवलंबून असलेले एक ओझे आहे असे त्यांना वाटण्याचे बंद झाले पाहिजे. स्त्रीपुरुषांना समान योग्यता असलेला एकमेकांचा आधार पाहिजे. स्त्रियांनी स्वतःला आपण उपभोगाचे साधन आहो असे मानण्याचे बंद केले पाहिजे. पुरुषाला संतुष्ट करण्यासाठी अलंकृत होण्याचे व साजशृंगार करण्याचे थांबविले पाहिजे पातिव्रत्य व पतिपरायणता हा एकतर्फी व्यवहार असता उपयोगी नाही. पतीनेही पत्नीव्रत व पत्नीपरायण असण्याची

तेवढीच गरज आहे. सेवा फक्त पत्नीनेच पतीची करावयाची असे नसून पतीनेही पत्नीची सेवा केली पाहिजे. परस्पर सामंजस्यानेच उभयतांची समानता सिद्ध होईल. आपल्या शारीरिक विलोभनांनी सीतेने रामाला संतुष्ट करण्याकरिता एक क्षणभर तरी वेळ घालविला असेल अशी कल्पनाही मला करवत नाही, असे गांधींनी या लेखाच्या अखेरीस म्हटले आहे.

अनत्याचारी असहकारितेला या कालात ज्या मान्यवर व्यक्तींकडून विरोध झाला त्यात पंडित मदनमोहन मालवीय, डॉ. रवींद्रनाथ टागोर व बिपिनचंद्र पाल हे प्रमुख होते. त्या सगळ्यांना नम्र पण सडेतोड भाषेत उत्तरे देऊन योग्य माहितीचा अभाव, त्यामुळे उद्‌भवलेले अज्ञान व गैरसमज हे त्यांच्या टीकेच्या मुळाशी आता कारणीभूत आहेत असे गांधीजीचे प्रतिपादन त्यांच्या प्रत्युत्तरात सापडते. पण ३१ ऑगस्टपर्यंत टिळक स्वराज्य निधीची एक कोटी रुपयांची मर्यादा आपल्या देशबांधवांनी ओलांडून बेझवाडा कार्यक्रमातील एक बाब तडीस नेल्याबद्दल त्यांना धन्यवाद देताना गांधीजी म्हणाले, अशाच कार्यक्रमातील सर्व बाबी पुऱ्या केल्या तर एक वर्षात स्वराज्य ही नुसती घोषणा नसून वस्तुस्थिती झाली आहे असे सर्वांच्या दृष्टोत्पत्तीस येईल. मात्र परदेशी कापडाचा निःशेष बहिष्कार आपण घडवून आणला पाहिजे. सप्टेंबर महिन्यात या एकाच गोष्टीचा सतत उद्‌घोष ते देशभर करीत राहिले. जुलैअखेर मुंबईस भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या बैठकीत परदेशी कापडाच्या बहिष्काराबद्दल अनेकांनी घेतलेल्या शंकाकुशंकांचे त्यांनी निरसन केले. असे करताना ते म्हणाले : आपण एक कोटी रुपये योग्य मुदतीत जमा केले त्यावेळी दाखविलेली तडफ व आशापूर्णता आता कोठे गेली आहे? परदेशी कापडाचा बहिष्कार तशाच रीतीने वेळवर घडवून आणण्याबद्दल तुम्हाला भय कां वाटते? आपल्या भीतीचे कारण केवळ आपली दुर्बलता आहे. या गोष्टीचा जर आपण शांतपणे विचार करू तर आपल्या असे लक्षात येईल की परदेशी कापडाचा बहिष्कार सिद्ध केल्यानंतर आपल्याला फारसे काही करावयास उरणारच नाही. जो जो मी याचा अधिकाधिक विचार करतो तो तो माझ्या असे ध्यानात येते की फौजेतील शिपायांना शस्त्रे खाली ठेवा आणि करदात्यांना कर देऊ नका असे आवाहन करण्याची वेळच आपणावर येणार नाही. जर आपण संपूर्ण बहिष्कार सिद्ध केला तर फारच थोड्या लोकांना सविनय कायदेभंग करून कारागृहे भरण्याचे अथवा इतर त्याग करण्याचे काम करावे लागेल म्हणून तुम्ही धीर सोडण्याचे, निराश होण्याचे मुळीच कारण नाही.

यानंतर ३१ ऑगस्ट १९२१ रोजी गांधींनी परदेशी कापडाची होळी करून बहिष्काराची मोहीम परळ, मुंबई येथे एका मोठ्या जाहीर सभेत सुरू

केली. तेव्हा ते म्हणाले : "आज आपण आपल्या शरीरावरील पाप धुवून काढीत आहो. आपल्या गुलामगिरीची ध्वजा असलेल्या परदेशी कापडाचा आपण त्याग करीत आहो. आज स्वराज्यमंदिरात प्रवेश करण्याची लायकी संपादन करीत आहो. काही लोक म्हणतात की टाकून दिलेल्या कपड्याचा नाश करणे हे क्रोधाचे व द्वेषाचे लक्षण आहे. ज्या दृष्टिकोणातून आपण हे कपडे 'अग्नये स्वाहा' करीत आहो त्यावर, याचा निकाल अवलंबून राहील. आम्हांला इंग्रज, जपानी, फ्रेंच अथवा अमेरिकन यांच्याबद्दल द्वेष असण्याचे काय कारण आहे? आपण त्यांचे कापड विकत घेत राहू तोपर्यंत त्याचे गठ्ठे ते आपल्यासमोर आणून टाकीत राहतील. म्हणून आपल्याला जर राग येत असेल तर आपण आपल्यावरच रागवावे. परदेशी दिखाऊ कपड्यांचा मोह पडण्याचे बंद झाले, तर परकी देशांबद्दल द्वेष वा असूया वाटायचे बंद होईल. मला असे दिसते की तुर्कस्तानात ज्या गोष्टी घडत आहेत त्यामुळे आपले मुसलमान-बंधु अस्वस्थ झाले आहेत. खिलाफतीचा अन्याय त्यांना सोसवत नाही. मी त्यांना असे सुचविण्याचे धाडस करतो, खिलाफतीचा सेवा करण्याचा सर्वात जवळचा व सरळ मार्ग म्हणजे स्वदेशीचा स्वीकार हा आहे. कारण स्वदेशीचा अंगीकार करण्याने हिंदुस्तानाला आपण सामर्थ्यसंपन्न बनवितो आणि हिंदुस्तानचे सामर्थ्य वाढणे म्हणजे खिलाफतीचे संरक्षण करण्याचे सामर्थ्य वाढणे होय. परंतु आज आपल्या मनात सर्वप्रथम विचार हा असला पाहिजे की उद्या लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी साजरी करण्याकरिता आपण पुनीत झाले पाहिजे. स्वदेशीची शपथ घेतल्याशिवाय आपण पवित्र होऊ शकत नाही. म्हणून मी आशा करतो, की ज्यांनी परदेशी कपड्यांचा त्याग केला आहे अथवा ते स्मर्ना वगैरे ठिकाणी पाठविण्याकरिता दिले आहेत त्यांनी असा पक्का निर्धार करावा की यापुढे परदेशी कापडाला स्पर्श करणे नाही. माझी खात्री आहे की लोक-मान्यांची स्मृती अमर करण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे स्वराज्य-संपादन करणे आणि स्वराज्य तर स्वदेशीचा अंगीकार केल्याशिवाय अशक्य आहे. आणि स्वदेशीची प्रस्थापना ही परदेशी कापडाचा परिपूर्ण बहिष्कार अंमलात आणूनच होईल. म्हणून परदेशी कापडाची होळी करणे म्हणजे एक पवित्र यज्ञ आहे असे मी मानतो आणि हा पवित्र समारंभ माझ्याकडून घडत आहे हे माझे भाग्य आहे असे समजतो. ईश्वर आपली अंतर्गत व बहिर्गत अशी सगळी अपवित्रता नाहीशी करो, ३० सप्टेंबर १९२१ पर्यंत परदेशी कापडावर संपूर्ण बहिष्कार घालण्याचा आपला गांभीर्याने केलेला निश्चय पार पाडण्याला ईश्वर आम्हांस सामर्थ्य देवो!"

तारीख १ ऑगस्ट १९२१ रोजी चौपाटीवर जेथे लोकमान्यांच्या मृतदेहाचे दहन झाले तेथे प्रचंड सभा झाली आणि तेथे परदेशी कापडाच्या बहिष्काराची प्रतिज्ञा सर्वांनी घेतली, तेव्हा गांधींनी सर्वांना खडखडीतपणे बजावले की स्वदेशी कापडाचाच फक्त अंगीकार व परदेशी कापडाचा निक्षून बहिष्कार या चिरकालीन स्वरूपाच्या गोष्टी आहेत. मला माहीत आहे की आपल्याजवळ असलेल्या सर्व परदेशी कापडाचा परित्याग कालच्या होळीत पुष्कळांनी केलेला नाही. कारण त्यांना वाटते आहे की पुढे केव्हा तरी त्या कपड्यांचा उपयोग त्यांना करता येईल. पण मी निक्षून सांगतो की सतत आणि नहमी स्वदेशी कापड वापरणे ही स्वराज्यसंस्थापनेची, स्वराज्यसंवर्धनाची व त्याच्या शाश्वतीची कायमची अट आहे आणि ती केव्हाही शिथिल होऊन चालणार नाही. या बाबतीत सर्व हिंदी स्त्रीपुरुषांनी एकदिलाने व एकजुटीने वागले पाहिजे. स्वराज्य चिरकाल उपभोगण्याला स्वदेशीचा आधार राहाणे आवश्यक आहे शास्त्रीय पद्धतीने विध्वंसक व विधायक कार्य करण्याची कला आपल्याला स्वदेशीचा अंगिकारच शिकवील टिळकांच्या स्मृतीशी इमान राखून आपण स्वतःला आणि देशाला फसविता उपयोगी नाही. तारीख ३० सप्टेंबरच्या आत आपण हा परदेशी कापडाचा बहिष्कार शंभर टक्के अंमलात आणलाच पाहिजे, असे सांगून व पोलिसांची मदत न लागता लक्षावधी जमावाची व्यवस्था नीटपणे राखल्याबद्दल गांधींनी स्वयंसेवकांना धन्यवाद दिले आणि आपले भाषण संपविले.

४ ऑगस्ट १९२१ च्या 'यंग इंडिया' मध्ये सविनय कायदेभंगाची चर्चा केली आहे. त्यात ते म्हणतात, "मुंबईस भरलेल्या ऑल इंडिया काँग्रेसच्या बैठकीत प्रत्येकाच्या तोंडी सविनय कायदेभंग होता. पूर्वी कधी तो केलेला नसल्यामुळे प्रत्येकाला त्याच्याबद्दल मोठे प्रेम व उत्सुकता वाटत होती. आपल्या आजच्या सर्व संकटांचा, गाऱ्हाण्यांचा व तक्रारींचा परिहार सविनय कायदेभंग करील अशी चुकीची कल्पना सर्वत्र पसरली होती. त्याकरिता अवश्य ते वातावरण जर आपण उत्पन्न करू शकलो तर त्याचा तसा उपयोग होईल याबद्दल मला खात्री वाटते. सविनय कायदेभंग केल्यामुळे जर रक्तपात होणार नाही अशी खात्री असेल तर व्यक्तीव्यक्तींना सविनय कायदेभंग करण्याला वातावरण नेहमीच तयार असते. पण हा अपवाद असतो हे सत्याग्रहाच्या दिवसात माझ्या लक्षात आले. जरी असे असले तरी अशी हाक दिली जाण्याचा संभव आहे. काय वाटेल तो परिणाम होवो अथवा किंमत द्यावी लागो—अशा हाकेला दाद देणें भाग पडेल. मला असा काळ येत आहे असे स्वच्छ दिसते की सरकारने केलेला प्रत्येक कायदा मोडावा लागेल आणि रक्तपात होण्याची खात्रीही

तेव्हा असेल. जेव्हा अशा हाकेकडे दुर्लक्ष करणे म्हणजे ईश्वरी सत्ता नाकारण असा अर्थ होईल– तेव्हा सविनय कायदेभंग हे टाळण्याजोगे कर्तव्य होऊन बसते.

"सामुदायिक सत्याग्रहाची गोष्ट मात्र फार वेगळी आहे. अगदी शांत वातावरणातच त्याचा प्रयोग करता येईल, पण हा शांतपणा बलनिदर्शक असला पाहिजे, नबलाईचा निदर्शक असून चालणार नाही, ज्ञानदर्शक असला पाहिजे, अज्ञानदर्शक असता कामा नये. वैयक्तिक सविनय कायदेभंग स्वत:ला करता येईल अथवा दुसऱ्याकडून करविता येईल. सामुदायिक सविनय कायदेभंग स्वार्थी प्रकारचा असू शकेल आणि असतो सुद्धा, अशा अर्थाने की त्यापासून एखाद्या व्यक्तीला वैयक्तिक लाभ होऊ शकेल. याप्रमाणे दक्षिण आफ्रिकेत कालेनबाख व पोलक यांनी इतरांकडून सामूहिक सत्याग्रह करून घेतला, पण त्यांना त्यांत वैयक्तिक लाभ काही नव्हता. हजारोंनी सविनय कायदेभंग केला आणि त्यापासून डोईपट्टीचा त्यांजवर बसविलेला व त्यांच्या बायकामुलांवर बसविलेला कर दूर होईल अशी त्यांची अपेक्षा होती. सामूहिक सत्याग्रहात सत्याग्रहींना तत्त्वपालनाचे पथ्य नीट समजलेले असले म्हणजे बस्स आहे.

"जेव्हा बंदी केलेल्या प्रदेशात दोनतीन हजार स्त्रीपुरुष व मुले यांसह मी जवळजवळ वस्ती नसलेल्या भागात दक्षिण आफ्रिकेत असता प्रवेश केला तेव्हा (पामफोर्ड येथे ६ नोव्हेंबर १९१३) मला अटक करण्यात आली. यामध्ये काही पठाण आणि धडधाकट लोकही होते. दक्षिण आफ्रिकेच्या सरकाराने या चळवळीला मोठच प्रमाणपत्र दिले. त्यांना माहीत होते की, आम्ही जेवढे दृढनिश्चयी होतो तेवढेच निरुपद्रवी होतो. ज्यांनी मला अटक केली त्यांचे तुकडेतुकडे करून टाकणे या समुदायाला अगदी सोपे होते व तसे जर त्यांनी केले असते तर तो भेकडपणा झालाच असता, पण शिवाय त्यांनी केलेल्या प्रतिज्ञेचा तो भंग झाला असता आणि स्वतंत्रतेची आमची चळवळ त्यामुळे संपुष्टात आली असती आणि प्रत्येक हिंदी माणसाला दक्षिण आफ्रिकेमधून हद्दपार करण्यात आले असते. ते शिस्तबद्ध सैनिक होते आणि नि:शस्त्र असल्यामुळे अधिकच बाणेदार होते. ते शिपाई म्हणजे नुसतीच भाऊगर्दी नव्हती. मला जरी त्यांच्यामधून ओढून नेण्यात आले तरी ते सैरावरा धावले नाहीत किंवा परत गेले नाहीत. ठरलेल्या ठिकाणापर्यंत ते चालत गेले आणि त्यांपैकी प्रत्येकाला अटक होऊन तुरुंगात टाकण्यात आले. माझ्या माहितीप्रमाणे इतिहासामध्ये असे शिस्तीचे आणि अनत्याचारी तत्त्वनिष्ठ वागणुकीचे उदाहरण दुसरे सापडणार नाही. असा संयम आणि मनोनिग्रह असल्याखेरीज सामुदायिक सविनय कायदेभंगाला यश येण्याची मला आशा वाटत नाही.

"कोणालाही अटक झाली तर मोठमोठी निदर्शने करून सरकारास घाबरवून सोडण्याची कल्पना आपण सोडून दिली पाहिजे. उलटपक्षी असहकारितावादी माणसाला अटक केली जाणे ही आपण अगदी मामुली गोष्ट आहे असे समजले पाहिजे. लढाईवर जाणारा शिपाई ज्याप्रमाणे तळहातावर शिर घेऊन जातो त्याप्रमाणे आपण अटक आणि तुरुंगवास पत्करण्याला केव्हाही तयार असले पाहिजे. सरकारचा विरोध आपण मोडून काढणार तो तुरुंगवासाचे स्वागत करून, टाळण्याचा प्रयत्न करून नव्हे, मग तो सामुदायिकपणे आपली गृहीत धरलेली तुरुंगवासाची तयारी ध्यानात घेऊनही. एक निःशस्त्र शिपाई जरी पकडण्याला आला तरी हजारोंनी त्याच्याकडून पकडून घेण्यास राजी असले पाहिजे. अनेक बकऱ्या जशा कत्तलखान्यात निमूटपणे जातात त्याप्रमाणे आपण हजारोंनी तुरुंगात गेलो तर तो आपला विजयच आहे. काही देखील गैरवर्तन न करता पकडून नेले जाणे हा आपला जय आहे. आपण जितके अधिक निरपराधी असू, तितके अधिक आपले सामर्थ्य असेल आणि तितक्या अधिक लवकर आपला जय होईल.

"पण सध्या जी स्थिती आहे ती अशी की हे सरकार भकड आहे आणि आपण तुरुंगात जाण्याला घाबरतो. आपल्या या भीतिग्रस्ततेचा सरकार फायदा घेते. हिंदी स्त्री-पुरुषांनी तुरुंगांचे स्वागत विश्रामधामांप्रमाणे करावे आणि आपली मुलेबाळे आणि कुटुंबीय तुरुंगांत पडले म्हणून काळजी करण्याचे सोडून द्यावे. दक्षिण आफ्रिकेत आपले हिंदीबांधव कारागृहांना बादशहांची खाद्यपेय-स्थाने असे म्हणत असत. कायदेभंग हा सविनय व्हावयाचा असेल तर अगदी उघडपणे आणि अहिंसकपणेच केला पाहिजे.

"संपूर्ण सविनय कायदेभंग म्हणजे शांततेने पुकारलेली बंडाची स्थिती आहे. सरकारने केलेल्या हरएक कायद्याला मान देण्यास नकार देणे. कमालीच्या हालअपेष्टा सोसण्याला जर सविनय कायदेभंग करू पाहाणारे तयार असतील तर हे बंड कधीही दडपून टाकता येणार नाही. निरपराधी असताना दुःख सोसण्याच्या निरपवाद समर्थतेवर बळकट श्रद्धा असणे हा सविनय कायदेभंगाचा पाया आहे. काही आरडाओरड किंवा गडबड न करता तुरुंगात जाणारा सत्याग्रही शांत वातावरण खात्रीने उत्पन्न करतो. काहीच प्रतिकार होत नाही असे पाहून पीडा देणारा पीडक अखेर कंटाळून जातो. जेव्हा पीडिताकडून काहीच प्रतिकार होत नाही असे दिसते तेव्हा छळ करणाऱ्याला त्यात मजा वाटेनाशी होते. सामुदायिक कायदेभंगाच्या एवढ्या मोठ्या साहसाला आपण प्रवृत्त होण्यापूर्वी निदान लोकप्रतिनिधींना तरी अशा सविनय कायदेभंगाच्या शर्तींची पक्की समज असावयास हवी. अतिशय जलद परिणाम घडवून आण-णाऱ्या उपायांमध्ये धोका फारच मोठा असतो आणि ते करताना आपल्याजवळ

पराकाष्ठेचे कौशल्य असले पाहिजे. माझी अशी बालंबाल खात्री आहे की आपण परदेशी कापडाचा बहिष्कार जर यशस्वीपणे घडवून आणला तर आपणाला सविनय कायदेभंगाची अशी जंगी मोहीम चालू करता येईल, की कोणत्याही सरकाराला तिचा प्रतिकार करता येणार नाही. म्हणून ज्यांना सामुदायिक सविनय कायदेभंग सुरू करण्याची फार उतावळ झाली आहे त्यांना परदेशी कापडाचा पुरता बहिष्कार घडवून आणण्याचा दृढनिश्चय अगदी एकचित्तपणे अंमलात आणा आणि उतावीळ न होता धीर धरा, असे माझे सांगणे आहे."

गांधीजी आणि सौराष्ट्र यांचे एक खास निकटचे नाते आहे. सौराष्ट्र ऊर्फ काठियावाडमधील संस्थानात गांधींच्या वडिलांनी दिवाण म्हणून नोकरी बजाविली. त्यांचे चुलते आणि आजोबा देखील अशाच कामात होते. गांधी कुटुंबातील अनेकांनी अनेक संस्थानी दरबारात मानाच्या नोकऱ्या केल्या. यामुळे काठेवाडातील संस्थानिकांबद्दल त्यांना विशेष प्रेम आणि आपुलकी वाटते. सौराष्ट्र ही वीरपुरुषांची जन्मभूमी आहे असा त्यांचा विश्वास होता आणि म्हणून भारताच्या स्वराज्यसंपादनाच्या आंदोलनात सौराष्ट्राने आपला योग्य वाटा उचलावा असे त्यांना नेहमी वाटत असे. परंतु असहकारितेच्या आंदोलनाची काही संस्थानिकांनी टर केली व स्वराज्याच्या चळवळीवर आक्षेप घेतले असे त्यांच्या नजरेस आले तेव्हा त्यांना एक अनावृत्त पत्र लिहिणे गांधींना भाग पडले. या पत्रात गांधी म्हणतात, "एका बलाढ्य साम्राज्याचा गैरकारभार जेव्हा निकालात निघल तेव्हा तुमच्यासारख्या संस्थानिकांचा गैरकारभारही संपेल असे समजून आजपर्यंत मी त्याविषयी काही टीका केली नाही. पण चरखा व खादी यांची कुचेष्टा करतात, खादी टोपी घालण्याची लोकांना बंदी करतात व खादी वापरू नका असे सांगतात तेव्हा मला गप्प बसणे अशक्य झाले. काठेवाडाची नैसर्गिक संपत्ती एवढी विपुल आहे की काठेवाडी लोकांना आपला देश सोडून पोटासाठी दूरवर भटकण्याचे काही कारण नाही. अलीकडील माझ्या दौऱ्यात माझ्या ध्यानात आले की पूर्वीची धनधान्याची व दूधदुभत्याची समृद्धी आता राहिलेली नाही. पण मी खात्रीने सांगतो की काठेवाडी संस्थानिक जर मदत करतील तर चरखे आणि माग तेथे पुनः पूर्वीची समृद्धी प्रत्यक्षात आणतील. पाच लाख चरखे काठेवाडची सव्वीस लाख प्रजा सहज चालवू शकेल. यामुळे दर महिन्याला ७५ लाख रुपये पैदा होतील. काठेवाडी स्त्रियांनी वर्षातून आठ महिने, एकीकडे भवितपर गाणी म्हणत जर सूत काढले तर दरसाल साठ लाख रुपये त्या आपल्या घरांसाठी कमावतील. याचा तुम्हांला मत्सर तर वाटणार नाही ना? त्यांची तुम्ही कुचेष्टा कराल काय?

"काठवाडातील मेघवाल विणकरांपैकीं एक लाखानी जर मागांवर काम केले तर दरमहा २० लाख रुपये ते मिळवतील. आणि आठ महिने असे काम केलें तर वर्षाला क कोटीं साठ लाख रुपये मिळवतील. अशा लाभदायक कार्याला दूरदृष्टी दाखवून तुम्ही उत्तेजन देऊ नये काय ? तुमच्या दरबारातही तुम्ही खादीला उत्तेजन द्यावे, स्वतः खादी वापरावी. मला खात्री वाटते की तुमचे शास्त्री तुम्हांला सांगतील की काठेवाडातील प्रजेला भ्‌के ठवन जपान व मँचेस्टर येथील लोकांना मजा करायला मिळावी हे तत्त्व काही तुम्हाला शोभादायक नाही. तुम्हांला तलम मलमलच हवी असेल तर चांगल्या दर्जाच्या कपाशीची लागवड करा व कुशल सूत कातणारे व विणकर अशांना उत्तेजन द्या.

"पण खरोखर डोंगरकपाऱ्यात राहाण्याची सवय असलेल्या काठेवाडच्या संस्थानिकांना चैनीच्या वस्तूंची गरजच काय आहे ? कुत्र्यांचे मोठे पथक हवे कशाला ? त्यापेक्षा त्यांनी आपल्या प्रजेच्या सुखासाठी आपले प्राण खर्ची घालावे, त्यांच्याबरोबर दुःख सोसावे आणि त्यांना खाऊ घातल्याशिवाय आपण स्वतः खाऊ नये. जर राजेच व्यापारी झाले व ब्राह्मणांनी नटाचा पेशा पत्करला तर लोकांना शहाणे कोणी करायचे आणि धर्म कोणी टिकवून धरायचा ? काठेवाडच्या लोकांनी तुमच्या हद्दीमधून ब्रिटिश सरकाराविरुद्ध आंदोलन करावे हे मला पसंत नाही. तुम्हांला त्यांनी अडचणीत टाकता उपयोगी नाही. तुमच्या नाजुक परिस्थितीची मला जाणीव आहे व तुमच्याविषयी मला सहानुभूती वाटते. तुम्ही असहकारितेत सामील व्हा असे मी मुळीच म्हणत नाही. पण स्वदेशीला पाठिंबा हा अगदी स्वतंत्र विषय आहे आणि असहकारितेच्या कार्य-क्रमाशी काही संबंध न आणता तुमच्या प्रजेच्या उद्धारासाठी कातणे व विणणे हा उद्योग तुमच्या प्रजाजनांना करण्यास तुम्ही उत्तेजन द्यावे.

"आणखी एक दोष तुमच्या नजरेस आणितो. काठवाडात एक तरी दारूचे दुकान असण्याची जरुरी आहे काय ? दारूपासून मिळणारे उत्पन्न तुम्हांला मिळविण्याची जरूर आहे यावर कोणाचा विश्वास बसेल ? लोक मद्यपान सोडीत आहेत व इतरांना सोडावयास लावीत आहेत हे पाहाता तुमच्या दरबारात मद्याची एकही बाटली दिसता उपयोगी नाही. एका धोब्याने खाजगी रीतीने काढलेले उद्‌गार लक्षात घेऊन रामाने सीतेचा त्याग केला हे तुम्ही जाणता. मग लोकांना काय हवे माहीत असता दारूची पूर्ण हकालपट्टी काठे-वाडातून तुम्ही का करू नये ?

"त्याचप्रमाणे तुमच्या संस्थानात धावणाऱ्या आगगाड्यांमध्ये अंत्यजा-साठी वेगळे डबे कशाला ठेविले जातात? खरे तर त्यांना तिकिटे मिळविण्याला अडचणी येतात व सर्व जागांवरून त्यांची हकालपट्टी होते. तुम्ही तुमच्या

प्रजाजनांशी युक्तिवाद करून थड लोकांना मिळणारी गैर वागणूक थांबविली पाहिजे. एवढे तुम्ही केले तर त्या गरीब लोकांच्या शुभेच्छा व आशीर्वाद यांचा तुमच्यावर वर्षाव होईल. आणखी पुष्कळ गोष्टी मी ऐकल्या आहेत, पण तूर्त या तीन गोष्टींबद्दल कोणाचा काही आक्षेप येणार नाही आणि तुम्हांला सत्कृत्ये केल्याचे श्रेय मिळेल. ईश्वर सर्वांस सन्मती देवो!"

स्वराज्याच्या स्वरूपाविषयाच्या व्याख्या गांधींनी वेळोवेळी फुटकळपणे मांडल्या. पण एकदा त्यांनी अशा व्याख्यांचे अथवा अवश्य अशा लक्षणांचे संकलन 'नवजीवन' मधील एका लेखात १४ ऑगस्ट १९२१ रोजी केले. गांधीजी म्हणतात: माझ्या मनात स्वराज्याच्या ज्या व्याख्या बनत आलेल्या आहेत त्या माझ्या वाचकांपुढे मी मांडीत आहे: (१) स्वराज्य म्हणजे स्वतःवर राज्य. ज्याला हे साध्य झाले आहे त्याने आपली वैयक्तिक प्रतिज्ञा पूर्ण केली आहे. (२) पण स्वराज्याबद्दल आपण नेहमी एक प्रतिमा किंवा प्रतीक कल्पिलेले असते. म्हणून स्वराज्य म्हणजे देशाच्या आयातीवर आणि निर्यातीवर लोकांचे पूर्ण नियमन असणे, तसेच देशाचे सैन्य व न्यायमंदिरे यांवर पूण लोकनियंत्रण असणे असा अर्थ होतो. डिसेंबर महिन्यात ज्या स्वराज्यासाठी लढण्याची आपण शपथ घेतली ते हे स्वराज्य. अशा स्वराज्यात ब्रिटिशांशी संबंध राखलेला असेल किंवा असणार नाही. जर पंजाब व खिलाफत या प्रश्नांची सोडवणूक झाली नाही तर असा संबंध राहाणार नाही. (३) पण असे शक्य आहे की साधूंना व्यक्तिशः आज देखील स्वराज्याची प्राप्ती झालेली आहे आणि असेही असू शकेल की जेव्हा आपले स्वतःचे पार्लमेंट होईल तेव्हा देखील आपण स्वतंत्र झालो असे वाटणार नाही. म्हणून स्वराज्य म्हणजे अन्नवस्त्र सहजपणे प्राप्त होणे आणि त्याच्याअभावी कोणीही भुकेला अथवा वस्त्रहीन न राहाणे. (४) अशा परिस्थितीतही असे होऊ शकेल की जमात दुसऱ्या जमातीला दडपून टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणून स्वराज्य म्हणजे कोणाही तरुण मुलीला मध्यरात्री देखील धोका न वाटता मोकळेपणाने इतस्ततः हिंडण्या–फिरण्याची मोकळीक वाटणे. (५) या पाच शर्तींमध्ये दुसऱ्या अनेक शर्तींचा अंतर्भाव होतो. तरीही स्वराज्याने एक नवे वारे लोकांमध्ये उत्पन्न केले आहे. यात सर्व वर्ग येतात. यात अंत्यजांना अस्पृश्य मानण्याची प्रथा पार नाहीशी झालेली असेल. (६) ब्राह्मण-अब्राह्मण वाद त्यात संपलेला असेल. (७) हिन्दु व मुस्लिम यांच्या अंतःकरणात असलेले दुर्विकार साफ नाहीसे झालेले असतील. याचा अर्थ हरएक हिंदूने मुसलमानांच्या भावनांचा आदर करावा आणि प्राण देण्याची देखील तयारी ठेवावी. मुसलमानाने पण हिंदूंशी तसेच वागावे. हिन्दूंच्या भावना दुखविण्यासाठी मुसलमानांनी गोहत्या करू

नये; उलट, त्यांच्या भावनांचा मान राखण्यासाठी त्यांनी आपण होऊन गोहत्येपासून परावृत्त व्हावे. त्याचप्रमाणे कोणताही मोबदला न मागता हिंदूंनी मशिदींपुढे वाद्ये वाजविण्याचे बंद करावे व असे करण्यात आपण योग्य तेच करतो असा अभिमान बाळगावा. (८) स्वराज्य म्हणजे हिंदू, मुस्लिम, शीख, पारशी, ख्रिस्ती व यहुदी यांना आपापल्या धर्माप्रमाणे वागता यावे व परस्परांचा त्यांनी आदर करावा. (९) स्वराज्य म्हणजे, प्रत्येक गावाने किंवा शहराने स्वसंरक्षणार्थ बलवान व्हावे आणि चोर-दरोडेखोर यांचा बंदोबस्त करावा आणि आपल्याला लागणारे अन्नवस्त्र पैदा करावे. (१०) स्वराज्य म्हणजे राजेरजवाडे व जमीनदार आणि त्यांची प्रजा यांना परस्परांबद्दल आदर असावा, संपन्नांनी, विपन्नांचा छळवाद करू नये व परस्पर सामंजस्याने वागावे. (११) स्वराज्य म्हणजे श्रीमंत व गरीब यांना परस्परांबद्दल वाटणारा आदर. गरीबांनी योग्य वेतन घेऊन श्रीमंतांची कामे करावी. (१२) स्वराज्य म्हणजे प्रत्येक स्त्रीला मातेसमान अथवा भगिनीसमान मानणे आणि तिचा आत्यंतिक आदर राखणे. यांत उच्चनीच भावाला सर्वस्वी फाटा देणे आणि प्रत्येकाशी बंधु अथवा भगिनीसमान वागणे*

या सर्व व्याख्यांचा निष्कर्ष असा की (१) सरकार मद्य, अफू अशासारख्या द्रव्याचा व्यापार करणार नाही. (२) अन्नधान्ये व कापूस यांमध्ये सट्टेबाजी बंद होईल. (३) कोणीही माणूस कायदा तोडणार नाही. (४) कोणालाही मनमानी करता येणार नाही. याचा अर्थ असा की, एखाद्या व्यक्तीवर काही आरोप ठेवण्यात आला असेल तर त्या आरोपाचा निकाल त्याला करता येणार नाही. देशात स्थापन झालेल्या योग्य न्यायालयाकडून त्या आरोपाची चौकशी होईल व फैसला होईल.

"मी किती वेळा चुकलो असेन हे एका परमेश्वरालाच ठाऊक. जे माझी कधीच चूक होणार नाही असे मानतात ते मला ओळखीतच नाहीत. माझ्या अनुभवांवरून मी मात्र एवढे शिकलो आहे की जीवन म्हणजे चुका करीत राहाण्याविरुद्ध झगडत राहाणे आहे हे आपण नम्रपणे ध्यानात घेतले पाहिजे. १९१९ साली मी सविनय कायदेभंग अगदी सहजपणे सुरू केला तेव्हा मी मोठीच चूक केली. नडियाद येथे दूरदृष्टीचा अभाव माझ्या लक्षात आल्याबरोबर त्याला हिमालयाएवढी मोठी गलती असे म्हटले. ती काही अतिशयोक्ती नव्हती. आणि तीमुळे या देशाची नैतिक वाढ होण्याचे थांबले नाही याचे कारण माझी चूक अगदी स्पष्टपणे, हातचे राखून न ठेवता कबूल करण्याचा शहाणपणा दाखविला हे होय. स्वदेशीवर चित्त केंद्रित केलेल्या अलीकडच्या थोड्या आठवड्यात मी आणखी एक अशीच चुकीची कबुली देऊ इच्छितो.

विद्यार्थी व प्राध्यापक यांजबरोबर झालेल्या संभाषणात तशी कबुली मी अगोदरच दिलेली आहे. पण याहून निश्चित व जाहीर स्वरूपाची चुकीची कबुली माझ्या मन:स्वास्थ्यासाठी आणि सध्याच्या खादीच्या प्रचारासाठी आवश्यक आहे. गेल्या नऊ महिन्यांच्या अनुभवाने सरकारी नियंत्रणाखालील शिक्षणसंस्थांवरील बहिष्कार अगदी बरोबर होता अशी माझी खात्री पटलेली आहे. पण त्याकरिता मी पर्याय सुचविला त्याबद्दल मी तेवढा जोराने बोललो नाही. कारण इतरांची खात्री पटविण्याबद्दलच्या माझ्या सामर्थ्यावर माझा विश्वास नव्हता. ईश्वरावर भरंवसा ठेवण्याऐवजी परिणामांची काळजी मी करीत बसलो आणि म्हणून दुर्बळपणाने मी असे म्हटले की, शाळा-कॉलेजे सोडल्यावर मुलांनी रस्त्यातून भटकावे, दुसरा काही शिक्षणाचा उद्योग करावा अथवा उत्तम मार्ग म्हणजे, स्वराज्यस्थापना होईपर्यंत सूत कातीत राहावे," अशा शब्दांत महात्मा गांधींनी 'चुकीची कबुली' या शीर्षकाखाली तारीख १८ ऑगस्ट १९२१ रोजी 'यंग इंडिया'त छापलेला एक लेख आहे. ते पुढे म्हणतात, "नागपूर काँग्रेसचा ठराव झाल्यानंतर, अनेक पर्याय सुचविण्यात मी चूक केली हें माझ्या लक्षात आले. पण त्यामुळे होणारे नुकसान होऊन गेले होते. गेल्या सप्टेंबर महिन्यात त्याची सुरुवात झाली. मी माझी पावले मागे घेण्याला जानेवारीत प्रारंभ केला, पण दुरुस्तीचे काम हे तसे तकलुपीच असते. आणि त्यामुळे बहुतेक राष्ट्रीय शाळांत चरखा म्हणजे कसा तरी चालावण्याचा एक प्रकार किंवा बांडगुळासारखा होऊन राहिला. मी धैर्याने संपूर्ण सत्य सांगायला हवे होते व असे सुचविणे अवश्य होते की सरकारनियंत्रित बहिष्कृत शाळांत सूत काढणे व हातमाग चालविणे हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. मग कदाचित कमी विद्यार्थी विद्यालयांतून बाहेर पडले असते. पण पर्यायाबद्दल निश्चित कल्पना नसलेल्या ज्या शेकडो विद्यार्थ्यांनी शाळा–कॉलेजे सोडली त्यांच्यापेक्षा त्या कमी विद्यार्थ्यांनीच अधिक मोलाची कामगिरी बजावली असती. या वेळेपर्यंत ते हातसुताच्या व हातमागांच्या कामात तरबेज होऊन गेले असते आणि स्वदेशीच्या बाबतीतील आपले काम अधिक सोपे झाले असते. मला माहीत आहे की, असहकारिता शाळांतील विद्यार्थी व अध्यापक आपल्याकडून उत्तम काम करीत आहेत. पण ते काही अडचणीतून मार्ग काढीत आहेत हे कबूल केले पाहिजे. एकंदरीत स्वदेशी आणि सूतकताई याबद्दलची निश्चित खात्री पटून ते बाहेर पडले नव्हते. फक्त शैक्षणिक दृष्टिकोणातूनच त्यांनी त्याचा विचार केला आणि तसे करण्याचा त्यांना हक्क होता. त्यांचे बहिष्काराचे कार्य पूर्ण होण्याकरिता त्यांना सूत कातणारे व विणकर बनले पाहिजे असें आता त्यांना सांगणे काहीसे अन्यायाचे आहे. तसेच कापडाचे उत्पादन होण्या-

साठी कपाशीवर ज्या प्रक्रिया कराव्या लागतात त्या सगळ्यांचे ज्ञान स्वराज्यात मिळणाऱ्या शिक्षणाला अवश्य आहे व त्याचे प्राथमिक ज्ञान सर्वांनी संपादन केलेच पाहिजे.

"पण आता चूक होऊन गेल्यानंतर मला त्याची शिक्षा भोगलीच पाहिजे. ती म्हणजे, जे शंकाकुल आहेत त्यांची खात्री पटविणे की असहकारितेतील शैक्षणिक संस्थांवरील बहिष्काराच्या कलमात सूतकताई हा आवश्यक भाग आहे असे प्रथमपासून सांगणे जरूर होते. ज्यांना माझे म्हणणे पटत असेल त्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी झालेली चूक लवकर दुरुस्त करावी आणि सर्व शैक्षणिक संस्थांत सूत व खादी विणणे यांचे शिक्षण देण्यास सुरुवात करावी. माझ्याजवळ शिक्षकांची मागणी त्यांनी करू नये. माझ्याजवळ फार थोडे शिक्षक आहेत. पण कपाशीच्या गासड्यांत असलेल्या कापसावर कोणकोणत्या प्रक्रिया कराव्या लागतात त्यांचे टिपण मी येथे करतो. गासड्यांमधील कापूसच आपणाला येथे घ्यावा लागतो. प्रथम तो पिंजून घ्यावा लागतो. पिंजारा किंवा धनिया हिन्दुस्तानाच्या कोणत्याही जिल्ह्यांत नसतील असे नाही. त्यांचे काम एकदोन दिवस पाहात राहिल्यावर कोणालाही ते शिकता येईल. दिवसांतून सहा तास असे एक आठवडाभर काम केल्यावर कोणालाही कापूस पिंजण्याचे काम करता येईल. पिंजलेल्या कापसाचे पेळू किंवा पुणी तयार करणे हे अगदी सोपे काम आहे. आता कापूस सूत काढण्याला तयार झाला आणि कातण्याचे काम कोणाही कातणाऱ्याकडून सहज शिकता येईल. हा धागा स्वच्छ, सारखा व पिळदार असला पाहिजे. जर तो तसा नसेल तर त्याचे कापड विणता येणार नाही. यानंतर प्रक्रिया त्याला खळ लावण्याची. हे काम शिकणे काहीसे अवघड आहे. खळ कशी करावी याचे काही शास्त्रीय कोष्टक माझ्याजवळ तयार नाही. ते सर्व एखाद्या अनुभविक विणकराकडूनच शिकले पाहिजे. धागे जोडण्याचे कामही स्वतंत्रपणे शिकावे लागेल. सायकलवर बसणे हे जसे शिकता येते तसेच हे धागे जोडण्याचे कामही कोणालाही शिकता येते.

"शेवटचे काम म्हणजे खादी विणण्याचे. हा प्रश्न सवय करण्याचा आहे, अभ्यासाचा आहे. त्याचे मूलभूत तत्त्व एका दिवसात शिकता येते. या सर्व प्रक्रिया सहज शिकता येतात, असे मी म्हणतो याचे वाचकाने आश्चर्य वाटून घेऊ नये. सर्व स्वाभाविक व आवश्यक काम सोपेच असते. पण अभ्यासाची आवश्यकता पारंगत होण्यासाठी आहे. तो सतत न आळसावता केला पाहिजे. कष्ट करण्याची पात्रता म्हणजे स्वराज्य. ती योगसाधनाच आहे. तसेच यात तेच तेच करीत राहाण्याचा कंटाळवाणेपणा आहे याची धास्ती वाचकाने घेऊ नये. तीच तीच क्रिया करीत राहणे हा निसर्गाचाच नियम आहे. सूर्य रोजरोज

कसा उगवतो आणि अस्तास जातो ते पाहा. त्याने जर टंगळमंगळ केली आणि तो कोठे खेळायला गेला तर विश्वावर केवढे संकट येईल याचा विचार करा. पण जीवन सफल करणारी आणि मृत्यू जवळ आणणारी असे पुनरावृत्तीचे प्रकार आहेत. अवश्य अशा उद्योगांतील पुनरावृत्ती जीवनदायी असते. कलाकाराला आपल्या कलेतील तोचतोचपणा कंटाळवाणा होत नाही. सूत कातण्याची कला हस्तगत केल्यावर कातणाराला ती रोचक, रंजक व जीवनदायी होते. चाती फिरू लागली की उदित होणारा सूर कंटाळा येऊ न देता संगीताचा अनुभव देतो. आणि तेच तेच कातण्याचे काम करून हिंदुस्तानाने स्वराज्य संपादन केल्यावर एक अशी सुंदर वस्तू तयार होईल की तो नित्याचा आनंद होईल. पण चरखा चालविल्याशिवाय तो अप्राप्य आहे. म्हणून हिंदुस्तानाला सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय शिक्षण म्हणजे समजून सवरून चरखा चालविणे हेच आहे."

१९२१ अखेरपर्यंत परदेशी कापडाचा बहिष्कार हे अनत्याचारी असहकारितेच्या कार्यक्रमातील कलम पूर्णपणे अंमलात येईल आणि परिणामी खिलाफत व पंजाबातील अत्याचार याबाबत केलेले अन्याय ब्रिटिश सरकारच्या ध्यानात येतील आणि ब्रिटिशांशी मैत्रीचा संबंध ठेवणारे स्वराज्य येथे स्थापन होईल, असे गांधी सारखे म्हणत होते. तसेच सप्टेंबर ३० नंतर परदेशी कापडावरील बहिष्काराबद्दलचें प्रचार कार्य चालू राहाणार नाही असे म्हणत होते. या काळात हिंदुस्तानच्या स्वराज्याचे बाह्य स्वरूप कसे याबद्दलची चर्चा करणे त्यांना अयोग्य व अकालिक वाटत होते. पण स्वराज्यात अवश्य असलेच पाहिजेत असे गुणधर्म कोणते हे स्पष्ट करण्याला ते चुकत नसत. स्वराज्य म्हणजे मृत्यूच्या भयाचा परित्याग, सतत कष्ट करीत राहण्याची क्षमता म्हणजे स्वराज्य. धर्माचे अथवा लोकांचे राज्य म्हणजे स्वराज्य आणि असे स्वराज्य लोक जेव्हा धर्माची कदर करू शकतील व शूर बनतील तेव्हाच त्यांच्याकडूनच होईल. ईश्वराच्या देखील हाती स्वराज्याची देणगी देण्याचे नाही. आपले आपल्यालाच ते मिळवावे लागेल, असे उद्गार आपल्या लेखनात त्यांनी वारंवार काढले आहेत. विपिनचंद्र पाल यांनी जेव्हा त्याची चर्चा सुरू केली तेव्हा त्यांनी लिहिले, "पाया मजबूत केल्याशिवाय वरचे मजले बांधणाऱ्या गवंड्याच्या उद्योगासारखा हा उद्योग आहे." आपले स्वराज्य हें धर्मराज्य असेल आणि अनत्याचारी अहिंसेनेच ते सिद्ध होईल. याच वेळी त्यांनी साधनाच्या शुचितेची महती सांगितली. स्वतंत्र व स्वराज्यसंपन्न हिंदुस्तानात राज्यकर्ता वर्ग असा कोणी असणार नाही.

याच कालात गांधींना एक निनावी पत्र मिळाले. निनावी पत्रे लिहिण्याची सवय लिहिणाराचा भेकडपणाच फक्त दाखविते, अशी सुरुवात करून गांधी म्हणतात,

अशा पत्रांची दखल घेणे देखील बरोबर नाही, पण या पत्रांत उपस्थित केलेला विषय महत्त्वाचा असल्यामुळे त्याच्याकडे लक्ष पुरविणे मला भाग आहे. टिळकांना अत्यंत प्रिय असलेले स्वराज्यकार्यच पुढे चालवीत असता गांधींनी आपल्याला टिळकांचे शिष्य न म्हणविता गोखल्यांचे शिष्य म्हणवावे ही गोष्ट सदरहू निनावी पत्रलेखकाला खटकली आणि ही तोतयागिरी ( Imposture ) सोडून देण्याचा त्याने गांधींना उपदेश केला. टिळकांबद्दल आपल्याला किती आदरभाव आणि पूज्यबुद्धी आहे हे त्यांनी परोपरीने व अंतःकरण पिळवटून सांगितले आहे. पण राजकीय कार्य करण्याची त्यांची व आपली पद्धती एकच नव्हती हे आपल्याला पक्के माहीत होते असे कळवळून सांगितले. गोखले हयात असते तर त्यांच्या हाताखालीच आपण काम करीत राहिलो असतो, असे त्यांनी स्वच्छ म्हटले आहे. गुरुशिष्यत्वाचे नाते हे पावित्र्यपूर्ण आहे व तो संबंध खास वयक्तिक स्वरूपाचा आहे आणि त्याचे अवमूलन गोखले हयात नसताना मी करू शकत नाही असे म्हणून त्यांनी या विषयावर पडदा टाकला आहे. मात्र टिळकांचा माझ्या पद्धतीवर अविश्वास होता असे मात्र नव्हे. मृत्यूपूर्वी पंधरा दिवस आधी झालेल्या भेटीतच टिळकांनी त्यांना सांगितले होते की, तुमची अनत्याचारी असहकारितेच्या आंदोलनाची योजना उत्तम आहे, फक्त लोक ती उचलून धरण्याला कितपत तयार होतील याबद्दल साशंकता वाटते, असे गांधींनी याच लेखात नमूद करून ठेविले आहे.

१४ ऑगस्ट १९२१ रोजी प्रथम 'नवजीवन' मध्ये लिहिलेल्या व १३ ऑक्टोबर १९२१ रोजी 'यंग इंडिया' मध्ये प्रसिद्ध झालेल्या गांधींच्या एका लेखाचे शीर्षक आहे 'मृत्यूचे भय.' या लेखात ते म्हणतात, "स्वराज्याची वर्णने मी जमा करीत आहे. यांपैकी एक वर्णन अथवा व्याख्या म्हणते, स्वराज्य म्हणजे मृत्यूच्या भयाचा त्याग. जे राष्ट्र मृत्यूच्या भयाने ग्रस्त असेल त्याला स्वराज्य कधीच मिळणार नाही आणि कसे तरी जर मिळाले तरी ते टिकणार नाही.

"इंग्रज लोक आपले प्राण नेहमी आपल्या खिशामध्ये ठेवून असतात. अरब व पठाण लोक मरण म्हणजे एक अनेक दुखण्यांपैकी दुखणे समजतात. जेव्हा एकादा आप्त मरतो तेव्हा ते रडत नाहीत. बोअर स्त्रिया या भीतीपासून सदैव मुक्त असतात. बोअर युद्धाच्या वेळी हजारो बोअर स्त्रिया विधवा झाल्या. त्यांनी काही परवा केली नाही. नवरा अथवा मुलगा युद्धात पडला याचे त्यांना काही वाटले नाही. देशाचा मान अबाधित राहिला यात त्यांना सर्व काही मिळाले असे वाटले. देश गुलाम होऊन नवरा जिवंत राहाण्याचा काय उपयोग? मुलगा मेला तर त्याची कबर बांधून त्याचे

कायमचे स्मरण ठवण हे त्याला गुलामगिरीतून लहानाचा मोठा करण्यापेक्षा हजारपटीनें अधिक बरे. अशा प्रकारे बोअर स्त्रियांनी आपली अंतःकरणे पोलादापेक्षा कठोर बनविली आणि आपल्या प्रिय कुटुंबियांना यमराजाच्या हवाली केले.

"ज्या लोकांचा उल्लेख मी केला आहे ते हत्या करीत होते आणि करवून घेत होते. पण जे हत्या करीत नाहीत, पण स्वतःच मरणाला तयार असतात त्यांचे काय ? असे लोक जगाच्या परमादराचे विषय होतात. ते या पथ्वीचे खरे अलंकार आहेत.

"इंग्रज व जर्मन यांनी एकमेकांशी युद्ध केले. त्यांनी दुसऱ्यांना मारले व स्वतः मेले. परिणाम इतकाच झाला की कत्तल वाढली. अस्वस्थतेचा शेवट झाला नाही व युरोपची सध्याची स्थिती करुणास्पद आहे. फसवणूक वाढली आहे आणि एक दुसऱ्याला गंडवीत आहे.

"पण ज्या निर्भयतेचा परिपोष आपण करीत आहो ती अधिक उदात्त व शुद्ध आहे आणि म्हणून अल्पावधीत आपण प्रचंड विजय मिळविण्याची आशा धरली आहे.

"जेव्हा आपण स्वराज्य मिळविलेले असेल तेव्हा आपल्यापैकी पुष्कळ मृत्युंजय झालेले असतील. तसे झाले नसेल तर आपण स्वराज्य मिळविलेलें नसणारच. आतापर्यंत फक्त तरुण मुलांचे बलिदान झालेले आहे. अलीगडास जे कामाला आले ते सगळे एकवीस वयाखालचे होते. ते कोण होते हे देखील कोणाला माहीत नाही. जर सरकारने आता गोळीबार चालू केला तर मी आशा धरून आहे की पहिल्या प्रतीच्या लोकांना आत्मयज्ञ करण्याची संधी मिळेल. जेव्हा मुले अथवा तरुण अथवा वृद्ध मृत्युमुखी पडतात तेव्हा आपण विचलित का व्हावे ? असा एकही क्षण जात नाही की जेव्हा कोणी तरी जन्म घेत नाही अथवा मरत नाही. जन्माबद्दल आनंद मानण्याचे आणि मृत्यू-बद्दल शोक करण्याचा मूर्खपणा आपणाला ओळखता आला पाहिजे. ज्यांचा आत्म्याच्या अमरत्वावर विश्वास आहे ते जाणतात की आत्मा अमर आहे. जिवंत असलेल्यांचा व मृतांचा आत्मा एकच आहे. उत्पत्ती व लय यांचे सनातन चक्र न थांबता चालूच आहे. म्हणून त्याबद्दल आनंद वा दुःख करण्याचे आपल्याला प्रयोजन नाही. आपण किती जन्माला येणाऱ्यांबद्दल आनंद व मरणाऱ्याबद्दल दुःख करणार ? यावरून मरणाचे भय नाहीसे होण्याला आपल्याला मदत व्हावी.

"हिंदुस्तान हा तत्त्वज्ञान्यांचा देश आहे असे म्हणतात. आणि ही आपली प्रशंसा मान्य करून घेण्याला आपण काही नाखूष नसतो. पण मरणाचा प्रसंग आला की आपल्याएवढे हतबल दुसरे कोणीच होत नसतील. आपणाला जर

स्वराज्य मिळविणे असेल आणि ते मिळविल्यावर त्याला अभिमान बाळगिण्यासारखें स्वरूप आणून द्यायचे असेल तर आनंदोत्सव व दु:खप्रदर्शनाचा हा अशोभनीय प्रकार आपण ताबडतोब वर्ज्य केला पाहिजे.

"आता जो मृत्युंजय झाला त्याला तुरुंगवासाचे कसले भय वाटणार? वाचकाने इकडे विचारपूर्वक लक्ष पुरविले तर त्याला समजेल की स्वराज्य जर लांबणीवर पडले तर ते आपण मृत्यूला भीतो म्हणून लांबणीवर पडलेले असेल आणि मृत्युपेक्षाही कमी गैरसोयीच्या प्रसंगांना भीतो म्हणून असेल.

"निरपराधी असलेले अधिकाधिक लोक मरणाला कवटाळण्यास जेव्हा तयार होतील तेव्हा त्यांचा त्यागच इतरांच्या मुक्तीचे प्रबल साधन बनेल, आणि एकंदरीत दु:खभार किमान होईल. आनंदाने दु:ख सोसले तर त्यापासून दु:ख होण्याचे थांबते आणि त्याचे उच्च आनंदात पर्यवसान होतें. जो माणूस दु:खापासून दूर पळतो त्याच्यावर अमर्याद दु:ख कोसळून पडतें आणि त्यावेळी अगोदरच अर्धमेला झालेला असतो. पण जो मनुष्य कोणत्याही व कशाही प्रसंगाला तोंड देण्यास सिद्ध असतो त्याला दु:ख बाधतच नाही. त्याचा सदानंदीपणा हेच त्याचे औषध ठरते.

"या विषयावर हे इतके लिहिण्याला मी प्रवृत्त झालो याचे कारण या वर्षीतच जर आपणाला स्वराज्य हस्तगत करण्याचे असेल तर आपण मृत्युमुखात चालत जाण्याची तयारी आपण होऊन ठेविली पाहिजे. जो अगोदरच सर्व तयारी करून बसतो तो सहसा अपघातात सापडत नाही, आणि आपल्या बाबतीत तसें होऊ शकेलही. माझी पक्की खात्री पटली आहे की स्वदेशी व्रताचें परिपालन हीच ती तयारी आहे. एकदा हे व्रत यशालाभास चढले, तर हे सरकार किंवा दुसरे कोणतेही सरकार आपली दुसरी कोणतीही कसोटी पाहाणार नाही.

"तरीपण कोणतीही कुचराई करून चालणार नाही. सत्ता मिळाली की माणूस अंध व बधिर होतो. सत्ताधीशांना त्यांच्या नाकासमोरच्या गोष्टी देखील दिसेनाशा होतात आणि कानावर येऊन आदळणारे सुद्धा त्यांना ऐकू येत नाही. म्हणून हे सत्तेने मंदांध झालेले सरकार काय करील व काय नाही हे सांगता येणार नाही. म्हणून मला सांगणें जरूर वाटते की देशभक्तांनी मरण, तुरुंगवास आणि अशा प्रकारच्या सर्व छळाला सिद्ध असले पाहिजे.

"जे शूर असतात ते हसत हसत मृत्युमुखात प्रवेश करतात, पण तरीही त्यांची चौफेर नजर असते. या अहिंसात्मक संघर्षात आचरट धाडसीपणाला जागा नाही. अनीतीचे कृत्य करून आपण मरू इच्छीत नाही अथवा तुरुंगात जाऊ इच्छीत नाही. या सरकारच्या जुलुमी कायद्यांचा प्रतिकार करता करताच आपण फासावर चढले पाहिजे."

★

# ४. हिंसाचारामुळे पिछेहाट-
# स्वराज्य पक्षाचा विजय

'एक वर्षात स्वराज्य ' ही घोषणा झाली ते वर्ष (१९२१) सप्टेंबर महिन्या-अखेर संपत होते आणि त्यानंतर स्वदेशीवर म्हणजे सूतकताई व हातमागांवर काढलेल्या सुतांची वस्त्रे विणणे यावर जो आंदोलनाचा मुख्य भार त्यांनी ठेविला होता ते आंदोलन गांधी थांबविणार होते. यापुढे सविनय कायदेभंगाचे आंदोलन सुरू करून व तुरुंग भरण्याचा आदेश सर्व अनुयायांना देऊन ब्रिटिश राजवटीला अखेरचा धक्का मारण्याचा गांधींचा विचार होता. सविनय कायदेभंग हा सामुदायिक स्वरूपाचा होणार होता आणि त्याच्या तयारीकरिता कराचीपासून कलकत्ता आणि रावळपिंडीपासून तुतिकोरिनपर्यंत सगळ्या देशाची प्रदक्षिणा करण्याचा उपक्रम त्यांनी सुरू केला. आसाम प्रांतात ते दिब्रुगढ येथे असता मोपल्यांच्या बंडाची बातमी त्यांना समजली. हे मोपला लोक म्हणजे मलबार किनाऱ्यावर उतरलेल्या व स्थाईक झालेल्या अरब लोकांचे वंशज. तेथील हिंदू प्रजेशी मिळूनमिसळून ते कधीच वागले नाहीत आणि २० ऑगस्ट रोजी त्यांनी अचानक हिंदूंची कत्तलच सुरू केली. इतरही पुष्कळ अत्याचार निर्घृणपणे केले आणि देशात विकसत असलेल्या हिंदु-मुस्लिम ऐक्याला मोठाच धक्का दिला. काही मुसलमान पुढाऱ्यांनी या अत्याचारांकडे कानाडोळा करून या ऐक्याला भगदाडच पडेल असे वर्तन केले मोपल्यांच्या माथेफिरूप्रमाणे हिंदूंनी आपली डोकी फिरवून न घेता आपली माथी थंड राखावी असा उपदेश गांधी दक्षिण हिंदुस्तानातील हिंदूंना करीत होते. त्यांनी हा उद्रेक वेळीच आटोक्यात न ठेवल्याबद्दल सरकारास दोष दिला व असहकारितेच्या पुढाऱ्यांना शांतता व सामंजस्य टिकवून धरण्याच्या कामात यत्न करू देण्याने विघ्ने आणिली असे म्हटले. मोपल्यांना मिळालेल्या अमानुष शिक्षा सरकाराने दिल्या तरी गांधींनी देशाला मोपल्यांबद्दल सहानुभूती बाळगिण्याचे आवाहन केले. अशा परिस्थितीत शौकतअली व महंमदअली हेही नेहमीप्रमाणे हिंदु-मुस्लिम एकता राखण्याच्या कामात त्यांना साथ देण्याला नव्हते. कारण त्यांच्यावर सरकारने खटला भरला होता. लष्करी सेवेत कोणी शिरू नये, सरकारशी सहकार्य करू नये, अशा प्रकारची भाषणे केल्याबद्दल त्यांच्यावर हा खटला भरण्यात आला होता. गांधींनी याबाबत त्यांना पूर्ण पाठिंबा दिला. काँग्रेसच्या कार्यकारिणीनेही

पाठिंबा दिला व लष्करी अथवा मुलकी कोणतेही सहकार्य सरकारशी करणें म्हणजे पाप आहे अशी भूमिका घेतली. त्याच धर्तीवर अखिल भारतीय पुढाऱ्यांचा एक जाहीरनामा प्रसिद्ध होण्याची खटपट गांधींनी केली. या जाहीरनाम्यावर सुमारें पन्नास हिंदु-मुसलमान पुढाऱ्यांच्या सह्या आहेत. त्यांची नावे पुढे दिल्याप्रमाणे आहेत: मोहनदास करमचंद गांधी, अबुल कलाम आझाद, अजमलखान, लजपतराय, मोतीलाल नेहरू, सरोजिनी नायडू, आबास तयबजी, न. चिं. केळकर, विठ्ठलभाई पटेल, वल्लभभाई पटेल, मु. रा. जयकर, दा. वि. गोखले, शंकरलाल बँकर, जवाहरलाल नेहरू, गंगाधर देशपांडे, लखमीदास तेरसी, उमर सोबानी, जमनालाल बजाज, मा. श्री. अणे, एस. ई. स्टोक्स, महमंदअली अन्सारी, खलिफइझमान, के. एम्. अबदुल गफूर, अबदुल बारी, कृष्णाजी नीलकंठ, सी. राजगोपालाचारी, कोंडा वेंकटपाया, ती. हरिसर्वोत्तमराव, अनसूया साराभाई, जितेंद्रलाल बानर्जी, मुशीर हुसेन किडवाई, श्यामसुंदर चक्रवर्ती, राजेंद्रप्रसाद, आजाद सोबानी, हजरत मोहानी, महादेव हरिभाई देसाई, बरजोरजी फ्रामजी भरुचा, याकुब हसन, बा. शि. मुंजे, जयरामदास दौलतराम, एम. आर. चोळकर, वा. वि. दास्ताने, अहमद हाजी सिद्दिक खत्री, गुडुर रामचंद्र राव, डी. एस. विजयराव, बी. एल. सुबरामय्या, मिया महंमद हाजी जानमहंमद छोटानी इत्यादि.

स्वदेशीविषयक, हिंदु-मुस्लिम ऐक्यविषयक आणि असहकारितेच्या सर्वच अंगोपांगाबद्दल गांधी पूर्ण आत्मविश्वासपूर्वक लिहीत होते, परंतु अनेक टीकाकारांचे समाधान होत नव्हते. यांत त्यांचे सी. एफ. अँड्र्यूज यांचेसारखे जिवलग मित्र व त्यांना सदैव आदरणीय असलेले पंडित मालवीय आणि रवींद्रनाथ ठाकूर यांचेसारखे लोकही होते. रवींद्रनाथांची व गांधींची भेट सप्टेंबर महिन्यात ६ तारखेला कलकत्त्यास झाली. त्या भेटीबद्दलचे चुकीचे अहवाल वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाले. ऑक्टोबर महिन्याच्या 'मॉडर्न रिव्ह्यू' मध्ये 'दि कॉल ऑफ ट्रूथ' या मथळ्याचा एक लेख रवींद्रनाथांनी प्रसिद्ध केला. त्याचा विषय स्वदेशी हाच होता. स्वदेशीच्या नावाखाली आधुनिक आंतरराष्ट्रीय विचारप्रवाह भारतात वाहू न देण्याचा खटाटोप होत आहे, असे त्यांचे या लेखात प्रतिपादन आहे. या लेखाचे वर्णन, 'ए ब्रिलियंट एसे' असे करून गांधींनी 'दि ग्रेट सेंटिनल' या मथळ्याखाली जोरदार उत्तर दिले. त्यात गांधी म्हणतात, "कविराज आपल्या नजरेसमोर आकाशात उडत व गात जाणाऱ्या आनंदी पक्ष्यांचे लोभनीय दृश्य उभे करतात. या पक्ष्यांना आदल्या रात्री भरपूर खानापिना व विश्रांती मिळाली होती व त्यामुळे त्यांच्या पंखात, रक्तात नवीन जोम उत्पन्न झाला होता. पण माझ्या नजरेसमोर जे पक्षी आहेत ते दुर्बळ



म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
५/२५३
२
मंत्रालय.

आहेत. त्यांना उंच भराऱ्या तर मारता येत नाहीतच, पण पंखांची साधी फडफड देखील करता येत नाही. कवीराचे गीत गाऊन आजारी रुग्णांना समाधान देणें मला शक्य नाही. भुकेल्या लक्षावधी लोकांना काव्य फक्त एकाच रूपात दिसते व समजते. शक्तिदायक अन्न त्यांना कोणी देणार नाही. त्यांचे त्यांनीच तें मिळविले पाहिजे. आणि कष्ट करून घाम गाळूनच त्यांना ते मिळेल."

यंग इंडियाच्या १३ ऑक्टोबर १९२१ च्या अंकात हा लेख प्रसिद्ध झालेला आहे. चरखा व खादीच भुकेलेल्यांना अन्न व वस्त्र देऊ शकेल व त्यांना स्वावलंबी बनवील अशी गांधीजींची पुरेपूर खात्री झालेली होती आणि कविराजांना त्यांनी तसे स्पष्टपणे बजावले.

देशातील असंख्य भुकेकंगाल जनतेबरोबर गांधींचे किती तादात्म्य झाले होते याचे एक ठळक लक्षण त्यांनी आपल्या वैयक्तिक जीवनात व वागणुकीत जो लोकविलक्षण फरक घडवून आणला त्यामध्ये दिसून येते. खादीच्या दुर्मिळतेबद्दल चर्चा करताना गांधी अनेक वेळा कपडे वापरण्यात काटकसर करण्याबद्दल सुचवीत असत. बोलण्याप्रमाणे वागणे हा त्यांचा स्वभावच असल्यामुळे त्यांनी सदरा, टोपी व मोठे धोतर वापरण्याचे बंद करून फक्त आखूड पंचा वापरण्याला प्रारंभ केला. सप्टेंबरच्या २३ तारखेच्या सकाळी ते मद्रासच्या विणकरांच्या एका सभेला फक्त पंचा नसून गेले. हा फरक का केला याचा खुलासा करताना ते म्हणाले, आपल्या देशाच्या हवामानात, विशेषतः उन्हाळयाच्या दिवसांत आपले शरीर झाकण्याला याहून जास्त कपडयांची मुळीच गरज नाही. कपडयांचे उगीच स्तोम माजविण्यात काही अर्थ नाही. ऑक्टोबर ३१ रोजी त्यांनी दुसरे एक व्रत घेतले. दुसऱ्या जेवणापूर्वी अर्धा तास चरख्यावर सूत काढायचे व काही कारणास्तव हे शक्य झाले नाही तर संध्याकाळी अन्नग्रहण मुळीच करायचे नाही हे ते व्रत. आणखी एक नियम केला व अखेरपर्यंत तो पाळला. दर सोमवारी उपोषण करायचे आणि मौनव्रत पाळायचे. तेव्हापासून सोमवार हा मौनदिन त्यांनी यावज्जीव पाळला, हे शेवटचे व्रत त्यांनी घेतले याचे कारण १७ नोव्हेंबरला ब्रिटिश युवराज मुंबईस उतरल्यावर जी दंगल झाली तिचे प्रायश्चित्त म्हणून उपोषण करणे त्यांना अवश्य वाटले. युवराजाची भेट म्हणजे दयाळू ब्रिटिश सरकारची इज्जत लोकमानसावर ठसण्यासाठी येथील नोकरशाहीने काढलेली एक युक्तीच होती आणि त्याच भेटीच्या दिवशी दडपशाही सुरू करण्यात आली. गांधींनी लोकांना राजपुत्राच्या स्वागतासाठी व सन्मानासाठी होणाऱ्या सर्व उपक्रमांवर, सर्व समारंभांवर बहिष्कार घालण्यास सांगितले. पण त्याच वेळी त्यांनी असे बजाविले की, ज्यांना त्यात सामील व्हावयाचे असेल

त्यांचा तसे करण्याचा हक्क आहे आणि त्यांच्यावर कोणत्याही हिंसाचारान आपण दडपण आणिता उपयोगी नाही. त्या दिवशी उत्कृष्ट शांतता राखल्या-बद्दल एका जाहीर सभेत गांधी लोकांचे अभिनंदन करीत असताच मुंबई शहराच्या दुसऱ्या भागात राजपुत्राच्या स्वागतात सामील होणाऱ्यांना अथवा बहिष्काराला पाठिंबा न देणाऱ्यांना लोकांच्या झुंडी नानाप्रकारे त्रास देत होत्या. तेव्हा झालेल्या दंग्यांनी गांधींचे मन अगदी विटून गेले. त्या दिवशी लिहिलेल्या एका पत्रात ते म्हणतात, "मला वाटते लोकांनी अनाचाराची कमाल केली आहे. सहा पोलीस मृत्युमुखी पडले आहेत. आपले काही लोक सुद्धा मेले आहेत. स्वराज्याची चव आपल्याला चाखण्याला सापडली आणि माझी पुरी फजिती झाली आहे. यापुढे काय होणार आहे ते समजत नाही." दोन दिवसांनी लोकांना उद्देशून काढलेल्या एका विनंतिपत्रात ते म्हणतात, "गेल्या दोन दिवसांत मला स्वराज्याचे जे दर्शन घडले त्याची दुर्गंधी माझ्या नाकपुड्यांत अजून चिकटून राहिली आहे. तुम्ही मान्य कराल की माझ्यामुळे हा सगळा अनर्थ घडून आला आहे आणि त्यासाठी छळ झालेल्या लोकांची काही भरपाई मी करू शकत नाहीं. मूठभर पारशी, ख्रिस्ती व यहुदी लोकांना माझी हिंदु-मुस्लिम एकता म्हणजे मोठीच दहशत होऊन राहिली आहे. असहकारितावाद्यांची अहिंसा ही सहकारितावाद्यांच्या हिंसेपेक्षा वाईट ठरली आहे." या बाबतीत मुसलमानांनी फारच वाईट वर्तन, पारशी व ख्रिस्ती सहकारितावादी लोकांशी केले असे गांधींनी खेदपूर्वक नमूद केले आहे. मुंबईतील गुंड-मवाल्यांना सुद्धा गांधींनी एक विनंतिपत्र लिहून त्यांचेकडे दुर्लक्ष केल्याबद्दल त्यांची माफी मागितली. पण या सर्व अनर्थाचे प्रायश्चित्त म्हणून त्यांनी शहरातील सर्व जातीजमाती एकमेकांशी स्नेहाने व गुण्यागोविंदाने नांदायला तयार होईपर्यंत अनिश्चित कालापर्यंत उपवास जाहीर केला.परंतु त्यांनी तो लवकरच सोडला. सर्व जाती व धर्माच्या नेत्यांनी त्यांना तशी विनंती केली. सर्वांनी एकत्र बसून फलाहार केला व गांधींनी उपवास सोडला. पण देशातील राजकीय वातावरण पार बिघडून गेले होते. सामुदायिक कायदेभंगाची चळवळ हाती घेण्याला ते मुळीच अनुकूल नव्हते. तथापि काही निवडक भागांत त्याबद्दलची तयारी चालू झालेली होती. गांधी जरी ती चळवळ थोपवून धरण्याच्या मनःस्थितीत होते तरी सरकार मात्र एकदा काय तोसोक्षमोक्ष करून टाकावा अशा विचाराने भारले होते. बंगाल, यू. पी., पंजाब व दिल्ली येथील स्वयंसेवक संघटना बंद करून टाकण्यात आल्या, राष्ट्रीय वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी करण्यात आली आणि लाला लजपतराय, मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू, चित्तरंजन दास (यांची अहमदाबाद येथे डिसेंबरअखेर भरणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे

अध्यक्ष म्हणून निवडणूक झाली होती) या सर्वांना एकामागून एक अटक करण्यात आली. तेव्हा गांधीजींनी हे आव्हान स्वीकारण्याचें ठरविले. २९ ऑक्टोबर रोजी अहमदाबादेस जाहीर भाषण करताना ते म्हणाले : "आता आपल्याला दोन महिने देखील उरलेले नाहीत. २५ डिसेंबर रोजी काँग्रेसचे अधिवेशन सुरू होणार आहे. त्या वेळेपर्यंत जर आपण स्वराज्याचा झेंडा फडकाविला नाही तर ती काँग्रेस भरविण्याचा उपयोग काय ?" काँग्रेसचे अधिवेशन नीटपणें सिद्धीस जावे म्हणून गांधीजी सर्व तपशिलाकडे किती बारकाईने पाहात होते हें नवजीवनमधील त्यांच्या लेखनावरून स्पष्ट दिसते.

दुसऱ्या एका संदर्भात बोलताना गांधीजी म्हणाले, "माझी भाषणे बरोबर रीतीने छापील स्वरूपात उतरण्याच्या कामी लेखकांना नेहमी यश आले नाही. अशा वेळी अशा भाषणांचा काहीच उल्लेख न करणे बरें, अथवा ती करणारांकडून तपासून घेतल्यावरच ती छापण्यास द्यावी. म्हणजे पुष्कळ गरसमज होण्याचे टळेल." वर्षअखेर गांधींना समजून आले की विधायक कार्या-मार्फत आपले शुद्धीकरण करून घेण्याचा आपला संदेश लोकांच्या मनात मुळीच रुजलेला नाही. एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून देण्याचा प्रकारच पुष्कळसा घडलेला आहे. हे लक्षात घेऊन त्यांनी म्हटले, "अगदी नम्र होऊन मी ईश्वराच्या पायांशी अशी विनवणी करावी का, की हे माझे निरुपयोगी शरीर त्याने घेऊन जावे व मला सेवेसाठी अधिक चांगले हत्यार बनवावे." गांधी आत्महत्या करण्याच्या विचारात आहेत असा समज त्यामुळे फैलावला. पण त्यांची निराशापूर्ण मनःस्थिती लवकरच पहिल्यासारखी झाली. आपण स्वराज्य संपादनाकरिता अगदी साध्या अटी घातल्या होत्या. संपूर्ण स्वदेशीचा अंगीकार ही त्यातील प्रमुख अट होती. तिरंगी बहिष्कार व स्वदेशी या अटी पूर्ण करा आणि स्वराज्य घ्या, असे मी सगळ्यांना सांगितले. पण त्यांनी ते ऐकलें नाही. मी निरीश्वरवादी नाही व निराशावादी नाही. हिंदुस्तानाला स्वराज्य मिळाले नाही म्हणून आत्मघात मी कशाला करावा ? भारतीयांना स्वराज्य हवे असेल तर त्यांनी त्यासाठी लढा द्यावा व ते मिळवावे, असे त्यांनी म्हटले. या संदर्भात २३ ऑक्टोबर १९२१ रोजी 'नवजीवन' मध्ये छापलेला लेख अत्यंत महत्त्वाचा वाटतो. आशावाद म्हणजे 'ऑप्टिमिझम' असे त्याचें शीर्षक आहे. तो सगळा लेखच येथे पुढे दिला आहे :

"आशावादाने श्रद्धेचा निर्देश होतो. जो निरीश्वरवादी असेल तोच फक्त निराशावादी बनेल. आशावादी नेहमी ईश्वराबद्दल भय बाळगतो, नम्रपणे आपल्या आतल्या आवाजाला साद देतो, त्याच्या आज्ञा पाळतो. ईश्वरावर भरंवसा ठेवितो आणि तो जे जे घडवितो ते सर्व आपल्या कल्याणाचेच असते असे समजतो.

“निराशावादी उगाच अशा घमेंडीत असतो की सर्व काही मी करतो. जव्हा एखादे काम अंगावर घेऊन ते त्याला पार पाडता येत नाही तेव्हा तो स्वतःला वगळून दुसऱ्याना दोष देतो. स्वतःच्या मोठेपणाची बडबड करतो, ईश्वर आहे की नाही याची खात्री त्याला नसल्यामुळे, हे जग फुकट आहे व आपणच फक्त चांगले आहे असे म्हणतो. जगाला आपली किंमत कळत नाही असे म्हणतो आणि आत्महत्या करतो, ती न केली तरी कसातरी जिवंत राहातो, परंतु ते जीवन मरणप्रायच असतें.

“आशावादी सदैव प्रेम व परोपकार यांच्या विचारात मश्गुल असतो आणि त्याचा शत्रू असे तो कोणालाच मानीत नसल्यामुळे तो कोठेही निर्भयपणे वावरतो. त्याला हिंस्र प्राण्यांची अथवा भीतिप्रद माणसांचे भय वाटत नाही, कारण त्याच्या आत्म्याला विषारी सर्प चावत नाही अथवा पापी माणसाची तरवार भोसकू शकत नाही. असा मनुष्य आपल्या शरीराचा फारसा विचार करीत नाही. पाणी पिण्याच्या काचेचा ठिसूळ पेला जसा केव्हा तरी फुटणार तसे हे शरीरही केव्हा तरी विदीर्ण होणार हे समजून त्याची निरोगिता सांभाळण्यासाठी तो दुनियाभर भटकत फिरत नाही. आशावादी मनुष्य कोणाही दुसऱ्या माणसाला सतावणार नाही अथवा ठार मारणार नाही. तो सदा आनंदी असेल.

“निराशावादी मात्र अनेक लोभांची व नावडणाऱ्या गोष्टींची शिकार बनलेला असल्यामुळे प्रत्येक माणसाला आपला शत्रू समजून भीतो. त्याला आतला आवाज वगैरे काही नसतोच. मधमाशीप्रमाणे तो सारखा नवी नवी सुखे शोधीत असतो आणि अखेरीस कोणालाही त्याची करुणा न येता तो मरून जातो.

“असे माझे विचार असल्यामुळे, मला आशा वाटते की या वर्षी जर स्वराज्य मिळाले नाही तर मी आत्महत्या करीन असे कोणाला सांगितले असेल यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. माझ्या मताप्रमाणे फक्त बलात्कार होण्यापासून वाचण्यासाठीच आत्महत्या समर्थनीय आहे. एरवी ते महापाप व भेकडपणाचे निदर्शक आहे. खरोखर, हिंदुस्तानाने स्वराज्य मिळविले नाही म्हणून मी आत्महत्या करण्याचे कारण काय? हिंदुस्तानाला जर मनापासून स्वराज्य हवे असेल तर त्याने त्यासाठी लढा द्यावा व ते मिळवावे. हिंदुस्तानाला त्याची किंमत समजलेली आहे व त्याची रुची त्याने चाखलेली आहे. आता जर त्याला त्याची निकड वाटत असेल तर त्याने त्याची किंमत द्यावी आणि तें ते हस्तगत करावे. त्याने तसे केले अथवा न केले तरी मला आत्महत्या करण्याचे प्रयोजन काय?

"तथापि, काही मित्रांसमोर एका गोष्टीचा मी उल्लेख केला होता. जानेवारीपर्यंत स्वराज्य न मिळाले तर तुम्ही काय कराल, असा प्रश्न मला विचारला असता मी म्हणालो होतो की, या देशावर माझा इतका मोठा भरंवसा आहे कीं डिसेंबर महिना संपेपर्यंत आपल्याला स्वराज्य नक्की मिळेल असेच मला वाटत राहील. म्हणून त्यानंतर मी काय करीन हे माझे मलाच ठाऊक नाही असे म्हणालो. लोकांची रजा घेऊन मी कोठे एकांती जाऊन राहीन आणि स्वराज्याची घटना बनविण्यासाठी, यथाशक्ती, देशाला मदत करण्यात मला आनंद वाटेल. त्या वेळेपर्यंत स्वराज्य मिळाले नसेल तर पुढील वर्षी आपण जिवंत राहाणे मला आवडणार नाही. तसे झाले तर मला इतके खोलवर दुःख होईल की त्यामुळे माझे हे शरीर नष्ट होईल. तसे व्हावे अशी माझी इच्छा आहे.

"या देशात मी इतके आर्थिक व नैतिक दुःख पाहिले आहे की, त्यांच्या ज्वालांमध्ये मी जर भाजून मेलो नाही तर त्याचे कारण लोकांनी माझ्या अंतःकरणात पेटविलेला आशावादच होय. आज लक्षावधी लोकांनी एका दिवसात आपल्याला शुद्ध केले आहे आणि आज या लक्षावधी लोकांच्या शरीरांच्या अस्थिपंजरांवर थोडसे मांस दिसू लागेल अशा आशावादानेच मी हरएक दिवस जिवंत राहात आहे. हा आशावाद सिद्ध होण्यासाठी एक वर्षाची मुदत पुरे आहे असे मला वाटते. सप्टेंबर १९२० मध्ये असे म्हणणारा मी एकटाच होतो.

"डिसेंबरमध्ये इतरांनी असहकारितेचा कार्यक्रम एकमताने स्वीकारला. आता काँग्रेसने दिलेले अभिवचन जर पुरे केले नाही तर माझ्यासारख्या माणसाची काय स्थिती होईल? माझे आणि काँग्रेसचे दिवाळे वाजले असाच त्याचा अर्थ होतो. काँग्रेसवर विश्वास टाकून जर मी हुंडी लिहिली आणि जर तिचे रोख पसे मिळाले नाहीत तर मी कोठे जावे? माझी अशी फार इच्छा आहे की या वर्षी जर आपण स्वराज्य मिळविले नाही तर १ जानेवारी १९२१ रोजी सर्वांनी माझ्याइतकेच दुःख सहन करावे. प्रत्येकाला असें वाटावे की धर्म नाहीसा झाला आहे व अन्नही नष्ट झाले आहे.

"एका मित्राने मला विचारले हा भेकडपणा नाही काय? मला तसे वाटत नाही. मला त्यामध्ये करुणेचा आविष्कार प्रतीत होतो, हे केवळ सामान्य व्यवहारज्ञान आहे असे मला वाटते. जेव्हा आपण करीत असलेल्या सेवेबद्दल काही किंमत वाटत नाही असे दिसेल तेव्हा ती देत राहाण्यात काही अर्थ नाही. जेव्हा देह हाच संपण्याच्या बेतात असेल तेव्हा गंगाजलावर राहून त्याला हळूहळू नष्ट होऊ देणे हेच केवळ अस्थिपंजर म्हणून त्याला जिवंत ठेवण्यापेक्षा

वरे. त्याला वसंतमालती किंवा आणखी दुसरे काही देऊन जगविण्याचा काही उपयोग नाही. मला आज दिसते त्याप्रमाणे मी दुसरे काही न सांगता फक्त स्वदेशीला चिकटून राहा व स्वराज्य मिळवा एवढेच सांगेन. याशिवाय दुसरे काही मला सांगताच येत नाही तर मी दुसरी कोणती सेवा करू शकतो ?

"आता आपण शिडीच्या शेवटच्या पायरीवर आहो. आता पुनः बलवान बनून प्रकृती सुधारून घेतल्याशिवाय पुढल्या पायरीवर चढण्याचा प्रयत्न केल्यास पिछेहाटच होईल. मला आठवते की सिंहगडावर चढताना मी एका अशा टप्प्यावर आलो की तेथून मला मुळीच पुढे चढवेना. काही काळ विश्रांती घेतल्यावरच आणि थोडी शक्ती आली आहे असे वाटल्यावरच पुढील चढाव चढून मी वर जाऊ शकलो.

"आपण सध्या तशाच अवस्थेत आहो. स्वदेशीच्या कार्यक्रमांत आपल्याला पूर्ण यश मिळाल्याखेरीज आपणास जास्त पुढे जाता येणार नाही म्हणून माझे जिवंत राहाणे अथवा समाजात मिसळून राहाणे हे सवस्वी स्वदेशीच्या यशावर अवलंबून आहे.

"मला परिस्थिती दिसते ती अशी, माझ्या मनाची स्थिती आज अशी आहे. उद्याचा दिवस कसा उगवतो हे फक्त ईश्वरच जाणतो." (नवजीवन : २३-१०-१९२१).

'एक वर्षाची कालमर्यादा' या ११-१२-१९२१ रोजी 'नवजीवन' मध्य प्रसिद्ध झालेल्या लेखात गांधीजींनी तसेच विचार मांडले आहेत. गांधी स्वराज्य मिळवून देतील असे जे मानतात त्यांना स्वराज्याचा अर्थच समजला नाही असे म्हटले पाहिजे. स्वराज्य म्हणजे स्वावलंबन असे सांगून, गांधी पुढे म्हणतात, "मी एक वैद्य आहे. मी कोणते औषध घ्यावे ते सांगतो, कसे घ्यावे त्याचा खुलासा करतो, त्याच्याबरोबर कोणते पदार्थ घ्यावे ते सांगतो, पण अखेरीस रुग्णानेच ते सगळे केले पाहिजे. जर वर्षअखेर आपल्या स्वतःच्या अनुभवातूनच लोक समजले नसतील की स्वराज्य हे हिन्दु, मुसलमान, सीख, पारशी, खिरस्ती, यहुदी यांच्या एकतेने, स्वदेशी व्रत कसोशीने पाळून, अस्पृश्यतेचे उच्चाटन करून मिळवायचे आहे तर व्यावहारिक शहाणपणा अंगी नसलेला एक कुचकामी माणूस मी आहे आणि मी हिमालयात निवास करण्यास जाणे हेच उत्तम." यापुढे ते म्हणतात, "एका अर्थी वर्षअखेर स्वराज्य प्रत्यक्षात न उतरले तर चांगलेच होईल. म्हणजे माझ्याबद्दल ज्या भलभलत्या समजुती लोकांत पसरल्या आहेत त्यांचा तरी निरास होईल. लोकांना हे समजलेच पाहिजे की मी एक सामान्य मनुष्य आहे. लोकांना जरी असे वाटले

की माझे अंदाज व आडाखे चुकतात, मी अव्यवहारी मूर्ख माणूस आहे, तरी मला चालेल. माझ्या विलक्षण सामर्थ्याने काही प्राप्त झाले असे त्यांना वाटण्यापेक्षा आपल्या स्वतःच्या श्रमांनी, तपस्येने, शुद्धीकरणाने आपण काही मिळविले असे लोकांस समजून येणेच श्रेयस्कर आहे. लोकांना माझ्याबद्दल एवढा विश्वास वाटला म्हणजे पुरे की 'या माणसाने त्यावेळी त्याला जे सत्य वाटेल तेच त्याने आमच्यापुढे ठेविले.' यापेक्षा अधिक मोठे प्रशस्तीपत्र मला नको. यापेक्षा अधिक काही मिळवण्याला मी पात्र नाहीच."

हे सगळे खरे असले तरी सविनय कायदेभंग आणि तो देखील सामुदायिक स्वरूपाचा, असा करणें अवश्य होईल हे जाणून असल्याने गांधीजी बारडोली या गुजरातेतील तालुक्यात तेथील जनतेची सर्व प्रकारची तयारी करण्याचे काम चालवीत होतेच. ब्रिटिश राजपुत्राच्या मुंबईतील आगमनाच्या वेळी जे दंगे झाले त्यामुळे देशाच्या सविनय कायदेभंगाची चळवळ करण्याच्या पात्रतेविषयी गांधींना चिंता उत्पन्न झाली होती, तरी तीमधून ते हळूहळू बाहेर येत होते व अहमदाबाद काँग्रेसच्या वेळी अनेक पुढाऱ्यांना सरकारने अटक करून नियुक्त अध्यक्ष चित्तरंजन दास यांनाही पकडून ठेविले होते, तरी हकीम अजमलखाँ यांना त्यांचे जागी बसवून त्यांनी त्या काँग्रेसच्या अधिवेशनाचे काम तडीस नेले. सरकारने सरसकट पुढाऱ्यांची धरपकड केल्याने त्यांना सामुदायिक कायदेभंगाकडे वळणे भाग पडत होते. सरकारचे आव्हान स्वीकारणे त्यांना प्राप्त झाले. काँग्रेसच्या अधिवेशनात भाषण करताना ते म्हणाले, "मी शांतताप्रिय माणूस आहे. पण पाहिजे ती किंमत देऊन मी शांतता विकत घेऊ इच्छीत नाही. दगडात किंवा थडग्यात नांदणारी शांतता मला नको. ब्रिटिश लोक आमची राजकीय प्रगती व्हावी म्हणून आस्था दाखवीत होते तेव्हा लोकांना खरोखर काय पाहिजे हे त्यांना कळले नाही. आम्हाला शाळेतील मुले समजून मास्तरांनी दिलेली शाबासकी नको. लॉर्ड रेडिंग यांना हे समजले नाही की सरकाराशी आमचे युद्ध चालू आहे!" तथापि त्या वेळेपुरता त्यांचा संघर्ष भाषणस्वातंत्र्य व सभास्वातंत्र्य यापुरताच मर्यादित केलेला होता आणि या मर्यादित स्वातंत्र्याच्या लढ्यात सहकारवादी नेमस्तांचेही सहाय्य आपणास मिळेल असे त्यांना वाटत होते. त्यांच्याशी सलोख्याचे संबंध ठेवा असे ते असहकारितावाद्यांनाही सांगत होते आणि म्हणूनच पंडित मदनमोहन मालवीय यांनी मुंबईस सर्व राजकीय पक्षांची जी परिषद सर शंकरन नायर यांच्या अध्यक्षतेखाली भरविली तिला ते हजर राहिले. काही गैरसमजाने सर शंकरन परिषदेचे अध्यक्षस्थान सोडून निघून गेले तेव्हा सर एम्. विश्वेश्वरय्या यांची

निवड त्यांच्या जागी करून या परिषदेचे काम पुरे करून घेण्यात आले (महंमदअलींची मुक्तता व्हावी अशी सूचना गांधींनी केली; तीमुळे प्रक्षुब्ध होऊन सर शंकरन नायर एकदम अध्यक्षस्थान सोडून निघून गेले.) या परिषदेचे वर्णन गांधींनी 'यंग इंडिया' मधील लेखात ती यशस्वी झाली आणि अयशस्वीही झाली असे केले. सर्वानुमते मंजूर असा एक ठराव या परिदेषने केला आणि गांधींच्या सांगण्यावरून काँग्रेसच्या कार्यकारिणीनेही त्याला पाठिंबा देणारा एक ठराव पास केला. गांधींनी यशस्वी परिषदेला एवढ्याकरिता म्हटले की परिषदेला आलेल्या सर्वांनी सध्याची कटकट मिटावी म्हणून एकोपा दाखविला आणि अयशस्वी अशासाठी म्हटले की परिस्थितीची गंभीरता हजर असलेल्यांच्या ध्यानातच आली नाही. राजकीय पक्ष व सरकार यांच्या प्रतिनिधींची एक गोलमेज परिषद भरवावी असे परिषदेने म्हटले तरी त्यातून काही निष्पन्न होईल असे गांधींना वाटलेच नाही. ब्रिटिशांच्या राष्ट्रीय स्वभावाची त्यांना चांगली पारख होती. पुरेसे दडपण असल्याशिवाय ब्रिटिश काही करीत नाहीत, हे त्यांना पुरते ठाऊक होते. गांधी म्हणतात, "त्या दृष्टीने पाहाता पूर्ण स्वराज्याची योजना तयार करण्याची परिषदेची कल्पना ही अकालिक होती. हिंदुस्तानाने आपली तशी योजना होण्याकरिता लागणारे सामर्थ्य अद्यापि प्रकट केलेले नाही. हिंदुस्तानने पुष्कळ सहन केले आहे, दुःख भोगले आहे, पण जे उद्दिष्ट आहे त्याच्या मानाने ते काहीच नाही व दीर्घकालीन तर नाहीच नाही."

या परिषदेत काँग्रेसजनांच्यातर्फे फक्त गांधींनीच बोलावे अशी सूचना केळकरांनी केली होती.

सरकारने गोलमेज परिषद भरविण्याची मालवीय-शंकरन-विश्वेश्वरय्या यांच्या परिषदेची विनंती फेटाळून लावली. काँग्रेसनेही या मागणीला पाठिंबा दिला होता. डिसेंबर १९२१ अखेर भरलेल्या अहमदाबाद काँग्रेसमध्येही तसा ठराव पास झाला होता. तेव्हा गांधींनी सामुदायिक सविनय कायदेभंगाची चळवळ करण्याचे ठरविले. बारडोलीस त्याचा प्रारंभ करावा असे त्यांनी निश्चित केले. १ फेब्रुवारी रोजी त्यांनी व्हाइसरॉय लॉर्ड रेडिंग यांना अखेरचे पत्र पाठविले. त्यात बारडोलीस संघटित केलेल्या सामुदायिक सविनय कायदेभंगाची सर्व माहिती देऊन, ताबडतोबीच्या मागण्या म्हणून भाषणस्वातंत्र्य, सामुदायिक कृतीचे स्वातंत्र्य व मुद्रणस्वातंत्र्य यांवरील सगळे निर्बंध उठवावे असे सुचविले. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. बारडोलीपासून नव्या चळवळीचा प्रारंभ करायचे पक्के ठरले. पण ४ फेब्रुवारी १९२२ रोजी गोरखपूर जिल्ह्यात चौरी-चौरा मुक्कामी एका पोलीसचौकीला आग लावण्यात आली. तीमध्ये

२१ पोलीस शिपाई ठार झाले व त्यांची प्रेते आगीत जळून गली. हा प्रकार म्हणज ईश्वराने आपल्याला कायदेभंगाची मोहीम रद्द करण्यासाठी दिलेला इषाराच आहे, असे गांधीजींच्या मनाने घेतले. त्याच्या सांगण्यावरून १२ फेब्रुवारी रोजी काँग्रेसच्या वर्किंग कमिटीने सविनय कायदेभंग कोणत्याही स्वरूपात कोठेही अनिश्चित कालपर्यंत करू नये, अशा अर्थाचा ठराव पास केला. जवाहरलाल नेहरू तेव्हा अटकेत होते. त्यांना लिहिलेल्या पत्रात गांधी म्हणतात, "हा ठराव झालेला पाहून आपल्यावर मोठाच घाला गांधींनी घातला असे वाटेल", पण गांधींच्या वर कितीही प्रतिकूल टीका झाली तरी ते स्तब्ध राहिले आणि अर्धवट अत्याचारी व अर्धवट अनत्याचारी चळवळ मला पाहिज असलेल्या स्वराज्यासाठी मी चालवू शकत नाही असा ठाम निश्चय त्यांनी सर्व काँग्रेसजनांच्या नजरेस आणिला. वर्किंग कमिटीत व अखिल भारतीय काँग्रेस कमिटीत त्यांनी सांगितले की, 'माझ्यात काही बदल होणार नाही. जगात मी जर कोणाचा निरपवाद अधिकार मानीत असेन तर तो माझ्या आतील आवाजाचा अथवा हृदयस्थ परमेश्वराचा!' त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ठराव जरी ए. आय. सी. सी. ने केला तरी गांधीजी समजून होते की यात तोंडदेखलेपणाचा अंश काही थोडाथोडका नाही. सभेच्या शेवटी ते म्हणाले, "मी अधिक दुःखी पण अधिक शहाणा झालो आहे." त्यांच्या आता ध्यानात आले होते की सगळच असहकारितावादी म्हणविणारे खरोखर तसे प्रामाणिक नव्हते, अहिंसा व अनत्याचार यावरही त्यांची खरी श्रद्धा नव्हती. सामुदायिक सविनय कायदेभंगाचा कार्यक्रम बेमुदत निलंबित केल्यानंतर त्यांनी जवाहरलाल नेहरू यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले की, "माझ्या उंटाच्या पाठीवरच्या वजनात ही शेवटची गवताची काडी पडल्यासारखी झाली. व्हाइसरॉयसाहेबांना लिहिलेल्या माझ्या पत्रातील भाषेवरून हे सगळ्यांच्या स्पष्टपणे ध्यानात आले असेलच. ही सर्व हकीकत माझ्यासमोर असता आणि दक्षिण हिंदुस्तानातून तशाच आणखी हकीकती समजून येत असता चौरीचौऱ्याची दंग्याची हकीकत म्हणजे दारूच्या कोठारावर पडलेली ठिणगीच होती.

त्यामुळे भडका उडाला. त्याआधी कित्येक महिने ते लोकांचे परोपरीने शिक्षण करीत होते की अनत्याचाराचे वातावरण देशात सतत राहिले पाहिजे आणि कार्यक्रमात विधायक भाग म्हणजे स्वदेशी, हिंदु-मुस्लिम एकता, अस्पृश्यतेचे निर्मूलन वगैरे सारखे चालू राहिले पाहिजेत. सरकाराने प्रक्षोभ उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला तरी आपण शांत राहिले पाहिजे असे ते सारखे बजावीत होते, पण असहकारितेच्या कार्यकर्त्यांतच ती चिकाटी व श्रद्धा नव्हती. त्यांना ते सगळे काम मिळमिळीत वाटत होते. अगदी विनम्रपणे त्यांनी आपला पराजय मान्य केला. परंतु त्यामुळे

हिन्दुस्तानातील ब्रिटिश राज्यपद्धती सुधारली पाहिजे अथवा संपली पाहिजे हा त्यांचा निश्चय अबाधित होता. लॉर्ड बर्कनहेड व मँटेग्यू यांच्या वक्तव्यांना उत्तर देताना ते म्हणाले, " लाल मद्यासारखी असलेली सत्ता पिऊन झिंगलेले ब्रिटिश सरकार आहे. " " No empire intoxicated with the red wine of power and plunder of weaker races has yet lived long in this world and this British Empire which is based upon organised exploitation of physically weaker races of the earth and upon a continuous exhibition of brute force, cannot live if there is a God ruling the universe...... I am aware that I have written strongly about the insolent threat that has come from across the seas, but it is high time that the British people were made to realise that the fight that was commenced in 1920 is a fight to a finish."

यानंतर लौकरच गांधीजींना अटक करण्यात आली. ज्या लेखातून हा उतारा घेतला आहे तो लेख त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवण्यासाठी आधारभूत धरला आहे. 'शेकिंग दि मेन्स' म्हणजे ब्रिटिश सिंहाच्या गुहेत शिरून त्याची आयाळ पिरगाळणे असे ते शीर्षक होते.

गांधीजींची अटक व त्यांच्यावरील राजद्रोहाचा खटला म्हणजे एक विलक्षणच घटना या असहकारितेच्या चळवळीच्या काळात होऊन गेली. या खटल्यामुळे ब्रिटिश राज्याची नैतिक समर्थनीयताच अव्हेरली गेली व हे काम त्यांनी मोठ्या जोमदारपणें व निर्भयतेने न्यायकोर्टातच केलें. आपल्या लेखी निवेदनात त्यांनी आपलें एका राजनिष्ठ नागरिकांतून, राजद्रोही असहकार-वाद्यात का व कसे रूपांतर झालें याचा खुलासा केला. दक्षिण आफ्रिकेत गेल्यावर लवकरच जरी त्यांना समजले की एक हिंदी माणूस या नात्याने आपल्याला काही हक्क नाहीत., तरी त्यांना असें वाटत होतें की मूलत: व मुख्यत: सुदृढ व निकोप असलेल्या राज्यपद्धतीत तात्पुरता बिघाड एवढेच आफ्रिकेतील राज्यपद्धतीचें वैगुण्य होतें. आपल्या सार्वजनिक जीवनाची पंचवीस वर्षे त्यांनी या विश्वासाची जोपासना करीत घालविली. या विश्वासाला पहिला धक्का १९१९ साली रौलट बिलाच्या रूपानें बसला आणि जालियनवाला बागेत डायरने केलेल्या कत्तलीवर साम्राज्य सरकारने केलेली रंगसफेती व खिलाफतीबाबत भारतीय मुसलमानांचा केलेला विश्वासघात यामुळे सरकार-वरील सच्चेपणाच्या विश्वसनीयतेलाच मोठा धक्का बसला. असे असलें तरी व्यक्तिश: कोणा ब्रिटिश अधिकाऱ्याबद्दल अथवा इंग्रज माणसाबद्दल त्यांची असत् भावना नव्हती. परंतु सरकाराबद्दल अप्रीती असणे हा ते एक सद्गुणच मानीत

असत. अखेरीस आपल्या निवेदनात त्यांचा खटला चालविणाऱ्या न्यायाधीशाला उद्देशून त्यांनी म्हटले, "आपल्याला एकतर आपल्या जागचा राजीनामा देऊन प्रचलित राज्यपद्धतीपासून बाजूला सरून ज्या कायद्याचा अंमल करण्याचें काम आपल्या शिरावर आले आहे त्यापासून फारकत घेणे व मी निरपराधी आहे असे दाखविणे असे तरी करावे लागेल अथवा प्रचलित राज्यपद्धती व तिचा कायदा लोकांच्या कल्याणाचाच आहे असे वाटत असेल तर मला शक्य तेवढी जास्त कडक शिक्षा देणे आपल्याला भाग आहे आणि माझे उद्योग सार्वजनिक कल्याणाचा घात करणारे आहेत असे ठरवावे लागेल."

श्री. आर. एस. ब्रूमफील्ड या न्यायाधीशांपुढे गांधींवरील हा राजद्रोहाचा खटला चालविण्यात आला. बॅरिस्टर स्ट्रँगमन यांनी सरकारतर्फे ॲडव्होकेट-जनरल म्हणून काम चालविले. गांधीजी आणि यंग इंडियाचे प्रकाशक या दोघांनीही आपल्यावर ठेविलेले आरोप मान्य केले. गांधींनी फक्त वर उल्लिखिलेले निवेदन कोर्टाला सादर केले. न्यायाधीशांनी दिलेला निकाल असा : "श्री. गांधी, आपण अपराधी असल्याचें कबूल करून, एका अर्थी माझे काम सोपे केले आहे. तथापि त्या अपराधाबद्दल काय शिक्षा देणें योग्य होईल याचा निर्णय करणे तेवढे सोपे नाही. कायदा कोणाचेही व्यक्तिमाहात्म्य जाणत नाही. तथापि हे मान्य करणे भाग आहे की ज्यांचे खटले आजपर्यंत चालविले अथवा पुढे चालविण्याचा संभव आहे त्यांच्यापेक्षा तुमची गोष्ट अगदी निराळी आहे. तुम्ही एक महान् देशभक्त व थोर नेते आहां, असे तुमचे लक्षावधी देशबांधव मानतात या सत्यस्थितीकडे दुर्लक्ष करणें अशक्य आहे. राजकारणात तुमच्यापेक्षा निराळी मतें असणारे लोकही हे जाणतात की तुम्ही एक उच्च ध्येय बाळगिणारे थोर, इतकेंच नाही तर साधुतुल्य जीवन जगणारे सत्पुरुष आहां. मला तुमचा विचार फक्त एकाच दृष्टिकोणातून करायचा आहे. कायद्याचा अंमल ज्यावर चालतो अशी एक व्यक्ती म्हणून तुमचा विचार मला करणें आहे. तो कायदा तुम्ही मोडला आहे असे कबूल केलें आहे आणि सामान्य माणूस ज्याला राज्याविरुद्धचा गुन्हा असे मानतो तो तुम्ही केला आहे. मला हे विसरता येत नाही की अत्याचाराविरुद्ध तुम्ही नेहमी प्रचार केला आहे व अत्याचार टाळण्याचे प्रयत्न केले आहेत. तुमच्या राजकीय शिकवणुकीचे स्वरूप आणि ज्या लोकांमध्ये तुम्ही हा प्रचार केला त्याचे स्वरूप लक्षात घेता तुमच्या प्रचाराचा परिणाम हिंसाचारात होणार नाही हे तुम्हाला कसे कळले नाही हे समजण्याची माझी अपात्रता मात्र मी मान्य करतो.

"तुम्हाला मोकळे सोडणें कोणत्याही सरकाराला शक्य नाही अशी स्थिती तुम्ही उत्पन्न करावी याबद्दल मनापासून खेद न वाटणारे थोडेच लोक असतील.

अशा वेळी तुम्हाला शिक्षा सुनावताना तुमच्या प्रकरणाशी बरेच साम्य असणारे एक प्रकरण मला आठवते. तें प्रकरण म्हणजे बाळ गंगाधर टिळक यांचे. त्यांना दिलेली सजा अखेरीस सहा वर्षांची साधी कैद अशी ठरली, त्यांचा व तुमचा वर्ग एकच आहे असे म्हटले तर तुम्ही ते गैर मानणार नाही असे मला वाटते. तेवढीच शिक्षा मी तुम्हांला देतो. हिंदुस्तानातील परिस्थिती अशा प्रकारे नंतर बदलेल की तीमुळे ही मुदत संपण्यापूर्वीच तुमची मुक्तता करणे सरकारास शक्य होईल व असे झाले तर माझ्याइतका संतोष दुसऱ्या कोणालाच होणार नाही."

ही शिक्षा सुनावल्यावर न्यायाधीशांच्या परवानगीन गांधींनी दोन शब्द त्यांना उद्देशून उच्चारले. ते म्हणाले, "टिळकांच्या खटल्याचा उल्लेख करून आपण माझा बहुमान केला आहे. त्यांच्याबरोबर माझे नाव गुंफीले जाचे हे मी माझे महदभाग्य समजतो. शिक्षेबद्दल व मला मिळालेल्या वागणुकीबद्दल तर माझी काहीच तक्रार नाही."

तारीख ५ फेब्रुवारी १९२४ रोजी गांधींची बिनशर्त सुटका करण्यात आली. सुटून आल्यावर त्यांनी पाहिले की १९२०-२१ सालात लोक जेवढे आपला संदेश पाळण्याला व आपले म्हणणें समजून घेऊन त्याप्रमाणे वागण्याला तयार होते तेवढे देखील आता तयार नव्हते. महंमदअलींना ७ फेब्रुवारी रोजी लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, "देशातील एकंदर परिस्थितीबद्दल मला जरी फारच थोडे माहीत आहे तरी मला इतके चांगले समजून आले आहे की बारडोलीचे ठराव झाले त्यावेळेपेक्षा एकंदर परिस्थिती व प्रश्न फारच काळजी उत्पन्न करणारे व वाढविणारे झाले आहेत." वारंवार होत असलेल्या जातीय दंग्यांमुळे असहकारितेच्या दिवसात जे हिंदुमुसलमानांचे ऐक्य दिसून आले तें नाहीसे होण्याच्या पंथाला लागलेले आहे. आणि काँग्रेसजनांना कौन्सिल प्रवेशाची मुभा जेव्हा देण्यात आली तेव्हा असहकारितेचे तत्त्वच समूळ उखडून टाकल्यासारखे झाले. मोतीलाल नेहरू व चित्तरंजन दास यांनी काँग्रेसमध्येच स्वराज्य पक्ष नावाचा एक नवा राजकीय पक्ष स्थापन केला आणि ज्यांना नाफरवादी असे म्हणत त्यांनी त्यांना कसून विरोध केला. गांधीजी येरवडा तुरुंगात असतानाच काँग्रेसने सिव्हिल डिसओबिडियन्स इन्क्वायरी कमिटी नेमली. म्हणजे सामुदायिक सविनय कायदेभंग केव्हा सुरू करावा व त्याची तयारी कशी करावी हा खरोखर त्या कमिटीचा विषय. हकीम अजमलखाँ, मोतीलाल नेहरू, विठ्ठलभाई पटेल, सी. राजगोपालाचारी, कस्तुरीरंगा अयंगार व डॉ. अन्सारी असे या कमिटीचे सभासद होते. गांधीप्रमाणेच दासबाबू यावेळी तुरुंगातच होते. या कमिटीने देशभर दौरा करून अनेक काँग्रेसवाल्यांच्या

साक्षी घेतल्या. त्यामध्ये पुण्यास न. चिं. केळकर यांची साक्ष फार गाजली. आणि प्रायः त्यांच्या साक्षीला अनुसरूनच अजमलखाँ-नेहरू-पटेल यांनी आपले निर्णय अहवालात नमूद केले. अन्सारी-अयंगार-राजगोपालाचारी यांनी मात्र काँग्रेसच्या असहकारितेच्या कार्यक्रमात काही बदल करू नयेत, गांधींच्या मुक्ततेची वाट पाहूनच काँग्रेसकार्याचे धोरण त्यांच्या सुटकेनंतर त्यांच्या सल्ल्याने ठरवावे असा आपला अहवाल लिहिला. म्हणजे ही कमिटी बरोबर दुभंगली. देशबंधु दास सुटून आल्यावर गया येथे झालेल्या १९२३ सालच्या काँग्रसमध्ये स्वराज्य पक्षाची स्थापना दास-नेहरू यांनी केली व असहकारिता थेट कौन्सिलातच आचरणात आणून अडवणुकीचे धोरण अंमलात आणावे असे ठरविले. या गयेच्या काँग्रेस अधिवेशनातच राजगोपालाचारी यांचा ब्रिटिश सरकारने काढलेली सगळी कर्जे आमच्यावर बंधनकारक नाहीत, अशा अर्थाचा ठराव पास झाला. असहकारितेच्या कर्यक्रमात ही नवीन भर होती. नवी कर्जे काढली तरी त्यात पैसे भरू नयेत हे काँग्रेसजनांवर बंधनकारक होते.

गांधींची मुक्तता झाल्यावर स्वराज्यपक्षाच्या नव्या उपक्रमाबद्दल आपले मत गांधींनी घाईघाईने प्रकट केले नाही, पण जेव्हा कालांतराने ते प्रकट केले तेव्हा त्या पक्षाच्या कार्यक्रमाबद्दल त्यांनी स्पष्ट नापसंती व्यक्त केली. त्यांनी असे स्पष्ट म्हटले की, स्वराज्याकडे होणारी देशाची वाटचाल स्वराज्य पक्षाच्या कार्यक्रमाने खूप मागे खेचली आहे आणि कायदेमंडळातील अडवणुकीचा व्यवहार म्हणजे अत्याचाराचा व हिंसेचा उग्र वास त्याला येतो. पण कौन्सिल-प्रवेश व तेथील कामकाज याची मोहिनी पुढाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात पडली असल्याने ती एक अपरिहार्य अशी वाईट गोष्ट आहे असे मान्य करून स्वराज्य-पक्षीयांशी सहकार्य करून काँग्रेसमधील या दोन छावण्यांची तोंडमिळवणी करावी, असा निर्णय त्यांनी मोठ्या नाखुषीने केला. 'पार्लमटरी मॅटॅलिटी हॅज कम टु स्टे' असे त्यांनी मान्य केले.

'यंग इंडिया' व 'नवजीवन' ही पत्रे पुनः संपादक या नात्याने त्यांनी आपल्या हाती घेतली. त्यांना शिक्षा झाल्यावर एकदोन महिने श्वाइब कुरेशी यांनी व पुढे राजगोपालाचारी यांनी 'यंग इंडिया'चे काम पाहिले. ३ एप्रिल १९२४ रोजी 'यंग इंडिया'च्या आजी व माजी वाचकांसाठी या मथळ्याखाली लिहिलेल्या लेखात ते म्हणतात : "माझ्याजवळ कोणताही नवा कार्यक्रम नाही. मी हिंदुस्तानच्या स्वातंत्र्यासाठीच जगतो आणि त्यासाठीच मरेन. कारण तो सत्याचा भाग आहे. केवळ स्वतंत्र हिंदुस्तानच खऱ्या ईश्वराचा पूजक होऊ शकेल. परंतु माझा देशाभिमान हा एकारलेला नाही. त्याचा उपद्रव दुसऱ्या कोणत्याही देशाला तर होणार नाहीच, पण तो सर्वांच्या हिताचाच असेल."

दुसऱ्या एका लेखात त्यांनी याहून ठासून असे म्हटले की, माझी राष्ट्रसेवा म्हणजे माझ्या आत्म्याच्या मोक्षासाठी होणारे प्रशिक्षण आहे. असा विचार केला तर माझी राष्ट्रसेवा स्वार्थी आहे असे म्हटले तरी चालेल. मला विनाश होणाऱ्या पृथ्वीच्या राज्याची इच्छा नाही. मला स्वर्गाचे राज्य म्हणजे मोक्ष पाहिजे आहे. सनातन स्वातंत्र्य व शांती यांच्या प्रदेशाकडे चालणाऱ्या माझ्या प्रगतीतील माझा देशाभिमान म्हणजे एक टप्पा आहे. यावरून हे समजेल की माझे राजकारण धर्मापासून लांब असलेले असे असणार नाही. धर्माला उपकारक असे माझे राजकारण आहे. धर्मरहित राजकारण म्हणजे मृत्यूचा सापळा आहे. कारण त्यामुळे आत्मा मरतो.

धर्म याचा त्यांचा अर्थ हिंदुधर्म असा नव्हता. हिंदुधर्मापलीकडील शाश्वत सत्य हा होता. सर्व धर्मांच्या पायाभूत असलेले सत्य हा त्यांचा धर्म होता.

येरवड्याच्या तुरुंगात असता त्यांचा पत्रव्यवहार आणि आप्तेष्टांच्या भेटी हा कार्यक्रम जेलच्या नियमांप्रमाणे चालूच होता. येरवड्याला पोचताच काँग्रेसचे अध्यक्ष हकीम अजमलखाँ यांना लिहिलेले पत्र सरकारने अडवून ठेवल्यामुळे त्यांना पोचलेच नाही. त्याबद्दल सरकारचे सेक्रेटरी व गव्हर्नर यांच्याशी त्यांचा पत्रव्यवहार झाला. यांत मधूनमधून खटके उडत. पण गर-समज प्रामाणिक असत, ते उभयपक्षी दूर होत आणि एकंदरीत कारावास हा गांधींना अवश्य ती विश्रांती मिळून सुखावहच झाला. धार्मिक ग्रंथांचे वाचन, कुराणाचा अभ्यास, आत्मकथालेखन, उर्दूचे अध्ययन आणि मुख्य म्हणजे, चरखा चालविणे व कापूस पिंजायला शिकणे या गोष्टी गांधीजींना करायला मिळाल्या आणि यामुळे ते आनंदात होते. श्रीनिवास शास्त्री यांचेबरोबर देखील एक मुलाखत झाली. अॅपेंडिसायटीसची शस्त्रक्रिया होऊन त्यांची प्रकृतीच्या कारणास्तव बिनशर्त सुटका सरकारने केली, तेव्हा त्यावेळी काँग्रेसचे अध्यक्ष असलेले महंमदअली यांना लिहिलेल्या पत्रात गांधीजी म्हणतात, "या सुटकेने माझा काहीच दुःखपरिहार झालेला नाही. तुरुंगात असताना मजवर कसली जबाबदारी नव्हती. परंतु मुक्तता होताच जबाबदारीचे ओझे जाणवू लागले. कौन्सिले-कोर्टे-कॉलेजे यांजवरील बहिष्काराबद्दल माझ्या मनात काहीच बदल झालेला नाही. पण या बाबतीत दिल्लीस केलेल्या फरबदलांबद्दल मला आताच काही मत प्रकट करावयाचे नाही. ज्यांना हे बदल करणे योग्य वाटले त्यांजबरोबर मला चर्चा केली पाहिजे."

कारागृहाच्या सर्व अधिकाऱ्यांनी आपल्याला आदराने, प्रेमाने व अगत्याने वागविल्याबद्दल, ज्या वॉर्डरांशीं व इतरांशीं संबंध आला त्यांच्याबद्दल गांधी मोठ्या कृतज्ञतेने व संतोषाच्या भावनेने सदोदित बोलत असत.

स्वराज्य पक्षाचे पुढारी मोतीलाल नेहरू व गांधीजी या दोघांमध्ये कौन्सिलप्रवेश, कोर्टे-कॉलेजे यांवरील बहिष्कार या बाबतीत उच्च पातळीवर पुष्कळ लेखी चर्चा झाली. अहिंसा व असहकारिता यांच्या अर्थाच्या व्याप्ती-बद्दल पुष्कळ ओढाताण झाली. देशबंधु दास आजारी असल्यामुळे या चर्चेत नव्हते. गांधी त्यावेळी जुहू येथे विश्रांती घेऊन प्रकृती सुधारण्याची वाट पाहात होते. पण दास हे बरे झाल्यावरही जे अखेरीस ठरले ते एवढेच की स्वराज्यपक्षीयांनी कॉंग्रेसमध्ये राहूनच व कॉंग्रेसची कौन्सिल कार्यशाखा म्हणून काम करावे व विधायक कार्यक्रमाचे काम जे नाफेरवादी होते त्यांनी करीत राहावे. म्हणजेच चरखा-खादीप्रसार, जातीय ऐक्य, मद्यपानबंदी व अस्पृश्यतेचे उच्चाटन या कार्यावर नाफेरवाद्यांनी आपले लक्ष केंद्रित करावे व स्वराज्यपक्षीयांनी देखील त्यांजबरोबर होईल तितके सहकार्य करावे. गांधींची या व्यवस्थेमागची भावना अशी दिसते की, स्वराज्यवाद्यांना लवकरच समजून येईल की कौन्सिलात काम करण्याचा व्यावहारिक उपयोग फारसा काही होत नाही आणि म्हणून ते अखेरीस आपला निष्फळ होत असलेला शक्तिक्षय थांबविण्याकरिता आणि असहकारितेचा सुधारलेला कार्यक्रम अंमलात आणण्याकरिता त्यांची व नाफेरवादी लोकांची पुन: एकजूट होईल. अखेर तसे झालेच. पण मध्यंतरी स्वराज्यपक्षीयांनी ६ वर्षे कायदेमंडळात काम करून पाहिले. लोकजागृतीच्या कामाला त्यामुळे मदत झालीच. कारण खऱ्या सत्तेच्याअभावी आपले उत्तम प्रतिनिधी कायदेमंडळात पाठविले तरी त्यांचा प्रभाव पडत नाही याचा वस्तु-पाठच होऊन गेला.

येरवड्याच्या तुरुंगात असतानाच गांधींचे अॅपेंडिसायटीचे ऑपरेशन कर्नल मॅडॉक यांनी केले. ते लांबणीवर टाकण्यासारखे नव्हते असे निष्णात डॉक्टरांनी ठरविले आणि गांधींना सांगितले की आपल्या विश्वासाच्या व स्नेहाच्या कोणा डॉक्टरांना त्यावेळी हजर राहाण्यासाठी बोलवायचे असेल तर बोलवावे. गांधींनी कर्नल मॅडॉक यांना डॉ. जीवराज मेहता आणि डॉ. दलाल यांची नावे सुचविली होती. पण दोघांपैकीं कोणाशी कर्नल मॅडॉक संपर्क साधू शकले नाहीत. तेव्हा गांधीजींनी कर्नल मॅडॉक यांना कळविले की आपल्यावर माझा पूर्ण विश्वास आहे आणि आपणास जे काही व जेव्हा करायचे असेल ते करावे.

आपल्या कारावासातील अनुभवांबद्दल गांधींनी जे लेख यानंतर व सुटकेनंतर लिहिले त्यांमध्ये सर्व संबंधित भिषग्वर्यांसंबंधी गौरवाचे व कृतज्ञतेचे उद्गार काढले आहेत. जुहूला राहायला गेल्यानंतर मिसेस मॅडॉक यांना गांधींनी लिहिलेले पत्र मोठे हृद्य आहे. कर्नल मॅडॉक यांची तसबीर त्यांना पाठविली

होती. त्या देणगीविषयी त्यांनी अंतःकरणापासून आभार मानले आहेत व दोघांनाही म्हटलें आहे की इंग्लंडला कायमचे राहायला गेल्यावर माझी आठवण होईल तेव्हा मला दोन ओळी लिहीत जा. कर्नल मॅडॉक, कर्नल मरे आणि मेजर जोन्स यांच्या स्नेहाळ व प्रेमळ वागणुकीबद्दल त्यांचे आभार त्यांनी मनापासून मानले आहेत. हे लोक व गांधीजी यांमधील संबंध स्नेहाचे झाले. यांमध्ये सरकारचे आभार मानण्यासारखें काही नाही. आपल्या ताब्यात असलेल्या कैद्यांबद्दल जशा कर्तव्यबुद्धीने वागलेच पाहिजे, तसेंच मुंबई सरकार वागले, म्हणजे त्याने फक्त आपले कर्तव्य बजावले आणि मी देखील कैदी या नात्यानें जसे कायदा व हुकूम पाळून वागले पाहिजे तसा वागलो, असे गांधींनी एका पत्र-लेखकाला लिहून कळविले. सरकाराबद्दल कृतज्ञता व आभार तुम्ही का प्रकट करीत नाही, असे त्यांना विचारण्यात आले होते. येरवडा कारागृहातील आपल्या अनुभवांवर आधारलेली एक लेखमाला गांधींनी मुक्तता झाल्यावर लिहिली. तीमध्यें तुरुंगांची सुधारणा व कैद्यांची नैतिक सुधारणा कशा व्यवस्थेने होईल याची चर्चा त्यांनी केली आहें.

जुहूला राहत असता पुण्याचे हरिभाऊ फाटक यांना लिहिलेल्या पत्रात लोकमान्यांची एक आठवण गांधींनी पाठविली. गांधीजी म्हणतात, "टिळकांची व माझी भेट अनेक वेळा झाली आहे. प्रथम मी त्यांना व इतर पुणेकर पुढाऱ्यांना १८९६ साली भेटलो. त्यांची व माझी शेवटची भेट सरदारगृहात त्यांच्या मृत्यूपूर्वी झाली. मौलाना शौकतअली तेव्हा माझ्याबरोबर होते. त्यांना भेटल्यानंतर आम्ही दोघे उत्तर हिंदुस्तानाच्या दौऱ्यावर गेलो. आम्ही परत आलो तेव्हा लोकमान्यांची प्रकृती फारच बिघडली आहे असे आम्हाला समजले. मी त्यांच्या दर्शनासाठी गेलो, पण तेवढेच झाले. आमचे काही बोलणे होऊ शकले नाही. त्यांची अखेरची आठवण तेवढी सांगतो. हिंदुमुसलमान प्रश्नाबद्दल शौकतअलींकडे पाहून ते म्हणाले, 'गांधी सुचवितील त्यावर मी डोळे मिटून सही करीन. माझा या प्रश्नाच्या बाबतीत त्यांचेवर पूर्ण विश्वास आहे. असह-कारितेबाबत ते पूर्वी माझ्यापाशी बोलले होते. तेच पुनः म्हणाले, " मला कार्यक्रम पसंत आहे. पण असहकारितेचा कार्यक्रम म्हणजे स्वतःला अनेक गोष्टी नाकार-ण्याचा करडा हुकूम आहे आणि देशाची त्याकरिता कितपत तयारी आहे याबद्दल मला शंका आहे. या आंदोलनाची प्रगती खंडित होईल असे काही देखील मी करणार नाही. तुम्हांला मी पूर्ण यश चिंतितो आणि लोकांनी जर तुमचें म्हणणे उचलून धरले तर माझ्याकडून तुम्हांला उत्साहपूर्ण पाठिंबाच मिळेल. "

मुळशी सत्याग्रहाबद्दलचे कागदपत्र वाचल्यावर श्री. वि. वि. दास्ताने यांना लिहिलेल्या ५ एप्रिल १९२४ च्या पत्रात गांधीजी म्हणतात, "मुळशी

सत्याग्रहाबद्दल तुम्ही पाठविलेलें सर्व वाङ्मय चाळून पाहिले. त्यानंतर मला असे वाटते की दोन अथवा तीन कारणांस्तव हें आंदोलन बंद केले पाहिजे : (१) ज्या जमीनमालकांचा धरणासाठी त्यांची जमीन घेतल्याचा संबंध आहे त्यापैकी बहुतेकांनी नुकसानभरपाईचा स्वीकार केलेला आहे. ज्या थोड्यांनी ती घेतली नाही, त्यांचा थांगपत्ता लागत नाही. (२) धरण अर्धेमुर्धे बांधून झालेंच आहे आणि तें कायमचें पुरें होणे थांबविता येणार नाही. या आंदोलनामागे काही निश्चित उद्दिष्ट दिसत नाही. (३) या चळवळीच्या नेत्यांचा अहिंसेवर पुरेपूर विश्वास नाही. हा दोष यश मिळविण्यात मोठाच अडथळा ठरेल."

ही चळवळ गांधीजींच्या अनत्याचारी असहकारितेच्या तत्त्वांना धरून नव्हती यात काही विशेष नाही. पण तीनही बहिष्कारांना तिलांजली देऊन आणि विशेषतः कायदेमंडळातील कामकाज हे असहकारतेचाच एक प्रकार आहे असे प्रतिपादन करून गांधीजींची एका प्रकारे फसवणूकच स्वराज्य पक्षीयांनी केली होती. तरीही स्वदेशी म्हणजे पूर्णपणे वस्त्र-स्वावलंबनावर तसेच सर्व जातींचें ऐक्य आणि सर्व हिंदूंनी अस्पृश्यतेचा नायनाट करण्याचे व्रत घेणे या बाबी विधायक कार्यक्रम म्हणून, असहकारितेचा एक भाग म्हणून शिल्लक होत्या व त्या बाबतीत काही मतभेद नाफेरवादी व फेरवादी यांच्यामध्ये नव्हता. सर्व देशाची सर्व बाबतीत पुनः एकजूट घडवून आणण्याला हा आधार असल्यामुळे गांधींनी पुनः उमेदीने आपले काम चालू ठेवण्याचे ठरविले. परंतु नाफेर-वादी अनुयायांची समजूत घालून स्वराज्यवादी मित्रांना आपल्या मार्गाने जाऊ देण्यास मोकळे सोडण्याला सांगणे गांधीजींना तेवढे सोपे गेले नाही. राजगोपालाचारी यांना लिहिलेल्या एका पत्रात १५ सप्टेंबर १९२४ रोजी गांधी म्हणतात, "I know how difficult it must be for you and others suddenly to accommocate yourselves to these sudden changes. But, how shall I help myself? 'I know I am putting an undue strain upon the loyalty and the faith of co-workers. But is it not better that I should do that rather than that I should suppress the clear voice within ? Of what use should I be if I once stifled that monitor ? We must stoop to conquer, Retaining every bit of non-cooperation in our own persons, we must make the path of those who do not believe in it smooth for serving us and helping the country in the constructive effort. Is it not easy anough to see that service requires no power, no office, no prestige ? I would like every one of us to be a mere servant of the nation. I would like the no-changers so to be-have as to be wanted by the Swarajists, Liberals and all others. Let this be as balm to your lacerated heart,......Bardoli

was the boldest experiment in non-violence in one direction. The agreement is the boldest experiment in non-voilence in another direction."

पुण्यास ४ सप्टेंबर १९२४ रोजी जाहीर भाषण करताना गांधी म्हणाले, " I am beaten. If Motilalji and Shri Kelkar ask me to leave the Congress, I have vowed that I would do so. Our pro-changers and no-changers are misleading the common people by asking for their votes. I now feel that I committed a crime by seeking a vote at the Ahmedabad Congress. It was madness on my part to seek a vote. If the dispute with Motilalji or Kelkar gives rise to bitterness, 'I would prefer to bow before them and touch their feet. I would rather drown myself in the waters of the Sabarmati than harbour hate or animosity in my heart. "

बेळगावास झालेल्या कॉंग्रेसच्या १९२४ डिसेंबरअखेरच्या बैठकीच्या वेळी गांधींनी स्वराज्यवादी व नाफेरवादी यांना उद्देशून केलेल्या भाषणामध्ये दोघांनाही एकमेकांबद्दल आदर व प्रेम ठेवून काम करण्याला आवाहन केले. फेरवाले आणि नाफेरवाले यांच्यामधील समेट मनापासून झाला याचे प्रत्यंतर कॉंग्रेसची कार्यकारिणी ठरविण्यात दिसून आले. गांधीजी, मोतीलालजी व देशबंधु यांजकडे सर्व नावे ठरविण्याचे काम आले. सरोजिनी नायडू, सरदार मंगलसिंग, केळकर, व अणे यांस वर्किंग कमिटीत घेण्यात आले.

या काळातच काही अमेरिकन मित्रांनी गांधीजींना बोल्शेविकांचे दोस्त असें म्हटले. गांधींनी आपणाला बोल्शेविजम् म्हणजे काय ते समजत नाही असे म्हटले आणि निरीश्वरवादी असणे हे जर बोल्शेविजमचे प्रमुख लक्षण असेल तर बोल्शेविकांचे व आपले मुळीच जमण्यासारखे नाही असे सांगितले. इस्लाम निरीश्वरवादी नाही, पूर्ण एकेश्वरवादी आहे व म्हणून हिन्दुधर्म व इस्लाम यांत द्वैत असण्याचे कारण नाही असे प्रतिपादन केले. एम. एन. रॉय यांचा एक फार चांगला लेख या निमित्ताने त्यांनी यंग इंडियात प्रसिद्ध केला व त्यामुळे समाजवादाची मूलतत्त्वे, त्यांच्या पायावर लेनिनने केलेली रशियातील ऑक्टोबर १९१७ ची क्रान्ती यावर रॉय यांनी केलेले विवेचन 'यंग इंडिया' च्या वाचकांना वाचावयास मिळाले. या निमित्ताने डॉ. प्रफुल्लचंद्र रॉय व त्यांचा चरखा व खादी यांना असलेला संपूर्ण पाठिंबा याबद्दल लिहिण्याची संधी गांधीजींना मिळाली. चरख्यावर काम करणे म्हणजे शक्तीचा अपव्यय आहे असे या देशातील बहुसंख्य शेतकरीवर्गाची आर्थिक परिस्थिती लक्षात न घेता एम्. एन्. रॉय यांनी केलेले विधान गांधीजींनी खोडून काढले. सूतकताईचे फायदे गांधींनी पुनरुक्तीचे भय न बाळगता पुनः एकदा रॉय यांना

व त्यांच्या निमित्ताने सर्व भारतीय जनतेला पुढीलप्रमाणें सांगितले. 'यंग इंडिया -' मध्ये ८ ऑगस्ट १९२४ रोजी हा लेख प्रसिद्ध झाला आहे.

(१) ज्यांना पैसा-दोन पैसे मिळविण्याची आवश्यकता आहे व ज्यांचेपाशी फुरसदीचा वेळ आहे त्यांना सूतकताईसारखे दुसरे साधन हाताशी मिळणार नाही.

(२) हजारो लोकांना हे माहीत झाले आहे.

(३) सूतकताईचें काम सहज व लवकर शिकता येतें.

(४) याला फार मोठी भांडवली गुंतवणूक करावी लागत नाही.

(५) चरखा सहज व स्वस्तात करता येतो. पुष्कळांना ठाऊक नाही की कौलाचा एक तुकडा घेऊन चाती बनवून सूत काढता येते.

(६) लोकांमध्ये याबद्दल नावड अशी मुळीच नाही.

(७) दुष्काळाच्या व टंचाईच्या काळात यामुळे थोडा तरी दुःखपरिहार होतो.

(८) विदेशी कापड घेण्यामुळे जो पैसा परदेशी जातो तो थांबविण्याचा सूतकताई हा एकमेव मार्ग आहे.

(९) लायक गरीब लोकांमध्ये आपोआप हा पैसा वाटला जातो.

(१०) थोडेसे यश जरी मिळाले तरी लोकांचा फायदा होतो.

(११) लोकांमध्ये परस्पर सहकार्य वाढविण्याचे हे एक मोठेच साधन आहे.

डॉ. प्रफुल्लचंद्र रॉय यांना पूर्वी हजारो गरीब स्त्रियांना केवळ भिक्षा म्हणून बरीच रक्कम वाटावी लागे, त्यांना सूतकताई करायला प्रवृत्त करून स्वावलंबी बनविण्याचे कार्य त्यांनी केलें. कित्येकांना पूर्णपणे व कित्येकांना अंशतः स्वावलंबी व स्वाभिमानी बनविले, यात शक्तीचा अपव्यय कोठे येतो, असा सवाल गांधींनी एम. एन. रॉय यांना अखेरीस केला आणि म्हटले की, सूतकताई हा एकमेव असा उद्योग आहे की ज्यात होतो तो सगळा फायदाच, मग तो कितीही थोडा असो, पण तोटा मुळीच नाही. डॉ. प्रफुल्लचंद्र रॉय, सर प्रभाशंकर पट्टणी, घनःश्यामदास बिर्ला, म्हैसूरचे महाराज अशासारख्यांनी स्वतः सूतकताई करण्याचें ठरवून चरखा चालविण्याचे व खादी वापरण्याचे व्रत स्वीकारल्याबद्दल गांधींना समाधान वाटले आहे व अशा मोठ्या माणसांचे अनुकरण करण्याची प्रेरणा पुष्कळ सामान्यजनांना मिळते, हा अनुभव त्यांनी कृतज्ञतापूर्वक नमूद केला रवींद्रनाथ टागोरांचे थोरले बंधु अवनींद्रनाथ टागोर यांचा उल्लेखही त्यांनी या संदर्भात केला आहे.

सन १९२४ व १९२५ या दोन वर्षांत गांधीजी सर्व देशभर फिरत राहिले. सरहद्द प्रांत, गुजरात, केरळ, तमीळनाडू व आंध्रप्रदेश या सर्व देशाच्या

भागात सूतकताई, जातीय ऐक्य, अस्पृश्यतेचे उच्चाटन याबद्दल ते अविरतपणे बोलत राहिले, प्रश्नांना उत्तरे दिली, आक्षेप खोडीत राहिले. जातिभेद, मिश्रविवाह, रोटीव्यवहार व बेटीव्यवहारावर असलेली नियंत्रणें व निर्बंध हे सर्व विषय चर्चेमध्ये येत राहिले. एकदा गांधीजी म्हणाले, "अस्पृश्यता आणि वर्णव्यवस्था अथवा जातिभेद यांमध्ये मी स्पष्ट भेद करतो. अस्पृश्यतेला काही शास्त्रीय आधारच नाही. परंतु जातिभेदव्यवस्थेला माझ्या मताने शास्त्रीय आधार आहे. जन्माधिष्ठित कर्तव्ये बजावण्याची कल्याणप्रद अशी विभागणी असलेली ती समाजव्यवस्था आहे."

रोटीव्यवहार आणि बेटीव्यहारावरील निर्बंध उठविणे ही देखील त्यांच्या मतान आवश्यक अशी सुधारणा नव्हती. "स्वयंस्फूर्तीने बसविलेल्या या निर्बंधांना आरोग्यविषयक व आध्यात्मिक मूल्य आहे," असे त्यांचे मत होते. परंपरागत ब्राह्मण संस्कृतीमध्ये असलेले अनेक नियम व संयम यांमध्ये आत्मसंयमनाचे थोर तत्त्व ग्रंथित झाले होते. "ब्राह्मण्याचा नष्टांश करून अब्राह्मणांनी वर चढणे मला योग्य वाटत नाही. उलट, त्यांचे गुण आपल्या ठिकाणी आणून ब्राह्मण्य संपादन करावे हे श्रेयस्कर आहे," असे त्यांनी या संदर्भात लिहिले.

एका क्रांतिकारकाला उद्देशून लिहिलेल्या तीन लेखांत गांधींनी आपल्या जीवनाचे तत्त्वज्ञान स्पष्ट शब्दांत आणि शांतपणे सांगितले. त्याचाच ते प्रचार करीत होते व आचार करण्याचा कसोशीने प्रयत्न करीत होते. "एखाद्या सैतानी व्यक्तीविरुद्ध अथवा पद्धतीविरुद्ध सशस्त्र कट-कारस्थाने करणे म्हणजे एका सैतानाविरुद्ध दुसरा सैतान उभा करण्यासारखे आहे. पण एक सैतानच नाहीसा करणे मला कठीण वाटतें, तर अनेक सैतानांच्या भानगडीत मी कशाला पडू? मी काही खटपट माझ्या पद्धतीने करीत आहे, का स्वस्थ बसून आहे हे कालांतरान ठरेल. तथापि सध्या जेथे पूर्वी एक वार सूत कातले जात होतें तेथे जर दोन वार सूत निघत असेल तर माझे काम सफल होत आहे असे मी समजेन. भकडपणा कोणत्याही स्वरूपात मला तिरस्करणीय वाटतो.

गोरक्षण या विषयावर लिहिताना त्यांची परंपरागत हिंदुधर्मविषयक भावना विधायकपणें प्रकट झाली आहे. आपल्या हिंदुबांधवांना त्यांनी आदर्श दुग्धालये काढून ती चालविण्याचा व्यावहारिक व विधायक उपदेश केला. त्यामध्ये म्हाताऱ्या व लंगडयापांगळ्या गायींचाही सांभाळ करण्याची व्यवस्था करण्यास सांगितले. केवळ गोहत्या होऊ नये म्हणून मुसलमान व ख्रिस्त्यांशीं भांडत बसण्यात काही अर्थ नाही असे त्यांनी प्रतिपादन केले. अखिल भारतीय गोरक्षण संस्था स्थापून तिची घटनाही तयार करविली.

जवाहरलाल नेहरूंनी लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी आपली भावना बुद्धिवादी पद्धतीने निवेचिली आहे. "गाय ही सर्व सजीव प्राण्यांची प्रतिनिधी समजावी, गोरक्षण याचा अर्थ सर्व दुर्बळ, असहाय्य, मूक आणि बधिर प्राण्याचे रक्षण होय असे केले तरच मानवप्राणी त्या सर्व सजीव सृष्टीचा मालक नव्हे तर सेवक होतो. गाय म्हणजे माझ्या दृष्टीने दयेवरील एक प्रवचनच आहे."

गांधींच्या धार्मिक विचारात भावना व बुद्धी यांचा मधुर मिलाप झालेला दिसतो. काँग्रेसच्या वेगवेगळ्या प्रतिज्ञांमध्ये ईश्वराचा उल्लेख असू नय असे एका काँग्रेसजनाने म्हटले तेव्हा गांधी म्हणाले, "ईश्वर म्हणजे माझ्या दृष्टीने सत्य व प्रेम आहे, ईश्वर म्हणजे नीतिशास्त्र व नीतीच आहे. ईश्वर म्हणजे निर्भयता आहे, सदसद्विवेकबुद्धी आहे. इतकेच काय, निरीश्वरवाद्यांचा निरीश्वरवादच तो आहे." कन्याकुमारीचे दर्शन या आपल्या लेखात त्यांनी लिहिले, 'सागराच्या लाटांचे संगीत, मधुर व नाजुक होते, वीणेच्या निनादासारखे होते आणि त्यामुळे फक्त चिंतन करण्याकडच मनाची प्रवृत्ती होत होती. मी स्तब्ध राहिलो व गीता उपदेशिणाऱ्या त्या थोर शिक्षकाची मूर्ती माझ्यासमोर साकार झाली."

गांधींच्या मताने बुद्धाचा धर्म व जैनांचा धर्म हे सामान्यतः समजले जातात तसे निरीश्वरवादी नव्हेत. कारवारचे एस. डी. नाडकर्णी यांनी भर्तृहरीच्या नीतिशतकातील एक श्लोक उद्धृत करून त्यांना एक पत्र लिहिले, त्याच्या हुपारीने लिहिलेले पत्र असा निर्देश करून गांधी म्हणतात, मी नाडकर्णी यांस ईश्वराच्या काही व्याख्या सुचवितो : "कर्माची बेरीज म्हणजे ईश्वर, माणसाला बरोबर तेच करण्याला प्रेरणा देतो तो ईश्वर; सर्व सजीव सृष्टीची बेरीज म्हणजे ईश्वर; दैवाचे केवळ खेळणे मनुष्याला करतो तो ईश्वर. चार्लस ब्रॅडला याला त्याच्या सर्व कसोट्यांतून पार पाडण्याला सामर्थ्य दिले. तो म्हणजेच ईश्वर, निरीश्वरवादी ज्याला नाकारतो तोच ईश्वर."

मोठ्या उमेदीने आणि हिरीरीने स्थापन केलेल्या स्वराज्य पक्षाने नजरेत भरण्यासारख्या पुष्कळ गोष्टी केल्या. अनेक नगरपालिकांच्या निवडणुकांत बहुमताने निवडून येऊन स्वराज्यपक्षीय त्यांचे अध्यक्ष झाले. देशबंधु दास कलकत्त्याचे मेयर झाले, विठ्ठलभाई पटेल मुंबई कॉर्पोरेशनचे मेयर झाले. सुभाषचंद्र बोस आय. सी. एस. सोडून आधीच बाहेर पडले होते. पण त्यावेळच्या नियमांप्रमाणे कलकत्ता व मुंबई कॉर्पोरेशनचे चीफ ऑफिसर आय. सी. एस. असणे अवश्य असल्यामुळे देशबंधूंनी सुभाषचंद्रास कलकत्ता कॉर्पोरेशनचे चीफ ऑफिसर केले. पटणा म्युनिसिपालिटीचे राजेंद्रप्रसाद अध्यक्ष झाले. अलाहाबाद

म्युनिसिपालिटीचे जवाहरलाल नहरू अध्यक्ष झाले. पुणे म्युनिसिपालिटीचे सरकारी हुकूम तोडून टिळकांचा पुतळा रे मार्केटसमोर उभा केला. मुंबई व अहमदाबाद म्युनिसिपालिटयांनी महात्मा गांधींना मानपत्रे दिली. कराची मुंबई, कलकत्ता व पटणा नगरपालिकांच्या अध्यक्षांनी व्हाइसरॉयांच्या सन्मानार्थ झालेल्या समारंभात हजर राहाण्याला नकार दिला. सर्व हिंदुस्तानभर स्थानिक स्वराज्यसंस्था व सरकार यांमध्ये मोठाच संघर्ष माजला. पण या आणि कायदेमंडळांत मिळविलेल्या, लढायांतील यशान प्रत्यक्ष लाभ काही झाला नाही. देशात वैफल्यभावना पसरत होती आणि पुनः गांधींनी नेतृत्व व मार्ग-दर्शन करावे असे जनतेस वाट लागले.

अशा वेळी १९ जून १९२४ राजो 'यंग इंडिया' मध्य लिहिले की अखिल भारतीय कॉंग्रस कमिटीच्या बैठकीत चार ठराव आपल्याला मांडायचे आहेत. त्यातील पहिला सूतकताई सर्वांना बंधनकारक करावी, अशा अर्थाचा होता. दुसरे दोन, कॉंग्रेसच्या अधिकारीवर्गाच्या वागणुकीबाबत होते. चवथा गोपीनाथ साहा याने डे या एका इंग्रजाचा त्याला पोलीस कमिशनर समजून ठार केले याबद्दल होता. गांधींना माहीत होते की सर्व ठरावांवर मोठं रण माजेल. पण त्यांना अर्धवटपणा मोडून टाकून निश्चितपणा काग्रेसवाले म्हणविणाऱ्या लोकांत आणण्याची अतिशय निकड वाटत असल्यामुळे त्यांनी सोक्षमोक्ष करुन घेण्याचें ठरविले. अ. भा. कॉं. कमिटीची सभा १७ जून १९२४ रोजी अहमदाबाद येथे झाली. स्वराज्यपक्षीयांनी या ठरावांना वसून विरोध केला. चार आणे वर्गणी-एवजी स्वतः काढलेले सूत प्रत्यक कॉंग्रेस सभासदाने वर्गणी म्हणून द्यावे असे गांधींनी मांडले. घटनेप्रमाणे अ. भा. कॉं. कमिटीला हे ठरविता येत नव्हते. म्हणून मोतीलाल नेहरूंनी याला अतिक्रमण म्हटले व गांधींचे वागणे हुकमशाही आहे अशी टीका केली. नेहरू व दास यांच्या हरकती बहुमताने मानल्या नाहीत. त्यावर नेहरूंनी एक निवेदन वाचून दाखविले आणि दास, नेहरू व श्रीनिवास अयंगार सभेतून उठून गेले. त्यांच्यापाठोपाठ अनेक स्वराज्यपक्षीय पण गेले. यानंतर गांधी व स्वराज्यपक्षाचे पुढारी यांच्यांत चर्चा होऊन गिरणीचें कापड, कोर्ट-कौन्सिले-कॉलेजे यांवरील बहिष्काराबाबत गांधींच्या ठरावात काही फेरफार एकमताने करण्यात आले. मात्र गोपीनाथ साहाच्या ठरावात कोणताही फेरबदल करण्याचे गांधींनी नाकारले. तो ठराव फक्त आठ मते अधिक पडून पास झाला. पण यात आपला जय झाला असे गांधींना मुळीच वाटले नाही. १४८ पैकी ७० मते दास यांना पडण्यात आपला पराभवच झाला असे त्यांनी मानले आणि आपण हरलो व आपली फजिती झाली (Defeated and Humbled) असेच त्यांनी यंग इंडियात लिहिलें. या एकंदर प्रकरणाविषयी ४ जुलै १९२४

रोजी 'नवाकाळ' पत्राने केलेले समालोचन लक्षात घेण्यासारखे आहे. "महात्मा गांधींच्या बाजूला मताधिक्य एकसारखे होते. आकडे मोजण्याच्या मताधिक्याच्या दृष्टीने आपला पराभव झला असे गांधी मुळीच मानीत नाहीत. सूत काढणे व बहिष्कार पंचक अंमलात आणणे या तत्त्वांना महात्माजींना मताधिक्य मिळाले, पण सदर तत्त्वे न पाळणारांना दंड करण्याच्या कामांत राष्ट्रात राजकीय वातावरणात जो जबर पाठिंबा असावयास पाहिजे तो जबर पाठिंबा त्यांना मिळाला नाही. हा पाठिंबा नसताना त्यांनी दंडाच्या कलमांसंबंधान आग्रह धरला नाही एवढीच काय ती पराभवाची बाब आहे. मताधिक्याने दंडाचाही भाग पास झाला असताना सदर बाब सोडून देण्यास महात्माजी आपण होऊन तयार झाले, याचे कारण त्यांना काँग्रेसचे कार्यकारी मंडळ एकजुटीचे व एकमताचे पाहिजे आहे. कौन्सिलवाल्या पक्षाच्या तंत्राने वागून काँग्रेसचा गाडा पुढे ढकलण्यात काही अर्थ नाही हे त्यांचे मत कायम असून काँग्रेसचें अधिकारी मंडळ एकमताचे व एकजुटीचे करण्याचा आपला कार्यक्रम महात्माजींनी मुळीच सोडून दिलेला नाही. आपली मते काही व्यक्तींकडून अत्यंत तुच्छतेन धिक्कारली जाण्यात काही लोक नकळत प्रौढी मिरवीत आहेत असा देखावा जेव्हा गांधींनी पाहिला तेव्हा स्वतःची मते इतक्या थोड्या लोकांनी तरी कां धिक्कारावी असा विचार त्यांच्या अंतःकरणात आपोआप उत्पन्न झाला आणि या मानखंडतेपुढ शांत वृत्तीने मान वाकविण्यास ते तयार झाले." या प्रसंगावर गांधींनी यंग इंडियात लिहिलेला सर्व मजकूर कोणाच्याही अंतःकरणाचा ठाव घणारा आहे. विशेषतः गोइटेच्या (Goethe) 'फास्ट' या काव्यातील मार्गारेटच्या काही ओळी देऊन ते लिहिले ते असे: "Meanwhile, I can only take up the wheel or speak or write about it and commend it to the reader. In my loneliness, it is my only infallible friend and comforter.

याच काळात हिंदुमुसलमानांमधील तणाव वाढत होता. जागोजागी दंगेधोपे होत होते. अमेथी, सांभळ, गुलबर्गा वगैरे ठिकाणी हिंदुमंदिरे मुसलमानांनी मोडूनतोडून भ्रष्ट केली. सप्टेंबर १९२४ मध्ये कोहाट यथ झालेल्या दंग्यात ३६ लोक मारले गेले, १४५ जखमी झाले आणि नऊ लाख रुपयांची मालमत्ता नष्ट झाली. कोहाटमधील सर्व हिंदु लोक तेथून पळून निघून गेले. या दंग्याचे तात्कालिक कारण म्हणजे, एका हिंदूने 'रंगीला रसूल' या नावाचे प्रेषित महंमदावर लिहिलेले एक भिकार चोपडे. या लेखकाचा खून करण्यात आला. गांधी या घटनेने कमालीचे अस्वस्थ झाले. दोन रात्री त्यांनी याबद्दल विचार करण्यात घालविल्या आणि १८ सप्टेंबर १९२४ रोजी त्यांनी

२१ दिवसांचे उपोषण दिल्लीस महंमदअलींच्या घरीच मुक्काम असताना जाहीर केले. ते बिछान्यात पडून होते. तथापि 'यंग इंडिया' साठी लेखन सतत चालू होते. उपोषण करण्यापूर्वी त्यांनी कोणाचाही सल्ला घेतला नाही. आतल्या आवाजाने जे सांगितले तेच मानले. सरोजिनी नायडू, महादेव देसाई, शौकतअली व अनेक आप्तेष्ट दिल्लीस लोटले आणि त्या सर्वांनी एकता परिषद भरवून चर्चासत्र चालू केले. मोतीलाल नेहरू परिषदेचे अध्यक्ष होते. कलकत्याचे बिशप वेस्टकॉट, डॉ. ॲनी बेझंट, अजमलखाँ, स्वामी श्रद्धानंद, पंडित मालवीय, 'स्टेटसमन' पत्राचे संपादक आर्थर मूर असे प्रतिष्ठित लोक परिषदेत सामील होते. परिषदेचे स्वागताध्यक्ष महंमदअली होते. त्यांनी ठराव मांडला. त्यात प्रार्थनास्थळांवर हल्ल्यांचा निषेध करून गांधींना उपोषण सोडण्याची विनंती करण्यात आली. गांधींकडे मोतीलाल नेहरूंनी हा ठराव पाठविला. त्याला दिलेल्या उत्तरात गांधींनी म्हटले की, मृत्यूला कवटाळण्यासाठी मी उपोषण आरंभिलेले नाही; ईश्वर आणि मी यांमधील हा विषय आहे, मला ठरलेल्या मुदतीपूर्वी उपोषण संपविता येणार नाही; आपण फक्त हिंदु-मुस्लिम ऐक्य सिद्ध व्हावे म्हणून झटत राहा. या कॉन्फरन्सच्या बऱ्याच बैठकी होऊन काही ठराव पास झाले. अबुल कलाम आजाद हे परिषदेच्या मताभतांच्या गलबल्यात सुसूत्रता आणण्याचा मनापासून प्रयत्न करीत होते. सर्व वादग्रस्त प्रश्न लवादामार्फत अथवा कोर्टा-मार्फत मिटवावे, असा ठराव परिषदेने त्यांच्या सूचनप्रमाणे केला. गोहत्येच्या प्रश्नावर त्यांनी मुसलमानांना सांगितले की, गोहत्या करणे इस्लामच्या आदेशा-प्रमाणे मुळीच आवश्यक नाही आणि हिंदूंना त्यांनी सांगितले की, उभ्या आयुष्यात गोमांस ज्यांनी खाल्ले नाही असे हजारो मुसलमान आहेत. यानंतर या परिषदेतील वाद संपून सलोख्याचे वातावरण निर्माण झाले. ८ ऑक्टोबर रोजी गांधींनी उपोषण संपविले. डॉ. अन्सारींनी संत्र्याच्या रसाचा पेला त्यांच्य हाती दिला. विनोबांनी कठोपनिषदावर प्रवचन केले.

उपोषण संपविल्यावर काही दिवसांनी कोहाटला जाण्याचा गांधींचा बेत होता. पण सरकारने तिकडे जाण्यास त्यांना बंदी केली. बंगालमध्ये दडपशाही चालू केली. काँग्रेसच्या कचेऱ्यांची झडती घेतली. सुभाष बोस व इतर अनेकांना अटक केली. स्वराज्य पक्षाच्या कचेरीतील कागदपत्रे जप्त करून नेली. यामुळे देशभर संतापाची लाट उसळली. शास्त्री, जीना वगैरे स्वराज्यपक्षीयांच्या विरोध-कांनी देखील सरकारचा निषेध केला. गांधी कलकत्त्यास गेले व दास-नेहरूंच्या भेटीनंतर तिघांनी मिळून ६ नोव्हेंबर रोजी एक पत्रक प्रसिद्ध केले. स्वराज्य पक्षीयांबरोबर पक्का समेट करून त्यांना पूर्ण पाठिंबा देण्याचे गांधींनी ठरविले. काँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने महंमदअलींनी एक परिषद बोलाविली. सर्व राज-

कीय पक्षांच्या पुढाऱ्यांना निमंत्रणे केली. परिषद मुंबईस भरली व महंमदअलींनी स्वतः अध्यक्ष होण्याऐवजी सर दिनशा माणेकजी पेटिट यांचे नाव अध्यक्ष-पदासाठी सुचविले व ते मान्य झाले. परिषदेला डॉ. बेझंट, बिपिनचंद्र पाल, श्रीनिवास शास्त्री, जीना, चिंतामणी, जयकर, नेहरू, दास, विठ्ठलभाई पटेल वगैरे हजर होते. सर्व राजकीय पक्षांनी एकत्र जमून स्वराज्याची योजना व जातीय समेट घडवून आणावा असे ठराव पास झाले. नंतर अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची सभा होऊन या ठरावांना तीमध्ये दुजोरा देण्यात आला. काँग्रेसच्या सभासदत्वासाठी दरमहा दोन हजार वार हाताने काढलेले सूत ही वर्गणी ठरविण्यात आली. याच वेळी, देशबंधु दास यांनी आपली सर्व मिळकत राष्ट्रार्पण केली. यात त्यांचे आठ लाखांचे प्रासादतुल्य घर देखील आले. यानंतर बेळगाव येथे काँग्रेसचे एकुणचाळिसावे अधिवेशन गांधी यांच्याच अध्यक्षतेखाली भरले. गांधी-नेहरू-दास करारावर तेथे शिक्कामोर्तब झाले, फेर-नाफेरवाद खोल गाडला गेला. वर्किंग कमिटीत दास, नेहरू, सरोजिनी, महंमदअली, आजाद, मंगल सिंग, वरदाराजुलू नायडू, जम्नालाल बजाज, केळकर व अणे सभासद झाले. गांधीजी आपली हातसुताची व हातमागाची चळवळ, तसेच हिंदु-मुस्लिम ऐक्याची प्रचाराची मोहीम करीत देशभर फिरू लागले. या मोहिमेत थोडा काळ त्यांचा मुक्काम शांतिनिकेतनात झाला व रवींद्रनाथांचे वडील बंधु बडादादा यांजबरोबर त्यांची मुलाखत झाली. तेव्हा त्यांनी गांधींना सांगितले की, "जे कोणी आज तुम्हांला विरोध करीत आहेत ते नुसते बुडबुडे आहेत. काळाबरोबर ते विरून जातील आणि सत्याचा विजय होईल."

देशबंधूंच्या विनंतीवरून पाच दिवस गांधींनी दार्जिलिंग येथे विश्रांती घेण्याचे मान्य केले. नंतर त्यांनी बंगालचा दौरा सुरू केला. १६ जून रोजी खुलना येथ असताना देशबंधु दास यांच्या निधनाची वार्ता त्यांना समजली. तेव्हा आपला आसामचा दौरा रद्द करून ते देशबंधूंच्या अंत्ययात्रेसाठी कल-कत्त्याला आले. त्यांच्या फॉरवर्ड पत्रात गांधींनी मृत्युलेख लिहिला. त्यांत देश-बंधूंच्या थोरपणाच्या सर्व गोष्टींचा निर्देश केलेला आहे. "जेव्हा लोकमान्यांचे देहावसान झाले तेव्हा मला अगदी निराधार आल्यासारखे वाटले. तेव्हा बस-लेल्या धक्क्यामधून मी अजून बाहेर आलो नाही. पण देशबंधूंच्या मृत्यूमुळे माझी त्याहून जास्त दुर्दशा झाली आहे. कारण लोकमान्य असताना आपण अगदी आशावादी होतो. हिंदु-मुसलमानांचे शाश्वत ऐक्य झाले आहे असे तेव्हा वाटत होते. आपण युद्ध सुरू करण्याचा पवित्रा घेतला होता. पण आज?"

बंगालमधील मुक्कामात देशबंधूंच्या स्मारकासाठी त्यांनी दहा लाख रुपये जमविले आणि देशबंधूंचे निवासस्थान स्त्रियांचे व मुलांचे इस्पितळ करून टाकले.

त्यांच्या जागी ज. एम. सेनगुप्ता यांची स्वराज्य पक्षाचे पुढारी म्हणून कलकत्याचे मेयर, बंगाल स्वराज्यपक्ष शाखेचे अध्यक्ष व प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवड करून घेतली. दार्जिलिंग येथे असता देशबंधूंनी गांधींना म्हटले होते की लॉर्ड बर्कनहेड यांजकडून मोठ्या अपेक्षा आहेत. त्यांची घोषणा १० जुलै १९२५ रोजी झाली, पण ती पूर्णपणे निराशाजनक होती. त्यांच्यासमोर मुडिमन कमिटीच्या अल्पसंख्याकांचा म्हणजे सप्रू व जीना यांचा रिपोर्ट होता. पण, त्यांना आपले काम समजले नाही असे बर्कनहेड म्हणाले. मग मोतीलाल नेहरू, श्रीनिवासशास्त्री व फजलीहुसेन यांनी बनविलेल्या घटनेचा काय जास्त प्रकाश पडणार ? लॉर्ड बर्कनहेड यांनी बेसावध असणारांसाठी नुसता सापळा लावला आहे, असे गांधी म्हणाले. यानंतर स्वराज्य पक्षाच्या कौन्सिलाची सभा झाली आणि बॅर्कनहेड यांच्या घोषणाने सन्मान्य सहकार्य अशक्य केले आहे असा ठराव त्या सभेत पास झाला. याचा तावडतोब परिणाम असा झाला की, गांधींनी काँग्रेसची सगळी यंत्रणा स्वराज्य पक्षाच्या हवाली, राजकीय कार्यासाठी बिनशर्त करावी, असे मत प्रकट केले. नंतर देशबंधूंचे अखिल भारतीय स्मारक म्हणून चरखा-खादी सार्वत्रिक करावी व त्यासाठी मिळेल तेवढा पैसा गोळा करावा, त्यावर मर्यादा नसावी, असे 'यंग इंडिया' मध्ये लिहिले. स्वराज्य पक्षाला काँग्रेसच्या नावाने राजकीय कार्य करण्याला मोकळे रान सोडल्याबद्दल कित्येक नाफेरवादी मंडळींनी गांधींना दोष दिला. पण तो पत्करून आपला तसाच विचार असल्याचे त्यांनी मान्य केले. आणि स्वतःची संस्था वेगळी चालू करण्याचे ठरविले. पण स्वराज्य पक्षालाच तडे जाण्याला सुरुवात झाली. सेनगुप्ता एका सरकारी भोजनसमारंभाला हजर राहिले. बंगाल कौन्सिलचे अध्यक्ष म्हणून सुऱ्हावर्दी हे स्वराज्य पक्षीयांचे बहुमत होते तरी निवडून आले. म्हणजे स्वराज्य पक्षाच्या सभासदांनी शिस्तीने मतदान केले नाही. स्वराज्य पक्षाचे उमेदवार म्हणून नियुक्ती झाल्याबरोबर त्यांनी गव्हर्नरांची मुलाखत पक्षाची अनुज्ञा न घेता घेतली. त्यावर गांधींनीच गैरवर्तणूक म्हणून टीका केली. मोतीलाल नेहरूंनीच इंडियन सँहढर्स्ट कमिटीचे (स्कीन कमिटी) सभासदत्व स्वीकारले. विठ्ठलभाई पटल यांची स्वराज्य पक्षाचे उमेदवार म्हणून सेंट्रल लेजिस्लेटिव असेंब्लीचे अध्यक्ष म्हणून निवड झाली आणि आपण आता कोणत्याच पक्षाचे नसून असेंब्लीचे काम नीटपणे चालविणे हे आपले मुख्य कर्तव्य आहे असे त्यांनी जाहीर केले; आपण आता सहकार्य देण्याची आणि घेण्याची घोषणा करीत आहो असे त्यांनी म्हटले. मध्यप्रांतात श्री. बी. एस. तांबे या स्वराज्यपक्षीय पुढाऱ्याने कार्यकारी कौन्सिलराची जागा पत्करली. डॉ. मुंजे यांनी जाहीरपणे सांगितले की असहकारितेची चळवळ फसली असल्या-

मुळ आता प्रतियोगी सहकारितेचे धोरण चालू करण्याशिवाय गत्यंतर नाही. जयकर म्हणाले की, पटेल यांनी असेंब्लीचे अध्यक्ष होणे आणि तांबे यांनी कार्यकारी कौन्सिलराची जागा पत्करणे यात म्हणण्यासारखा फरक नाही. केळकरांनी तांबे यांचे वैयक्तिक नात्याने अभिनंदन केले आणि स्वराज्यपक्षाच्या कौन्सिल-प्रवेशानंतर सहकार्याच्या दिशेने एक एक पाऊल कसे पडत गेले याचे वास्तविक विवेचनही केले.

लजपतराय व मोतीलाल नेहरू यांचेही मतभेद होऊ लागले. जीना व मालवीय हे अगोदरपासून कौन्सिलकार्य प्रामाणिकपणे करण्याच्या बाजूचे होतेच. गांधी हे स्वराज्यपक्षीय व इतर कौन्सिलवाले यात चाललेल्या शाब्दिक चकमकी स्तब्धपणे पाहात होते. ८ मार्च १९२६ मध्ये मोतीलाल नेहरू यांनी असेंब्लीतून सर्व स्वराज्यपक्षीयांनी उठून जाण्याची घोषणा केली. तेव्हा पटेल यांनी सेंट्रल असेंब्ली यापुढे प्रातिनिधिक संस्था उरली नाही म्हणून तिचे बेमुदत विर्सजन केले. स्वराज्यपक्षातून फुटून जयकर-केळकर-मुंजे-अणे यांनी प्रतियोगी सहकारिता पक्ष स्थापन केला व मालवीय-लजपतराय यांजबरोबर म्हणजे हिंदुमहासभेबरोबर सहकार्य निवडणुकीत व नंतरही करण्याचे ठरविले. डिसेंबर १९२६ पर्यंत पस्तीस हिंदु-मुसलमानांचे दंगे झाले. स्वामी श्रद्धानंद यांचा अबदुल रशीद या एका धर्मवेड्या मुसलमानाने, पाणी मागण्याच्या मिषाने त्यांच्या घरात शिरून निर्घृणपणे, ते अगदी बेसावध असता खून केला. या असल्या प्रकारांकडे गांधी कसे पाहात होते ते पाहा. त्यांनी म्हटले, "The Hindu-Muslim quarrels are, in a way unknown to us, a fight for Swaraj. Each party is conscious of its impending coming. Each wants to be found ready and fit for Swaraj when it comes. The Hindus think they are physically weaker than the Muslim. The latter consider themselves weak in educational and earthly equipment. They are doing what weak bodies have done hitherto. This fighting, however unfortunate it may be, is a sign of growth, It is like the war of Roses. Out of it will rise a mighty nation. A better than the bloody way was opened art to us in 1920, but we could not assimilate it. But even bloody way is better than utter helplessness and unmanliness."

२० डिसेंबर १९२६ रोजी गांधींनी एक वर्षभर पाळलेला काहीच न बोलण्याचा आपला नियम रद्द केला आणि वर्धा मुक्कामी एक जाहीर भाषण केले आणि त्यात सत्य, अहिंसा, अनत्याचारी, असहकारिता, सूतकताई व हातमागांनी विणलेल्या वस्त्रांचा वापर, हिन्दु-मुस्लिम एकता, अस्पृश्यतानिवारण, मद्यबंदी

वगैरे विषयांवरील आपली निष्ठा जशीच्या तशी कायम आहे असे निःसंदिग्धपणे जाहीर केले. त्यानंतर आसामात गोहाटी येथे २६ डिसेंबर रोजी, श्रीनिवास अयंगार यांच्या अध्यक्षतेखाली सुरू होणाऱ्या काँग्रेसच्या बैठकीला हजर राहाण्यासाठी ते निघाले. या काँग्रेसच्या बैठकीत स्वातंत्र्याच्या ठरावावर बोलताना त्यांनी स्वराज्य या शब्दात साम्राज्याबाहेरील स्वातंत्र्य हा अर्थ येतोच, पण भावी पिढ्यांना जेवढा व्यापक अर्थ त्यात भरावयाचा असेल तो सुद्धा त्यात येऊ शकेल असे त्यांनी सांगितले. कौन्सिलातील कामकाज करण्यात स्वतः मंत्रिपदे घेऊ नयेतच, पण इतरांनाही घेऊ देऊ नयेत आणि सरकारने आपले अधिकार वाढविण्यासाठी केलेल्या सर्व खटपटींना उडवून लावण्यात यावे असे सांगण्यात आले. पण देशाच्या आर्थिक, कृषिविषयक, औद्योगिक हितसंबंधांना पोषक व उपकारक असे काही होत असेल तर त्याला पाठिंबा द्यावा असे स्पष्ट करण्यात आले. व्यक्तिस्वातंत्र्य, सभास्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य यांचे रक्षण करण्यात यावे असे ठरले. गोहाटीच्या काँग्रेसच्या बठकीनंतर पूर्ण वर्षभर गांधी बिहार, महाराष्ट्र, मद्रास कर्नाटक, यू. पी., बंगाल आणि ओरिसा या प्रांतांत सारखे दौऱ्यावर होते आणि त्यांच्या नेहमीच्या विषयांवरच ते बोलत असत. दोन दिवस ते यंग इंडिया व नवजीवन यांच्या लेखी मजकुरासाठी देत. कलकत्ता सोडण्यापूर्वी देशबंधूंच्या निवासस्थानाचे इस्पितळात रूपांतर करून, त्याचे सेवासदन असे नाव ठेवून त्याची सर्व व्यवस्था त्यांनी लावून दिली. नंतर सतीश दासगुप्तांच्या सोदेपूर येथील खादी प्रतिष्ठानाला भेट दिली. मालवीयांच्या निमंत्रणावरून ते बनारसला गेले आणि हिंदु विद्यापीठाच्या दोन हजार विद्यार्थ्यांना त्यांनी खादीचा संदेश दिला, 'उद्या कृपालानींच्या खादी भांडारात जा आणि तिथली सर्व खादी संपवून टाका!' श्रद्धानंदांच्या गुणवर्णनपर भाषणही गांधींनी केले. समस्तीपूर व दर्भंगा येथे स्त्रियांना पडदा फेकून देऊन पुरुषांच्या बरोबरीने समाजकार्याचा सल्ला त्यांनी दिला. द्रौपदीने भीमाला आपल्या इच्छेप्रमाणे वागण्याला लावले. तिचा कित्ता तुम्ही गिरवा, असे त्यांनी सांगितले. सोनपुरास स्त्रियांनी आपल्या अंगावरचे सगळे दागिने गांधींच्या स्वाधीन केले. बहुधा प्रत्येक ठिकाणी त्यांनी म्हटले की लोकमान्यांनी स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे असे म्हटले. त्याला आणखी अशी पुरवणी जोडली पाहिजे की खादीशिवाय मात्र ते मिळणार नाही. चांदा येथे भाषण करताना त्यांनी सांगितले की, फुलांचे हार व तुरे यांत व्यर्थ पैसा घालवू नका. एका हाराच्या किमतीत सोळा स्त्रियांना पोटभर जेवण मिळेल. त्या स्त्रियांनी तयार केलेल्या सुताची खादी जर वापरणार नसाल तर लोकमान्यांचा जयघोष करण्याचे बंद करा.

वऱ्हाडात दौरा चालू असतां यवतमाळ येथे शापुरजी सकलातवाला, एम. पी. यांची भेट झाली. त्यांचे कम्युनिझमवरचे सगळे व्याख्यान गांधींनी शांतपणें ऐकून घेतले. नंतर 'यंग इंडिया' मध्ये त्यांच्यावर लेखही लिहिला. त्या लेखात त्यांनी आपल्या सर्व जीवनाचे सिंहावलोकन करून वर्तमानकाळात चालविलेल्या दरिद्रीनारायणाच्या उद्धाराची हकीकत सांगितली आहे. त्या लेखाचा शेवट त्यांनी पुढील शब्दांत केला आहे: "I leave the Mahatma to his fate. Though a non-cooperator, I shall gladly subscribe to a bill, to make it criminal for anybody to touch my feet. Where I can impose the law myself that is, in the ashram (Sabarmati) the practice is criminal." आपल्या कोकणच्या दौऱ्यात रत्नागिरी येथे जाहीर सभेत भाषण केल्यावर गांधी विनायकराव सावरकरांच्या भेटीला गेले. सावरकरांनी त्यांना शुद्धी व अस्पृश्यतानिवारण याविषयी आपले म्हणणे स्पष्ट करण्यास सांगितले. गांधींनी काही गैरसमज दूर केले आणि ते म्हणाले, "आताच जरी आपल्याला पुष्कळ चर्चा करता येण्यासारखी नसली तरी मी आपल्याबरोबर पत्रव्यवहार करीन. आपल्याला रत्नागिरी सोडून कोठे बाहेर जाता येत नाही. पण आपल्यामधील मतभेदांची चर्चा आपल्याला पत्रव्यवहाराने करता येईल. दोनतीन दिवस मी येथे आपल्याकडे येऊन राहीन आणि परस्परांचे समाधान होईपर्यंत आपण चर्चा करू." नंतर तेथील स्त्रियांची एक मोठी सभा झाली व गांधींना एक थैली नजर करण्यात आली. सासवने येथे वैश्यविद्याश्रमात स्वयंपाकघराची आणि शौचकूपांची पाहणी त्यांनी केली. ते म्हणाले, "Life after all hovers between two functions of consumption and evaluation and you will make your institution ideal, if besides giving the students a literary education, you have made finished cooks, and sweepers of them."

"महाराष्ट्राचा दौरा पुण्यास गेल्यानंतर संपला. देशबंधु स्मारक निधीसाठी पाच हजार रु. तेथील कार्यकर्त्यांनी जमविले होते. तेथे सुरुवातीला विद्यार्थ्यांच्या विनंतीला मान देऊन गांधी इंग्रजीत बोलले, पण नंतर त्यांनी हिंदीमध्येच त्यांना आपले म्हणणे ऐकविले. पुण्याहून गांधी कांगरी येथे श्रद्धानंदजींनी स्थापन केलेल्या गुरुकुलात गेले आणि मार्च २३ ला मुंबईस परत आले. नंतर कोल्हापूर, निपाणी, बेळगाव येथे त्यांची भाषणें झाली. अतिश्रमाने व विश्रांती न मिळाल्याने गांधी अखेर आजारी पडले. ३१ मार्च रोजी यंग इंडियात लिहिलें की, मला वाईट वाटते, की गोरक्षणकार्याचे ओझे मी आपल्या शिरावर माझ्या वृद्धापकालात घेत आहे. गाय व म्हैस या दोघांनाही वाचविता येणार नाही,

असे सांगून गोशाळा या उत्तम दुग्धालये व चर्मालये झाली पाहिजेत असे प्रतिपादन केले. गोमय व गोमूत्र यांचा अपव्यय गोशाळांनी थांबविला पाहिजे यावर त्यांनी भर दिला. बेळगावाहून आंबोली येथे जाऊन नंतर ते बंगळूरला गेले. सर्वस्थळी नेहमीचे कार्यक्रम चालूच होते. जूनअखेर पुन: दौरे सुरू करण्याची त्यांची इच्छा होती. १४ जुलै रोजी अखिल भारतीय लिपी म्हणजे सर्व प्रांतीय भाषांसाठी एकच लिपी असावी याची चर्चा त्यांनी यंग इंडियात केली आहे. कर्नाटक व मद्रास प्रांतांचे दौरे इतर प्रांतांतील दौऱ्यांप्रमाणेच आणि साधारण-पणे तसेच अनुभव घेत त्यांनी संपविले आणि नोव्हेंबर १९२७ मध्ये ते दिल्लीस गेले. तेथे व्हाइसरॉय लार्ड आर्यविन यांनी त्यांना एक बंद पाकीट दिले. त्यात सायमन कमिशन नेमल्याची वार्ता होती. ८ नोव्हेंबर १९२७ रोजी ती जाहीर करण्यात आली. राजकीय सुधारणांच्या द्वारे हिंदी लोकांना अधिकार देण्याला नोकरशाहीचा सतत विरोध होता. लॉर्ड बर्कनहेड नोकरशाहीच्याच तंत्राने चालत होते. पण इंग्लंडमध्ये मजूर पक्षाचा निवडणुकीत विजय होण्याचा संभव त्यांच्या हुजूर पक्षाला दिसू लागला होता व तो अधिकारारूढ झाला, तर हिंदी लोकांशी अधिक सहानुभूतीने वागण्याला बांधलेला असल्यामुळे त्यांना मिळणाऱ्या भलेपणाचा रस्ता आपणच अडवून धरावा म्हणून १९२९ साली मॉंटेग्यू-सुधारणांची तपासणी होणार होती ती १९२७ मध्येच सायमन कमिशनची नेमणूक करून बर्कनहेड यांनी साधली. गोहाटी कॉंग्रेसने इतर राजकीय पक्षांशी संगनमत करून एक संयुक्त आघाडी उघडण्याबाबत ठराव केला होता. जीनांच्या नेतृत्वाखाली काही मुसलमान पुढाऱ्यांनी काही सूचना मांडल्या होत्या. त्यात हिंदु-मुसलमानांचे वेगळे मतदारसंघ काढून टाकण्याला काही शर्तीवर अनुकूलता दाखविण्यात आली होती. त्यांत सिंध प्रांत वेगळा करावा, बलुचिस्तान व वायव्य सरहद्द प्रांत यांना तीच योजना लागू करावी आणि पंजाब व बंगाल-मध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात हिंदु व मुसलमान यांना प्रतिनिधित्व असावे अशा सूचना होत्या. तसेच केंद्रातील कायदेमंडळात मुसलमानांची संख्या एकतृतीयांश असावी असे म्हटले होतें. ऑक्टोबर महिन्यात ऑ. इं. कॉं. क. च्या सभेने या सूचनांचे स्वागत केले आणि सर्व राजकीय पक्षांशी वाटाघाटी करून हिंदी स्वराज्याची घटना तयार करावी, असा ठराव झाला.

सायमन कमिशनची नेमणूक स्वराज्याच्या दिशेने अधिक प्रगती कशी होईल हे पाहाण्याकरिता झाली होती, तरी कमिशनवर एकही हिंदी सभासद नव्हता. यामुळे नेमस्त पक्ष सुद्धा रुष्ट झाला होता. तेजबहादूर सप्रू यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या लिबरल फेडरेशनने तसेच हिंदुमहासभेने त्यावर बहिष्कार घाल-ण्याचे ठरविले. कॉंग्रेसचा बहिष्कार होताच, मुस्लिम लीगमध्ये फूट पडून जीनांच्या

नेतृत्वाखाली झालेल्या पक्षाने बहिष्कार घातला, तर लाहोर येथ सर महंमद शफी यांच्या पुढारीपणाला मानणाऱ्या मुसलमानांनी सायमन कमिशनचे स्वागत केले. काँग्रेसचे अधिवेशन मद्रास येथे डॉ. अन्सारी यांच्या अध्यक्षते-खाली झाले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी भारताच्या भावी स्वराज्याची घटना तयार करण्याचे आवाहन काँग्रेसला केले आणि त्यासाठी एक नॅशनल कन्व्हेन्शन भरवावे असे सांगितले. गांधी अधिवेशनाला हजर होते, परंतु त्यांना त्यांचे कामकाज फारसे पसंत पडले नाही. ब्रिटिश मालावरील बहिष्कार आणि राजकीय स्वातंत्र्य या विषयावर केलेल्या ठरावांमुळे आपले दौर्बल्य दिसून येते व आपली फजिती होते, असे त्यांनी बोलून दाखविले. जवाहरलाल नेहरू युरोपचा दौरा करुन व रशिया पाहून आले होते आणि काँग्रेसच्या कामकाजावर त्यांची बरीच छाप पडलेली दिसली. गांधींनी हे सर्व फक्त पाहात राहायचें असा पवित्रा घेतला होता. जवळजवळ एक वर्षभर गांधी देशात सर्वत्र फिरत होते आणि मुख्यत: हातसुताचा व हातमागांचाच प्रचार करीत होते. १९२८ सालच्या जानेवारीत ते अहमदाबादेस आश्रमात परत आले. सायमन कमिशनवर बहिष्कार घालून "सायमन गो बॅक" या घोषणात जनता मग्न होती. या सर्व वर्षात बाहेर कोठे दौऱ्यावर गेले नाहीत. आश्रमात त्यांचा तिसरा मुलगा रामदास याचा विवाह अगदी साधपणाने उजविण्यात आला. वधूवरांच्या अंगावर खादीची शुभ्रवस्त्रे होती. एकही अलंकार नव्हता. मंगलवाद्ये नव्हती. कोणी फारसे निमंत्रित नव्हते आणि त्यांना कोणी नजरनजराणेही दिले नाहीत. गांधींनी फक्त दोन तकल्या, गीतेची एक प्रत आणि आश्रमभजनावलीची एक प्रत वधूवरांना दिली. प्रार्थनेच्या वेळी गांधी म्हणाले, केवळ एकाच जातीच्या वधूवरांचा येथे हा शेवटचाच विवाह असेल. यापुढे जाती-पोटजातींचे भेद न मानता विवाह होतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. सारे वर्ष गीतेवरील चिंत-नात अथवा कोणत्या तरी अध्यायांतील वरील प्रवचनात, टॉलस्टॉयच्या पुस्तकातील विषयांवर प्रवचने देण्यात त्यांनी खर्च केले. सत्य व अहिंसा हे विषय स्वाभा-विकपणे त्यात येतच होते. डासांना व कुत्र्यांना मारावे किंवा नाही, विषारी सर्पाची हत्या करावी किंवा नाही, वनस्पत्याहारास हिंसा होते किंवा नाही, असे प्रश्न त्यांनी चर्चिले आहेत आणि आपली अपूर्णता व दुर्बलता किती प्रकारची आहे याचा ऊहापोह केला आहे.

हे सर्व जरी चालू होते तरी स्वराज्य म्हणजे काय, त्यात ब्रिटिश साम्राज्या-मधून फुटून बाहेर पडणे अथवा वसाहतीसारखी पूर्ण स्वायत्तता घेऊन साम्राज्याच्या अंतर्गत राहणे येते की नाही, स्वराज्य शब्द जसा सामान्य जनतेला समजतो तसा इतर कोणता शब्द समजेल का, आणि स्वराज्य शब्दात जास्तीत जास्त स्वायत्ततेचा

अर्थ भरलेला आहे किंवा नाही, ही चर्चा गांधींनी केली आहे आणि स्वराज्य शब्दालाच आपण चिकटून राहावे असे आपले मत प्रकट केले. त्याची व्याप्ती किती मोठी होऊ शकेल याबद्दल गांधी म्हणतात, "Its cantent will vary with the action the nation is able to put forth at a given moment." एक नवीनच जोम किंवा प्रभाव वातावरणात उसळू लागला होता. मार्च १९२८ मध्ये गांधींना जी सहा वर्षांची शिक्षा देण्यात आली होती तिची मुदत संपत होती. आपल्याला प्रकृतीच्या कारणासाठी लवकर बिनशर्त सोडण्यात आले आहे हे गांधींच्या मनात सदैव डाचत होते आणि शिक्षा होण्यापूर्वीचा त्यांचा उत्साह पुन: जागृत होत होता, असे जणू दिसत होते.

बारडोलीचे शेतकऱ्यांचे संघटक कल्याणजी व कुंवरजी गांधींना भेटायला अहमदाबादेस आले आणि त्यांनी सांगितले की बारडोलीचे शेतकरी बावीस टक्के शेतसारा वाढविण्यात आला आहे तो न देण्याचा सत्याग्रह करण्यास तयार आहेत. वल्लभभाई पटेलही लवकरच तेथे येऊन त्यांच्या चर्चेत सामील झाले. वाढीव धारा रद्द झाल्याखेरीज आम्ही पूर्वीचा धारा देखील सरकारात भरणा करणार नाही अशी ठाम भूमिका ठरविण्यात आली. तथापि बसविण्यात आलेल्या धाऱ्याची फेरतपासणी एक नि:पक्षपाती समिती नेमून करण्याला तयार असेल तर पहिला धारा देण्याला तयारी आहे असे सर्व खातेदारांनी जाहीर केले. या वेळेपासूनच सरदार ही उपाधी वल्लभभाईंच्या नावाला चिकटली. सरकारने पुष्कळ धाकदपटशा देऊन पाहिला. दांडगे पठाण जप्तीच्या कामासाठी आणले, स्थावर व जंगम मालमत्ता जप्त केली, गुरेढोरे पकडून नली, जमिनी जप्त केल्या आणि अगदी स्वल्प किमतीत लिलावात विकून टाकल्या. सरदार पटेल यांनी सांगितले, "जा, आमच्या जमिनी घेऊन इंग्लंडला जा, जाता येत असेल तर!" खातेदारांना सांगितले की, "जप्त झालेल्या तुमच्या जमिनीत तुम्ही पेरण्या करा, कोण तुम्हांला तेथून घालवून देण्याला येतो ते पाहू या." ८७ हजारांच्या तालुक्याच्या वस्तीत जे २५० स्वयंसेवक लोकांना संघटित करीत होते त्यांच्यावर भलभलते आरोप ठेवून त्यांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. मुंबई कौन्सिलच्या गुजरातमधील सात आमदारांनी या प्रकाराचा निषेध म्हणून आपल्या जागांचे राजीनामे दिले. ६३ पाटलांनी व सतरा तलाठ्यांनी राजीनामे दिले. हे सगळे बारडोली तालुक्यातच काम करीत होते. सेंट्रल लेजिस्लेटिव असेंब्लीचे अध्यक्ष विठ्ठल-भाई पटेल यांनी व्हाइसरॉयना या कामात मध्यस्थी करण्याची विनंती केली आणि जाहीरपणे बारडोलीच्या सत्याग्रहचांना त्यांचा लढा चालू असेपर्यंत दरमहा एक हजार रु. पाठविण्याचे सांगितले.

२३ जुलै १९२८ ला मुंबई सरकारने निर्वाणीचा खलिता पाठवून आपल्या दडपशाहीच्या मोहिमेला हिंदुस्तान सरकाराचा पूर्ण पाठिंबा आहे असे जाहीर केले. मात्र या खलित्यात असे म्हटले होते की, चौकशी पुन: करून धाऱ्याची बाब विचारात घेतली जाईल; पण त्या आधी सगळे सरकारी देणे देऊन टाकावे. त्यावर अटक केलेल्या सर्वांची सुटका करावी, जमिनी ज्यांच्या त्यांना परत द्याव्या, विकलेल्या मालमत्तेची चालू बाजारभावाने परतफेड करावी, राजीनामे दिलेल्या किंवा बडतर्फ केलेल्या लोकांना परत कामावर घ्यावे, असे होईल तर सरकारी फेरचौकशीला देखील मान्यता देण्याला आमची हरकत नाही, असे वल्लभभाईंनी प्रत्युत्तर दिले, मात्र ही सरकारी चौकशी उघड्यावर व नि:पक्षपातीपणे झाली पाहिजे. गांधीजी व सरदार पटेल यांनी अशी चौकशी समिती नेमल्यास चळवळ मागे घेण्याचे आश्वासन दिले. २ ऑगस्ट १९२८ रोजी गांधी स्वत: बारडोलीस गेले. त्यांनी परिस्थितीचे अवलोकन केले. काही आमदारांनी काही आश्सासने दिली व सरकारने सरदार पटेल यांना पाहिजे असलेल्या शर्तीवर चौकशी कमिटी नेमली, ब्रूमफील्ड व मॅक्सवेल यांनीच पूर्वी वाढविलेल्या २२ टक्के धारावाढीवर आक्षेप घेतले आणि ५.७ टक्के वाढ व्हावी अशी शिफारस केली, यामुळे सर्वांचे समाधान झाले असे नाही. पण स्वतंत्र बाण्याच्या लोकांकडून चौकशी व्हावी या तत्त्वाला मान्यता मिळाली, यामुळे सरदारांचे नाव सर्वत्र झाले आणि कलकत्याला होणाऱ्या १९२९ सालच्या काँग्रेसचे अध्यक्षपद त्यांना द्यावे अशी सूचना पुढे आली. परंतु गांधी म्हणाले की, बंगालच्या लोकांना मोतीलाल नेहरू हवे आहेत व त्यांची मागणी मान्य केली जावी. सायमन कमिशनचा साऱ्या देशभर काळे झेंडे दाखवून आणि कमिशनच्या सभासदांना 'आपल्या देशाला परत जा' अशा आरोळ्या ऐकवून त्यांचा धिक्कार होत असताना, नेहरूंचा भावी हिंदी स्वराज्य कसे असावे याबद्दलच्या योजनेचा नेहरू-रिपोर्ट तयार झाला होता. सप्रूंनी त्या कमिटीवर काम करून त्यांना पूर्ण सहकार्य दिले होते. ऑगस्ट महिन्यात लखनौ येथे भरलेल्या सर्वपक्षीय परिषदेने त्याला पाठिंबा दिला. सर अली इमाम, महमुदाबादचे राजेसाहेब, सर शंकरन नायर, सर रामस्वामी अय्यर, तेजबहादूर सप्रू व मोतीलाल नेहरू त्या परिषदेस हजर होते. "बारडोलीनंतर ही परिषद म्हणजे एक दुसरा मोठा विजय आहे" असे गांधींनी यंग इंडिया-मध्ये लिहिले. सायमन कमिशनचा दौरा चालूच होता. कमिशन लाहोरला गेले असता इतर ठिकाणी जशी निदर्शने झाली तशीच तेथे झाली आणि त्या धुम-श्चक्रीत एका सार्जंटने लाला लजपतराय यांजवर हल्ला केला. परिणामी लालाजी मृत्युमुखी पडले. जवाहरलाल नेहरू व गोविंद वल्लभपंत यांच्यावर

सुद्धा लाठीहल्ले झाले. हा काळ मोठा धामधुमीचा व खळबळीचा होता. सायमन कमिशनवरील बहिष्काराची वावटळ ते कमिशन स्वदेशी परत जाई-पर्यंत चालूच होती. सकलातवाला यांच्या दौऱ्याने देशाच्या सर्व शहरांत एक नवीनच चैतन्य उत्पन्न केले होते. समाजवादी मतप्रवाह अधिकाधिक प्रबळ होत होता. जवाहरलाल नेहरूंचा त्यात बराच भाग होता. त्याचप्रमाणे ३१ कम्युनिस्ट व सोशालिस्ट व्यक्तींवर बादशहांचे राज्य उलथून टाकण्याचा कट केल्याबद्दल मीरत कॉन्स्पिरसी केस म्हणून खटला भरण्यात आला होता. त्यानेही या खळबळीत मोठी भर टाकली. यात डांगे, जोगळेकर, मिरजकर, घाटे, वगैरे महा-राष्ट्रातील लोक होते. युसुफ मेहेरअली, सुभाषचंद्र बोस यांच्या लेखांची व भाषणांची भरही समाजवादी विचार फैलावण्याच्या कामी पडत होती. सोविएत रशिया, चीन व टर्की येथील घडामोडी भारतीय युवकांना आकर्षित करीत होत्या. जवाहरलाल नेहरूंचे रशियाविषयक लेख 'यंग इंडिया'त प्रसिद्ध होत होते. यामुळे गुजरात विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी 'बोल्शेविजम' बद्दल चर्चा गांधींशी करण्याचा योग जमवून आणला. तेव्हा त्यांनी बोल्शेविजमबद्दल पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले:
" I must canfess that I have not been able fully to understand Bolshevism. All that I know is that it aims at the abolition of the institution of private property. This is an application of the ethical ideal of non-possession in the realm of economics and if the principle adopted this ideal of their own accord or could he made to accept it by means of peaceful persuasion, there would be nothing like it. But from what I know of Boshevism, it not only does not preclude the use of force but freely sanctions it for the expropriation of private property and for maintaining the collective state ownership of the same. And if that is so, I have no hesitation in saying that the Bolshevik regime in its present form cannot last for long. For it is my firm conviction that nothing enduring can be built on violence. But be that as it may, there is no questioning the fact that the Bolshevik ideal has behind it the purest sacrifice of countless men and women who have given up their all, for its sake and an ideal that is sanctified by the sacrifices of such master spirits as Lenin, cannot go in uain; the noble example of their renunciation will be emblazoned for ever and quicken and purify the ideal as time passes. "

काँग्रेसमध्ये सर्व राजकीय पक्षांच्या संयुक्त परिषदेने मंजूर केलेला व मान्यता दिलेला भारताच्या भावी स्वराज्यघटनेचा रिपोर्ट मान्यता पावावा

याबद्दल गांधी कार्यरत होते. मोतीलाल नेहरूंनी तर जाहीरच केले होते की त्या रिपोर्टाला मान्यता मिळणार नसेल तर काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारणे मला शक्य होणार नाही. यावर गांधींनी अशी तोड काढली की, ३१ डिसेंबर १९३० पर्यंत जर नेहरूप्रणीत स्वराज्यघटना ब्रिटिश पार्लमेंटने मान्य केली नाही तर काँग्रेस अनत्याचारी असहकारितेची चळवळ पुनरुज्जीवित करील. तथापि तरुण पिढीच्या लोकांना हे काही मानवत नव्हते. गांधींनी मांडलेला व वर्किंग कमिटीने मंजुरी दिलेला या बाबतीतील ठराव होता, तरी जवाहरलाल नेहरूंनी त्याला विरोध केला. पण विषयनियामक कमिटीत गांधींचा ठराव ११८ विरुद्ध ४५ मतांनीं पास झाला. खुल्या अधिवेशनात सुभाषचंद्र बोस यांनी गांधींच्या ठरावाला उपसूचना सुचविली व जवाहरलालांनी तिला पाठिंबा दिला. पण १३५० विरुद्ध ९७३ मतांनी ती नामंजूर झाली. आपल्या समारोपाच्या भाषणात मोतीलाल नेहरू म्हणाले, "वृद्ध व तरुण यांच्यामधील कलह हा सनातनच आहे. एक वर्ष दम धरण्याला आम्ही सांगत आहो. नंतर तुम्हाला हवे ते करण्याला तुम्ही मोकळे आहा!"

गांधी मात्र या विरोधाने मुळीच विचलित झाले नाहीत. ते पुन: पूर्ण आत्मविश्वासाने म्हणाले: "If you will help me and follow the programme I have suggested, honestly and intelligently, I promise that Swaraj will come within one year."

गांधींचा युरोपचा दौरा करण्याचा विचार होता, पण त्यांनी तो रद्द केला.

□

# ५. असहकारितेचे पुनरुत्थान— मिठाचा कायदा तोडला

गांधींनी युरोपचा दौरा रद्द केला व हिंदुस्तानातच राहण्याचे त्यांनी ठरविले. आपले खरे काम येथेच आहे हा विचार त्यांना कधीच सोडून गेला नाही. कलकत्त्याच्या काँग्रेसच्या बैठकीनंतर त्यांनी सिंध, ब्रह्मदेश व सीलोन येथील दौरे केले. २० मार्च रोजी मीरत कटाच्या खटल्यात गोविलेल्या कामकरी वर्गाच्या ३१ पुढाऱ्यांना अटक करण्यात आली. याबद्दल लिहिताना गांधी म्हणाले, "सरकार आता घाबरगुंडी उडाल्यासारखे वागत आहे. कम्युनिझमचा नायनाट करणे हा यामागील उद्देश नसून जनतेला दहशत बसविण्याचा यामागे हेतू आहे. खाडिलकर व सांबमूर्ती यांजवर भरलेले राजद्रोहाचे खटले तेंच दाखवितात."

२४ मार्च रोजी ब्रह्मदेशाच्या दौऱ्यावरून परत आल्यावर कलकत्त्यास एका जाहीर सभेत भाषण केले आणि परदेशी कापडाची होळी केली. त्याबद्दल त्यांना व त्यांच्या अनुयायांना मॅजिस्ट्रेटने एक रुपया दंड केला. त्यामुळे त्यांची मुक्तता झाली. २ एप्रिल रोजी सरकारनें सेंट्रल असेंब्लीत मांडलेले पब्लिक सेफटी बिल, मीरत-कटाच्या खटल्याचा निकाल लागेपर्यंत तहकूब ठेवावे असें अध्यक्ष विठ्ठलभाई पटेल यांनी सुचविले. सरकारला हे मान्य झाले नाही. ८ एप्रिल रोजी ट्रेडस् डिस्प्यूटस् बिल मंजूर झाल्यावर पब्लिक सेफटी बिलावरील आपला निर्णय देण्याला अध्यक्ष पटेल उभे राहिले तेव्हा प्रेक्षकांच्या सज्जातून काही लाल पत्रके आणि दोन बॉबगोळे सर जॉर्ज शुस्टर जेथें बसले होते तेथे फेकण्यात आले. त्याने थोडा धूर झाला व मोठा आवाज झाला, पण कोणाही सभासदाला काही दुखापत झाली नाही. तरी सभासद इकडेतिकडे पांगले आणि भगतसिंग व बटुकेश्वर दत्त या दोघा तरुणांना अटक करण्यात आली. अध्यक्षांचा निर्णय ऐकण्याकरिता असेंब्लीची बैठक पुनः सुरू झाल्यावर पटेल यांनी बिल बकायदा ठरविल्याचे जाहीर केले. १२ एप्रिल रोजी व्हाइसरॉयनी असेंब्ली व कौन्सिल ऑफ स्टेट यांची संयुक्त बैठक बोलावली आणि बिल पुनः मांडणे कायदेशीर ठरविले. गांधींनी तावडतोब जाहीर केले की बॉब फेकणारांनी स्वातंत्र्याच्या चळवळीला कमीपणा आणला आहे. सरकारनेही या प्रकाराने बिथरून जाऊ नये. काँग्रेसवाल्यांनी आपले अहिंसेचे ब्रीद सोडू नये, सरकारने आपले धोरण बदलावे. परंतु तसे काही झाले नाही. भगतसिंग व दत्त यांना १२ जून रोजी

काळ्यापाण्याच्या शिक्षेवर पाठविण्यात आले. त्या दोघांनी आपल्या निवेदनात, सरकारच्या कामगारांविरुद्ध असलेल्या धोरणाचा जोरदार निषेध करून, रेव्होल्यूशन इज दि इनएलिएनेबल राइट ऑफ मॅनकाइंड अशी घोषणा केली.

सरकार बिथरले होतेच. एप्रिल महिन्यातच मुंबईस गिरणी कामगारांचा संप चालू झाला होता. तो सहा महिने चालला. जमशेदपूर, ईस्ट इंडिया रेल्वे येथील कामगारही संपावर गेले. ताग्यांच्या गिरण्यांतील कामगारांची त्यांना जोड मिळाली. सरकारने दडपशाही, झडत्या आणि धरपकड यांचे सत्र सुरू केले. १८५७ च्या बंडाची पुनरावृत्ती होते की काय, असे भय सरकारास वाटू लागले. ९ मे रोजी मीरत येथे जिकडेतिकडे लष्कर दिसू लागले. शहराला वेढाच घालण्यात आला. कोणाला बाहेर जाता येईना अथवा आत येता येईना. डॉ. संडरलॅन्ड यांचे इंडिया इन बॉन्डेज हे पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल 'मॉडर्न रिव्ह्यू'चे संपादक रामानंद चतर्जी यांजवर राजद्रोहाचा आरोप ठेवून अटक करण्यात आली. गांधींनी लिहिले, या अटकेवरून एवढे सिद्ध होते की डॉ. संडरलॅंड यांनी ब्रिटिश राज्याचा केलेला निषेध समर्पक ठरतो. बंगाल ऑर्डिनन्स पास करून अनेकांना खटले न भरता डांबून ठेविले आणि सुभाषचंद्र बोस व त्यांचे सहकारी यांजवर नाममात्र आरोप ठेवून खटले भरण्यात आले. बंगाल, पंजाब व यू. पी. मध्ये दहशतवादी खटपटी सुरू झाल्या. भगतसिंग व दत्त यांच्यावर कटाचे आरोप ठेवण्यात आले. लाहोर, सहराणपूर, आग्रा व कलकत्ता येथे बाँब तयार करण्याचे उद्योग चालू होते. बिहार व ओरिसात राजकीय दरोडे घातले जात होते. लाहोर येथे सॉन्डर्स या ज्येष्ठ पोलीस अधिकाऱ्याचा खून करण्यात आला. या खटल्यात कोर्टात विलक्षणच प्रकार घडले. कोर्टात व कारागृहात देण्यात येणाऱ्या वागणुकीच्या निषेधार्थ भगतसिंग, दत्त व जतीन दास यांनी अन्नसत्याग्रह सुरू केला. जतीन दास उपवासाच्या एकसष्टाव्या दिवशी मरण पावला. यासाठी कलकत्त्यास पाच लाख लोकांनी निदर्शने केली सर्व देशभर मिरवणुकी निघाल्या.

असे देशात एक नवेच संतापाचे, त्वेषाचे नवे वारे वाहू लागले. गांधी आंध्रप्रदेशाच्या दौऱ्यावर ६ एप्रिल रोजी निघाले. हा दौरा २१ मे रोजी संपला. इतका मोठा दौरा यापूर्वी त्यांनी कोठे कधीच केला नव्हता. देशात चाललेली सार्वत्रिक दडपशाही पाहून २४ मे १९२९ रोजी अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीची सभा मुंबईस भरविण्यात आली आणि तेव्हा गांधींनी तयार केलेल्या प्रतिकाराच्या योजनेचा विचार तेथे करण्यात आला. ऑगस्ट महिना संपण्यापूर्वी साडेसात लाख स्त्री-पुरुषांची कॉंग्रेसचे सभासद म्हणून नोंदणी करण्यात यावी असे ठरले. म्हणजे प्रत्येक भारतीय खेड्यातून एक तरी कॉंग्रेस-

जन असला पाहिजे, असा याचा अर्थ होता. ११ जून रोजी जवाहरलाल नहरूंच्या विनंतीवरून गांधी आल्मोरा येथे गेले. विश्रांती आणि काम असे दोन उद्देश त्यात होते. २ जुलैला ते साबरमतीस परत आले तेव्हा त्यांचे नाव काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी सुचविण्यात आल्याचे त्यांनी वर्तमानपत्रात वाचले. त्यांनी नकार जाहीर करून जवाहरलाल नेहरूंचे नाव सुचविले. काँग्रेस कमिटयांनी सुचविलेल्या नावात नेहरूंबरोबर सरदार पटेलांचें नावही होते. पण गांधींनी नेहरूंनाच एकमताने निवडावे असें आपले मत जाहीर केले आणि अखेर त्यांचीच निवड झाली. लाहोरची काँग्रेस जवळ येऊ लागली, तशा काही घटना वेगाने घडू लागल्या.ब्रिटिश सरकाराने एक पाऊल पुढे टाकले. व्हाइसरॉय लॉर्ड आर्यविन इंग्लंडला जाऊन आले आणि ३१ ऑक्टोबरला त्यांनी एक घोषणा केली. त्यात असे म्हटले की, १९१७ साली मॉन्टेग्यू यांनी ब्रिटिश धोरणाचा खुलासा केला त्याबद्दल इंग्लंड व हिंदुस्तान येथे काही संशय उपस्थित झाल्यामुळे मी जाहीरपणे सांगतो की हिंदुस्तान अखेरीस 'डोमिनिअन' च्या दर्जाला जाऊन पोचेल! ही घोषणा झाल्यावर विठ्ठलभाई पटेलांच्या निवासस्थानी पुढारी मंडळीची एक परिषद झाली व तीमध्ये यापुढील सर्व चर्चा हिंदुस्तान एका डोमिनिअनच्या दर्जाला पोचणार आहे असे समजून व्हावी. काँग्रेसचे अधिवेशन जेव्हा लाहोरला रावी नदीच्या तीरावर डिसेंबर १९२९ अखेर सुरू झाले. तीस हजार प्रेक्षक व प्रतिनिधी जमले होते. त्यात वायव्य सरहद्द प्रांतामधून खान अबदुल गफार खान यांच्या नेतृत्वाखाली बरेच प्रतिनिधी होते. अलीबंधू जरी काँग्रेसला आले होते, तरी त्यांनी गांधींना इशारत दिली की मुसलमान सविनय कायदेभंग वगैरे चळवळीत सामील होणार नाहीत. डॉ. अन्सारी फारसे उत्साही नव्हते. मौलाना अबुल कलम आजाद मात्र म्हणत होते की, स्वातंत्र्याच्या कोणत्याही लढयाच्या हाकेला मुसलमान साद देतील. जवाहरलाल यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात आपण समाजवादी व लोकसत्तावादी (रिपब्लिकन) असल्याचे जाहीर केले. पूर्ण स्वराज्य म्हणजे कंप्लीट इंडिपेंडन्सचा ठराव स्वत: गांधींनी मांडला. काँग्रेसच्या भावी कार्याच्या मुळाशी हा ठराव व त्यातील मागणी सदैव राहील, असे त्यांनी सांगितले. ३१ डिसेंबरला मध्यरात्री 'इन्किलाब जिंदाबाद' च्या घोषणात काँग्रेसचा तिरंगा झेंडा फडकविण्यात आला. पास झालेल्या ठरावात नेहरू रिपोर्ट इतिहासात जमा झाला असे सांगण्यात आले. पूर्ण स्वराज्य हे काँग्रेसचे ध्येय ठरले. जतीनदास यांच्या त्यागाचें व ध्येयनिष्ठेचें कौतुक करण्यात आले. व्हाइसरॉयच्या गाडीवर बॉम्ब टाकण्यात आल्याबद्दल विषाद व्यक्त करण्यात व त्यांचे व त्यांच्या लव्याजम्यांचें प्राण वाचले म्हणून अभिनंदन करण्यात आले. परंतु

नेमस्त मंडळींनी मद्रासहून -सर्वांना डोमिनिअन स्टेटस मिळविण्यासाठी संयुक्त-पणे कामे करण्याचे आवाहन केले. लाहोर काँग्रेसचा समारोप करताना नेहरू म्हणाले, 'हिन्दुस्तानची स्वातंत्र्याची घोषणा साऱ्या दुनियेत दुमदुमली आहे. २६ जानेवारी १९३० हा दिवस भारतीय स्वातंत्र्य-दिवस म्हणून जाहीर करण्यात आला. लाहोर काँग्रेस संपताच तिच्या आदेशाप्रमाणे असेंब्ली व प्रांतीय कायदे-मंडळांतील काँग्रेस सदस्यांना राजीनामे देण्यास सांगण्याचे काम मोतीलाल नेहरूंनी केले. त्यांनी व पटेल व मालवीय यांनीही राजीनामे दिले. यानंतर गांधींनी 'यंग इंडिया' मध्ये लिहिले की, "पूर्णपणे अहिंसक वातावरण आणि अंमलात आणलेला विधायक कार्यक्रम याची खात्री पटेल तर काही महिन्यांच्या आत सविनय कायदेभंगाची लढत मी यशस्वी करून दाखवीन, अशी मला उमेद आहे. २६ जानेवारी हा स्वातंत्र्यदिन म्हणून ठरविण्यात आला होता. त्या दिवशी सर्वांनी करण्याची प्रतिज्ञा तयार झाली. काँग्रेसचा स्वातंत्र्याचा ठराव आणि सविनय कायदेभंग यांविषयी व्हाइसरॉय २५ जानेवारी रोजी म्हणाले की, ब्रिटन आणि इंडिया यांनी सध्याच्या अडचणी दूर करण्यासाठी सलोख्याने काम करावे असेच सरकार मानते, परंतु कायद्याचा आदर करून त्याचे पालन करणे त्यासाठी अवश्य आहे. डोमिनिअन स्टेटस अखेर प्राप्त होईल हे खरे, पण ती आजच प्राप्त होईल असे नाही. हा खुलासा करून लार्ड आर्यावन यांनी परिस्थितीची यथातथ्य जाणीव करून दिल्याबद्दल गांधीजींनी त्यांचे आभार मानले. त्यांनी म्हटले, मी सविनय कायदेभंग तहकूब करण्यास तयार आहे. पण स्वराज्याचा गाभा असलेल्या काही गोष्टींचा अंमल ताबडतोब झाला पाहिजे. त्यासाठी अकरा मागण्या त्यांनी या बाबतीत केल्या १) पूर्ण मद्यबंदी, २) हुंडणा-वळीचा दर १ शिलिंग ४ पेन्स करणे, ३) जमीनधारा ५० टक्क्यांनी कमी करणे, ४) मिठावरील कर रद्द करणे, ५) लष्करावरील खर्च सुरुवातीला तरी पन्नास टक्के कमी करणे, ६) सनदी नोकरांचे पगार पन्नास टक्के कमी करण, ७) परदेशी कापडाच्या आयातीवर संरक्षक जकात बसविणे, (८) किनाऱ्यावरील जहाजांचा व्यापार देशी जहाजांपुरताच सीमित करणे, ९) मानवहत्या केलेल्यांना वगळून इतर सर्व कैद्यांची मुक्तता करणे, १०) गुप्तहेरखाते बंद करणे, ११) स्वसंरक्षणासाठी शस्त्र बाळगण्याचा परवाना देणे. अशा या अकरा मागण्या आहेत. व्हाइसरॉयनी या अकरा मागण्या ताबडतोब द्याव्या म्हणजे त्यांच्या कानावर सविनय कायदेभंगाची भाषा मुळीच पडणार नाही. ब्रिटिश पत्रे गांधींनी या मागण्या केल्यावर खूप संतापली. हिंदुस्तानातील पत्रांनीही गांधीवर विसंगततेचा आरोप केला. यावर गांधी एवढेच म्हणाले की, माझ्या विसंगतीतही एक संगती आहे आणि मी नेतृत्व करावयास पाहिजे असेल तर

हे सर्व खपवून घतले पाहिजे. फेब्रुवारीत वर्किंग कमिटीची सभा होऊन त्यावेळी असे ठरले की, अहिंसेवर पूर्ण भरंवसा असणारांकडेच सविनय कायदेभंगाची व्यवस्था व जबाबदारी पाहिजे. अत्याचाराच्या भयाने बारडोलीची चळवळ माग घतली, तसे आता होणार नाही. सविनय कायदेभंग आता कोणता आकार घणार हा प्रश्न गांधींपुढे होता. मिठाचा कायदा तोडावा असा साक्षात्कार त्यांना एकाएकी झाला आणि यंग इंडियात त्याची चर्चा सुरू झाली. मीठ हे सरकारच फक्त निर्माण करतें आणि प्रत्येक प्राणिमात्राचे मिठावाचून चालत नाही. तेव्हा सरकारच्या या मक्तेदारीवर आघात केला तो आबालवृद्धांना, स्त्रियांना, सर्व नागरिकांना तावडतोब समजेल असे त्यांच्या मनाने घेतले. २७ फेब्रुवारी रोजी त्यांनी यंग इंडियात लिहिले की, ही मोहीम सुरू झाल्यावर मला अटक ही गोष्ट ठरलेलीच आहे. पण त्यानंतर सर्वांनी मिठाचा कायदा तोडण्याचे काम अटक होईपर्यंत अथवा प्राण जाईपर्यंत चालू ठेविले पाहिजे. यानंतर २ मार्च रोजी त्यांनी व्हाइसरॉयना पत्र लिहिले, त्यात ब्रिटिश राज्य-पद्धतीने केलेल्या सर्व जुलमांची कहाणी कथन करून अकरा मागण्यांचा उल्लेखही केला आणि हे पत्र पाठविण्यात आपण कसली धमकी देत नसून सविनय कायदेभंग करून दाद मागणाऱ्या माणसांचे कर्तव्यच बजावीत आहो असे म्हटले. रेजिनॉल्ड नावाच्या एका इंग्रज संदेशवाहकाजवळ ते दिले आणि लॉर्ड आर्यविन यांच्या हवाली करण्यास सांगितले. व्हाइसरायचे उत्तर तावड-तोब आले. गांधीजींनी कायदा व सार्वजनिक सुरक्षितता यांचा भंग होईल अशा मार्गाने जाण्याचे ठरविले आहे याबद्दल आपणांस खेद वाटतो, असे त्यांनी गांधींना लिहिले. त्यावर गांधी म्हणाले, "गुडघे टेकून मी भाकरी मागितली, पण मला दगड मिळाला." तारीख १२ मार्च रोजी गांधींनी लिहिले, "गरीब माणसांचे मीठ मुक्त करून मला निरुत्तर करणे व्हाइसरॉयना सहज शक्य होते. नेहमीचे ठराविक उत्तर पाठविण्यापलीकडे त्यांना पुष्कळ करण्यासारखे होते. पण ती वेळ अजून आलेली नाही. अशा एका राष्ट्राचे ते प्रतिनिधी आहेत की जे सहजासहजी ताळ्यावर येत नाही अथवा पश्चात्ताप पावत नाही. अर्जविनंत्यांनी त्यांची खात्री पटत नाही. पण पाशवी शक्तीपुढे ते नमते. मूक, प्रतिकाररहित दुःख सोसले तर तेही त्याला समजते. नुसत्या युक्ति-वादाने आमचेकडून कोट्यवधी रुपये नेण्याचे त्याला बंद करता येणार नाही. व्हाइसरॉयच्या उत्तराचे मला मुळीच आश्चर्य वाटत नाही. पण मला एवढे माहीत आहे की, मिठावरील कर गेलाच पाहिजे आणि त्याच्याबरोबर आणखी पुष्कळ गोष्टी नाहीशा झाल्या पाहिजेत. काळ सर्व काही ठरवीलच. हिन्दुस्तान देश हाच एक मोठा तुरुंग आहे. व्हाइसरॉयच्या कायद्याचा मी धिक्कार करतो

आणि तो मोडणे हे माझे कर्तव्य समजतो. जबरदस्तीने लादलेल्या कंटाळवाण्या, सुतकी शांततेची मला जरूर नाही, तीमुळे राष्ट्र गुदमरून जात आहे."

यानंतर आश्रमातील सहायकांच्या मदतीने मिठाचा कायदा तोडण्याची मोहीम सुरू करावी असा गांधींचा बेत होता. आश्रमातील सत्याग्रहीशिवाय त्यांच्याकडे अनेक स्वयंसेवकांनी आपला समावेश गांधींच्या पहिल्या टोळीत करावा असा हट्ट धरला. वायव्य सरहद्द प्रांतातील बरेच स्वयंसेवक अहमदाबादेस आले होते. अनेक स्त्रियांचेही अर्ज होते, पण सुरुवातीला त्यांना न घेण्याचे गांधींनी ठरविले. मीराबेन व रेजिनॉल्ड रेनॉल्डस यांनाही मागे ठेवण्याचे ठरले. देशाच्या सर्व भागांतील ७९ सत्याग्रहींची निवड गांधींनी केली. त्यांमध्ये फिजी व नेपाळातील स्वयंसेवकही होते. दोन मुसलमान, एक खिरस्ती व बाकी सर्व हिंदू होते, त्यांतील दोन अस्पृश्य जमातींतील होते.सर्वांची वये १६ ते ६० यामधील होती. दांडी नावाचे एक खेडे, साबरमतीपासून २०० मैल लांब असलेले व एका काळी पश्चिम किनाऱ्यावर दीपगृह असलेले होते. तेथे चालत जाऊन बेकायदा मिठाची निर्मिती व विक्री करण्याचे गांधींनी ठरविले. बोरसद गाव वाटेत लागणार होते. गांधी व त्यांजबरोबरचे स्वयंसेवक यांना स्वागतपूर्वक निरोप देण्याची तयारी करण्यासाठी सरदार पटेल तेथे गेले होते. तेथेच त्यांना अटक करण्यात आली. ७ मार्च रोजी रास गावी त्यांना पकडले. ९ मार्च रोजी साबरमतीच्या वाळवंटावर ७५ हजार लोक जमले. त्यांनी ठराव पास केला की सरदारांच्या मार्गानेच आम्ही सगळे जाऊ. बुधवार ता. १२ मार्च रोजी आपले आगेकूच सुरू होईल असे सोमवार १० मार्च रोजी गांधींनी जाहीर केले. ११ तारखला १० हजार लोक गांधींना शुभेच्छा देण्यासाठी जमले. १२ तारखेला गांधींची दांडीला पोचण्याची मोहीम ७८ स्वयंसेवकांसह चालू झाली. दहा मैल चालून गल्यावर ते असलाली या गावी पोचले. माझ्या टोळीतील लोकांनी सर्वसंगपरित्याग केला आहे, असे सांगून त्यांनी जाहीर केले की, मिठाचा कायदा रद्द होईपर्यंत किंवा स्वराज्य मिळेपर्यंत मी साबरमती, अहमदाबाद येथे पुन: येणार नाही. रोज दहा अथवा बारा मैलांपेक्षा अंतर काटायचे नाही असा गांधींचा विचार होता, पण प्रत्यक्षात पंधरा मैलांपेक्षा अधिक चाल होत होती. काही स्वयंसेवक पार थकून जात. गांधींना देखील हे चालणे जाणवले, पण अखेरपर्यंत चालत जाण्याचा त्यांचा निर्धार कायम होता. २७ मार्चच्या यंग इंडियाच्या अंकात 'ड्यूटी ऑफ डिसलॉयल्टी' म्हणजे राजद्रोह करण्याचे कर्तव्य हा लेख त्यांनी प्रसिद्ध केला. कॉंग्रेस कमिटीची सभा साबरमतीस होऊन गांधींना अटक झाली, तर सर्व प्रांतिक कमिटींनी सत्याग्रह सुरू करावा, किनाऱ्यावरील प्रदेशात मिठाचा सत्याग्रह करावा, इतर

ठिकाणी दुसरा काही प्रकार अंमलात आणावा आणि त्यांना अटक होईपर्यंत काहीच करू नये असे ठरविण्यात आले. या वेळेपर्यंत गांधी अर्धे अंतर चालून गेले होते. मोतीलाल व जवाहरलाल नहरू गांधींना भेटण्याला जंबुसर येथे गेले. मोतीलाल गांधीबरोबर थोडे चालत गेले आणि आपली हवेली आनंदभवन त्यांनी देशाला अर्पण केली. सहा एप्रिलला त्यांचे स्वराज्यभवन असे नामकरण करण्याचे ठरले. १ एप्रिल रोजी गांधी सुरतला पोचले. तेथे ८० हजार लोक जमले होते. त्यानंतरचा मुक्काम नवसारीला होता. तेथे बोलताना गांधी म्हणाले, "मला काय पाहिजे ते तरी घेऊन परत येईन, अथवा माझे प्रेत सागरावर तरंगेल." ३ एप्रिलच्या अंकात त्यांनी प्रत्येक भारतीयाला ६ एप्रिलपासून मिठाचा कायदा मोडण्याचा आदेश दिला. ५ एप्रिलला ते दांडीला पोचले, म्हणजे २४ दिवसात त्यांनी २४१ मैल अंतर तोडले. ६ एप्रिलला सकाळी प्रार्थनेनंतर सत्याग्रहाला प्रारंभ होणार होता. आपल्याला अटक झाल्यास आबास तय्यबजी व त्यांचेनंतर सरोजिनी नायडू यांचे हुकूम सर्वांनी पाळावें असे सांगितले. सकाळी साडेआठ वाजता गांधींनी मिठाचा एक पुंजका हाती घेतला. पण तेथे पोलीस पहारा वगैरे काही नव्हते. 'या लॉ, ब्रेकर' असे म्हणून सरोजिनीबाईंनी त्यांचे स्वागत केले.

गांधींनी मिठाचा कायदा तोडणारांना सर्व परिस्थिती एका निवेदनाद्वारे सुस्पष्ट केली. स्वाभाविक तयार झालेले अथवा मुद्दाम तयार केलेले मीठ वापरणे, वाहून नेणे, त्याची खरेदी-विक्री करणे हे सर्व शिक्षापात्र गुन्हे आहेत. हे सर्व उघडपण करावयाचे आहे, चोरूनमारून नव्हे. हा कार्यक्रम ६ एप्रिल ते १३ एप्रिलपर्यंत चालविण्याचा आहे. सरकार कोणाला अटक करो, वा न करो, आपण सर्वांनी हे आपले कार्य अविरत चालू ठेवण्याचे आहे. ७ एप्रिल रोजी सर्व गुजरातभर आणि मुंबई शहरात मिठाचा कायदा तोडण्याचे हे काम सुरू झाले. आट या गावी गांधींनी पुन: मीठ उचलले. स्त्रियांना त्यांनी याशिवाय दारूच्या दुकानांवर पिकेटिंग करण्याचे व सूत कातण्याचें काम चालू ठेविण्यास सांगितले. परदेशी कापडाच्या दुकानांवर पिकेटिंग करण्याला सुद्धा सांगितले. १४ एप्रिल रोजी जवाहरलाल नेहरूंना अटक झाली. तेव्हा काँग्रेसच्या अध्यक्षांचे काम मोतीलाल नेहरूंनी हाती घेतले. कलकत्ता, मद्रास व कराची येथे लाठीहल्ले झाले व सत्याग्रहींवर गोळीबार करण्यात आला. कस्तुरबा व सत्याग्रहाश्रमातील स्त्रियांनी दारूच्या दुकानांवर पिकेटिंग केले ते १७ एप्रिल रोजी. २५ एप्रिल रोजी विठ्ठलभाई पटेल यांनी असेंब्लीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. व्हाइसरॉयना लिहिलेल्या पत्रात त्यांनी म्हटले, हजारो लोक मृत्यूला कवटाळण्याला आणि तुरुंगात जाण्याला तयार झालेले

आहेत. पेशावर येथे खान अबदूल गफारखान यांना अटक झाली. त्यांना जेथे ठेविले होते तेथे हजारो खुदाई खिदमदगार अथवा 'रेड शर्टस्' यांनी तेथे वेढा घातला. तेथे गोळीबार करण्यात आल्याने शेकडो मृत्युमुखी पडले व जखमी झाले. 'गढवाली रायफल्स' मधील शिपायांनी लोकांवर गोळ्या झाडण्यास नकार दिला. त्यापैकी सतरा शिपायांना कडक शिक्षा देण्यात आल्या. सर्व देशभर हा प्रकार चालू असता व्हाइसरॉयने १९१० चा प्रेस अॅक्ट एका वटहुकुमाद्वारे जारी केला. गांधींनी नवजीवन छापखान्याच्या व्यवस्थापकाला कळविले की प्रेस अॅक्टखाली जामिनकी वगैरे मागण्यात आली तर द्यायची नाही. सरकारला छापखाना खुशाल जप्त करू द्या.

यानंतर धारासणा येथे मिठाचा कायदेभंग करण्याचा कार्यक्रम गांधींनी जाहीर केला. फिरून एक नोटीसवजा पत्र व्हाइसरॉयकडे पाठविण्यासाठी तयार करण्यात आले. पण धारासणाला पोचण्यापूर्वीच कराडीला असताना गांधींना ४ मे रोजी कैद करण्यात आले. सुरतच्या जिल्हा मॅजिस्ट्रेटने १९२७ च्या रेग्युलेशन २५ खाली ही अटक केली आणि रात्री १० वाजता येरवड्याच्या तुरुंगात ठेवण्यासाठी नण्यात आले. यावर टीका करताना मीराबेन (मिस स्लेड) हिने म्हटले, " At the dead of night, like thieves they came to steal him away. For when they sought to by hand on him, they feared that the multitudes, because they took him for a prophet. "

गांधींना अटक करून येरवड्यास तुरुंगात डांबून ठेवल्यावर देशभर हरताळ व संप यांचे सत्र सुरू झाले. मुंबईत पन्नास हजार गिरणी कामगार संपावर गेले. रेल्वे कामगारांनी त्यांच्या निदर्शनाला साथ दिली. मिरवणुकीचा प्रचंड-पणा पाहून पोलिसांनी काळे केले. कापडाच्या व्यापाऱ्यांनी सहा दिवस दुकाने बंद ठविली. पुण्यास अनेकांनी आपले सरकारी हुद्दे व नोकऱ्या सोडून दिल्या. कलकत्त्याला क्षुल्लक कारणावरून गोळीबार व अटक करणे चालू केले. दिल्लीसही गोळीबार झाला. पेशावरला लष्कराचा वेढा पडला दुनियेत सर्वत्र याचे पडसाद उठले. फ्रेंच व जर्मन पत्रात गांधी व त्यांची कृत्ये यांवर रकाने भरभरून मजकूर येऊ लागला. डॉ. होल्म्स आणि शंभर ख्रिस्ती धर्मगुरूंनी ब्रिटिश मुख्य मंत्री रामसे मॅक्डोनॉल्ड यांनी गांधींशी समेट करण्याचे आवाहन केले. सोला-पुरास आठवडाभर लोकांचेच राज्य स्थापन झाले होते. पण लष्करी कायदा पुकारून ते मोडण्यात आले. मैमनसिंग, कलकत्ता, कराची, लखनौ, मुलतान, दिल्ली, रावळपिंडी, मारदान, पेशावर या सर्व ठिकाणी असेच लोकशक्तीचे उद्रेक व ते दडपून टाकण्याचे प्रयत्न झाले. सैन्य, विमाने, रणगाडे, तोफा, बंदुका, दारूगोळा यांचा मनमुराद उपयोग वायव्य सरहद्द प्रांतात करण्यात आला.

जून महिन्यात पठाणांवर ५०० टन बॉम्बचा वर्षाव झाला. पण 'लाल डगले'-वाल्यांची संख्या दोनशेवरून ८० हजारांवर गेली. पंजाबात झालेल्या दडपशाही-मुळे मुसलमानांच्या अहरार पक्षाचा जन्म झाला. गांधीनंतर आबास तयबजी मिठाचा कायदा तोडण्याला जात असतानाच त्यांना अटक झाली आणि सरोजिनी नायडूंनी सत्याग्रहयांचे नेतृत्व स्वीकारले. गांधींचे चिरंजीव मणिलाल त्यांच्या-बरोबर होते. यावेळी सत्याग्रही मंडळीवर फारच निकराचा हल्ला सुरतच्या पोलिसांनी केला व त्याला शौर्याने व शांतपणे तोंड दिले. त्याचे फार हृदय-द्रावक वर्णन मिलर या अमेरिकन पत्रकाराने तेव्हा केले. श्रीमती नायडू व मणिलाल गांधी यांना कैद करण्यात आले. विठ्ठलभाई पटेल या हकीकतीचे साक्षीदार होते. ते म्हणाले, "ब्रिटिश साम्राज्य व हिंदुस्तान यांचा समेट होण्याची आशा आता पार नष्ट झाली असे मानले पाहिजे." "मिलर म्हणाले, गेल्या वीस वर्षात मी पुष्कळ मारामाऱ्या, दंगेधोपे पाहिले व त्यांची वर्णने देशोदेशी केली. पण धारासणा येथे पाहिले तसे प्रकार कोठेही माझ्या नजरेस पडले नाहीत." मुंबईच्या वडाळा येथील मिठागरावर झालेल्या सत्याग्रहयांच्या स्वारीच्या वेळी १५ हजार सत्याग्रही व इतर लोक जमले होते. त्यांवर घोडयावर बसलेल्या पोलिसांनी निघृण हल्ले केले. जॉर्ज स्लोकोम्ब हा ब्रिटिश पत्रकार तेव्हा हिंदुस्तानात आला होता. त्याने हा वडाळयावरील हल्ला पाहिल्यावर त्याला येरवडयास जाऊन गांधींना भेटण्याची परवानगी मिळाली. त्यानंतर काँग्रेसबरोबर सलोख्याची बोलणी सरकारने केली पण व्यर्थ ! सविनय कायदेभंगाची चळवळ चालूच राहिली. गांधी आश्रमातील मुलांना उत्तेजनपर पत्रे लिहीत होते. सरकार गंभीरपणे सर्व काही अवलोकन करीत होते. नेमस्त पुढारी लॉर्ड आर्यविन यांना भेटून गोलमेज परिषद भरवून वसाहतीचे स्वराज्य हिंदु-स्तानास देण्याबद्दलची चर्चा करावी असे त्यांना सुचवीत होते. ऑक्टोबर महिन्यात अशी परिषद भरविण्याबाबत पावले उचलण्यात येतील असे १२ मे रोजी लॉर्ड आर्यविन यांनी घोषित केले. काँग्रेसने सविनय कायदेभंगावरील आपली निष्ठा कार्यकारिणीमार्फत पुनर्घोषित करून करबंदी, परदेशी कापडावरील बहिष्कार, दर आठवडयाला मिठाचा कायदेभंग, दारू दुकानांवरील पिकेटिंग आणि ब्रिटिश बँका, विमा कंपन्या, जहाज कंपन्या व इतर संस्था यांवरील बहिष्कार पुकारला. सैन्यातील व पोलीस खात्यांतील नोकरांनाही असे सांगण्यात आले की स्वातंत्र्याकरिता प्रयत्न करणे हे इतर हिंदी लोकांप्रमाणे त्यांचेही कर्तव्य आहे.

याला प्रत्युत्तर म्हणून आणखी दोन वटहुकूम व्हाइसरॉयनी काढले. राजनिष्ठ नोकरांना फितविण्याबद्दल, करबंदीचा पुकार करण्याबद्दल व पिकेटींग

करण्याबद्दल त्यात शिक्षा सांगण्यात आल्या. वर्षअखेरपर्यंत असे डझनभर वटहुकूम निघाले. ३० जून रोजी मोतीलाल नेहरूंना अटक करण्यात आली. जुलपर्यंत ६७ राष्ट्रीय बाण्याची पत्रे आणि ५५ छापखाने प्रेसच्या वटहुकुमाखाली बंद करण्यात आले. नवजीवन छापखाना जप्त करण्यात आला आणि यंग इंडिया व नवजीवन ही सायक्लोस्टाइल कागदांवर निघू लागली. जून महिन्यात सायमन कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला. पण त्यात पूर्ण स्वातंत्र्याच्या जवळपास येईल असे काही नव्हते. पंडित मालवीय व लोकनायक अणे हे सविनय कायदेभंगात सामील होऊन तुरुंगात गेले. सरकारच्या अंदाजाच्या पलीकडे भलतेच अंतर आंदोलनाने आक्रमिले होते. असेंब्ली व कौन्सिल ऑफ स्टेट यांची एक संयुक्त बैठक बोलावून व्हाइसरॉयनी एक भाषण केले. त्यात डोमिनिअन स्टेटस अखेरीस भारताला मिळेल असा पुनरुच्चार केला. व्हाइसरॉयच्या या भाषणानंतर असेंब्लीतील स्वतंत्र व राष्ट्रीय पक्षांच्या पुढाऱ्यांची सभा भरून काँग्रेस व सरकार यात समेट व्हावा म्हणून खटपट करण्यासाठी जयकरांची नेमणूक केली. जयकर व सप्रू यांनी गांधी व दोघे नेहरू यांना येरवडा तुरुंगात भेटावे या सूचनेला मान्यता दिली. त्याप्रमाण २३ जुलै रोजी त्यांची बोलणी झाली. गांधींनी नेहरू पितापुत्रांना नैनी तुरुंगात देण्यासाठी सप्रू-जयकरांजवळ एक पत्र दिले. त्यांनी ते नेहरू पितापुत्रांना देऊन त्यांच्यापाशी दोन दिवस वाटाघाट केली. त्यानंतर जयकर पुन: गांधींकडे आले आणि गांधींनी ज्या शर्ती वाटाघाटीसाठी सुचविल्या त्या १ ऑगस्ट रोजी जयकरांपाशी दिल्या. नेहरू पितापुत्रांना येरवड्यास आणले गेले. नंतर १३-१४-१५ ऑगस्ट रोजी सप्रू-जयकर आणि गांधी-नेहरू यांमध्ये चर्चा झाली. पण त्यांचे म्हणणे एकून ते लॉर्ड आर्यविन यांना कळविल्यानंतर त्यांनी स्पष्ट सांगितले की, गांधी-नेहरूंनी घातलेल्या अटींवर चर्चा होऊ शकणार नाही. हे समजल्यावर ब्रिटनमधील हुजूर पक्षाला आनंद झाला. चर्चिल म्हणाले, "हिंदुस्तान सरकारने गांधींना तुरुंगात टाकले आणि त्यांच्या कोठडीबाहेर बसून त्यांनाच आम्हाला आमच्या अडचणींतून सोडवा म्हणून विनवीत आहे."

हे सगळे चालू असताना दडपशाही धोरणाच्या अंमलबजावणीत काहीच फरक पडलेला नव्हता. काँग्रेस पुढाऱ्यांची धरपकड चालूच होती. या सविनय कायदेभंगाच्या चळवळीचे एक महत्त्वाचे अंग कर देण्याचे नाकारणे हा होता. सरदार पटेलांना सोडल्यावर त्यांनी बारडोलीच्या शेतकऱ्यांचे नेतृत्व पुन: आपल्याकडे घेतले. दडपशाही धोरणाचा अतिरेक झाल्याने तेथील शेतकरी आपली घरेदारे सोडून शेजारच्या बडोद्याच्या संस्थानी मुलुखात जात होते. ब्रेल्सफर्ड यांनी ८० हजार लोक तात्पुरत्या झोपड्यांत राहत असलेले पाहिले.

त्यांची गुरेढोरे त्याच्यासमवेत होती. त्यांच्या बायकांनी सांगितले की गांधीजी तुरुंगात आहेत म्हणून आम्ही येथे आलो. पुरुषांनी सांगितले, शेतसारा बेसुमार वाढला आहे, त्यासाठी आम्ही बाहेर पडलो. एकदोघांनी सांगितले, स्वराज्य मिळविण्यासाठी आम्ही घरेदारे सोडली! गुजरातेत कर न देण्याची चळवळ बरीच फोफावली आणि तिचे लोण संयुक्त प्रांतातही पसरले.

ब्रिटिश सरकार या कशाची दखल न घेता गोलमेज परिषदेचा आपला कार्यक्रम अंमलात आणीत होते. स्वतः इंग्लंडच्या राजेसाहेबांनी या परिषदेचे उद्घाटन केले. नोव्हेंबर १९३० हा तो दिवस होता. सभासद सगळे हिन्दुस्तान सरकारने नेमलेले, राजेरजवाडे, जमीनदार, भांडवलदार, जातीयवादी आणि थोडे नेमस्त राजकारणी असे होते. दहा आठवडे कमिट्या नेमून कामकाज चालले होते. सायमन कमिशनच्या रिपोर्टाचा विचार झाला. संदिग्ध शब्दप्रयोग करुन ब्रिटिश मुख्य प्रधान रामसे मॅकडोनॉल्ड यांनी हिन्दुस्तानचा कारभार प्रांतिक व केंद्रीय कायदेमंडळांकडे सोपविण्यात येईल, हिन्दुस्तानची राजकीय प्रगती थोपविण्यात येणार नाही. जानेवारी १९३१ मध्ये परिषदेची पहिली बैठक संपली. मॅकडोनॉल्ड यांनी घोषणा केली की आर्यविन यांच्या जागी लॉर्ड विलिंग्डन यांची नेमणूक होणार आहे, त्यांजबरोबर विचारविनिमय करून पुढील कार्यक्रम ठरेल आणि तोपर्यंत सविनय कायदेभंग करीत असलेल्यांनी व्हाइसरॉयच्या विनंतीला मान देऊन सहकार्य करण्याचे ठरविले तर त्यांची सेवा रुजू करून घेण्यात येईल.

सविनय कायदेभंगाची चळवळ चालूच होती. मौलाना महंमदअली ४ जानेवारी १९३१ रोजी लंडन येथे मृत्यू पावले. पण त्यापूर्वी त्यांनी राजे व हिंदुस्तानचे बादशाह पाचवे जॉर्ज यांना आठवण करून दिली की, त्यांच्या एका पूर्वजाने संकुचित धोरणाचा अवलंब करून अमेरिकन वसाहती हातच्या घालविल्या होत्या. विशेष समजूतदारपणे वागून हिन्दुस्तानच्या बाबतीत त्यांनी तसे होऊ देऊ नये. १७ जानेवारी, १९३१ रोजी गांधीजी व काँग्रेस कार्यकारिणीचे सभासद यांना बिनशर्त तुरुंगातून सोडून देण्याचे कार्य लॉर्ड आर्यविन यांनी केले. मॅकडोनॉल्ड यांनी ज्या भावनेने सहकार्याची अपेक्षा केली आहे ती पुरी होईल अशी आशा व्हाइसरॉयनी व्यक्त केली व २६ जानेवारीला गांधींची सुटका झाली. त्यानंतर केलेल्या निवेदनात गांधी म्हणाले की, सविनय कायदेभंगाने जनतेच्या मनाची पुरती पकड घेतलेली आहे. आता पुढाऱ्यांनी सांगून लोक ऐकणार नाहीत. मीठ करण्याचा व पिकेटिंगचा हक्क कायम राहिला पाहिजे. हे हक्क मान्य केले की बहुतेक वटहुकूम मागे घेणे क्रमप्राप्तच आहे. सन्मानपूर्वक तह करण्याला मी उत्सुक आहे. २६ जानेवारी स्वातंत्र्यदिन

म्हणून सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरा झाला. आंदोलनात सामील झालेल्यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करण्यात आले. पूर्ण स्वातंत्र्याची प्रतिज्ञा पुनः उच्चारण्यात आली.

यानंतर मोतीलाल नेहरू गंभीरपणे आजारी झाले. त्यांना भेटण्यासाठी गांधी व दुसरे पुढारीही जमले. ६ फेब्रुवारी १९३१ रोजी पंडितजींचे देहावसान झाले. टिळक, लजपतराय, अजमलखाँ, महमंदअली व आता मोतीलालजी असे थोर नेते एकामागून एक गेले याचे गांधींनी स्मरण केले. ग्रेट ब्रिटनमधून शांतता प्रस्थापित करण्याविषयी बोलणी सुरू करण्यात आली होती हे खरे, पण दडपशाहीचा नंगा नाच थांबलेला नसल्यामुळे काँग्रेसला सहकार्य देणे अशक्य आहे असे गांधी म्हणाले. लंडनहून सप्रू, जयकर, व शास्त्री आले व अलाहाबादेस गांधींबरोबर त्यांची मुलाखत झाली आणि गांधींनी लॉर्ड आर्यविन यांजबरोबर चर्चा करण्यास संमती दिली. पत्रव्यवहार होऊन १७ फेब्रुवारीला दोघांची बोलणी सुरू झाली. ही बोलणी ४ मार्च रोजी संपली. या मुदतीत गांधी आठ वेळा व्हाइसेरिगल लॉजवर गेले आणि एकंदर २४ तास वाटाघाटीत गेले. तात्पुरती तडजोड झाली. ५ मार्च रोजी दुपारी गांधी व आर्यविन यांनी करारावर सह्या केल्या. या कराराप्रमाणें सविनय कायदेभंगाची चळवळ बंद करण्यात आली. या कराराचा मसुदा गांधींनीच केला व त्यात काही शाब्दिक फरक आर्यविन यांनी केले. यानंतर गांधींना कित्येकांनी पुष्कळ गैरलागू प्रश्न विचारले, पण त्या सर्वांची त्यांनी समर्पक उत्तरे दिली. परदेशी कापडाचा बहिष्कार व मद्यप्रतिबंधाची मोहीम चालूच राहील असे सांगितले. १० मार्च रोजी गांधी अहमदाबादेस परत आले. गुजरातच्या जनतेला त्यांनी सांगितले की, निमंत्रण आल्यावर गोलमेज परिषदेला न जाणे बरोबर होणार नाही. सध्या सर्वविध्वंसक चळवळी बंद करून फक्त विधायक कामाकडेच लक्ष पुरवावे. यंग इंडिया पुनः छापील स्वरूपात निघू लागला. १२ मार्च रोजी पहिला अंक निघाला. त्यातील आपल्या सहीनिशी लिहिलेल्या लेखात गांधींनी म्हटले आहे, "एकाएकी सरकारी गोटात फार मोठा मानसिक बदल होण्याची अपेक्षा करणे रास्त नाही. पण जरूर तेव्हा सविनय कायदेभंग पुनः सुरू करण्याची शक्ती आपल्याजवळ असेल तर तापदायक हुकूम पाळणे तूर्त आपल्याला फार कठीण वाटण्याचे कारण नाही." दांडीला ज्या मार्गाने वर्षापूर्वी ते गेले होते त्याच मार्गाने ते अहमदाबादेस परत गेले. खेडा, बारडोली, कराडी ही गावे त्यात आली. शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी आपल्याला परत मिळतील अशी खात्री बाळगावी. मी व सरदार हे केल्यावाचून राहाणार नाही. मुंबईस गेल्यावर त्यांचें मोठेच स्वागत झाले. तात्पुरता जो तह किंवा करार आर्यविन

व गांधी यांमध्ये झाला होता त्याचे दोनतीन जाहीर सभांत व यंग इंडियात खुलासेवार समर्थन केले. नंतर १९ मार्च रोजी व्हाइसरॉयच्या भेटीस दिल्लीस जाऊन भगतसिंग, दत्त व त्यांचे सोबती यांच्या फाशीच्या शिक्षा रद्द करून घेण्याचे बोलणे लावले. पण त्यात त्यांना यश आले नाही. करारात हा विषय नसल्यामुळे त्यांना सरकारवर करार न पाळण्याचा दोषारोप करता येईना. २३ मार्च रोजी भगतसिंग, राजगुरु, सुखदेव यांना लाहोर जेलमध्ये फाशी देण्यात येऊन सतलज नदीच्या किनाऱ्यावर त्यांच्या प्रेतांना भडाग्नी देण्यात आला आणि रक्षा नदीत विसर्जन करण्यात आली. भगतसिंग झिंदाबादच्या आरोळ्या हिंदुस्तानात सर्वत्र दुमदुमल्या. २४ मार्च हा दिवस देशभर सुतकदिन म्हणून पाळण्यात आला. मोठमोठी निदर्शने सर्वत्र झाली. काँग्रेसजन नसलेल्यांनाही तीव्र दुःख झाले. याचे एक उदाहरण म्हणजे, अबदुल रहीम व कावसजी जहांगीर या फाशींचा निषेध म्हणून असेंब्लीमधून बाहेर पडले. २५ मार्च रोजी जातीय दंगे कानपुरास होऊन गणेश शंकर विद्यार्थी, या काँग्रेस नेत्याची हत्या करण्यात आली. भगतसिंग प्रभृतींना फाशी दिले त्या दिवशी कराचीला काँग्रेसच्या बैठकीसाठी जमलेल्या लोकांनी प्रचंड निदर्शने केली. गांधी कराची स्टेशनजवळ आले तेव्हा लाल डगले घातलेल्या नवजवान सभेच्या कांलोनी 'गांधी परत जा', 'गांधीझम मुर्दाबाद', 'गांधीच्या कराराने भगतसिंग फाशी गेला,' अशा घोषणा दिल्या. पण गांधी त्यांच्यावर मुळीच रागावले नाहीत. त्यांचा राग ते समजू शकत होते. त्यांनी त्या लोकांना उपदेशपर असे एक पत्रक प्रसिद्ध करून आपली बाजू मांडली. 'भगतसिंग जिंदाबाद'च्या घोषणांनी देशभर दशदिशा दुमदुमत होत्या. गांधींनीच काय, पण मालवीय व सप्रू यांनी देखील भगतसिंग व त्यांचे सोबती यांची फाशी रद्द व्हावी म्हणून परिश्रम केले. पण ते व्यर्थ गेले. लोकांना चुचकारून घेण्याची एक चांगली संधी त्यांच्या विनवणीला मान देण्याचे नाकारून ब्रिटिश सरकारने फुकट घालविली.

ही जनतेची नाराजी स्पष्ट झालेल्या वातावरणात कराची येथील काँग्रेसचे अधिवेशन २९ मार्चला सुरू झाले. दरवर्षी डिसेंबरअखेर होणारी काँग्रेसची बैठक प्रथमच मार्च महिन्यात झाली. मुख्यतः काँग्रेसमधील कायदेपंडित व इतर विद्वान यांना नाताळच्या सुट्टीत काँग्रेसच्या बैठकीला हजर राहणे सोयीचे पडे म्हणून हा प्रघात पडला होता. अगदी उघड्यावर हे अधिवेशन झाले. सरदार पटेल यांची अध्यक्षपदी योजना झाली होती. काँग्रेस ही कोटयवधी सामान्य भारतीयांसाठी स्थापन झाली आहे व त्यांचे प्रतिनिधित्व ती करते, हे सरदारांच्या भाषणाचे मुख्य सूत्र होते. भगतसिंग व त्यांचे सोबती यांज-

विषयीचा ठराव जवाहरलाल नेहरूंनीं मांडला. गांधींनी तो तयार केला होता. मुख्य ठराव गांधी-आर्यविन यांच्यामध्ये झालेला करार आणि गोलमेज परिषद यांच्याविषयी होता. त्यात असे म्हटले होते की, कोठेही, कोणाबरोबर कसल्याही वाटाघाटी राजकीय ध्येयासंबंधाने होवोत, त्यांमध्ये सैन्य, परराष्ट्रीय संबंध, अर्थव्यवस्था, जकातीचे धोरण आणि ब्रिटिश सरकारनें केलेल्या अर्थविषयक कारभाराचे निःपक्षपाती परीक्षण व इंग्लंडने हिंदुस्तानच्या बाबतीत घेतलेल्या जबाबदाऱ्यांचे मूल्यमापन या सर्वांचे नियमन, तसेच परस्परांमधील भागीदारी ठेवण्याचे अथवा संपविण्याचे स्वातंत्र्य हिन्दुस्तानकडेच असले पाहिजे. काँग्रेस महात्मा गांधीजींना आपले एकमेव प्रतिनिधी गोलमेज परिषदेत भाग घेण्याकरिता नेमीत आहे. वाटल्यास त्यांनी इतर कोणाला बरोबर घ्यावे. जवाहरलाल नेहरूंनी हा ठराव मांडला, गफारखान यांनी त्याला दुजोरा दिला व इतर अनेकांनी पाठिंबा दिला. गांधींनी इंग्रजी व हिंदीमध्ये खुलासेवार भाषण केले. मूलभूत हक्क आणि आर्थिक धोरण यासंबंधी गांधी व नेहरू यांमध्ये बरीच चर्चा पूर्वी झाली होती, तिला अनुसरून ठराव तयार करण्यात आला. नेहरूंनी अनेक मसुदे केले. गांधींनी ते पुनःपुनः तपासले व अखेरीस कराची काँग्रेस भरण्यापूर्वी तो पक्का करण्यात आला. भावी स्वराज्य ऊर्फ रामराज्य कसे असेल, कोणत्या तत्त्वांवर अधिष्ठित असेल आणि कोणते धोरण अनुसरील याचा खुलासा या ठरावात आहे. गांधींनी तो मांडला व सर्वानुमते पास झाला. गांधींनी आपल्या भाषणात मांडलेले काही मुद्दे असे : स्वराज्यात व्हाइस-रॉयला रु. ५०० पेक्षा अधिक पगार मिळणार नाही. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सर्व समान हक्क असतील, सर्व धर्मांबद्दल समदृष्टी ठेविली जाईल, कारखान्याच्या मालकांनी समजून राहावे की कामकऱ्यांना माणसांप्रमाणे वागविले जायला पाहिजे. कडक व्याज आकारण्याची सावकारी पठाण करतात ती बंद झाली पाहिजे, सावकारांना आठ टक्क्यांपेक्षा अधिक व्याज मिळणार नाही, जमीनदार व महाराजे यांनी जमिनींवरील उत्पन्नाचा आपला हिस्सा अन्याय्य व जुलमी असणार नाही असा आकारावा. या गोष्टी केवळ उदाहरणादाखल सांगितल्या आहेत. पण यावरून स्वराज्यात आमची व्यवस्था कशी असेल याची सर्वांना साधारण कल्पना येऊ शकेल, असे गांधींनी आपल्या या हिंदी भाषणात सांगितले.

कराची काँग्रेसने गांधींना गोलमेज परिषदेला हजर राहाण्याला अनुज्ञा दिली. पण त्यांचा मार्ग तसा निर्विघ्न नव्हता. राखीव अधिकाराच्या प्रश्नावर व्हाइसरॉय व भारतमंत्री यांच्या आश्वासनात विसंगती होती. प्रांतिक सरकारे केलेल्या कराराचा अंमल प्रामाणिकपणे करीत नव्हती. खेरीज जातीय बखेडे

बंद होऊन सलोखा प्रस्थापित झाल्याखेरीज गोलमेज परिषदेला जाणे गांधींना प्रशस्त वाटत नव्हते. १८ एप्रिल रोजी मुंबईस जाऊन स्वदेशी जात असलेल्या लार्ड आर्यविन यांना निरोप दिला. पण बोरसद व बारडोली येथील शेतकऱ्यांना आर्यविन यांच्याशी झालेल्या कराराप्रमाणे न्याय मिळालेला नाही हे ते विसरू शकत नव्हते. नवे व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन यांची गांधींनी सिमला येथे भेट घेतली व आपली तक्रार त्यांच्यापुढे मांडली. एका ब्रिटिश पत्राने त्यांना तार पाठवून विचारले की गोलमेज परिषदेला येणार का नाही? गांधींनी उत्तर पाठविले की गांधी-आर्यविन कराराचे पालन आणि हिंदु-मुस्लिम सलोखा अंमलात येणे यावर सर्व काही अवलंबून आहे. काँग्रेस कार्यकारिणीच्या मते गांधींनी करार पाळला जावा म्हणून लंडनला जावे असे होते. एकंदर स्थिती अशी नाजूक असता मुंबईचे गव्हर्नर सर अर्नेस्ट हॉटसन यांच्यावर ते फर्ग्युसन कॉलेजला भेट देण्याला गेले असता एका विद्यार्थ्याने गोळी झाडली. पण ते बचावले. पाच दिवसांनी अलिपूरचे डिस्ट्रिक्ट जज्ज गार्लिक यांचा खून झाला. कलकत्त्याच्या युरोपिअनांनी एक सभा घऊन सरकारने या कृत्यांची दखल घ्यावी असे सुचविले. भगतसिंगाची स्तुतिस्तोत्रे गाण्यामुळे अशा गोष्टी घडत आहेत असे गांधी म्हणाले, परंतु सरकारने सूडाची आणि बदला घेण्याची भावना जोपासून दडपशाही करणे योग्य होणार नाही, असेही त्यांनी बजाविले. ६ ऑगस्ट रोजी काँग्रेसच्या कमिटीने राजकीय खुनांचा धिक्कार करणारा ठराव केला. भाषण करताना गांधींनी अशा खून करणारांचा कैवार घेणाऱ्यांना विचारले की, इंग्लिश अंमलदारांचा खून करण्याऐवजी तुम्ही मलाच का मारीत नाही? १४ ऑगस्ट रोजी, गांधी व व्हाइसरॉय यांजमध्ये झालेला पत्रव्यवहार व्हाइसरॉयानी प्रसिद्ध केला. सप्रू व जयकर लंडनला जाण्यास निघाले होते. त्यांनी गांधींची भेट घेतली. मालवीय, सरोजिनी नायडू व प्रभाशंकर पट्टणी गांधीबरोबर जाणार होते. त्यांनी आपले पर्यटण-परवाने रद्द केले. गांधी म्हणाले, माझा रस्ता साफ होताच मी लंडनला तडक जाईन. पण येथील सरकारी अधिकारी माझा रस्ता साफ करीतच नाहीत. आणि त्याच दिवशी व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन यांस एक पत्र लिहिले. पत्रात त्यांनी विचारले की आर्यविन व मी यांजमध्ये झालेला करार जिवंत आहे का रद्द झाला आहे? तसेच 'यंग इंडिया' मध्ये 'दि स्टोरी ऑफ ए ब्रोकन पॅक्ट' व 'दि रियल इश्यू' या मथळ्याखाली दोन लेख लिहिले. ऑगस्टच्या २० तारखेला हे घडले यानंतर गांधींनी व्हाइसरॉयाच्या भेटीची मागणी केली. 'सेकंड सेटलमेंट' या नावाने ओळखला जाणारा करार, होम सेक्रेटरी यांजबरोबर चर्चा होऊन करण्यात आला, सर्व विघ्ने दूर झाली व २७ ऑगस्ट रोजी त्यावर सह्या झाल्या. २९ ऑगस्ट

रोजी 'राजपुताना' बोटीने गांधी, मालवीय, सरोजिनी नायडू, प्रभाशंकर पट्टणी व बिर्ला विलायतेस जाण्यास निघाले. या सर्व वाटाघाटी चालू असताच एका पत्रकाराने त्यांना विचारले होते की लंडनला आपण पोषाक कोणता करणार? त्याचे उत्तर त्यांनी दिले, दरिद्रीनारायणाला शोभणारा सध्याचाच पंचा व चादर हा माझा पोषाक राहील. इंग्रजी कपडे अथवा मोतीलाल नेहरूंसारखा शेरवानी आणि चुस्त पायजमा असा पोषाक मला शोभणार नाही आणि मानवत नाही. प्रवास करीत असता बोटीवर गांधी अगदी आनंदात होते. बोटीवरील मुलांबरोबर खेळत होते.

गोलमेज परिषदेचें दुसरे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी एक मोठा बदल विलायतेत घडून आला. मजूर पक्षाच्या सरकारऐवजी राष्ट्रीय सरकार अधिकारारूढ झाले. मॅकडॉनल्ड हे मुख्य प्रधान म्हणून कायम राहिले. पण भारतमंत्री बदलले. वेजवूड बेन यांच्या जागी सर सॅम्युएल होअर आले. फेडरल स्ट्रक्चर कमिटीच्या अध्यक्षपदी लॉर्ड सँकी यांची नियुक्ती झाली. १४ सप्टेंबर रोजी भरलेल्या या सभेला गांधी हजर झाले. पंडित मालवीय, श्रीनिवास शास्त्री, तेजबहादूर सप्रू आणि मुकुंदराव जयकर त्यांच्या शेजारी बसले होते. तो दिवस गांधींच्या मौनाचा होता. तथापि लॉर्ड सँकी व ते यांच्या दरम्यान चिठ्ठ्यांची देवाणघेवाण चालू होती. १५ सप्टेंबर रोजी या कमिटीत काँग्रेसचे म्हणणे मांडले. कराची काँग्रेसचा ठराव वाचून दाखवून ते म्हणाले, काँग्रेसच्या मागण्यांच्या मानाने ब्रिटिश मुख्य प्रधानांची घोषणा फारच थिटी पडते. पण हिन्दुस्तानसारख्या भागीदाराला बळजबरीने नव्हे, पण प्रेमाने साम्राज्यात ठेवणे ब्रिटिश राज्यकर्त्यांना शक्य होईल असे मला वाटले आणि मी परिषदेला आलो आहे. येथून परत जाताना इंग्लंड व हिंदुस्तान यांच्यामध्ये बरोबरीची व सन्मान्य भागीदारी राहील अशा खात्रीने परत जाण्यात मला आनंद होईल. त्यांच्यानंतर मालवीयजी, सर सॅम्युएल होअर व लॉर्ड रीडिंग यांची भाषणे झाली. १६ सप्टेंबर रोजी मजूर पक्षाच्या पार्लमेंटच्या सभासदांपुढे गांधींनी हिंदुस्तानच्या मागणीचे खुलासेवार विवरण केले. इतर पक्षांच्या सभासदांपुढेही ते बोलले. १७ सप्टेंबर रोजी त्यांनी फेडरल स्ट्रक्चर कमिटीत दुसरे भाषण केले. या भाषणात दरडोई एक मत ही मागणी त्यांनी पुढे मांडली. २२ सप्टेंबर रोजी ते लँकशायरला गेले. काँग्रेसचे म्हणणे आणि परदेशी कापडावर बहिष्कार याबद्दल बोलताना त्यांनी लँकशायरच्या लोकांस विचारले, "हिन्दी सूत कातणाऱ्या व माग चालविणाऱ्या गरीब शेतकरी कामकऱ्यांच्या व त्यांच्या मुलांच्या तोंडचा घास काढून, पळवून नेऊन तुम्ही आपली भरभराट करून घेऊ इच्छिता काय?" २७ सप्टेंबर रोजी गिल्ड हॉल-

मध्य भाषण करताना त्यांनी स्वखुषीने स्वीकारलेल्या दरिद्रीनारायण व्रताचें विवरण केले. २ ऑक्टोबर रोजी ईस्ट एंडमध्ये त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. नाइटसब्रिज येथे गांधी गेले असता बर्नार्ड शॉ त्यांना सपत्नीक भेटायला आले. एक तासभर त्यांची जमिनीवर मांडी घालून मनमोकळी चर्चा अनेक विषयांवर झाली. शॉ यांनी गांधींना अगदी सहज विचारले, "या राऊंड टेबल कॉन्फरन्सचा तुम्हाला कंटाळा येत नाही का ?"

गांधी म्हणाले, "हा सगळा प्रकार म्हणजे शुद्ध बनावाबनवी आहे आणि तेथे होणारी भाषणे म्हणजे उगाच वेळकाढूपणा आहे. मी म्हणतो की त्यांनी एकदा स्वच्छपणे आपले धोरण का सांगू नये व आम्हाला स्वीकार अथवा नकार हे ठरविण्याला मोकळे का करू नये? पण ब्रिटिश राजकीय स्वभावात तें बसत नाही. कष्टदायक, जाचक पद्धतीनीच त्यांना सगळे करणें परवडते."

ऑक्टोबरअखेर नवी निवडणूक झाली आणि टोरी पक्ष अधिकारारूढ झाला. सप्रू व इतर भारतीय सभासदांनी मागणी केली की भावी हिंदी सरकारात जबाबदारीचे स्वराज्य होणार की नाही ते स्पष्ट सांगावे. ५ नोव्हेंबरला पुन: राष्ट्रीय सरकारची स्थापना होऊन रामसे मॅकडॉनल्ड यांची ब्रिटिश मुख्य मंत्री म्हणून योजना झाली. तरीही काही घोषणा होईना. फक्त गोलमेज परिषदेच्या सर्व सभासदांना बकिंगहॅम राजवाड्यात बादशहा पाचवे जॉर्ज व महाराणी मेरी यांच्या मुलाखतीला नेण्यात आले. गांधींची व राजेसाहेबांची भेट झाली. तेव्हा राजेसाहेबांनी विचारले, "माझ्या मुलावर तुम्ही बहिष्कार का घातला ?"

गांधी म्हणाले, "आपल्या मुलावर नव्हे, तर ब्रिटिश राज्यप्रमुखाच्या प्रतिनिधीवर."

५ नोव्हेंबरला गांधींना कॉंग्रेसच्या कार्यकारिणीकडून तार आली की त्यांनी आता हिंदुस्तानात परत यावे. त्यांनी युरोपातील आयर्लंड, जर्मनी, डेन्मार्क वगैरे देशांना भेटी देण्याचा बेत रद्द केला, पण त्यांना आपले काम अर्धवट टाकून जाणे शक्य नव्हते. त्यांनी परिषदेच्या बैठकीतच जाहीर केले, "जोपर्यंत मी येथे असावे असे परिषदेला वाटेल तोपर्यंत मी राहीन, कारण मला सविनय कायदेभंग पुन: चालू करण्याची इच्छा नाही. दिल्लीस केलेला हंगामी करार पक्का करावा अशी माझी इच्छा आहे. पण मेहेरबानी करून, मला ६२ वर्षांच्या दुर्बळ म्हाताऱ्याला तशी संधी तरी द्याल का नाही ? "

परिषदेचें काम मुख्यत: फेडरल स्ट्रक्चर कमिटी आणि मिनॉरिटीज कमिटीत होत होते. गांधी दोनही कमिट्यांत सभासद होते. सर्व मुख्य मुख्य विषयांवर त्यांनी भाषणे केली आणि त्या सर्वांना कॉंग्रेसच्या ठरावांचा आधार घेतला. पहिल्या

भाषणात त्यांनी कॉंग्रेसचा इतिहास थोडक्यात सांगितला व तिला काय पाहिजे आहे याचे विवेचन केले. दुसऱ्या भाषणात त्यांनी वयात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला मताधिकार या विषयावर आणि इतर महत्त्वाच्या प्रश्नांवर भाषणे केली. सैन्य व परराष्ट्रीय संबंधावर फेडरल कायदेमंडळाचे नियंत्रण पाहिजे असे सांगितले. हिंदुस्तानात सुप्रीम कोर्ट हवे, पण त्यावर प्रिव्ही कौन्सिलात अपील नको, असे सांगितले. व्यापारी व्यवहारात भेदभाव नको, असे सांगून भारतीय उद्योगांना संरक्षणाची मागणी केली आणि राष्ट्रीय सरकार अंमलात येण्यापूर्वी त्याच्या देण्याघेण्याच्या व्यवहाराची तपासणी झाली पाहिजे, अशी मागणी केली. जाती-जातीमधील संबंधांच्या चर्चेत ते पुनःपुन: बोलले. औपचारिक आणि अनौपचारिक चर्चा झाल्या, पण सगळ्या फुकट गेल्या व कमिटीला असे सांगणे भाग पडले, की आमचा समझोता होत नाही. डॉ. आंबेडकरांनी दलित वर्गासाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली आणि शीखांखेरीज इतर सर्व अल्पसंख्याक जमातींनी त्यांना पाठिंबा दिला. आंबेडकर चक्क म्हणाले, "दलित वर्गांनी तावडतोब ब्रिटिशांकडून हिंदी लोकांना सत्ता दिली जावी अशी मागणी मुळीच केलेली नाही." १३ नोव्हेंबर रोजी मॅकडॉनल्ड यांनी आपला निर्णय दिला. त्यात सर्व अल्पसंख्यांचा करार आणि दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघ याला मान्यता दिली. गांधींनी विचारले सर्व जातींमध्ये अशी फाटाफूट व विसंवाद ठेवण्यासाठीच त्यांच्या प्रतिनिधींना एवढ्या दूर ६ हजार मैलांवर निमंत्रित केले होते काय? आपले भाषण संपविताना गांधी म्हणाले, इतर अल्पसंख्याकांनी केलेल्या मागण्या मी समजू शकतो, पण हिंदू समाजापासून दलित अस्पृश्यांना असे तोडून वेगळे करण्याच्या योजनेला माझ्याकडून व कॉंग्रेसकडून कालत्रयी संमती मिळणार नाही. यानंतर फ्रान्स व इटलीमधील काही स्थळे पाहून गांधीजी पिल्स्ना बोटीत बसून हिन्दुस्तानला परत आले. इटलीत मुसोलिनींची त्यांनी भेट घेतली. त्याने गांधींना मोठ्या आदराने वागविले. फासिस्ट राज्य उभारणीविषयी मुसोलिनीने त्यांना प्रश्न केला. तेव्हा गांधी म्हणाले, "तुम्ही हा पत्त्यांचा बंगला उभारला आहे!" (तो अल्पजीवी आहे.)

गांधी गोलमेज परिषदेच्या कामासाठी विलायतेत गुंतून पडलेले असता हिंदुस्तानातील राजकीय परिस्थिती झपाट्याने बिघडत होती. प्रथमपासून गांधी-आर्यावन करार हा एकतर्फीच झालेला असा होता. दडपशाहीचे थैमान चालूच होते. बारडोलीच्या चौकशीचा बट्याबोळच झाला होता. संयुक्त प्रांत आणि बंगाल येथे लोक संतप्त झालेले होते. बंगाल्यात डांबून ठेविलेल्या लोकांपैकी दोन मरण पावले होते व हिजलीच्या छावणीत वीस घायाळ झाले होते. दहशतवाद्यांनी फिरून डोके वर काढले होते आणि सरकारने दडपशाहीचा

व वटहुकूम काढण्याचा सपाटा चालू ठविला होता. वायव्य सरहद्द प्रांतात तर आणीबाणीचाच प्रसंग आला. गफारखानांचे तेथील वाढते वजन सरकारच्या डोळ्यात सलत होते. पेशावर जिल्ह्यात लाल शर्टवाल्या स्वयंसेवकांना कोणत्याही आणीबाणीच्या प्रसंगाला तोंड देण्यासाठी प्रशिक्षित करण्यात येत होते. सरहद्द प्रांताच्या काँग्रेस कमिटीने ठराव केला की, ब्रिटिश मुख्य प्रधानांचा जातीय प्रश्नावरील निवाडा अत्यंत असमाधानकारक आहे. हिंदुस्तान सरकारने एक दरबार भरवून गफारखान व डॉ. खानसाहेब यांना हजर राहण्याला निमंत्रण पाठविली. परंतु काँग्रेस कार्यकारिणीला न विचारता कोणत्याही चर्चेत आम्हांला सामील होता येणार नाही, असे त्यांनी कळविले. तावडतोब एक वटहुकूम काढून त्या दोघांना व त्यांच्या सहकाऱ्यांना २४ डिसेंबर १९३१ रोजी म्हणजे गांधीजी हिंदुस्तानात यऊन पोचण्याला चार दिवस असता अटक करण्यात आली. संयुक्त प्रांतात करबंदीची चळवळ शेतकरी सुरू करण्याच्या बेतात असता एक वटहुकूम काढून ती चळवळ होऊच दिली नाही. त्या संबंधातच अलाहाबाद जिल्हा सोडून कोठे जाऊ नये असा हुकूम जवाहरलाल नेहरू यांजवर बजावण्यात आला. त्यांची सर्वप्रकारेच मुस्कटदाबी करण्यात आली. नेहरूंनी उलट कळविले की, मी काय करावे अथवा काय करू नये याबद्दलचे हुकूम जिल्हा मॅजिस्ट्रेटकडून घेत नसतो. २६ डिसेंबर रोजी ते गांधींना भेटण्यासाठी म्हणून मुंबईस जाण्यास निघाले असता त्यांना अटक करण्यात आली. गांधी ज्याला 'गोडिंग' म्हणजे सतावणे म्हणतात ते वर्षभर चालू होते आणि त्यांना आपली फसवणूक झाली आहे असेच वाटत होते. हिंदुस्तानात गेल्याबरोबर आपण सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करणार अशा अर्थाचे विधान असलेली, पण त्यांनी कधीच न दिलेली एक मुलाखत प्रसिद्ध झाली. बोटीवर असताच त्यांनी याचा इन्कार केला. रोममध्ये असता त्यांनी कोणालाच मुलाखत दिली नव्हती. तरी देखील ब्रिटिश वर्तमानपत्रांनी व सार्वजनिक कार्यकर्त्यांनी गांधींचा हा खुलासा न मानता त्यांना खोटे बोलणारे ठरविले.

२९ डिसेंबर रोजी मुंबई बंदरात उतरताच गांधींनी म्हटले की लॉर्ड विलिंग्डन यांचे वटहुकूम म्हणजे काँग्रेसला दिलेली स्पष्ट आव्हानेच आहेत, पण आता दुसरे एक अग्निदिव्य टाळण्याचा प्रयत्न मी आपल्याकडून केल्यावाचून राहाणार नाही. आजाद मैदानावरील जाहीर सभेत त्यांनी हेच उद्‌गार काढले. बंगालमधील दहशतवादी कृत्यांचा त्यांनी निषेध केला, पण सरकारचे वट-हुकूम म्हणजे आमच्या मानववंशाला खच्ची करण्याचाच प्रयत्न आहे. तथापि मी वाटाघाटीचा मार्ग चोखाळल्यावाचून राहाणार नाही. जर मला यश आले नाही तर अखेरची निकराची लढाई देण्यासाठी मी सर्वांना आवाहन करीन.

हिंदुस्तानच्या स्वातंत्र्यासाठी दशलक्ष माणसांचा देखील बळी देईन. इंग्लंड-मधील लोकांना मी हेच सांगितलें आहे, असे गांधी म्हणाले. यानंतर मुळीच वेळ न घालविता त्यांनी काँग्रेस कार्यकारिणीबरोबर विचारविनिमय केला. २९ डिसेंबर रोजी त्यांनी लॉर्ड विलिंग्डन यांना आपल्यामधील सलोख्याचे संबंध संपले आहेत काय, अशा अर्थाची तार पाठवून विचारणा केली. दोन दिवसांनी आलेल्या उत्तराने व्हाइसरॉय साहेबांनी आपल्या वटहुकुमांचे सविस्तर समर्थन केले. पण गांधींना भेटण्याची व आपला दृष्टिकोन समजावून देण्याची तयारी दर्शविली. यानंतर गांधी व विलिंग्डन यांमधील तारांची देवाणघेवाण झाली आणि त्यात समझोता होण्याचें कोणतेही लक्षण नव्हते. आपण केले तें सर्व योग्य आणि शांतता व सुरक्षितता टिकविण्याच्या दृष्टीने आवश्यकच होते, हा सरकारचा हट्ट कायम होता आणि त्यामुळे त्याचा प्रतिकार अहिंसेच्या मार्गाने व कायदेभंगाच्या चळवळीने करणे काँग्रेसला व गांधींना अपरिहार्य झाले.

४ जानेवारी १९३२ रोजी गांधींना अटक करण्यात आली. ती रेग्यु-लेशन २५ (१८२७) खाली आणि त्यांना येरवड्यास नेण्यात आले. किती दिवस ठेवणार याला मुदतीचे काही बंधन नव्हते. वल्लभभाई पटेल यांनाही अटक करून गांधीबरोबर ठेवण्यात आले. जवाहरलाल नेहरूंची चौकशी होऊन त्यांना दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा देण्यात आली. चार वटहुकूम काढून पोलीस व मॅजिस्ट्रेट यांचे अधिकार वाढविण्यात आले. नागरी स्वातंत्र्य असे काही उरलेच नाही. सर्व हिंदुस्तान देशालाच एकप्रकारे वेढा घालण्यात आला. हे सर्व पाहून लॉर्ड आर्यविन इंग्लंडमध्ये जाहीरपणे म्हणाले, मी जरी या काळात हिंदुस्तानात असतो तरी सगळे असेच केले असते. सरदार पटेल यांना अटक झाल्यावर काँग्रेसच्या अध्यक्षपदावर राजेंद्रप्रसाद यांची नियुक्ती करण्यात आली, पण त्यांनाही ५ जानेवारी रोजी अटक झाली. त्यांच्या जागी डॉ. अन्सारी आले, पण त्यांनाही ८ जानेवारी रोजी अटक झाली. १० तारखे-पर्यंत काँग्रेसचे सर्व पुढारी कारागृहात कोंडले गेले. इंग्लंडमध्ये सर सॅम्युएल होअर व हिंदुस्तानात लॉर्ड विलिंग्डन यांनी आता अर्धवटपणे काही करायचे नाही असे ठरविले आणि एकंदर तेरा वटहुकूम काढले. काँग्रेस ही बेकायदा संस्था ठरविण्यात आली. म्हणजे काँग्रेसची कार्यकारिणी, प्रांतिक कमिट्या, त्याच्याबरोबर विद्यार्थी व तरुण यांच्या संघटना, शेतकरी संघटना, राष्ट्रीय शाळा व विद्यापीठे, इस्पितळे, ग्रंथालये या सर्वांची यादी प्रचंडच झाली. प्रत्येक प्रांतातील शेकडो व्यक्ती त्यांमध्ये होत्या. सात हजारांना कैद करण्यात आले. यात दोनशे तरी काँग्रेसचे पुढारी म्हणता येतील असे लोक होते. चर्चिल आपल्या पद्धतीने म्हणाले, १८५७ च्या बंडानंतर इतके कडक वटहुकूम यावेळी

निघाले. या वटहुकुमांचा एक विशेष असा की मुलांच्या अथवा पाल्यांच्या अपराधाबद्दल आईबापांना व पालकांना शासन करण्यात आले. मालमत्ता, घरेदारे, मोटरगाड्या, बँकांतील पैसे, मग ते व्यक्तींचे असोत वा संस्थांचे असोत, जप्त करण्यात आले. राजकीय कैद्यांना इतरांपेक्षा अधिक वाईट रीतीने वागविण्याचें धोरण होते. सविनय कायदेभंग करणाऱ्यांना चांगले झोडपून काढावे असे एक गुप्त परिपत्रक सर्व तुरुंगांच्या अधिकाऱ्यांना पाठविण्यात आले होते. फटके मारणे ही नेहमीचीच शिक्षा झाली. सर सॅम्युएल होअर यांनी कॉमन्स सभेत सांगितले की, या वेळेस ड्रॉन बॅटल नाही.

पण याचा काही परिणाम न होता परदेशी कापडावर बहिष्कार व सविनय कायदेभंग ही आंदोलने चालूच राहिली. संप, दंगली, यांनाही खंड पडला नाही. पहिल्या चार महिन्यांत ८० हजार लोकांना अटक झाली. कोणी पुढारी नसता, जनतेने लढा चालूच ठेविला. अलाहाबादेस जवाहरलाल नेहरूंची वृद्ध आई देखील एका निदर्शनात जबर मार लागल्याने बेशुद्ध पडली. स्त्रियांना पुढे करून कायदेभंगाचे स्वरूप फुगवून दाखविण्याचे काँग्रेसचे धोरण आहे, असे सरकारी अधिकाऱ्यांना वाटत होतें. २३ एप्रिल रोजी काँग्रेसचे अधिवेशन भरविण्याचे जाहीर करण्यात आले. चांदणी चौकात पंडित मालवीयांच्या अध्यक्षतेखाली ते भरविण्यात यावयाचे होतें. पण त्यांना सभेला येत असता वाटेतच पकडण्यात आले. तरीही तेथे जमाव होऊन ५०० प्रतिनिधींनी कार्यकारिणीचे ठराव मोठ्याने उच्चारले. पोलिसांनी १६० व्यक्तींना पकडून इतरांवर लाठीहल्ला केला. इतर पुष्कळ ठिकाणी याच प्रकारच्या सभा झाल्या. कित्येक नगरपालिकांवर तिरंगा काढून टाकून युनिअन जॅक लावण्याची सक्ती करण्यात आली. लहानमोठे, मुलगे-मुली, वृद्धतरुण असा काही भेदाभेद न करता सर्वांनी ओळखपत्रे जवळ बाळगिली पाहिजेत, अशी सक्ती बंगालमध्ये सर्वांवर करण्यात आली. वीणा दास या बंगकन्येने कोर्टात स्वच्छ सांगितले, "माझ्या दडपल्या जात असलेल्या मातृभूमीवरील भक्तीने मी गव्हर्नरावर गोळी झाडली,

रोमाँ रोलॅं यांनी आपल्या एका इंग्रज मित्राला याबद्दल लिहिले: "In the eyes of thousands of men, today, who consider the maintenance of the present form of society — imperialist and capitalist — intolerable and who are determined to change it, the magnificent experiment in India of Satyagraha is the only chance offered to the world of bringing about this social transformation without appeal to violence. If it fails — if it is ruined by the violence of the British empire, putting itself against India's civil disobedience — there will be no other issue for

human evolution but violence; and it will be the British Empire it self which has decided it, it is either Gandhi or Lenin. In any case social justice will be done."

" It is this which makes the spectacle of India so much the more tragic. This is why all who have at heart the harmony of society and the spirit of peace and the Gospel, must give their help, sparing no effort, to India or, if the India of satyagraha were to go down in the bettle, it is Chirst himself who would be pierced by it, with a supreme lance — thrust on the Cross. And this time there would be no resurrection."

गांधी येरवडा तुरुंगात डांबून पडलेले होते. त्यांना हें सगळे सोसेना. ११ मार्च रोजी त्यांनी भारतमंत्री सर सॅम्युएल होअर यांना एक पत्र लिहिले. त्यात दडपशाही व ब्रिटिश महामंत्री मॅकडॉनल्ड यांच्या जातीय निवाड्याबद्दल त्यांनी लिहिले. हिंदु दलित जातींना जर स्वतंत्र मतदारसंघ देण्यात येणार असेल तर मी उपोषण करून प्राण सोडीन, असे त्यांनी लिहिले. गोलमेज परिषदेतच त्यांनी हे जाहीर केल्याची आठवण देऊन सांगितले. भावनेच्या भरात उच्चारलेले ते शब्द नव्हते, गंभीरपणे विचारपूर्वक केलेले ते विधान होते. " So far as Hinduism is concerned, separate electorate would simply vivisect and disrupt it." असे एक वाक्य त्या पत्रात आहे. दडपशाहीबद्दल त्यांनी असे म्हटले की " Goondaism is being practised in the name of Law and Order" एक महिन्याने १३ एप्रिल रोजी सर सॅम्युएल होअर यांचे उत्तर आले. लॉर्ड लोदिअन यांच्या कमिटीचे म्हणणे ऐकल्यावर महामंत्री मॅकडोनल्ड आपला निवाडा जाहीर करतील असे त्यात म्हटले होते. या पत्रव्यवहाराची माहिती गांधी, सरदार पटेल व महादेवभाई देसाई यांनाच फक्त होती. भारतीय जनतेचे लक्ष इतर कोठेतरी लागावे म्हणून गोलमेज परिषदेच्या इतर कमिट्या हिंदुस्तानात येऊन आपआपली कामे करीत होत्या. हिंदुमहासभा, मुस्लिम लीग, शीख लीग व दलित पुढारी सभा भरवून आपले म्हणणे त्यांच्यापुढे मांडीत होत्या. मुस्लिम लीगच्या परिषदेत भाषण करताना सर महंमद इक्बाल यांनी सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा निषेध करून जातीय समझोता घडवून आणण्याची मागणी केली. १७ ऑगस्ट १९३२ रोजी महामंत्री मॅकडॉनल्ड यांनी आपला हंगामी जातीय निवाडा जाहीर केला. तो पाहून गांधींना ज्याचे भय वाटत होते ते सर्व घडल्याचे दिसून आले. त्यांच्या योजनेचा प्रतिकार करण्यासाठी त्यांनी 'मृत्यू येईपर्यंत उपोषण' जाहीर करून, मॅकडॉनल्ड यांना एक पत्र लिहिले. त्यांत सर सॅम्युएल होअर यांना लिहिलेल्या पत्राचा संदर्भ दिला होता आणि

प्राणांतिक उपोषणाचा निश्चय त्यांना कळविला होता. २०. सप्टेंबरला उपोषण सुरू होईल असे कळविले होते. मॅकडोनॉल्ड यांचे उत्तर ८ सप्टेंबर रोजी पाठविण्यात आले. त्या पत्रातील अखेरचे शब्द पुढीलप्रमाणे आहेत : " I am afraid, therefore, that my answer to you must be that the decision of the Government stands and that only an agreement of the cammunities themselves can substitute other electoral arrangements for those that the Government have devised." ९९ सप्टेंबर रोजी गांधींनी मॅकडॉनल्ड यांना जबाब पाठवून आपल्या निश्चयाची पुनरुक्ती केली. १२ सप्टेंबर रोजी गांधी-होअर-मॅकडॉनल्ड पत्रव्यवहार प्रसिद्ध करण्यात आला. गांधींच्या या प्राणांतिक उपोषणाच्या निर्णयाने सर्वत्र एकच खळबळ उडाली. प्रथम दलित पुढारी एम. सी. राजा यांनी १३ सप्टेंबर रोजी एक पत्रक काढून मॅकडॉनल्ड अॅवार्डचा निषेध केला आणि गांधींचा जीव वाचविण्यासाठी सर्वांनी संयुक्तपणे कृती करावी असे म्हटले. डॉ. आंबेडकरांनी गांधींचा हा पोलिटिकल स्टंट आहे असे म्हटले, परंतु सप्रूंनी गांधींची ताबडतोब मुक्तता करावी, अशी मागणी केली. याकुब हसन यांनी गांधींची तुच्छतेने टवाळी करू नये व त्यांच्या त्यागाची कदर करावी, असे म्हटले. राजेंद्रप्रसाद म्हणाले, हिंदुसमाजाच्या कठोर कसोटीचा हा क्षण आहे. १४ सप्टेंबर रोजी अलाहाबादेतील सर्व मंदिरे हरिजनांना खुली करण्यात आली. जिकडेतिकडे एकच खळबळ माजली. १८ सप्टेंबर हा गांधींचा मौनाचा दिवस होता. त्या दिवशी, मथुरादास वसनजी, चुनीलाल मेहता, पुरुषोत्तमदास ठाकुरदास व घनःश्यामदास बिर्ला गांधींशी चर्चा करण्यासाठी येरवड्यास आले. त्यांना गांधींनी स्पष्ट सांगितले की, उच्चवर्णीय हिंदू व दलित हिंदू यांचा समझोता होऊन केवळ चालणार नाही. अस्पृश्यता नष्ट व्हावी म्हणून आणखी असेच उपोषण मला करावे लागेल. १९ सप्टेंबरला मुंबईस मालवीयजींच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली. सुमारे शंभर हिंदू पुढारी हजर होते. दोन मुद्दे सर्वानुमते वादातीत होते; एक म्हणजे, काही झाले तरी गांधींचे प्राण वाचविले पाहिजे आणि दुसरा म्हणजे, अस्पृश्यता शीघ्रतम नाहीशी झाली पाहिजे. एम. सी. राजा यांच्या सूचनेवरून एक जाहीरनामा तयार करून त्यावर सर्व पुढाऱ्यांनी सह्या कराव्या व आपणास अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला वाहून घ्यावे २० सप्टेंबरपूर्वी गांधींनी टागोर यांस एक पत्र लिहून त्यांचा आशीर्वाद मागितला. पत्र जाण्यापूर्वीच टागोरांची तार आली. त्यानंतर आंबेडकर, राजा व इतर हिंदू पुढारी यांच्या उलटसुलट पुष्कळ चर्चा गांधीबरोबर झाल्या. गांधींचा सोशिकपणा अगदी कसाला लागला. डॉ. आंबेडकर म्हणाले, " महात्माजी, आपणच आमच्या सहाय्याला आले पाहिजे. झालेल्या प्रदीर्घ चर्चेला अनुसरून गांधींनी ठरावाचा मसुदा लिहिला व सर्वांनी

त्याला संमती दिली. ठराव असा:

" This conference resolves that hence forth, amongst Hindus, no one shall be regarded as an untouchable by reason of his birth and those who have been so reqgarded hitherto, will have the same right as other Hindus, in regard to the use of public wells, public schools, pubiic roads and other public institutions. This right will have statutory recognition at the first opportunity and shall be one of the earliest acts of the Swaraj Parliament, if it shall not have received such recognition before to secure by every means, legitimate and peaceful, an early removal of all social disabilities, now imposed by custom upon the so-called untouchable classes, including the bar in respect of admission to temples."

हे वृत्त सप्रू, आंबेडकर आणि मालवीय यांनी मॅकडॉनल्ड यांस कळविलें. २६ सप्टेंबर रोजी याचा स्वीकार त्यांच्या मंत्रिमंडळाने केल्याबद्दलची निवेदने इंग्लंड व हिन्दुस्तान येथे प्रसिद्ध करण्यात आली. सप्रू, कुंझरू, टागोर, आंबेडकर या सर्वांनी गांधींना उपोषण सोडण्याची विनंती केली. सोमवार, २६ सप्टेंबर १९३२ रोजी ५-१५ वाजता, दोनशे लोकांसमक्ष प्रार्थना होऊन, कस्तुरबांनी गांधींना संत्र्याच्या रसाचा पेला दिला आणि उपोषण सुटले. २७ सप्टेंबर रोजी गांधींचा ६४ वा वाढदिवस देशी हिंदू पंचांगाप्रमाणें आला. त्यानिमित्त पुण्यास जाहीर सभेत टागोरांनी भाषण केले. अस्पृश्यतानिवारण आठवडा २७ सप्टेंबर-पासून १२ ऑक्टोबरपर्यंत सर्वत्र पाळण्यात आला. अँटी-अनटचाबिलिटी लीग या संस्थेची स्थापना दिल्लीस करण्यात आली व अमृतलाल ठक्कर यांस तिचे चिटणीस नेमण्यात आले. पंचवीस लाख रुपये जमविण्याचे विनंतिपत्र काढण्यात आले. भोपाळच्या नवाबांनी पाच हजार रुपयांची देणगी दिली. हिंदू-मुसल-मानांचा समझोता याच पद्धतीने व्हावा म्हणून शौकतअली व अबुलकलाम आजाद यांनी निवेदन काढले आणि तसा प्रयत्न करण्यास गांधींना मोकळीक मिळावी म्हणून त्यांनी व्हाइसरॉयसाहेबांना गांधींची मुक्तता करावी म्हणून विनंती केली.

सरकार आपल्या मनोवृत्तीत बदल झाला आहे असे दाखवील अशी लोकांची अपेक्षा होती. गांधींनी सुद्धा आपल्याकडून सहकार्याची इच्छा व्यक्त केली होती. ते म्हणाले, "सरकार आणि गोलमेज परिषदेशी काँग्रेसने सहकार्य करावें म्हणून सरकाराकडून सुयोग्य सूचना आली, तर माझ्याइतका आनंद दुसऱ्या कोणालाच होणार नाही. फक्त सुयोग्य या शब्दावर मी जोर देतो

आणि तो अधोरेखित करतो. स्वाभाविक प्रवृत्तीने मी सहकार्यानुकूलच आहे ही गोष्ट जेवढी मान्यता पावायला हवी होती तेवढी मी अनेक वेळा घोषित करूनही पावली नाही." पण या सर्व अपेक्षांचा भंग एका फटक्यात सरकारने केला. कारण २९ सप्टेंबर रोजी पत्रव्यवहाराचा आणि मुलाखतीच्या ज्या सवलती सरकारने दिल्या होत्या त्या एकाएकी काढून घेतल्या आणि भेटण्याची वेळ आधी ठरवून आलेल्या जयकरांना सांगण्यात आले की त्यांना येण्याला फार उशीर झाला होता आणि येरवडा तुरुंगाचे दरवाजे बंद झाले. सविनय कायदेभंगाचे आंदोलन १९३२ अखेरीस अगदीच मंदावले होते. गांधींच्या उपोषणाकडे सर्वांचे लक्ष खिळून राहिले होते. सत्याग्रही लोकांची संख्या नोव्हेंबरात १७ हजार होती ती डिसेंबरात १४ हजारांवर आली. सर सॅम्युअल होअर यांनी कॉमन्स सभेत सांगितले की, काँग्रेसजनांचे लक्ष गांधींच्या अस्पृश्यता-निवारणाच्या मोहिमेकडे लागले होते. हिंदी पुढारी मंडळी गांधींच्या सुटकेची मागणी करीत होती. त्यामुळे अस्पृश्यतानिवारण व जातीजातींतील सलोख्याच्या खटपटींना वेग येईल असे त्यांचे म्हणणे होते. सरकारतर्फे सांगण्यात आले की गांधींचा घोषित कार्यक्रम कायदेभंग होता आणि त्यासाठी तुरुंगात ठेवण्यात आले होते. हिंदु-मुसलमानांचा प्रश्न प्रधानतः राजकीय असल्यामुळे त्या बाबतीत त्यांना काही करायचे आहे हे त्यांच्या सुटकेचे कारण होऊ शकत नाही. तथापि गांधी व सरकार यांच्यात बराच पत्रव्यवहार झाल्यावर अस्पृश्यता निवारणकार्याची त्यांची मोहीम पुढे चालविण्यासाठी त्यांना दिलेल्या खास सवलती नोव्हेंबर १९३२ मध्ये पुनः देण्यात आल्या व या संधीचा फायदा त्यांनी निवेदनावर निवदने काढून उच्चवर्णीय हिंदूंचे मतपरिवर्तन करण्यासाठी, त्यांच्या आक्षेपांना व टीकेला उत्तर देण्यासाठी घेतला. त्यांना सहकार्याची विनवणी ते करीत राहिले. सरकारने आपले कर्तव्य चोख बजावले आहे, आता अस्पृश्य व उच्चवर्णीय यांनी दोघांमधील अंतराय दूर व्हावा यासाठी झटून प्रयत्न करायचा आहे असे त्यांनी म्हटले. केरळमधील गुरुवायुर येथील मंदिरात अस्पृश्यांना इतरांच्या बरोबरीने प्रवेश मिळावा म्हणून केलाप्पन यांनी उपोषण करायचे ठरविले आणि ते मरणाच्या दारात असता गांधींनी त्यांना परत फिरविले होते. येत्या जानेवारीपर्यंत अस्पृश्यांना तेथे प्रवेश करण्याची सवलत मिळाली नाही तर मला केलाप्पन यांजबरोबर त्यासाठी उपोषण करावें लागेल असे गांधींनी जाहीर केले. अस्पृश्यांना मंदिरप्रवेश मिळावा म्हणून मद्रास कायदे-मंडळात व सेंट्रल लेजिस्लेटिव असेंब्लीत विधेयके मांडण्यात आली. त्यामुळे केलाप्पन यांचे व गांधींचे उपोषण बेमुदत तहकूब झाले. गांधींच्या या मोहिमेच्या नगाऱ्याच्या आवाजात गोलमेज परिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनाकडे कोणाचे

फारसे लक्षच गेले नाही. १९३२ सालअखेर हे अधिवेशन लंडन येथे झाले. या अधिवेशनाला शास्त्री, फिरोज सेठना, चिंतामणी यांना देखील निमंत्रणे नव्हती. सप्रू-जयकर गेले होते. केळकरांना निमंत्रण आले आणि ते स्वीकारून तेही गेले. जीना देखील निमंत्रिले गेले नव्हते. सर चिमणलाल सेटलवाड यांच्यासारख्या नेमस्तांनी काँग्रेसचे सहकार्य मिळवावे असे ब्रिटिश सरकारास कळकळीने सांगितले, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. यावेळी सर तेजबहादूर सप्रू यांनी काढलेले उद्गार फारच महत्त्वाचे, मार्मिक व परिस्थितीचा तळ शोधण्याच्या योग्यतेचे आहेत. सप्रू म्हणाले, "With all my differences with Congressmen, I hold that as far as Mr. Gandhi, is concerned, he sums up in his personality the highest degree of self-respect in India and the highest degree of patriotism."

सप्रू पुढे म्हणाले, "As far as Mr. Gandhi is cancerned, he will simply refuse to discuss any political question inside the Jail. I am making an earnest appeal to you to consider the situation. I tell you that I have never known in my thirty years' experience as a public man so much of bilterness and so much of hostile feeling in Indian homes as I have witnessed during the last few months."

४ जानेवारी १९३३ हा दिवस सविनय कायदेभंगाच्या आंदोलनाचे एक वर्ष पुरे करणारा होता. राजेंद्रप्रसाद यांनी अध्यक्ष या नात्याने निवेदन केले की, सर्व काँग्रेसजनांनी देशात सर्वत्र ते वाचावे आणि जाहीर सभा त्या-साठी भरवाव्या. लाठीमार होऊन अनेकांना याबद्दल पकडण्यात आले. खुद्द राजेंद्रप्रसादांना अटक झाली आणि त्यांची जागा लोकनायक माधवराव अणे यांनी घेतली. अमुक एक कार्यक्रम समोर नसल्याने काँग्रेसचे अनुयायी काहीसे गोंधळून गेले. मिठाचा व जंगलचा कायदा तोडून सविनय कायदेभंग करावा का अस्पृश्यतानिवारणाचे कार्य करावे, अशा विवंचनेत ते पडले. वस्तुतः या दोहोमध्ये काहीच विरोध नव्हता आणि स्वदेशी, मद्यपाननिषेध व अस्पृ-श्यतानिवारण याबद्दलचे काम हे कधीच न संपणारे होते. पण सामान्य काँग्रेस-जन गोंधळले हे खरे. पण त्यांना भेटायला येरवड्यास गेलेल्या लोकांस त्यांनी फिरून हेच सांगितले.

२३ जानेवारी १९३३ रोजी व्हाइसरॉयनी रंगा अय्यर यांच्या अस्पृश्यता-निवारण विधेयकाला परवानगी दिली. सुब्बारॉयन यांच्या बिलाची जरुरी त्यामुळे उरली नाही. साऱ्या हिंदुस्तानातील देवालये व मंदिरे त्यामुळे अस्पृश्यांना

खुली होणार होती. गांधींनी यानंतर म्हटले की, आता सवर्ण हिंदूंनी अस्पृश्यता तरी नष्ट केली पाहिजे, अथवा मला तरी या दुनियेतून घालविले पाहिजे. ११ फेब्रुवारी १९३३ रोजी हरिजन या इंग्रजी साप्ताहिकाचा पहिला अंक पुण्याहून प्रकाशित करण्यात आला. हरिजन सेवक संघाकडे त्याची सर्व व्यवस्था व मालकी सोपविण्यात आली. इतःपर दलित, अनुसूचित व अस्पृश्य म्हणून मानल्या गेलेल्यांना हरिजन ही संज्ञा लावण्याचे त्यांनी ठरविले. गुजरातच्या पहिल्या संतकवीनेच तो शब्द वापरलेला आहे, असा खुलासा त्यांनी केला. 'हरिजन' मध्ये तथाकथित सनातनी हिंदूंना समजावण्याचे त्यांचे कार्य चालू होते. टीकाकारांचे म्हणणे ते छापीत व त्यांना उत्तरे देत. त्यांच्या विनंतीवरून अनेक विद्वानांनी लेख लिहिले. सप्रू-जयकर यांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी कायदा करण्यात काहीच गैर नाही असे सांगितले. हरिजन सर्वस्वी एकाच अस्पृश्यतानिवारणाच्या कामाला वाहिलेला होता. त्यात राजकारणाचे अवाक्षर येत नव्हते. गांधींनी लिहिले, "Though I am not a prisoner in law, I am conducting the paper as if, I am one in fact."

१५ एप्रिल रोजी गांधींनी 'थिंकिंग अलाऊड' या मथळ्याखाली लिहिलेल्या लेखांत म्हटले, "अस्पृश्यता हे पाप आहे आणि त्याच्या निष्कृतीसाठी अनेकांचे रक्त सांडल्याशिवाय ते नष्ट होईल असे वाटत नाही. उपोषणाच्या उपायावर माझा दृढविश्वास आहे आणि २९ एप्रिल रोजी त्यांनी २१ दिवसांचे उपोषण जाहीर केले. ८ मे रोजी ते सुरू होईल व २९ मे रोजी ते संपेल. कोणाचे काही आक्षेप अथवा हरकती त्यांनी जुमानल्या नाहीत. १ मे रोजी त्यांनी आपला विचार हिंदुस्तान सरकाराला कळविला. ८ मे रोजी उपवास सुरू झाल्यावर ९-३० वाजता रात्री एक सरकारी पत्रक प्रसिद्ध झाले. त्या अन्वये गांधींचा हेतू व मनःप्रवृत्ती लक्षात घेऊन गांधींना सोडून देण्याचे सरकारने ठरविले. या निर्णयाबद्दल दोन तास अगोदर गांधींना कळविण्यात आले होते. तेथून सरदार पटेल, महादेव देसाई व सरोजिनी नायडू यांसमवेत त्यांना लेडी प्रेमलीलाबाई ठाकरसी यांच्या 'पर्णकुटी' या पुण्यातील घरी नेण्यात आले. गांधींनी लगेच सविनय कायदेभंगाचे आंदोलन एक महिना थांबविण्यात आल्याचे सांगून सर्व राजकीय कैद्यांची सुटका व वटहुकूम मागे घ्यावे, अशी मागणी सरकाराकडे केली. काँग्रेसचे हंगामी अध्यक्ष, लोकनायक अणे यांनी त्याला संमती दिली. नंतर गांधींनी याच विषयावर एक विस्तृत निवेदन केले. अणे यांनी सविनय कायदेभंग बंद केल्याची मुदत सहा आठवड्यांनी वाढविली. सरकारतर्फे जाहीर झाले की गांधीबरोबर राजकीय कैद्यांची सुटका करणे

अथवा कायदेभंगाची चळवळ सोडून द्यावी यासाठी वाटाघाटी करणे हा त्यांची मुक्तता करण्यामागे उद्देश नाही. गांधींच्या या सर्व हालचाली, आपल्याला पसंत नाहीत असे विठ्ठलभाई पटेल व सुभाषचंद्र बोस यांनी युरोपमधून जाहीर केले. यानंतर २९ मे रोजी ठरल्याप्रमाणे गांधींनी उपोषण सोडले. गांधींची तब्येत साधारण बरी झाल्यावर पुण्यास सुमारे १५० काँग्रेस नेत्यांची एक परिषद भरली. बहुतेकांच्या मते कायदेभंगाची मोहीम बंद करावी असे होते. सत्यमूर्ती असे म्हणणारांत प्रमुख होते. आचार्य कृपलानी मुख्य विरोधक होते. तीन ठरावांचा विचार होऊन शेवटी जो एक ठराव एकमताने मंजूर झाला, त्याचा आशय असा कीं, गांधींनी व्हाइसरॉयबरोबर विनशर्त मुलाखत मागावी. १५ जुलै रोजी गांधींनी तार पाठवून व्हाइसरॉयनी मुलाखत द्यावी अशी विनंती केली. पण कायदेभंगाची चळवळ मागे घेतल्याशिवाय वाटाघाटी नाहीत ही सरकारी भूमिका कायम होती. गांधींनी पुन: प्रयत्न केला, पण तो व्यर्थ गेला. तेव्हा लढा चालू ठेवण्यासाठी व्यक्तिश: स्वत:च्या जबाबदारीवर कायदेभंग करावा, काँग्रेसकडून कसल्याही मदतीची अपेक्षा करू नये, असा पर्याय निघाला. हंगामी अध्यक्ष अणे यांनी सर्व काँग्रेस संघटनांनी आपले कामकाज बंद ठेवावे असे हुकूम काढले. कायदेभंगात तोपर्यंत एक लाख कैदेत पडले होते, अणे यांच्या व्यवस्थेवर गांधींनी टीका करून काही व्यक्ती जरी कायदेभंग करीत राहिल्या तरी ब्रिटिश सरकारावर त्याचा काही परिणाम होणार नाही असे म्हटले. काही लोकांना वाटले, की मी अस्पृश्यतानिवारणाच्या उद्योगाखेरीज दुसरे काही करणार नाही. पण मी असा एकारलेला माणूस नाही. २६ जुलै रोजी त्यांनी अठरा वर्षे साबरमतीस चालविलेला सत्याग्रह आश्रम मोडून टाकण्याचे जाहीर केले. मुंबई सरकारास पत्र पाठवून आश्रम व त्याची मिळकत यांचा ताबा घ्या, असे सुचविले. आश्रमात त्यावेळी एकंदर १०७ माणसे होती, बेचाळीस पुरुष, एकतीस स्त्रिया, बारा मुलगे व बावीस मुली अशी त्यांची वर्गवारी होती. या वेळेपर्यंत एक हजार माणसांना आपले सत्याग्रही वळण गांधींनी लाविले होते. आणि यांतील प्रत्येक व्यक्ती म्हणजे चालताबोलता आश्रमच असे ते समजत होते. साडेतीन लाख रुपयांची आश्रमाची मिळकत होती आणि जंगम संपत्ती सुमारे तीन लाखांची होती. ट्रस्टमध्ये असलेल्या पैशाचा विनियोग कसा व्हावा हे सर्व आधीच ठरलेले होते. यानंतर फक्त तेहतीस लोकांना बरोबर घेऊन गांधींनी आश्रम सोडून आपली मोहीम सुरू केली. १ ऑगस्ट रोजी त्यांना व कस्तुरबा व महादेव देसाई यांना कैद करून साबरमती तुरुंगात नेण्यात आले. साबरमतीहून त्यांना येरवडा तुरुंगात नेले आणि ४ ऑगस्ट रोजी सोडून देऊन, पुणे शहर सोडून कोठे न जाण्याचा हुकूम त्यांच्यावर बजावण्यात

आला. पण हा हुकूम पाळण्याचे त्यांनी नाकारल्यावर त्यांना पुन: कैद केले, त्याच्यावर खटला भरला आणि एक वर्षाची कारावासाची सजा त्यांना फर्माविण्यात आली. गांधींना तुरुंगात टाकल्याबरोबर वैयक्तिक कायदेभंगाची चळवळ सर्वत्र सुरू झाली. हंगामी अध्यक्ष अणे व त्यांचे तेरा सोबती अकोल्याहून सत्याग्रहासाठी बाहेर पडले. त्यांना कैद करण्यात आले. एक आठवड्यात शेकडो सत्याग्रह्यांना अटक झाली. गांधींना आता हरिजनकार्याच्या पूर्वीच्या सवलती मिळेनात. तेव्हा त्या मिळाल्याखेरीज जीवनात मला काही स्वारस्य वाटत नाही, असे त्यांनी मुंबई सरकारास लिहिले, तेव्हा काही 'हरिजन' चालविण्याकरिता अवश्य त्या सवलती त्यांना देण्यात आल्या. पण त्या पुरेशा नव्हत्या. या सुमारास त्यांची प्रकृती बिघडली तेव्हा त्यांना ससून इस्पितळात नेण्यात आले. त्यांनी अन्नपाणी वर्ज्य केले. २३ ऑगस्ट रोजी त्यांच्या जीविताला धोका आहे असे दिसल्यावर त्यांना बिनशर्त सोडण्यात येऊन अँब्युलन्समधून पर्णकुटीवर नेण्यात आले. जवाहरलाल नेहरूंना आता मुक्त करण्यात आले होते. ते पुण्यास गांधींना भेटण्यासाठी आले. त्यांची समोरासमोर चर्चा झाल्यावर त्यांना पत्ररूपाने पक्केपणा आणण्यात आला. १९३३ च्या सप्टेंबरात 'पूना स्टेटमेंटस्' या नावाने ती प्रसिद्ध करण्यात आली. काँग्रेसचा आर्थिक कार्यक्रम हा त्यांचा मुख्य विषय होता. १३ सप्टेंबर रोजी गांधींनी घोषणा केली की, ऑगस्टच्या ३ तारखेपर्यंत कायदेभंगाच्या चळवळीपासून दूर राहात आहे. मला अकल्पितपणे बिनशत सोडून दिल्यामुळे मला जरा भांबावल्यासारखे झाले आहे. यामागील हेतू काही असोत, मी आपलें कर्तव्य करीत राहीन.

सप्टेंबर १९३३ मध्ये गांधी वर्धा येथील सत्याग्रह आश्रमात आले. ३० सप्टेंबरला त्यांनी साबरमती आश्रमाची जागा हरिजन सेवक संघाला दिली. त्यांची प्रकृती अजूनही ठीक नव्हती. तरी ते 'हरिजन' साठी लेखन करीत असत. सहा आठवडे विश्रांती घेतल्यावर ७ नोव्हेंबर रोजी त्यांनी हरिजन दौऱ्यासाठी वर्धा शहर सोडले. तेथील राममंदिरात ते गेले. ते नुकतेच हरिजनांना मोकळे करण्यात आले होते. नंतर लक्ष्मीनारायणाच्या मंदिरात गेले. तें १९२८ सालीच खुले करण्यात आले होते. या ठिकाणी वर्ध्याचे एक मारवाडी व्यापारी रामदेवजी यांनी आपले खाजगी देवालय हरिजनांना खुले केल्याचे जाहीर करण्याची गांधींना विनंती केली. येथून त्यांचा नऊ महिन्यांचा हरिजन दौरा सुरू झाला. नागपूर, काटोल, अमरावती, रायपूर, अनंतपूर, शिवणी, छिंदवाडा, बैतुल, जबलपूर येथपर्यंत अनेक सभांत ते बोलले. हजारो रुपये हरिजन कार्यासाठी त्यांनी जमविले. पण अविरत परिश्रमाने त्यांचा रक्तदाब वाढत होता. ८ डिसेंबर रोजी डॉ. अन्सारीनी त्यांना तपासले

आणि त्यांचा कार्यक्रम आखणारांना त्यांनी सांगितले की, अशा प्रकारे काम करीत राहिल्यास ते केव्हा कोसळतील याचा नेम नाही. रोज चार तासांपेक्षा अधिक काम त्यांच्याकडून करून घेऊ नका. चार दिवस गांधी जबलपुरास राहिले. तेथून ते दिल्लीस गेले. तेथे १२ हजार रुपये जमा केले व एकंदर जमा ९० हजार रुपयांवर गेली. यापुढे आंध्र प्रांताचा दौरा सुरू झाला. बेझवाडा, मच्छलीपट्टण, मद्रास, येथील दौरा आटोपून ते म्हैसूर संस्थानात गेले. म्हैसूर, बादनवाल, बंगळूर ही शहरे घेऊन मलबारकडे वळले. पालघाट, बादगारा, कालिकत ही शहरे घेऊन गांधी कोचीन आणि त्रावणकोर संस्थानात गेले. कोट्टायम, अलेप्पी करून ते त्रिवेंद्रम येथे २० जानेवारी १९३४ ला गेले. त्रावणकोर संस्थानात सगळे सार्वजनिक रस्ते, विहिरी, अन्नछत्रे सर्व लोकांना सारखी खुली होती. नगरकॉइल, तिनवेल्ली येथेही त्यांची भाषणें झाली. त्रावणकोर संस्थानाच्या कारभाऱ्यांचे त्यांनी मनापासून अभिनंदन केले.

दक्षिण हिंदुस्तानात त्यांचा हरिजन कार्याचा हा दौरा चालू असताच १५ जानेवारी १९३४ रोजी बिहारमध्ये झालेल्या प्रचंड भूकंपाची बातमी समजली. १७ जानेवारी रोजी बिहार सरकारने बाबू राजेंद्रप्रसाद यांची सुटका, त्यांना भूकंपग्रस्तांसाठी मदतकार्य करता यावे म्हणून केली. २१ तारखेला बाबूजींनी गांधीजींना कळविले की मोंघीर, दरभंगा, मुझफ्फरपूर आणि मोतिहारी या जिल्ह्यांत मोठाच अनर्थ झाला आहे. दहा ते १५ हजार लोक मेले व असंख्य लोकांना दुखापत झाली. गांधींनी बाबूजींना लिहिले की मी फार विचलित होऊन गेलो आहे, पण हाती घेतलेले काम सोडणे अधर्म होईल आणि असा अधर्म आचरून तरी मी काय करणार आहे? कालपासून मी बिहारच्या आपत्तीबद्दलच लोकांसमोर माझे अंतःकरण उघडे करीत आहे. २४ जानेवारीला ते तिनवेल्लीला होते. तेथे केलेल्या भाषणात ते म्हणाले, हा सर्व ईश्वरी कोप आहे आणि आपल्या पापांबद्दल तो आपल्याला शिक्षा करीत आहे! ठक्करबाप्पांनी त्यांना निलगिरी पर्वतावर कौन्नूर मुक्कामी एक आठवडा राहाण्याचा सल्ला दिला. पण गांधींना विश्रांतीचे नाव सुद्धा नको होते. 'हरिजन'च्या फेब्रुवारी २ तारखेच्या अंकात त्यांनी बिहार व अस्पृश्यता या विषयावर लेख लिहिला आणि अस्पृश्यतेच्या पापाबद्दल ही भूकंपाची शिक्षा ईश्वराने बिहारला केली आहे, असे म्हटले. रवींद्रनाथ टागोरांनी असले अवैज्ञानिक मत मांडल्याबद्दल गांधींना चांगले फैलावर घेतले. १६ फेब्रुवारी तारखेच्या 'हरिजन' मध्ये फिरून आपल्या मताचाच पुनरुच्चार केला. दक्षिण हिंदुस्तानातील हरिजन दौरा कर्तव्यबुद्धीने संपविल्या-वरच ते ९ मार्च रोजी पटणा येथे जाण्यास निघाले. ३ मार्च १९३४ पर्यंत

त्यांनी ३,५२,१३० रुपये जमा केले होते. ते सर्व हरिजनसेवक समाजाचे चिटणीस ठक्करबापा यांच्या हवाली केले. एका अमेरिकन पत्रकाराने त्यांना विचारले, "या पैशांचा विनियोग कसा काय होणार आहे?" गांधींनी सांगितले, "मतप्रचारावर नव्हे, केवळ विधायक कामेच यांतून करण्यात येतील." यानंतर त्यांनी जाहीर केले की इतर प्रांतांतील हरिजनकार्य, दौरे बिहारची थोडी खबर घेतल्यावर पुन: चालू होतील, तूर्त या आकस्मिक आपत्तीकडे लक्ष दिले पाहिजे.

११ मार्च १९३४ रोजी गांधी पटणा येथे पोचले. १२ मार्च हा सोमवार असल्यामुळे त्यांच्या मौनाचा दिवस होता. १४ मार्च रोजी बाबूजी आणि गांधीजी मोतिहारीला जाण्याला निघाले. सात तास त्यांना तेथे पोचण्याला लागले. इतका रस्ता खराब झाला होता. मोतिहारीमध्ये झालेला विध्वंस अवलोकन करून ते पुढे छपरा, मुझफ्फरपूर, दरभंगा, भागलपूर, सहरसा, मधुबनी, मोंघीर या सर्व भूकंपग्रस्त जिल्ह्यांची पाहणी करून पटण्याला परत आले. वाटेत बुरही येथ सनातनी लोकांनी काळे झेंडे दाखवून त्यांचे स्वागत केले. मी स्वत: पक्का असहकारवादी असलो तरी प्रस्तुत आपत्ती ध्यानात घेऊन सरकारशी सहकार्यच केले पाहिजे, असे गांधी म्हणाले. वीस हजार लोकांचा बळी अकस्मात भूकंपाने घेतला होता. अशा प्रसंगी लोकसेवा व विपस्थितांचे पुनर्वसन हा एकच धर्म आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

४ एप्रिल १९३४ रोजी डॉ. अन्सारी, भुलाभाई देसाई आणि डॉ. बिधानचंद्र रॉय हे त्यांनी दिल्लीत सभा भरवून काही राजकीय कार्य करण्याची योजना आखली होती तिला गांधींचा पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांना भेटायला आले. आगामी निवडणुकी जुन्या स्वराज्य पक्षाचे पुनरुज्जीवन करून लढवाव्या असे त्यांनी योजिले होते. 'स्वराज्यसंपादनासाठी सविनय कायदेभंग' ही चळवळ तहकूब करण्याचे गांधींनी अगोदरच ठरविले होते. म्हणून कायदेमंडळात कामे करण्याबद्दल त्यांचे १९२० साली जे मत होते त्यात काही देखील फरक झाला नसताना त्यांनी स्वराज्य पक्षाच्या पुनरुज्जीवनाचें स्वागतच केले. पटण्याहून ७ एप्रिल रोजी काढलेल्या एका पत्रकात त्यांनी या बाबतीतल्या आपल्या भूमिकेचा सविस्तर खुलासा केला. हा विचारण्यासाठी आलेल्या लोकांना दिलेला केवळ सल्ला होता. काँग्रेसचे या बाबतीतील निर्णय करण्याचे अधिकार मी बळकावू इच्छीत नाही, असे स्पष्ट केले. डॉ. अन्सारींनी गांधींच्या निवेदनाचे स्वागत केले, पण तुरुंगात असलेल्या जवाहरलाल नेहरूंना मात्र आपल्या काळजात खंजीर खुपसल्यासारखे वाटले. " The chords of alleguicnce that had bound me to him (Gandhi) for many years had snapped."

अशी त्यांची अवस्था झाली. त्यांच्याप्रमाणे इतर पुष्कळ काँग्रेसजनांची अवस्था झाली. सरकारतर्फे सेंट्रल असेंब्लीत सर हॅरि हेग यांनी सुद्धा आता काँग्रेसच्या सभा होण्याच्या कामी सरकार काही विघ्ने आणणार नाही असे जाहीर केले. काही आठवड्यांनी गांधींनी आपल्या निवेदनाची प्रदीर्घ व मनमोकळी चर्चा रांची येथे काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांबरोबर केली. अन्सारी, राजेंद्रप्रसाद, राजगोपालाचारी, असफअली, सरोजिनी नायडू, भुलाभाई देसाई, बिधानचंद्र रॉय, जमनालाल बजाज, मुनशी, दीपनारायण सिंग, मथुरादास त्रिकमजी, खुर्शेद नरीमान वगैरे काँग्रेसजन या चर्चेत सामील होते. शब्दच्छल ज्याला म्हणतात तो तेथे बहुत झाला. या चर्चेचा शवट गांधींनी पुढीलप्रमाणे केला : " I am for prosecuting the constructive programme. I am not a believer in Councils. But if I were, I would be the first member of the Swaraj Party."

१० एप्रिल रोजी गांधी आसामच्या दौऱ्यावर गेले. तारीख ११ रोजी त्यांनी रुपसी येथील सभेत भाषण केले. दोन आठवडे फिरत राहून त्यांनी रु. १७ हजार जमा केले. 'मला एखाद्याने एक कोटी रुपये दिले तरी मला अस्पृश्यता नेस्तनाबूद करता येणार नाही, पण एक कोटी माणसे जर मनापासून या कामाला जाणूनबुजून लागली तर एक पैसा न जमविता अस्पृश्यतेचे उच्चाटन होईल. स्नान करणे ठीक आहे, पण नुसत्या स्नानाने कोणी शुद्ध होत नाही, म्हशी व टोणगे देखील मजेने पाण्यात डुंबत राहातात,' असे ते म्हणाले.

आसामातील बहुतेक शहरे त्यांनी पालथी घातली. तिनसुकिया हे चहाच्या मळ्यांचे एक प्रमुख केंद्र होते. तेथे मळ्यांत व खाणींत काम करणारे कामगार मोठ्या संख्येने त्यांचे भाषण ऐकण्याला आले होते. आसामात अफूचे व्यसन मोठ्या प्रमाणात लोकांना होते व त्यामुळे त्यांचे आरोग्य बिघडले होते. हे व्यसन सोडून देण्याबद्दल त्यांनी लोकांना आवाहन केले. आसामात रु. १९ हजार रोख व रु. १५११ चे दागिने त्यांनी जमविले. २५ एप्रिल रोजी तेथून ते पुन: दक्षिण बिहारमध्ये आले. सनातनी गटांनी त्यांना काळे झेंडे दाखविले. आणि त्यांच्या गाडीची मागील काच फोडली. देवघर येथे त्यांचे भाषण झाले. एप्रिलअखेर ते रांचीला गेले. ४ मे रोजी ते उडिसाच्या दौऱ्यावर निघाले. झारसगुडा येथ दौऱ्याची सुरुवात झाली. ७ मे रोजी यापुढील सगळा दौरा पदयात्रा करून पुरा करावा ही कल्पना, देवघर येथे जे प्रकार घडले ते पाहून त्यांच्या मनात बळावत होती. त्याप्रमाणे ७ मे रोजी त्यांनी हरिजनमध्ये लेख लिहिला आणि ८ मेला पुरी येथं तो अंमलात आणला. ९ मेला ते हरिकृष्णपूरला गेले. तेथून चंद्रपूरला गेले. तेथून १० तारखेला काडुआला गेले. पदयात्रा चालू

केल्याने पुष्कळ गोष्टी सोप्या झाल्या. १५ मेला बालिअंटा येथे त्यांनी एक देवालय हरिजनांसकट सर्व हिंदूंना खुले केले. तारीख १६ ला कटक येथे एक सभा करून पटणाला जाण्यासाठी गाडी पकडली. तेथे काँग्रेसच्या अखिल भारतीय सभेला त्यांना हजर राहायचे होते. रांचीला स्वराज्य पक्षाच्या पुनरुज्जीवनासाठी केलेल्या चर्चेवर तेथे निर्णय होणार होते. डॉ. अन्सारी यांनी मुख्य ठराव मांडला. त्याला अनुसरून कायदेभंगाची चळवळ बंद करून सत्याग्रहाचा हक्क फक्त महात्मा गांधीपुरता काँग्रेसने ठेवावा असे होते. यावर उलटसुलट पुष्कळ चर्चा झाली. जयप्रकाश, आचार्य नरेंद्र देव यांनी ठरावाला विरोध केला. अनेक उपसूचना सुचविल्या गेल्या, पण त्या नापास झाल्या. गांधींनी चर्चेचा समारोप केला. आपल्या भाषणात ते म्हणाले, "मला बळकट आशा आहे की काँग्रेसमधील बहुसंख्यांना कौन्सिलकार्याचे काही आकर्षण वाटत नाही. कौन्सिलकार्याकिडे सगळे लक्ष पुरविले तर काँग्रेसने आत्महत्या केली असे होईल. कौन्सिलच्या रस्त्याने स्वराज्यप्राप्ती कधीच होणार नाही. जनतेमधील सर्वस्पर्शी जागृतीनेच स्वराज्य मिळेल."

२० मे रोजी ते पुन: उडिसाच्या अर्ध्यावर सोडलेल्या दौऱ्यावर रुजू झाले. २१ तारखेला ते बायरी स्टेशनावर उतरले. चंपापूरहाट येथील आश्रमात पायी चालत गेले. तेथे दोन दिवस त्यांनी विश्रांती घेतली. आणखी काही ठिकाणे घेतल्यावर त्यांचा उडिसा दौरा ८ जून रोजी संपला. गांधींनी सविनय कायदेभंगाची चळवळ तहकूब केल्याला दोन महिने झाल्यावर काँग्रेस बेकायदा ठरविली होती, ती कायदेशीर ठरविली. पण तिच्या सर्व शाखांवरील बंदी उठविली नव्हती आणि पटेल, जवाहर व गफारखान हे अजून तुरुंगातच होते. तीस महिन्यानंतर प्रथमच काँग्रेसची कार्यकारिणी १३ जूनला वर्धा येथे व १८ जून रोजी मुंबईस भरली. या सभेला गांधी, आझाद, अणे, सरोजिनी व राजगोपालाचारी हजर होते. कमिटीने विधायक कार्यक्रम आखला आणि लाल डगले संस्था व काँग्रेसच्या इतर शाखा यांजवरील बंदी उठविण्याचे राहून गेले आहे, असे सरकारच्या नजरेस आणिले. यानंतर गांधी पुणे, अहमदाबाद, कराची, लाहोर, कलकत्ता, कानपूर व लखनौ वगैरे शहरी गेले. बनारस येथे २९ जुलैला त्यांनी हा हरिजनदौरा संपविला. पंडित लालनाथ व देवनायकाचार्य आणि गांधी यांच्यामध्ये अस्पृश्यतानिवारणाबद्दल चर्चा झाली. त्यांना मंदिरप्रवेशाची विधेयके म्हणजे सनातन धर्मावरील हल्ला वाटत होता. गांधी नंतर वर्धा येथे गेले ते ५ ऑगस्ट १९३४ रोजी. आपला पुढील कार्यक्रम सांगताना ते म्हणाले की, राजकारणाची चर्चा करण्याला मी आता मोकळा आहे. पण मी त्यापासून दूर राहाणार आहे. मला माझे

हरिजनकार्य, स्वदेशी आणि मद्यप्रतिबंध हे पुरेसे आहे. यापूर्वी पटेलांनी बनारसला एक चर्चा घडवून आणून मालवीय व अणे यांचे सहकार्य काँग्रेसबरोबर पूर्णपणे टिकविण्याचा प्रयत्न केला. पण तो प्रयत्न फलद्रूप झाला नाही. मॅकडोनॉल्ड यांचा जातीय निवाडा त्यांना अन्यायाचा वाटत होता. काँग्रेसलाही तसेच वाटत होतें. पण काँग्रेसमधील सर्व जातीजमातींचा एकोपा राखण्यासाठी कार्यकारिणीने त्याबद्दल स्वीकारही करीत नाही व धिक्कारही करीत नाही अशी भूमिका घेतली होती. मालवीय-अणे यांना ती मान्य नव्हती म्हणून त्यांनी कार्यकारिणीचे राजीनामे दिले होते. सनातन्यांचा अस्पृश्यतानिवारणाला अजून विरोध होता. म्हणून त्यांनी सात दिवसांचे उपोषण ६ ऑगस्टपासून १३ ऑगस्टपर्यंत केले. १४ ऑगस्ट रोजी काढलेल्या एका पत्रकात त्यांनी तरीही अत्याचारी मार्गाचा अवलंब करता नये याचा पुनरुच्चार केला. शंभर टक्के स्वदेशी या विषयावर त्यांनी सूतकताई, हातमाग आणि गोरक्षण या शाखांचा सविस्तर विचार पुन: आपल्या लेखनात उपोषणानंतरच्या काही दिवसात केला. वर्ध्याहून काढलेल्या एका निवेदनात १७ सप्टेंबर १९३४ रोजी त्यांनी काँग्रसजनांकडून पुऱ्या न झालेल्या उणीवांची यादीच दिली आहे. त्या निवेदनाचा विचार सर्वांनी करावा असे म्हटले आणि काँग्रेसचे जे खास अधिवेशन २६ ऑक्टोबर रोजी मुंबईस भरले त्या अधिवेशनाला हजर राहून भाषण करून त्यांनी काँग्रेसमधून निवृत्त होण्याचा आपला निर्णय जाहीर केला. या निवेदनात गांधी म्हणतात, " माझे विचार आणि माझ्या कार्यपद्धती यांचा पुष्कळशा काँग्रेसजनांना कंटाळा आलेला आहे आणि त्यांना माझी मदत होण्याऐवजी अडथळाच होत आहे असा माझा समज झालेला आहे. हा समज खरा आहे का नाही याची परीक्षा करण्याचे मी ठरविले आहे व त्या दृष्टीने काही सूचना करणार आहे. मला व्यक्तिश: फार मानीत असल्यामुळे बरेच लोक नुसते होयबा झालेले आहेत. खादी व चरखा यांवर मनापासून कोणाचा भरंवसा नाही, कायदेमंडळांत काम करण्यासाठी उत्सुकता फार वाढली आहे, सोशालिस्ट मताचे लोक वाढत आहेत, पण त्यांचे बहुमत झाले तर मला काँग्रेसमध्ये राहाता येणार नाही. देशी संस्थानांच्या बाबतीतील माझे धोरण पुष्कळ काँग्रेसजनांना पसंत नाही, अस्पृश्यतानिवारण कार्याबद्दलही मला वाटणारा जिव्हाळा इतरांना वाटत नाही, अहिंसा देखील माझ्या अर्थाने सर्वांना मान्य नाही, तसेच सविनय कायदेभंगाबद्दल आहे, पूर्ण स्वराज्य अथवा कंप्लीट इंडिपेंडन्सबद्दलही मतभेद आहेत. या सर्व परिस्थितीचा साकल्याने विचार केला म्हणजे माझ्या भिडेखातर केवळ काँग्रेसजन माझ्या म्हणण्याला होकार भरतात, स्वत: विचार करीत नाहीत. म्हणून मी ज्या सूचना करणार आहे त्या स्पेशल काँग्रेसमध्ये लोकांना कितपत पसंत

पडतात ते पाहून मी काँग्रेसमध्ये राहायचे की बाहेर पडायचे हे ठरविणार आहे."

या निवेदनाला अनुसरून एक उपसूचना काँग्रेसच्या घटनेत सुचविली. ती म्हणजे, पीसफुल व न्याय्य म्हणजे शांततापूर्ण व लेजिटिमेट या ऐवजी नॉनव्हायोलंट व ट्रुथफुल म्हणजे अहिंसापूर्ण व सत्यपूर्ण असे शब्द घालावे. पण ही सूचना अबुल कलाम आजाद यांना देखील आवडली नाही आणि त्यांनी व अनेकांनी तिला विरोध केला आणि अखर ती स्वीकारली गेली नाही. मॅक-डॉनल्ड निर्णयाबाबत असा ठराव झाला की त्यांत बदल परस्पर पसंतीने हिंदुमुसलमानांनी केला तरच होईल आणि काँग्रेस त्या कामी तटस्थ राहील. ब्रिटिश सरकारच्या श्वेतपत्रिकेचा निषेध करण्यात आला आणि घटना समिती म्हणजे कॉन्स्टिटयुएंट असेंब्ली निवडून तिच्या मार्फतच भारताची राज्यघटना ठरविण्यात यावी. ग्रामीण उद्योगांच्या विकासासाठी ऑल इंडिया व्हिलेज इंडस्ट्रीज असोशिएशन स्थापन करण्याबद्दल ठराव झाला. यापुढे काँग्रेसवर खादी प्रदर्शन वगैरे भरविण्याची जबाबदारी असू नये असे ठरले आणि काग्रेसचे प्रतिनिधी दोन हजारपेक्षा जास्त असू नयेत व अधिवेशनें सुटसुटीत व्हावी असे ठरलें. गांधीवर पूर्ण विश्वास प्रकट करणारा ठराव एकमताने पास झाला. काँग्रेसपासून दूर राहाण्याचें गांधींनी तरी देखील जाहीर केलेच. ते म्हणाले, " Any interest in the Congress organisation will henceforth he confined to watching from a distance, enforcement of the principles for which the Congress stands. If we would be truthful through and through, then we would recognise that the predominant past of tha Congress programme has been progressively social, moral and economic. And it becomes a powerful programme because it is inevitably connected with the political that is attainment of freedom of the country from the foreign yoke, not from foreign friendship, that is voluntary intercourse on the terms of absolute equality with the foreign nations. Let me also utter a warning. I hope no one will think that the Khaddar clause and the labour franchise do not come into immediate operation. They do. I plead guilty of negligence in that I had not in the past insitsted on these things so as to make them a condition precedent to the launching of civil disobedience . My retirement from the Congress may be regarded as a penance for the negligence, although it was wholly unconscious. What I am aiming at is the development of the capacity for civil disobedience. Disobdience that is wholly civil should never provoke retaliation. "

'हरिजन' मध्ये काँग्रेसमधून बाहेर पडल्याबद्दल गांधींनी काही देखील उल्लेख केला नाही. खादी व इतर ग्रामीण उद्योगाकडे अधिक उत्साहाने लक्ष देण्याला व अस्पृश्यतेचे उच्चाटन, मद्यपानप्रतिबंध, गोरक्षण आणि गोसंवर्धन अशा विधायक कामांकडे लक्ष पुरविण्याचेच ठरवून ते वर्धा यथील सत्याग्रहाश्रमात येऊन राहिले आणि तेथून या सर्व कामांचा विकास करण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले.

□

म. रा. ग्रा. स. म. ग्रंथालय
प्र|२५३
२
मंत्रालय.

# ६. कायदेमंडळातील कामकाजाची फलश्रुती

सन १९३५ च्या पहिल्या काही महिन्यात जनतेचे लक्ष दिल्लीस सेंट्रल लेजिस्लेटिव असेंब्लीच्या कामाकडे लागले होते. २१ जानेवारी रोजी असेंब्लीच्या बैठकीला प्रारंभ झाला. वेगवेगळ्या पक्षांत तेव्हा मतविभागणी अशी होती: काँग्रेस पक्ष ४४, काँग्रेस नॅशनॅलिस्ट ११, इंडिपेंडंट २२, युरोपिअन ११, सरकारी सभासद २६ आणि सरकारनियुक्त बिनसरकारी १३. सरकारला साधारपणे ५० मते हुकमी मिळत. काँग्रेस व काँग्रेस नॅशनॅलिस्ट मिळून ५० वर मते होत. त्यामुळे सामान्यतः इंडिपेंडंट पार्टीच्या हाती एकादा ठराव व विधेयक पास करणे अथवा फेटाळून लावणे बरेचसे राहात असे. यामुळे भुलाभाई देसाईंना जीनांची मदत मिळाल्यामुळे व्हाइसरॉयना आपला 'सर्टिफिकेशन'चा अधिकार सरकारी कामकाज पार पाडण्यासाठी वापरावा लागे. १९३५ चा कायदा पूर्णपणे फेटाळण्याला काँग्रेसला जीनांनी मदत न केल्यामुळे ७२ विरुद्ध २१ मतांनी पराभव पतकरावा लागला. पण जीना यांना काँग्रेसपक्षाने मदत केल्यामुळे, मॅकडॉनल्ड निर्णय तसाच ठेवावा या ठरावाला, प्रांतिक व्यवस्थेरव टीका करणाऱ्या केंद्रातील व्यवस्था सर्वथा त्याज्य असे म्हणणाऱ्या ठरावाला आणि तेथे तावडतोब जबाबदार स्थापन करणाऱ्या ठरावाला यश मिळाले.

त्या वर्षी मांडण्यात आलेल्या अंदाजपत्रकाचा एक विशेष असा होता की प्रांतांच्या आर्थिक विकासासाठी एक कोटी रुपयांची रक्कम वेगळी राखून ठेवण्यात आली होती. ग्रामीण जनतेचा उद्धार हे त्याचे उद्दिष्ट होते. गांधींनी ग्रामोद्योगाचा कार्यक्रम आखला होता तेव्हा त्यांचे काम चालू होण्यापूर्वी आपणच ते काम सुरू करून गांधींच्या शिडातील वारा काढून घ्यावा असा त्यात उद्देश होता. सरकारने एक सर्व स्थानिक अधिकाऱ्यांकडे एक परिपत्रक पाठवून गांधींच्या खटपटीत लोकांना जागे करून सरकार उलथवून टाकण्याचा प्रकार आहे की काय इकडे लक्ष देण्याला सांगण्यात आले होते. त्या परिपत्रकात असे म्हटले होते की, मुंबईचे काँग्रेसचे खास अधिवेशन म्हणजे गांधींचा मोठाच खास वैयक्तिक विजय होता. " Mr. Gandhi has again shown himself to be a very astute political leader; his mental and political vigour is reported to be unabated and the session

has resulted in another personal triumph, for he has succeeded in keeping the divergent elements, if not in one organisation, at least under one leadership-his own."

सेंट्रल लेजिस्लेटिव असेंब्लीच्या पहिल्याच दिवशी या परिपत्रकावर वादविवाद झाला. होम मेंबर सर हेन्री क्रेक म्हणाले की हे परिपत्रक गुप्त होते आणि त्यात सरकारचे तात्पुरते बनलेले मत त्यामध्ये ग्रथित करण्यात आले होते. त्या परिपत्रकातील प्रत्येक गोष्ट सिद्ध करण्याची सरकारची तयारी आहे. कॉंग्रेसचे सेक्रेटरी कृपलानी यांनी म्हटले होते की, ग्रामीण भागांतून क्रांती उभी करण्यासाठीच ऑल इंडिया व्हिलेज इंडस्ट्रीज असोशिएशनची स्थापना करण्यात आली होती. मग या संघटनेचे धोकादायक संभाव्य परिणाम कोणते हे सरकारनें दाखविले, तर त्यात दोष देण्यासारखे काय आहे? पण प्रत्यक्ष जर असे दिसून आले की केवळ आर्थिक उन्नतीला ही संघटना वाहिली जाणार आहे, तर सरकार तिच्याबरोबर सहकार्य करील. पण कायदेभंगाच्या आंदोलनाबद्दल कॉंग्रेसची वृत्ती व ओढ कायम असल्यामुळे सरकारने आपल्या अधिकाऱ्यांना या संस्थेच्या खटपटीकडे डोळयांत तेल घालून पाहात राहा असे सांगण्यात गैर काय आहे असा सर हेन्री क्रेक यांचा सवाल होता.

गांधींनी सरकारच्या या कृतीचे स्वागतच केले. ते त्यावेळीं दिल्लीस होते. ते म्हणाले," मी जे काम करू इच्छितो ते खरोखर सरकारचेच काम आहे. सरकारला जे काही करायचे असेल तें त्याने अवश्य करावे. पण लोकांवर काही लादू नये. मला जर सरकारने मदत केली तर मी जादू केल्यासारखे परिणाम दाखवीन. त्यांना अनेक प्रकारांनी मदत करता येईल. त्यांना अवश्य ते कायदे त्याबाबत करता येतील. मला सरकारच्या कृतीवर काही टीका करायची नाही. माझे सगळे काम उघडपणेच चालते. गुप्त ठेवण्यासारखे माझ्यापाशी काही नाहीच. पॉलिश न केलेला तांदूळ, हाताने दळलेले पीठ, खेड्यात तयार होणारा गूळ करा आणि याच्या उलट वागून प्रकृतीची खराबी करून घेऊ नका. हेच मी लोकांना सांगत आहे."

या मोहिमेची सुरुवात त्यांनी २५ जानेवारीच्या हरिजनाच्या अंकात एक लेखमाला लिहून केली. गहू व गूळ यांचा उपयोग कसा करावा हे दुसऱ्या लेखात सांगितले. स्वच्छता कशी राखावी, मलमूत्राचा खत म्हणून कसा उपयोग करावा, पालेभाज्यांची लागवड व उपयोग कसा करावा हेच विषय विविध प्रकारे त्यांच्या लेखनात येत राहिले. इंदुरास हिंदी साहित्य संमेलनासाठी ते गेले, ग्रामोद्योगांचे प्रदर्शन तेथें भरविण्यात आले. पीअरे सेरेसोल या फ्रेंच विद्वानाशी बोलताना त्यांनी दाखवून दिले की, स्वार्थत्यागपूर्वक व अहिंसामार्गानें

काम करीत राहिले म्हणजे सर्व प्रश्न सोपे होतात. त्यांचेजवळ झालेल्या या संभाषणात कम्युनिस्ट दृष्टिकोण व गांधींचा दृष्टिकोण यावर चर्चा झाली. श्रमाच्या पावित्र्याच्या पायावर उभारलेली समाजव्यवस्था स्थापन झाली पाहिजे असे म्हणून गांधींचे असे आपले मत नाही का असे त्यांना विचारले. किती काळपर्यंत श्रीमंत लोकांचे परिवर्तन होण्यासाठी आपण वाट पाहावी ? यावर गांधींचे उत्तर असे होते की माझी अंतिम कसोटी अहिंसा ही आहे. माझ्या पद्धतीने त्यांचे मतपरिवर्तन होण्यासाठी मी वाट पाहाणार· मध्यंतरीच्या काळात तो जर म्हणेल की माझ्यासाठी २५ टक्के ठेवून ७५ टक्के मी धर्मादाय म्हणून देईन, तर मी तें कबूल करून तेथेच थांबेन, कारण खुषीने दिलेले ७५ टक्के हे जबरदस्तीने घेतलेल्या १०० टक्क्यांपेक्षा बरे. श्रीमंतांनी करण्याजोगी योग्य गोष्ट म्हणजे, त्यांनी आपल्या मालमत्तेचे ट्रस्टी म्हणून वागावे. 'हरिजन' मध्ये विविध प्रकारांनी लोकशिक्षणाचे कार्य गांधी अविरतपणे करीत होते. सोशालिस्टांच्या मते जनतेचे दारिद्र्य देशाचे औद्योगिकीकरण केल्याने दूर होईल व त्यासाठी यंत्रांची जरुरी आहे, पण गांधींचा यंत्रांना विरोध आहे असे ते म्हणत, याविषयी खुलासा करताना गांधी म्हणाले, चरखा हे एक यंत्रच आहे, सिंगरचे शिवण्याचे मशीन हे यंत्रच आहे. यांना मी विरोध करीत नाही. कोणतीही यंत्रणा माणसाला त्याचा गुलाम न करता शारीरिक परिश्रमाचा वाव ठेवणारी असेल तर तिला माझा मुळीच विरोध नाही, असे गांधींनी सांगितले. विद्युतशक्तीलाही त्यांचा विरोध नव्हता. खेड्यांतील प्रत्येक घरात वीज पोचावी व तिच्या साहृयाने खेडुताचीं हत्यारे व अवजारे चालावी. पण गायराने जशी सरकारी मालकीची आहेत तशी विजेची 'पॉवर हाऊसेस' सरकारी मालकीची पाहिजेत. पण जेथे या सोयी नाहीत तेथे रिकाम्या हातां-मध्ये चरखा हेच सर्वत्र उपयोगात आणण्याजोगे यंत्र आहे. त्यांचे टीकाकारांना उत्तर अशा प्रकारचे नेहमी असे. मेच्या शेवटच्या आठवड्यात ते बोरसदला गेले. तेथे प्लेगची साथ जोरात सुरू होती व उंदरांची व माश्यांची हत्या करण्याची मोहीम जोरात होती. चार वर्षे सतत येथे प्लेगचा उद्‌भव होत राहावा ही शरमेची गोष्ट आहे. बोरसद शहराची लोकसंख्या १३ हजार व सबंध तालुक्याची १ लक्ष ४४ हजार होती. येथून प्लेगची हकालपट्टी करणे अशक्य कां व्हावे ? पण साऱ्या शहराकरिता फक्त सहा भंगी नेमून हे शक्य नाही. सर्वांनी भंगीकाम अंगीकारले तरच प्लेग आटोक्यात येईल, असे गांधींचे म्हणणे. गांधी आठ दिवस बोरसदला राहिले. घरांच्या छपरात उंदीर वास्तव्य करणार नाहीत अशी ती बनविली पाहिजेत, असे डॉक्टरांच्या मदतीनें समजावून दिले. पण असलेल्या उंदरांना व माश्यांना नष्ट करण्याला त्यांनी

हरकत घेतली नाही. बोरसदचा दौरा संपतो न संपतो तोच क्वेटा येथें भूकंप झाल्याची वार्ता आली. एका क्षणात २५ हजार लोक मरण पावले. गांधींनी 'हरिजन' मध्ये 'आपण प्रार्थना करू या' असा लेख लिहिला. बिहार भूकंपाबद्दल त्यांनी जे म्हटले तेच बलुचिस्तानातील या आपत्तीबद्दल म्हटले. तेथे सरकार मदतीची सर्व काळजी घेत होतें आणि बाहेरच्या कोणालाही तेथे जाण्याला बंदी होती. गांधी आणि राजेंद्रप्रसाद यांनाही परवानगी मिळाली नाही. क्वेट्टयाच्या आपत्तीपेक्षाही हिंदुस्तानच्या कोटयवधी लोकांची कायमची आपत्ती म्हणजें दारिद्रय ! ते कसे नष्ट करावे याचा विचार ते वर्ध्याला करीत होते. 'हरिजन' मध्ये 'भाकरीकरिता श्रम करण्याचे कर्तव्य' या विषयावर त्यांनी लेख लिहिला. इतर वाटेल तितके मानसिक, बौद्धिक व शारीरिक देखील श्रम करावे, पण स्वतःचे अन्न ज्यातून मिळेल इतके शारीरिक श्रम प्रत्येकाने केलेच पाहिजेत हे त्याचे सार होते. सर्व कामकऱ्यांना हल्ली मिळतें त्याहून अधिक वेतन मिळाले पाहिजे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

कॉंग्रेसच्या कार्यकारिणीची सभा १ ऑगस्ट रोजी वर्ध्यास झाली. सेंट्रल लेजिस्लेटिव असेंब्लीचे काम ठीक चालले होते, पण शेकडो राजकीय कैदी अजून तुरुंगात होते आणि त्यामध्येच जवाहरलाल नेहरू, डॉ. खानसाहेब, व गफार खान हे होते. लवकरच येणाऱ्या राजकीय सुधारणांबद्दल कोणालाच आस्था नव्हती. १९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टाला पाचवे जॉर्ज यांनी २ ऑगस्ट रोजी संमती दिली, पण त्याची वास्तपुस्त कोणी केली नाही. गांधींनी हरिजनात त्याचा काहीच उल्लेख केला नाही. त्यांचे सर्व लक्ष ग्रामोद्योग संस्था व हरिजन सेवा यांकडे लागलेले होते. पासष्टाव्या वाढदिवसानिमित्त आलेल्या सर्व सदिच्छांना त्यांनी एका शब्दात उत्तर दिलें, "Thanks. My mind is living in the villages. They are calling me to bury myself in them." आपल्या सर्व कार्याच्या मुळाशी फक्त अहिंसा आहे असा त्यांचा दावा सतत होता. हिन्दु-मुसलमानांचा कलह हिंदुस्तानात चालू होता. त्या कामी त्यांनी आपला पराभव तात्पुरता मान्य केला. शांततेचा त्यांचा संदेश हिंदुस्तानपुरताच नव्हता. हिटलरच्या अंमलाखालचा जर्मनी, फॅसिस्ट इटली, व लष्करशाही जपान यांच्या कृत्यांमुळे त्यांच्या मनाला यातना होते होत्या. अहिंसा हे सार्वत्रिक ब्रीद झाले पाहिजे असे त्यांना वाटत होते. 'अहिंसा सर्वश्रेष्ठ शक्ती' या मथळ्याखाली १३, ऑक्टोबर १९३५ साली त्यांनी लिहिले, "Non-violence to be a creed has to be all-pervasive. I cannot be non-violent about one activity of mine and violent about others. That would be a policy, not a life-force. It is my unshakable belief that India's destiny is to deliver the message of non-violence

to mankind. It may take ages to come to fruition, but as far as I can judge, no other country will precede her in the fulfilment of that mission."

गांधी आपल्या शरीराकडून त्याच्या शक्तीबाहेर काम करून घेत होते. परिणामी डिसेंबर महिन्यात ते आजारी पडले. त्यामुळे सगळ्या मुलाखती आणि दौरे थांबवावे लागले. फक्त जपानी कवी योने नागुची याला थोडा वेळ भेटण्याची परवानगी मिळाली. गांधींच्या डोक्यावर भिजलेल्या मातीच्या पट्टीची घडी घातलेली होती व ते पडून होते. किंचित स्मित करूनगांधी त्यांना म्हणाले, "I sprang from Indian earth and so it is Indian earth that crowns me."

इंडियन नॅशनल कॉंग्रेसला २८ डिसेंबर १९३५ रोजी पन्नास वर्ष पुरी होत होती. तो दिवस हिन्दुस्तानभर उत्साहाने पाळण्यात आला. राजकीय बाबींवर काही बोलायचे नाही याचा खुलासा त्यांनी केला: "One must forget the political goal in order to realise it. That is why, take keenest interest in discussing vitamins and leafy vegatables and unpolished rice. That is why it has become a matter of absorbling interest to me to find how best to clean our latrines, how best to save our people from the heinous sin of fouling Mother Earth every morning. I do not quite see how thinking of these necessary problems and finding a solution for them has no political signigficance and how an examination of the financial policy of the Government has necessarily a political bearing. What I am clear about is that the work I am doing and asking the masses to do is such as can be done by the millions of people, whereas the work of examining the policy of the rulers will be beyond them...... I can confidently claim that I yield to no one in my passion for freedom. No fatigue or depression has seized me. many years' experience has convinced me that the activities that absorb my energies and attention are calculated to achieve the nation's freedom, that therein lies the secret of non-violent freedom."

गांधी हाय ब्लडप्रेशरने अजून आजारीच होते आणि त्यांना भेटायला कोणी येऊन त्रास देऊ नये म्हणून खुद्द जमनालाल बजाज रखवाली करीत होते. तथापि १९३६ जानेवारीच्या मध्याला जागतिक संततिनियमनाच्या चळवळीच्या प्रमुख कार्यकर्त्या मार्गारेट सँगर त्यांना भेटायला आल्या व त्यांना

भेटण्याची मुभा देण्यात आली. गांधी आत्मसंयमाने संततिनियमनाचा पुरस्कार करणारे, तर सँगरबाई कृत्रिम साधनांच्या पुरस्कर्त्या, यामुळे त्यांची चर्चा खूप रंगली, परंतु दोघांच्याही भूमिका होत्या तशाच राहिल्या; त्यात मुळी देखील बदल झाला नाही. पण ही मुलाखत गांधींच्या बाजूने फार कष्टप्रद झाली व त्यांची प्रकृती जास्तच बिघडली. १७ जानेवारी रोजी त्यांना सगळे दात काढून टाकण्यासाठी मुंबईस नेण्यात आले. तेथून २१ तारखेला ते अहमदाबादेस गेले व दोन महिने गुजरात विद्यापीठात राहिले. दोन महिनेपर्यंत त्यांनी 'हरिजन' साठी काही लेखन केले नाही. २० फेब्रुवारीला ते वर्ध्यास परत येण्याला निघाले. वाटेत बारडोलीस मुक्काम केला असता अमेरिकन नीग्रो लोकांचे एक शिष्टमंडळ त्यांच्या भेटीला आले. डॉ. थर्मन हे त्या शिष्टमंडळाचे पुढारी होते. त्यांजबरोबर झालेल्या चर्चेत गांधींनी अहिंसा आणि जरूर पडेल त्याप्रमाणे अहिंसात्मक असहकारिता हेच मार्ग नीग्रो लोकांचे सर्व प्रश्न सोडविण्याला उपयोगी पडतील असे प्रतिपादन केले. डॉ. थर्मन यांना त्यांचा संदेश पटला असे त्यांनी सांगितले. गांधी त्यावर म्हणाले; " It may be through the Negroes that the unadulterated message of non-violence will be delivered to the world."

२९ फेब्रुवारी १९३६ रोजी गांधींनी 'हरिजन' मध्ये पुन: लिहिण्याला प्रारंभ केला. त्या पहिल्या लेखात त्यांनी बरेच आत्मसंशोधन करून असा निष्कर्ष काढला की, गीतेने शिकविलेली अनासक्ती आपण आपल्या सर्व कामांमध्ये ठेवू शकलो नाही, ती मनःस्थिती प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न पुढे चालू ठेविला पाहिजे. २९ फेब्रुवारीपासून ६ मार्चपर्यंत गांधी सेवासंघाचे संमेलन झाले. किशोरलाल मश्रुवाला अध्यक्षस्थानी होते, त्यात भाषण करताना गांधींनी सांगितले की, " There is no such thing as Gandhism and I do not want to leave any sect after me. I do not claim to have originated any new principle or doctrine. I have simply tried in my own way to apply the eternal truths to our daily life and problems. There is, therefore, no question of my leaving any code like the code of Manu. The opinions I have formed and the conclusions I have arrived at are not final and may change them tomorrow. I have nothing new to teach the world, Truth and non-violence are as old as the hills."

मार्च १९३६ मध्ये जवाहरलाल नेहरू आपला युरोपचा दौरा आटोपून परत आले. ते काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून लखनौ काँग्रेस एप्रिल महामध्ये भरली तेव्हापासून पाहू लागले. त्यांचे बहुतेक ठराव कार्यकारिणीने व अखिल भारतीय कमिटीन

स्वीकारले, पण काही नाकारले. मुख्य ठराव १९३५ च्या कायद्याप्रमाणे जी निवडणूक होणार होती तिजबद्दल होता. निवडणुका लढविण्याचे ठरले, पण प्रांतांत मंत्रिपदे स्वीकारायची अथवा नाही याबद्दलचा निर्णय पुढे ढकलण्यात आला. संस्थानी प्रजेला ब्रिटिश हिंदुस्तानातील नागरिकाप्रमाणेच हक्क असले पाहिजेत असा ठराव झाला. ग्रामीण नागरिकांच्या म्हणजे शेतकऱ्यांविषयीचा ठराव हा सर्वांत महत्त्वाचा ठराव वर्किंग कमिटीने पास केला हे नेहरूंचे मोठे यश म्हटले पाहिजे. कारण असा ठराव प्रथमच काँग्रेसने केला. या ठरावाची संहिता पुढे दिल्याप्रमाणे आहे: This Congress calls upon each of the Provincial Congress committees to make recommendations in detail to the working Committee by August 31, 1936 for being considered and placed before the All India Congress Committee, having particular regard to the following matters: (1) Freedom of organisation of agricultural labourers and peasants (2) Safeguarding of the interests of the peasants where there are intermediaries between the state and themselves (3) Just and fair relief of agricultural indebtedness including the arrears of rent and revenue (4) Emancipation of the peasants from feudal and semi-fendal levies (5) Substantial reduction in respect of rent and the revenue demands (6) A just allotment of the State expenditure for the social, economic and cultural amenities of the villages (7) Protecton against harassing restrictions on the utilisation of the local natural facilities for their domestic and agricultural needs (8) Freedom from oppression and harassment at the hands of Government officials and landlords (9) Fostering industries for relieving rurals unemployment.

काँग्रेसच्या या अधिवेशनात असे दिसून आले की बहुमताचा पाठिंबा जुन्या नेतृत्वालाच आहे. वर्किंग कमिटीत जे लोक आले ते पाहून नेहरूंनी राजीनामा देऊ केला, पण त्यांची समजूत काढण्यात आली. नेहरूंनी सुभाषचंद्र बोस, जयप्रकाश नारायण, नरेंद्र देव आणि अच्युत पटवर्धन यांना कार्यकारिणीवर घेतले. गांधींनी या अधिवेशनाच्या कामकाजात मुळीच भाग घेतला नाही, पण खादी ग्रामोद्योग प्रदर्शनाचे उद्घाटन मात्र त्यांनी २८ मार्च रोजी केले. १२ एप्रिल रोजी पुन: एक भाषण करून सर्वांना या प्रदर्शनाला एकदा नव्हे तर दोनदा, तीनदा, चार वेळा भेटी देऊन तेथील वस्तूंचा अभ्यास करण्याला आवाहन केले. लखनौ येथील १५ दिवसांच्या मुक्कामात या प्रदर्शनांनीच त्यांच्या मनाची

पुरी पकड घेतली होती. खेडी, तेथील लोक, त्यांची कामे, त्यांची राहणी, त्यांचे गुण व दोष यांकडे अक्षम्य दुर्लक्ष झालें आहे व त्याची भरपाई मध्यमवर्गीयांनी आपल्याला त्यांच्यामध्ये गाडून घेऊन त्यांना व स्वतःला सुधारण्याचा उद्योग सतत व स्वराज्य मिळाल्यानंतरही चालू ठेविला पाहिजे, असे गांधींच्या म्हणण्याचे तात्पर्य व रहस्य होते. ग्रामोद्वारकार्याकडे त्यांनी सध्या, लक्ष पुरविण्याचे ठरविले होते. डॉ. आंबेडकर त्यांना भेटण्यासाठी शेगावला आले. हरिजन सेवासंघाच्या शाखा व कार्य सर्व देशभर पसरत होते. त्रावणकोरात मंदिर-प्रवेशाच्या चळवळीला जोर चढत होता. ख्रिस्ती मिशनरी मंडळींनी हरिजनांच्या दारिद्र्याची परिस्थिती पाहून, त्यांना विलोभने दाखवून बाटविणे सोडून द्यावे असे समजावित होते. मे महिन्यात त्यांना समजले की त्यांचा मोठा मुलगा हरीलाल याने मुसलमानी धर्म स्वीकारून अब्दुल्ला हे नाव धारण केले होते. आपल्या मुसलमान मित्रांना त्यांनी समजावून सांगितले की, हा काही प्रामाणिक धर्मांतराचा प्रकार नव्हता. हरीलाल पक्का दारुबाज व रंडीबाज झाला होता आणि कर्जबाजारी झाला होता. तेव्हा द्रव्याची लालूच दाखवून त्याला मुसलमान करण्यात आपण काही पुण्यकृत्य अथवा धर्मसेवा केली असे कोणी जाणत्या मुसलमानाने समजू नये, असे गांधींनी जाहीरपणें म्हटले. 'हरिजन' मध्ये खादी ग्रामोद्धार व अंत्यजसेवा याखेरीज कोणतेही विषय चर्चिले जात नसत. पण डॉ. अन्सारी कालवश झाल्यावर १६ मेच्या अंकात त्यांनी मृत्युलेख लिहिला. तसेच १० जून रोजी आबास तय्यबजींचे देहावसान झाल्यावर त्यांनी त्यांचे गुणग्रहण केले. मेअखेर ते बंगळूरला गेले. तेथे दक्षिण हिंदुस्तान हरिजन परिषदेत भाषण केले. हरिजनांशी सवर्णांनीं एकरूप होऊन त्यांची सेवा केली पाहिजे, हे त्या भाषणाचे सूत्र होते. नंतर हिंदी प्रचार मंडलाच्या विद्यार्थ्यांपुढे बोलताना हिंदी-हिंदुस्तानी ही राष्ट्रभाषा व्हावी आणि देवनागरी ही तिची लिपी असावी, असे प्रतिपादन केले. तसेच सर्व देशी भाषांची म्हणजे तमीळ, तेलगु, कन्नड व मल्याळम व बंगाली प्रभृती संस्कृतोद्भव भाषांची लिपी देवनागरी झाली, तर सर्व प्रांतांना, सर्व प्रांतांच्या भाषा समजणे सुलभ होईल असे त्यांनी सांगितले.

नंदी-बंगळूरचा दौरा आटोपून १६ जूनला वर्ध्यास येऊन नंतर ते पुन शेगाव येथे राहू लागले. जूनअखेर काँग्रेस कार्यकारिणीची सभा वर्ध्याला होती म्हणून तेथ गेले. लखनौची काँग्रेस झाली तेव्हापासून नेहरूंना चित्त-स्वास्थ्य असे नव्हते आणि त्यांनी आपली व्यथा गांधींना पत्र लिहून त्यांजपाशी मोकळी केली. ७ जुलै रोजी वल्लभाई पटेल, राजेंद्रप्रसाद व अबुल कलाम आजाद या पार्लमेंटरी बोर्डाच्या सभासदांनी प्रांतिक कायदेमंडळे

व लेजिस्लेटिव असेंब्लीच्या निवडणुकी कॉंग्रेसने बहुमताने जिकाव्या म्हणून मोहीम सुरू केली. यानंतर कॉंग्रेसचे अध्यक्षपद सोडून देण्याचा विचार नेहरूंनी केला होता. पण स्पेनमधील यादवी युद्ध सुरू झाले आणि तो विचार त्यांनी सोडून दिला. गांधी व नेहरू यांच्यामधील अंतर फार वाढत चालले आहे अशा बातम्या वर्तमानपत्रात वारंवार येऊ लागल्या. त्यामुळे गांधींनी २५ जुलैच्या 'हरिजनच्या' अंकात नेहरू व मी प्रतिस्पर्धी आहो काय? या मथळयाखाली एक लेख लिहिला. या लेखात त्यांनी लिहिले: "I cannot think of myself as a rival to Jawaharlal or him to me. Or, if we are rivals in making love to each other in the pursuit of a common goal. And if in the joint work for reaching the goal, we at times seem to be taking different routes, I hope, the world will find that we had lost sight of each other only for the moment and only to meet again with greater mutual attraction and affection."

गांधींनी नेहरूंना भक्कम पाठिंबा दिला व कॉंग्रेस कार्यकारिणीत दिलसफाई होऊन निवडणुकीचा जाहीरनामा काही कटकट न होता तयार झाला. या जाहीरनाम्यात पूर्ण राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि कॉन्स्टिटयूएंट असेंब्ली म्हणजे स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर होणाऱ्या स्वराज्याची घटना तयार करण्यासाठी भरविण्याची सभा ही उद्दिष्टे जाहीर करण्यात आली. कायदेमंडळात प्रतिनिधी पाठवायचे ते १९३५ च्या कायद्याशी सहकार्य करण्यासाठी नव्हे, तर तो लवकर संपुष्टात यावा म्हणून, असे स्पष्ट करण्यात आले. तावडतोब अंमलात आणण्याच्या गोष्टी नागरिक स्वातंत्र्ये व समान हक्क व सामाजिक व आर्थिक विकासाचा कार्यक्रम आखणे असे ठरले. मुस्लिम लीगचा निवडणूक जाहीरनामा याहून फारसा निराळा नव्हता. फक्त मुसलमानांना मिळालेले हक्क व सवलती कायम राहाव्या आणि त्यात वाढ व्हावी असे त्यात म्हटले होते. गांधी या कामात कोठेही पडले नाहीत. ते शेगावलाच आपले आखून घेतलेले ग्रामोद्धाराचे कार्य करीत राहिले. सर्प आणि सरपटणारे प्राणी मानवाचे, खेडूत मानवाचे शत्रू नसून मित्र आहेत, शेतातील उंदीर हे पिकांना विघातक असणाऱ्या किडयांचा नाश करतात, सर्पातही विषारी व बिनविषारी असे भेद आहेत आणि विषारी सर्प देखील त्याच्यावर आपला पाय पडल्याखेरीज दंश करीत नाहीत. या उपयुक्त गोष्टी शेतकऱ्यांना समजावून सांगण्याची गरज आहे असे त्यांच्या ध्यानात आले. शेगाव म्हणजे अनारोग्याचे माहेरघर होते. तेथे होणारा मलेरिया हा तेथील लोकांच्या राहणीत जरूर ते फरक केले तर नाहीसा होण्यासारखा होता. मलेरिया व अतिसार यावर, अन्नग्रहण योग्यप्रकारे करणे,

स्वच्छता पाळणे आणि मलमूत्रविसर्जनाची व्यवस्था आरोग्याच्या नियमांना धरून करणे हे उपाय होते व त्यांचा उपयोग करून हे रोग आटोक्यात आणता आलेच पाहिजेत असा निश्चय त्यांनी केला. मलेरियाचा त्रास त्यांनाही सोसावा लागला, पण सप्टेंबरअखेर त्यांना साधारण बरे वाटले आणि त्यांनी आपले ग्रामीण प्रशिक्षणाचे काम सुरू केले. जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल व राजेंद्रप्रसाद तेथे आले असता ते त्यांना म्हणाले, "मलेरिया, कॉलरा वगैरे व्याधी आपणच आपल्या गुणांनी आपल्यावर ओढवून घेतो. स्वत: उदाहरण घालून देऊनच आपण खेडुतांना हे शिकविले पाहिजे."

दिल्ली व राजकोट येथे जाऊन आल्यावर गांधी अहमदाबादेस गुजराती साहित्य संमेलनासाठी गेले. आपण साहित्यिकांमध्ये वावरण्याला अगदीच नालायक आहो असे त्यांना वाटले. आपल्या लक्षावधी देशबांधवांच्या, खेड्यांत राहाणाऱ्या लोकांच्या तहानभुका व गरजा काय आहेत याचा त्यांना काहीच पत्ता नाही असे त्यांच्या कृती व वृत्ती यावरून त्यांना दिसून आले. 'आपले साहित्य कोणासाठी?' असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. आंग्लशिक्षित मध्यम-वर्गीय यांना लिहिलेले सर्व वाङ्मय खेडुतांच्या काही कामाचे नाही. कृष्णलाल जव्हेरी यांनी बंगालीमधून कृष्णचरित्र गुजरातीत भाषांतरित केले आहे. ते पुस्तक चांगले आहे, पण निरक्षर खेडुतांना त्याचा काय उपयोग; शेगावच्या 'अस्थी व चर्म' फक्त असलेल्या मानवी सांगाड्यांचा जेव्हा मी विचार करतो तेव्हा आपले साहित्य अगदी कुचकामी आहे असे मला वाटते (Our literature is a miserable affair) आचार्य ध्रुव यांनी मला शंभर पुस्तकांची एक यादी पाठविली, पण त्यांतील एक देखील त्यांच्या उपयोगाचे नाही. खेडुतांच्या बायकांपुढे व त्याच्यांपुढे मी काय ठेवावे? कथा आणि कादंबऱ्या यांच्यावाचून गुजरातीचे काही अडणार नाही. गुजराती भाषेत्रे, संस्कृतच्या एका कन्येचे अर्थवाही सामर्थ्य कमी नाही, पण तीत तथाकथित वाङ्मय निर्माण करणाऱ्या साहित्यसेवकांचे सामर्थ्य व दृष्टी तोकडी आहे. खगोलशास्त्र आणि भूगोलशास्त्र यांवर गुजरातीत काही वाचनीय असे आहे काय? फ्रेंच अथवा जर्मन भाषांतील कोणतेही चांगले पुस्तक तेव्हाच इंग्रजीत भाषांतरित होते आणि इंग्रजी भाषा अशीच समृद्ध झाली आहे. यानंतर गांधी गुजराती साहित्याच्या दुसऱ्या एका अंगाची तपासणी करण्याकडे वळले. ज्योती संघ नावाच्या स्त्रियांच्या एका संस्थेने पत्र लिहून गुजराती साहित्यिकांच्या अलीकडील एका हीन प्रवृत्तीचा निषेध केला होता. स्त्रियांचे विकृतपणे वर्णन व चित्रण कथा-कादंबऱ्यांमधून करणे ही ती प्रवृत्ती होय. स्त्रीशरीराचे कामुक भावना जागृत करणारे वर्णन व पुरुषसत्ताक समाजपद्धतीत त्यांच्या अंगी

कोणते गुण असणे योग्य यासंबंधीच्या अपेक्षा यांची रेलचेल या साहित्यकृतीत असते अशी तक्रार या ज्योती संघाने केली होती. मी साहित्यिकांपुढे एक साधी कसोटी ठेवितो. स्त्रियासंबंधाने लिहिताना त्यांच्याबद्दल तुम्ही कसा विचार करता? मी तुम्हाला असे सुचवितो की, कागदाला लेखणी लावण्यापूर्वी स्त्री ही तुमची आई आहे असे समजा. म्हणजे अगदी शुद्ध व पवित्र साहित्य तुमच्या लेखणीतून स्त्रवू लागेल. लक्षात ठेवा, की स्त्री ही तुमची पत्नी होण्यापूर्वी तुमची माता होती. स्त्रियांच्या अंगप्रत्यंगाची तपशीलवार वर्णने म्हणजे वाङ्मयाचा अवश्य भाग आहे असे का मानण्यात यावे याचे मला नवल वाटते. उपनिषदांत, कुराणात वा बायबलात असे काही आहे का? तुळशीदासाच्या रामायणाचा विचार करा. आजकालच्या साहित्यात स्त्रियांबद्दल जसे लिहिले जाते तसे काही त्यात सापडते का?

१९३६ साल संपत आले तेव्हा काँग्रेसच्या नव्या वर्षाचा अध्यक्ष म्हणून कोणाला निवडावे याची चर्चा सुरू झाली. वर्षभर झटून काम करून नेहरूंनी काँग्रेसमध्ये नवचैतन्य उत्पन्न केले होते. म्हणून पुन: आणखी एक वर्ष त्यांनाच अध्यक्ष करावे असे जनमत प्रबल होत होते. नेहरूंचा याला नकार नव्हता, पण आपली मते काय आहेत हे नीट ध्यानात घेऊन आपल्याला पुन: अध्यक्ष म्हणून निवडायचे असेल तर निवडावे असे त्यांचे म्हणणे होते. वल्लभभाईंनी आपल्याला अध्यक्षपद नको असे केव्हाच जाहीर केले होते. त्यांनी हे स्पष्ट केले की मी अध्यक्ष होण्यास कबूल नाही याचा अर्थ जवाहरलालांची सर्व मते मी मान्य करतो असे नव्हे. उदाहरणार्थ, भांडवलशाहीचे काही दोष नाहीसे करता यणार नाहीत असे मला वाटत नाही. तरी असलेल्या काँग्रेसजनात सर्वोत्तम म्हणून त्यांनाच निवडावे असे माझे मत आहे असे सरदार पटेल म्हणाले. आता काँग्रेस प्रथमच ग्रामीण भागात भरणार होती. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने पूर्वखानदेशात फैजपूर यथे सर्व तयारी करण्याचे आपल्या अंगावर घेतले होते. गांधींनी ते यशस्वी व्हावे म्हणून पणच लावला होता. टिळकनगर ही काँग्रेसची छावणी म्हणजे बांबूनगरच तयार झाले. गांधींनी लिहिले : ग्रामीण काँग्रेस व खादी-ग्रामोद्योगाचे प्रदर्शन बरोबरच भरविण्याची कल्पना माझी आहे व म्हणून त्यामध्ये ज्या उणीवा अथवा दोष दिसून येतील त्याची जबाबदारी माझ्यावर आहे. प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना केलेल्या भाषणात गांधी म्हणाले, "वैकुंठ मेहतांनी प्रदर्शन लहान आहे म्हणून दिलगिरी व्यक्त केली, पण तसे करण्याचे काही कारण नाही. यात एकही अनावश्यक

वस्तू ठेविलेली नाही. यातील मुंजगवत, केळीची सोपटे आणि बांबू यांजपासून तयार केलेला हातकागद पाहा. येथे उभारलेल्या सगळ्या बांधकामात बांबूचा भाग केवढा मोठा आहे ते पाहा आणि लक्षात ठेवा, की काँग्रेसचे काम संपल्यावर हा सगळा बांबू सत्कारणी लागणार आहे. सहा बैलजोड्यांनी ओढलेल्या, सजविलेल्या रथात बसून आपल्या अध्यक्षांची जी मिरवणूक आपण काढली तिच्या साधेपणाची सर पूर्वीच्या कोणत्याही अध्यक्षीय मिरवणुकीला आली नाही." एक लाख लोक काँग्रेसच्या या मेळाव्यात आले होते.

नेहरू आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, "काँग्रेस आज पूर्ण लोकशाहीचा पुरस्कार करीत आहे, समाजवादाचा नाही. काँग्रेस साम्राज्यवाद-विरोधी आहे आणि राजकीय व आर्थिक चौकटीत मोठे बदल करण्याकरिता झगडत आहे, मला आशा आहे. की घडामोडींची तर्कशुद्ध परिणती समाजवादात होईल. कारण भारताच्या आर्थिक अधिव्याधींवर सोशालिझम हाच एकमेव उपाय आहे असे मला दिसते." यानंतर नेहरू हिन्दुस्तानच्या समस्यांकडे वळले. नवी राज्य घटना, कॉन्स्टिटयूएंट असेंब्ली आणि केंद्रात संकल्पिलेल्या संस्थाने व ब्रिटिश मुलुखांची सांगड घालणे यांना विरोध व्यक्त केला. नंतर त्यांनी प्रांतामध्ये मंत्रिपदे स्वीकारण्याच्या प्रश्नाचा विचार केला आणि त्याविरुद्ध मत दिले. सर्व साम्राज्यवादविरोधी शक्तींची आघाडी संयुक्तपणे उभारणे हे काँग्रेसपुढील काम आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. काँग्रेसमध्ये अधिकारपदे व मंत्रिपदे स्वीकारण्याच्या प्रश्नावर उघड मतभेद होता व त्याबद्दलचा निर्णय निवडणुका उरकल्यावर जी परिस्थिती दिसेल ती पाहून करावा असे ठरविण्यात आले.

१९३५च्या राजकीय सुधारणा कायद्याबद्दल पुढील ठराव झाला: "This Congress reiterates its entire rejection of the Government of India Act of 1935 and the constitution that has been imposed on India against the declared will of the people of the Country. In the opinion of the Congress, any cooperation with the consititution is a betrayal of India's struggle for freedom and a strengthening of the hold of British Imperialism. The Congress, therefore, repeats its resolve not to submit to this constitution or to cooperate with it, but to ccmbat it inside and outside the legislatures, so as to end it. The Congress does not and will not recognise the right of any external power or authority to dictate the political and econcmic

structure of India and every such attempt will be met by the organised and uncompromising opposition of the Indian people. The Congress stands for a genuine democratic state in India where political power has been transferred to the people as a whole and the Government is under their control. Such a state can only come in existence through a constituent assembly elected by adult suffrage and having the power to determine finally the constitution of the country."

काँग्रेसच्या अधिवेशनाच्या वादविवादात गांधी कोठे सामील झाले नाहीत. परंतु २७ डिसेंबर रोजी प्रदर्शनाच्या मैदानावर त्यांनी केलेले भाषण अर्थपूर्ण होते. "I am powerful as ever and will prove it when time comes." असे ते म्हणाले. त्यांच्या भाषणाने अनेकांच्या शंकाकुशंकांचें आणि हरकतींचे निरसन होऊन विधायक कार्यक्रमाची महती सर्वांना समजली. गांधी म्हणाले, "मी काहीच नवीन सांगणार नाही. चरखा चालवा असे मी १८ वर्षांपूर्वी सांगितले. त्याच्या सामर्थ्यावरील माझा विश्वास १९१८ साली होता तेवढाच आजही लखलखीत आहे. अनुभव आणि प्रयोग यांमुळे तो आणखीच तेजस्वी झाला आहे. केवळ खादी वापरणे पुरेसे नाही. ती नेहमी वापरली पाहिजे आणि विदेशी कापडाला कधीच स्पर्श करता कामा नये. खादी वापरणे हाच स्वदेशी बाणा आहे आणि उपाशी राहाणाऱ्या लक्षावधी भारतीयांबरोबर एकरूप होणे आहे. स्वराज्यासंबंधी माझी कल्पना काय आहे याबद्दल काही गैरसमज नसावा. परकी नियंत्रणापासून पूर्ण मुक्तता आणि पूर्ण आर्थिक स्वायत्तता असा माझा स्वराज्याचा अर्थ आहे. राजकीय स्वातंत्र्य म्हणजे ब्रिटिश, फ्रेंच, इटालियन, जर्मन, रशियन यांच्या राज्यपद्धतींचे केवळ अनुकरण नव्हे. मी त्याचे वर्णन रामराज्य असे करीत आलो आहे. म्हणजे केवळ नैतिक अधिकारावर स्थापलेले लोकांचे सार्वभौमत्व. नागपूर व मुंबई येथे काँग्रेसच्या घटना तयार केल्या गेल्या त्याबद्दल मी मुख्यत: जबाबदार आहे. अशा स्वरूपाचे स्वराज्य स्थापण्याचे ते प्रयत्न होते. त्यानंतर आर्थिक स्वातंत्र्याचा विचार करा. आधुनिक पाश्चात्य धर्तीचे औद्योगिकरण म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य नव्हे. माझ्या मते प्रत्येक व्यक्तीच्या जाणीवपूर्वक केलेल्या आर्थिक उद्धरणाचे प्रयत्न म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य. त्या पद्धतीने प्रत्येक व्यक्तीला पोटभर अन्न, अंगभर कपडा, दूध व लोणी मिळेल. आज लाखो लोकांना हे मिळत नाही. येथे सोशालिझमचा विचार येतो. 'सब भूमी गोपाल की' ही आपल्या पूर्वजांची शिकवण आहे. हिंसाचाराने कोणाची मालमत्ता काढून घेण्याऐवजी प्रत्येकाच्या हाती चरखा देणे उत्तम. जो काम करील त्याची जमीन आणि मालमत्ता राहील. हिन्दुस्तान

दरिद्री कशामुळे झाला हे आपण पाहू या. ईस्ट इंडिया कंपनीने आपला कापडाचा धंदा बुडविला आणि आपल्याला लँकाशायरवर अवलंबून राहाण्यास लाविले. यामुळे बेकार व अर्धबेकार यांची मोठी फौजच निर्माण झाली आणि त्यांना दुसरे काही काम देण्यात आले नाही. सततच्या बेकारीमुळे लोकांत आळशीपणा वाढला. आता कायदेमंडळात कामे करण्याचे फार ऐकू येत आहे. त्याचा काही थोडाफार उपयोग होईल. पण दुसऱ्या एका दृष्टीने त्याकडे पाहा. जास्तीत जास्त दीड हजार व्यक्ती कायदेमंडळात जातील. साडेतीन कोटी लोकांना मतदानाचा हक्क नव्या घटनेप्रमाणे मिळणार आहे. उरलेली साडेएकतीस कोटी प्रजा काय करणार ? स्वराज्याच्या आपल्या कल्पनेप्रमाणे साडेतीन कोटींचे ३१ कोटी हे मालक आहेत. आणि साडेतीन कोटींचे दीड हजार सेवक आहेत. साडेएकतीस कोटींना स्वराज्य म्हणजे काय ते समजत नाही. दीड हजार लोकांच्या हातातील ही सगळी प्यादी होतील. सगळ्या ३५ कोटींनी उद्यमरत व शहाणे होणे हाच यावर इलाज आहे. आणि या सगळ्यांच्या हातात चरखा असणे हाच योग्य व्यवहार आहे. १९२० साली मी म्हटले की काँग्रेसने जर खरेपणे आणि यशस्वितेने तेव्हा सांगितलेला कार्यक्रम पार पाडला आणि खादी, जातीय ऐक्य, मद्यबंदी आणि अस्पृश्यतानिवारण यांची त्याला जोड दिली तर एक वर्षात स्वराज्यप्राप्ती होईल. असे बोलल्याबद्दल मला वाईट वाटत नाही आणि लाजही वाटत नाही. त्याची पुनरुक्ती मी पुन: आपल्यासमोर करतो हाच अहिंसात्मक कृतीचा मार्ग आहे. हा कार्यक्रम जर आपण पार पाडला तर सविनय कायदेभंग करण्याची गरजच पडणार नाही, अर्थात अत्याचाराची गरज पडणार नाहीच नाही."

फैजपूरची काँग्रेस आटोपल्यावर जानवारी महिन्यात काँग्रेस पुढारी पुष्कळसे निवडणुकीच्या प्रचारसभा घेण्यात आणि काँग्रेसने शक्य तेवढ्या जागा जिंकाव्या म्हणून परिश्रम करण्यात गुंतलेले होते. पण गांधींनी त्यावेळी त्रावणकोर संस्थानाचा दौरा केला. तेथे सर्व देवालये हरिजनांना मोकळी करण्यात आली होती व हे घडवून आणण्यात त्रावणकोरचे महाराज आणि त्यांचे दिवाण सर सी. पी. रामस्वामी अय्यर हेच प्रमुख होते. केप कॉमोरिन व कन्याकुमारी-पर्यंत जाऊन व आंध्रात गुंटुर येथे जाऊन ते वर्ध्यास परत आले. ते जानेवारी महिनाअखेर. सर्व निवडणुका देखील तोपर्यंत आटोपल्या होत्या. फेब्रुवारीत सर्व निकाल जाहीर झाले. काँग्रेसला प्रचंड विजय मिळाला होता. अकरापैकी सहा प्रांतांत काँग्रेसला बहुमत मिळाले होते आणि सर्व प्रांतांत काँग्रेसचे उमेदवार सर्वात जास्त संख्येने निवडून आले होते. काँग्रेसने एकंदर ७१५ जागा काबीज केल्या. एकंदर जागा १५८५ होत्या; पण त्यांतील फक्त ६५७

जागाच जनरल होत्या. म्हणजे कोणाकरिता तरी राखीव अशा नव्हत्या. मुंबई, मद्रास, संयुक्त प्रांत, मध्यप्रांत, बिहार आणि ओरिसा येथे काँग्रेसला भवघवीत बहुमत मिळाले. आसाम प्रांतात १०८ पैकी ३५ जागा जिंकणारा सर्वात मोठा असा काँग्रेसपक्षच ठरला. मद्रासमध्ये जस्टिस अथवा ब्राह्मणविरोधी १९२२ पासून सतत मद्रास प्रांतात वर्चस्व ठेवून होता, त्याला फक्त २१ जागा मिळाल्या आणि काँग्रेसला १५९ जागा मिळाल्या. वायव्य सरहद्द प्रांत हा बहुसंख्य मुसलमान वस्तीचा. पण तेथे मुस्लिमांसाठी राखून ठेवलेल्या ५६ जागांपैकी १५ काँग्रेसच्या मुसलमान उमेदवारांनी जिंकल्या. मुस्लिम लीगला एकही जागा मिळाली नाही. बंगालमध्ये २५० पैकी ६० जागा काँग्रेसला मिळाल्या. पंजाबात काँग्रेसला १७५ पैकी फक्त १८ जागा मिळाल्या आणि सिंधमध्ये ६० पैकी ८ मिळाल्या. लिबरल व डेमोक्रॅटिक स्वराज्य पक्षाचा पार धुव्वा उडाला. तीच गत हिंदुमहासभेची. मुस्लिम लीगची स्थिती थोडी बरी होती, पण बहुसंख्य मुस्लिम प्रांतांत मुस्लिम लीगला फारच थोड्या जागा मिळाल्या. पंजाब व सिंधमध्ये पूर्ण पराभव झाला. पण बंगालमध्ये थोडे यश मिळाले. फेब्रुवारीअखेर काँग्रेस कार्यकारिणीची सभा झाली. काँग्रेसला मोठे यश मिळवून दिल्याबद्दल सर्व मतदारांचे अभिनंदन करून काँग्रेसच्या लोकनियुक्त कायदेमंडळातील सभासदांनी संपूर्ण स्वराज्याचे ध्येय विसरून सहकारितेच्या मार्गाने जाण्याचे मनात आणता उपयोगी नाही असे म्हटले. सध्याच्या कायद्यात व्हाइसरॉय व गव्हर्नर यांना जे खास अधिकार आहेत त्यामुळे पेचप्रसंग उत्पन्न होणे अटळ आहे. काँग्रेस धोरण अंमलात आणीत असता ते मुद्दाम टाळण्याचे काही कारण नाही. या ठरावावरील चर्चेत गांधी सामील झाले. परंतु 'हरिजन' मध्ये मात्र राजकीय स्वरूपाच्या चर्चेवर अद्यापि बहिष्कारच होता. भेटायला येणाऱ्या लोकांबरोबरही ते राजकारणाची चर्चा करीत नसत. कैरोच्या अल अझार विद्यापीठाच्या शिष्टमंडळाबरोबर त्यांनी भारत व इजिप्त यांमधील सांस्कृतिक संबंध वाढविण्याविषयीच चर्चा केली. डॉ. ढोवियास व प्रो. माया या नीग्रो विद्वानांना त्यांनी अहिंसेच्या शस्त्रावरच प्रवचन दिले. मार्चच्या तिसऱ्या आठवड्यात ते अखिल भारतीय काँग्रेसच्या बैठकीसाठी गेले. मंत्रिपदे व अधिकारपदे स्वीकारण्याच्या प्रश्नावर पुढाऱ्यांत मतभेद होता. पटेल, राजगोपालाचारी, राजेंद्रप्रसाद स्वीकाराच्या बाजूचे आणि नेहरू, बोस आणि समाजवादी विरुद्ध होते. अखेरीस गांधींनी सुचविलेला तडजोडीचा ठराव १२७ विरुद्ध ७० मतांनी पास झाला. त्याचा सारांश असा : ज्या प्रांतात काँग्रेस आमदारांचे बहुमत असेल त्यांच्या नेत्याने गव्हर्नर मंत्रिमंडळाच्या कामात हस्तक्षेप करणार नाही अशी त्याच्याकडून

हमी मिळविली तर मंत्रिमंडळ बनवावे. १९ मार्च रोजी काँग्रेसच्या शिस्ती-प्रमाणे वागण्याची नवनिर्वाचित आमदारांनी शपथ घेतली. हिंदुस्तानीत ही शपथ नेहरूंनी सर्वांना दिली. २६ मार्च रोजी गांधी हिंदी साहित्य संमेलना-साठी मद्रासला गेले. तेथे हिंदुस्तानी ही राष्ट्रभाषा व्हावी, तिच्यामध्ये सर्व संस्कृतोद्भव भाषातील शब्दसंपत्ती समाविष्ट करावी आणि तिची लिपी देवनागरी असावी, असे आपले मत ठामपणे मांडले. रोमन व उर्दू लिप्या नागरीपुढे गुणवत्तेत कमी पडतात, हा मुद्दा त्यांनी ठाशीवपणे मांडला. काँग्रेसच्या कामकाजात उत्तरोत्तर अशा हिंदुस्तानीचा उपयोग वाढवीत न्यावा, असे गांधींनी प्रतिपादन केले आणि ते सर्वमान्य झाले.

मार्चअखेर मंत्रिमंडळे स्थापन व्हावी म्हणून प्रांतांच्या गव्हर्नरांनी बहुमतवाल्या पक्षांच्या नेत्यांना मंत्रिमंडळे स्थापन करण्यासाठी पाचारणे केली. तेव्हा काँग्रेसच्या नेत्यांनी त्यांजपाशी आश्वासने मागितली की ते मंत्रिमंडळाच्या कामात आपले खास अधिकार वापरून हस्तक्षेप करणार नाहीत. गांधींनी ज्या शब्दांत ही आश्वासने मागण्याचा मसुदा केला होता तो मान्य करण्याचे गव्हर्नरांनी नाकारल्यामुळे त्यांनी दुसऱ्याच लोकांना मंत्रिमंडळे बनविण्यास सांगितले. यावद्दलची उलटसुलट चर्चा बरीच झाली. या कामाचे ब्रिटिश सरकारचे प्रमुख लॉर्ड लोदिअन हे पण चर्चेत उतरले. तेजबहादूर सप्रू यांनी काँग्रेसतर्फे धरलेला आग्रह असंमजसपणाचा ठरविला. पण प्रोफेसर कीथ राज्यशास्त्रतज्ज्ञ गांधींच्या मताला अनुकूल होते. एप्रिलच्या १ ल्या तारखेला नव्या घटनेप्रमाणे कारभार सर्व हिंदुस्तानात सुरू करण्याचे ठरले होते, पण काँग्रेसने त्याची बोळवण 'ए न्यू चार्टर ऑफ स्लेव्हरी' अशा शब्दांनी केली. सर्वत्र हरताळ पाळण्यात आला. कोणाही बाह्य शक्तीला हिंदुस्तानची राजकीय आणि आर्थिक रचना कशी असावी हे ठरविण्याचा हक्क नाही, अशा आशयाचे ठराव पास झाले. भारतमंत्री लॉर्ड झेटलंड यांनी हाऊस ऑफ लॉर्डस्‌मध्ये लॉर्ड लोदिअन यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, "गांधींचे सर्व म्हणणे आश्चर्यचकित करणारे आहे व त्यांनी १९३५ चा गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट नीट वाचलेला नाही असे त्यावरून वाटते. हिंदुस्तानात गांधी जे काही म्हणतील ते सगळे बरोबर असे लोकांना वाटते, पण लॉर्ड लोदिअन यांची गणना मी त्यामध्ये करीत नाही." क्लेमंट ॲटली यांनाही बटलर, उपभारतमंत्री यांनी याच अर्थाचे उत्तर कॉमन्स सभेत दिले. गांधींनी 'लंडन टाइम्स' ला तार पाठवून झेटलंड यांच्या वक्तव्याची बरोबर खबर घेतली. काँग्रेसच्या कार्यकारिणीने आपला हट्ट सोडला नाही. पण अखेरीस, व्हाइसरॉय लार्ड लिनलिथगो यांच्या मध्यस्थीने हा पेचप्रसंग सुटला

आणि काँग्रेसला बहुमत मिळालेल्या सर्व प्रांतांत काँग्रेसची मंत्रिमंडळे आली. सरकारने आपले म्हणणे बदलीत, बदलीत अखेर असे मान्य केले होते की, घटनेत प्रांतिक स्वायतता देण्यात आली होती याचा गाभा हाच की, गव्हर्नराने मंत्रिमंडळाबरोबर सहकार्य करावे व जादा अधिकार वापरू नयेत. मुंबई प्रांतात खेर, मद्रास प्रांतात राजगोपालाचारी, संयुक्त प्रांतात गोविंदवल्लभपंत, मध्य प्रांतात डॉ. खरे व वायव्य सरहद्द प्रांतांत डॉ. खानसाहेब यांची मंत्रिमंडळे अधिकारारूढ झाली. अकरापैकी सात प्रांतांत हे घडले. बंगालमध्ये सर्वाधिक सभासद असलेला काँग्रेसचाच गट होता, पण स्वच्छ बहुमत नसल्यामुळे तेथे काँग्रेसने मंत्रिमंडळ बनविले नाही. जवाहरलाल नेहरू म्हणाले, " Acceptance of office does not mean by aniota acceptance, of the slave constitution. It means fight against the coming federation by all means in our power, inside as well as outside the legistatures. We have taken a new step involving new responsibilities and some risk. But if we are true to our objectives and are ever vigilant, we shall overcome these risks and gain strength and power from this step also. Eternal vigilance is the price of liberty. "

१७ जून १९३७ रोजी राजकारणावर काही न लिहिण्याचे गांधींनी आपणहून जे नियंत्रण घातले होते ते उठविले. काँग्रेसच्या मंत्रिमंडळाबद्दल गांधींनी त्या दिवशी लिहिले की, ज्याअर्थी काँग्रेसच्या कार्यकारिणीने व इतर काँग्रेस पुढाऱ्यांनी मंत्रिपदे स्वीकारण्याच्या प्रश्नावर माझ्या मताला महत्त्व देण्याचे ठरविले आहे, त्याअर्थी सर्व जनतेच्या माहितीसाठी माझी मते व धोरणे मी स्पष्ट करावी हे उचित आहे. १९३५ चा गव्हर्मेंट ऑफ इंडिया. ॲक्ट हा सर्वतोपरी असमाधानकारक आहे आणि त्याच्या द्वारे हिंदुस्तानला स्वातंत्र्य मिळणार नाही हे सर्वमान्य आहे. पण साडतीन लाख मतदारांना आपले प्रतिनिधी निवडून त्यांच्यामार्फत राज्यकारभार अंशतः करता येणार आहे, ही इष्ट दिशेने झालेली थोडीशी प्रगती आहे हे मान्य केले पाहिजे, असे म्हणून गांधींनी ताबडतोब मद्यपानबंदी मंत्रिमंडळांनी अंमलात आणावी याला अग्रक्रम दिला. शिक्षणासाठी मद्यापासून पैसा मिळविणे याला त्यांनी कसून विरोध केला. शिक्षण स्वावलंबी करता येईल असा त्यांचा सिद्धांत होता. सगळी कारागृहे, सुधारगृहे आणि औद्योगिक शिक्षणाची केंद्रे करावी सर्व कापडाची खरेदी खादी घेऊनच करावी, मंत्र्यांनी अगदी साधेपणाने धोतर-सदरा असा पोषाख करावा, पहिल्या वर्गाने प्रवास करू नये, पाश्चात्य पोषाख व इतर सगळा डामडौल काढून टाकावा आणि शिस्तीला सोडून वागू नये, असे त्यानी

प्रतिपादन केले. नेहरूंना त्यांनी एक पत्र लिहिले आणि त्यांना विचारले की, आपण जे विचार व ज्या कल्पना मांडीत आहो ते त्यांना पसंत नसले तर त्यांनी सांगावे. सर्व कौन्सिल कामाचा कारभार आजाद, पटेल, राजेंद्रप्रसाद यांजकडे होता, पण त्या सगळ्यांची प्रेरणा गांधींपासून मिळत होती. मद्य-प्रतिबंधावर घेण्यात आलेल्या सगळ्या आक्षेपांना त्यांनी समर्पक उत्तरे 'हरिजन'-मधून दिली. इतकेच नाही तर अंमलबजावणी कशी करावी याचे सविस्तर विवेचन केले. सत्कार व मानपत्रे यात मंत्र्यांनी वेळ खर्च करू नये. भेटीगाठी देण्याघेण्यातही काटकसर करावी. पाचशे रुपयांपेक्षा जास्त पगार घेऊ नये अशा कितीतरी सूचना ते सारखे करीत होते. आपल्या भूमिकेबद्दल त्यांनी लिहिले " My participation in the Congress affairs is confined to tendering advice on the issues involved in office acceptance and in the policies to be pursued in the prosecution of our march to the goal of complete independence. The offices have to be held lightly and not tightly. They are or should be crowns of thorns, never of renown. Offices have been taken in order to see if they enable us to quicken the pace at which we are moving towards our goal."

बेसिक एज्युकेशन म्हणजे बुनियादी शिक्षण यावर आपले विचार त्यांनी मांडले, तेव्हा त्यांच्यावर पुष्कळ टीका झाली. पुस्तकी शिक्षणाकडे ते दुर्लक्ष करीत आहेत असे पुष्कळांनी म्हटले, पण ते आपल्या कल्पना मांडीतच राहिले. डॉ. जाकीर हुसेन, आर्यनायकम आणि विनोबा हे त्यांना मदत करीत होते. राष्ट्रीय शिक्षण पुनः संघटित करण्याबाबतच्या त्यांच्या योजना जाकीर हुसेन कमिटीने स्वीकारल्या, आणि ११ डिसेंबर, १९३७ रोजी 'हरिजन' ची पुरवणी म्हणून कमिटीचा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. न्यू एज्युकेशन फेलोशिपचे सभासद डॉ. झिलिआकस, प्रो. बोव्हेत आणि प्रो. डेव्हिस गांधींना भेटायला आले आणि शैक्षणिक क्षेत्रात गांधी करीत असलेल्या कार्याबद्दल त्यांना मनःपूर्वक धन्यवाद दिले. डॉ. जॉन द बोअर यांनी या वर्धा योजनेचा पुरस्कार केला. या योजनेच्या-मागे अहिंसा होती म्हणून त्यांना, तिचे विशेष कौतुक वाटले. यांच्याशी झालेल्या चर्चेत गांधी अखेर म्हणाले, " If by abundance you mean every one having plenty to eat and drink and clothe himself with enough to keep his mind trained and educated; I should be satisfied. But I should not like to pack more stuff in my belly than I can digest and more things than I can usefully use. But neither do I want poverty, penury, misery, dirt and dust in India."

कॉंग्रेसच्या मंत्रिमंडळांनी अधिकारग्रहण केल्यानंतर प्रथम आपले लक्ष पूर्वीच्या सरकारांनी दडपशाहीच्या ज्या पद्धती अंमलात आणल्या होत्या तिकडे वळविले. राजकीय कैद्यांची सुटका करण्यात आली. आणीबाणीचे म्हणून जे उपाय योजिले होते ते मागे घेतले, सभा व संस्था बेकायदा ठरवून त्यांवर बंदी घातली होती ती उठविली, वर्तमानपत्रांकडून जामिनक्या घेतल्या होत्या त्या परत केल्या. नागरी स्वातंत्र्ये प्रस्थापित करण्याच्या क्षेत्रात कॉंग्रेस मंत्रि-मंडळांनी इतरांपेक्षा आपले वैशिष्टय प्रकट केले. शेतकरीवर्गावरील कर्जाचे ओझे कमी कमी करण्याचे प्रयत्न केले, स्थानिक स्वराज्य व शिक्षण या क्षेत्रांत सुधारणा केल्या आणि अशा रीतीने सामान्य लोकांना अनेक प्रकारांनी मदत केली. मद्रासमध्ये मद्यप्रसारबंदी लागू केली. किसान व मजूर वर्गाशी संघर्ष उत्पन्न झाला व यामुळे ठिकठिकाणी असंतोषाला वाचा फुटली. ऑक्टोबर १९३७ अखेर कलकत्त्याला ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची सभा झाली, कॉंग्रेस मंत्रिमंडळे स्थापन झाल्यापासूनची ती पहिलीच सभा होती. कॉंग्रेस मंत्रिमंडळांनी केलेल्या कार्यावर साहजिकच चर्चा झाली. निवडणूक जाहीरनाम्यात दिलेली सर्व अभिवचने कॉंग्रेस मंत्रिमंडळांनी प्रत्यक्षात आणावी असा ठराव पास झाला. म्हैसूर संस्थानात लोकांच्या चळवळीला, त्या बाबतीत संस्थानी अधिकाऱ्यांचे म्हणणे समजून घेतल्याशिवाय ऑ. इं. कॉं. कमिटीने पाठिंबा दिला याबद्दल गांधींनी नापसंती व्यक्त केली. त्याचप्रमाणे राजगोपालाचारी यांच्या मंत्रि-मंडळावर त्यांचे म्हणणे न ऐकता टीका केली, याबद्दलही गांधींनी खेद व्यक्त केला. उत्साहाच्या भरात वाहावत जाऊ नये असे त्यांचे म्हणणे होते. पटेल व नरिमान यांच्या वादात बहादुरजी-गांधी कमिटीने केलेल्या अहवालाचा विचार करून नरिमान हे "Unworthy of holding any position of trus and responsibility in the Congress organisation." असा निकाल ए. आय. सी. सी. ने दिला. वंदे मातरम् हे राष्ट्रगीत म्हणण्याला काही मुसलमानांनी आक्षेप घेतला, तेव्हा जनगणमन हेच गीत सर्वत्र अधिकृत राष्ट्रगीत समजले जावे, असे ठरविण्यात आले. बंगालमध्ये हक मंत्रिमंडळ होते ते कॉंग्रेसचे नव्हते, तरी कॉंग्रेसच्या धोरणाप्रमाणे बऱ्याच बाबतीत वागत होते. लोकमताला मान देण्याच्या या धोरणाबद्दल गांधींनी समाधान व्यक्त केले. सुभाषचंद्र बोस यांचे पाहुणे म्हणून एक आठवडा ते कलकत्त्याला राहिले. नोव्हेंबर महिन्याच्या मध्याला गांधी वर्ध्याला परत आले. अहमदाबाद व सोलापूर येथे काही गडबड झाली व खेर मंत्रिमंडळाने ती दडपून टाकली, याबद्दल २० नोव्हेंबरच्या हरिजनमध्ये 'स्टॉर्म सिग्नल्स' या मथळ्याखाली एक लेख लिहून प्रश्न विचारला, कॉंग्रेस मंत्रिमंडळे राज्य करण्याला लायक आहेत

काय ? कानपूर व अहमदाबाद यथे वारंवार संप का व्हावे ? गांधींनी म्हटले, " If in spite of honest efforts, by Congressmen, forces of disorder cannot be brought under control without the assistance of the police and the military, in my opinion, acceptance by the Congress of the burden of office loses all force and meaning and the sooner the ministers are withdrawn the better it would be for the Congress and its struggle to achieve complete ndependence."

१९३८ च्या जानेवारीत कॅाँग्रेस कार्यकारिणीची सभा नेहरूंच्या अध्यक्षतेखाली मुंबईस भरली. कॉंग्रेस मंत्रिमंडळाचे मुख्य मंत्री हजर होते. तेव्हा मंत्रिमंडळांनी राजकीय कैद्यांच्या मुक्ततेबद्दल आतापर्यंत केलेल्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. फेब्रुवारीत पुन: वर्ध्याला कार्यकारिणीची सभा भरली आणि पुढील ठराव पास झाला. " The committee trusts that with the strenuous and unceasing efforts of Mahatma Gandhi and the vigilance of public opinion, the question of release will be satisfactorily solved at an early date and hopes that all detenus and political prisoners will cooperate to this end by exercising patience and self-restraint and the public will do likewise by maintaining an atmosphere of non-violer ce."

१९३८ साली फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात कॅाँग्रेसचे वार्षिक अधिवेशन सुभाषचंद्र बोस यांच्या अध्यक्षतेखालो हरिपुरा येथे तापी नदीच्या तीरावर भरले. सात हजार स्वयंसेवक आणि चार हजार कार्यकर्ते सर्व व्यवस्था उत्तम ठेवीत होते. पहिल्या दिवशी ५६ हजार रुपयांची तिकिटे प्रेक्षकांनी घेतली. सुमारे अडीच लाख लोकांनी प्रदर्शनाला भेट दिली आणि एक लाख रुपयांवर खादीची विक्री झाली. पण एक खादी सोडून इतर कशातही खादीचे स्वदेशी ब्रीद अथवा बाणा त्यांना दिसला नाही. संयुक्त प्रांत व बिहार येथील कॅाँग्रेस मंत्रिमंडळांनी ज्या राजकीय कैद्यांची मुक्तता करण्याचे योजिले होते त्याला व्हाइसरॉयच्या पाठिंब्याने त्या प्रांतांच्या गव्हर्नरांनी हरकत घेऊन मंत्र्यांच्या कारभारात हस्तक्षेप केला. हरिपुरा येथे कार्यकारिणीची बैठक चालू असताच ही बातमी येऊन थडकली. गांधींनी एक निवेदन काढून असे सांगितले की, १९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टचे १२६(५) कलम पुन: पुन: वाचूनही मला या हस्तक्षेपाची सयुक्तिकता कळत नाही. संबंधित कैद्यांची सुटका केल्यावर जर दंगाधोपा झाला तरच हस्तक्षेप समर्थनीय ठरला असता. त्यांच्या मुक्ततेने शांतता व सुव्यवस्था बिघडण्याचा काहीच संभव मंत्र्यांना दिसला

नाहीं. हाच संदेश गांधींनी लंडनच्या डेली हेरल्ड पत्राला पाठविला आणि मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले हेच बरोबर केले; तोच सन्माननीय मार्ग त्यांना मोकळा होता. काँग्रेसची बैठक संपल्यावर २२ फेब्रुवारीला काँग्रेसने याबाबत केलेल्या ठरावाला उत्तर दिले. लगेच दुसऱ्या दिवशी गांधींनी प्रत्युत्तर दिले. परिणामी संयुक्त प्रांत व बिहारचे मुख्यमंत्री काँग्रेस संपवून परत गेल्यावर गव्हर्नरांनी त्यांना पाचारण केले. समझोता झाला आणि त्यांनी आपले राजीनामे परत घेतले. अशा रीतीने हा पेचप्रसंग टळला. कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याचा अधिकार मंत्रिमंडळाचाच आहे आणि गव्हर्नर तो हिसकावून घेऊ शकत नाहीत हे हडसून खडसून ठरले.

मात्र या प्रकरणाची छाया स्वाभाविकपणेच हरिपुरा काँग्रेसच्या कामावर पडली. सुभाषचंद्र बोस यांचे अध्यक्षीय भाषण त्यांच्या पुरोगामी व डाव्या विचारसरणीला धरूनच झाले. ब्रिटिश साम्राज्य खिळखिळे झाले असून कोलमड ण्याच्या बेतात आहे अशा वेळी आणि फेडरेशनचा अंमल करण्याचे ब्रिटिश साम्राज्य वादी ठरवतील. सविनय कायदेभंगाची मोठी मोहीम त्याचा पुरता निकाल लावील. आपल्यासमोर मुख्य समस्या देशाचे दारिद्र्य दूर करण्याची आहे. शेती व उद्योग नव्या धर्तीने उभारावे लागतील. परराष्ट्रीय धोरणाचा विचार करताना ते म्हणाले, सोविएत मुत्सद्दीमंडळाकडून आपल्याला पुष्कळ शिकण्यासारखे आहे. देशी संस्थानांबाबत काँग्रेसने प्रथमच ठराव केला. संस्थानी प्रजेला ब्रिटिश हिन्दुस्तानच्या नागरिकांसारखेच सर्व हक्क मिळाले पाहिजेत असे ठरावात म्हटले होते. सर्व ठराव मागील ठरावांप्रमाणेच होते, पण मतभेद मिटवून ते शक्य तेवढे किमान पातळीवर आणण्यात आले व काँग्रेसमधील डाव्या-उजव्या पक्षांमध्ये सामंजस्य स्थापन करण्यात आले. किसान सभांची संघटना हा एक नवा विषय एका ठरावाद्वारे पुढे आला. २६ मार्च रोजी चार महिन्यांची विश्रांती घेऊन गांधींनी 'हरिजन' मध्ये लेख लिहिला. अलाहाबादेतील जातीय दंग्याचा मोड करण्यासाठी पोलीस आणि लष्कर यांची मदत घ्यावी लागली यावरून ब्रिटिश सत्तेच्या जागी आपली सत्ता स्थापन करण्याला काँग्रेस लायक नाही हे सत्य कटु व दुःखद असले तरी मान्य केले पाहिजे, असे त्यांनी या लेखात म्हटले.

१ एप्रिल रोजी गांधी काँग्रेस कार्यकारिणीच्या सभेसाठी कलकत्त्यास गले. व्यापारी संस्थांमार्फत करण्यात येणारा भेदभाव या विषयावरील महत्त्वाचा ठराव कमिटीने पास केला. गांधींनी याबाबत वेळोवेळी प्रकट केलेल्या मतांचाच अंतर्भाव या ठरावात करण्यात आला. हिन्दुस्तान सरकारने सारासार विचार-

पूर्वक स्वीकारलेले संरक्षक जकातीचे धोरण अनेक परदेशी कंपन्या आपल्या नावापुढे ' इंडिया लिमिटेड ' असे शब्द घालून आपल्या फायद्यासाठीच वापरले व देशी संस्थांच्या वाढीला अटकाव केला. १९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टमध्ये त्यांच्या या उद्योगाचे संरक्षण करण्याची तरतूद होती. तिचा या ठरावाने निषेध केला. ठरावात असे स्पष्ट म्हटले की, कोणतीही व्यापारी अथवा औद्योगिक संस्था तिचा कारभार, नियंत्रण आणि धोरण हिंदी नागरिकांच्या हाती असेल तरच तिला स्वदेशी मानता येईल. कार्यकारिणीच्या अनौपचारिक सभेत जमीनदारीची पद्धत सुधारावी की बरखास्त करावी यावर चर्चा झाली. तीमध्ये गांधींनी ती सुधारता येईल आणि सुधारावी असे मत व्यक्त केले. किसान सभांची संघटना उपकारक होईल किंवा नाही याबद्दलही

त्यांना खात्री वाटत नव्हती. काँग्रेसच्या मंत्रिमंडळांचे काम चालावे तसे चालत नाही अशी तक्रार एका पत्राने जवाहरलाल नेहरूंनी गांधींकडे केली. तसेच काँग्रेसजनांत धुसफूस, वशिलेबाजी, गटबाजी असे प्रकार वाढत आहेत, अशीही तक्रार त्यांनी केली. आणि आपल्याला येथे नीट काम करणे कठीण वाटत असल्यामुळे युरोपला जावे असे वाटत आहे, असे त्यांनी या पत्रात म्हटले. गांधींनाही राजकीय जीवन सदोष होत चालले आहे असे वाटत होते.

२३ एप्रिलच्या 'हरिजन' मध्ये त्यांनी म्हटले, "अधिकारग्रहणामुळे काँग्रेसची इज्जत वाढेल अथवा पार धुळीला मिळेल. याकरिता मंत्र्यांनीच व आमदारांनी आपल्या वैयक्तिक व सार्वजनिक वर्तनाबद्दल खबरदारीने वागावे. त्यांचेबद्दल संशय कोणालाही येता उपयोगी नाही."

वातावरण असे असता ओरिसाच्या गव्हर्नरांनी रजेवर जाण्याचा विचार केला आणि डेन नावाच्या एका कनिष्ठ अधिकाऱ्याला हंगामी गव्हर्नर म्हणून नेमण्याचे ठरविले. मंत्रिमंडळाला ही व्यवस्था मान्य नव्हती व राजीनामा देण्याचा विचार त्याने केला. तात्पुरते दुसरे मंत्रिमंडळ नेमावे व रजेवरून परत आल्यावर पुनः काँग्रेस मंत्रिमंडळाला बोलवावे असली शक्कल निघाली. पण हा केवळ पोरकटपणा आहे, अशी टीका यावर गांधींनी केली. यावर गव्हर्नराने रजवर जाण्याचेच नाकारले आणि हा पेचप्रसंग टळला. हिंदुमुसलमानांच्या ऐक्याचा प्रश्नही बिकट होत होता. मुस्लिम लीगने काँग्रेस मंत्र्यांच्या राज्यांत मुसलमानांना अन्यायाने वागविण्यात येत आहे, अशी तक्रार करून सभा–संमेलनांत वंदे मारतरम् गीत म्हणणे, वर्धा शिक्षण योजना अंमलात आणणे आणि शाळांमध्ये हिंदुस्तानी भाषा शिकविणे वगैरे उपक्रमांचा निषेध केला. पडद्याआड काँग्रेस व लीग यांमध्ये वाटावाटी चालू झाल्या. गांधी व जीना यांनी वाटाघाटी कराव्या असे ठरले.

त्याप्रमाणे २८ एप्रिल रोजी जीनांच्या घरी त्यांची भेट झाली. तीन तास संभाषण होऊन पुन: भेटण्याचे ठरले. प्रकृतीत अशक्तपणा जाणवत असता व उत्साह कमी झाला असताही गांधी वायव्य सरहद्द प्रांताच्या दौऱ्यावर गेले. डॉ. खानसाहेबांकडे त्यांचा मुक्काम होता. आपला नेहमीचा प्रघात मोडून गांधींनी पेशावरच्या इस्लामिया व एडवर्ड कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी दिलेली मानपत्रे स्वीकारली. काही खेडी त्यांनी पाहिली. सर्वत्र त्यांचे मनापासून स्वागत झाले. मे ८ ला त्यांचा सरहद्द प्रांताचा दौरा संपला आणि जुहूला विश्रांती घेण्यासाठी ते मुंबईला आले. ते म्हणाले, " "The violence that I see running through speeches and writings, the corruption and selfishness among Congressmen and the petty bickerings fill one with dismay. In the midst of this, we who know must be unyielding and apply the golden rule of non-cooperation. "

मेच्या तिसऱ्या आठवड्यात कार्यकारिणीची सभा मुंबईस भरली. सर्व कॉंग्रेसच्या मुख्य मंत्र्यांना बोलावण्यात आले होते. नागरी स्वातंत्र्य, कृषि-विषयक धोरण, मजुरांची स्थिती, औद्योगिक पुनर्रचना, ग्रामोद्धार आणि शिक्षण या विषयांवर चर्चा झाली. कॉंग्रेस मंत्रिमंडळाविरुद्ध आलेल्या तक्रारींचा तपास करण्यात आला. मध्य प्रांतातील तीन मंत्र्यांनी मुख्य मंत्री डॉ. खरे यांजकडे राजीनामे दिले होते व वर्किंग कमिटीकडेही ते राजीनामे घेऊन गेले. आजाद व पटेल यांनी लाचलुचपत आणि भ्रष्टाचार यांबद्दलच्या आरोपांची चौकशी करून ते निराधार आहेत असा निकाल दिला. परंतु काही मंत्र्यांनी आपल्या चुका कबूल केल्या. नालायक लोकांना प्राध्यापकांच्या व इतर जागांवर नेमण्यात आले होते. कर्ज तडजोडीच्या कायद्याखाली घातलेली रु. पन्नास हजारांची मर्यादा उल्लंघून ती दहा लाखांवर नेण्यात आली होती. पण सर्वांत गंभीर आरोप कायदामंत्री शरीफ यांजवर होता. एका मुलीवर बलात्कार केल्याचा गुन्हा एका शाळातपासनीसाने केला होता. त्याची सुटका मुदत संपण्यापूर्वी या मंत्र्यांनी केली होती. खरे मंत्रिमंडळाची इच्छा हे प्रकरण दडपून टाकण्याची होती, पण कार्यकारिणीने त्या मंत्र्याला म्हणजे श्री. शरीफ यांना राजीनामा देण्याला सांगितले. ज्या तीन मंत्र्यांनी राजीनामे दिले होते त्यांना ते परत घेण्याला सांगण्यात आले आणि डॉ. खरे यांनी कार्यकारिणीला विचारल्याशिवाय काही न करण्याचे आश्वासन दिले व हे प्रकरण मिटले. म्हैसूरप्रकरणी हरिपुरा कॉंग्रेसच्या ठरावाला पाठिंबा देऊन तेथे जबाबदार राज्यपद्धती सुरू होईल अशी आशा व्यक्त करण्यात आली.

पुनः २६ मे १९३८ रोजी गांधी व सुभाषचंद्र बोस जीनांना भेटले. जीनांनी १४ मुद्दे परस्परांचे एकमत व्हावे म्हणून मांडले आणि लगेच ते म्हणाले, की, या यादीत जरुरीप्रमाणे भर घालू. जूनमध्ये लीगतर्फे पुढील ११ मागण्या काँग्रेसकडे करण्यात आल्या: १. वंदे मातरम् हे राष्ट्रगीत म्हणून रद्द करावे. २. मुसलमानांना, ज्या प्रांतांत सध्या बहुमत आहे त्या प्रांतांची पुनर्रचना झाली तरी तसेच टिकवून धरावे. ३. मुसलमानांच्या गोहत्या करण्याच्या प्रघाताला काही हरकत घेऊ नये. ४. अझान व इतर धार्मिक हक्कांत काही हस्तक्षेप करू नये. ५. मुस्लिमांचा व्यक्तिगत कायदा आणि संस्कृती कायद्याने अबाधित राखावी. ६. मुस्लिमांना देण्याच्या नोकऱ्यांचे प्रमाण घटनेनेच ठरवून टाकावे. ७. काँग्रेसने जातीय निवाड्याला असलेला आपला विरोध बंद करावा. ८. उर्दूचा वापर कमी करण्यात येणार नाही अशी हमी राज्यघटनेने द्यावी. ९. जातीय निवाड्याप्रमाणे स्थानिक स्वराज्यसंस्थांत मुस्लिमांना जागा मिळाव्या. १०. तिरंगा झेंडा बदलावा अथवा मुस्लिम लीगच्या झेंड्याला बरोबरीचा मान द्यावा. ११. मुस्लिम लीग ही एकच एक मुसलमानांची प्रातिनिधिक संस्था समजण्यात यावी.

१६ जून रोजी गांधीजींना बोलणी फिसकटली आणि जीनांनी त्यांचा गांधी व नेहरू यांजबरोबर झालेला पत्रव्यवहार प्रसिद्ध केला. जातीय तेढ पक्की वाढीला लागली आणि बऱ्याच दिवसांनी गांधींनी 'पीस ब्रिगेड' म्हणजे 'शांततेची पलटण' यावर लेख लिहिला. अशा अहिंसक पलटणीची जरुरी हिंदुमुसलमानांची तडजोड झाली अथवा न झाली तरी नेहमी लागणारच, असे त्यांनी प्रतिपादन केले.

२० जुलै रोजी डॉ. खरे यांनी आपले सहकारी गोळे व देशमुख यांच्यासह राजीनामे दिले. दुसऱ्या तिघांनाही त्यांनी राजीनामे देण्यास सांगितले हिंदी व मराठी भाषिकांमधील संघर्ष हे एक या बडामोडीचे कारण होते. शुक्ल, मिश्र व मेहता यांनी राजीनामे दिले नाही. याचे कारण असे दिले. की, काँग्रेस कार्यकारिणीची सभा तीनचार दिवसांत भरतच आहे (२३ जुलै) तेव्हा काय ते ठरवू. राजेंद्रप्रसादांनी असाच सल्ला डॉ. खरे यांना दिला. गव्हर्नरांनी सगळ्यांच्या राजीनाम्यांची मागणी केली, पण शुक्ल-मिश्र-मेहता यांनी ऐकले नाही. तेव्हा गव्हर्नराने खरे-गोळे-देशमुख यांचे राजीनामे स्वीकारले आणि शुक्ल-मिश्र-मेहता यांची मंत्रिपदे रद्द केली. २१ जुलैला नवे मंत्रिमंडळ बनविण्याला गव्हर्नराने डॉ. खरे यांना विनंती केली. सुभाषचंद्र बोस यांच्या सांगण्यावरून डॉ. खरे यांनी आपला राजीनामा गव्हर्नराकडे पाठविला. डॉ.

खरे यांनी कबूल केले की, राजीनामा देण्यात व नवे मंत्रिमंडळ बनविण्याचे मान्य करण्यात आपली चूक झालेली आहे. २३ जुलैला डॉ. खरे यांना वर्धा येथे बोलावण्यात आले. २५ जुलैला सुभाषचंद्र बोस व खरे गांधींना भेटले, ते शेगावला. डॉ. खरे यांना एकंदर हकिकतीचे निवेदन करावे असे त्यांना सांगण्यात आले. त्यांनी तसे केले व "I place myself unreservedly in your hands" असे म्हटले. गांधींनी त्यांच्या निवेदनात काही फेरफार केले. पण खरे यांनी आपला विचार बदलला होता. २६ जुलैला ३ वाजेपर्यंत जर ते सुधारलेले निवेदन घेऊन आले नाहीत तर त्यांनी ते करावयाचे नाही असे कार्यकारिणी समजेल असे सांगण्यात आले होते. टेलिफोनवरून खरे यांनी कार्यकारिणीला तसे कळविले. यानंतर कार्यकारिणीने डॉ. खरे यांच्या एकंदर वागण्याचा विचार करून असे ठरविले की, "Dr. Khare has proved himself unworthy of holding positions of responsibility in the Congress organisation. He should be so considered until by his services as a Congressman he has shown himself well-balanced and capable of observing discipline and discharging the duties that may be undertaken by him." गव्हर्नरांच्या घिसाडघाईवरही कार्यकारिणीने टीका केली. याबद्दल पुढे वर्तमानपत्रांत पुष्कळ उलटसुलट लिखाण येत होते. ६ ऑगस्ट रोजी गांधींनी एक दीर्घ निवेदन काढून डॉ. खरे व मध्यप्रांताचे गव्हर्नर यांची सणसणीत भाषेत हजेरी घेतली. काँग्रेसचे अध्यक्ष सुभाषचंद्र बोस यांनी काढलेल्या त्याच अर्थाच्या पत्रकात म्हटले, "In no country would a deposed premier have behaved with such supreme lack of dignity and responsibility as the ex-premier of C. P."

काँग्रेसमध्ये ही जी बजबजपुरी माजत होती तिच्याबद्दल गांधी म्हणाले, "I cannot shirk the responsibility by saying I am no longer in the Congress. I have gone out of it for serving it better, I know that I still influence the Congress policy. As the author of the Congress Constitution of 1920, I must hold myself responsible for such deterioration as is avoidable. The Congress started with an initial handicap. Very few believed in truth and non-violence as a creed ........ Evil has continued to grow. The Working Committee has been making some attempt to purge the Congress of the evil but has not been able to put its foot down and risk the loss of members on the Congress register. I believe in quality rather than quantity......I know

I am not a bad general. I have wisdom enough to know my limitations. I do entertain the hope that there is yet work for me to do, that the darkness that seems to have enveloped me will disappear and that, whether with another battle more brilliant than the Dandi march or without, India will come in her own demonstrably through non-violent means.'

गांधींची प्रकृती यावेळी ठीक नव्हती. त्यांच्या रक्तदाबात फार चढउतार होत होते. म्हणून दीर्घकाल मौनव्रत पाळण्याचे त्यांनी ठरविले. ऑगस्ट महिन्यापासून त्यांनी ते सुरू केले. देशात सर्वत्र दंगली-गडबडी यांचे वातावरण पसरत होते, यामुळे ते फार अस्वस्थ झाले. हिंसा चोरट्या पावलांनी परत येत आहे काय? असा प्रश्न 'हरिजना'च्या १३ ऑगस्टच्या अंकात त्यांनी केला. काँग्रेसजन म्हणविणारेच आपापसात कलह-मारामाऱ्या करीत आहेत आणि पिकेटिंगच्या बुरख्याखाली हिंसाचार करीत आहेत याचे त्यांना फार दुःख झाले. हिंसाचार जर वेळीच थांबविला नाही तर आतून कुजल्यामुळे काँग्रेसचे तुकडे तुकडे होतील, असे त्यांनी बजाविले. त्याच्यावर विसंगतीचे आरोप करण्यात आले त्यांना त्यांनी बरोबर उत्तरे दिली आणि एमसनचे प्रख्यात वचन आक्षेपकांच्या तोंडावर फेकले, ते असे: "Foolish consistency is the hobgoblin of little minds."

ऑगस्ट महिनाअखेर गांधींना एका मोठ्याच दिव्याला सामोरे जावे लागले. काही हरिजन सत्याग्रही आम्हाला न्याय द्या, असे म्हणत शेगावला त्यांच्या झोपडीशी आले. मंत्रिमंडळात एक हरिजन मंत्री घेण्याची व्यवस्था करा, नाही तर तुमच्या दाराशी सत्याग्रह करीत, म्हणजे धरणे धरून बसू, असे त्यांनी सांगितले. गांधींनी म्हटले, ती गोष्ट माझ्या अधिकारातील नाही आणि त्यांना विचारले, सत्याग्रह म्हणजे तुम्ही काय समजता? त्यावर त्यांनी उत्तर केले, तुमचा अधिकार सर्वत्र चालतो हे आम्हाला माहीत आहे. आमची मागणी मान्य होईपर्यंत आम्ही येथे उपोषण करू. आम्ही जाताच नागपुराहून दुसरी टोळी येथे येऊन आमचे काम पुढे चालवील.

गांधींनी म्हटले ठीक आहे. तुमचे काम चालू द्या. त्यावर ते पुन्हा म्हणाले, आमचे दुसरे सोबती आम्हाला काय हवे नको ते पाहाण्याला येतील. तेव्हा त्यांच्या राहाण्याची व्यवस्था तुम्ही केली पाहिजे, गांधींनी त्यांना स्पष्ट सांगितले, माझा त्याच्याशी काही संबंध नाही. पण तेवढ्यात कस्तुरबा तेथे आल्या आणि त्यांना राहाण्यासाठी जागा करून दिली.

३ सप्टेंबरच्या अंकात त्यांनी लिहिले, कॉंग्रेसला जो सत्ता मिळाली आहे ती पचविण्याचे सामर्थ्य कॉंग्रेसजनांच्या अंगी आहे असे दिसत नाही. आपल्याला नेहमी उत्तम व शहाणी माणसे कॉंग्रेसजनांमधून सरकारे चालविण्याकरिता मिळतीलच असे नाही. पण ज्यांनी अधिकार स्वीकार केला आहे ते जर निःस्वार्थी, समर्थ आणि मोहाचा प्रतिकार करणारे असणार नाहीत, तर स्वराज्य आपल्यापासून फार दूर दूर राहील. खादीचा पोषाक सतत न करणाऱ्यांना कॉंग्रेसमध्ये जागा नाही. 'शांततामय व न्याय्य' या शब्दांच्या अर्थाची ओढाताण कोणी करू नये. त्यांचा अर्थ अहिंसक व सत्यपूर्ण असाच आहे. मी देत आहे हा इशारा सर्वांना न दिला तर मी कॉंग्रेसशी प्रामाणिकपणे वागलो असे होणार नाही, अशा शब्दांत त्यांनी हा परखडपण लिहिलेला लेख संपविला आहे.

म्हैसूर संस्थानातील प्रजेच्या चळवळीला थोडेफार यश आल्याचे पाहून त्रावणकोर व हैदराबाद या संस्थानात संस्थानी प्रजेच्या चळवळी तशाच जोर धरू लागल्या. सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची सभा दिल्ली येथे भरून त्रावणकोर, हैदराबाद, काश्मीर, ढेंकमाल, तालचेर येथे चाललेल्या दडपशाहीकडे आपले लक्ष आहे असे कमिटीने आपल्या ठरावात म्हटले व संस्थानी प्रदेशात हस्तक्षेप करायचा नाही असा आपल्या धोरणाचा उद्घोष केला. पण प्रजेला शक्य ती मदत करण्याचे धोरण मात्र स्वीकारले. नागरी स्वातंत्र्याबाबत ए. आय. सी. सी. ने केलेला ठराव अर्थपूर्ण आहे व त्याची भाषा काळजीपूर्वक शब्दांकित केली आहे. तो ठराव असा
" In as much as a few Congressmen have been found in the name of civil liberty to advocate murder, arson, looting and class war by violent means, and several papers are carrying on a compaign of falsehood and violence, calculated to incite the readers to violence and to lead to Communal conflicts, the Congress warns the public that civil liberty does not cover the acts of or incitement to violence or promulgation of palpable falsehoods. Inspite, therefore, of the Congress policy on civil liberty, remaining unchanged, the Congress will, consistently with its tradition, support measures, that may be undertaken by the Congress governments for the defence of life and property."

गांधींचे मौन अद्यापि चालूच होते, तरी कार्यकारिणीच्या कामकाजात ते लक्षपूर्वक भाग घेत होते. ब्रह्मदेशातील भारतीयांनी न्यायाने व नम्रतेने वागून त्यांची मैत्री संपादन करावी, ब्रिटनने पॅलेस्टाइनची फाळणी न करता तेथील अरब व यहुदी लोकांना आपली भांडणे आपआपसात सोडविण्याला मोकळे ठेवावे असे ठराव पास झाले. हिटलरच्या जर्मनीने चेकोस्लावाकियावर उघड हल्ला करून त्याचे स्वातंत्र्यहरण केले याबद्दल सहानुभूतीचा ठराव करण्यात आला. या प्रकारामुळे महायुद्ध उद्‌भवते की काय असे वाटू लागले होते. पण ब्रिटनने पडते घेऊन म्युनिकचा करार हिटलरबरोबर केला व युद्धाचे ढग तूर्त तरी विरले. हा म्युनिक करार ३० सप्टेंबर रोजी झाला. काँग्रेसची कार्यकारिणी यावेळी दिल्लीत बसून ११ दिवस चर्चा करीत होती. या सुमारास गांधींनी चेकोस्लोवाकियाच्या प्रश्नावर दोन लेख एक पेशावर येथे गफारखान शेजारी बसले असता ६ ऑक्टोबर रोजी व दुसरा ८ ऑक्टोबर रोजी, असे लिहिले. 'मी एक चेक असतो तर' असे म्हणून हिंसाचाराला तोंड अहिंसेच्या 'शस्त्रा'ने कसे दिले पाहिजे याचे केलेले विवेचन बिनतोड आहे. त्यातील काही वाक्ये येथे देणे योग्य होईल. " Czechoslovakia has a lesson for me and for us in India. The Czechs could not have done anything else, when they found themselves deserted by their two powerful allies. (France and England) And yet I have the hardihood to say that if they had known the use of non-violence as a weapon for the defence of national honour, they would have faced the whole might of Germany with that of Italy thrown in. They would have spared England and France the humiliation of suing for a peace which was no peace; and to save their honour they would have died to a man, without shedding the blood of the robber. I must refuse to think that such heroism or call it restraint, is beyond human nature. Human nature will only find itself when it fully realises that to be human, it has to cease to be beastly or brutal. Though we have the human form, without the attainment of the virtue of non-violence, we will share the qualities of our remote reputed ancestor, the orang-outang"

दुसरा एक उतारा पुढीलप्रमाणे आहे. " If I were a Czech, I would free England, France from the obligation to defend my country. And yet I must live. I would not be a vassal to any nation or

body. I must have absolute independence or I must perish. To seek to win a clash of arms, would be pure bravods. Not so, if in defying the might of one who would deprive me of my independence, 'I refuse to obey his will and perish unarmed in the attempt. In so doing, though I lose my body, I save my soul, my honour. I present Dr. Benes with a weapon of the weak but of the brave. There is no bravery greater than a resolute refusal to bend the knee to an earthly power, no matter how great and that without bitterness of spirit and in the fulness of faith that the spirit alone lives, nothing else does."

९ ऑक्टोबरपासून २९ नोव्हेंबरपर्यंत गांधींना गफारखान सरहद्द प्रांतांत घेऊन गेले. पेशावरपासून उतमनझै या नावाचे खेडे म्हणजे गफारखानांचे गाव. ते स्वात नदीच्या किनाऱ्यावर वसलेले शांत, निसर्गसुंदर असे ठिकाण होते. मुलाखती आणि जाहीर सभा वगैरे व्यापापासून अगदी मुक्त. गांधी राहात असलेल्या घराच्या छपरावर त्यांच्या सुरक्षिततेसाठी म्हणून गफारखानांनी सशस्त्र पहारेकरी ठेविले होते. गांधींना हे समजले तेव्हा त्यांनी हे पहारेकरी ताबडतोब काढून घ्यायला लावले. पण निःशस्त्र पहारेकरी ठेवण्याचा आग्रह मात्र गफारखानांनी कायम ठेविला आणि ते मात्र गांधींनी मान्य केले. हा प्रकार म्हणजे सत्याग्रह्यांपुढे असलेल्या अधिक मोठ्या प्रश्नाचे प्रतीकच आहे असे त्यांना वाटले. ज्याप्रमाणे व्यक्तीने स्वसंरक्षणासाठी शस्त्रत्याग केला पाहिजे, त्याप्रमाणे हिन्दुस्तानने सरहद्दीपलीकडील टोळीवाल्यांपासून आपले रक्षण करण्याकरिता पोलीस व लष्कर यांची मदत घेता कामा नये. सरहद्द प्रांतात अहिंसेला प्रतिज्ञेने बांधलेले एक लाख खुदा-ई-खिदमदगार होते. त्यांची अहिंसा त्यांनी खरोखर पचविलेली असेल तर त्यांनी सरहद्दीपलीकडील टोळीवाल्यांचे मतपरिवर्तन त्यांच्याशी प्रेमाने वागून करता आले पाहिजे. जर ते हे करू शकले तर ते हिन्दुस्तानला स्वराज्य मिळवून देऊन दुनियेला एक नवाच धडा घालून देतील, असे गांधी म्हणाले. गफारखान यांस गांधी म्हणाले, "डॉ. खानसाहेब सरहद्द प्रांताचे मुख्य मंत्री यांना जर हे करता आले नाही तर त्यांनी अधिकारग्रहण करण्यात काय अर्थ आहे? म्हणून खुदा-ई-खिदमदगारांना अहिंसा कितपत समजली आहे व त्यांच्या आचरणात ती किती उतरली आहे हे मला समजून घ्यावयाचे आहे. त्यावरून तुम्हांला व मला भावी कार्याची दिशा ठरविता येईल."

दक्षिण आफ्रिकेतील आपला अनुभव सांगताना गांधी म्हणाले, "आम्ही तेथे फक्त १३ हजार सत्याग्रही होतो, पण सेनापती स्मट्स यांच्या सरकाराला तोंड देऊन टिकलो. पण तेथे आलेल्या ५० हजार चिनी लोकांना त्यांनी काही नुकसानभरपाई देखील न देता सहा महिन्यांच्या आत हाकून लाविले. आम्ही अहिंसा मार्गापासून ढळलो असतो तर त्यांनी आम्हाला केव्हाच चिरडून टाकले असते. योग्य रीतीने प्रशिक्षण दिलेल्या एक लाख अहिंसा खुदा-ई-खिदमदगारांना काय संपादन करता येणार नाही?" शक्य तेवढ्या खुदा-ई-खिदमदगारांशी अगदी मनमोकळेपणाने बोलून मला त्यांचे मनोगत समजून घ्यावयाचे आहे, असे गांधी म्हणाले. त्याप्रमाणे चरसदा तहसिलीमधील तेरा अंमलदारांबरोबर त्यांनी ११ व १२ ऑक्टोबर रोजी भेटी घेऊन चर्चा केली. १५ ऑक्टोबरला दुसऱ्या एका गटाशी पेशावरला चर्चा केली. सर्वांनी अहिंसेवर आपली निष्ठा अढळ आहे असे सांगितले. त्यांनी असेही सांगितले की, खुद्द गफारखान जरी फिरले व त्यांनी अहिंसाव्रताचा त्याग केला तरी आम्ही करणार नाही. प्रतिपक्षीयांशी वागतानाच केवळ नव्हे तर आपसातील व्यवहारात सुद्धा निरपवाद अहिसा हवी आणि ती शूरांची अहिंसा असली पाहिजे. दुर्बलांची आणि भ्याडांची नको, यावर गांधींनी भर दिला. १५ ऑक्टोबरला विश्रांतीची मुदत संपली आणि गांधी मार्दान व नौशेरा जिल्ह्यांच्या दौऱ्यावर गेले. सर्वत्र त्यांचे अत्यंत उत्सुकतेने स्वागत झाले. १६ तारखेला काबूल नदी ओलांडून नौशेराला गेले आणि खिदमदगारांच्या अधिकाऱ्यांशी संभाषण केले. सरहद्दीपलीकडील टोळ्यांना लुटालूट व दरोडे यांची आवड नाही. पोटाचा उद्योग म्हणून त्या असे वागतात. त्यांना कुटिरोद्योग काढून देऊन त्यांच्यात मिळूनमिसळून वागून त्यांची राहणी बदलता येईल. सरकारने असा प्रयत्न कधी केलेलाच नाही. गुन्हेगार समजून पोलिसांनी व लष्कराने फक्त गोळीबार केला आणि त्याला त्यांनी तसेच उत्तर दिले. तीन दिवस फिरून गांधी उतमनझै येथे परत आले. 'हरिजन'साठी थोडे लेखन करून १९ व २० ऑक्टोबरला आपल्या दौऱ्यात काय साधले याची चर्चा त्यांनी गफारखानांबरोबर केली. गफारखानांनी आपले मत मोकळेपणे गांधींना सांगितले, "खुदा-ई-खिदमदगार प्रामाणिक आहेत, पण त्यांच्या मनात हिंसा अद्यापि दबा धरून आहे. त्यांना झटकन राग येतो यामुळे त्यांचे प्रशिक्षण पुष्कळ करावे लागेल. पण अखेर आपण यश मिळवू. हा देश धान्ये व फळफळावळ चांगली पिकवतो. पण हिंसाचाराने सगळ्याची माती झाली आहे. एकमेकांच्या वाईटावर उठलेले व नाश करायला टपलेले हे पठाण आहेत. पण अहिंसा व अनत्याचार त्यांनी आत्मसात केला तर हा प्रदेश नंदनवन बनेल. आस्ते

आस्ते आमची सुधारणा होत आहे. अहिंसेचा चांगला परिणाम कसा होतो याचे एक उदाहरण महात्माजी, आपल्याला सांगतो. आता आम्ही पूर्वीसारख इंग्रज माणसाला भीत नाही. सविनय कायदेभंगाची चळवळ चालू असता एक इंग्रज अंमलदार आपल्या शिपायांसह लाल डगलेवाल्यांची एक मिरवणूक उधळून टाकण्यासाठी आला. त्याच्या खिशात १४४ कलमाखाली मिरवणुकीला बंदी घालणारा हुकूम होता. पण तो न दाखविता नुसताच धाकदपटशा दाखवू लागला. एका लाल डगलेवाल्याच्या हातांतील झेंडा हिसकावून घेण्याचा प्रयत्न त्याने केला. स्वयंसेवकांचा पुढारी तो सोडीना. तेव्हा त्या अंमलदाराने गोळ्या झाडण्याचा हुकूम दिला. पण लाल डगलेवाले स्तब्ध उभे राहिले, तेव्हा तो चकित झाला. घाबरला. त्याची कशी फेफे झाली हे पाहायला महात्माजी, आपण तेथे असायला पाहिजे होते. त्याच्या तोंडून शब्द उमटेना. मी त्याला शांत केले व सांगितले, आम्ही सगळे निःशस्त्र आहो. तुला काही इजा होणार नाही. त्याने जर दमदाटी न करता आम्हाला हुकूम दाखविला असता तर आम्ही सर्व मिरवणूक सोडून निघून गेलो असतो. आता इंग्रजांना आमच्या अहिंसेचीच भीती वाटते. अहिंसक पठाण हा हिंसक पठाणापेक्षा अधिक खतरनाक आहे असे ते म्हणतात. तुमच्या शिकवणीने आमचा खूप फायदा झाला आहे. आता मी माझ्या लोकांना सांगतो, की तुमच्या घोषणाबाजीचा काही उपयोग नाही. सर्व भीती तुम्ही सोडली आणि शरीरश्रमाने तुमची रोटी तुम्ही मिळविली म्हणजे तुम्ही स्वराज्य मिळविल्यासारखेच आहे. ही तुमचीच शिकवण आहे, महात्माजी!"

यावर गांधी म्हणाले, "तुमच्या ईश्वरसेवकांना काही प्रशिक्षण देण्याची गरज आहे. त्यांनी आपल्याला लागणारे धान्य, भाज्या, फळे पिकवावी, आरोग्यरक्षण करावे, खादीच्या सर्व प्रक्रिया शिकाव्या आणि त्यासाठी थोडे दिवस वर्ध्याला यावे. तसेच जर हरएक कामात नियमितपणा व वक्तशीरपणा नसेल तर सगळे बिघडून जाते. वेळच्या वेळी लवकर उठणे व झोपी जाणे हे सर्व त्यांना शिकविले पाहिजे."

उतमनझै येथे थोडी विश्रांती घेऊन २१ ऑक्टोबर रोजी पुनः उरलेल्या गावीं जाण्याकरिता, गांधी दौऱ्यावर निघाले. मारदान जिल्ह्यात खुदाई-खिदमदगारांना त्यांनी सांगितले की, अहिंसेचा स्वीकार अर्धवट करून भागत नाही. पूर्णपणे करावा लागतो. तुमच्या आसमंतात राहाणाऱ्या सर्वांशी मैत्री ठेवून त्यांचा विश्वास तुम्ही संपादन केला आहे काय? केला असेल तर अहिंसा तुमच्या अंगी पूर्ण बाणली आहे असे ठरेल. समाजातील सगळ्याचे सहकार्य खुदा-ई

खिदमदगार आपल्या प्रेमळ अहिंसक वर्तनाने मिळवितो. त्याच्या सांगण्याने इतर आपल्या घाणेरड्या, अनारोग्यकारक सवयी सोडून देतात. गुन्हेगार गुन्हे करण्याचे सोडून देतात व मद्यपी लोक निर्व्यसनी बनतात. असे तुमच्या समाजात झाले म्हणजे मी समजेन की अहिंसा पचविलेले एवढे लोक आमच्या-पाशी आहेत आणि हिंदुस्तानला मुक्ती मिळण्याचा काळ आता दूर नाही.

यानंतरचा, दौरा स्वाबी, कोहाट, बन्नू, डेराइस्माइलखान या सर्व जिल्ह्यांत झाला. अनेक खेडी गांधींनी पाहिली. खुदाई-खिदमदगार त्यांच्याबरोबर होते. सरहद्द प्रांतापलीकडच्या टोळ्यांनी आपले नातेवाईक पळवून नेले अथवा ठार मारले, अशा तक्रारी त्यांचेपुढे मांडण्यात आल्या. ब्रिटिश सरकारास या टोळ्यांचा बंदोबस्त कोट्यवधी रुपये खर्चूनही करता आला नाही. काँग्रेस मंत्रिमंडळाकडून सुद्धा फार अपेक्षा बाळगणे व्यर्थ आहे, कारण त्याला पोलिसावर व लष्करावर नियंत्रण करण्याचा अधिकारच नाही. या टोळ्यांचे हल्ले व उपद्रव थांबविणे शक्य नसेल तर डॉ. खानसाहेबांनी राजीनामा द्यावा असे मला वाटते, असे गांधी म्हणाले. खुदाई-खिदमदगारांसमोर केलेल्या भाषणात हिंसात्मक संघटना व अहिंसात्मक संघटना यांमधील फरक त्यांनी स्पष्ट केला: "हिंसेचा प्रतिकार अहिंसेनेच केला पाहिजे, मग ती हिंसा कितीही प्रक्षोभक, चिडविणारी आणि उपमर्द करणारी असो. हे ज्याला आचार-उच्चार -विचारात आणता येणार नाही त्याला अहिंसा-सेवक बनता येणार नाही." विरोधकाविषयी द्वेषाची किंवा शत्रुत्वाची भावना मुळीच असून चालणार नाही. ती भावना सदा क्षमेची व प्रेमाची असावयास हवी हे त्यांना आफ्रिकेत आलेल्या अनुभवावरून त्यांनी स्पष्ट केले. तेथे मीर आलमखान या पठाणाने माझ्यावर हल्ला केला पण मी प्रतिकार करीत नाही असे पाहून त्याला पश्चात्ताप झाला आणि तो माझा मित्र व सहकारी झाला, असे गांधींनी सांगितले.

२७ ऑक्टोबरला गांधी डेराइस्माइलखान येथे गेले. तेथे जाहीर सभेत भाषण करताना ते म्हणाले, "येथे असलेल्या अल्पसंख्य हिंदूंनी खऱ्या 'हमसाया' प्रमाणे शेजारधर्म पाळून राहिले पाहिजे आणि खुदाई-खिदमदगारांनी त्यांना आदराने वागविले पाहिजे. सर्वांनाच त्यांनी रक्षणकर्ते या नात्याने पाहिले पाहिजे.

३१ ऑक्टोबर रोजी गांधींच्या दौऱ्याचा शेवटचा टप्पा सुरू झाला. पतियाला आणि मिरखेल या खेड्यांना भेटी देऊन, संध्याकाळी ४ वाजता रस्त्यावरील वाहतूक बंद असताही गफारखानांनी सांगितले, आम्ही धोका पत्करण्याला तयार आहो आणि गाडी चालवीत असलेला आपला मुलगा वलीखान यांना गाडी पुढे चालविण्यास सांगितले. ते म्हणाले कोणी गाडी थांबवायला सांगितले

तर तावडतोब थांबवायची, इषारा न जुमानता पुढे गेल्यास मात्र आपल्यावर गोळी झाडण्यात येईल. एरवी आपण कोण आहो हे पाहून आपल्याला पुढे जाऊ देण्यात येईल. अखेर १२५ मैलांचा प्रवास संपवून सर्व जण पेशावरला आले. परत आल्यावर पेशावरच्या वकीलमंडळींनी त्यांना मानपत्र दिले व त्यात त्यांना आपले व्यवसायबंधु म्हटले. गांधींनी आपल्या विनोदी भाषणात म्हटले की, मी तुमच्या व्यवसायामधून केव्हाच हाकलला गेलो आहे. इंग्लंडमध्ये माझे नाव बॅरिस्टरच्या यादीतून काढून टाकले आहे. शिवाय अलीकडे मी कायदेभंगाचा सपाटा लावलेला आहे व माझ्या 'हिंद स्वराज्य' मध्ये वकील-वर्गाची भरपूर नालस्ती केली आहे. सत्य व सेवा यांना स्मरून व प्राप्तीकडे दुर्लक्ष करील तोच खरा वकील, असे गांधी म्हणाले. ९ नोव्हेंबरला सकाळी शेगावला येण्यासाठी गांधींनी पेशावर सोडले. गफारखान व ते इतके निकट झाले होते की त्यांच्या वियोगाच्या कल्पनेने उभयतांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. गाडीत बसल्यावर 'खुदा-ई-खिदमदगार व बादशाहखान' या मथळ्याखाली गांधींनी 'हरिजन'साठी लेख लिहिला.

शेगावला परत आल्यावर १४ नोव्हेंबर १९३८ रोजी गांधींनी लिहिले की, मुंबई, संयुक्त प्रांत, बंगाल आणि सिंध या प्रांतांतून आपल्याकडे खादी वापरण्यासंबंधी कॉंग्रेसच्या घटनेत जो नियम आहे तो मुळीच पाळला जात नाही. बाकीच्या प्रांतांच्या नावांचा उल्लेख केला नाही याचा अर्थ त्या प्रांतात तो नियम पाळला जात असेल असे मुळीच नाही. स्थानिक स्वराज्यसंस्थांत उमेदवार निवडताना ही काळजी मुळीच घेतली गेलेली नाही, अशी पत्र-लेखकांची तक्रार आहे. खादी व स्वराज्य यांचा काही संबंध नाही असे ते म्हणतात, पण हे बरोबर आहे का? खादी व चरखा यांच्यामार्फतच स्वराज्य मिळवायचे हीच असहकारितेच्या काळापासून आजतागायत समजूत होती व आपण सतत तसे प्रतिपादन करीत आलो आहो, असे गांधींनी लिहिले. संयुक्त प्रांतातील एक पत्रलेखक म्हणतो की, लाचलुचपत व भ्रष्टाचार यामुळे कॉंग्रेसचे नाव खराब होत आहे. कॉंग्रेसची सर्व गैरप्रकारांमधून सुटका होऊन ती शुद्ध होणार नसेल तर तिच्याबद्दलच्या सगळ्या अपेक्षा पुऱ्या होणार नाहीत व तिचे सामर्थ्य नष्ट होईल, असे उद्गार त्यांनी काढले. मंत्र्यांच्या कामकाजाबद्दल लिहिताना त्यांनी म्हटले, "The ministers are not responsible to the India Office several thousands miles away. They are responsible to the millions of their masters who do not know what red tape is and care little. Many of them cannot read and write. But they have

primary wants to be fulfilled. They have been accustomed by Congressmen to think that immediately the Congress comes into power, there will not be a hungry mouth in all India nor a naked person who wants to cover himself. The ministers have to give their time and thought to such problems, if they are to do justice to the trust they have undergtaken."

देशी संस्थानांमध्ये लोकगर्जना होऊ लागल्या होत्या. काश्मीर, हैदराबाद, त्रावणकोर, उदेपूर, राजकोट येथे पूर्ण जबाबदार राज्यपद्धतीची मागणी करण्यात येऊ लागली होती. ३ डिसेंबरच्या अंकात 'संस्थाने आणि लोक, या विषयावर गांधींनी लिहिले: "The almost simultaneous awakening in the Indian States is a very significant event in the national struggle for independence. It will be wrong to think that such awakening can be due to the instigation of one person or a body of persons or any organisation. It is just posible that the Haripura resolution of the Congress put the people of the States on their mettle and they realised as never before that their salvation depended on their own labours. But above all it is the time spirit that has brought about the awakening. It is to be hoped that the Princes and their advisers will recognise it and meet the legitimate aspirations of the people. There is no half-way house between total extinction of the states and the Princes making their people responsible for the administration of their states and themselves becoming trustees of the people, taking an earned commission for their labours."

या 'हरिजन' मधील लेखाचा शेवट गांधींनी पुढील शब्दांत केला आहे: "If the Princes believe that the good of the people is also their good, they would gratefully seek and accept the Congress assistance. It is surely in their interest to cuiltivate friendly relations with an organisation which bids fair in the future, not very distant, to replace the paramount power, let me hope, by friendly arrangement. Will they not read the handwriting on the wall ?"

गांधी फक्त हिन्दुस्तानातील घडामोडींचा विचार करीत नव्हते. युरोपात यहुदी लोकांचा चाललेला छळ, हिटलर व मुसोलिनी यांची आंतरराष्ट्रीय गुंडगिरी, चीनची वरवर दिसणारी अहिंसा ऊर्फ युद्धपराङ्मुखता, व्हर्सायच्या तहानेच

हिटलरशाहीला दिलेला जन्म या सर्व विषयांची चर्चा त्यांना भेटायला आलेल्या ख्रिस्ती मिशनरी व इतर लोकांशी त्यांनी केलेली दिसून येते. दुनियेतील घडामोडींवर त्यांचे चांगले लक्ष होते. एका ख्रिस्ती मिशनऱ्याला त्यांनी दिलेल्या संक्षिप्त पण संपूर्ण उत्तरात त्यांची भूमिका स्पष्ट झाली आहे. ते म्हणाले : " Peace will never come until the great powers courageously decide to disarm themselves. It seems to me that the recent events must force that belief on the Great Powers. I have an implicit faith-a-faith that burns today brighter than ever, after half a contury's experience of unbroken practice of non-violence that mankind can only be saved through non-violence."

□

प्र. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/243/2
संग्रालय

# ७. वैयक्तिक कायदेभंग– सुभाषचंद्र गुप्त झाले– 'छोडो भारत' आंदोलनाचा प्रारंभ

डिसेंबर १९३८ च्या मध्याला सरहद्द प्रांताचा दौरा संपवून गांधी शेगावला परत आले. नंतर काँग्रेस कार्यकारिणीची सभा तेथे भरली. तिने देशी संस्थानात होत असलेल्या नव्या लोकजागृतीचे स्वागत केले. संस्थानांतील लोक नागरी स्वातंत्र्य व जबाबदारीचे स्वराज्य मागत आहेत हे पाहून काँग्रेस कार्यकारिणीने त्यांना पाठिंबा व्यक्त केला. तसेच काही प्रागतिक संस्थानांनी जनतेच्या मागण्यांना योग्य तो प्रतिसाद दिला याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. (औंध, भोर वगैरे अशी महाराष्ट्रातील उदाहरणे) याच सुमाराला मुस्लिम लीग आपल्या स्वतंत्र मागण्या वाढवीत होती आणि तिला प्रत्युत्तर म्हणून हिंदुमहासभा हिंदू राष्ट्रीयत्वावर भर देत होती. गांधींना भेटायला सगळ्या दुनियेतून लोक येत होते. त्यांत चीन, जपान, हवाई येथील बुद्धिमंत नेते होते, तसेच दक्षिण आफ्रिकेतील नीग्रो लोकांचे पुढारी डॉ. टेमा हे होते. दक्षिण आफ्रिकेतील १ कोटी लोकांना २० लाख गोऱ्या लोकांशी सामना करायचा आहे. तेथे असलेले भारतीय फक्त ७५ हजार आहेत. नीग्रो व भारतीयांनी एक होणे ही चूक ठरेल असे गांधींनी त्यांच्या प्रश्नाला उत्तर दिले. त्यांचे व तुमचे मैत्रीचे संबंध जरूर असावे, पण एकरूपता नसावी· तुम्ही तेथील भूमीचे मूळ सुपुत्र आहा. स्वतंत्रपणे, अहिंसात्मक मार्गाने त्यावर विश्वास ठेवून झटले तर तुम्हाला यश मिळेल. ख्रिस्ती धर्माचा प्रत्यक्ष व्यवहार ख्रिस्ताच्या तत्त्वांना सोडून होत असतो. ख्रिस्ती युरोपिअनांचे अनुकरण तुम्ही कशातही करू नये. आपल्या झुलू अथवा बांटू स्वत्वाला जपावे."

मुसोलिनी अथवा हिटलर यांच्याशी त्यांच्या शस्त्रांनी लढून यश मिळणार नाही. त्यांना प्रतिकार अवश्य केला पाहिजे, पण तो अहिंसेने आणि यातना सोसूनच, या गांधींच्या प्रतिपादनाची सर्वत्र खिल्ली उडविली जात होती. अशामध्ये कलकत्त्याचे 'स्टेटस्‌मन' हे दैनिक इंग्रजी पत्रही होते. त्याला उत्तर देताना गांधींनी लिहिले: "I hold that non-violence is not merely a personal virtue. It is also a social virtue to be cultivated like the other virtues. I was not prepared to find the view expressed by the *Statesman* that the example of Christ proved once and for all that in a worldly and temporal sense it can fail hopelessly.

Though I cannot claim to be a Christian in the Sectarian sense, the example of Jesus' suffering is a factor in the com-prosition of my undying faith in non-violence which rules all my actions, wordly and temporal. And I know that there are hundreds of Christians who believe likewise. Jesus lived in vain, if he did not teach us to regulate the whole of life by the eternal Law of Love."

जानेवारी १९३९ च्या मध्याला काँग्रेस कार्यकारिणीची सभा बारडोली यथे भरली, ती संस्थानिक व त्यांच्या प्रजा यांचा प्रश्न फार तातडीचा होऊ लागला होता त्याचा विचार करण्यासाठी. त्रावणकोरमध्ये जबाबदारीच्या स्वराज्याची व नागरी स्वातंत्र्याची मागणी होत होती, त्याजबरोबर संस्थानचे दिवाण सर रामस्वामी अय्यर यांजवर काही वैयक्तिक स्वरूपाचे दोषारोप करण्यात येत होते. त्याबाबत गांधींचा सल्ला असा होता की, या दोन गोष्टींची गल्लत करू नये आणि जबाबदारीच्या स्वराज्याच्या मागणीवर लक्ष केंद्रित करावे. जयपूर संस्थानात अशीच मागणी होती आणि त्या संस्थानचे मालमत्ता धारण करणारे मूळ रहिवासी जमनालाल बजाज यांच्या संस्थान-प्रवेशावर बंदी घालण्यात आली. असेच प्रकार इतर काही संस्थानांतूनही सुरू झाले. राजकोटच्या ठाकुरसाहेबांनी आपल्या इंग्रज दिवाणाच्या मताची पर्वा न करता आपल्या प्रजेचा संतोष संपादण्याचा हिय्या केला; म्हणून गांधींनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी बहुतेक काठियावाडातील संस्थानांचे दिवाण इंग्रज होते, तसेच जयपूरचेही इंग्रज दिवाण होते आणि ते आपल्याला संस्थानिकाचे नोकर न समजता मालकासारखे वागत. जोपर्यंत संस्थानी प्रजाजनांत आपल्या हक्कांबद्दल जागृती आणि स्वाभिमान उत्पन्न झाला नव्हता तोपर्यंत काँग्रेसने संस्थानी मुलुखाच्या राजकारणात हस्तक्षेप करावयाचा नाही असे धोरण ठेविले होते. परंतु आता जमाना बदलला होता आणि गांधींनी खुद्द 'हरिजन' मध्ये एकामागून एक मार्गदर्शक लेख संस्थानिक व त्यांची प्रजा यांच्या हितासाठी लिहिले. त्यांत राजकोटच्या ठाकोरसाहेबांना दिलेली वचने रद्द करण्याला त्यांचे इंग्रज दिवाण सर पॅट्रिक कॅडेल यांनी लावले, यामुळे गांधी त्यात विशेष आपलेपणाने पडले आणि त्यामुळ ते बराच काळ गाजत राहिले आणि गांधींच्या सोशिकपणाची, अहिंसाचाराचीही त्याने कसोटीच पाहिली. ३१ जानेवारीच्या 'हरिजन'च्या अंकात राजकोट व जयपूर येथील घडामोडींचे गांधींनी समालोचन करून तेथील इंग्रज दिवाणांनी रेसिडेंटच्या पाठिंब्याने गुंडगिरीचे व वचनभंगाचे थैमान आरंभिले आहे, असे लिहिले. लोकांना मात्र कितीही प्रक्षोभक प्रकार घडले तरी अहिंसेचा त्याग करू नका हे

फिरून फिरून वजावले. वल्लभभाई पटेल राजकोटच्या ठाकोरसाहेबांच्या प्रजेचे प्रमुख म्हणून सर्व व्यवहार पाहत होते. जी कमिटी पुढील राज्य-कारभाराबद्दल व्यवस्था पाहाण्याकरिता सरदार पटेलांच्या संमतीने नेमावयाची होती त्याबाबतचे पत्र त्यांचेजवळ होते, पण ते त्यांनी प्रसिद्ध केले नव्हते. मुसलमान व भयात यांचे प्रतिनिधी कमिटीवर घ्यावयाचे होते. याबाबत हिंदुस्तान सरकारने काढलेल्या पत्रकाबद्दल गांधी म्हणतात : ' But the communique adroitly cmits the most relevant fact that the terms of reference have been altered cut of shape. These were agreed to by the Thakore Saheb in Council of which the British Dewan was a member. I have naver known such a breach (dishoncurable) of a fact signed cn be-half of a Chief. I do suggest that the Resident, who shculd be the Custodian of the honour of the Chiefs. within his jurisdiction, has in this case, dragged the name of the Thakore Saheb in the dust. Let me state the issue clearly. I seek no interference in the affairs of the state. I seek non-interference by the Resident in Rajkot. The Resident is directly responsible for the strained relations between the State and the people. It is therefore, the duty of the Paramcunt Power to see that the solemn part is fulfilled to the letter and in spirit.'"

९ फेब्रुवारी १९३९ रोजी पुन: संस्थानांचा विषय घेऊन, तसेच १३ फेब्रुवारी रोजी 'हरिजना'त त्यांनी लिहिले, " There is rocm in my conception of an independent India for states with Princes as Constitutional trustees as in Aundh."

राजकोटकडून कैद्यांना गैरवर्तणूक दिल्याच्या आणि कस्तुरबा सत्याग्रहात सामील झाल्याच्या बातम्या मिळाल्यावर गांधींनी केलेल्या चौकशीला राजकोटहून उत्तर मिळाले, काही काळजी करू नये, सर्व ठीक आहे. पण गांधींचा विश्वास बसेना. कारण त्यांना दुसरीकडून खबर कळत होती. पुन: पुन: एकमेकांच्या तारा झाल्या, पण व्यर्थ ! अखेर स्वत: राजकोटला जाण्याचे गांधींनी ठरविले ते शांततादूत या नात्याने. त्यांनी सरदारांना सत्याग्रह थांबविण्याची विनंती केली. राजकोटात होत असलेले अत्याचारांचे वृत्तान्त त्यांना स्वस्थ बसू देईनात अथवा इतर काम करू देईनात. २८ फेब्रुवारी १९३९ रोजी ते राजकोटला जाऊन पोचले. जेलखान्यांना त्यांनी भेटी दिल्या

व त्यांची बोलणी ठाकुरसाहेब, रेसिडेंट व श्री. वीरावाला यांजबरोबर सुरू झाली. तीन दिवस झालेल्या चर्चेत ठाकुरसाहेबांनी आपली वचने पाळण्याच्या दृष्टीने काही प्रगती झाली नाही. आपली सहनशक्ती आता संपली, असे म्हणून २ मार्च १९३९ रोजी त्यांनी ठाकोरसाहेबांना पत्र लिहून राजकीय सुधारणा कमिटी नेमण्याची विनंती केली. त्यात यू. एन. ढेबरप्रभृती पाच सदस्य नेमावे व तिघे ठाकोरसाहेबांनी नेमावे असे सुचविले. याच पत्राची नक्कल रेसिडेंट गिब्सन यांस पाठविली आणि एक कडक पत्र वीरावाला यांसही पाठविले. ३ मार्चपर्यंत उत्तर मागितले होते. ते ठरल्या वेळेवर न आल्याने गांधींनी उपोषण सुरू केले आणि पत्रकारांना त्याबद्दल माहिती व मुलाखत देण्यास प्रारंभ केला. इतक्यात ठाकोरांचे उत्तर आले, पण त्यात समाधान होण्यासारखे काही नव्हते. उलट, आगीत तेल ओतण्याचाच प्रकार होता. त्याप्रमाणे यथोचित उत्तर त्यांस पाठविले. गांधींचे उपोषण सुरू झाल्यावर अनेक प्रांतांच्या मुख्य मंत्र्यांनी व्हाइसरॉयसाहेबांना या प्रकरणी लक्ष घालण्यासाठी तारा केल्या. व्हाइसरॉयनी आपला राजपुतान्यातील दौरा आटोपता घऊन दिल्लीस प्रयाण केले आणि गांधींनी रेसिडेंट गिब्सन यांच्यामार्फत पाठविलेल्या संदेशाला उत्तर म्हणून गांधींना कळविले की, या कामी सरन्यायाधीश सर मॉरिस ग्वायर यांना निवाडा देण्याला सांगण्याची माझी तयारी आहे. राजकीय परिषद व ठाकुरसाहेब यांच्यामधील भूमिकांची न्याय्यता सर मॉरिस यांनी ठरवावयाची होती. गांधींनी लॉर्ड लिनलिथगो यांचे म्हणणे मान्य केले आणि ७ मार्च रोजी उपोषण संपविले. पुढे गांधी दिल्लीस गेले आणि व्हाइसरॉयबरोबर दीर्घ चर्चा होऊन सर मॉरिस ग्वायर यांचा निवाडा जाहीर झाला. त्यामुळे गांधी व सरदार पटेल यांचे म्हणणे सर्वस्वी बरोबर होते असे सिद्ध झाले. सरन्यायाधीशांनी लिहिले,

" In my opinion the true construction of each document is that the Thakore Saheb undertakes to appoint the persons whom Mr. Vallabhbhai Patel may recommend and that he does not reserve to himself any discretion to reject those whom he does not approve. He is, undoubtedly, entitled ro criticise the recommendations and to urge reasons for reconsidering them; but unless it can be shown that any of the recommendations are neither the subjects nor the servants of the state Mr. Patel is to have the last word."

गांधींनी ४ व ५ एप्रिल रोजी पुनः लॉर्ड लिनलिथगो यांची भेट घेतली. ७ एप्रिल रोजी त्यांनी गांधींना लिहून दिले की ठाकोरसाहेब आपला शब्द पाळतील हे पाहण्याचे आमचे कामच आहे.

९ एप्रिलला गांधी राजकोटास परत आले व त्यांनी ठाकोरांना कमिटी नेमून त्यांची नावे कळवा म्हणून लिहिले, परंतु नावे कोणाची असावी, मुसलमान, भयात, हरिजन यांना प्रतिनिधित्व असावे वगैरे बाबींवर चर्चा सुरू झाली. या चर्चेत संख्यावाढीचा प्रश्न आला, जीना व आंबेडकर राजकोटला आले आणि त्यांनी मुसलमान व अस्पृश्य यांच्यावर अन्याय होत असल्याची तक्रार केली. सर मॉरिस यांचा निकाल मिळाल्याला पंधरा दिवस झाले तरी कमिटी सदस्य कोण असावे याचा निकाल होईना आणि आपण शांतिदूत म्हणून राजकोटला आलो, पण कलहकारण होऊन बसलो म्हणून गांधीजींचे मन अगदी विटून गेले. गांधींनी परिषदेची म्हणून सात सदस्यांची जी नावे पाठविली ती राजकोटच्या प्रजाजनांचीच आहेत असे सिद्ध करा म्हणून त्यांनी सांगण्यात आले. खुद्द ढेबर राजकोटचे नाहीत असा आक्षेप घेण्यात आला. अखेरीस " Empty-handed, with body shattered and hope cremated,

गांधी राजकोट सोडून वर्ध्याला गेले. यानंतर प्रजापरिषदेने आपले आपण काम पाहावे व माझ्या नादी लागू नये असे त्यांनी आपल्या निवेदनात म्हटले. 'Rajkot has been to me a priceless laboratory.' तसेच 'Chief Justice's award has become a halter round my neck' असे उद्गार काढले. त्याचप्रमाणे, 'I confess I was quilty of impatience when I wrote to Mr. Gibson about the interminable delays. Such impatience reflects little credit on my **ahimsa.** अखेरीस मॉरिस अॅवार्डचा त्याग करण्याचे ठरवून ते म्हणाले, "I recognise my error. At the end of my fast, I had permitted myself to say it had succeeded as no previous fast had done. I now see that it was tainted with **himsa**." असे म्हणून व्हाइसरॉय व सरन्यायाधीश यांची त्यांनी क्षमा मागितली. मॉरिस अॅवार्ड फेकून दिल्यावर अनेकांना वाटले आपण आपल्या यशावरच तिलांजली दिली. पण प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांना त्यानी अहिंसेचे व सत्याग्रहाचे सर्व शास्त्र पुनः समजावून सांगितले, आपल्या चुका कबूल करण्याची महती पटविली. ठाकोरसाहेबांनी बोलावलेल्या दरबाराला ते हजर राहिले. तेथे त्यांनी पूर्वीचे सर्व जाहीरनामे रद्द केले, जप्त केलेली मालमत्ता व दंडाच्या रकमा परत करण्याची घोषणा केली, सर्वांना नागरी हक्क व स्वातंत्र्ये बहाल केली आणि

राजकीय सुधारणा कोणत्या कराव्या याच्या शिफारशी करण्यासाठी कमिटी नेमली. काठियावाड राजकीय सभेच्या कार्यकर्त्यांपुढे, अखेरचे भाषण करून ३१ मे रोजी गांधींनी राजकोटला रामराम केला. त्यांच्या या भाषणातील काही उद्‌गार आत्यंतिक महत्त्वाचे आहेत. ते म्हणाले. : "I am not tired of repeating that we should be non-violent in thought and word and deed. We had been saying so but there was no emphasis on the first of these. A dissclute character is more dissolute in thought than in deed and the same is true of vicience. Our violence in word and deed is but a feeble echo of the surging violence of thought in us.' त्याचप्रमाणे "For me there is no laying down of arms. I can't do so. I am trying to be the warrior of my description and, if God wills, it may be that during this life. Such a warrior can fight single handed." आपले प्रवचन संपविताना ते म्हणाले "In the pursuit of earnest research, I may seem to act strangely. I should not grumble if every one left me in the honesty of his conviction. Let no one stick to me in the blind faith that something will happen."

गांधी राजकोट प्रकरणात गुंतलेले असल्यामुळे ६ मार्च रोजी त्रिपुरी येथे भरलेल्या काँग्रेसच्या बैठकीला ते जाऊ शकले नाहीत. या काँग्रेसच्या अध्यक्षस्थानी कोणाला निवडावे याबद्दल बराच वाद माजला होता. अबुल कलाम आजाद, सुभाषचंद्र बोस आणि पट्टाभि सीतारामय्या यांची नावे सुचविण्यात आली होती. २० जानेवारीलाच आजाद यांनी जाहीर केले की, प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे आपल्याला निवडू नये. निवडणूक २९ जानेवारीला होणार होती. सुभाषबाबूंनी एक निवेदन काढून तरुणांचा प्रति-निधी म्हणून आपण निवडणूक लढवितो असे जाहीर केले. २४ जानेवारीला बारडोलीस काँग्रेस कार्यकारिणीची सभा झाली. तेव्हा गांधींच्या सांगण्यावरून सरदार पटेल, राजेंद्रप्रसाद, जमनालाल बजाज, जयरामदास दौलतराम, शंकरराव देव, भुलाभाई देसाई आणि कृपलानी यांनी एक पत्रक काढून सुभाषचंद्रांनी आपल्याला अध्यक्ष निवडावे म्हणून दिलेल्या कारणांची यथार्थता मान्य केली नाही. आजाद जरी उमेदवार नव्हते तरी त्यांचे मत डॉ. पट्टाभी सीतारामय्या यांनाच अनुकूल होते. जुन्या नेतृत्वावर केलेले आरोप यांना कोणालाच मान्य नव्हते. त्यांनी म्हटले की, सुभाषबाबूंनी आपल्या म्हणण्याचा फेरविचार करावा आणि पट्टाभी सीतारामय्यांची निवडणूक बिनविरोध होऊ द्यावी. सुभाषचंद्र

यांनी त्यास जोरदार प्रत्युत्तर दिले व आपली उमेदवारी मागे घेतली नाही. अखेरीस मतमोजणी होऊन सुभाषचंद्र बोस १५८० विरुद्ध १३७५ मतांनी काँग्रसचे अध्यक्ष निवडून आले. गांधींनी बारडोलीहून एक पत्रक काढून हा आपला पराभव आहे असे जाहीर केले. पण I rejoice in this defeat असे म्हटले. सुभाषबाबू म्हणाले, गांधींनी हा आपला वैयक्तिक पराभव मानावा याचे मला दुःख होते. हिंदुस्तानातील सर्वश्रेष्ठ पुरुषाचा विश्वास जर मला संपादन करता आला नाही तर माझ्या दृष्टीने अत्यंत शोकप्रद बाब आहे. एप्रिलअखेर सुभाषबाबूंच्या आग्रहाच्या निमंत्रणावरून गांधी ए. आय्. सी. सी. च्या सभेस हजर राहाण्याला कलकत्त्याला गेले. पंधरा दिवस अगोदर त्यांनी लिहिले की, पंडित गोविंद वल्लभपंत यांच्या ठरावाचा मला अर्थच लागत नाही आणि त्याचा जसजसा मी विचार करतो तसतसा तो मला जास्तच नापसंत होत जातो. तुमच्या मताची कार्यकारिणी तुम्हाला मिळेल अशी हमी मी घऊ शकत नाही. २९ एप्रिलला गांधी सभेला नव्हते. नंतर सुभाषबाबूंनी त्यांचे पत्र वाचून दाखविले आणि आपल्या राजीनाम्याचे निवेदन सादर केले आणि श्रीमती सरोजिनी नायडू यांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती केली. नेहरू व नायडू यांनी बोस यांना राजीनामा मागे घेण्याची विनंती केली, पण त्यांनी ती मानली नाही. अखेर राजेंद्रप्रसाद यांची उर्वरित वर्षासाठी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. सुभाषचंद्रांनी फॉरवर्ड ब्लॉक या नावाची नवी संघटना आपण स्थापन करीत असल्याचे जाहीर केले. गांधीसेवा संघाच्या सभेला गांधी वृंदावन येथे गेले. तेथे विधायक कार्यक्रमावर चर्चा झाली. त्याचा व हिंसाचाराचा अतूट संबंध आहे हे विशद करण्यात आले. मेअखेर मुंबईस प्रमुख पारशी पुढाऱ्यांबरोबर मद्यप्रतिबंधाच्या विषयावर मोकळेपणाने चर्चा झाली. पारशी कुटुंबांचा वृत्तिच्छेद मद्यबंदीच्या कार्यक्रमाने होईल असे त्यांचे म्हणणे होते. गांधींनी त्यांच्या सर्व हरकतींना समर्पक उत्तरे दिली. सर कावसजी जहांगीर, सर जे. सी. कोयाजी, सर होमी मोदी, ए. डी. श्रॉफ, सकलातवाला, खारेघाट वगैरे मंडळी त्यांत होती. आर्चबिशप ऑफ बॉम्बे यांनीही रोटरी क्लबात केलेले आपले भाषण त्यांजकडे पाठविले. या सर्वांच्या सर्व आक्षेपांचा यथोचित परामर्श गांधींनी 'हरिजन'मधील मद्यबंदीचा अर्थ या शीर्षकाखाली लिहिलेल्या लेखात घेतला. जूनअखेर गांधी मुंबईस अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सभेसाठी आले. या कमिटीने दोन महत्त्वाचे ठराव केले. एका ठरावाने प्रांतिक कमिटीच्या आगाऊ परवानगीशिवाय प्रांतात सत्याग्रह कोणीही करू नये असे ठरविले आणि दुसऱ्याने काँग्रेसची मंत्रिमंडळे व संबंधित प्रांतिक काँग्रेस कमिट्या यांजमधील संबंध निश्चित ठरविले. काँग्रेसचे तिरंगी

निशाण आणि वंदे मातरम् हे देखील वादग्रस्त प्रश्न बनले होते. या मुद्द्यावर भांडणे करू नयेत, माघार घ्यावी. असे प्रतिपादन गांधींनी केले. सुभाषचंद्र बोस यांनी मुंबईच्या कॉंग्रेस मंत्रिमंडळाच्या दारूबंदीच्या धोरणावर प्रतिकूल टीका केली. त्यांना सावधान राहण्याचा इशारा देताना गांधी म्हणाले, अल्प-संख्य आणि जातीयवाद्यांचा पक्ष घेऊन बाबुजींनी देशाची मोठीच हानी ( disservice ) केली आहे. अशा प्रकारे कॉंग्रेसमध्ये फाटाफुटीची लक्षणे वाढत चालली होती. देशी संस्थानिक ब्रिटिश सत्तेच्या पाठिंब्याने प्रजेला दडपून टाकण्याचे प्रयास करीत होते आणि कॉंग्रेसला त्यांना योग्य सल्ला देण्याची कामगिरी पार पाडता येत नव्हती. पाटण्याला सुभाषबाबूंचे स्वागत काळे झेंडे दाखवून करण्यात आले. स्वामी सहजानंद या किसान पुढाऱ्यावर दगडफेक झाली. राजेंद्रबाबू व गांधी यांनी या प्रकारांचा निषेध केला. अशी अंदाधुंदी माजण्याची चिन्हे अधिकाधिक दिसू लागली असताच, आंतरराष्ट्रीय परिस्थिती देखील पार बिघडली होती. युरोपच्या क्षितिजावर युद्धाचे ढग जमा होत होते. हिटलरने पोलंडला निर्वाणीचा खलिता पाठविला आणि रशिया व जर्मनी यांनी एकमेकांवर हल्ला न करण्याचा करार केला. यामुळे मोठी गंभीर परिस्थिती निर्माण झाली. ३ सप्टेंबर, १९३९ रोजी इंग्लंडने जर्मनीशी युद्ध पुकारले. कारण जर्मनीने पोलंडवर हल्ला केला होता. त्याच दिवशी व्हाइस-रॉयनी भारतीय पुढाऱ्यांना अथवा कायदेमंडळांना न विचारता हिंदुस्ताननेही युद्ध पुकारले असल्याचे जाहीर केले. अनेक वटहुकूम जारी करण्यात आले. नंतर व्हाइसरॉयनी हिंदी पुढाऱ्यांना चर्चेसाठी ५ सप्टेंबर रोजी सिमला येथे येण्यासाठी निमंत्रणे केली. गांधींनी एक निवेदन प्रसिद्ध केले. त्यात आपण फक्त स्वत:पुरते बोलत असल्याचे स्पष्ट करून इंग्लंड व फ्रान्स याबद्दलची आपली सहानुभूती व्यक्त केली व २३ जुलै रोजी अबोटाबाद येथून हिटलरला पाठविलेल्या पत्राचा त्यांत उल्लेख केला आहे. त्यातील एक वाक्य असे आहे: " It is quite clear that you are today the one person in the world who can prevent a war which may reduce humanity in the savage state. " देशाच्या वतीने कॉंग्रेसच बोलू शकते असे गांधींनी व्हाइसरॉयना सांगितले. ८ सप्टेंबर रोजी शेगावला परत आल्यावर पोलंडचे माजी वृद्ध अध्यक्ष पॅडेरेवस्की यांनी आपले नैतिक वजन पोलंडसाठी खर्ची घाला असे गांधींना लिहिले. गांधींनी उलट उत्तर लिहिले, माझ्या शब्दांत काही सत्तेचे सामर्थ्य नाही. पण माझे हृदय पोलिश लोकांच्या पूर्ण बाजूला आहे. हिंदुमहासभेच्या कार्यकारिणीने ब्रिटनला पाठिंबा दिला व हिंदुस्तानचे रक्षण करणे हे ब्रिटन व हिंदुस्तान या दोघांचे काम आहे. हे

सहकार्य परिणामकारक व्हावे यासाठी जबाबदार सरकार ताबडतोब अंमलात आणावे, सैन्यांत अधिक हिंदूंची भरती करावी आणि जातीय निवाड्याचा फेरविचार व्हावा. ही सभा १० सप्टेंबरला झाली. मुस्लिम लीगची सभा १८ सप्टेंबरला होऊन जीनांना व्हाइसरॉयनी बोलाविले हे योग्य झाले आणि तिने ब्रिटिश सरकारला असा इशारा दिला की मसलमानांना न्याय्य व योग्य वागणूक दिली आणि लीगच्या पसंतीन व मंजुरीनेच राजकीय प्रगती ठरविली तरच मुसलमानांचा पाठिंबा सरकारास मिळेल आणि मुसलमानांच्या वतीने बोलणारी मुस्लिम लीग ही एकच एक प्रातिनिधिक संस्था आहे. लिबरल फेडरेशन आणि ख्रिश्चन कॉन्फरन्स वगैरे संघटनांनी बिनशर्त पाठिंबा दिला. काँग्रेस कार्यकारिणीची सभा वर्धा येथे भरली. जीना यांना खास बोलावणे पाठविले होते, पण ते आले नाहीत. इतर निमंत्रितांमध्ये सुभाषचंद्र बोस, लोकनायक अण, आचार्य नरेंद्र देव व जयप्रकाश नारायण हे होते. नेहरू चीनला गेलेले होते. पण चार दिवस चाललेली कार्यकारिणीतील चर्चा पुरी होण्यापूर्वी ते यऊन पोचले. गांधी हजर होतेच. चर्चा झाल्यावर ठरावाचा मसुदा करण्याचे काम जवाहरलाल नेहरू यांजवर सोपविण्यात आले. १४ सप्टेंबरला हे निवेदन प्रसिद्धीला देण्यात आले. त्यातील काही भाग पुढे दिला आहे :

" The British Government have declared India as a belligerent country, promulgated ordinances, passed the Government of India Act Amending Bill and taken many other far-reaching measures which affect the Indian people vitally and circumscribe and limit the powers and the activities of the Provincial Governments. This has been done without the consent of the Indian people whose declared wishes in such matters have been deliberately ignored by the British Government. The working Committee must take the gravest view of these developments.

फॅसिझम, नाझिझम व इंपीरिअॅलिझम यांचा धिक्कार करून पोलंडबद्दल सहानुभूती व्यक्त करून, ठरावात पुढे म्हटले आहे की, "If the war is to defend the **status quo,** imperialist possessions, colonies, vested interests and privileges, then India can have nothing to do with it. Great Britain must end imperialism in her own possessions, establish full democracy in India and the Indian people must have the right of self-determination by framing their own constitution through a constituent assembly without any external interference."

संस्थानी मुलखातील प्रजला इतर हिंदी जनतेला बरोबरीचे स्थान व दर्जा मिळावा यावर भर देऊन हा ठराव पुढे म्हणतो की, The Congress Working Committee invite the British Government to declare in unequivocal terms what their war aims are in regard to democracy and imperialism and how these aims are going to apply to India and to be given effect to at present. The real test of any declaration is in its application in the present, for it is the present that will govern action today and give shape to the future."

काँग्रेसच्या कार्यकारिणीने नेहरू, आजाद, आणि पटेल यांची एक कमिटी युद्धपरिस्थितीत उद्भवणाऱ्या सर्व प्रश्नांचा विचार करण्याकरिता नेमली. काँग्रेसच्या या निवेदनाला मॉस्को रेडिओवरून प्रसिद्धी देण्यात आली. सप्टेंबर १५ रोजी काँग्रेसच्या निवेदनावर लिहिताना खुलासा केला की माझे एकट्याचे मत असे होते की ब्रिटिशांना सर्व प्रकारचे सहकार्य बिनशर्त द्यावे. पण ते कोणालाच रुचले नाही. गांधींनी काँग्रेसच्या या 'जाहीरनाम्या' वरील भाष्य पुढील शब्दांनी संपविले.

" All that is required is a mental revolution on the part of British statesmen. To put it still more plainly, all that is required is honest action to implement the declaration of faith in democracy made from British platforms. Will Great Britain have an unwilling India dragged into war or willing-ally cooperating with her in the prosecution of a defence of true democracy. The Congress fights not with violent but with non-violent means, however imperfect, however crude he non-violence may be. "

व्हाइसरॉयनी पुनः एकदा हिंदुस्तानच्या सुमारे पन्नास पुढाऱ्यांना, भेटीला बोलाविले. गांधी, नेहरू, बोस, पटेल व जीना त्यांमध्ये होतेच. व्हाइसरॉयची भेट घेऊन २६ सप्टेंबर रोजी ते सिमल्याहून शेगावला येण्यासाठी गाडीत बसले, तेथे पोचतात तो भारतमंत्री लॉर्ड झेटलंड यांच्या भाषणाचा वृत्तान्त त्यांची वाट पाहात होता. त्यामध्ये त्यांना पूर्वीचा परिचित असलेला साम्राज्यवादी दर्पच प्रत्ययाला आला. काँग्रेसच्या जाहीरनाम्याचा पाठपुरावा करून त्यांनी म्हटले, " As a friend of the British, I appeal to English states men that they wll forget the old language of imperialism and open a new chapter for all those who have been held under imperial bondage. "

२ ऑक्टोबर रोजी गांधी ७० वर्षाचे झाले आणि तन्निमित्त डॉ. राधाकृष्णन यांनी एक गौरवग्रंथ संपादित करून प्रसिद्ध केला. तो दिवस देशभर सुटीचा मानावा असे कोणी सुचविले, पण यामुळ देशात आणखी वादंग माजायला नको म्हणून राजगोपालाचारी यांनी ती कल्पना खोडून काढली. गांधींचे मतही तसेच तंतोतंत होते. अल्पसंख्य जमातींचा कैवार घेऊन भांडणाऱ्या ब्रिटिशांना समजावण्यासाठी गांधींनी १६ ऑक्टोबर रोजी 'दि फिक्शन ऑफ मेजॉरिटी' या मथळ्याखाली एक लेख लिहिला. त्यातील एक मर्मग्राही वाक्य पुढीलप्रमाणे आहे. हिंदू हे म्हणजे एक बहुसंख्य जमात आहे असे म्हणण्याचा प्रघात आहे असे नमूद करून गांधी पुढे म्हणतात, " Hinduism is an elastic indefinable term and Hindus are not a homogeneous whole like the Mussalmans and Christains. When one analyses the majority in the provincial legislatures, it will be found to consist of a combination of the socalled minorities. In other words, and in reality, so far as India is concerned, there can only be political parties and no majority or minority communities. The cry of the tyranny of the majority is a fictitious cry.

व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी १७ ऑक्टोबर रोजी एक जाहीरनामा काढून मुसलमानांच्यातर्फे बोलण्याचा मुस्लिम लीगचा दावा मान्य केला. युद्धाच्या उद्दिष्टांबाबत त्यांनी ब्रिटिश मुख्य प्रधानांच्या म्हणण्याचा पुनरुच्चार केला. भारताच्या स्वातंत्र्याबाबत त्यांनी ब्रिटिश राजकीय धोरणाचे अंतिम उद्दिष्ट हिंदुस्तानला डोमिनिअन स्टेटस ऊर्फ वसाहतींचे स्वराज्य देण्याचे आहे हीच जुनी तबकडी पुन: वाजवून दाखविली. त्यासाठी युद्धसमाप्तीनंतर १९३५ च्या कायद्याचा पुनर्विचार होईल, असे सांगितले. अर्थात हा जाहीर-नामा काँग्रेसची पूर्ण निराशा करणारा होता. गांधी तर म्हणाले की, व्हॉइसरॉय याऐवजी काहीच घोषणा न करते तर बरे होते. काँग्रस कार्य-कारिणीने अगदी असमाधानकारक आणि संतापजनक अशी त्याची बोळवण केली. पूर्वीच्या साम्राज्यवादी धोरणाचीच यात पुनरुक्ती आहे असे तिच्या. ठरावात म्हटले आहे. 'न्यूज क्रॉनिकल' या ब्रिटिश पत्राच्या विनंतीस मान देऊन काँग्रेसची भूमिका एक तार पाठवून स्पष्ट केली. तसेच न्यूयॉर्क टाइम्स, डेली हेरल्ड, पारिस सैर, पॉपुलो द इतालिया, नॅशनल तिदेंत, योरमिरी शिबुन आणि तास न्यूज एजन्सी यांजकडे त्याच आशयाची निवेदने पाठविली. या निवेदनाची भाषा पुढीलप्रमाणे आहे :

" The Indian National Congress has demanded no constitutional change during the war. Its demand is for a declaration that Britain's war aims necessarily include the independence India according to the Charter framed by her elected representatives after the war. This declaration should be acted up to during the war to the utmost extent possible. The minorities question is a bogey. Not that it does not exist but its proper solution can only come out of the proposed constituent assembly. According to Indian opinion, the Hindu-Muslim question is the direct product of British rule. The least the Congress could do was to withdraw the Congress ministers from provincial administrations. Further action will wholly depend upon British handling of the crisis. The Congress left the door open to Britain to mend the mistake.

२४ ऑक्टोबर रोजी गांधींनी 'हरिजन' मध्ये जाहीर केले की, सविनय कायदेभंगाची व्यवस्था व नियंत्रण कॉंग्रेस कार्यकारिणीच्या हाती सोपविण्यता आलेले आहे. कॉंग्रेसच्या भूमिकेवर ब्रिटिश पार्लमेंटमध्ये २६ ऑक्टोबर रोजी वादविवाद झाला. सर सॅम्युएल होअर यांनी त्यावेळी केलेल्या भाषणाबद्दल गांधी म्हणाले, त्यांनी संस्थानिक, युरोपिअन आणि अल्पसंख्य यांचे एकच गाठोडे बांधून त्यांना संरक्षण हवे असे म्हणण्यात स्वतःला हास्यास्पद केले आहे. युरोपिअनांचे हितसंबंध सुरक्षित राहिले पाहिजेत असे ते म्हणतात, पण ते तर केवळ तलवारीच्या जोरावर उत्पन्न झालेले आहेत. स्वतंत्र हिंदुस्तान प्रत्येक विदेशी हक्कहितसंबंध गुणवत्तेवर तपासून पाहील आणि राष्ट्रीय हिताला जो विरोधी वा प्रतिकूल ठरेल तो नष्ट करण्यात यईल. ऑक्टोबरच्या अखेरीस सर्व कॉंग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले. ब्रिटिश धोरणाशी जुळवून वागणे त्यांना अशक्य झाले.

१ नोव्हेंबर १९३९ रोजी गांधी, जीना व राजेंद्रप्रसाद यांनी व्हाइसरॉयची संयुक्त मुलाखत घेतली. त्यांच्या कार्यकारी कौन्सिलाची वाढ करण्याचा प्रस्ताव त्यांनी मांडला. कॉंग्रेसने साहजिकच, कॉंग्रेसने सुचविल्याप्रमाण ब्रिटिश सरकारने आपल्या धोरणात बदल करून तो जाहीर केला नाही तर सहकार्याच्या दिशेने आपल्याला पाऊल उचलता येणार नाही असे सांगितले. जातीय प्रश्न घटना परिषद सोडवील असे कॉंग्रेसचे म्हणणे होते. यामुळे त्यांच्यात व आपल्यात बोलणे होऊच शकत नाही असे जीना म्हणाले. तेव्हा

व्हाइसरॉयनी हा प्रश्न सुटत नाही असे ठरविले आणि ५ नोव्हेंबर रोजी तशी घोषणा केली. त्यावर टीका करताना गांधी म्हणाले, " Once a declaration to free India from bondage, not in stages but at once is made, an interim solution will be found to be easy. Protection of the rights of minorities will then become simple. The game of seesaw will cease. The minorities are entitled to protection not in stages, but to the fullest extent and in one single step. No charter of freedom will be worth working which does not ensure the same measure of freedom for the minorities as for the majority. The minorities will be full-fledged partners in the framing of the Constitution. All resources must, therefore be exhausted to reach the constituent assembly before any direct action is thought of. A stage may be reached when direct action may become the necessary prelude to the Constituent Assembly. That stage is not yet. ;

अलाहाबादेस भरलेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या सभेचा एक विशेष असा होता की, तेथे केलेल्या ठरावात कोणतीही चळवळ सुरू करण्याला एक अवश्यमेव ठेवण्यात आलेली अट म्हणजे, नियमितपणे सूत काढणे आणि विधायक कार्यक्रमांतील बाबींचे आचरण करणे. गांधींचे काम आता फारच वाढले होते आणि शेगावला एक पोस्ट ऑफिस व टेलिफोन बसविणे आवश्यक झाले होते. तेथून न्यूज क्रॉनिकल पत्राला पाठविलेल्या संदेशात गांधींनी म्हटले : " The declaration of British policy about India is a purely moral issue, for freedom-loving India has neither the will nor the right to know Britain's will about her. I am aware that Britain can impress men and money from India, treated as her dependency, but she can get moral weight on her side only from an India conscious of her freedom. I am anxious, as a friend of Britain bound by many ties, that she should come out victorious not because of her superiority in arms but because of her will to be just all along the line. She will then have the true friendship and sympathy of millions of people all over the world who have became sick of the wanton waste of precious life and of the palpable lies disseminated to sustain greed and hunger for dominion."

आता सर्व राष्ट्राचे लक्ष राजकीय आणि घटनात्मक प्रश्नांकडे लागले होते. युरोपात युद्ध सुरू झाले असल्याने ते चालू असता व संपल्यानंतर काय व्हावे याबद्दल चर्चा सुरू झाली. डिसेंबर महिन्यात लिबरल व हिंदुसभा यांच्या बैठकीतही याबद्दल खल झाला. केंद्रस्थानी जबाबदार सरकार नसावे याबद्दल विषाद व्यक्त करून लिबरल फेडरेशनने १९३५चा कायदा सुधारून युद्धसमाप्तीनंतर हिंदुस्तानला डोमिनिअन स्वराज्य मिळावे अशी मागणी केली. हिंदुमहासभेने मॅकडॉनल्ड यांचा जातीय निवाडा रद्द व्हावा, डोमिनिअन स्वराज्य हिन्दुस्तानला देण्याचा कायदा तावडतोब करावा, आणि सैन्याचे पूर्ण हिंदीकरण करावे, अशा मागण्या केल्या. मुस्लिम लीगने आपली मंत्रिमंडळे तशीच चालू ठेविली आणि मुसलमानांवर अन्याय व जुलूम करणारी काँग्रेस मंत्रिमंडळे गेली म्हणून शुक्रवार ता. २२ डिसेंबर, १९३९ हा 'मुक्तिदिन' म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. गांधींनी जीनांना हा घोषणा दिन रद्द करण्याची विनंती केली. सरदार पटेल यांनी जीनांनी केलेल्या आरोपांचा इन्कार केला. काँग्रेसचे अध्यक्ष राजेंद्रप्रसाद यांनी या आरोपांची चौकशी स्वतंत्र न्यायसंस्थेकडून करून घ्या, असे जीनांना सुचविले, पण त्यांनी ते अमान्य केले आणि कळविले की, आपण व्हाइसरायकडे सर्व काही कळविले आहे. जीनांनी आरोपांचा पुनरुच्चार केल्यावर, सरदार पटेलांनी प्रांतांच्या मुख्य मंत्र्यांना सांगितले की, आपआपल्या गव्हर्नरांचे लक्ष या आरोपांकडे वेधून घ्या. तसे केल्यावर गव्हर्नरांनी हे आरोप बिनबुडाचे आहेत असे म्हटले. काँग्रेसची मंत्रिमंडळे गेल्यावर आता मुसलमानांना जीना कोणता सल्ला देणार आहेत, असा प्रश्न अबुल कलाम आजाद यांनी विचारला. मुसलमानांच्या दुसऱ्या काही संस्थांनी जीनांवर गहजब केला. तेव्हा त्यांनी आपली भूमिका बदलली. माझे हिंदूंशी काही भांडण नाही. काँग्रेसच्या सरकार-विरुद्ध मुक्तिदिन पाळला गेला असे ते म्हणू लागले. पण हा सगळा प्रकार नेहरू व जीना यांजमध्ये जी जातीय सलोख्याबद्दल बोलणी होऊ घातली होती त्यांना उपकारक नव्हता. अखेर या वाटाघाटी झाल्याच नाहीत. डिसेंबर-अखेर कार्यकारिणीची सभा होऊन असे घोषित केले गेले की, कठोर परिश्रमा-शिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही, त्याची आराधना अहिंसेनेच होईल आणि त्याचा मार्ग सविनय प्रतिकाराचाच आहे. तसेच विधायक कार्यक्रमाचा झटून अवलंब करीत राहावे. २६ जानेवारीला स्वातंत्र्यदिन येणार तेव्हा नवी सुधारलेली शपथ सर्वांनी घेण्याचा ठराव झाला. या शपथेमध्ये चरखा, खादी व इतर ग्रामोद्योग यांच्या अभिवृद्धीसाठी झटण्याचे कलम होते. सुभाषचंद्र बोस व इतर डाव्या विचारसरणीच्या मंडळींनी स्वातंत्र्याच्या प्रतिज्ञेत चरखा

घातल्याबद्दल जोराची हरकत घेतली. फॉरवर्ड ब्लॉकच्या अनुयायांनी स्वतंत्र रीतीने स्वातंत्र्यदिन साजरा करण्याचे ठरविले. जयप्रकाश नारायण, स्वामी संपूर्णानंद, रॉयवादी व इतर समाजवादी यांनी पण प्रतिकूल टीका केली. पण या स्पष्टवक्तेपणाचे गांधींनी स्वागतच केले. अखेरीस सुभाषचंद्रांशिवाय इतरांनी आपले आक्षेप जास्त पुढे दामटले नाहीत. स्वातंत्र्यदिन साजरा झाला. गांधींनी लिहिले की, सुभाष व गांधी यांमध्ये कोण पुढे जातो ही शर्यतच आहे, युवक व वयस्क यांजमधील हा शर्यत आहे. पण मला आशा आहे, की संघर्ष न होता आम्ही आमचे समान ध्येय गाठल्याशिवाय राहाणार नाही.

लॉर्ड लिनलिथगो यांनी दिल्लीस भेटीला बोलाविले व गांधी ५ फेब्रुवारी रोजी गले. त्यानंतर संभाषण होऊन पुढील आशयाचे सरकारी पत्रक निघाले. गव्हर्नर जनरलाच्या कौन्सिलाची वाढ ताबडतोब करण्याला व फेडरल योजनेत फेरबदल करून डोमिनिअन स्वराज्य स्थापनेला गती देण्याची व्हाइसरायची तयारी आहे.

गांधींनी या सर्व प्रकारात काँग्रेसची मागणी संपूर्ण होत नाही असे स्पष्ट केले आणि तूर्त जास्त वाटाघाटी थांबवाव्या. ६ फेब्रुवारी रोजी टाइम्स, न्यूज क्रॉनिकल, मँचेस्टर गार्डिअन व टाइम्स या पत्रांच्या प्रतिनिधींना एक निवेदन तोंडी सांगितले. ते म्हणाले, "काँग्रेसची मागणी व व्हाइसरॉयसाहेबांची देणगी यांतील मुख्य फरक म्हणजे हिंदुस्तानचे अंतिम भवितव्य ब्रिटिश सरकारने निश्चित करायचे की हिंदुस्तानने म्हणजे घटनापरिषदेने ठरवायचे हा आहे. संरक्षणाचा प्रश्न स्वतंत्र हिंदुस्तानने सोडविण्याचा आहे. आम्ही मित्रभावनेने एकमेकांचा निरोप घेतला. वाटाघाटी फसल्याने माझी निराशा कधीच होत नाही. पुढे केव्हा तरी त्या सफल होतातच."

वर्ध्याला परत आल्यावर 'आपल्यापुढील कार्य' या विषयावर गांधींनी 'हरिजना'त लिहिले की, व्हाइसरॉयशी भेट होऊन चर्चा झाल्याने काहीच बिघडले नाही. अहिंसेने काम करणाऱ्याला खूप सहनशीलता ठेवून वर्तावे लागते. हिन्दुस्तानला डोमिनिअन व्हायचे असले तर इतरांच्या शोषणात ब्रिटनबरोबर भागीदारी त्याला नको आहे. वाटाघाटी माझ्या समजुतीप्रमाणे सोडून देण्यात आलेल्या नाहीत. कशा प्रकारचे 'डोमिनिअन' आम्ही व्हावे हे आम्ही ठरविणार, ब्रिटन नव्हे. जीनांची अशक्य व पूर्णतः अराष्ट्रीय भूमिका आम्हांला मान्य नसली, तरी मुसलमान बांधवांच्या अस्तित्वाची व कल्याणाची कदर आम्ही केलीच पाहिजे. इतर समस्यांबद्दल देखील आमची वृत्ती अशीच असणार, अशा

आशयाचा खुलासा त्यांनी केला. 'डेली हेरल्ड'च्या खास विनंतीवरून गांधींनी त्याच आशयाचा मजकूर त्या पत्राकडे पाठविला. त्यातील काही वाक्ये अशी होती : " What is offered is not real independence. Reality demands that India should determine what she needs, not Britain. There could be no justice or virtue in Britain yielding to successful rebellion, violent or non-violent. It is necessary for Great Britain to be just to declare her determination to recognise immediately the freedom of India in practice and the constitution to be framed, by the Constituent Assembly or an equivalent, as soon as practicable. ....No make-shifts such as is now offered can stir India's heart or world conseience.'

गांधींच्यानंतर व्हाइसरॉयसाहेबांनी जीनांना भेटीस बोलाविले. कोणतीही व्यवस्था नव्याने ठरली तरी त्यात सर्व अल्पसंख्यांना अन्याय होऊ नये असे, जीना म्हणाले व ब्रिटिश सरकारास त्याची पूर्ण जाणीव आहे, असे लॉर्ड लिनलिथगो म्हणाले.

लॉर्ड झेटलंड यांच्या ताज्या घोषणेबद्दल गांधींनी 'हरिजना'त लिहिले: " The builders of the British Indian Empire have patiently built its four pillars — the European interests, the army, the Indian Princes and the communal divisions. The last three were to subserve the first. It is clear to the realist that the buiiders have to remove the four pillars before they can claim to have given up the empire or the empire spirit......... Between the nationalist and the imperialist, there is no meeting ground.....I conscientiously cannot pray for the success of British arms, if it means a further lease of life to India's subjection to foreign domination. I write this last sentence with a heavy heart."

यानंतर लॉर्ड झेटलंड यांच्या भमिकेची बरोबर दखल घेऊन, आगामी रामगड काँग्रेसकरिता योग्य ते ठराव करण्यासाठी कार्यकारिणीची सभा पाटणा येथे भरली ती २८ फेब्रुवारी रोजी. गांधी त्या सभेला गेले होते. तेथे ठराव तयार करण्यात आला. ५ मार्च १९४० ला गांधी शेगाव येथे परतले. शेगावचे नामकरण आता सेवाग्राम असे करण्यात आले होते. त्यांना सारखे विचारले जाऊ लागले की, सविनय कायदेभंगाची चळवळ तुम्ही केव्हा

सुरू करणार ? पटण्यास केलेल्या ठरावाचा इतकाच अर्थ या प्रश्न करणाऱ्यांना समजतो. पण अशी चळवळ करण्याची पूर्वतयारी मात्र त्यांच्या चित्ताला शिवत नाही. गांधींनी स्पष्ट लिहिले की, डाव्या बाजूला झुकलेले लोक मजवर असा दबाव कधीही आणू शकणार नाहीत. माझ्या अटी पूर्ण करणारे लोक किती आहेत, ते किती प्रामाणिकपणे त्या पाळतात हे सर्व पूर्वानुभवावरून शहाणा झाल्यामुळे मला पाहावे लागते. मार्च महिन्याच्या मध्याला म्हणजे रामगड काँग्रेस भरण्याच्या आधी थोडे दिवस सर मायकेल ओडवायर यांचा कॅक्स्टन हॉलमध्ये गोळी घालून खून करण्यात आला. लॉर्ड झेटलंड हेही जखमी झाले. गांधींनी ही माथेफिरूपणाची कृती आहे. माझ्याप्रमाणे प्रत्येक हिंदी माणसाला याबद्दल शरम वाटली पाहिजे. मला दुःख व शरम वाटते की लंडन शहरात हरएक हिंदी माणसाच्या चेहऱ्याकडे संशयित नजरेने पाहिले जाईल. १७ मार्च रोजी रामगडला विषयनियामक कमिटीची सभा भरली, तेव्हा राजेंद्रप्रसादांनी हिन्दुस्तान व युद्धसंकट या विषयावर पाटण्याला कार्यकारिणीने केलेला ठराव मांडला. नेहरूंनी त्याला दुजोरा दिला. या ठरावाला सत्तावीस उपसूचना मांडण्यात आल्या. यांतील चौदा मागे घेण्यात आल्या. बाकीच्या नापास झाल्या आणि मूळ ठराव २५०० विरुद्ध १५ मतांनी पास झाला. रामगडला पास झालेल्या एकाच ठरावात असे जाहीर करण्यात आले की, " Nothing short of complete Independence can be accepted by the people of India and that no permanent solution is possible except through the Constituent assembly."

शिवाय त्यात असे नमूद करण्यात आले की, सद्यःपरिस्थितीत काँग्रेस आणि तिच्या मताशी जमणाऱ्या इतरांना सांप्रतच्या युद्धात पैसा, मनुष्यबळ, व सामानसुमान यापैकी कशाचीही मदत देता येणार नाही. गेल्या सहा वर्षात गांधींनी विषयनियामक कमिटी अथवा खुली काँग्रेस यांच्यासमोर भाषण केले नव्हते. पण यावेळी त्यांनी बोलण्याची इच्छा दर्शविली. २० हजार प्रतिनिधी व इतरांनी त्यांचे भाषण १८ मार्च रोजी रात्री १० वाजता अगदी शांतपणे श्रवण केले. कोणतीही महत्त्वपूर्ण, जबाबदारीची मोहीम सुरू करण्यासारखे वातावरण माझ्या प्रत्ययाला येत नाही, असे गांधींनी आपल्या या भाषणात स्वच्छपणे सांगितले. रामगड काँग्रेसचे खुले अधिवेशन अबुल कलाम आजाद यांच्या अध्यक्षतेखाली १९ मार्चला सुरू झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी एम. एन. रॉय यांचा त्यांनी १८६४ विरुद्ध १८३ मतांनी पराभव केला होता. खुले अधिवेशन सुरू झाले, तेव्हा पाऊस पडत होता, पण आजाद यांचे वक्तृत्वपूर्ण भाषण सर्वांनी, काही गडबड न करता ऐकिले. मुसलमान अल्पसंख्य आहेत ही कल्पनाच

त्यांना मान्य नव्हती. हिंदुस्तानवर हिंदूंइतकाच मुसलमानांचा मातृभूमी म्हणून हक्क आहे, असं ते म्हणाले आणि हीच भूमिका ख्रिस्ती बांधवांची असली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. आम्ही एकमेकांकडे अविश्वासाने व संशयाने पाहाण्याचे सोडून दिले पाहिजे. शंका व भीती यांनी मनात घर केले म्हणजे कोणतीही घोषणा, आश्वासन आणि घटनात्मक संरक्षण कलमे आपल्या उपयोगी पडणार नाहीत. आपण सर्वांनी आपल्या राष्ट्रीय ध्येयाकड एकजुटीने चाल केली पाहिजे, असे त्यांच्या भाषणाचे तात्पर्य होते. काँग्रेसच्या बैठकीच्या वेळीच सुभाषचंद्र बोस यांनी 'समेटविरोधी' अशी एक परिषद भरविली आणि गांधी व इतर उजवे पुढारी ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या शब्दजालात गुंतण्याचा संभव असल्यामुळे आपण खबरदार असले पाहिजे अशा आशयाचे भाषण त्यांनी तेथे केले. सेवाग्रामला गेल्यावर २५ मार्च रोजी गांधींनी प्रत्येक काँग्रेस कमिटी म्हणजे सत्याग्रह समितीच आहे अशा आशयाचा लेख लिहिला. रामगड येथे केलेली दोन भाषणे व 'हरिजन' मध्ये जे काही मी लिहीन ते सर्व सत्याग्रही होऊ इच्छिणाऱ्यांनी नीटपणे मनन करावे व मी अभ्यास त्यासाठी सुचवीत आहे तो करीत राहावे, असे गांधींनी सर्वांस बजाविले. येत्या लढतीमध्ये कसलाही अर्धकच्चेपणा मी खपवून घेणार नाही, असे त्यांनी हडसून खडसून सांगितले. प्रत्येक काँग्रेस कमिटीने सत्याग्रही स्त्री-पुरुषांच्या नावांची नोंद करावी. सर्वांशी प्रेमाचे वर्तन, अस्पृश्यता स्वतःच्या वर्तनात पूर्णपणे हाकून लाविणे, नियमितपणे सूत काढणे, फक्त खादीचाच वापर करणे, या व्रतांचे सत्याग्रहयाने आचरण केले पाहिजे. नाव नोंदविलेल्या प्रत्येक सत्याग्रही स्त्री-पुरुषाने रोजनिशी लिहून तीमध्ये आपल्या दैनंदिन कामाची नोंद करावी. स्वतःच्या सूतकताईखेरीज, प्राथमिक सभासदांच्या भेटी घेणे, त्यांना खादी वापरण्याला व सूत काढण्याला प्रवृत्त करणे व सत्याग्रही म्हणून नोंदविले जाण्यासाठी त्यांची मानसिक व शारीरिक तयारी करवून घेणे ही कामे केली पाहिजेत, हरिजनांच्या घरी जाऊन त्यांच्या अडचणींचे निवारण करणे आणि कसल्याही पैशाच्या मदतीची अपेक्षा न करणे हे नियम त्यांनी पाळले पाहिजेत. या लेखात अखेरीस असे म्हटले आहे की, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने सत्याग्रह कमिट्यांच्या संघटनाकडे लक्ष पुरवावे आणि कामकाजाचा अहवाल वेळोवेळी माझ्याकडे पाठवावा. एक महिन्याच्या आत मला योग्य प्रतिसाद मिळाला तर सत्याग्रह कमिट्या कार्यान्वित कशा करायच्या व त्याला किती नेमका वेळ लागेल हे समजणे शक्य होईल. सविनय कायदेभंग करावा लागला तर त्याची पूर्वतयारी किती कसोशीने काळजीपूर्वक, सावधानतेने गांधीजी करीत होते हे या लेखावरून स्पष्ट होते: "In the coming struggle if it must come, no half-hearted

loyalty will answer the purpose. Imagine a general marching to battle with doubting, ill-prepared soldiers. He will certainly march to defeat. I shall not consciously make any such fatal experiment." असे त्यांनी लिहिले.''

मार्च १९४० अखेर मुस्लिम लीगने आपल्या लाहोर येथे भरलेल्या बैठकीत पाकिस्तान आपले ध्येय असल्याचे जाहीर केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात जीनांनी द्विराष्ट्रवादाचा पुकारा केला. ते म्हणाले, "Islam and Hinduism are not religions in the strict sense of the word, but are in fact, different and distinet social orders, and it is only a dream that the Hindus and the Muslims can ever evolve a comman nationality."

जीनांच्या मते सध्याचे ऐक्य हे कृत्रिम होते. ते ब्रिटिश अंमलामुळ जन्माला आले आणि ब्रिटिशांच्या संगिनींच्या बळावरच टिकले. जीनांच्या मार्गदर्शनाला अनुसरून पाकिस्तानचा ठराव लीगने पास केला. तथापि, कितीतरी मुसलमानांना हे पसंत पडले नाही. कारण एप्रिलमध्ये दिल्लीस मुस्लिम राष्ट्रीय अशा काँग्रेस मुस्लिम, अहरार, जमियत-ई-उलेमा-इ-हिंद, शिया पोलिटिकल कॉन्फरन्स वगैरे संस्थांचे प्रतिनिधी जमले. सिंधचे मुख्य प्रधान अल्लाबक्ष हे या आजाद मुस्लिम कॉन्फरन्सच्या अध्यक्षस्थानी होते. हे सर्व मुख्यत: पाकिस्तानच्या कल्पनेविरुद्ध आपला आवाज उठविण्यासाठी आले होते. त्यांनी काँग्रेसच्या घटनापरिषदेच्या मागणीला जोरदार पाठिंबा दिला आणि हिन्दुस्तानची फाळणी करण्याच्या कल्पनेविरुद्ध आपला निषेध नोंदविला. पूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याकरिता इतरांशी सहकार्य करण्याचा आपला निश्चय व्यक्त करून त्यांनी म्हटले, प्रत्येक मुसलमान हा हिंदीच आहे.

गांधींनी मुस्लिम लीगच्या पाकिस्तानविषयक ठरावाबद्दल त्याने गोंधळ उडविणारी परिस्थिती निर्माण केली आहे, असे म्हटले. हिंदु-मुस्लिम एकता असल्याशिवाय स्वराज्य नाही हे माझे म्हणणे कायमच आहे. १९१९ साली माझे हेच मत होते आणि आजही ते कायम आहे. पण सविनय कायदेभंग हा निराळा प्रश्न आहे. सविनय कायदेभंग एका व्यक्तीला सुद्धा करता येतो. त्यापासून काही लाभ झाला तर तो साऱ्या हिंदुस्तानचा असेल. पण नुकसान झाले तर त्या व्यक्तीचे किंवा समूहाने तो केला असेल तर त्या समूहाचे नुकसान होईल. मला असे वाटते की जेव्हा प्रत्यक्ष निर्णयाचा प्रसंग येईल तेव्हा मुसलमान हिंदुस्तानची फाळणी व्हावी असे म्हणणार नाहीत. द्विराष्ट्रकल्पना असत्यपूर्ण आहे. हिंदु-

स्तानातील बहुतेक मुसलमान हे धर्मांतर केलेल्यांचे वंशज आहेत. धर्म बदलल्याने त्यांचे राष्ट्रीयत्व बदलले नाही. बंगाली मुसलमान बंगाली भाषा बोलतो, बंगाली पोशाख करतो व इतर बंगाली माणसाप्रमाणे खातो अथवा करमणुकीची साधने वापरतो, नुसते पाहून कोणता बंगाली हिंदू आहे, अथवा मुसलमान आहे, हे सांगणे कठीण आहे. दक्षिण हिंदुस्तानात सर्वत्र हाच अनुभव येतो. सर अली इमाम यांना मी जेव्हा पाहिले तेव्हा ते मुसलमान असतील अशी यत्किंचित शंका मला आली नाही. तीच गोष्ट जीनांची आहे. त्यांचे झीणा हे नाव कोणाही गुजराती हिंदूचे असू शकते. जेव्हा त्यांना मी प्रथमच पाहिले तेव्हा ते हिंदूच आहेत असे मला वाटले. विठ्ठलभाई पटेल यांची दाढी व टर्किश फेज टोपी यामुळे मी त्यांना मुसलमान समजत असे. इक्बाल व किचलू ही नावे हिंदु-मुसलमानांत समानच आहेत. ज्यांना ईश्वरानेच एक म्हणून निर्माण केले आहे त्यांना माणूस दुभंगू शकणार नाही.

दुसऱ्या एका लेखात गांधींनी नवाबजादा लिआकतअलीखाँ यांनी घतलेल्या आक्षेपांना उत्तरे दिली. ते म्हणाले, "अहिंसावादी माणूस म्हणून मुसलमानांनी पाकिस्तानच हवे असा हट्ट धरला तर जबरदस्तीने मी प्रतिकार करणार नाही. पण या फाळणीला (Vivisection) मी खुषीने संमती देण कधीही शक्य नाही.

५ एप्रिल रोजी चार्ली अँड्र्यूज मरण पावले. 'वन ऑफ दि ग्रेटेस्ट अँड बेस्ट इंग्लिशमेन' असे त्यांजबद्दल गांधींनी म्हटले. सविनय कायदेभंग करून ब्रिटिशांना किंवा मुसलमानांना घाबरवून, गोंधळून टाकण्याची मुळीच इच्छा काँग्रेसला नाही, असे सांगून गांधी पुढे म्हणाले की, सामुदायिक सविनय कायदेभंगाचे तर सध्या कोणी नावच काढू नये. मे महिन्यात महायुद्ध परिस्थितीत मोठाच फरक पडला. ब्रिटनला नॉर्वेमधून माघार घ्यावी लागली. जर्मनीने हॉलंड, बेलजिअम व लक्सेंबुर्ग यांवर स्वारी केली. चेंबर्लेन यांच्याऐवजी चर्चिल मुख्य प्रधान झाले आणि झेटलंड यांच्या जागी एमरी हे भारतमंत्री झाले. त्यांनी पार्लमेंटात त्यांना विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, ब्रिटिश कॉमनवेल्थमध्ये हिंदुस्तानला स्वतंत्र व समान स्थान देणे हेच ब्रिटिश धोरणाचे ध्येय आहे. यावर काहीही बोलण्याचे गांधींनी नाकारले. १७ जून १९४० रोजी फ्रान्सने जर्मनीपुढे शरणागती पत्करिली. दुसऱ्याच दिवशी हिटलरिजमचा मुकाबला कसा करावा यावर गांधींनी लिहिले : "चेक, पोल, नॉर्वेजिअन, फ्रेंच व इंग्रज यांनी जर हिटलरला असे म्हटले असते की संहार व विध्वंस करण्याकरिता शास्त्रीय तयारी करण्याचे तुला कारण नाही. तुझ्या

हिंसासत्राचा प्रतिकार आम्ही अहिंसेने करू, म्हणजे तुला आमचे अहिंसक सैन्य, रणगाडे, विमाने व बेडर जहाजे न वापरता खतम करता येईल. यावर असा जबाब मिळण्याचा संभव आहे की, रक्तपात करून जे मिळवायचे ते रक्तपात न करता हिटलरला मिळाले असते. अगदी बरोबर, पण मग युरोपचा इतिहास फार वेगळ्या तऱ्हेने लिहिला गेला असता. मी असे म्हणण्याचे धाडस करतो की, युरोपची नैतिक उंची यामुळे बरीच वाढली असती, अखेरीस नैतिक योग्यतेला खरी किंमत आहे. मी हे केवळ युरोपच्या लोकांसाठी लिहीत नाही. हे आपल्यासाठी सुद्धा आहे. बलवंतांच्या अहिंसेवरील आपली श्रद्धा प्रकट करण्याला ही अगदी योग्य वेळ आहे. आपण असे म्हटले पाहिजे की, आम्ही आमचे संरक्षण शस्त्रशक्तीने करू इच्छित नाही, आम्ही ते अहिंसक प्रतिकारानेच करू. आपले अहिंसक सैनिक त्याचे स्वागत करतील आणि मग असे सुद्धा घडेल, की तो येणारच नाही. माझे हे स्वप्नरंजन असेल. पण माझ्या समग्र आयुष्यभर जोपासलेल्या तत्त्वाला आणि माझ्या गेल्या वीस वर्षांच्या दिवास्वप्नांना मी खोटे पाडू शकत नाही."

वर्धा येथे १७ जून १९४० रोजी भरलेल्या काँग्रेस कार्यकारिणीने खूप विचार केला. पण गांधींच्या अहिंसक मार्गाने देशरक्षण करण्याची कल्पना कोणाच्या डोक्यात उतरेना. गांधी म्हणाले, मला माझ्या मार्गाने जाऊ द्या, तुम्हाला योग्य वाटेल त्या मार्गाने तुम्ही जा. यानंतर २४ जून च्या 'हरिजनात' गांधींनी लिहिले,

"With the Congress, non-violence was always a policy. It was open to it to reject it, if it failed. If it could not bring political and economic independence, it was of no use. For me, non-violence is a creed. I must act up to it, whether I am alone or have companious. Since propagation of non-violence is the mission of my life, I must pursue it in all weathers. I felt now was the time for me to prove my faith before God and Man." असे जाहीर करून गांधीजी काँग्रेसपासून दूर झाले आणि गांधी सेवासंघातील आपल्या अनुयायांना व शिष्यांना त्यांनी तुमची श्रद्धा माझ्याइतकीच दृढ आहे किंवा काँग्रेसमधील वर्किंग कमिटीच्या सभासदां-सारखी आहे याचे नीट संशोधन करा, असे फर्माविले. कार्यकारिणीमधून व काँग्रेसपासून फक्त गफारखान बाहेर पडले. पण त्यांनाही आपल्या खुदा इ-खिदमदगारांची कसोटी पाहावयाची होतीच. काँग्रेस कार्यकारिणीची एक तातडीची बैठक ३ जुलै रोजी दिल्लीस झाली. तीमध्ये अशी मागणी करण्यात

आली की, तावडतोब व निःसंदिग्धपणे असे जाहीर व्हावे, की हिन्दुस्तानला पूर्ण स्वातंत्र्य देण्याच्या दृष्टीने उचललेले पाऊल म्हणून हंगामी राष्ट्रीय सरकार दिल्लीस स्थापन करावे व त्यावर मध्यवर्ती कायदेमंडळात निवडून आलेल्या सर्व सभासदांचा विश्वास असावा आणि प्रांतांतील सर्व सरकारांचे सहकार्य या राष्ट्रीय सरकारास मिळावे. असे केल्याखेरीज संरक्षणासाठी देशाचे सर्व भौतिक व नैतिक सामर्थ्य एकत्र करता येणार नाही. हे केल्यास कॉंग्रेसला आपली सर्व शक्ती देशाच्या संरक्षणासाठी संघटित करता येईल. संरक्षण म्हणजे आपल्या शर्ती मान्य झाल्यास युद्धप्रयत्नात कॉंग्रेसने पूर्ण सहभाग घेणे असा अर्थ आजाद व राजाजी यांनी सांगितला. नेहरूंनी याचा अर्थ ब्रिटिश साम्राज्यशाहीचे रिक्रूटिंग एजंट होणे नव्हे असा सांगितला. गांधींनी ७ जुलैला 'अरण्यरुदन' या मथळ्याखाली यावर लेख लिहिला. त्यात म्हटले होते की, बापूजी अणे सिमल्याहून परत येताना मला भेटले. कॉंग्रेसच्या मतप्रवाहापासून दूर झाल्याबद्दल त्यांनी मला सहानुभूती दाखविली, पण खरोखर ते अभिनंदनच होते. ते म्हणाले, प्रत्येक इंग्रजाला उद्देशून केलेली तुमची विनवणी बहिऱ्या-पुढील वक्तृत्व ठरेल. पण आपला धर्म काय हे तुम्ही स्वच्छ केले हे चांगले झाले. व्यास महर्षींचे तरी लोकांनी कोठे ऐकले ? कॉंग्रेसच्या ठरावाचा मसुदा राजाजींनी केला होता. आम्ही एकमेकांपासून दूरदूर जात आहो असे मला बरेच दिवस वाटत होते. त्यांना वाटते मी चुकत आहे आणि मला वाटते ते चुकत आहेत. आता खरी निवड ब्रिटिश सरकारलाच करायची आहे. स्वातंत्र्य मान्य झाले तर पुढील भाग आपोआप मान्य केला जातोच, पण ब्रिटनचा मित्र म्हणून मी असे म्हणतो, की कॉंग्रेसने जे देऊ केले आहे ते ब्रिटनने नाकारू नये. ही सर्व चर्चा देशात चालू असताच डाव्या विचारसरणीच्या अनेकांची धरपकड डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टखाली अथवा इतर प्रकारे चालू होती यात सुभाषचंद्र बोस होते. ते कॉंग्रेसचे दोन वेळा अध्यक्ष झाले होते, पण. कॉंग्रेसने त्यांच्या अथवा इतरांच्या अटकेबद्दल काही मतप्रदर्शन केले नाही. गांधी या काळात, विशेषतः युद्धात होत असलेल्या जीवित-वित्तहानीने फार अस्वस्थ झाले होते. आपल्याला काहीच करता येत नाही, तर आपण जिवंत राहाण्याचा तरी काय उपयोग आहे असे त्यांस वाटू लागले होते. आजाद यांनी पुढे एकदा सांगितले, "He was so disturbed that on several occasions he even spoke of suicide. He told me that if he was powerless to stop the suffering caused by war, he could at least refuse to be a witness to it by putting an end to his life."

ब्रिटिश सरकारकडून पुन: एक खेळी खेळण्यात आली. ती पूर्वीच्या कार्यकारी मंडळाची वाढ करण्याच्या कल्पनेचीच खरे तर पुनरुक्ती होती, पण त्यात आणखी सल्लागार युद्धमंडळाची भर घातली होती; घटनात्मक प्रश्न युद्धकाळात चर्चिणे शक्य नाही असे साळसूद दिसणारे विधान सरकारमार्फत करण्यात आले. पण असल्या हुलकावण्यांनी काँग्रेसचे अनुभविक नेते फसणे कसे शक्य होते ? मौलाना अबुल कलम आजाद यांनी असल्या सूचनांचा विचार करण्याकरिता लॉर्ड लिनलिथगो यांचे निमंत्रणही धुडकावून लावले. गांधींनी आजाद यांना पत्र लिहून त्यांना पूर्ण पाठिंबा दिला व म्हटले, ईश्वराची इच्छा हिंदुस्तानने युद्धात सामील व्हावे अशी दिसत नाही. ब्रिटिश सरकारने काँग्रेसच्या सहकाराच्या इच्छेची काहीच कदर केली नव्हती. एमरी यांच्या पार्लमेंटातील भाषणात ते स्पष्ट झाले. काँग्रेसची सभा १५ सप्टेंबर रोजी मुंबईस भरली, तेव्हा आजादांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात पुन: रामगडकडे परत चला हाच सूर लाविला. आता पुढील पाऊल उचललेच पाहिजे, असे ते म्हणाले. महात्मा गांधींकडे पुन: नेतृत्व जाणे हेच योग्य आहे. तशा अर्थाचा ठराव नेहरूंनी मांडला आणि पटेलांनी त्याला अनुमोदन दिले. कोणी भाषणे वगैरे केली नाहीत. आजादांनी गांधींना भाषण करण्याची विनंती केली. आपण आयुष्यात कधी घेतली नव्हती एवढी मोठी जबाबदारी काँग्रेसचे नतृत्व पुन: आपल्याकडे घेण्यामुळे घेत आहो, असे ते म्हणाले. आपल्या भाषणात ते म्हणाले, " I do not want to hurl civil disobedience or anything in the face of the Government without making my meaning clear, the meaning I attach to the sum-total of the Government - actions-actions beginning with the declaration of the Viceroy, the statement of the Secretary of State for India and the series of actions and the policy that the Governmet have pursued since. The sum-total of all these left an indelible impression on my mind, that there is something wrong, same injustice being perpetrated against the whole nation and that the voice of freedom is about to be shifted." या भाषणातच त्यांनी व्हाइसरॉयना भेटून आपला व काँग्रेसचा दृष्टिकोन सविस्तर समजावून सांगण्याचा मनोदय व्यक्त केला आणि ते म्हणाले, " Freedom of speech and pen is the foundation of Swaraj. If foundation-stone is in danger, you have to exert the whole of your might in order to defend that single stone. But the right is subject to one condition that we observe non-violence. You are free to organise mass civil disobedience if

you like though you will then be guilty of indiscipline. But as I said to Subhas Babu, I shall gladly congratulate you if you succeed, but you cannot have my blassings. Of course, the honourable course for you would be to leave the Congress."

गांधींनी फिरून काँग्रेसचे नेतृत्व स्वीकारावे, हा ठराव १९२ विरुद्ध सात मतांनी पास झाला. यानंतर गांधी व्हाइसरॉयना भेटण्यास सिमल्यास गेले आणि त्यांनी आपली स्वतःची आणि काँग्रेसची अशा दोन्ही भूमिका त्यांच्यापुढे स्वच्छपणे मांडल्या. यानंतरच्या वाटाघाटी निष्फळ ठरल्या. व्हाइसरॉयना भारतमंत्र्यांनी आखलेल्या चौकटीपलीकडे शक्य नव्हते. ब्रिटिश सरकारला अखिल हिंदुस्तानची प्रतिनिधी ही काँग्रेसची भूमिका मान्य नसल्यामुळे मुसलमान, शीख, युरोपिअन, संस्थानिक यांच्या हितसंबंधांची सबब पुढे करून राष्ट्राची पूर्ण स्वातंत्र्याकडे होणारी प्रगती अडवून धरावयाची होती. यामुळे गांधींना यश आले नाही. यशाची मोठी आशा त्यानी धरली होती असे नव्हे, पण प्रतिपक्षाला पूर्ण संधी देऊन मग नाईलाज झाला तरच प्रतिकाराचा पवित्रा घ्यायचा या त्यांच्या नेहमीच्या रिवाजाप्रमाणे ते वागले. अखेर ते म्हणाले, "I will not accept defeat. I must strive to have the truth admitted by the British people that the bar to India's freedom lies neither in the Congress nor any other party's in ability to produce an agreement which is in its nature impossible, but that it undoubtealy lies in the British disinclination to do the obviously right thing."

मग गांधींनी पुढे काय करायचे ठरविले? १३ ऑक्टोबर रोजी काँग्रेस कार्यकारिणीची सभा वर्धा येथे झाली आणि तेव्हा गांधींनी आपली प्रत्यक्ष कृतीची योजना पुढे मांडली. दोन दिवसांनी त्यांनी एक पत्रक काढून या योजनेचा खुलासा सेवाग्राम येथून केला. सविनय कायदेभंगाच्या प्रत्यक्ष कृतीची सुरुवात विनोबा भावे करतील. या कायदेभंगाचे स्वरूप लक्षात घ्या. ते अगदी संकुचित आहे. युद्धाविरुद्ध, प्रस्तुतच्या युद्धाविरुद्ध मतप्रचार करणे हे काम विनोबा करतील. या आपल्या मूलभूत हक्काविरुद्ध गदा उभारण्यात आली आहे आणि तिचा आपण उघडपणे प्रतिकार करणार आहो. अगदी अहिंसापूर्वक. १७ ऑक्टोबर रोजी पवनार येथे युद्धविरोधी भाषण करून विनोबांनी कायदेभंग केला. आसपासच्या खेड्यांत फिरून त्यांनी हाच प्रचार चालविला. २१ ऑक्टोबर रोजी त्यांना अटक करण्यात येऊन तीन महिन्यांच्या कैदेची शिक्षा फर्माविण्यात आली.सरकारने विनोबांच्या हालचालींना अथवा कृतींना, भाषणांना प्रसिद्धी देऊ नये, अशा सूचना वर्तमानपत्रांना देऊन युद्धविरोधी प्रचार होऊ नये अशी व्यवस्था केली होती.

तशा प्रकारची नोटीस 'हरिजन' ला पण मिळाली. यावर गांधींनी एक निवेदन काढून मुद्रणस्वातंत्र्यावर, प्रेस अॅडव्हायजरला दिल्ली येथे सगळा मजकूर प्रसिद्ध करण्याला सांगण, हा मोठाच आघात आहे. मला माझे काम या परिस्थितीत नीट करता येणार नाही म्हणून 'हरिजन' बंद करण्यात येत आहे, असे त्यांनी वाचकांना उद्देशून लिहिलेल्या लेखात स्पष्ट केले. ७ नोव्हेंबर रोजी जवाहरलाल नेहरू यांची दुसरे वैयक्तिक सत्याग्रही म्हणून निवड करण्यात आली व तशी सूचना सरकारी अधिकाऱ्यांना देण्यात आली. पण ३१ ऑक्टोबर रोजी छेवकी स्टेशनावर ते उतरत असता त्यांना अटक करण्यात आली. वर्धा येथे गांधींना भटून ते परत जात होते. तेथून गोरखपूर तुरुंगात त्यांची चौकशी करण्यात येऊन चार वर्षांची कैदेची शिक्षा देण्यात आली. ऑक्टोबर महिन्यात त्यांनी अनेक आक्षेपार्ह भाषणे केली, असा त्यांजवर आरोप होता. त्यामुळे दुसरे वैयक्तिक सविनय कायदेभंग करणारे श्री. ब्रह्मदत्त हे ठरले. ७ नोव्हेंबर रोजी वर्ध्याच्या आसमंतात युद्धविरोधी घोषणा केल्याचा त्यांच्यावर आरोप होता. ब्रिटिशांच्या युद्धप्रयत्नाला पैसा व माणसे देऊन मदत करणे चुकीचे आहे. अनत्याचारी व अहिंसक राहून सर्वच युद्धप्रकारांना प्रतिकार करणे हेच योग्य आहे असे त्यांनी घोषित केले. त्यांना अटक होऊन सहा महिन्यांची तुरुंग-वासाची शिक्षा देण्यात आली. नोव्हेंबर महिन्याच्या मध्याला गांधींनी ज्याला प्रातिनिधिक सत्याग्रह असे संबोधिले तो सुरू करण्यात आला. काँग्रेसची कार्यकारिणी, अखिल भारतीय काँग्रेस समिती आणि प्रांतिक व केंद्रीय कायदे-मंडळांचे सभासद यांमधून हे सत्याग्रही निवडले जाऊ लागले. अनेक माजी मंत्री रस्त्यावर आले, त्यांनी युद्धविरोधी घोषणा दिल्या, त्यांना अटक करण्यात आली. आणि बहुतेकांना एक वर्षाची सजा होऊन त्यांना तुरुंगात पाठविण्यात आले. वल्लभभाई पटेल यांनी सत्याग्रह करण्याची नोटीस दिली त्यामुळे; त्यांना ताबडतोब अटक करण्यात आली. १७ नोव्हेंबर हा तो दिवस होता. डिफेन्स ऑफ इंडिया अॅक्टखाली त्यांना डांबून ठेवण्यात आले. राजगोपालाचारी यांनी अनेकांना पत्रे लिहून युद्धप्रयत्नाला मदत देऊ नका असे चिथाविले, म्हणून ३ डिसेंबर रोजी त्यांना अटक झाली. २४ डिसेंबरपासून ४ जानेवारी, १९४१ पर्यंत ख्रिसमससाठी गांधींनी सत्याग्रहाची मोहीम तहकूब केली. १९४० अखेर ११ काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य, १७६ अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सदस्य, २९ माजी मंत्री व ४०० केंद्रीय व प्रांतिक कायदेमंडळाचे सदस्य तुरुंगात गेले. नवे वर्ष सुरू होण्याच्या आधल्या दिवशी अबुल कलाम आजाद यांना अटक होऊन १८ महिन्यांची कारागृहवासाची सजा झाली. यानंतर काढलेल्या पत्रकात गांधींनी म्हटले की, आपला लढा हा युरोपातील युद्ध चालू आहे

तोपर्यंत तरी राहाणारच. जर कोणाला अल्पमुदतीची कैदेची सजा मिळाली तर सुटका झाल्यावर त्याने पुन: सत्याग्रह केला पाहिजे आणि हा क्रम आपला लढा संपेपर्यंत असाच चालला पाहिजे. काही सत्याग्रही लोकांना मोठ्या रकमांचाच फक्त दंड होईल. अशांनी दंड न भरता त्यांची मालमत्ता जप्त करून दंड वसूल केला जाईल. याला तयारी ठेविली पाहिजे. मला आशा आहे की, सरकारने जर स्थावर मिळकत जप्त केली तर तिची विक्री करू नये, फक्त जप्तीतच ठेवावी. ५ जानेवारीपासून कॉंग्रेस कमिट्यांनी सत्याग्रह्यांच्या याद्या तयार ठेवल्या. क्रमाक्रमाने त्यांना युद्धविरोधी प्रचाराला पाठविण्यात येऊ लागले. अटक होईपर्यंत त्यांनी घरी परत न येता या खेड्यातून त्या खेड्यात प्रचार करीत फिरायचे अशी शिस्त होती. कोणतेही वाहन न वापरता सर्वत्र पायी फिरायचे बंधन होते. जानेवारी अखेरपर्यंत सत्याग्रहींची संख्या २२५० पर्यंत गेली. २७ जानेवारीला अशी बातमी प्रसिद्ध झाली की सुभाषचंद्र बोस पोलिसांचा कडक पहारा त्यांच्या निवासस्थानावर असताही तेथून नाहीसे झाले होते. २६ जानेवारी रोजी कोणीच सत्याग्रह केला नाही. तो दिवस गांधींनी सांगितलेल्या पद्धतीने स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा झाला. एप्रिलमध्ये सामान्य कॉंग्रेसजनांची नावे नोंदवून त्यांना सत्याग्रह करण्यास सांगण्यात आले. लवकरच सत्याग्रहींची संख्या २० हजारांवर गेली. १४ हजार एका वेळी तुरुंगात होते. हे पाहून भारतमंत्री एमरी म्हणाले की, तुरुंगातील कॉंग्रेसवाल्यांना पत्रव्यवहार करण्याला खूप सवड मिळेल, अभ्यास करायला सापडेल, युद्ध संपल्यावर त्यांना विचारपूर्ण विधायक अशी योजना मांडता येईल. देशात सर्वत्र कमालीचा असंतोष पसरला होता. रवींद्रनाथ टागोरांनी सर्व जगाला उद्देशून एक संदेश प्रसिद्ध केला व त्यानंतर लवकरच त्यांनी या दुनियेचा अखेरचा निरोप घेतला. तो संदेश असा : " It is no longer possible for me to retain any respect for the mockery of civilisation, which believes by ruling by force and has no faith in freedom at all. By miserly denial of all that is best in their civilisation, by withholding true human relationship from Indians, the English have effectively closed for us all paths of progress. "

राजकीय जीवनाची झालेली कोंडी लिबरल, हिंदु महासभा व मुस्लिम लीग यांना असह्य झाल्यामुळे त्यांना दिल्लीस फार पुरोगामी बदल व्हावयास पाहिजे होता. सर तेजबहादूर सप्रू यांनी कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांमध्ये समेट घडवून आणण्याचा यत्न केला, पण जीनांनी त्यांना मुळीच दाद दिली

नाही. काँग्रेसची युद्धविरोधी सत्याग्रहाची मोहीम म्हणजे आपली मागणी पुरी करून घेण्यासाठी ब्रिटिश सरकारवर आणलेले दडपण आहे असे जीना म्हणाले, तेव्हा गांधींनी सप्रूंना सांगितले की, जीना मुस्लिम लीगचे सामर्थ्य इतके वाढवू इच्छितात की त्यांनी सांगावे व इतरांनी ऐकावे. तोपर्यंत ते कोणत्याही समेटाला तयार होणार नाहीत. गांधी अगदी कडक शिस्तीने सत्य व अहिंसा यांना अनुसरून सत्याग्रहींना मार्गदर्शन करीत होते. मधून मधून जातीय दंगे होत ; त्यासाठी गांधींनी शांततापथके संघटित करण्याचा सल्ला दिला. श्री. कन्हय्यालाल मुन्शींना हिंसात्मक प्रतिकार पाहिजे होता. गांधींनी त्यांना काँग्रेसचा राजीनामा द्या व तुमच्या मार्गाने खुशाल जा, असे सांगितले आणि कृपलानींच्या मदतीने काँग्रेसच्या सत्याग्रहींवर नऊ बंधने घातली. सत्याग्रहींनी स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या निवडणुकी लढवू नयेत आणि आपल्या कामाचे पंधरवड्याचे अहवाल पाठवावे ही त्यांतलीच बंधने होती.

जून महिन्याच्या मध्याला जर्मनीने अकस्मात रशियावर स्वारी केली. जुलै महिन्यात व्हाइसरॉयच्या कौन्सिलांची वाढ व नॅशनल डिफेन्स कौन्सिल यांची घोषणा व्हाइसरॉयनी केली. पण यामुळे काँग्रेसच्या धोरणात काही फरक होणे शक्यच नव्हते. कारण तिची मागणी मान्य केल्याचा त्यांत मागमूस नव्हता. फक्त तीन ठळक अशा हिंदी गृहस्थांना व्हाइसरॉयच्या कौन्सिलचे सभासद होता आले. श्री. माधवराव अणे, सर होमी मोदी व श्री. नलिनी-रंजन सरकार हे ते तीन गृहस्थ होते. श्री. अणे हे सेंट्रल लेजिस्लेटिव असेंब्लीत सरकार पक्षाचे नेते झाले. ब्रिटिश मुख्य प्रधान विन्स्टन चर्चिल यांनी अॅट-लँटिक चार्टरची घोषणा केली, पण त्याची व्याप्ती युरोपमधील देशांपुरतीच आहे आणि हिन्दुस्तान, ब्रह्मदेश व सीलोन यांना तो चार्टर लागू नाही असे त्यांनी हडसून खडसून स्पष्ट केले. गांधींनी या घोषणांकडे पूर्ण दुर्लक्ष केले व आपल्या वैयक्तिक सविनय कायदेभंगाच्या व विधायक कार्यक्रमाच्या व्रतापासून ते ढळले नाहीत. २ ऑक्टोबर रोजी सेवाग्राम येथे त्यांना तीन कोटी वार सूत व बारा हजार रुपयांची थैली देण्यात आली, तेव्हा त्यांनी सांगितले की, चळ-वळीचा वेग मला वाढवायचा नाही. सध्या चालले आहे ते ठीक आहे. १७ ऑक्टोबरला वैयक्तिक कायदेभंग सुरू केल्याला एक वर्ष पुरे झाले. अशा वेळी जयप्रकाश नारायण यांनी तुरुंगातून काही कागदपत्र चोरून बाहेर पाठविले असे सरकारने प्रसिद्ध केले. गांधींनी यात काँग्रेसची आबरू जात नाही असे स्पष्ट केले. मात्र जयप्रकाशांच्या असल्या कृतीने चळवळीची हानी होते हे सत्याग्रहींनी ध्यानांत ठेवावे, असे गांधींनी बजाविले. १९४१ सालअखेर हिन्दुस्तानातील राजकीय परिस्थिती सुधारावी म्हणून काही तरी केले पाहिजे,

असे ब्रिटिश मुत्सद्दीमंडळीस वाटू लागले असावे. जर्मनीचा रशियात बराच आतवर प्रवेश झाला होता आणि नजिकच्या पूर्वेतील देशांवर हिटलरचा हल्ला होणार असे दिसू लागले. जपानने आपले स्थान इंडोचायनामध्ये बळकट केले आणि युद्धात उडी घेण्याची तयारी केली. पर्ल हार्बर येथील माघारीनंतर ब्रिटिश सरकारने सामोपचाराने वागण्याची आपली तयारी झाली आहे असे वाटावे अशी वर्तणूक केली. जवाहरलाल नेहरू व अबुल कलाम आजादांनी नाममात्र व प्रतीकात्मक सत्याग्रह केला होता, असे मानून त्यांना सोडून दिले. पण गांधींनी याची काही दखल घेतली नाही, कारण काँग्रेसच्या मागणीला मान्यता दिल्याचे काहीच लक्षण यात नव्हते. चौदा महिन्यात २५ हजार सत्याग्रही तुरुंगात गेले होते. पण आता सर्वांना सोडून देण्याचे धोरण चालू केले. यात काँग्रेसने आपल्या धोरणाचा फेरविचार करावा असा हेतू असेल. पण काँग्रेसची मागणी मान्य झाल्याखेरीज काँग्रेसचे पुढारी धोरण कसे बदलणार? तथापि आजाद यांनी कार्यकारिणीची व नंतर अखिल भारतीय काँग्रेस समितीची सभा बोलावून सर्वांनी एकत्र विचारविनिमय करावा, असे गांधींनी एका निवेदनाद्वारे सुचविले. सामान्य कायदेभंग चालू राहिलाच पाहिजे आणि स्वतःपुरता गांधी तो कधीच थांबविणार नव्हते. " As a man sworn to peace at this critical moment to suspend my anti-war activity would be to deny myself. And, therefore, those who think like me whether we are misunderstood or worse befalls, we must express our faith through our action, hoping thereby that ultimately our way will be accepted by all warring powers as the only escape from a bloods bath which is reducing man to his lowest deph. "

हे या निवेदनातील त्यांचे उद्गार अगदी निःसंदिग्ध आहेत. ८ डिसेंबर रोजी गांधी बारडोलीस सरदार पटेलांच्या आश्रमात एक महिनाभर राहाण्यासाठी म्हणून गेले. डिसेंबरच्या मध्याला त्यांनी विधायक कार्यक्रम या नावाची एक पुस्तिका प्रसिद्ध केली. सेवाग्राम ते बारडोलीच्या प्रवासात त्यांनी ती लिहून काढली. 'हरिजन' बंद करण्यात आल्यामुळे झालेली हानी तिने भरून काढली. काँग्रेसजनांना ती जर पसंत पडली नाही तर मीच त्यांना पसंत नाही असे ठरेल, कारण या विधायक कार्यक्रमाविरहित चालणारा सविनय कायदेभंग म्हणजे पक्षघात झालेल्या हाताने चमचा उचलण्याचा प्रयत्न करण्यासारख होईल, असे गांधींनी लिहिले. गांधींच्या आयुष्यभर सांगितलेल्या सर्व लोककल्याण-विषयक कल्पना या पुस्तिकेत एकत्र केलेल्या आहेत. २३ डिसेंबरला बारडोलीसच

कार्यकारिणीची सभा भरली. जपान युद्धात सामील झाल्यामुळे एकप्रकारे युद्ध आशियात आल्यासारखे झाले होते. गांधींनी आजाद यांना जे पत्र लिहिले होते त्याचा विचार करून त्यांच्या नेतृत्वावरील विश्वास व्यक्त करण्याचा ठराव कार्यकारिणीने केला. २४ डिसेंबर रोजी गांधींनी हिटलरला एक खुले पत्र लिहिले, पण सेन्सॉरने ते प्रसिद्ध होऊ दिले नाही. हरिजन व दुसरी दोन पत्रे पुन: सुरू करण्याचे जाहीर करून १८ जानेवारी रोजी शांततेची संघटना या विषयावर संपादकीय लिहिले, त्यामध्ये त्यांनी प्रत्येक काँग्रेसजनाला विचारले की त्याने शांततेचा शिपाई अथवा सेवक होण्याचे ठरविले आहे, की स्वराज्य उभारण्याच्या कामी कोणी नगण्य व्यक्ती म्हणून राहण्याचे पसंत केले आहे? जानेवारीच्या मध्याला अखिल भारतीय काँग्रेसची बैठक झाली. ब्रिटिश सरकारच्या भूमिकेत काही फरक झालेला नाही हे ध्यानात घेऊन आजाद यांनी गेल्या दोन वर्षांत झालेल्या घडामोडींचा आढावा घेतला. गांधी यापुढे काँग्रेसचे औपचारिक पुढारी नाहीत. कारण ते अहिंसेचे निरपवाद भक्त आहेत आणि इतर काँग्रेसवाले राजकीय धोरण म्हणून अहिंसेचेच आचरण करतात. गांधींनी आपल्या भाषणात जवाहरलाल हे माझे राजकीय वारस आहेत, राजाजी नाहीत, अशी जाहीर घोषणा केली. बारडोलीस केलेल्या कार्यकारिणीच्या ठरावाला नेहरू व राजाजी यांनी पाठिंबा व दुजोरा दिला. तो ठराव २१९ विरुद्ध १५ मतांनी पास झाला. यामुळे काँग्रेसचे ब्रिटिश भूमिकेबद्दलचे पूर्ण विरोधाचे व धिक्काराचे धोरण कायम राहिले. १९ जानेवारी, १९४२ रोजी गांधीजी बनारस येथे जाण्यास निघाले. वाटेतच त्यांनी 'खरा युद्धप्रयत्न' या विषयावर 'हरिजन' साठी लेख लिहिला. बनारसला हिंदू विद्यापीठाच्या रजतमहोत्सवी पदवीदानसमारंभासाठी पंडित मालवीय यांच्या निमंत्रणावरून गले होते. खरा युद्धप्रयत्न या विषयावर लिहिताना त्यांनी अन्नाची बचत कशी करावी, अन्नग्रहणावर नियंत्रण कसे ठेवावे आणि शक्यतोवर कोणाची उपासमार होणार नाही यासाठी कसे जपावे याची बारकाईने तपशीलवार मार्गदर्शिकाच दिली आहे. तसेच वस्त्रांची कमतरता पडू नये म्हणून चरख्याच्या अभावी तकलीवर सूत काढावे व त्याची वस्त्रे विणून घ्यावी असा उपदेश केला आहे. २३ हजार मुसलमान सूत काढणारे, कापूस पिंजणारे आणि विणकर आहेत, त्यांना रोजीरोटी मिळावी म्हणून मुस्लिम लीगने काँग्रेसशी या कामी सहकार्य करण्यास काहीच हरकत नाही असे गांधींनी या लेखात लिहिले. बनारस हिंदू विद्यापीठात बोलताना इंग्रजी भाषेचा वरचष्मा त्यांना जेथे तेथे दिसून आला त्याबद्दल त्यांनी नापसंती व्यक्त केली. १ फेब्रुवारी रोजी त्यांनी अखिल भारतीय गोसेवा संघाच्या परिषदेचे वर्धा येथे उद्घाटन केले. त्यानंतर

'हरिजना'त गोरक्षण शास्त्रीय पद्धतीने कसे करावे याबद्दलच्या आपल्या कल्पना विशद केल्या. ११ फेब्रुवारी रोजी जमनालाल बजाज यांचे देहावसान झाले. त्यांचे गुणवर्णन करताना गांधींनी म्हटले, " The country has lost one of the bravest of its servants " विधायक कार्यक्रमावर सगळा भर ठेवून गांधींनी सत्याग्रहाच्या सर्व प्रकारांवर सहा महिने बंदी घातली होती. १८ फेब्रुवारी रोजी कलकत्त्यास चांग-कै-शेक व मॅडम चांग-कै-शेक यांची मुलाखत होऊन चार तास दुभाष्यामार्फत संभाषण झाले. त्यांत गांधींनी आपल्या अनत्याचारी अहिंसक प्रतिकार चळवळीचा सविस्तर खुलासा त्या चिनी सर्वाधिकाऱ्यांपाशी केला. सरदार पटेल यांस लिहिलेल्या पत्रात गांधींनी म्हटले, " He came and went without making any impression, but fun was had by all. I would not say that I learnt anything and there was nothing that we could teach him. All that he had to say was this. Be as it may, help the British. They are better than others and they will now be better still."

७ मार्च रोजी जपानने रंगून काबीज केले. म्हणजे जपानने हिंदुस्तानच्या दरवाजावर धडका देण्याला प्रारंभ केला होता. ७ मार्च रोजी रंगून पडल्यावर असे दिसू लागले की, जपान बंगाल आणि मद्रासवर हल्ला करणार. हे ध्यानात घेऊन ११ मार्च रोजी चर्चिल यांनी घोषणा केली. जपानपासून रक्षण करण्यासाठी समंजसपणा व व्यावहारिक शहाणपणा हिंदी पुढारी दाखवितात की नाही हे अजमाविण्यासाठी सर स्टॅफर्ड क्रिप्स यांनी हिंदुस्तानात जावे व तेथील परिस्थितीची चाचपणी करावी. त्याप्रमाणे २२ मार्च रोजी त्यांनी दिल्ली येथे व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांजपाशी प्राथमिक चर्चा केली. त्यांनी काही सूचना ब्रिटिश सरकारच्या म्हणून बरोबर आणल्या होत्या. त्यांच्यावर सर्व राजकीय पक्षांच्या भेटी घऊन त्यांच्या प्रतिक्रिया अजमावली. गांधी व क्रिप्स यांची भेट झाल्यावर गांधींनी त्यांना विचारले, " हेच आम्हांला देऊ करायचे होते तर तुम्ही येथे आला कशाला ? जे पहिले विमान मिळेल ते पकडून तुम्ही निघून जा ! " क्रिप्स यांची देणगी म्हणजे 'पुढच्या तारखेचा चेक' आहे असे त्यांनी त्याचे वर्णन केले आणि ४ एप्रिल रोजी ते सेवाग्रामला निघून गेले. शक्य तितक्या लवकर हिन्दुस्तानात स्वराज्य स्थापन करण्याचा व इच्छा असल्यास ब्रिटिश साम्राज्यातून बाहेर पडण्याचा हक्क हिन्दुस्तानास आहे. युद्ध संपल्यानंतर घटना तयार करण्यासाठी यंत्रणा उभी करण्यात येईल; मात्र तूर्त संरक्षणाची सर्व जबाबदारी ब्रिटिश सरकारची असेल आणि युद्ध चालविण्यात सर्व हिंदी लोकांनी हिन्दुस्तान

सरकारशीं सहकार्य करावे अशी कलमे क्रिप्स यांच्या योजनेत होती. कॉंग्रेसच्या कार्यकारिणीनें स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाला या योजनेत मान्यता आहे असे मान्य केले; पण यात स्वातंत्र्याच्या मागणीचा मागमूस नाही हे पाहून कॉंग्रेसने क्रिप्स योजना झिडकारली. प्रेसिडेंट रूझवेल्ट यांचे प्रतिनिधी कर्नल जॉन्सन यानी कॉंग्रेस व क्रिप्स यांच्यात तडजोड करण्याचा यत्न केला. काँग्रेसने असा आग्रह धरला की व्हाइसरॉयने ,आपले कौन्सिल म्हणजे आपले मंत्रिमंडळ समजावे व त्याचे निर्णय मानावे. क्रिप्स यांना हे मान्य झाले नाही आणि १२ एप्रिल रोजी ते स्वदेशी निघून गेले. जीना, सावरकर, सप्रू-जयकर यांनाही योजना पसंत झाली नाही. आजाद यांनी कॉंग्रेसतर्फे सांगितले की, संरक्षण समस्या कशी सोडवावी या मुद्यावर मुख्यतः क्रिप्स वाटाघाटी कोलमडून पडल्या. 'दुर्दैवी सूचना' या शीर्षकाखाली लिहिलेल्या लेखात गांधींनी या योजनेच्या टाकाऊ म्हणून चिंधड्या केल्या आणि क्रिप्स साम्राज्यवादाचे एक हत्यारच बनले असे म्हटले. पुढे २६ एप्रिलच्या 'हरिजन'च्या अंकात त्यांनी ब्रिटिशांनी हिन्दुस्तानातून काढता पाय घ्यावा असे प्रथमच स्पष्टपणे म्हटले. यानंतर राजगोपालाचारी यांनी कॉंग्रेसने पाकिस्तान मान्य करावे अशी कल्पना पुढे मांडली. अलाहाबादेस भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेसपुढे ती आणल्यावर राजगोपालाचारींनी कार्यकारिणीचा राजीनामा दिला. त्यांचा ठराव १२० विरुद्ध १५ मतांनी नापास झाला. या सभेत दुसरा एक ठराव पास झाला तो ब्रह्मदेश व रंगून येथे घडलेल्या घटनांबाबत. पण त्याच्या प्रसिद्धीवर सरकारने बंदी घातली. ठराव असा होता : " The officials whose duty was to protect the lives and interests of the people in their repective areas utterly failed to discharge that responsibility and ran away from their post of duty and sought safety for themselves, leaving the vast majority of people wholly uncared and unprovied for, Such arrangements for evacuation as were made were meant for the European population and at every step racial discrimination was in evidence."

पोलिसांनी कॉंग्रसच्या कचेरीवर धाड घालून या ठरावाच्या प्रती जप्त केल्या. जपानी हल्ल्याचा प्रतिकार हिंसेने करावा असे म्हणणारे नेहरू असहकारिता करावी, कारण तेवढेच करणे शक्य आहे असे त्यांना दिसून आले, असे कार्यकारिणीचे कागदपत्र जप्त झाले त्यांवरून दिसून आले. एप्रिल महिन्याच्या अखेरीपासून गांधींनी 'Quit India' म्हणजे 'भारत छोडो' ही घोषणा करून त्याप्रमाणे 'हरिजन'मध्ये सतत लिहिले आणि त्यांना भेटायला येणाऱ्या पत्रकारांना व इतरांनाही आपली भूमिका विशद करून सांगू लागले.

जून महिन्याच्या सुरुवातीला, अमेरिकन पत्रकार लुई फिशर हा गांधींकडे सेवाग्राम येथे आला व एक आठवडाभर राहिला. त्याने पुढे या प्रदीर्घ चर्चेवर एक पुस्तकही लिहिले. चॅपलिन व बेलडॉन हे आणखी अमेरिकी पत्रकारही त्यांच्याशी चर्चा करून गेले. त्या सर्वांशी भरपूर युक्तिवाद व चर्चा गांधींनी केली. त्या सगळ्याचे तात्पर्य एकच, ब्रिटिशांनी येथून निघून जावे; जपानची स्वारी झाली तरी त्यांच्याशी मुकाबला कसा करायचा ते आमचे आम्ही पाहू. आम्हाला कोणाही परकीयांचे वर्चस्व नको आणि कोणत्याही परकी सत्तेच्या मदतीने स्वातंत्र्य मिळवायचे नाही. जपानी किंवा जर्मन हे काही परोपकारी संत नाहीत. कदाचित काही काळ येथे बेबंदशाही माजेल, रक्तपातही होईल. पण त्याचा वीट येऊन भांडणारे शुद्धीवर येतील व आमची आम्ही शांतता व सुव्यवस्था स्थापन करू आणि आम्हांला पाहिजे तसे राज्ययंत्र आम्ही उभे करू. प्रेस्टन ग्रोव्हर, असोशिएटेड प्रेस ऑफ अमेरिका, हे गांधींची मुलाखत घेण्याला जूनच्या मध्याला आले. राजाजी राष्ट्रीय सरकार स्थापन करून जपानचा हल्ला थोपवून धरू इच्छितात आणि त्याकरिता ब्रिटिशांशी अथवा दोस्तांशी सहकार करू पाहातात याबद्दल ग्रोव्हर यांनी विचारले असता गांधी म्हणाले, यामुळे स्वातंत्र्याचा प्रश्न युद्धसमाप्तीपर्यंत पुढे ढकलण्याला राजाजी तयार होतात. पण मी म्हणतो युद्ध जर निर्णायकपणे जिंकायचे असेल तर हिन्दुस्तानला स्वातंत्र्य आजच, या क्षणी मिळाले पाहिजे आणि त्याला आपली कामगिरी आपल्या मताने व इच्छेने बजावता आली पाहिजे. मला यात काही चूक आहे असे वाटत नाही आणि पूर्ण विचाराअंती माझ्या बुद्धीचा हा निर्णय झालेला आहे. क्रिप्स यांनी ब्रिटिशांनी सत्तात्याग करावा याचे वर्णन 'वॉक-आऊट' असे केले आहे. मला उपमर्दकारक असे काहीच म्हणायचे नव्हते व नाही. स्नेहपूर्ण भावनेनेच मी हा सल्ला ब्रिटिशांना देत आहे आणि दोस्त राष्ट्रांचे म्हणजे इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका यांचे त्यात कल्याणच आहे. अहिंसेच्या माझ्या भूमिकेला अनुसरून अहिंसक असे पाऊलच त्यामुळे मी उचलले आहे. अखेरीस गांधी म्हणाले, "The step that I have conceived overcomes all difficulties, shuts all controversy about violence and -non-violence and immediately frees India to offer her best help to the allied cause and more especially to China, which is in imminent danger. I am convinced that the Independence of India which the witndrawl of British power involves, would ensure China's freedom and put the allied cause on an unassailable basis."

१४, जून १९४२ रोजी चँग-कै-शेक यांना सेवाग्रामहून लिहिलेल्या पत्रात गांधी म्हणतात, "Our proferred help has repeatedly been

rejected by the British Government and the recent failure of the Cripps mission has left a wound which is still running. Out of that anguish has come the cry for immediate withdrawl of British power so that India can look after herself and help China to the best of her ability."

१ जुलै रोजी गांधींनी प्रेसिडेंट रुझवेल्ट यांना एक पत्र लिहिले. लुई फिशर यांजकडे हे जासूदाचे काम सोपविले होते. "The policy of the Indian National Congress largely guided by me has been one of non-embarrasment to Britain, consistently with the honourable working of the Congress, admitted by the largest political organisation of the longest standing in India. The British policy as exposed by the Cripps mission and rejected by almost all parties has opened our eyes and has driven me to the proposal I have made. I hold that the full acceptance of my proposal, and that alone, can put the allied cause on an all assilable basis. I venture to think that the allied declaration that the allies are fighting to make the world safe for freedom of the individual and for democracy sounds hollow, so long as India and for that matter, Africa are exploited by Great Britain and America has the Negro problems in her own home. But in order to avoid all complications, in my proposal I have confined myself to India. If India becomes free, the rest must follow, if it does not happen simultaneously."

यानंतरही गांधी देशी व विदेशी पत्रकारांना आपली व काँग्रेसची भूमिका व त्या दोहोमधील फरक समजावीत राहिले. जपानी लोकांना उद्देशूनही त्यांनी एक अनावृत पत्र लिहिले. सर स्टॅफर्ड क्रिप्स यांनी त्यांजवर चढविलेल्या हल्ल्याला उत्तर दिले. माझ्या हृदयात एक डोंब उसळून राहिलेला आहे, असे त्यांनी लिहिले.

ऑगस्ट १९४२ च्या पहिल्या आठवड्यात काँग्रेस कार्यकारिणीची सभा मुंबईस भरून तेथे 'Quit India' अथवा 'छोडो भारत' चा ठराव पास झाला. ठरावाचा मसुदा ठरविण्याच्या कामी मदत करण्याला गांधी हजर होतेच. तो ठराव नंतर अखिल भारतीय काँग्रेस समितीपुढे ठेवण्यात आला. आणि सर्वानुमते पास झाला. या ठरावात वेळोवेळी ब्रिटिश मुत्सद्दीमंडळीने केलेल्या भाषणांचा व घोषणांचा आढावा घेऊन, महायुद्धाच्या चिनी व रुसी आघाड्यांवरील घटना ध्यानात घेऊन असे म्हटले आहे की, युद्धाचे

भवितव्य आणि स्वातंत्र्य व लोकशाही यांचा विजय होण्यासाठी या देशातील ब्रिटिश सत्तेचा अंत होणे अत्यंत आवश्यक आहे. स्वतंत्र हिन्दुस्तानालाच नाझी, फासिस्ट व साम्राज्यवाद यांचा नाश करण्याच्या लढ्यात सामील होता येणे यशस्वीपणे शक्य आहे. म्हणून ही कॉंग्रेसची अखिल भारतीय समिती ब्रिटिश सत्ता हिंदुस्तानातून काढून घेतली जावी, अशी जोरदार मागणी करीत आहे. भारताचे स्वातंत्र्य सिद्ध होताच ब्रह्मदेश, मलाया, इंडोचायना, डच ईस्ट इंडीज, इराण व इराक यांची स्वातंत्र्ये अस्तित्वात येतील. स्वतंत्र भारत आनंदाने जागतिक शांततेच्या कार्यात सामील होईल. अखेरीस असे जाहीर करण्यात येत आहे की, स्वतंत्र भारताचा राज्यकारभार आपल्या हातात घेण्याची इच्छा कॉंग्रेस बाळगीत नसून, मिळणारी सत्ता सर्व भारतातील लोकांच्या हाती राहील. यानंतर क्रिप्स यांचा प्रयत्न अयशस्वी ठरल्यावर कॉंग्रेसला हा 'भारत छोडो' चा ठराव करणे भाग पडले आहे असे अबुल कलाम आजाद व महात्मा गांधी यांनी आपल्या भाषणात सविस्तर सांगितले. गांधी म्हणाले की, घाईघाईने कोणतेही आंदोलन मी चालू करणार नाही. तुम्ही सर्व अधिकार मला दिले आहेत. आता मी प्रथम व्हाइसरॉयकडे जाऊन कॉंग्रेसची मागणी स्वीकारण्याची त्यांना विनंती करीन. या कामात दोनतीन आठवडे जातील. त्या मुदतीत विधायक कार्यक्रमाच्या खादीप्रभृती सर्व अंगांकडे तुम्ही आपले लक्ष केंद्रित करा. यापुढे प्रत्येक भारतीय व्यक्तीने आपण स्वतंत्र आहो, साम्राज्यशाही आपण उलथून टाकली आहे, असे समजून वागावे. 'छोडो भारत'चा ठराव नेहरूंनी मांडला, सरदार पटेल यांनी त्याला अनुमती दिली. पटेल म्हणाले, सतत तीन वर्षे कॉंग्रेसने ब्रिटिश सरकारला अवघडल्यासारखे वाटू नये म्हणून प्रयत्न केला. पण त्याची किंमत त्याला कळली नाही. आता कॉंग्रेसला आणखी वाट पाहणे अशक्य आहे. अखिल भारतीय समितीत ८ ऑगस्ट रोजी हा ठराव आल्यावर त्याला बऱ्याच उपसूचना सुचविण्यात आल्या. त्या आणण्यात कम्युनिस्ट प्रमुख होते. त्या सर्वांना उत्तरे देताना नेहरू म्हणाले, " हा ठराव म्हणजे धमकी नाही. ते एक निमंत्रण आहे, तो एक खुलासा आहे, ते एक पृथक्करण आणि विवरण आहे, त्यात खरोखर सहकार्य देऊ केले आहे. स्वतंत्र भारताने देऊ केलेले ते सहकार्य आहे. ते न घेतले तर कलह व लढा अटळ आहे. "

सर्व उपसूचना नापास होऊन मूळ ठराव प्रचंड बहुमताने पास झाला. गांधींनी हिंदुस्तानीत व इंग्रजीत प्रदीर्घ भाषणे केली. अध्यक्ष आजाद यांनी समारोप करताना म्हटले की, कॉंग्रेसच्या मागणीबाबत मी राष्ट्रसंघाला ( United Nations ) पत्र लिहीत आहे व अखेरपर्यंत समझोता होण्यासाठी

झटेन. रात्री १० वाजता हे अधिवेशन संपले. ८ ऑगस्ट हा दिवस सक्त कामाचा होता. काँग्रेसचा ठराव गांधींनी 'न्यूज क्रॉनिकल'च्या प्रतिनिधीला व असोशिएटेड प्रेसला नीट समजावून सांगितला. ९ ऑगस्ट रोजी कार्यकारिणीची सभा होऊन तीमध्ये गांधी सरकारबरोबर तीन आठवडे काय वाटाघाटी करणार त्याची रूपरेखा सभासदांना सांगणार होते आणि या वाटाघाटी सफळ झाल्या नाही तरच त्यांनी सर्वांसाठी करून ठेविलेल्या सूचना प्रसिद्ध करावयाच्या होत्या. मुस्लिम लीगबरोबर समेट करण्याचा मोठाच प्रयत्न गांधी करणार होते. मुंबईतील एका मुसलमान व्यापाऱ्याला त्यांनी ८ ऑगस्ट रोजी एक पत्र लिहिले. त्यात असे म्हटले होते की, माझी मुस्लिम लीगच्या हाती सर्व सत्ता सोपविण्याला मुळीच हरकत नाही, मात्र लीगने काँग्रेसच्या स्वतंत्र हिंदुस्तानच्या मागणीला पाठिंबा दिला पाहिजे. स्वतंत्र हिन्दुस्तान, नाझी-जपानी आक्रमणाला अटकाव करण्यासाठी दोस्तांच्या फौजांना आपल्या भूमीवर हवे तसे वावरू देईल, ही शर्तही मुस्लिम लीगने मानली पाहिजे.

पण यापैकी काहीच घडले नाही. ९ ऑगस्ट रविवार रोजीच गांधी बिर्ला हाऊसमध्ये राहात होते. तेथे गांधी, महादेव देसाई आणि मीराबेन यांना डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट खाली पकडून डांबून ठेवण्यासाठी पोलीस कमिशनर वॉरंटे घेऊन आले. कस्तुरबा व प्यारेलाल यांना पकडण्याची वॉरंटे नव्हती; तरीही गांधींबरोबर ती दोघे जाणार असती तर पोलीस कमिशनरांची त्याला काही हरकत नव्हती. पण त्यांनी न जाण्याचेच ठरविले. गांधींनी पोलिसांच्या स्वाधीन होण्यापूर्वी प्यारेलालमार्फत असा संदेश दिला की, प्रत्येक अहिंसक सत्याग्रहीने एका कागदावर अथवा कपड्यावर 'करेंगे या मरेंगे' म्हणजे Do or Die असे शब्द लिहून इतरांपेक्षा आपले निराळेपण व्यक्त करावे. सत्याग्रह करीत असता मरण आल्यास ओळखण्याला अडचण पडू नये म्हणून ही योजना होती. गांधी व महादेवभाई यांना आगाखान पॅलेस, पुणे येथे अटकेत ठेवण्यात आले. त्यांना वर्तमानपत्रे वगैरे देण्यात येत नव्हती. १४ ऑगस्ट रोजी गांधींनी व्हाइसरॉय यांस एक पत्र लिहिले. पत्रात त्यांनी म्हटले, "The whole Congress movement was intended to evoke in the people the measure of sacrifice sufficient to compel attention. It was intended to demonstrate what measure of popular support it had, was it wise at this time of the day to seek to suppress a popular movement avowedly non-violent."

याच पत्रात आणखी म्हटले होते, "The declared cause is common between the Government of India and us. To put it in more

concrete terms, it is the protection of China and Ruasia. The Government think that the freedom of India is not necessary for winning the cause. I think exactly the opposite. I have taken Jawaharlal Nehru as my measuring rod. His personal contacts make him feel much more the misery of the impending suin of China and Russia than I can and may I say that even you can. In that misery, he tried to forget his old quarrel with Imperialism. He dreads much more than I do the success of Nazism and Fascism. I argued with him for days together. He fought against my position with a passion which I have no words to describe. But the logic of facts was overwhelmed him. He yielded when he saw clearly that without the freedom of India, that of the other two was in great jeopardy. Surely, you are wrong in having imprisoned such a powerful friend and ally."

पण या पत्राला एक तुटक उत्तर लॉर्ड लिनलिथगो यांनी दिले. त्यांनी लिहिले, "It will not be possible for me either to accept criticism which you advance of the resolution of the Government of India, or your request that the whole policy of the Government of India should be reconsidered."

देशावर वटहुकुमांनी राज्य करण्यात येत होते. काँग्रेस कार्यकारिणी, काँग्रेसच्या सर्व शाखा, फक्त वायव्य सरहद्द प्रांतातील सोडून बेकायदा ठरविण्यात आल्या होत्या. ९ ऑगस्टला मुंबई, पुणे आणि अलाहाबाद येथे दंगली झाल्या, १० ऑगस्टला दिल्लीस व संयुक्त प्रांतात दंगली झाल्या. हरताळ, निषेधसभा वगैरे निदर्शने देशात सर्वत्र चालू होती. डिफेन्स ऑफ इंडियाच्या कलमाखाली उपाहारगृहे व खाणावळी सक्तीने उघड्या ठेविल्या जात होत्या. बातम्यांचे प्रसरण सरकारी परवानगीने होईल तेवढेच होत होते. कित्येक वर्तमानपत्रे बंद ठेवण्यात आली. 'नॅशनल हेरल्ड' व 'हरिजन' बंद करण्यात आली. आगाखान पॅलेसमध्ये गेल्यापासून एक आठवड्याच्या आतच महादेवभाई देसाईंचे अचानक देहावसान झाले. त्यांच्या घरी पाठविलेली तार तीन आठवड्यांनी पोचली. त्यांच्या देहावर अग्निसंस्कार आगाखान पॅलेसच्या आवारातच करण्यात आला. या वार्तेने सर्व देश स्तिमित झाला. यावरून लोकांनी असा तर्क केला की, पकडलेल्या पुढाऱ्यांना फार कठोरपणे वागविण्यात येत आहे. वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी केल्यामुळे अफवांना मुक्तद्वार झाले. सरकारी पत्रके लोकांना संशयास्पद वाटू लागली. बेकायदेशीरपणे हिन्दुस्तानात कोठून तरी

चालविलेला काँग्रेस रेडिओ सरकारने दडपून ठेवलेल्या हकिकती जाहीर करू लागला. अहमदाबादच्या गिरण्यांत व जमशेदपूरच्या पोलादाच्या कारखान्यात झालेले संप, बनारस हिंदू विद्यापीठाचा लष्कराने ताबा घेणे, बालीयावर हवेतून बॉम्बवर्षाव, मिदनापूरची भयंकर दडपशाही, आष्टी व चिमूर येथे लष्कराने केलेले अत्याचार आणि सर्वत्र होत असलेले लाठीहल्ले व गोळीबार यांच्या हकिकती छापण्याला वर्तमानपत्रांना बंदी झाली. पण काँग्रेसचा रेडिओ आणि मुंबईहून अज्ञात ठिकाणातून प्रसिद्ध होणारे काँग्रेस बुलेटिन जनतेला सर्व काही कळवीत होते. दडपल्या गेलेल्या लोकांचे पोलीस व लष्कराबरोबर संघर्ष होत होते. ब्रिटिश राज्याच्या सत्तेची प्रतीके असलेली पोस्ट ऑफिसे, पोलीस चौक्या, रेल्वे स्थानके, टेलिफोनच्या व टेलिग्रामच्या तारा, पूल, सरकारी इमारती, यांचा विध्वंस लोक करू लागले. पोलीस अंमलदार ऑगस्टपासून नोव्हेंबरपर्यंत एक हजारावर मारले गेले. ५३८ प्रसंगी समुदायांनी पोलीस व लष्करी गोळीबाराला तोंड दिले. अशा लोकांना चाबकाचे फटकारे मारण्याची शिक्षा दिली गेली. सामुदायिक दंडाची वसुली १ कोटी रुपयांवर गेली. १९४२ अखेरपर्यंत ६० हजार लोकांना अटक झाली. २६ हजार गुन्हेगार ठरले आणि १८ हजार भारत संरक्षक कायद्याखाली डांबले गेले. हजारो काँग्रेस कार्यकत पोलिसांना न जुमानता भूमिगत झाले. दोन महिने असे प्रकार होत होते. पण पुढे ते कमी झाले. चर्चिलने फुशारकी मिरविली की दंगली सरकारने पार चिरडून टाकल्या. हिन्दुस्तानात गोरे शिपाई पाठविण्यात आले आहेत आणि त्यांची संख्या तेथे आताएवढी पूर्वी कधीच नव्हती. ऑगस्टअखेर कोणाकोणाला पत्रे पाठविण्याला परवानगी देण्यात आली. गांधींना हवी ती जुनी व ताजी वर्तमानपत्रे घेण्याची मुभा देण्यात आली, पण त्यांनी तिचा फायदा घेण्याचे नाकारले. देशातील परिस्थितीबाबत एक पत्र मुंबई सरकारला व दुसरे व्हाइसरॉयना पाठविले, पण त्यांना काही जबाब मिळाला नाही. नवजीवन छापखाना व 'हरिजन' चे नवेजुने अंक जप्त करण्यात आलेच होते. सप्टेंबरच्या अखेरीस सरकारला सगळ्या हिंसक-अहिंसक दंगली मोडून काढण्यात यश मिळाले होते. राजगोपालाचारी, सप्रू व श्यामाप्रसाद मुकर्जी यांनी गांधींशी संपर्क साधण्याचा यत्न केला; पण त्यांना यश आले नाही. ३१ डिसेंबर रोजी गांधींनी लॉर्ड लिनलिथगो यांना स्वहस्ते लिहिलेले एक वैयक्तिक पत्र पाठविले. त्यात त्यांनी म्हटले की, माझ्या चुका मला पटवून द्या, म्हणजे मी त्यांची भरपाई करीन. याचे वैयक्तिक स्वरूपाचे उत्तर १३ जानेवारी १९४३ रोजी लिहिलेले त्यांना मिळाले. १९ जानेवारीला पुन: गांधींनी लिहिले व २५ जानेवारीचे व्हाइसरॉयचे उत्तर त्यांना आले. या पत्रात व्हाइसरॉयनी लिहिले,

"If you are anxious to inform me that you repudiate or dissociate yourself from the resolution of August 9 and the policy that resolution represents and if you can give me the appropriate assurances as regards the future, I shall be very ready to consider the matter further."

२९ जानेवारीच्या आपल्या पत्रात एकवीस दिवस उपोषण करण्याचा आपला निर्णय गांधींनी व्हाइसरॉयसाहेबांस कळविला. ५ फेब्रुवारीला त्यांचे उत्तर आले. ७ फेब्रुवारीला गांधींनी त्यांना लिहिले, "Posterity will judge between you as representative of an all powerful Government and me as a humble man who had tried to serve his country and humanity through it';

८ फेब्रुवारीला हिंदुस्तान सरकारच्या गृहखात्याकडून सर रिचर्ड टॉटेनहॅम यांच्या सहीने गांधींना कळविण्यात आले की, उपोषणाच्या निर्णयावर गांधी पक्के असतील तर त्यांना आगाखान पॅलेसमधून मुक्त करण्यात येईल. उपोषणाच्या मुदतीत त्यांना योग्य वाटेल तेथे त्यांनी राहावे. गांधींनी दूर कोठे जाण्याचे नाकारले व कैदी असताच त्यांनी १० फेब्रुवारीपासून उपोषण २१ दिवसांसाठी चालू केले. डॉ. गिल्डर त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवण्यासाठी आगाखान पॅलेसमध्ये येऊन राहिले. लोकनायक अणे, सर होमी मोदी व नलिनीरंजन सरकार यांनी व्हाइसरॉयच्या कौन्सिलाचे राजीनामे १७ फेब्रुवारी रोजी दिले. १८ फेब्रुवारीला गांधींना कोणाजवळ काही बोलावे असे वाटेना. १९ तारखेला दिल्लीस सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची सभा झाली आणि त्यांनी गांधींच्या सुटकेची मागणी केली. जीनांनी या सभेशी कसलाही संबंध ठेवण्याचे नाकारले. पण चर्चिल व लिनलिथगो अचल होते. प्रेसिडेंट रुझवेल्ट यांचे प्रतिनिधी विल्यम फिलिप्स यांना गांधींना भेटण्याची परवानगी मिळाली. ३ मार्च रोजी, सर्व कठीण अवस्थांतून बाहेर पडून गांधींनी उपोषण सोडले. कस्तुरबांनी त्यांना संत्र्याच्या रसाचा ग्लास दिला. २ मार्चला बाहेरच्या लोकांना गांधींना पाहाण्यासाठी अखेरचे येऊ देण्यात आले होते. २२ फेब्रुवारीला सरकारने 'काँग्रेस रिस्पॉन्सिबिलिटी फॉर दि डिस्टर्बन्सेस' या नावाचे चोपडे प्रसिद्ध करून गांधी व काँग्रेस यांची भरपूर नालस्ती केली. ८६ पानांची ही पुस्तिका होती.

गांधींचे उपोषण सुटल्यानंतर ब्रिटन व हिंदुस्तान यांच्यामध्ये जी राजकीय कुचंबणा उत्पन्न झाली होती तीबद्दल सर्व जगभर मतप्रदर्शनाची एक लाटच उसळली. यात न्यूयॉर्क टाइम्स, मँचेस्टर गार्डियन यांसारखी पत्रे होती. पण बर्नार्ड शॉ यांनी काय लिहिले हे विशेष ध्यानात घेण्याजोगे आहे. ते म्हणाले,

"The imprisonment of Gandhi is the stupidest blunder the Government has let itself be landed in by its right wing of incurable diehards. The King should release Gandhi unconditionally as an act of grace unconcerned with policy and apologise to him for the mental defectiveness of his cabinet."

चिनी वर्तमानपत्रांनी काँग्रेस-कैद्यांना सोडावे आणि कुचंबणा संपवावी असे लिहिले. सप्रू, जयकर, राजाजी, भुलाभाई देसाई, सर अर्देशर दलाल, सर होमी मोदी वगैरे पुढाऱ्यांनी गांधींना भेटण्याची परवानगी व्हाइसरॉयकडे मागितली; पण त्यांनी काँग्रेस पुढाऱ्यांकडून काही आश्वासने मिळाल्याखेरीज काही करू पाहणे व्यर्थ आहे, असे उत्तर त्यांना दिले. गांधींनी एमरी व लॉर्ड सॅम्युएल यांच्या अज्ञानावर आणि चुकीच्या माहितीवर आधारलेल्या विधानांचा खरमरीत समाचार घेतला. त्याचप्रमाणे प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकेतील खोडसाळ विधानांचा कलमवार धुव्वा उडविला. लॉर्ड लिनलिथगो आपली राजप्रतिनिधित्वाची मुदत संपवून परत जाण्याच्या मुहूर्तावर गांधींनी त्यांना पत्र लिहून 'असत्याचे पाठीराखे' अशी शाबासकी दिली आणि व्हाइसरॉयनी पण एखाद्या परमहंस स्थितप्रज्ञासारखा जवाब गांधींना पाठवला.

ते आता अशा निर्णयावर येऊन ठेपले होते की, आपल्याला बरीच वर्षे कैदेत राहावे लागणार आहे. त्यांनी कामाचे वेळापत्रक बनविले आणि रोजनिशी ठेवायला सुरुवात केली. निरनिराळ्या विषयांवरील पुस्तकांचे वाचन त्यांनी आरंभिले. शरीरशास्त्र, व्याकरण, अर्थशास्त्र वगैरे पुस्तके त्यांनी वाचायला घेतली. शेक्सपीअर, ब्राऊनिंग, बर्नार्ड शॉ, मार्क्स, एंगल्स, लेनिन, स्तालिन यांचे ग्रंथ त्यांनी वाचायला घेतले. वयाच्या ७४ व्या वर्षी प्रथमच त्यांनी 'कॅपिटल' हाती धरले. मार्क्स वाचल्यावर ते म्हणाले, 'मार्क्सवाद बरोबर आहे का चूक आहे याची फिकीर मला नाही. मला एवढे कळलेले आहे की गरीब सर्वत्र चिरडले जात आहेत आणि त्यांच्यासाठी काही तरी करण्याची निकड आहे. मला ही गोष्ट गृहीतकृत्यासारखी स्वयंसिद्धच वाटते.' कस्तुरबासाठी त्यांनी रामायण व भागवत अगदी सोप्या शब्दांत सांगितले. तिच्या शिक्षणाकडे लक्ष द्यायला त्यांना केव्हाच फुरसद मिळाली नव्हती, ती आता मिळाली. तिच्याबरोबर तास दोन तास बैठक मारून ते तिला गुजराती व्याकरण, काव्य, इतिहास व भूगोल यांचे धडे देऊ लागले. पण हा कार्यक्रम फार काळ चालला नाही. कस्तुरबांची तब्येत फार खराब झाली होती. महादेवभाई देसाईंच्या मरणाने तिला फार मोठा धक्का बसला होता. १९४३ च्या फेब्रुवारीत कस्तुरबा गंभीर आजारी स्थितीत होत्या. गांधी सारखे तिच्या बाजूला असत.

२२ फेब्रुवारीला त्यांनी आपल्या पतीच्या मांडीवर डोके ठेवून या जगाचा निरोप घेतला. गांधींना दुःखावेग आवरला नाही. कस्तुरबावर अंत्यसंस्कार सरकारी अनुमतीने महादेवभाई देसाईंच्या दहनभूमीजवळच करण्यात आले. सर्व देशभर हरताळ पाळला गेला व दुखवटयाचे अनेक संदेश आले. त्यामध्ये नवे व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांचा एक शोकसंदेश होता. युद्ध संपेपर्यंत गांधींची सुटका होईल, असे त्यांना वाटत नव्हते, तसेच लोकांनाही वाटत नव्हते. असे भयही कोणाकोणाला वाटत होते, की तुरुंगात असताच त्यांचा अंतही होईल. आगाखान पॅलेसचा आसमंत मलेरियाग्रस्त होता. त्याची बाधा गांधींनाही झाली व त्यांना ताप येऊ लागला. १६ व ३० एप्रिल रोजी त्यांच्या प्रकृतीबद्दल पत्रके प्रसिद्ध झाली ती चिंताजनक होती. ५ मे रोजी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस त्यांना भेटायला गेले. त्याच दिवशी संध्याकाळी ते पुनः त्यांच्या भेटीस आले व त्यांनी सांगितले की, त्यांना व त्यांच्याबरोबर असलेल्या सर्व मंडळींना दुसऱ्या दिवशी सकाळी बिनशर्त सोडून देण्यात येणार आहे. त्याप्रमाणे ६ मे रोजी त्यांची मुक्तता होऊन त्यांनी पर्णकुटीवर म्हणजे प्रेमलीलाबाई ठाकरसींच्या बंगल्यावर पोचविण्यात आले. पुण्यास तीन दिवस मुक्काम करून गांधी थोडे दिवस प्रकृती सुधारण्याकरिता जुहू येथे समुद्रकिनारी राहायला गेले, तेथे पंधरा दिवस मौन पाळण्याचे त्यांनी ठरविले. मे २९ ला दिवसाकाठी २० तास मौन पाळले व १५ जून रोजी ते पुण्यास गेले आणि उरळीकांचनच्या नेचर क्युअर क्लिनिकमधून १७ जूनला त्यांनी लॉर्ड वेव्हेल यांना एक पत्र लिहिले. त्याला पाठविलेल्या उत्तरात व्हाइसरॉयनी लिहिले की, ९ ऑगस्टच्या ठरावाला तुम्ही चिकटून राहात असल्यामुळे कॉंग्रेस कार्यकारिणीच्या सभासदांची व तुमची भेट होऊ देण्यात काही मतलब नाही. २९ जून रोजी गांधींनी पुण्यास सुमारे पन्नास कार्यकर्त्यांसमोर भाषण करून त्यात त्यांनी म्हटले की हिंदुस्तानच्या हाती राजकीय सत्ता आल्याखेरीज जनतेच्या दुःखाचे निराकरण होणार नाही. जुलैच्या २ तारखेला गांधी पाचगणीला राहायला गेले. यापूर्वी न्यूज क्रॉनिकलचे स्टयुअर्ट गेल्डर यांना गांधींनी एक मुलाखत देऊन प्रस्तुत राजकीय पेचप्रसंग कसा सोडविता येईल याविषयी काही कल्पना मांडल्या होत्या आणि त्यांनी व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांची मुलाखत मिळवून त्या त्यांचेपुढे मांडाव्या असे ठरले होते. सगळ्या प्रश्नोतरांच्या दोन प्रती करून त्या मुलाखतीला प्रसिद्धी द्यावयाची नाही असे ठरले होते. गेल्डर यांना वेव्हेल यांची मुलाखत मिळाली नाही आणि तरीही गांधींच्या मुलाखतीचा वृत्तांत अंशतः २ जुलैच्या टाइम्स ऑफ इंडियात प्रसिद्ध झाला. त्यामध्ये 'क्विट इंडिया' ठराव अगदी निरुपद्रवी होता आणि क्रिप्सचे प्रस्ताव अगदीच टाकाऊ

व निराशाजनक होते, असे गांधींनी म्हटले होते. पण अकाली प्रसिद्धी मिळाल्यामुळे ही महत्त्वाची मुलाखत फुकट गेली. १५ जुलै रोजी गांधींनी व्हाइसरॉय यांस पत्र लिहिले व त्यांत हा गेल्डरबद्दलचा खुलासा केला. व्हाइसरॉयनी उत्तर केले. 'डेफिनिट कन्स्ट्रक्टीव' धोरण तुम्ही घेतल्याशिवाय मला काही करता येणार नाही. आणखी थोडा पत्रव्यवहार झाला, पण तात्पर्य असे होते, हिंदुस्तानातील सर्व जातीजमातींचा एकमुखी करार ब्रिटिश सरकाराकडे गेल्याखेरीज चालू राजकीय चौकटीत कोणताही मोठा बदल होणे शक्य नाही. पार्लमेंटमध्ये या विषयावर झालेल्या चर्चेबद्दल गांधी म्हणाले, हिन्दुस्तानातील औद्योगिक व्यापारीप्रमुख जे. आर. डी. टाटा आणि सर होमी मोदी यांनी म्हटल्याप्रमाणे देशात राष्ट्रीय सरकार स्थापन झाल्याखेरीज आर्थिक व राजकीय दोन्ही प्रकारची प्रगती शक्य नाही. गांधींनी सर्व न्यायप्रिय लोकांना आवाहन केले की, 'the diabolical conspiracy to stifle Indian's aspirations' मोडून काढा. ब्रिटिश सरकारने जरी माझे म्हणणे मान्य केले नाही तर जीनाबरोबर समेट करण्याचे माझे प्रयत्न चालूच राहातील असे ते म्हणाले. A proper heart-to-heart agreement between us can induce revision even of the firm refusal of the British Government as conveyed through his Excellency's letter."

राजगोपालाचारी यांच्या जीनांबरोबर वाटाघाटी सुरू होत्याच. १० जुलै १९४४ रोजी त्यांचा तोडगा प्रसिद्ध झाला आणि गांधींनी त्याला पसंती दर्शविली होती. त्याच्या आधारावर वाटाघाटी करण्याला जीनांची ना नव्हती. म्हणून पाचगणीस असता गांधींनी १७ जुलैला जीनांना एक पत्र लिहिले आणि जीनांनी त्यांना २४ जुलै रोजी श्रीनगर येथून उत्तर पाठविले. गांधींनी जीनांबरोबर चालू केलेली ही बोलणी हिंदुमहासभा गोटात कोणाला आवडली नाहीतच, पण काँग्रेसमध्येही पुष्कळांना पसंत पडली नाहीत. कित्येक भूमिगत झालेले काँग्रेसवाले बाहेर आले आणि त्यांपैकी २५ जणांनी पोलीस कमिशनरला कळविले की, ९ ऑगस्ट, १९४२ रोजी केलेला काँग्रेसचा 'भारत छोडो' ठराव आपण जाहीरपणे वाचून दाखवू. त्या सर्वांना अटक करण्यात आली आणि बारा तासांनी त्यांना सोडून देण्यात आले. गांधी-जीनची संभाषणे सफल व्हावी म्हणून काँग्रेसच्या व मुस्लिम लीगच्या अनुयायांनी एकत्र प्रार्थना केल्या. अलाहाबादेस, आनंदभुवनात काँग्रेस व लीगच्या नेत्यांनी हिन्दु-मुस्लिम ऐक्याचा ठराव पास केला. जीनांनी सुद्धा लाहोर येथे जाहीर भाषण करून गांधींना व मला तुमच्या शुभेच्छा द्या, अशी मागणी लोकांजवळ केली. अशा रीतीने सगळीकडे शुभचिन्हें दिसू लागली. जीनांनी कळविल्याप्रमाणे गांधी ९ सप्टेंबर

रोजी जीनांच्या घरी गेले. जीना दरवाजात स्वागतासाठी उभे होते. गांधींनी जीनांच्या पाठीवर हात ठेवून स्मितवदन केले आणि प्रेस फोटोवाल्यांनी त्यांची छायाचित्रे घेतली. नंतर ११ सप्टेंबरपासून २७ सप्टेंबरपर्यंत दररोज त्यांची संभाषणे कित्येक तास चालू राहिली. गांधींचे मौनाचे दिवस व रमजान महिन्यातील मुसलमानांचे उपवासाचे काही दिवसच त्यात खंड पडे. दोघेही आपापली भूमिका खंबीरपणे मांडणारे असल्याने कोणीच कोणाचे मन वळवू शकला नाही आणि वाटाघाटी फिसकटल्या असे म्हणण्याची उभयपक्षांची इच्छा नसल्यामुळे त्या बेमुदत तहकूब झाल्या असे जाहीर करण्यात आले. ब्रिटिशांचे येथून निर्गमन होण्यापूर्वी भारताची फाळणी झाली पाहिजे आणि त्यांनी मागितलेल्या पाकिस्तानात सिंध, पंजाब, सरहद्द प्रांत, बलुचिस्तान व बंगाल व आसाम यांचा समावेश असला पाहिजे, असे जीनांचे स्पष्ट म्हणणे होते. राजाजींचे सलग मुसलमान वस्तीचे प्रांत पाकिस्तान म्हणून देण्याबाबतचे म्हणणे जीनांना मुळीच कबूल नव्हते. २८ सप्टेंबर रोजी गांधींनी एक पत्रकार परिषद घेतली. तिला चाळीसांवर देशी व विदेशी पत्रकार हजर होते. तेथे गांधींनी प्रथम आपले निवेदन वाचून दाखविले. नंतर त्यांना काही पत्रकारांनी प्रश्न विचारले. त्यांत एक प्रश्न राष्ट्रीय मुसलमानांबद्दलचा होता. गांधींनी मुस्लिम लीग व जीना यांना अवास्तव महत्त्व देऊन त्यांना अडचणीत टाकले अशी त्यांची तक्रार होती. त्यावर गांधींनी चोख उत्तर दिले, की जे कोणी राष्ट्रीय वृत्तीचे असतात ते कोणाला खूष करण्यासाठी राष्ट्रीय असत नाहीत. ते आपल्या श्रद्धेनेच तसे असतात. त्यांना अडचणीत पडल्यासारखे वाटण्याचे काही कारण नाही. दुसरा एक प्रश्न होता, १९४२ मधील काँग्रेसच्या ९ ऑगस्टच्या ठरावावेळची व आताची गांधींची भूमिका यात काय फरक आहे?

त्यावर गांधींनी उत्तर दिले; "There is very great difference. In 1942, Rajaji had not 'burst' on the seene as he did at Aga Khan Palace with a complete proposition. It reflects very great credit on his persistence. Rajaji never takes up a stand-point without the fullest consideration and having taken it up, he follows it to the bitterest end. He had abundant faith in my loyalty and he never gave me up as I have never given him up. When he found me in Aga Khan Palace and presented the formula, I did not take even five minutes and I said 'yes', because I saw it in a concrete shape.

"My mind is narrow. I have not read much literature. I have not seen much of the world. I have concentrated on certain things in life and beyond that I have no other interest. Therefore, I could not realise the meaning of Rajaji's stand and I disliked it. But when he came with a concrete formula, and when he had put something in concrete shape, I felt that I could buy it and touch it. Therefore you see the vast difference between 1942 and today. However, thereby, I have not departed from the Congress stand-point in general terms. The Congress has accepted self-determination, The Rajaji formula also has accepted the principle of self-determination and therefore, the formula had become common ground."

□ □ □

# ८. सत्तांतराच्या वाटाघाटी – स्वातंत्र्यप्राप्ती व फाळणी

२ ऑक्टोबर १९४४ रोजी गांधींचा पंचाहत्तरावा वाढदिवस आला. त्या दिवशी पंडित मालवीयांनी त्यांना 'शतायु भव' असा आशीर्वाद तारेन पाठविला, तेव्हा गांधी म्हणाले, "मला १२५ वर्षे जगायचे होते. परंतु मालवीयजींनी माझी पंचवीस वर्षे कापली!" शंभर वर्षेच मी जगले पाहिजे असे ते म्हणतात. हा पंचाहत्तरावा जन्मदिवस साजरा करण्याला सेवाग्रामातील आश्रमीय मंडळींनी प्रातःकालीन प्रार्थनांनी प्रारंभ केला. तिरंगी झेंडा फडकावण्यात आला. ठक्करबापांकडे यजमानपण होते. 'गांधीजी' या नावाचा, अनेक भारतीय व जागतिक प्रसिद्ध व्यक्तींचे गांधीबद्दलचे लेख अथवा संदेश ज्यात होते असा ग्रंथ त्यांना अर्पण करण्यात आला. डॉ. राधाकृष्णन यांनी त्याचे संपादन केले होते. त्यातील ऑल्बर्ट आइनस्टाईन यांनी लिहिलेला मजकूर येथे उदधृत करणे औचित्यपूर्ण होईल. "A leader of his people unsupported by any outward authority; a politician whose success rests not upon craft, nor mastery of the technical devices, but simply upon the convincing power of his personality, a victorious fighter who has always seorned the use of force, a man of wisdom and humility armed with resolve and in flexible consistency, who has devoted all his strength to the uplifting of his people and the betterment of their lot; a man who has confronted the brutality of Europe with the dignity of the simple human being and thus at all times risen superior. Generations to come, it may be will searcely believe that such a one as this ever, in flesh and blood, walked upon this earth."

असा हा पंचाहत्तरावा वाढदिवस जगात सर्वत्र साजरा झाला. नेताजी सुभाषचंद्र बोस, आझाद हिंद फौजेचे सरसेनापती, आझाद हिंद हंगामी सरकारचे प्रमुख यांनी रंगून येथे झेंडावंदनाच्या प्रसंगी उद्गार काढले, "Father of our nation! In this holy war for India's liberation we ask for your blessings."

सेवाग्रामातील मुख्य समारंभ दुपारी दोन वाजता झाला. श्रीमती सरोजिनी नायडूंनी गांधींच्या भालप्रदेशावर कुंकुमतिलक लावला आणि त्यांचेवर फुले उधळली. ऐंशी लाख रुपये त्यांना नजर करण्यात आले, ते

कस्तुरबा स्मारक निधीतर्फे होते. त्यांची प्रकृती मात्र अजून साफ बरी झालेली नव्हती. १९४५ साल आता सुरू झाले. भारतमंत्री एमरी हे काँग्रेस पुढाऱ्यांची सुटका करण्याला अजून तयार झालेले नव्हते. गांधीजींचा सर्वांना एकच सल्ला सारखा होता की, विधायक कार्यक्रमावरील निष्ठा व लक्ष कदापि कमी होऊ देऊ नका. नव्या वर्षाच्या पहिल्या एकदोन महिन्यात असे मात्र दिसू लागले होते, की राजकारणाची हवा बदलत आहे. सेंट्रल लेजिस्लेटिव असेंब्लीवरील बहिष्कार काँग्रेसने उठविला होता आणि काँग्रेसपक्षाने भुलाभाई देसाई यांच्या नेतृत्वाखाली, इतर पक्षांच्या सहकार्याने चारपाच वेळा सरकार पक्षाचा पराभव केला होता. मार्च १९४५ मध्ये डॉ. खानसाहेबांनी मुस्लिम लीग मंत्रिमंडळाचा पराभव करून काँग्रेसचे मंत्रिमंडळ स्थापन केले होते. आसाम-मध्ये काँग्रेसच्या मदतीने मुस्लिम लीगचे मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाले होते. लीगचे दुसरे मंत्रिमंडळ सिंधमध्ये होते. बंगालमध्ये ९३ कलमाखाली गव्हर्नरचे राज्य चालू होते. ब्रिटिश सरकारकडून योग्य प्रतिसाद मिळाला तर भुलाभाई देसाई व लियाकत अलीखाँ व्हाइसरॉयचे मंत्रिमंडळ सर्व हिंदी सभासदांचे बनविण्याला तयार होते. सप्रूंच्या अशाच स्वरूपाच्या खटपटीला गांधींनी अनुकूलता दाखविली होती, पण जीना तिकडे ढुंकून बघायला राजी नव्हते. ब्रिटनमधील लोकमतही हिंदी प्रश्नाची कुचंबणा संपविण्याला तयार होत होते. इतक्यात प्रेसिडेंट रुझवेल्ट अकस्मात मृत्यू पावले. ब्रिटिश सरकारने युद्ध-समाप्तीनंतरच्या व्यवस्थेच्या चर्चेसाठी सानफ्रान्सिस्को येथे सभा घेण्याचा घाट घातला आणि त्या परिषदेत हिन्दुस्तानच्या वतीने शिष्टमंडळ पाठविण्याचे ठरविले, जणू काही हिन्दुस्तान स्वतंत्र देशच होता. पण गांधींनी १८ एप्रिल रोजी या कपटपूर्ण प्रयत्नावर टीका केली. ते म्हणाले की, सानफ्रान्सिस्को येथे लोकनियुक्त शिष्टमंडळ तरी जाईल अथवा कोणीच जाऊ नये. या परिषदेला रशियाचे परराष्ट्रमंत्री मोलोटोव हजर होते. ते म्हणाले की, या परिषदेत एक हिन्दुस्तानचे शिष्टमंडळ आले आहे. पण हिंदुस्तान हा काही स्वतंत्र देश नाही. पण आपण सर्व जाणतो, की अशी वेळ लवकरच येईल जेव्हा स्वतंत्र हिन्दुस्तानचा आवाज आपण येथे ऐकू. ब्रिटनचे मुख्य प्रधान चर्चिल यांनी मे महिन्यात निवडणूक घेण्याचे जाहीर केले आणि तेथील सर्वपक्षीय मंत्रिमंडळाची कारकीर्द संपली. मजूर पक्षाच्या परिषदेत बेव्हिन यांनी जाहीर केले की, आम्ही जर बहुमताने निवडून आलो तर इंडिया ऑफिस बंद करू आणि वसाहतीकडे सर्व सत्ता देऊ. प्रोफेसर हॅरोल्ड लास्की म्हणाले की, हिंदु-स्तानातील कुचंबणा संपविण्याच्या दृष्टीने योजना चालू आहेत, राजकीय कद्यांची लवकरच सुटका होईल. लॉर्ड वेव्हेल दहा आठवडे मायदेशी सर्व

खल करून ५ जून रोजी हिंदुस्तानात परत आले. आल्यावर त्यांनी हिंदी पुढाऱ्यांना परिषदेसाठी निमंत्रणे पाठविली. गांधींनी काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून आजाद यांना बोलावणे रास्त होईल असे सांगितले. २५ जूनला सर्व निमंत्रितांची परिषद भरली. गांधी परिषदेला गेले नाहीत; परंतु सल्लामसलतीसाठी सिमला येथे येऊन राहिले होते. व्हाइसरीगल कौन्सिलचे सर्व मुसलमान सभासद मुस्लिम लीगचे सदस्य असले पाहिजेत; म्हणजे काँग्रेसचे असफअली व आजाद तसेच युनिअनिस्ट पक्षाचे मालिक खिजर हयातखान हे चालणार नाहीत असा हेका जीनानी धरल्यामुळे परिषद कोलमडली. १४ जुलैला कॉन्फरन्स मोडली असे लार्ड वेव्हेल यांनी जाहीर केले. त्यानंतर जीना यांनी काढलेले उद्गार मासलेवाईक होते. ते म्हणाले :

On a final examination and analysis of the Wavell Plan, we found that it was a snare. There was the combination consisting of Gandhi and the Hindu Congress who stand for India's Hindu national independence as one India and the latest exponent of geographical unity, Lord Wavell and Glancy-Khizr, who are bent upon creating disruption amng the Muslims in the Punjab and we were sought to be pushed into this arrangement which, if we had agreed to, as proposed by Lord Wavell, we should have signed our death warrant. "

ही परिषद संपल्यावर दोन आठवड्यांच्या आतच म्हणजे २६ जुलै रोजी ब्रिटनमध्ये मजूर पक्षाचे सरकार सत्तारूढ झाले. आणि आणखी दोन आठवड्यांनी जपानने शरणागती पत्करली. एमरी निवडून आलेच नाही आणि त्यांच्या जागी लॉर्ड पेथिक लॉरेन्स हे भारतमंत्री झाले. नवे ब्रिटिश मुख्य मंत्री क्लेमंट ॲटली हे झाले. २१ ऑगस्ट रोजी घोषणा झाली की सेंट्रल असेंब्ली व प्रांतिक कायदे मंडळाच्या सार्वत्रिक निवडणुका शक्य तेवढ्या लवकर घेतल्या जातील आणि व्हाइसरॉय विचारविनिमयासाठी फिरून लंडनला जातील १९ सप्टेंबर रोजी ॲटली व वेव्हेल हे एकाच वेळी लंडन व दिल्ली येथे भाषणे करतील व जाहीर करतील. की निवडणुका होताच नवीन घटना तयार करण्यासाठी एक समिती नियुक्त करण्यात येईल आणि ब्रिटन आणि हिंदुस्तान यांमध्ये करण्याच्या तहनाम्यातील मजकुराचा विचार करण्यात यईल. तसेच निवडणुका होताच आपले कार्यकारी मंडळ बनविण्याचा अधिकार व्हाइसरॉय यांस देण्यात आला. सप्टेंबर महिन्यातच काँग्रेसची कार्यकारिणी आणि अखिल भारतीय समिती यांच्या सभा होऊन पूर्वीच्या सर्व काँग्रेसच्या तात्त्विक

भूमिकांचा पुनरुच्चार करण्यात आला. १९४२ मधील लढा व नंतर या विषयावर पटेल यांनी ठराव मांडला. नेहरूंनी त्याला दुजोरा दिला. आझाद हिंद फौजेतील १९४२ मधील ब्रह्मदेश व मलाया येथील त्यांच्या कृत्यांबद्दल त्यांना सजा होणे गैर होईल असा ठराव नेहरूंनी मांडला आणि त्यांच्या बचावासाठी सप्रू व भुलाभाई देसाई यांची कमिटी नेमण्यात आली. सरदार पटेलांनी नंतर कार्यकारिणीचा लॉर्ड वेव्हेल यांच्या भाषणावरील ठराव मांडला व त्याचे वर्णन संदिग्ध, अपुरा व असमाधानकारक असे केले. सोशालिस्ट पार्टी, फॉरवर्ड ब्लॉक व किसान संघटनांवरील बंदी उठविण्याची मागणी त्यात होती. तथापि सत्तांतराच्या प्रश्नावर मतदारांची इच्छा नोंदली जावी म्हणून निवडणुका लढविण्याचा कॉंग्रेसचा संकल्प त्यात जाहीर केला. आता कॉंग्रेसचा कारभार पटेल, आजाद व नेहरू यांच्या हाती होता. गांधी नेचर क्युअर क्लिनिकमध्ये राहाण्याला पुण्यास गेले. कॉंग्रेस कार्यकारिणीने १२ कलमी निवडणुकीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. यामध्ये भाषावार प्रांतरचनेचे एक कलम होते, सामाजिक न्यायाची मागणी दुसऱ्या एका कलमात होती, संयुक्त स्वरूपाची व लोकसत्ताक घटना हवी, असे एका कलमात म्हटले होते, दारिद्र्य-निर्मुलन आणि जीवनमान उंचावण्याची प्रतिज्ञा आणखी एका कलमात होती आणि सर्व दलित राष्ट्रांचे स्वातंत्र्य व राष्ट्रांचा बंधुभावावर उभारलेला संघ दुनियेत पाहिजे, अशी मागणी होती. आझाद हिंद फौजेतील लोकांचा खटला कोर्टात चालला. मुख्य काम भुलाभाई देसाईंनी चालविले. पण मदतनीस वकिलांत नेहरूही कित्येक वर्षांनी बॅरिस्टरचा काळा झगा घालून कोर्टात हजर होते. सर्व आरोपींची निर्दोष म्हणून सुटका झाली. लोकांच्या इच्छेचा विजय झाला, असे उद्गार नंतर नेहरूंनी काढले.

१० डिसेंबर, १९४५ रोजी गांधींजी व व्हाइसरॉय यांची मुलाखत झाली. गांधींनी व्हाइसरॉयना सांगितले की, हिंदुस्तानच्या प्रश्नाची उकल करण्याचा एकच मार्ग आहे. त्यांनी हे पक्के समजून राहिले पाहिजे, की हिन्दुस्तानवर कबजा ठेवण्याचा त्यांना कोणताही नैतिक अधिकार नाही. ब्रिटनचा न्याय हा इसापनीतील लोणीखाऊ माकडाचा न्याय आहे. जो कोणता पक्ष सत्तास्वीकारण्यास तयार असेल त्याच्या हाती सत्ता सुपूर्द करून त्यांनी निघून जावे, मग तो पक्ष कॉंग्रेस असो वा मुस्लिम लीग असो, कॉंग्रेस कार्यकारिणीची सभा डिसेंबरला कलकत्याला होऊन त्यात असा ठराव करण्यात आला की, १९४२च्या ऑगस्टमध्ये कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांची धरपकड करण्यात आल्यावर मार्गदर्शनापासून वंचित झालेल्या जनतेने आपल्या हाती कारभार घेऊन अत्याचाराचे

प्रकार केले. त्यांची गणना अहिंसेमध्य कदापि करता येणार नाही. सार्वजनिक इमारती जाळणे, आगगाड्या उलथून पाडणे व टेलिग्राफच्या तारा तोडणे यांचा अंतर्भाव अहिंसेत होऊ शकत नाही. या कार्यकारिणीला असे जाहीर करणे भाग आहे की, काँग्रेसने अहिंसेचा मार्ग केव्हाच सोडलेला नाही व विधायक कार्यक्रमावरील तिचा विश्वास पूर्ववत् कायम आहे. आझाद हिंद फौजेचे व सुभाषचंद्र बोस यांचा देशाभिमान, शौर्य, शिस्त, त्याग आणि ऐक्य या गुणां-बद्दल काँग्रेसला अभिमानच वाटतो; परंतु याचा अर्थ असा मुळीच नाही की काँग्रेसने न्याय्य व शांततेच्या मार्गानेच स्वातंत्र्य मिळविण्याचे आपले धोरण सोडून दिले आहे. यानंतर गांधी बंगालच्या दौऱ्यावर गेले आणि ठिकठिकाणी लोकांना आपले व काँग्रेसचे धोरण समजावून सांगितले. ९ जानेवारी १९४६ला गांधी गौहाटीला गेले आणि आसामचा दौरा संपवून त्यांनी उडिसा पालथा घातला आणि नंतर मद्रासला गेले. तेथील दौरा संपल्यावर सेवाग्रामला परत आले आणि १० फेब्रुवारीपासून 'हरिजन' पुन: चालू करण्यात आला, तो साडेतीन वर्षांनी. या मुदतीत जगात पुष्कळ मोठे बदल झाले; पण गांधींमध्ये कसलाही बदल झाला नाही. सुभाषचंद्र बोस यांचे मदतनीस शहानवाज यांनी केलेल्या घोषणेचे गांधींनी स्वागत केले. शहानवाज म्हणाले, "नेताजींवरील निष्ठेला साक्ष ठेवून, हिंदुस्तानच्या भूमीवर पुन: पाऊल ठेवल्यावर काँग्रेसमध्ये अहिंसेचा शिपाई म्हणूनच मी काम करणार आहे!" रॉयल इंडिअन नेव्हीमधील नाविक सैनिकांचा असंतोष शिगेला पोचला होता आणि २० फेब्रुवारीला त्यांनी बंडच पुकारले. मुंबई, कराची वगैरे ठिकाणी बंडाचा वणवा पसरला आणि गोळीबार झाले, 'जय हिंद'च्या घोषणा देण्याला कोणावरही सक्ती करणे म्हणजे स्वराज्य दूर ढकलणे आहे. हिंदु-मुसलमानांनी असल्या कृतीसाठी एक होणे हे अपवित्र आहे आणि यातून परस्परांशी हिंसाचार करण्याचेच शिक्षण मिळेल, हे हिंदुस्तानच्या आणि दुनियेच्या दृष्टीने अनिष्ट आहे. ब्रिटिश राज्य-कर्त्यांनी सत्तात्याग करण्याचा व हिंदी लोकांच्या हाती सत्ता देण्याचा उद्देश जाहीर केला आहे, तो लवकर अंमलात आणावा अशा आशयाचे जाहीर पत्रक त्यांनी काढले आणि २४ फेब्रुवारीच्या 'हरिजन'मध्ये तसेच लिहिले. ज्या नाविक दलातील लोकांना तेथील जीवन असह्य झाले असेल त्यांनी राजीनामे देऊन आपला स्वाभिमान राखावा असे गांधींनी म्हटले, पण सोशालिस्टांना व अरुणा असफअलींना ते मुळीच रुचले नाही. एका पत्रलेखकाने गांधींना सुचविले की त्यांनी अहिंसामार्ग यावर विवेचक प्रबंध लिहावा. त्यावर ते म्हणाले, "विद्वत्तापूर्ण लेखन करणे माझ्या शक्तीबाहेरचे आहे. मी प्रत्यक्ष कार्य करणारा माणूस आहे. मला जे समजते, ते मला माझे कर्तव्य वाटते

आणि जे माझ्या वाट्याला येते ते मी करतो आणि माझे सर्व कार्य म्हणज सेवेचे व सेवाबुद्धीनेच केलेले असते. ज्याला कोणाला अहिंसेचे शास्त्र पध्दतशीरपणे मांडायचे असेल, आणि खरोखर तसे करणे शक्य असेल तर त्याने ते करावे. परमेश्वराचे पूर्ण वर्णन अजून कोणी करू शकलेला नाही. अहिंसेचे तसेच आहे. आज मला जे खरे आणि बरोबर वाटते ते उद्या वाटेलच अशी हमी मी देऊ शकत नाही." यानंतर सुभाषचंद्र बोस जिवंत नाहीत असे आपले मत गांधींनी व्यक्त केले आणि कोणीतरी गांधींचे मंदिर बांधावे असे सुचविल्यावर विभूतिपूजा हा एक रोग आहे व लोकांनी त्यापासून मुक्त राहावे असे प्रतिपादन केले.

या काळात दिल्लीस एक आशापूर्ण वातावरण तयार झाले होते. लॉर्ड पेथिक लॉरेन्स, सर स्टॅफर्ड क्रिप्स आणि ऑल्बर्ट अलेक्झांडर यांचे कॅबिनेट मिशन दिल्लीस आले होते. गांधी ज्या दिवशी कॅबिनेट मिशनला भेटले तेव्हा ८२ हजार शब्द परदेशी रवाना झाले. अमेरिका, रशिया, फ्रान्स, दक्षिण आफ्रिका, मध्यपूर्व येथून पत्रकार आले होते. स्वातंत्र्य मिळाल्यावर आमची अवस्था काय होईल असे जमीनदार, भांडवलवाले, विद्यार्थी, शेतकरी गांधींना विचारीत होते. न्यायाने व सत्याने वागणाऱ्याला स्वातंत्र्यसंपन्न हिंदुस्तानात काहीच भीती नाही असे गांधी त्यांना भेटणाऱ्या सगळ्यांना सांगत असत. २९ एप्रिल रोजी त्यांनी 'हरिजन' मध्ये लिहिले,

" If the Cabinet Mission delivers the goods, India will have to decide whether in attempting to become a military power she would be content to become, atleast for same years, a fifth-rate power in the world without a message, or whether she will by further refining and continuing her non-violent policy prove herself worthy of being the first naiion in the world using her hard-won freedom for the delivery of the earth from the burden which is crushing her in spite of the so-called victory. "

२७ एप्रिल, १९४६ रोजी मौलाना अबुल कलाम आजाद यांना लॉर्ड पेथिक लॉरेन्स यांजकडून एक पत्र आले. आजादांनी २८ फेब्रुवारीला त्यांना लगेच उत्तर पाठविले. त्यात इंडियन 'इंडिपेंडन्स' या मुख्य मुद्याचा काहीच उल्लेख नाही असे म्हटले आणि हिंदू लोकांचे संख्याधिक्य असलेले व मुसलमानांचे संख्याधिक्य असलेले प्रांत असा जो उल्लेख आहे त्यावर आक्षेप असल्याचे

नमूद केले. तथापि काँग्रेसतर्फे आजाद, नेहरू, गफारखान आणि पटेल असे चौघे प्रतिनिधी व्हाइसरॉयना भेटण्यासाठी सिमला येथे गेले. या चौघांच्या विनंतीवरून गांधीही २ मे रोजी सिमला येथे गेले, पण दोन दिवसांनीच ते दिल्लीला भंगी कॉलनीमध्ये राहण्यासाठी गेले. काँग्रेस प्रतिनिधींच्या वाटाघाटी कॅबिनेट मिशनबरोबर सिमल्याला चालूच होत्या. १८ मे रोजी कॅबिनेट मिशनची घोषणा झाली. ब्रिटिश इंडिया व संस्थान मिळून इंडियन युनियन बनविणे हा कॅबिनेट मिशनच्या योजनेचा गाभा होता. पाकिस्तान असे स्वतंत्र राज्य निर्माण करण्याची कल्पना संरक्षण, राज्यकारभार आणि आर्थिक व्यवस्था या कारणास्तव टाकाऊ ठरविण्यात आली होती. कॅबिनेट मिशन आणि व्हाइस-रॉय यांचे असे म्हणणे होते की आम्हांला भावी घटनेचा तपशील ठरवायचा नाही, पण अशा यंत्रणेला गती द्यायची आहे, की तिच्या योगाने हिंदी लोकांनीच स्वतःची घटना बनवावी. म्हणून त्यांची सूचना अशी की, अशी असेंब्ली शक्य तितक्या लवकर दिल्लीस बनविण्यात यावी. आणि अशा असेंब्लीचे काम चालू असताच प्रमुख राजकीय पक्षांच्या पाठिंब्याने कामचलाऊ सरकार दिल्लीस स्थापन करावे. या उद्देशाने व्हाइसरॉयनी चर्चा चालू केली आहे आणि त्यांना आशा वाटते की, असे सरकार स्थापन होईल. सर्व खाती, युद्ध खाते सुद्धा हिंदी मंत्र्यांच्या हाती असेल. २० मे रोजी गांधींनी या सरकारी घोषणवर 'हरिजन' मध्ये संपादकीय लिहिले, ते सर्व कॅबिनेट मिशनच्या कार्याची प्रशंसा करणारे व सत्तात्याग करण्याच्या प्रामाणिक इच्छेने प्रेरित झालेले होते. जी गुणदोषचर्चा गांधींनी केली, ती सहानुभूती, सदहेतू आणि स्नेह यांनी परिप्लुत अशी होती. काँग्रेसच्या कार्यकारिणीची सभा प्रथम २४ मे रोजी भरली ती पुन: ९ जूनला भरावयाची होती. कार्यकारिणीने आपले अखरचे मत कामचलाऊ राष्ट्रीय सरकार कसे होते याचे प्रत्यक्ष चित्र पाहिल्यावर प्रकट होणार असे जाहीर केले. भीती व आशा यांचा लपंडाव चालू होता. १६ जून रोजी व्हाइसरॉयनी १४ व्यक्तींना पत्र पाठवून सरकार बनविण्याला मला मदत करा अशी विनती केली. काँग्रेस व मुस्लिम लीग यांना एकत्र आणण्यात यश न आल्यामुळे, कुचंबणा सोडविण्याकरिता मिशनने हा उपाय योजिला होता. हे अपयश का आले याबद्दल गांधी म्हणतात, कोणत्या तरी एका पक्षाला सरकार बनविण्याला सांगण्याऐवजी त्यांनी आपल्या पसंतीचे सरकार लादण्याचा प्रयत्न केला म्हणून अपयश आले. कॉन्स्टिटयुएंट असेंब्लीची योजना कार्य-कारिणींने मान्य केली; पण तातपुरते सरकार बनविण्याची कल्पना मान्य केली नाही. सरकारमधील सर्व मुसलमान सभासद लीगनेच नेमलेले फक्त असावे हे काँग्रेसला मान्य नव्हते. अखेरीस २६ जून रोजी सरकारने तातपुरते सरकार

बनविण्याची खटपट तूर्त बंद ठेविली आहे असे जाहीर करून 'टेंपररी केअरटेकर गव्हर्मेंट ऑफ ऑफिशल्स' नेमून टाकले. कार्यकारिणीची सभा वर्धा येथे ८ ऑगस्ट रोजी झाली. कॉन्स्टिटयुएंट असेंब्लीची सत्ता सार्वभौम स्वरूपाची आहे व प्रांतांनी आपण कोणत्या गटात जावे याचे स्वातंत्र्य आहे हे लक्षात घेऊन ज्या काही उणीवा कॅबिनेट मिशनच्या योजनेत असतील त्या नाहीशा करता येतील हे समजून मुस्लिम लीग आणि इतर सर्व हंगामी सरकार बनविण्याला तयार होतील अशी या कार्यकारिणीला आशा आहे, असा ठराव व मुस्लिम लीगन आपला पूर्वीचा निर्णय फिरविला याबद्दल खेद प्रकट केला. काँग्रेसने हंगामी सरकार बनविण्याचे व्हाइसरॉयचे निमंत्रण स्वीकारले. नेहरूंनी काँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने जीनांस पत्र लिहिले की, आपण संयुक्त सरकार बनवू या! जीनांनी उत्तर दिले की, तुमच्या वर्ध्याच्या ठरावामुळे मुस्लिम लीगला आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा असे वाटत नाही. मुस्लिम लीगने १६ ऑगस्ट हा दिवस डायरेक्ट ॲक्शन डे म्हणून ठरविला आणि त्या दिवशी बंगाल, बिहार, सिंध, पंजाब वगैरे ठिकाणी हिंदु-मुसलमानांचे दंगे फार मोठ्या प्रमाणावर झाले. २४ ऑगस्ट रोजी गांधींनी सेवाग्रामाचा निरोप घेतला आणि सर्वप्रथम ते कोचराबला उसळलेल्या दंग्याच्या आगडोंबात जाण्यास निघाले आणि आश्रमाच्या ध्येयवादाला साजेसे वर्तन आपण प्राणत्याग करावा लागला तरी करू या, असे आश्रमवासींना उद्देशून म्हणाले आणि त्यांनी सन्मती मिळण्यासाठी ईश्वराची प्रार्थना केली.

२४ ऑगस्ट रोजीच जवाहरलाल नहरूंनी बनविलेल्या हंगामी मंत्रिमंडळाची नावे जाहीर करण्यात आली. व्हाइसरॉयनी रेडिओवरून केलेल्या आपल्या भाषणात मुस्लिम लीगला आपल्या निर्णयाचा फेरविचार करण्याची आणि हिंसात्मक शब्द न वापरण्याची आणि हिंसात्मक कृत्ये न करण्याची विनवणी केली. पण दुसऱ्याच दिवशी नेहरूंच्या हंगामी मंत्रिमंडळाचे एक सदस्य सर हाफत अहमदखान यांच्यावर काही मुसलमान तरुणांनी भोसकाभोसकीचा हल्ला केला आणि त्यांना गंभीर जखमी केले. २७ ते ३० ऑगस्टपर्यंत काँग्रेस कार्यकारिणीची सभा कलकत्ता वगैरे ठिकाणी झालेल्या अत्याचारांमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीचा विचार करण्याकरिता भरली आणि जीवितवित्ताच्या गंभीर हानीबद्दल व वृद्ध, स्त्रिया व मुले यांजवर झालेल्या पाशवी हल्ल्यांबद्दल अतीव दुःख व्यक्त केले आणि सर्वांची जबाबदारी मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांवर आणि बंगाल सरकारने १६ ऑगस्ट हा सुटीचा दिवस ठरविला त्यावर पडते, असा ठराव पास केला. २ सप्टेंबर, १९४६ रोजी नेहरूंचे हंगामी सरकार अंमलात आले. त्या सरकाराला गांधींनी संदेश पाठविला की, "प्रार्थना केल्या-

पासून मी सारा वेळ तुमच्याबद्दलच विचार करीत आहे. मिठाचा कर रद्द करा. दांडी मोहिमेचा विसर पडू देऊ नका. हिंदू व मुस्लिमांना एकत्र आणा. अस्पृश्यता नष्ट करा. आणि खादीचा स्वीकार करा." प्रार्थनासभेत गांधींनी म्हटले की, हा प्रसंग काही मोठ्या आनंदोत्सवाचा नाही. कारण या सरकारात मुस्लिम लीग सामील झालेली नाही. त्यांनी आशा व्यक्त केली, हंगामी सरकार योग्य दिशा जनतेला दाखवील आणि सत्य, पावित्र्य व स्वराज्य या रस्त्याने जाईल. तसेच या कामी त्यांना सर्व हिंदी लोकांचे सहकार्य मिळेल; परंतु मुस्लिम लीगचा आडमुठपणा अमर्याद होता. आम्हाला जे पाहिजे ते आम्ही जबरदस्तीने मिळवू असे लीगचे पुढारी सारखे घोकीत होते. लॉर्ड वेव्हेल यांनी २६ सप्टेंबरला गांधींना भेटायला बोलाविले. या भेटीनंतर ७ ऑक्टोबर रोजी गांधींनी नेहरू व जीना यांच्यामध्ये चालू असलेल्या हंगामी नेहरू सरकारात मुस्लिम लीगने यावे याबद्दलच्या वाटाघाटींचा उल्लेख गांधींनी प्रार्थनासभेत केला. या कामी भोपाळचे नबाब पुढाकार घेत होते. त्यांनी तयार केलेल्या मसुद्याप्रमाणे, व्हाइसरॉयच्या आमंत्रणाला मान देऊन मुस्लिम लीगचे प्रतिनिधी हंगामी मंत्रिमंडळात येण्याचे ठरले असे १५ ऑक्टोबर रोजी जाहीर झाले. १६ ऑक्टोबरला असे दिसून आले की, मुस्लिम लीगच्या यादीत एका हरिजनाचे नाव आहे. पण यात सरळपणा नाही असे गांधींना वाटले. आणि हंगामी मंत्रिमंडळ सुद्धा युद्धभूमी बनविण्याचा लीगचा इरादा असावा असे गांधींना वाटले. २१ ऑक्टोबर रोजी गांधींनी 'असोशिएटेड प्रेस ऑफ अमेरिका' चे प्रेस्टन ग्रोव्हर यांना मुलाखत दिली. तीमध्ये ते म्हणाले की, बंगालमध्ये मुस्लिम लीगचे मंत्रिमंडळ होते. त्याला पूर्व बंगालमध्ये होत असलेल्या अत्याचारांना आळा घालता आला पाहिजे. तेथील हृदयद्रावक हकीकती ऐकून २३ ऑक्टोबर रोजी कलकत्त्याला जाण्याचा आपला हेतू जाहीर केला. हंगामी केंद्र सरकारात मुस्लिम लीग शिरली आहे ती पाकिस्तान मिळविण्यासाठी, असे विधान गझनफर अलीखान यांनी करावे याबद्दल गांधींनी विषाद व्यक्त केला. २३ ऑक्टोबर रोजीच काँग्रेसच्या कार्यकारिणीची सभा दिल्लीस होऊन पूर्व बंगालमध्ये ते लाजिरवाणे अत्याचार चालू झाले होते त्यांबद्दल शरम, तिरस्कार व संताप व्यक्त करण्यात आला. स्त्रियांचे अपहरण व त्यांवरील अत्याचार, जबरीने धर्मांतर करणे, आगी लावणे, लुटालूट करणे व खून करणे हे सगळे प्रकार तिकडे घडत होते, आणि कार्यकारिणीने असे स्पष्ट म्हटले की, मुस्लिम लीगने गेली कित्येक वर्षे द्वेष व यादवी यांचा जो अविरत प्रचार चालविला होता त्याचाच हा साक्षात परिणाम होता. काँग्रेसचे नवे अध्यक्ष आचार्य कृपलानी हे नोआखलीला गले होते आणि तेथून सर्व पूर्व बंगालचा

दौरा करणार होते. गांधी २७ ऑक्टोबर रोजी कलकत्याला जाण्यास निघणार होते. आगगाडीचा प्रवास त्यांना फार कष्टदायक झाला. अखेर स्टेशनावर गर्दीच्या आरोळ्या ऐकून त्यांना कानात बोटे घालून बसावे लागे. ३० ऑक्टोबर रोजी त्यांनी सर्वांचे लक्ष व्हाइसरॉय व त्यांचे मंत्रिमंडळ यांनी केलेल्या आवाहनाकडे वेधिले. त्या आवाहनम्हटलेत होते की, हिन्दु-मुसलमानांनी आपसातील संघर्ष मिटवावा. काँग्रेस व लीग या दोघांचे प्रतिनिधी ज्यात आहेत अशा मंत्रिमंडळाचे हे आवाहन होते. बंगालचे गव्हर्नर कॅसी व मुख्य मंत्री सुरावर्दी यांची त्यांनी दोन वेळा भेट घेतली. गांधी आता काँग्रेसची आगामी बैठक, सेवाग्राम आश्रम, उरळीकांचनचे नेचर क्लीनिक वगैरे सर्व विसरले होते. त्यांचे लक्ष आता नोआखलीकडे लागलेले होते. तेथून अंत:करणाला पाझर फोडणाऱ्या वार्ता सारख्या येत होत्या. बकरी ईद जवळ आली होती, म्हणून गांधींनी ती होऊन जाईपर्यंत कलकत्त्यासच राहावे असे मुख्य मंत्र्यांचे म्हणणे होते. त्यांच्या मते सगळ्या उद्रेकाचे मूळ कलकत्त्यात होते. हंगामी सरकारचे चार मंत्री २ नोव्हेंबर रोजी कलकत्त्यास शांतता प्रस्थापनेच्या खटपटीसाठी आले होते हा एक शुभशकुनच होता. व्हाइसरॉयची भेटही तेव्हाच कलकत्त्याला झाली. गांधी म्हणाले, "मला समजा, कोणी मारले तरी उलट कोणाला तरी मारून कोणाला काय मिळणार? म्हणून असल्या कल्पनांना कोणी मुळीच थारा देऊ नये. असल्या प्रकारांनी आपल्याला स्वातंत्र्य कधीच प्राप्त होणार नाही." गांधींचा हा इशारा अगदी योग्य वेळीच आला. कारण बिहारमध्ये सूड व बदला घेण्याच्या बातम्या येऊ लागल्या होत्या. काही बिहारी हिंदूंनी पळून जाणाऱ्या मुसलमानांची कत्तल केल्याच्या बातम्या आल्या. पण त्या ऐकताच गांधींनी जवाहरलाल नेहरूंना तार केली आणि आपल्या तीन सहकारी मंत्र्यांसह नेहरू तावडतोब पटना येथे गेले. नेहरू व अबदुल राब नित्सार जरूर पडेल तेवढे दिवस बिहारमध्ये राहाणार होते. नेहरूंनी गर्जना केली की, असला जंगलीपणा केंद्र सरकार मुळीच सहन करणार नाही. ५ नोव्हेंबर रोजी राजेंद्रप्रसाद यानी जाहीर केले की, चोवीस तासांत बिहारमधील दंगली जर थांबल्या नाहीत तर गांधी आमरण उपोषण करण्याला बसतील. ६ नोव्हेंबर रोजी नोआखलीहून निघण्यापूर्वी बिहारमधील लोकांना उद्देशून गांधींजींनी शांततेचे आवाहन केले. त्यांत गांधींनी म्हटले, "बिहारी हिंदूंची दुष्कृत्ये पाहून जीना काँग्रेसला हिंदू काँग्रेस म्हणून जो टोमणा देतात तो बरोबर ठरेल. माझ्या अहिंसेविषयी मला मुळीच लाज वाटत नाही. माझ्याकडून ती कशी प्रकट होते ऐन वेळी त्याची कसोटी पाहण्यासाठीच मी बंगालमध्ये आलो आहे. या देहाकडून सेवा घडावी असे जोपर्यंत ईश्वराला वाटत आहे तोपर्यंत मला काही होणार नाही."

गांधींना नोआखलीहून पूर्व बंगालमध्ये सर्वत्र तिसऱ्या वर्गाने रेल्वेचा प्रवास करावा असे वाटत होते, पण बंगाल सरकारने त्यांच्यासाठी खास गाडीची व्यवस्था केली आणि त्यांचेबरोबर मंत्री शमसुद्दीन, मुख्य मंत्र्यांचे पार्लमेंटरी सेक्रेटरी नसरुल्लाखान आणि अबदुल रशीद यांना सोबतीला दिले. स्वत: मुख्यमंत्री सुरावर्दीच त्यांचेबरोबर जाणार होते; पण ते कामामुळे कलकत्त्यालाच अडकून पडले. कुष्टिया, राजबारी व गोआलांडो येथे खूप गर्दी स्टेशनांवर जमली. तेथे गांधींनी हिन्दुस्तानीत थोडक्यात भाषणे केली. त्यांची बंगाली रूपांतरे कोणी तरी सांगे. वर्तमानपत्रांसाठी गांधी स्वत:च आपल्या भाषणांची टिपणे करीत. गोआलांडोहून बोटीत बसून ते पद्मा व चांदपूरला गेले. ६ नोव्हेंबर रोजी तेथे त्यांना एक मुस्लिम लीगचे व दुसरे हिंदूचे शिष्टमंडळ भेटले. त्यांनी असहाय्यता व भीरुता यांचा धिक्कार केला व जोपर्यंत हे दुर्गुण असतील तोपर्यंत पोलीस व लष्कर कोणाचे संरक्षण करू शकणर नाहीत असे त्यांनी सांगितले. शूरपणे, निर्भयतेने वागणे यांतच खरा पुरुषार्थ आहे हा त्यांच्या शिकवणीचा सर्वत्र गाभा होता. चांदपूर येथे मुसलमानांच्या शिष्टमंडळाची त्यांनी कानउघाडणी केली की, तुमच्या म्हणण्याप्रमाणे पोलीस व लष्कर यांनी व घबराट उडालेल्या हिंदूंनी व खोटचा अफवांनी सर्वत्र दंगे केले. पण ही गोळी गिळण्याला कठीण आहे. लष्कराला बोलावण्याची गरजच कां पडली? टिपरा व नोआखरीहून मला समजलेल्या हकीकती भयानक आहेत. जीनांनी म्हटले होते की, पाकिस्तानात सर्वांना निर्भेळ न्याय मिळेल. मला तो येथे कोठे दिसत नाही. हिंदूंना पळून जावे लागावे ही हिंदूंना व मुसलमानांना, दोघांनाही शरमेची गोष्ट आहे. तेथून दत्तापारा येथे गांधी गेले. तेथे त्यांनी सर्वांना सांगितले की, तुम्ही विश्वास ठेवा अथवा ठेवू नका; पण मी हिंदु-मुसलमानांचा सेवक आहे. ११ नोव्हेंबर गांधींचा मौनदिन होता. तरी त्यांनी नोआखाली, सोनाचाका, खिलपारा या लखिमपूर ठाण्यातील खेडयांना भेटी दिल्या. गोमारौली व नंदिग्राम झाल्यावर १३ नोव्हेंबरला त्यांनी एक महत्त्वाचा निर्णय आपल्या सोबत्यांना सांगितला. एकएकाने आपल्याला एकएका खेडयात स्वत:ला वाहून घ्यावे आणि स्वत:ला सुरक्षिततेची हमी असे समजावे. त्यांचा स्वत:चा निश्चय झाला होता की हिंदू व मुसलमान पुन: निर्भयपणे एकमेकांशी प्रेमाने व स्नेहाने वागू लागेपर्यंत पूर्व बंगालची रजा घ्यायची नाही. याबद्दलच्या चर्चेत सुचेता कृपलानी व ठक्करबापा सामील होती. गांधी म्हणाले, हे पाऊल मी उचलले नाही तर माझी अहिंसा अपुरी राहील. गांधी नंतर आपला मुक्काम हलवून काजरखिल येथे गेले. ते १४ नोव्हेंबरला वाटत शाहापूरला एक जाहीर सभा घेण्यात आली. तेथील स्थानिक मुसलमान

म्हणाले, आम्हांला शांतता प्रस्थापित व्हावी असेच वाटते, पण मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांनी आम्हाला त्यासाठी संमती दिली पाहिजे. गांधींना त्यांचे म्हणणे सयुक्तिक वाटले आणि त्या दिवशी वर्तमानपत्रांत आलेल्या जीनांच्या भाषणातील उतारा त्यांना गांधींनी दाखविला. जीना म्हणाले, " If the Muslims lose their balance and give vent to a spirit of vengeance and retaliation and prove false to the highest codes of morality and preachings of our great religion Islam, you will not only lose your title to the claim of Pakistan but also it will start a vicious cirlcle of blood-shed and crucity which will at once put off the day of our freedom and then we shall only be helping to prolong the period of slavery and bondage.

त्यांनी पुढे आणखी म्हटले की, " We must prove practically that we are brave, generaous and trustworthy and that in the Pakistan areas, the minorities will enjoy the fullest security of life and prope.ty and honour, just as the Mussalmans themselves, nay even greater."

गांधींनी या विधानाचा सर्वांनी नीट विचार करावा असे सांगितले. पूर्व बंगालमधील परस्परांच्या हत्याकांडाने मी अगदी कधी नाही इतका हादरून गेलो आहे. बंगालमध्ये यश मिळविल्यावाचून मी जाणारच नाही असे गांधींनी १५ नोव्हेंबरच्या प्रार्थनासभेत सांगितले. नंतर ते एका मुसलमानाच्या घरीच राहू लागले. १७ तारखेला ते दाखधारिया या खेड्यात गेले. पळवून नेलेल्या काही मुली अद्यापि सापडत नव्हत्या. त्यांना शोधून काढून देण्याचे कर्तव्य पार पाडण्यास त्यांनी मुस्लिम लीगच्या नेत्यांना सांगितले. मुख्य मंत्री शहीद सुरावर्दी गांधींना १९ नोव्हेंबर रोजी भेटले. त्यांजबरोबर त्यांचे काही सहकारी मंत्री सुद्धा होते. त्यांनी सुचविले की, जादा पोलीस व लष्कर आता काढून घ्यावे. कारण दोनही जमातीत आता दिलजमाई झाली आहे, निर्वासितांनी सुद्धा आता परत घरी यावे. गांधी म्हणाले, "मला कबूल आहे. मात्र परत येणाऱ्यांच्या सुरक्षिततेची हमी म्हणून प्रत्येक खेड्यात एक प्रामाणिक मुसलमान मला द्या." एका मंत्र्याने म्हटले, "एकच मुसलमान काय, सगळेच मुसलमान सामुदायिक जामीन आहेत". गांधी म्हणाले, "हे फार छान आहे, पण जे सगळ्यांचे काम समजले जाते ते अखेर कोणाचेच काम असत नाही. मी फक्त एकच मुसलमान जामीन मागतो. तसाच एक हिंदू मिळविण्याचे काम मी करीन. मुस्लिम लीगने आता बांगला देशाचे सरकारच बनविले आहे. तेव्हा दर

खेड्यासाठी एक प्रामाणिक मुसलमान मला जामीन म्हणून मिळाला म्हणजे पुरे!" यावर मात्र सगळे मंत्री दगडासारखे स्तब्ध झाले.

काझिरखिलपासून चार मैलांवर असणाऱ्या श्रीरामपूर या खेड्यात जाण्यासाठी गांधी निघाले तेव्हा ते म्हणाले: "I find myself in the midst of exaggeraiion and falsity. I am unable to discover the truth. Thers is terrible mutual distrust. The oldest friendships have anapped. Truth and Ahimsa by which I swear and which have to my knowledge sustained me for sixty years, seem to fail to show the attributes I have ascribed to them. To test them or better to test myself, I am going to a village called Shrirampur, cutting myself away from those who have been with me all these years and who have made life easy for me. I anm taking Prof. Nirmal Kumar Bose as my Bengalee teacher and interpreter and shri Parshuram who has been my devoted, self-less and silent stenographer....... In the meantime, both Pyarelal and I have decided to suspend all other activities in the shape of correspondence, including the heavy work of **Harijan** and the allied weeklies. I have asked Shri Kishorlal, Shri Kakashab, Shri Vinoba and Shri Narahari Parikh to eudit the weeklies jointly and severally. How long this suspence will last is more than I can say. I do not propose to leave Bengal till I am satisfied that mutual trust has been established between the two communities and the two have resumed the even tenor of their life in their villages. Without this there is neither Hindustan nor Pakistan, only slavery awaits India, torn asunder by mutual strife and engrosed in barbarity."

नोआखली व त्याच्या आसमंतात काम करीत असताना गांधींची मन:स्थिती आणि भोवतालची परिस्थिती कशी होती याची बरोबर कल्पना या त्यांच्या निवेदनावरून येते. २० नोव्हेंबर रोजी साडेअकरा वाजता गांधींनी आपला काझिरखिलचा मुक्काम हलविला आणि ते श्रीरामपूरला जाण्याला मचव्यातून निघाले. त्याच दिवशी संध्याकाळी सुमारे एक हजार माणसांसमोर त्यांनी सांगितले की, प्रत्येक खेड्यात एक हिंदू व एक मुस्लिम कार्यकर्ता एकजुटीने भयग्रस्त लोकांना समजावून सांगून त्यांची भीती घालवील.

२३ नोव्हेंबरला काँग्रेसची बैठक मीरत येथे झाली; पण गांधी तिकडे गेले नाहीत. कृपलानी यांनी गांधींना कमीपणा आणणारे असे सगळे आपण त्यांचे अनुयायी आहो अशा तऱ्हेचे भाषण केले. इकडे ७७ वर्षांचे गांधी दिवसाकाठी अठरा तास कामात गढून जात होते. ठिकठिकाणी त्यांनी असे सांगितले, आजमितीस जेवढा अंधार माझ्याभोवती दाटलेला मला अनुभवास येतो तसा पूर्वी कधीच आला नाही. अमिया चक्रवर्तीबरोबर भाषण करताना गांधी म्हणाले, लोकसंख्येची अदलाबदल करण्याची कल्पना अव्यवहार्य व केव्हाच विचारात घेण्यासारखी नाही. शांतता कमिटयांनी काम करण्यासाठी लोकांनी आपल्या घरादारांना चिकटून धैर्याने व शौर्याने राहिले पाहिजे.

२३ डिसेंबर रोजी त्यांनी सांगितले की, मी नोआखलीतून निघून जावे, कारण माझ्यामुळे हिंदु-मुसलमानांत सलोख्याचे संबंध प्रस्थापित होण्याला अडथळा होतो, कारण माझा हेतू बंगालमधील मुस्लिम लीगच्या मंत्रिमंडळाला बदनाम करण्याचा आहे. पण माझा असा हेतू अथवा यत्न असा असणे कदापि शक्य नाही हे या पत्रलेखकांना समजावयास पाहिजे. आपले रक्षण आपण स्वावलंबनानेच करू शकतो, दुसऱ्यावर अवलंबून नव्हे, हे सर्वांनी समजले पाहिजे. ३१ डिसेंबर रोजी नेहरू व कृपलानी घटनाविषयक काही सल्ला घेण्याकरिता येऊन गेले, असा उल्लेख गांधींनी आपल्या प्रार्थनासभेत केला. घटना परिषदेची कल्पना काँग्रेसने कधीही सोडून देण्यासारखी नाही, असे त्यांनी सांगितले. तिची योजना साऱ्या हिंदुस्तानसाठी आहे असे त्यांनी नेहरू व कृपलानी यांना सांगितले. श्रीरामपूरचा निरोप घेताना नेहरू म्हणाले, " It is always a pleasure and inspiration to meet this young man of seventy-seven. We always feel a little younger and stronger after meeting him and the burdens we carry seem a little lighter. "

१ जानेवारी १९४७ हा श्रीरामपुरातील सहा आठवडयांच्या गांधींच्या मुक्कामाचा शेवटचा दिवस होता. प्रत्येक दिवशी एक खेडे घेऊन तेथील लोकांशी बोलणे-चालणे करून त्यांना धीर द्यावयाचा, स्वावलंबी व्हावयाला सांगायचे, हिंदु-मुसलमान हे माणसांतील कृत्रिम भेद आहेत, परमेश्वराची सर्वच लेकरे आहेत आणि त्यांनी गुण्यागोविंदाने, एकमेकांच्या सुखःदुःखांशी समरस होऊन सहानुभूतीने वागण्यातच सर्वांचे समान कल्याण आहे, अशा गोष्टी सांगत. आपले दक्षिण आफ्रिकेतील व येथील अनुभव प्रसंगानुरूप त्यांना कथन करीत. अशा रीतीने चंदिगड, काजीबाजार, चागीरगाव, मासिमपूर, दासपारा, लामचार, कारपारा, शाहापूर, नारायणपूर, दासघारिया, पारकोटे, अटकहोरा, शिरांडी,

डाल्टो, मुराईम, हिरापूर, बाणसा, चारसिल, आमकी, नवग्राम, आमिशपारा, सतघारिया, साधुरखिल अशी कित्येक खेडी त्यांनी घेतली. २ जानेवारीला सुरू झालेला हा दौरा ५ फेब्रुवारीपर्यंत चालला होता. त्या दिवशी नोआखलीच्या दौऱ्याचा दुसरा टप्पा सुरू झाला. साधुरखिल छावणीतून सकाळी बरोबर ७-३० वाजता ते निघाले, २८ दिवस ते सारखे चालत होते. फक्त याच गावी ते दोन दिवस व दोन रात्री राहिले. सरदार पटेल यांना लिहिलेल्या एका पत्रात गांधींनी लिहिले,

"I take the Cabinet Mission statement to mean that there is nothing to fear even if the princes do not join the Constituent Assembly. Nothing is lost even if they do not interpret it in the same way. And, if they do, it will show them a better light and we shall be able to walk directly. It is as clear as daylight to me that there is no need to experience shortages in food and cloth. It is another matter if I cannot convience others about it. In such a position, it does not make much difference whether I come there or I do not. My place is here only. I am satisfied with what I can do here. I believe that I bring some happiness to the people here and I may be able to do more if I continue to function. But that is in the hands of Providence."

६ फेब्रुवारीला ते धरमपूर या मुसलमानांची बहुसंख्य वस्ती असलेल्या गावी पोचले. आरोग्यविषयक नियमांचे उल्लंघन येथे त्यांच्या विशेषप्रकारे नजरेस आले. ७ फेब्रुवारी रोजी ते प्रसादपूरला गेले. तेथे आपल्या स्वतःच्या पोटापुरते मिळविण्याकरिता प्रत्येक मनुष्याने शारीरिक श्रम केलेच पाहिजेत, असे सांगितले. विजयनगरहून ते गोपीनाथपुरास जात होते. पण त्यांना किती अंतर तोडावे लागेल याचा बरोबर अंदाज आमंत्रण करणारांनी न दिल्यामुळे अखेर ते तेथे गेले नाहीत. नंतर हेमचंदी, केरोआ, काफीलतारी, पूर्व केरोआ, रायपूर, देवीपूर, टिपेरा, चारदुखिया, चारलारुआ, चांदपूर, कृष्णपूर, चारसोलाडी, हैमचार इतक्या खेड्यांना फेब्रुवारीअखेरपर्यंत भेटी देऊन तेथील दुःखितांच्या व पीडितांच्या यातनांवर फुंकर घालण्याचा व मलमपट्टी लावण्याचा निकराचा यत्न गांधींनी केला. शारीरिक यातना दूर झाल्याच पाहिजेत; पण त्यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे, त्यांचे नैतिक धैर्य टिकवून धरणे आणि त्याच्या जोरावर भंगलेली हिंदु-मुसलमानांची मने सांधून त्यांच्यात शेजारधर्म आणि बंधुभाव उत्पन्न करून तो कायम राहावा यासाठी झटणे अधिक महत्त्वाचे होते. यामुळे त्यांची प्रवचने व संभाषणे यांचा रोख त्यावर असे. सात

आठवड्यांच्या या दौऱ्यात त्यांनी ११६ मैलांची चाल केली आणि ४७ खेड्यांना भेटी दिल्या. चांदपूरला ते बिहारला जाण्यासाठी २ मार्च रोजी आले. ५ मार्च रोजी ते पटणा येथे आले. ६ मार्च रोजी होळीचा सण पडत होता आणि त्यावेळी मुसलमानांना भय वाटत होते की, आपणांवर हिंदूंचे पुन: हल्ले होतील. आपल्या प्रार्थनासभेत त्यांनी स्पष्ट केले की, हिंदूंना आपल्या दुराचरणाबद्दल झालेला अनुताप तोंडदेखला नसावा. त्यांची अंत:करणे पुनीत झाली पाहिजेत. १२ तारखेला त्यांनी पटणा सोडले व ते कुमारहर येथे गेले. तेथे एका मुसलमान कुटुंबाची पुरती लूटमार झाली होती. पुस्तके, सामानसुमान नष्ट करण्यात आले होते आणि शेजारच्या एका मशिदीलाही उद्‌ध्वस्त केले होते. मी बिहारला आलो आहे ते लोकांनी केवढा माथेफिरूपणा केला आहे ते त्यांच्या ध्यानात आणून देण्यासाठी व त्यांनी पश्चात्तापाने आपले पाप धुऊन काढावे म्हणून, असे ते म्हणाले. सबंध मार्च महिना बिहारमध्ये सर्वत्र हिंडून हा एकच प्रचार त्यांनी केला आणि १ एप्रिलला दिल्लीस पुराणा किल्ल्यात भरलेल्या एशियन रिलेशन्स परिषदेला हजर राहण्यास गेले. तेथे त्यांनी १ व २ एप्रिल रोजी भाषणे केली व प्रश्नांची उत्तरे दिली. सारी दुनिया एकच आहे, या तत्त्वावरील आपला विश्वास त्यांनी जाहीर केला. "सगळी दुनिया म्हणजे सगळी मानवजाती एकच असे जर जर नसेल तर अशा दुनियेत राहाण्याला मला मुळीच आवडणार नाही. खरोखर, माझे हे स्वप्न मला माझ्या आयुष्यातच खरे ठरेल तर मला फारच आनंद होईल," असे त्यांना विचारण्यात आलेल्या एका प्रश्नाचे उत्तर त्यांनी दिले. एशियन रिलेशन्सचे दिल्लीमधील काम आटोपल्यावर ते पुन: अर्धवट सोडलेल्या बिहारच्या दौऱ्यावर तो पूर्ण करण्यासाठी निघून गेले. पण दिल्लीस असतानाच व्हाइसरॉय माऊंटबॅटन यांच्या विनंतीवरून गांधी व जीना यांच्या सह्यांवर निघालेल्या निवेदनावर स्वाक्षरी केली. नेहरू व काँग्रेसच्या कार्यकारिणीचे सभासद यांची त्याला मान्यता होती. त्या निवेदनाची संहिता अशी होती:

"We deeply deplore the recent acts of lawlessness and violence that have brought the utmost disgrace on the fair, name of India and the greatest misery to innocent people irrespective of who were the aggressors and who were the victims. We denounce for all time the use of force to achieve political ends and we call upon all the communities of India, to whatever persuasion they may belong, not only to refrain from all acts of violence and disorder; but also to aovoid both in speech and in writing any words which might be construed as an icnitement to such acts."

गांधीजी, जीना व व्हाइसरॉय या सर्वांनी असे आवाहन केल्यावरही पंजाबात, सरहद्द प्रांतात आणि इतरत्र हिंसाचार चालूच होते. याबद्दल १ मे रोजी आपल्या प्रार्थनासभेत दिल्लीस भाषण करताना गांधी म्हणाले, " या संयुक्त आवाहनाला अवश्य तो प्रतिसाद मिळाला नाही यात जीनासाहेब व व्हाइसरॉय या दोघांच्याही नावाला काळिमा लागत आहे. जीनांना असे म्हणता येईल की माझ्या म्हणण्याकडे माझे अनुयायी दुर्लक्ष करतात, पण असे म्हणणे म्हणजे आपल्या पायाखालची जमीनच कापून टाकण्यासारखे आहे. कारण बहुसंख्य मुसलमानांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अखिल भारतीय मुस्लिम लीगचे ते अध्यक्ष आहेत. पाकिस्तान या एका शब्दात आपले राजकीय उद्दिष्ट समाविष्ट झालेले आहे असे मानणाऱ्या मुसलमानांनी जर अत्याचार व हिंसक कृत्ये केली तर मुस्लिम लीगचा अधिकार व दबदबा गेला कोठे ? ब्रिटिश सरकार जबरदस्तीपुढे लोटांगण घालणार आहे, का बौद्धिक युक्तिवादाच्या सामर्थ्यापुढे ?" जेव्हा हे संयुक्त आवाहन करण्यात आले तेव्हाच गांधींनी ते काढण्याच्या शहाणपणाबद्दल शंका व्यक्त केली होती. ज्या शब्दांत हे आवाहन जीनासाहेबांनी लिहिले त्या शब्दांचा पुरा अर्थ सर्व सह्या करणारांना नीट व सारखा समजला होता का नाही ? व्हाइसरॉयना मी विचारतो की आता ते स्तब्ध का आहेत? मला अथवा जीनांना ते याबद्दल जाब का विचारीत नाहीत ? आणि ब्रिटिशांना जर हिंदू व मुसलमानांना शांततेत राहू देणे शक्य होत नसेल तर आपण निघून त्यांना आपली भांडणे सोडविण्याला, थांबविण्याला अथवा लढून निकाल लावण्याला मोकळे का सोडीत नाहीत ? अशा प्रकारचे विचार गांधींनी या प्रार्थनासभेत स्पष्टपण बोलून दाखविले.

४ मे रोजी प्रार्थनासभेत केलेल्या भाषणात गांधी म्हणाले, " व्हाइसरॉयसाहेबांशी माझे दीड तास संभाषण झाले. ते म्हणाले हिंदी लोकांच्या हाती पूर्ण राजकीय सत्ता देण्याकरिता मला येथे पाठविण्यात आले आहे. आणि ३० जून १९४८ पूर्वी ब्रिटिश सत्ता–वर्चस्वाच्या सर्व खाणाखुणा येथून पुसून टाकल्या जातील. माझी अशी मनापासून इच्छा आहे की हिन्दुस्तानात ऐक्य नांदावे व सर्वांनी एकमेकांबरोबर सुखासमाधानाने राहावे. येथून जाण्यापूर्वी हिंदू व मुसलमानांत ऐक्य प्रस्थापित व्हावे अशी ब्रिटिशांची इच्छा आहे. जातीय बखेडा चालूच राहिला तर ब्रिटन अथवा हिन्दुस्तान कोणालाच ते भूषणावह नाही. व्हाइसरॉय हे एक प्रसिद्ध आरमारी अधिकारी आहेत आणि ते काही अहिंसावादी नाहीत, पण ईश्वराला ते मानतात आणि सदसद्विवेकबुद्धीला प्रमाण मानून वागतात. म्हणून त्यांच्या कामात कोणी विघ्ने आणू

नयेत अशी त्यांची सर्वांना विनंती आहे. सर्व प्रयास करून भांडण थांबणार नसेल, तर मोठ्या नाखुषीने लष्करी शक्तीचा उपयोग करण्याला ते डगमगणार नाहीत. कायदा व सुव्यवस्था टिकविण्याची जबाबदारी जरी हंगामी सरकारची असली, तरी जोपर्यंत हिंदुस्तानच्या भूमीवर ब्रिटिश सैनिक आहेत तोपर्यंत अगदी अखेरीस शांतता टिकविण्याची त्यांची जबाबदारी तेवढीच आहे. व्हाइसरॉयसाहेब अतिशय सभ्यतेने व संयमपूर्वक बोलले आणि सर्व संबंधित जर त्यांचा प्रामाणिकपणा आणि कळकळ ओळखून त्यांच्याशी सहकार्य करतील तर त्यांचे कठीण काम सोपे होईल. अखेर सगळ्यांचे उद्दिष्ट एकच असल्यामुळे हे शक्य व्हावे." शक्य तितक्या व्हाइसरॉयनी वापरलेल्या शब्दांचा उपयोग करून त्या दोघांमधील संभाषणाचा गोषवारा अशा रीतीने गांधींनी सांगितला.

नंतर ७ मे रोजी गांधी कलकत्त्याला जाण्यास निघाले. वाटेत, गाडीतच त्यांनी लॉर्ड माऊंटबॅटन यांना एक ११ कलमी पत्र लिहिले. त्यातील पहिल्या कलमात असे निक्षून सांगितले होते की, हिंदुस्तानची फाळणी करण्याच्या कामी हातभार लावण्यात ब्रिटनची फार मोठी चूक होईल. (२) तात्पुरते सरकार बनविणेच असेल तर ते एक काँग्रेसचे तरी असावे अथवा लीगचे असावे. मिश्र असू नये. (३) सरहद्द प्रांतात सद्यःस्थितीत सार्वमत घेऊ नये. फाळणी करण्याचे ठरले तरच या कलमाचा उपयोग करण्याची वेळ येईल. (४) बंगाल व पंजाब यांची फाळणी साफ चुकीची ठरेल आणि मुस्लिम लीगला उगाच चिडविल्याप्रमाणे होईल. (५) आरमारी कामात संपादन केलेली एकचित्तता आणि साफ दृष्टी येथे फारच मोठ्या प्रमाणात तुमच्या कामात वापरावी लागेल. (६) तुमच्या मागे यथे बजबजपुरी माजायला नको असेल तर अखिल हिंदुस्तानचा कारभार एकाच पक्षाकडे सोपवावा लागेल. यात देशी संस्थानांचाही अंतर्भाव आहे. (७) पंजाब व बंगाल यांची फाळणी करू नये. याचा अर्थ त्यांची हयगय करावी असा नाही. प्रांतिक सरकारांना हे नीट जमले नाही तर गव्हर्नरांनी हस्तक्षेप करावा. (८) ब्रिटिशांचे एकूण एक अधिकार सत्तांतराने ज्या पक्षाकडे सत्ता जाईल त्याच्याकडे असले पाहिजेत. (९) सर्व सिव्हिल सर्विसच्या सदस्यांनी नोकरांची पायरी सांभाळूनच वागले पाहिजे. (१०) जीनांबरोबर पाऊण तास माझा सुखसंवाद झाला. हिंसाचार कोठेही न होऊ देण्यावर ते ठाम होते. (११) फाळणी व पाकिस्तान यावरही आम्ही चर्चा केली. पण पाकिस्तान झालेच पाहिजे, त्यावर चर्चा नको या मुद्यावर ते खंबीर होते. काही गोष्टी वेळेच्या अभावी पुरत्या बोलून झाल्या नाहीत. पण मी काय बोललो याबद्दल सारांशरूपाने टिपण तुमच्याजवळ असावे म्हणून हे पत्र पाठविले आहे, असे गांधींनी लिहिले.

यानंतर जून महिन्याची पहिली तारीख उगवेपर्यंत गांधीजी दरसंध्याकाळी बिहार, बंगाल, व सिंध प्रांतात लोकांसमोर फक्त तेथे हिंदु-मुसलमानांतील बिघडलेले संबंध आणि वैमनस्याची भावना याच विषयाच्या निरनिराळ्या अंगोपांगाबद्दल बोलत राहिले आणि गांधी-जीना संयुक्त निवेदनाचा उपयोग हिंसाचार व अत्याचार यांचा बीमोड व्हावा म्हणून प्रचारकार्य करीत राहिले. जूनच्या १ तारखेला घड्याळाचे काटे पाहण्यात काही चूक झाल्यामुळे ते नेहमीच्या वेळेच्या अगोदर उठले. प्रार्थनेला अजून अर्धा तास अवकाश होता. म्हणून तसेच पडून राहिले, तेव्हा आत्मगत आणि अस्फुट आवाजात पुढील-प्रमाणे बोलले: "माझ्या सर्व प्रयासांचा निर्मळपणा खरोखर आता कसोटीला लागणार आहे. आज मी अगदी एकाकी पडलो आहे. सरदार पटेल आणि जवाहरलाल नेहरू यांना देखील वाटते की राजकीय परिस्थितीचे माझे आकलन चुकीचे आहे आणि देशाची फाळणी जर झाली तर शांततेची स्थापना होईल. व्हाइसरॉयना मी सांगितले की फाळणी होणारच असली तरी ती ब्रिटिशांच्या मध्यस्थीने न होता अथवा ब्रिटिश अंमलाखाली होऊ नये. तथापि नेहरू-पटेलांना ते आवडले नाही. त्यांना वाटले, वार्धक्यामुळे माझी समजशक्ती ऱ्हास पावत असावी. तथापि मला जे वाटते ते मी बोलून दाखविले पाहिजे. कारण मी काँग्रेसचा आणि ब्रिटिश लोकांचा निष्ठावंत मित्र म्हणवितो. माझा सल्ला त्यांना पटो अथवा न पटो. मला अगदी उघड दिसते की, हा प्रश्न आपण अगदी चुकीच्या मार्गाने सोडवू पाहात आहो. त्याचा सगळा परिणाम आपल्याला ताबडतोब दिसणार नाही कदाचित, परंतु मला स्वच्छ दिसते की, ही किंमत देऊन मिळविलेल्या स्वातंत्र्याचा भविष्यकाळ हा अंधकारमय होणार आहे. माझी अशी प्रार्थना आहे, की ईश्वराने मला त्याचा साक्षीदार होण्याला जिवंत ठेवू नये. सगळीकडून विरोध होत असताही खंबीर व ठाम राहाण्याचे सामर्थ्य व शहाणपणा मला द्यावा अशी माझी ईश्वराला प्रार्थना आहे आणि पूर्ण सत्य उच्चारण्याकरिता पावित्र्याने जे सामर्थ्य मिळते त्याची मला गरज आहे. माझ्या विचारविश्वात मी जरी एकटाच असलो तरी मला एक अनिर्वचनीय आंतर आनंद वाटत आहे आणि मनाला ताजेतवानेपणा अनुभवास येत आहे. मला असे वाटते, की ईश्वरच मला माझ्या मार्गावर प्रकाश पाडीत आहे. आणि त्यामुळेच कदाचित् एकट्याने लढत राहाण्याला मला बळ येत आहे. लोक मला काशीला अथवा हिमालयात जाण्याला सांगत आहेत. मला त्याबद्दल हसू येते. आणि मी त्यांना सांगतो, की जेथे दुःख कमी करायचे आहे व जुलुमापासून सुटका करायची आहे तेथेच माझ्या तपश्चर्येचा हिमालय आहे. जीवनावश्यक गोष्टींचा तुटवडा असलेला एक माणूस जोपर्यंत

हिंदुस्तानात आहे तोपर्यंत मी विश्रांती घेऊ शकत नाही. बादशाहखानांचे दु:ख मला पाहवत नाही. त्यांच्या अंतस्थ यातना पाहून माझ्या हृदयाला पीळ पडतो. पण मी जर अश्रुपात केला तर तो भेकडपणा होईल आणि तो शूर पठाण कोलमडून पडेल. म्हणून अविचलित मनान माझे काम मी करत राहाणार आणि ही काही लहानसान गोष्ट नाही."

नंतर थोडा वेळ थांबून गांधी पुढे म्हणाले: "कदाचित असे असेलही की त्या सर्वांचे म्हणणे बरोबर आहे आणि मीच अंधारात चाचपडत आहे. कदाचित ते दृश्य पाहण्याला मी जिवंत असणार नाही, पण ज्या संकटाचे मला भय वाटते ते या देशावर कोसळलेच आणि त्याचे स्वातंत्र्य धोक्यात आले तर भावी पिढ्यांना समजू दे की या म्हाताऱ्याच्या मनात हे सगळे विचार येऊन गेले होते. गांधी हिन्दुस्तानच्या जिवंतपणीच्या विच्छेदात भागीदार होता असे म्हणण्याला मी जागा ठेवणार नाही. पण आज स्वातंत्र्यासाठी सर्वजण अधीर झाले आहेत. तेव्हा आता काही इलाज राहिलेला नाही. स्वातंत्र्य आणि देशाची फाळणी यांची मिसळण म्हणजे एका गुजराती दृष्टांताचा उपयोग करायचा तर ती लाकडाच्या भुशाची भाकरी आहे. काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी जर ती खाल्ली तर त्यांना पोटदुखी होईल, पण न खाल्ली तर त्यांना उपाशी राहावे लागेल."

१ जून, १९४७ ला व्हाइसरॉय लॉर्ड माऊंटबॅटन दिल्लीस परत आल्यावर त्यांनी आपल्या पोतडीत काय आणिले आहे याबद्दल तर्कवितर्क सुरू झाले. पण ३ जून रोजी त्यांनी, नेहरू, जीना आणि बलदेवसिंग यांनी रेडिओवर केलेल्या भाषणांमुळे सगळा उलगडा झाला. त्या सर्वांनाच हिंदुस्तानची चिरफाड नको होती; पण सतत त्याचा रक्तपात होत राहाणेही त्यांना रुचत नव्हते. म्हणून एकदाच सर्जनच्या सुरीने काय ते होऊन जाऊ द्या, असे त्यांना व लोकांना वाटले. ब्रिटिश सरकारच्या प्रस्तावात पाकिस्तानची निर्मिती व्हावी अशी सवड मुसलमानांची तशी मागणी असेल तर या अटीवर योजना होती. बंगाल व पंजाब या प्रांतांची विभागणी करण्याचीही सवड होती. सिल्हेट जिल्ह्याची भवितव्यता आसामात अथवा पूर्व बंगालात सार्वमताने ठरणार होती. गांधींनी ४ जूनला केलेल्या आपल्या प्रार्थनासभेतील भाषणात लॉर्ड माऊंटबॅटन यांना काही दोष दिला नाही. काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्या मागणीचेच फलित म्हणजे हिन्दुस्तानची फाळणी होती. व्हाइसरॉयनी उघडपणे सांगितले की हिंदुस्तान मला ब्रिटिश अंमलात होता तसाच तो पुढे राहावा असे वाटत होते, पण काँग्रेसनेच मुस्लिम लीगची भूमिका नाखुषीने का होईना, पण मान्य केल्यावर त्यांचा नाईलाज झाला. ६ जून रोजी व्हाइसरॉयची भेट घेऊन परत आल्यावर

गांधींनी प्रार्थनासभा घेतली, त्यावेळी ते म्हणाले, १५ ऑगस्टपूर्वीच जून १९४८ मध्येच सत्तात्याग करण्याची त्यांची इच्छा होती, पण आता १५ ऑगस्ट ही नक्की तारीख ठरली आहे. सरहद्द प्रांताच्या भवितव्याबद्दल गांधींचे व काँग्रेसच्या कार्यकारिणीचे मतभेद झाले. सरदार पटेल यांजबरोबर ६ जून रोजी त्यांचे बोलणे झाल्यावर दुसऱ्या दिवशी त्यांनी नेहरूंना लिहिले: " The oftener we meet the more convinced I am that the gulf between us is deeper than I had feared. If Jinnah does not go to the Frontier and does not woo Badshah Khan, his brother and his other colleagues, the Frontier ministry should resign and so also the Parliamentary majority on the sole ground that a referendum at this moment must lead to bloodshed which they should avoid in so far as it is humanly possible... you think that refrendum should take place now....... I had told Badshah Khan that if I do not carry you with me, I shall retire atleast from the Frontier consultation and let you guide him. After all, was it not you that brought him to me ?"

हे सर्व कसेही असले तरी कार्यकारिणीच्या सर्व निर्णयांचे परिपालन लोकांनी काटेकोरपणे केले पाहिजे, असेच गांधींचे म्हणणे होते आणि ७ जूनच्या प्रार्थनासभेत त्यांनी तसेच आपले मत मांडले. सोशालिस्ट आणि कम्युनिस्ट मुखंडांची तर त्यांनी कडकपणे बोळवण केली. फक्त दोष व उणीवा दाखविण्याची भूमिका घेऊ नका व पक्षैकदृष्टीने पाहू नका. देशाचे सामुदायिक हित लक्षात घ्या, असे त्यांनी सोशालिस्ट व कम्युनिस्टांना निक्षून सांगितले. सत्याग्रहाची भाषा तर त्यांच्या तोंडी मुळीच शोभत नाही, असे गांधी म्हणाले. ९ जूनच्या सभेत नवी ब्रिटिश योजना काँग्रेसने स्वीकारली त्याला आपण पाठिंबा का देतो याचे विवेचन केले. १० जूनला तोच विषय पुढे चालविला. विसंगत घोषणा, आज एक, उद्या दुसरी असा आरोप त्यांजवर झाला त्यालाही उत्तर दिले. पूर्वी मी लोकमत बोलून दाखवीत होतो. आता लोकमतच निराळे झाले आहे आणि ते पटेल-नेहरूंच्या बाजूला आहे, आणि त्याला मी मान देत आहे, असे आपले समर्थन गांधींनी केले. मला स्वच्छ दिसत आहे की हिंदुस्तानची फाळणी आता अटळ आहे.

१४ व १५ जून रोजी अखिल भारतीय काँग्रेसची सभा दिल्लीस झाली. तेथे बोलताना गांधी म्हणाले, "एक काळ असा होता, की जेव्हा देशी संस्थानांबाबत आपण काहीच करू नये असे मी म्हणत असे, तेव्हा तिसऱ्या एका सत्तेशी चाललेल्या लढ्यात आपण गुंतलेले होतो. आता काळ बदलला

आहे. हिंदुस्तान आता स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर उभा आहे. हैदराबाद आणि त्रावणकोर यांसारखी संस्थाने स्वतंत्र राज्ये होण्याच्या वल्गना करीत आहेत. त्या फुकट आहेत. बहुतेक संस्थानांनी घटना परिषदेत येण्याला मान्यता दिली आहे याबद्दल त्यांचे मी अभिनंदन करतो. हे संस्थानिक जर मनापासून येत असतील तर सेवक आणि विश्वस्त म्हणून ते सुखरूप राहातील. काळाबरोबर पावले त्यांनी उचलावयास हवीतच. जे संस्थानिक ब्रिटिशांचे केवळ गुलाम होते त्यांनी इंडियन युनियनमध्ये सन्मानाने न येता स्वतंत्र राहाण्याची इच्छा धरावी ही मोठी नवलाची बाब आहे. इंडियन युनियन ही काही संस्थानिकांची शत्रू नाही. पण आता सरकारी राज्यकारभाराची सूत्रे हाती आल्यावर त्यांनी अखिल हिंदुस्तानच्या लोकांच्या हिताच्या दृष्टीनेच कारभार चालविला पाहिजे. संस्थानिकांचे प्रजाजन हे खालसा मुलुखातील प्रजाजनांबरोबरच आहेत. मला हिंदुस्तानची नाडी बरोबर समजते आणि म्हणून मी म्हणतो, की हैदराबाद-त्रावणकोर यांचे चाळे खपवून घेतले जाणार नाहीत."

काँग्रेसने केलेल्या ठरावात म्हटले की, "The AICC cannot admit the right of any state in India to declare its independence and to live in isolation from the rest of India. That would be a denial of the course of Indian history and of the objectives of the Indian people today. The AICC trusts that the rualrs of the states will appreciate fully the situation as it exists today and will in full cooperate with their people, enter as democratic units in the union, thereby serving the cause of their own people and India as a whole."

पंडित पंत यांनी ठराव मांडला व अबुल कलाम आजाद यांनी त्याला पाठिंबा दिला. कॅबिनेट मिशनच्या योजनेपेक्षा स्वातंत्र्य व फाळणी ही योजना अधिक चांगली आहे असे मत पंडित पंत यांनी प्रकट केले. आजाद यांनी उलट मत प्रकट केले. पण हा सगळा प्रश्न लवकर संपविला पाहिजे म्हणून त्यांनी दुजोरा दिला. पण हिंदुस्तानची फाळणी करणे आणि एखाद्या नदीच्या वाहत्या पाण्याची फाळणी काठीने करू पाहणे सारखेच आहे, असे ते म्हणाले. मुस्लिम लीगच्या हट्टीपणाला दाखविलेला हा नैवेद्य आहे असे आजादांचे मत होते. गांधी देखील या ठरावावर बोलले. ते म्हणाले की, काँग्रेस पाकिस्तानला कधीच अनुकूल नव्हती आणि मी तर सतत त्याच्याविरुद्ध बोलत आलो. पण मी आता ए. आय. सी. सी. च्या ठरावाला पाठिंबा देऊन हिंदुस्तानच्या फाळणीला संमती देत आहे. केव्हा केव्हा आपणाला अतिशय नापसंत असणारे निर्णय आपल्याला करावे लागतात, असे ते म्हणाले. १५ जून रोजी हा ठराव

१५७ विरुद्ध १५ मतांनी पास झाला. काही सभासदांनी मत दिलेच नाही. हिंदी लोकांच्या हाती सत्ता सुपूर्द करण्याच्या ब्रिटिश सरकारच्या निर्णयाचे स्वागत करण्यासाठी अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीने मंजूर केलेला ठराव पुढीलप्रमाणे आहे:
" The Congress accepted the British Cabinet Mission statement of the 16th May, 1946, as well as the subsequent interpretation thereof dated December 6, 1946 and has been acting in accordance with it in the Constituent Assembly, which was constituted in terms of the Cabinet Mission plan. That assembly has been functioning for over six months and has not only declared its objectives to be the establishment of an independent Sovereign Republic of India and a just social and economic order, but has also made considerable progress. The Constitution is for the free Indian union on the basis of fundamental rights guaranteeing freedom and equality of opporutnity to all Indians.

" In view, however, of the refsual of the Muslium League to accept the plan of the 16th May and to particiapate in the Constituent Assembly and further in view of the policy of the Congress that if cannot think in terms of compelling the people in any territorial unit to remain in an Indian union, against their declared and established will, the AICC accepts the proposals embodied in the announcement of June 3, which have laid down a procedure for ascertaining the will of the people concerned.

" The Congress has consistently upheld that the unity of India must be maintained. And ever since its inception, more than sixty years ago, the National Congress has laboured for the realisation of a free and united India , and millions of our people have suffered in this great cause. Not only the labours and sacrifices of the past two generations but the long course of India's history and tradition bear witness to this essential unity. Geography and the mountains and the seas fashioned India as she is and no human agency can change that shape or come in the way of her final destiny. Economic circumstances and the insistent demands of the international affairs make the unity of India, still more necessary. The picture of India we have learnt to cherish will remain in our minds and

hearts. The AICC earnestly trusts that when present passions have subsided, India's problems will be viewed in their proper perspective and the false doctrine of two nations in India will be discredited and discarded by all.

" The proposels of June 3, 1947 are likely to lead to the secession of some parts of the country from India. However, much this may be regretted, the AICC accepts this possibility, in the circumstances now prevoiling.

" Allthough freedom is now at hand, the times are difficult and the situation in India demands vigilance and united front of all those who care for independence of India. At this time of crisis and change; when unpartriotic and anti-social forces are trying to injure the cause of India and her people, the AICC appeals to and demands of every Congreessman and the people to forget petty differences and disputes and to stand by vigilant, disciplined and prepared to serve the cause of India's freedom and defend it with all their strength from all who may seek to do it injury. "

यानंतर झालेल्या प्रार्थनासभेत त्यांना विचारलेल्या प्रश्नांपैकी एक प्रश्न असा होता : हिंदुस्तान चुकीच्या दिशेने जात आहे अशी जर तुमची खात्री आहे तर चुकीच्या मार्गाने जाणाऱ्यांबरोबर तुम्ही साहचर्य कसे ठेविता ? तुम्ही एकटे तुमच्या रस्त्याने जाऊन तुमचे बरोबर असेल तर तुमचे सहचर तुम्हांला शोधीत तुमच्याकडे आपोआप येतील असा विश्वास तुम्ही कां बाळगीत नाही ?

"असा प्रश्न विचारला जाणे अगदी न्याय्य आहे असे मी मान्य करतो आणि मला त्याविरुद्ध काही युक्तिवाद करता येणार नाही. मी एवढेच म्हणतो की, माझी श्रद्धा अगदी दृढ आहे, पण माझे तंत्र चुकीचे असेल, तरीही मजविषयी निष्कर्ष काढताना कोणीही इतकी घाई करू नये," असे उत्तर गांधींनी दिले.

वर्तमानपत्रात अशी एक बातमी आली की, फाळणी समितीच्या कॉंग्रेस व लीगच्या सभासदांनी व्हाइसरॉयसमोर कबूल केले की फाळणी बंधुभावनेने अंमलात आणली जाईल. यावर गांधींनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली ती अशी की, मधुर आश्वासनांनी भुकेल्या माणसाचे, पोट भरत नाही. पण त्याला वेळेवर कोरड्या भाकरीचा चतकोर मिळाला तरी पुरेसा होतो.

१८ जून रोजी गांधी व गफारखान जीनांना व्हाइसरॉयच्या घरी भेटले. नंतर गफारखान जीनांना त्यांच्या घरी भेटले. सरहद्द प्रांतात रक्तपात टाळण्यासाठी गफारखान आपला जीव आटवीत होते. पठाणीस्तान या नावाने सरहद्द प्रांताचे स्वतंत्र राज्य व्हावे अशी एक मजबूत चळवळ चालू आहे. ती जर हिंदुस्तान-विरोधी असेल तर धोकादायक आहे, पण ती जर पठाणांचे जीवन, संस्कृती व पुश्तु भाषा यांच्या रक्षणार्थ असेल तर स्वागतार्ह आहे, असे आपल्या प्रार्थनासभेत गांधी म्हणाले. सरहद्द प्रांतात काँग्रेसचेच वर्चस्व व बहुमत आणि मंत्रिमंडळ आहे आणि घटनापरिषदेत त्या प्रांताचे प्रतिनिधी आहेत, पण आता या प्रांतासमोर नाजुक प्रश्न उभा ठाकला आहे. तेथे सार्वमत घेण्यात येणार आहे. काँग्रेस व लीग यांनी त्याला कबुली दिली आहे. पाकिस्तान का हिंदुस्तान हा प्रश्न पठाणांनीच सोडवला पाहिजे, मात्र सद्य:स्थितीत सार्वमत घेणे म्हणजे अधारात उडी घेण्यासारखे आहे, असे गांधी म्हणाले.

सरहद्द प्रांत व पंजाबमधून काही निर्वासित गांधींना भेटायला आले होते. त्यांच्या हालांच्या कहाण्या पहाडाला पाझर फोडणाऱ्या होत्या. २१ जून रोजी नेहरू-समवेत गांधी हरद्वारला गेले. तेथे असलेल्या ३२ हजार निर्वासितांशी बोलणे त्यांना शक्य झाले नाही. म्हणून दिल्लीस आल्यावर २३ जून रोजी, त्यांचा मौनदिन असल्यामुळे त्यांचा संदेश वाचून दाखविण्यात आला. "हिंदुस्तानची फाळणी आणि प्रांतांची जातवार फाळणी यामुळे आपली आता चांगलीच कसोटी पाहिली जाईल. हिंदुस्तानच्या फाळणीचा मोठा समारंभ लंडनला होणार आहे, असे वर्तमानपत्रात छापून येत आहे. पण एका राष्ट्राचे दोन तुकडे होणार यांत आनंदोत्सव करण्यासारखे काय आहे? आतापर्यंत आपण अशा श्रद्धेला चिकटून बसलो आहो की वेगळे झालो तर आपले मैत्र व बंधुत्व टिकून राहील. पण आता आमची दोन स्वतंत्र राष्ट्रे होणार असे वर्तमानपत्रांतील हकीकती सांगत आहेत. आणि त्याचा मोठा गाजावाजा करण्यात येत आहे. हा आमच्यावर अखेरचा तडाखा मारण्यात येत आहे काय? मी आशा करतो की, असे नसेल. पण काही असले तरी मोठा भागीदार म्हणून हिंदुस्तानने आपल्या वृत्तीत फरक पडू देऊ नये. आपल्या देशात या पुढेही राहाणाऱ्या मुसलमानांना परके न मानता आपले आप्त म्हणूनच आपण वागविले पाहिजे आणि जीनांचा द्विराष्ट सिद्धांत खोटा असल्याचे सिद्ध करीत राहिले पाहिजे."

४ जुलै १९४७ रोजी ब्रिटिश पार्लमेंटात इंडियन इंडिपेंडन्स बिल मांडण्यात आले. त्यात तरतूद केल्याप्रमाणे १५ ऑगस्ट १९४७ पासून इंडिया आणि पाकिस्तान असे दोन स्वतंत्र डोमिनिअन अस्तित्वात येणार होते. १५ ऑगस्टपासून ब्रिटिश सरकार ब्रिटिश हिंदुस्तानातील सर्व

मुलुखाचा राज्यकारभार आणि या दोन डोमिनिअन प्रदेशांवरील नियंत्रण याबद्दलची जबाबदारी सोडून देणार असे ठरले. त्याच वेळी देशी संस्थानांवरील सार्वभौम सत्ताही ब्रिटिश सरकार सोडून देणार होते.

५ जुलै रोजी आपले प्रार्थनेच्या वेळचे भाषण गांधींनी याच विषयावर केले: "एक इंडियाऐवजी दोन इंडिया या बिलाने अस्तित्वात आणले ही गोष्टच मुळात अगदी वाईट आहे. दोघांचा दर्जा सारखा मानण्यात आला. मुस्लिम लीग आणि जीना यांनी आपले म्हणणे खरे करून दाखविले. कॅबिनेट मिशनचा पुकारा त्यांनी खोटा पाडला. काँग्रेस व शीख यांना या व्यवस्थेला संमती देण्याला त्यांनी भाग पाडले. जी गोष्ट मुळातच वाईट आहे ती सर्वांनी मान्य केली म्हणून काही चांगली ठरत नाही. जीनांना पाहिजे होते ते सगळे जसाचे तसे मिळाले नाही यात समाधान मानण्यासारखे काही नाही. त्यात स्वतंत्र, सार्वभौम राज्य पाहिज होते ते त्यांना शंभर टक्के मिळाले. इंडिया व पाकिस्तान यांचा दर्जा समान ठरला. ब्रिटिश आपली सगळी सत्ता सोडून देत होते हे अगदी खरे. पण हिंदुस्तानची फाळणी करण्याच्या कामी ते सामील झाले आणि विरोधी ध्येयवाद व हितसंबंध असलेले दोन सभासद ब्रिटिश कॉमनवेल्थसाठी मिळविले. यापुढे ही ग्रेट ब्रिटनची किंमत त्याच्या वागणुकीवरून ठरेल, गोड दिसणाऱ्या शब्दजालावरून नव्हे. देशी संस्थानिकांचे संबंध व स्थिती ही अगदीच असमाधानकारक राहिली. ब्रिटिश कॅबिनेट मिशनची नेमणूक केली तेव्हापासून आवश्यक ते धैर्य व खंबीरपणा दाखविलाच नाही. यापुढील होणाऱ्या सर्व परिणामांबद्दलचे दोषारोप टाळणे ब्रिटनला शक्य होणार नाही. सध्या जी संकटमय परिस्थिती निर्माण झाली आहे तिचे निराकरण प्रस्तुत बिलाने होत नाही. संस्थानिक व त्यांची प्रजा यांच्यामधील संबंध कसे राहावे याचा बिलाने काहीच खुलासा केला नाही. सरहद्द प्रांतात सार्वमत होणार आहे ते हिंसाचारापासून मुक्त असेल अशी आशा आहे. बादशाहखान व खुदा-ई-खिदमदगार अहिंसेला प्रतिज्ञाबद्धच आहेत. मुस्लिम लीगवालेही आता हा प्रश्न मुसलमानांचा आपसातील असल्यामुळे अहिंसाप्रवणच राहातील अशी आशा करण्यास हरकत नाही. पूर्ण स्वातंत्र्य मिळण्याचा क्षण जवळ आला असता सर्वत्र केवढा उत्साह दिसला पाहिजे, पण तसा तो नजरेस पडत नाही. याचे कारण देशाची फाळणी म्हणजे दोन विरोधी छावण्या झाल्या हेच आहे. आता समान संरक्षणव्यवस्था नाही. आता फौजेची देखील वाटणी व्हायची आहे. आता फौज आणि तिला लागणारा खर्च आणि तिच्यात वाढ या बाबतीतही इंडिया व पाकिस्तान यांच्यामध्ये स्पर्धा होणार काय? तसे झाले तर ते एकमेकांचो कत्तल करण्यासाठीच

का ? असे अनेक प्रश्नोपप्रश्न माझ्या मनात उठत आहेत. आणि इतकी वर्षे स्वातंत्र्यासाठी झटलो ते हा परिणाम पाहाण्यासाठी का ?" अशा प्रकारे आपल्या मनात दाटून येणारे विचार आपल्या प्रार्थनाप्रवचनात गांधींनी तीन दिवस सारखे प्रकट केले.

७ जुलैला त्यांचा संदेश सर्वांना वाचून दाखविण्यात आला. त्यांत त्यांनी म्हटले, "येऊ घातलेले स्वातंत्र्य उत्साह उत्पन्न करीत नाही. पण संकट सुद्धा वरप्रदान कसे होऊ शकेल हे मी दाखवू इच्छितो. कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांनी एकत्र बसावे आणि व्हाइसरॉयच्या मध्यस्थीशिवाय परस्परसंमत करार करावा, पाकिस्तान मोडून टाकावे, असे मी मुळीच सुचवीत नाही. ती आता चर्चेच्या अथवा वादाच्या पलीकडील ठाम गोष्ट ठरली. पण दहा उभयतांच्या प्रतिनिधींनी एकत्र बसावे आणि एकमताने ठराव झाल्याखेरीज उठायचे नाही असा निर्धार करावा. जे काय घडत आहे त्याबद्दल हिंदूंना काय अथवा मुसलमानांना काय, आनंद अथवा उत्साह नाही. हे मला रोज जे हिंदू-मुसलमान भेटायला येतात त्यांच्या विचारप्रदर्शनावरून म्हणतो. दुसरा एक पर्याय आहे. तो काही सोपा नाही. एका फौजेची आता दोन शकले होणार आहेत. आतापर्यंत शत्रूंशी लढण्याचा ध्येयवाद ज्यांच्यासमोर ठेवला गेला, त्यांचीच फाळणी झाल्याबरोबर त्यांनी एकमेकांशी शत्रुत्वाने वागावे काय ? मी अगदी नागव्या शब्दात परिस्थिती उघडी करून दाखवीत आहे. हे टाळण्याकरिता दोघांनी एकत्र बसून ही विचित्र अवस्था संपवावी हे सर्वतोपरी इष्ट नाही काय ?"

जीनांनी एक पत्रकार परिषद घेऊन तीमध्ये असे आश्वासन दिले की, पाकिस्तानात राहाणाऱ्या सर्व अल्पसंख्यांना धर्मस्वातंत्र्य, पूजास्वातंत्र्य, जीवितवित्ताची शाश्वती असेल याबद्दल खात्री बाळगावी. हे वाचून गांधींनी १३ जुलै रोजी आपल्या प्रार्थनाप्रवचनात सांगितले, "आपल्याला आनंद झाला. पण पुढारी एखादी गोष्ट अगदी प्रामाणिकपणे जरी बोलला तरी त्याचा सल्ला अंमलात येईलच असा काही भरंवसा बाळगता येत नाही. फाळणी होणार हे ठरल्यावर देखील खून, भोसकाभोसकी, लुटालूट, आगी लावणे वगैरे प्रकारच्या बातम्या अनेक ठिकाणांहून येत आहेत याचा अर्थ काय ? खुद्द सिंधमधून किती हिंदू निर्वासित जीवित असह्य झाल्यामुळे हिंदुस्तानात आले? १५ ऑगस्टपर्यंत सिंधी हिंदूंना संरक्षण देण्याची जबाबदारी आपल्यावर नाही असे जीनासाहेब मानतात काय ? ते तर आता पाकिस्तानचे गव्हर्नर-जनरल होणार आहेत."

माऊंटबॅटन यांनी दोनही फाळणी झालेल्या हिंदुस्तानच्या प्रदेशांचे गव्हर्नर जनरल व्हावे असे काँग्रेस व लीग यांनी ठरविले होते. पण जीनांनी तो बेत बदलला आणि माऊंटबॅटन फक्त हिन्दुस्तानचे गव्हर्नर जनरल झाले. काँग्रेसला दिलेला शब्द मोडावयाचा नव्हता. गांधींचे लक्ष आता दिल्लीस लागत नव्हते. नोआखली व बिहारकडे जाण्याची उत्कंठा त्यांना लागली होती, कारण तेथून समजणाऱ्या हकीकती त्यांना अस्वस्थ करीत होत्या. त्याप्रमाणे दिल्ली सोडण्याची इच्छा त्यांनी सरदार पटेल यांजकडे पत्र लिहून कळविली. 'हरिजन' पण आता बंद करावा असे त्यांना वाटू लागले, कारण उलटे मार्गदर्शन लोकांना करणे बरोबर नाही असे त्यांचे मन त्यांना सांगू लागले. परंतु काँग्रेस पुढाऱ्यांनी आमचे ओझे हलके करण्यासाठी दिल्लीसच राहाण्याची गळ घातल्याने अखेर त्यांनी आपला मुक्काम हलविला नाही.

१८ जुलै १९४७ रोजी हाऊस ऑफ लॉर्डस् या ब्रिटिश पार्लमेंटच्या वरिष्ठ सभेने इंडिअन इंडिपेंडन्स बिलाला मान्यता देऊन त्याला राजेसाहेबांची मंजुरीही मिळाली असे जाहीर केले. आतापासून काँग्रेस सरकारच्या अंमलाखाली सरकारी नोकरी मिळविण्याकरिता लोकांची धडपड सुरू झाल्याच्या वार्ता ऐकून गांधींनी इषारा दिला की काँग्रेस सत्ताधीश झाली आहे, म्हणून काँग्रेसजनांनी सरकारी नोकऱ्या धरण्याची हाव बाळगणे हे काँग्रेसच्या ध्येयवादाशी बिलकूल विसंगत आहे. १९ जुलैच्या प्रार्थनाप्रवचनात त्यांनी हे मत प्रकट केले. ऑगस्ट १५ पासून राष्ट्रीय झेंड्यावर एका कोपऱ्यात युनियन जॅकचे चिन्ह राहील अशी वार्ता ऐकून एकाने रागान पत्र लिहून महात्मा गांधींना कळविले की, असे झाले तर मी त्या निशाणाच्या चिंध्या करून टाकीन. गांधींनी त्या पत्राचे निमित्त करून सर्वांस बजाविले, "हा केवळ अविचारीपणा होईल. ब्रिटिश लोक आता राज्यकर्ते म्हणून हा देश सोडून जात आहेत. माऊंटबॅटन हे थोडे दिवस आपण नेमलेले गव्हर्नर जनरल म्हणून राहाणार आहेत; पण व्हाइसरॉय म्हणून नव्हे. आपल्या मंत्रिमंडळाच्या आज्ञा अंमलात आणणारे सेवक म्हणून ते राहतील. ब्रिटनशी आपले संबंध बरोबरीचे व मैत्रीचे राहाणार आहेत. मग आपल्या ध्वजावर एका बाजूला युनिअन जॅकला जागा मिळाल्याने काय बिघडते? एका काळी असलेल्या शत्रूबद्दल दाखविलेली सद्भावना हाच त्याचा अर्थ असेल. आपल्या समावेशक परंपरेला ते शोभून दिसेल. जोपर्यंत इंडिया एक डोमिनिअन म्हणून राहील तोवर युनिअन जॅकचा मान ठेवणे हे शिष्टाचाराला धरूनच होईल. पण मी तर असे ऐकले आहे की, काँग्रेसच्या कार्यकारिणीने आपल्या राष्ट्रीय ध्वजावर युनियन जॅकला जागा न देण्याचे ठरविले आहे. पण याबद्दल उल्हसित होण्यासारखे काही नाही. मला फक्त आपली औदार्याची व समावेशकतेची परंपरा जपणे आवडते."

२२ जुलै रोजी जवाहरलाल नेहरूंनी घटनापरिषदेमध्ये राष्ट्रीय ध्वजाविषयी पुढील ठराव मांडला. " Resolved that the national flage of India shall be a horizontal tricolour of deep saffron, whit and dark green, in equal proportion. In the centre of the white band, there shall be a wheel in navy blue to represent the Chakra. The design of the wheel shall be that of the wheel, **Chakra**, which appears on the abacus of the Sarnath pillor of Ashoka. The diameter of the wheel shall be approximate to the width of the white band. The ratio of the width to the length of the flag shall ordinarily be 2 : 3. " याच वर्णनाचा राष्ट्रध्वज पुढे भारताचा ध्वज म्हणून मान्यता पावला आणि 'हरिजन' मध्ये गांधींनी त्यावर विवेचक लेख लिहिला.

२५ जुलैच्या प्रार्थनाप्रवचनात गांधींनी गोहत्याप्रतिबंध हा विषय हाताळला. गोहत्याप्रतिबंधाचा कायदा सर्व देशासाठी करणे चुकीचे होईल असे आपले मत त्यांनी दिले आणि असा प्रतिप्रश्न केला की उद्या पाकिस्तानने मूर्तिपूजाप्रतिबंधाचा कायदा केला तर ते योग्य होईल काय? हा विषय विचारार्थ घेण्याचे कारण बाबू राजेंद्रप्रसाद यांनी त्यांना असे सांगितले होते की, गोहत्येला प्रतिबंध व्हावा अशी मागणी करणारी पन्नास हजार पोस्टकार्डे, तीस हजार पत्रे आणि हजारो तारा आपल्याकडे आलेल्या आहेत. गांधींनी गोरक्षण करण्याची मागणी करणाऱ्या व पांजरपोळ चालविणाऱ्यांना गोरक्षण शास्त्रीय पद्धतीने करून चर्मोद्योग व शेती यांना कशी मदत करता येईल हे कळत नाही. तिकडे त्यांनी लक्ष दिल्यास मोठी देशसेवा आणि समाजसेवा गोसेवेमार्फत घडेल. हिंदू व मुसलमान पुढाऱ्यांनी बाउंडरी कमिशन देईल ते निकाल बिनतक्रार मान्य करण्याचे ठरविले आहे हे सुलक्षण आहे, असे गांधी म्हणाले.

२६ जुलैला आपल्या प्रार्थनाप्रवचनात त्यांनी पे कमिशनच्या शिफारशींचा उल्लेख करून डायरेक्टरला दोन हजार रुपये व चपराशाला वीस रुपये दरमहा पगार द्यावा यात उघड अन्याय आहे, असे म्हटले. तसेच बॅरिस्टर, डॉक्टर, वगैरे मोठमोठ्या फी घेतात त्याचाही निषेध केला. कनिष्ठ प्रतीच्या नोकरांची उपासमार होईल असे पगार ठेवणे म्हणजे असंतोषाला निमंत्रणच आहे आणि पे कमिशनने तसे केले आहे. विषमतेचा रोग वाढू देण्याचे टाळणे अवश्य आहे, असे गांधींचे म्हणणे होते.

२७ जुलै रोजी, संस्थानिकांनी व्हाइसरायची भेट घेऊन त्यांचा सल्ला घेतला त्याबद्दल गांधींनी आपले विचार प्रकट केले. व्हाइसरॉयनी संस्थानिकांना

सांगितले की, फुटून बाजूला राहाण्याऐवजी सोईप्रमाणे पाकिस्तान किंवा हिंदुस्तान यात सामील होण्याचे संस्थानिकांनी ठरवावे. या सल्ल्याला मान्यता देताना गांधी म्हणाले, "यात एक उणीव आहे. संस्थानिकांनी आपल्या प्रजा म्हणजे आपली मालमत्ता अथवा जनावरे न समजता त्यांच्या इच्छा-आकांक्षा लक्षात घेऊन, आपण केवळ त्यांचे ट्रस्टी अथवा सेवक आहो अशी भूमिका स्वीकारून पुढील पावले उचलावी. स्वातंत्र्य मिळाल्याबद्दल खालसांतील जनता १५ ऑगस्ट रोजी जो आनंदोत्सव करील तीमध्ये संस्थानी प्रजेला देखील सामील होता आले पाहिजे."

तारीख २८ जुलैच्या प्रार्थनाप्रवचनात गांधींनी त्यांजकडे येऊन पडलेल्या काही प्रश्नांना उत्तरे दिली. एका प्रश्नाचे उत्तर असे होते की, धर्मभिन्नत्वाच्या तत्त्वावर पाकिस्तान व इंडिया अशी दोन शकले झाली असली तर खरोखर त्यांचे एकत्वच आहे. तेव्हा दोनही प्रदेशांतील लोकांच्या गरजा व गाऱ्हाणी विचारात घेण्यासाठी एकच काँग्रेसची संघटना असणे योग्य आहे. पूर्वीपेक्षा निराळ्या प्रश्नांना तोंड द्यावे लागण्याचा संभव आहे आणि कदाचित त्यांतील काही प्रश्न सोडविता येणे अशक्य होईल, पण म्हणून काँग्रेसची शकले होण्याचे काही कारण नाही.

दुसऱ्या एका प्रश्नाचे उत्तर असे होते की, काँग्रेसला केवळ हिंदूंची संघटना होणे कदापि शक्य नाही. लक्षावधी लोकांचे राष्ट्र म्हणजे हिंदुस्तान आहे. त्यात अनेक धर्मांचे, जातींचे लोक आहेत. फाळणीनंतरही येथेच राहू इच्छिणारे मुसलमान हे परके, परदेशी कसे होतील? बहुसंख्य हिंदूंना हा फक्त हिंदूंचा देश आहे असे न्यायाने म्हणताच येणार नाही. आणि काँग्रेसने या सर्वांच्या गरजांचा व कल्याणाचा विचार आपले परंपरादत्त कर्तव्य म्हणून करीत राहाणे हाच तिचा धर्म आहे. हेच तिच्या जन्माचे व अस्तित्वाचे कारण अथवा हेतू आहे.

तिसरा प्रश्न असा होता, की पाकिस्तानच्या ध्वजाविषयी बिगरमुसलमानांची वृत्ती अथवा भूमिका काय असावी? गांधी म्हणाले, "पाकिस्तानचा ध्वज अजून औपचारिकपणे तयार झालेला नाही. बहुधा मुस्लिम लीगचा ध्वजच पाकिस्तानचा म्हणून जाहीर होईल. इस्लामबरोबर त्याची एकरूपता ठरली तर जगातील यच्चयावत् मुसलमान त्याला मान देतील आणि ज्यांना इस्लामबद्दल आदर आहे ते सर्व त्याचा आदर करतील. अशा प्रकारचा इस्लाम, ख्रिस्ती धर्म, हिंदु धर्म वगैरे कोणाचा ध्वज असल्याचे मला माहीत नाही. पाकिस्तानचा ध्वज हा जर त्याच्या सर्व नागरिकांचा म्हणून, जातिधर्मातीत असा असेल तर त्याला मी अवश्य सलाम करीन आणि कोणीही करावा.

निराळ्या शब्दांत सांगायचे तर या दोन डोमिनिअनांचे आपसात शत्रुत्व नसावे, मैत्र असावे. एका कॉमनवेल्थचे सदस्य एकमेकांचे शत्रू असू शकत नाहीत. दक्षिण आफ्रिका आता पाकिस्तान व इंडिया यांबद्दल कशी वागणार आहे इकडे माझे लक्ष आहे. आता त्यांना हिंदविरोधी राहाता येईल काय? आता तेथील गोऱ्या लोकांना काळ्या लोकांबरोबर प्रवास करणे, ते हिंदी आहेत म्हणून नाकारता येईल काय?"

तारीख १ ऑगस्टपासून ४ पर्यंत गांधींचा मुक्काम काश्मीरमध्ये होता. तेथे असताना काश्मीरने पाकिस्तानात जावे का हिंदुस्तानात, असा प्रश्न त्यांना कोणी तरी विचारला. त्यावर गांधी म्हणाले, मी या प्रश्नाची चर्चा करण्याकरिता आलेलो नाही. काश्मिरातील जनमत असेल त्याप्रमाणे व्हावे. त्यांनी या विषयावर आपल्या चार दिवसांच्या मुक्कामात जाहीर भाषण असे केले नाही. पण शेख अब्दुल्लाची पत्नी सारखी त्यांच्याबरोबर होती. महाराजा व महाराणी आणि दिवाण काकसाहेब यांजबरोबर गांधींच्या मुलाखती झाल्या. शेख अब्दुल्लांची भेट मात्र झाली नाही. काश्मीरची प्रजा त्यांना अगदी एकजिनसी आढळली. नुसत्या चेहऱ्यामोहऱ्यावरून आणि पोषाखावरून हिंदू कोण व मुसलमान कोण हे ओळखता येणे मुष्कील होते. काश्मिरी प्रजेचे मत हेच प्रभावी ठरले. पाहिजे, असे गांधी म्हणाले व महाराजा व महाराणी यांची याला मान्यता होती, हे जनमत कसे अजमावावे हा प्रश्न होता. पण काश्मिरी लोक, राजासाहेब व दोनही डोमिनिअन त्याचा निर्णय करतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

वाह येथे अनेक हिंदू व शीख निर्वासित होते. त्यांची संख्या ९ हजार होती आणि त्यांना आपले भवितव्य १५ ऑगस्टनंतर अंधकारमय वाटत होते. गांधींनी त्यांना धीर दिला व असे नाउमेद होण्यासारखी परिस्थिती आहे असे आपल्याला वाटत नाही, असे जीनांच्या जाहीर आश्वासनांवर विसंबून सांगितले. गांधींना जर नोआखलीला जाण्याची निकड नसती तर ते १५ ऑगस्टपर्यंत तेथे राहाण्याला राजी होते. पण आपला प्रतिनिधी म्हणून सुशीला नायर यांना तेथ राहाण्याला सांगितले. रावळपिंडी येथील निर्वासितही सुरक्षित आहेत असे तेथील मुसलमान जिल्हा कमिशनरने त्यांना सांगितले. शीखांची गुरुद्वारे पंजासाहेब, नानकानासाहेब पूर्व पंजाबात होती, पण म्हणून पूर्व पंजाबचा राज्यकारभार शीखांच्या हाती द्यावा ही अशक्य गोष्ट आहे, असे गांधी म्हणाले. लाहोर येथे त्यांना पोचविण्यास आलेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांना ते म्हणाले, "यापुढील माझे आयुष्य पाकिस्तानात जाणार, मग ते पूर्व बंगालमध्ये असो, पश्चिम पंजाबमध्ये असो, वा सरहद्द प्रांतात असो. तूर्त मी नोआखलीला जात

आहे. तेथ मरण आले तरी मी जाणारच. पण नोआखलीमधून मुक्त झालो की मी पंजाबात येणार. नोआखलीहून माझी मुक्तता लवकर होईल अशी मी उमेद बाळगून आहे."

नोआखलीच्या वाटेवर आगगाडीमध्येच, 'विद्यार्थ्यांपुढील कार्य ' या विषयावर गांधींनी लेख लिहिला. त्यात त्यांनी म्हटले, "हिंदू, मुसलमान , ख्रिस्ती आणि इतर सर्वांसाठी विद्यार्थ्यांची एकच संघटना असावी. विद्यार्थी हे भवितव्याचे शिल्पकार आहेत. त्यांची फाळणी होऊ शकत नाही. प्रत्यक्ष व प्रचलित राजकारणात विद्यार्थ्यांनी पडू नये. सर्वच राजकीय पक्षांनी आपल्या कामासाठी त्यांचा आजवर उपयोग केलेला आहे. जेव्हा शिक्षणाचा उद्देश फक्त गुलाम निर्माण करण्याचाच होता तेव्हा हे अपरिहार्य होते. पण आता यापुढे तशी स्थिती नाही. स्वतंत्र राष्ट्राच्या बालकांना कोणत्या प्रकारचे शिक्षण पाहिजे याचा विचार करणे हे विद्यार्थ्यांचे आता पहिले काम आहे. ते काय असले पाहिजे यात मी आता शिरत नाही. पण तूर्त इतकेच म्हणतो की, विद्यापीठातील वडिलधाऱ्यांचे ते काम आहे असे समजण्याचया भ्रमात विद्यार्थ्यांनी फसू नये विधायक व प्रौढ टीका करून त्यांनी लोकमत बनविले पाहिजे. विद्यार्थ्यांचे जीवन म्हणजे संन्याशाचे जीवन आहे असे म्हणतात ते बरोबर आहे. साधी राहणी व उच्च विचारसरणी या तत्त्वाची साक्षात प्रतिमा विद्यार्थी असला पाहिजे. तो मूर्तिमंत शिस्त असला पाहिजे. अभ्यासातच त्याला आनंद वाटला पाहिजे. ज्ञानाची सतत वाढ होत राहणे यापेक्षा दुसरा अधिक मोठा आनंद कोणता ?" असा प्रश्न विचारून गांधींनी आपला लेख संपविला. कलकत्त्याला येऊन पोचल्याबरोबर डॉ. सुनील बोस यांनी त्यांची वैद्यकीय तपासणी केली. त्यांनी आपल्या तपासणीनंतर सांगितले, 'सध्याच्या पावसाळ्याच्या दिवसांत. नोआखली जिल्ह्यात मलेरियाचा उपद्रव होण्याचे भय आहे. म्हणून आठदहा दिवसांपेक्षा अधिक काळ गांधींनी तेथे राहू नये. महात्मा गांधींची आठ वर्षांनंतर मी पुन: तपासणी करीत आहे. १९३९ पासून आजवर त्यांच्या शारीरिक स्थितीत काहीच फरक पडलेला नाही. खरे तर त्यांचा चेहरा अधिक टवटवीत झाला आहे व त्वचा कांतिमान झाली आहे. वजन कायमच आहे. हृदय आणि फुप्फुसे उत्तम आहेत. नाडीचे ठोके मिनिटाला ६८ आणि नियमित पडतात. एकंदरीत प्रकृतीत कोणतेच वैगुण्य नाही.'

९ ऑगस्ट रोजी सोदेपूर येथे प्रार्थनासभेत गांधींनी कलकत्त्यामधील परिस्थितीवर भाषण केले. हिंदू वेडे झाले आहेत आणि मुसलमान अधिक शहाणे झाले आहेत,असे अनेक मित्रांनी त्यांना सांगितले. आता राज्यकारभाराची पूर्ण जबाबदारी घेण्याच्या वेळी गुंडगिरी आणि दंगेधोपे संपुष्टात आलेच पाहिजेत.

१० तारखेच्या प्रार्थनाप्रवचनाला खूपच गर्दी झाली होती आणि टाळ्यांचा कडकडाट कानठळ्या बसविणारा होता. काही मिनिटे याबद्दल लोकांची कानउघाडणी करण्यासाठीच गांधींना खर्च करावी लागली. नंतर ते म्हणाले, "मी नोआखलीला जाण्यासाठी आलो व थोडा वेळच कलकत्याला थांबण्याचा विचार होता. पण बऱ्याच लोकांच्या विनंतीवरून कलकत्ता शहर पूर्वस्थितीवर येण्यासाठी चाललेल्या प्रयत्नात मी माझा वाटा उचलण्याकरिता थोडा जास्त राहात आहे. मी आता मंत्र्यांच्या व इतरांच्या भेटी घेतल्या आहेत. हिन्दूंनी जेथे घरेदारे उद्ध्वस्त केली आहेत त्या जागा मला पाहायच्या आहेत. आपल्या स्वतःच्या घरातच हिदूंना अजून परत जाता येत नाही अशा हकीकती मी ऐकल्या आहेत. अशा प्रकारच्या जंगलीपणाच्या प्रकारांची माहिती मिळाली म्हणजे माझी मान शरमेने खाली जाते. पण मला सगळ्या अहवालांची शहानिशा करायची आहे. कलकत्यातील मुस्लिम वस्ती २३ टक्क्यांपेक्षा जास्त नाही असे मी ऐकले. इतके थोडे लोक बहुसंख्यांवर जुलूमजबरदस्ती कशी करतात हे मला समजत नाही. सरकारी नोकरांतही जातीय पक्षपाताचे विष भिनले आहे हे जर खरे असेल तर आपला भविष्यकाळ मला काळाकुट्ट दिसतो. निदान पोलिसांना तरी आपल्या कर्तव्याची थोरवी समजेल काय?"

११ ऑगस्टच्या प्रार्थनासभेत त्यांनी चितागांगमध्ये आलेल्या पुराचा उल्लेख केला. तीन दिवस झाले तरी पुराचे पाणी ओसरत नव्हते व त्यामुळे जीवितवित्ताची हानी किती झाली याचा अंदाज करता यत नव्हता. अशा आणीबाणीच्या विपत्तीत पूर्व आणि पश्चिम, पाकिस्तान आणि हिंदुस्तान असले विचार कोणी मनात आणता उपयोगी नाही. राजकीय, धार्मिक असले फरक पार विसरून दुःखितांना मदत केली पाहिजे. निधी गोळा करण्याला प्रतिष्ठित व विश्वसनीय माणसांची कमिटी नेमून अखिल बंगालने सर्वांचा परामर्श घेतला पाहिजे. जरूर तर अखिल भारतीय स्तरावर हे काम केले पाहिजे. पूर्व व पश्चिम बंगाल असा काही भेद न मानता सर्व बंगाली लोकांनी एक होऊन आपले काही भांडण नाही असे सिद्ध केले पाहिजे, असे गांधी म्हणाले.

१५ तारखेपासून स्वातंत्र्य अंमलात येणार आणि कलकत्याचे मुसलमान तो दिवस सुतकाचा म्हणून पाळणार आहेत, असे गांधींच्या कानावर आले. त्यांना १२ ऑगस्ट रोजी गांधींनी उपदेश केला की, असा उपक्रम अगदी गैर ठरेल. पाकिस्तानातील हिदूंनी सुद्धा पाकिस्तानच्या ध्वजाला वंदन केले पाहिजे. कारण स्वातंत्र्य व समता यांचे प्रतीक तो ध्वज आहे. त्यांच्या कानावर असेही आले होते की, फ्रेंच व पोर्तुगीज हिंदुस्तानातील हिंदु-मुसलमान आपले

स्वातंत्र्य जाहीर करणार आहेत. याबाबत गांधी म्हणाले की, असे करणे अविचारी-पणाचे आहे, इतकेच नव्हे तर यात त्यांचा फक्त मस्तवालपणाच दिसून येईल. ब्रिटिशांनी सत्तात्याग करण्याचे ठरविले आहे, फ्रेंच किंवा पोर्तुगीजांनी नव्हे. अर्थात् त्यांना तसेच करावे लागणार आहे. पण लोकांनी आपल्या हाती कायदा घेऊन चालणार नाही. त्याला घटनात्मक मार्गच चोखाळले पाहिजेत. जवाहरलाल नेहरूंनी डचांच्या ताब्यात असलेल्या इंडोनेशियाचा पुरस्कार केला तेव्हा आपल्या देशात असणाऱ्या फ्रेंच व पोर्तुगीज वसाहतीमधील लोकांनाही स्वातंत्र्य मिळून ते आपल्याशी एकरूप व्हावे याची काळजी त्यांना आहेच. म्हणन त्यांचा सल्ला घेतल्याशिवाय तेथील लोकांनी आपली मर्यादा सोडून वागू नये, असे गांधींनी सांगितले. त्याच दिवशी शहीद सुरावर्दी गांधींच्या भेटीला गेले आणि कलकत्या-तील दंगेधोपे थांबून हिंदुमुसलमान पूर्वीसारखे गुण्यागोविंदाने वागू लागेपर्यंत त्यांनी कलकत्ता सोडण्याचे मनात आणू नये, अशी त्यांना विनंती केली. गांधी त्यांना म्हणाले, तुम्ही व मी एखाद्या मुसलमानाच्याच घरात, दंगलग्रस्त भागात राहू. तुम्ही तुमच्या वडिलांचा व कन्येचा सल्ला घ्या. बाउंडरी कमिशनचा निकाल दोनतीन दिवसात लागेल आणि त्या कमिशनला दोनही पक्षांनी राजीखुषीने मान्यता दिली असल्याने त्याचे निकाल दोघांवर बंधनकारक असतील, मग कोणाला ते समाधानकारक वाटोत वा न वाटोत. गांधी म्हणाले ते मान्य होऊन १३ ऑगस्ट रोजी बेलिघाटा येथील एका मुसलमानाच्या घरी राहाण्यास आले. माजी मेयर उस्मान त्यांचेबरोबर होते, तसेच कलकत्ता जिल्हा मुस्लिम लीगचे सेक्रेटरी होते. पश्चिम बंगालच्या मुख्य मंत्र्यांचे पोलिटिकल सेक्रेटरी चौधरी, तसेच आभा आणि मनु गांधी या देखील त्यांच्या-बरोबर होत्या. मुख्यमंत्री पी. सी. घोष यांनी आपले सरकारी कर्तव्य म्हणून, गांधींच्या सर्व बाजूंनी उघड्या असलेल्या घराला संरक्षणाची व्यवस्था केली. गांधींना संरक्षण नको असले तरी त्यांजबरोबर राहाणाऱ्या शहीद सुरावर्दींना ते आम्ही दिलेच पाहिजे, असे मुख्यमंत्री म्हणाले. गांधींनंतर लवकरच शहीद सुरावर्दी गाडीत बसून आले. पण जमलेल्या गर्दीने 'शहीद परत जा' अशा घोषणा दिल्या. पोलिसांच्या मदतीने ते गांधीपर्यंत येऊन पोचले. गर्दी आणखी वाढली, पण गांधींचे सेक्रेटरी प्रो. निर्मलकुमार बोस यांनी त्यांना समजाविले व गांधींपुढे आपली गाऱ्हाणी ठेवण्यास सांगितले. गेल्या वर्षी याच दिवसात हिंदूंच्या घरांना आगी लावण्यात येत होत्या तेव्हा तुम्ही का आला नाही, असा प्रश्न गांधींना विचारण्यात आला. गांधींनी सांगितले तेव्हापासून काळ फार बदलला आहे. आता देश स्वातंत्र्यसंपन्न झाला आहे. शहीद सुरावर्दींमुळे मी येथे थांबलो आहे. नाही तर नोआखलीला जाऊन पोचलो असतो. येथे

राहूनच नोआखलीतील हिंदूंची सेवा मला करता येईल. मला हिंदु-मुसलमान सारखेच आहेत. त्यांनी आता सर्व वितुष्टे विसरून आपआपल्या घरी परतावे. कलकत्त्यात शांतता व सलोखा नांदू लागला की नोआखली व इतर ठिकाणीही तो नांदेल. अखेर गांधी म्हणाले, "उद्यापासून आपण ब्रिटिश अंमलापासून मुक्त होऊ. आज मध्यरात्रीनंतर आपली फाळणीही अंमलात येईल. म्हणून उद्याचा दिवस जसा उत्सव करण्याचा असेल तसा तो दु:ख करण्याचाही असेल. आपल्यावर फार अवजड जबाबदारी पडणार आहे. ती योग्यप्रकारे पार पाडण्याचे सामर्थ्य आपल्याला मिळावे म्हणून आपण ईश्वराची प्रार्थना करू या."

१४ ऑगस्ट रोजी कराची येथे पाकिस्तान डोमिनिअन अस्तित्वात आल्याची घोषणा झाली. जीना म्हणाले, " The two Indias are parting as friends and will continue to be friends for ever." दिल्लीला मध्यरात्र होईपर्यंत सारे शहर स्वतंत्र हिंदुस्तान जाहीर झाल्याचे ऐकण्याकरिता जागत राहिले. बरोबर १२ वाजता दिल्लीस व इतर मोठ्या शहरी हिंदुस्तान स्वतंत्र झाल्याच्या घोषणा शंखध्वनी करून व 'महात्मा गांधी की जय' असा उद्घोष करून देण्यात आल्या. कॉन्स्टिटयुएंट असेंब्लीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी असेंब्लीच्या कामाला सुरुवात करताना स्वातंत्र्यलढ्यात सामील झालेल्या सर्व लहानथोर स्त्री-पुरुषांची सेवा व त्याग यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण केले आणि महात्मा गांधींविषयी बोलताना त्यांचा उल्लेख " Mahatma Gandhi, who has been our beacon light, our guide and philosopher during the last thirty years" अशा शब्दांत केला.

कॉन्स्टिटयुएट असेंब्लीच्या सभासदांनी मध्यरात्रीनंतर जी शपथ घ्यांवयाची ठरले होते, तिचा मसुदा ठरावरूपाने सुचविताना जवाहरलाल नेहरू यांनी केलेल्या भाषणात म्हटले, " Long years ago, we had mad a tryst with destiny and now the times comes when we shall redeem our pledge, not wholly or in full measure, bur very substanlially. When the world sleeps India will awake to life and freedom. It is fitting that at this solemn moment, we take the pledge of dedication to the service of India and her people and to the still larger cause of humanity."

शपथेचा मसुदा असा होता: " At this solemn moment, when people of India through suffering and sacrifice, have secured freedom, I, a member of the constituent assembly of India, do dedicate myself, in all humility, to the service of India and her people to the end that this ancient land attain her rightful place

in the world and make her full and willing contribution to the promotion of world peace and the welfare of mankind."

१५ ऑगस्ट रोजी सकाळी लॉर्ड माऊंटबॅटन यांनी घटनापरिषदेत जाहीर केले : "I have the honour to be the Governor-General of independent India. I am your servant. At this historic hour let us not forget all that India owes to Mahatma Gandhi, the architect of her freedom through non-violence. We must miss his presence here today and world have him throw how much he is in our throughts."

गांधींनी उपोषण करून व सूत कातीत बसून स्वातंत्र्यदिन साजरा केला, तो महादेव देसाई दिन प्रार्थना करण्यात व समग्र गीतापठनात घालविला. सायंकाळच्या प्रार्थनासभेत, बंगालचे नवे गव्हर्नर राजगोपालाचारी यांना गव्हर्मेंट हाऊसवर लोकांनी घेराव घातला याबद्दल नापसंती व्यक्त केली. यात केवळ प्रेम व लोकशक्तीचे प्रदर्शन असेल तर गोष्ट निराळी; पण आता आपल्याला हवे तसे वागण्याला मुभा आहे असे लोकांना वाटत असेल तर ती गोष्ट आक्षेपार्ह आहे. स्वातंत्र्याचा उपयोग संयमपूर्वक करणे जरूर आहे, असे ते म्हणाले. सायंकाळची प्रार्थना झाल्यावर त्यांनी आपले उपोषण सोडले· हिंदु-मुसलमानांनी १५ ऑगस्टला बंधुभावाचे सर्वत्र दर्शन घडविले त्याची माहिती डॉ. घोष यांनी त्यांना दिली तेव्हा त्यांना फार समाधान वाटले. तसेच निदर्शनाचे प्रकार स्वतः पाहण्यासाठी रात्रभर ते शहरात फिरत होते.

१६ ऑगस्टला त्यांनी यावर 'चमत्कार का अपघात' या मथळ्याखाली लेख लिहिला आणि त्यात माझे फार वर्षांचे स्वप्न साकार झाले असे म्हटले. १७ ऑगस्ट रोजी त्यांनी हिंदी व पाकिस्तानी गव्हर्नर कसे असावे याबद्दल काही कल्पना मांडल्या. पहिली गोष्ट म्हणजे, तो पूर्णपणे मद्यनिवृत्त असला पा।हजे व गव्हर्मेंट हाऊसमध्ये त्याने मद्यबंदीचा अंमल केला पाहिजे. दुसरी गोष्ट, हाताने सूत काढण्याचा उद्योग त्याच्या आसमंतात भरभराटला पाहिजे. तिसरी गोष्ट, त्याने स्वतः साध्या घरात राहिले पाहिजे, पण लोकांच्या सहज नजरेस पडता येणार नाही असे ध्यान राखावे. साधी राहणी व उच्च विचारसरणी त्याच्या दैनंदिन वर्तनात दिसून आली पाहिजे. अस्पृश्यतेचा मागमूस तसेच धर्म, वंश, जात यावर आधारलेला भेदभाव त्याच्याकडे नसला पाहिजे. ज्या प्रांतात त्याची नेमणूक झाली असेल तेथील स्थानिक भाषा व हिंदुस्तानी त्याला चांगल्या येत असल्या पाहिजेत.

सोमवार ता. १८ ऑगस्ट रोजी ईद हा मुस्लिमांचा सण आला. त्या दिवशी हिंदु-मुसलमानांनी बंधुभावाने एकमेकांच्या भेटी घेतल्या व सदिच्छा

दिल्या. भारताचा तिरंगी झेंडा हाती घेऊन हजारो मुस्लिम 'ईद मुबारक' असे म्हणत गांधींच्या बेलिघाटा येथील मुक्कामावर आले. त्यांना अनेक नजराणे देण्यात आले. गांधींनी सर्वांना फळे वाटली आणि त्यांचा मौनदिन असल्यामुळे 'माझ्या सर्व मुसलमान बांधवांना ईदच्या शुभेच्छा' असे कागदावर लिहून कळविले. सगळा दिवसभर कलकत्ता शहरात बंधु-भावनेची निदर्शने होत होती. सायंकाळी सात वाजता प्रार्थनासभेत मौन सोडले व सर्वांना 'ईद मुबारक' म्हटले. बराकपूर येथे हिन्दु-मुसलमानांनी त्यांना सांगितले की आमची भांडणे आम्ही मिटवू, तुम्हाला त्रास देणार नाही; या गोष्टीचा खरा उल्लेख त्यांनी प्रवचनात केला. यावेळी लिहिलेल्या 'हरिजन'-मधील लेखात म्हटले, "आता ब्रिटिशांचे राज्य जाऊन स्वातंत्र्यप्राप्ती झाली असल्यामुळे 'हरिजन' व संलग्न मतपत्रांची काही जरुरी नाही. माझी मते सगळी कायम आहेत. स्वतंत्र हिंदुस्तानच्या रचनाकार्यात खेड्यांनी शहरांवर अवलंबून राहू नये आणि शहरे देखील खेड्यांच्या हिताला उपयुक्त होतील अशा रीतीनेच राहावी. म्हणून चरखा केंद्रस्थानी असावा आणि त्याच्याभोवती इतर जीवनोपयोगी उद्योगधंद्यांनी फिरावे. पण तो मागे पडत आहे असे दिसते. माझे जीवन पूर्वीपेक्षा अधिक वादळी झाले आहे. आता मला कायमचे कोठेतरी एका ठिकाणी राहाता येईल असे वाटत नाही. 'हरिजना'चे रकाने सगळे माझ्या प्रार्थनाप्रवचनातील मजकुराने भरलेले असतात. मी स्वतंत्र असा फार तर दीड रकाना मजकूर लिहितो. ही स्थिती बरोबर नाही. म्हणून 'हरिजन'च्या व संलग्न पत्रांच्या वाचकांनी मला स्पष्टपणे सांगावे की त्यांना त्या पत्रांची खरोखर गरज वाटते का आणि त्यांच्या राजकीय अथवा आत्मिक भुकेचे समाधान त्यांनी होत आहे का?"

अमेरिकेला जाण्यापूर्वी प्रोफेसर स्टुअर्ट नेल्सन गांधींना भेटायला आले होते. त्यांचा गांधींना असा प्रश्न होता, भारतीयांनी शांततापूर्ण मार्गानीच प्राय: स्वातंत्र्य मिळविले; मग आता आपसातील यादवी त्यांना त्याच मार्गांनी का मिटविता येऊ नये? गांधी म्हणाले हा प्रश्न अगदी मूलग्राही स्वरूपाचा आहे. त्यांच्या आता ध्यानात येऊ लागले होते की सगळ्या सत्याग्रहाच्या चळवळीत खरा सत्याग्रह नव्हताच. त्यात फक्त दुर्बलांचा नि:शस्त्र प्रतिकार होता. ब्रिटिश गेल्याबरोबर वरवर दिसणारी अहिंसा नष्ट झाली आणि मनात दडून बसलेली व दाबून ठेवलेली हिंसा आता डोके वर काढीत आहे. तथापि त्यांना अजून आशा वाटत होती की नवनिर्मित हिंदुस्तान व पाकिस्तान ही मानवजातीला संकटरूप न होता वरदान ठरतील. सामुदायिक स्वरूपाचे कलह मिटविण्यासाठी अहिंसेचे साधन पूर्णतेला नेऊन वापरणे हे स्वतंत्र भारताचे

कर्तव्य आहे आणि त्याने ते जर पार पाडले तर त्याचे स्वातंत्र्य खरेखुरे अर्थपूर्ण होईल.

त्यांचा कलकत्त्यातील ७ सप्टेंबर, १९४७ पर्यंत मुक्काम फारच अर्थपूर्ण झाला. दररोज कलकत्ता शहराच्या या किंवा त्या भागातून हिंदूंच्या वतीने असा सवाल करण्यात येत होता की वर्षभर त्यांनी ज्या हालअपेष्टा व छळ सोसला होता व ज्याबद्दल मुस्लिम लीगचा नेता म्हणून शहीद सुरावर्दी जबाबदार होते त्यावर आता गांधी सांगतात म्हणून भरंवसा कसा ठेवावा? गांधींचे म्हणणे असे होते की आता पाकिस्तान व अखंड हिंदुस्तान यामधील लढा आता संपला आहे आणि जीनासाहेबांनी जाहीर केले आहे की, पकिस्तानातील सर्व अल्पसंख्यांना समानतेची वागणूक मिळेल. काँग्रेसचा बाणाही तसाच आहे. तेव्हा आता या दोनही डोमिनिअन प्रदेशात शांतता, सलोखा आणि सामंजस्य नांदावे अशी अपेक्षा रास्तच आहे. शहीद सुरावर्दी आणि सगळे बंगालमधील मुसलमान आता जयहिंदच्या घोषणा उत्साहाने करीत आहेत.

१९ ऑगस्टच्या आपल्या प्रार्थनाप्रवचनात गांधी म्हणाले, आता प्रत्येक बहुसंख्य जमातीने आपले कर्तव्य अल्पसंख्याकांच्या बाबतीत, पाकिस्तानात अथवा हिन्दुस्तानात नेकीने बजावावे, जुलूमजबरदस्ती करण्याचे सोडून द्यावे.

खेंगरापट्टी येथे २० ऑगस्टच्या त्यांच्या प्रार्थनासभेला चार लाख लोक जमले होते. घरांच्या छपरांवरून आणि झाडांवरून देखील लोक बसले होते. गांधी म्हणाले, कलकत्त्यास आता शांतता स्थापन झाली आहे. तेव्हा आता पंजाबात त्याच कामासाठी या, अशी पत्रे मला आली आहेत, येत आहेत. दोनही डोमिनिअनांचे मुख्य मंत्री पंजाबात शांतता स्थापण्याचे प्रयत्न करीत आहेतच. पूर्व पंजाबात एकही मशीद राहू नये व पश्चिम पंजाबात एकही मंदिर अथवा गुरुद्वार राहू नये असे होणे शक्य आहे काय?

कलकत्त्यास त्यांना या वेळी तिसऱ्यांदा कॉर्पोरेशनने मानपत्र दिले. त्याला उत्तर देताना गांधी म्हणाले, आरोग्यसेवेच्या व स्वच्छतेच्या दृष्टीने जगातील सर्व मोठ्या शहरात कलकत्त्याने पहिला क्रमांक मिळविला पाहिजे आणि हिंदु-मुसलमानांमधील मैत्र व बंधुभाव कायम टिकविला पाहिजे.

२५ ऑगस्ट रोजी सिल्हेटमध्ये दंगली झाल्याचे ऐकून गांधींनी, तो त्यांचा मौनदिन असल्यामुळे त्यांनी सिल्हेटमधील हिंदु-मुसलमानांना सांगितले की, अशा दंगली या तात्पुरत्या असतात. आपल्याला सदोदित शेजारधर्माने नादांवयाचे आहे याचे भान ठेवा. दोनही बंगालांच्या मुख्य मंत्र्यांनी वारंवार एकमेकांना भेटून शांतता नांदवावी आणि लोकांना अन्नवस्त्राची कमतरता पडू देऊ नये. मला आता पंजाबची

हाक आली आहे व तिला साद देण्याला मी आतुर आहे. सिल्हेट, माल्डा व मुर्शिदाबाद येथून बोलावणी आली आहेत. पण एक माणूस किती ठिकाणी जाणार ?

२९ ऑगस्टच्या प्रार्थनासभेत प्रारंभी वंदे मातरम् हे राष्ट्रगीत म्हणण्यात आले, तेव्हा शहीद सुरावर्दी व इतर मुसलमान मित्र त्याचा मान राखण्यासाठी उभे राहिले. पण गांधी बसूनच राहिले होते. ते म्हणाले, अशा प्रसंगी उभे राहाणे ही पाश्चात्य प्रथा आहे. ती पाळण्याचे आपल्याला कारण नाही. राष्ट्रगीत अथवा भजन गाईले जात असताना आदरपूर्वक बैठकीत बसावे हेच योग्य आहे. राष्ट्रगीताला एकच चाल असावी आणि सर्वांना ते एकाच वेळी म्हणता यावे. ख्रिस्ती बांधवांना समान हक्क हरएक बाबतीत असतील, आहेतच, असे एका प्रश्नाला गांधींनी उत्तर दिले. गुणवत्तेवर सरकारी नोकरीत सर्वांना स्थान मिळेल. हिंदुस्तानात व पाकिस्तानात ही स्थिती सारखीच असेल अशी उमेद गांधींनी व्यक्त केली. कलकत्ता वरवर दिसण्यात तरी शांत दिसत होते, पण गांधींच्या मनाला मात्र शांतता नव्हती. सप्टेंबरच्या प्रारंभी तरी आपण आता नोआखलीला जावे असे त्यांना वाटत होते. पण ३१ ऑगस्ट रोजी त्यांच्या शांतता मोहीमेविरुद्ध निदर्शन करण्यात आले आणि नोआखलीला जाण्याचा त्यांचा बेत बारगळला. गांधी प्यारेलाल यांना म्हणाले, "कलकत्त्यात ज्वाला भडकल्या असता मी नोआखलीला जाऊ शकत नाही. माझ्या वतीने सध्या तुम्हीच जा!"

१ सप्टेंबर गांधींचा मौनदिन होता. अस्वस्थ करणाऱ्या बातम्या सारख्या येतच होत्या. तेव्हा त्यांनी सरदार पटेल यांना लिहिले: ' Preparations for a fight are today in evidence everywhere..... I hear the conflagration has burst out in many places. What is regarded as the 'Calcutta miracle' has proved to be a nine days' wonder. I am wondering what my duty is under these circumstances. There is a wire from Jawahar that I should proceed to the Punjab. How can I go now ? I am searching deep within myself. In that silence helps. ';

कित्येक शिष्टमंडळे त्यांचा सल्ला विचारण्याला आली व पेटलेला वणवा कसा शांत करावा असे त्यांना विचारू लागली. गांधी त्यांना म्हणाले : " Go in the midst of the rioters and prevent them from indulging in madness or get killed in the attempt; But don't came back alive to report failure. The situation calls for sacrifice on the part of top-rankers; So far, the unknown, nameless,

rank and file alone have been the victims of the holocaust with the one exception of Ganesh Shankar Vidyarthi. That is not enough."

परंतु हे सांगत असताच आपण आता काय करायला पाहिजे याबद्दल त्यांची घालमेल होत होती, कारण त्यांना तसे करू देण्यात येणार नाही हे त्यांना चांगले माहीत होते. बंगालचे गव्हर्नर राजगोपालाचारी त्यांना भेटायला आले आणि थोड्या चर्चेनंतर गांधींनी आपला उपोषणाचा निर्णय ठरवून तसे पत्रक तयार केले. १ सप्टेंबर रोजी रात्री सव्वाआठ वाजता त्यांनी उपोषणाला सुरुवात केली. त्यांच्या पत्रकातील अखेरचे वाक्य असे होते: "If the people of Calcutta wish me to proceed to the Punjab and help the people there, they have to enable me to break my fast as early as it may be;"

२ सप्टेंबर रोजी हिन्दुमहासभेचे श्यामाप्रसाद मुकर्जी व इतर पुढारी त्यांना भेटायला आले. तेव्हा दोन दिवसांपूर्वी कलकत्त्यात होती तशी स्थिती पुन: झाल्यावरच उपोषण सोडणे मला शक्य होईल असे त्यांनी त्यांना सांगितले. त्यानंतर मुस्लिम लीगचे एक पुढारी तशीच विनंती करायला आले व तुमचे प्राण म्हणजे आमचा मोठाच आधार आहे असे म्हणू लागले, तेव्हा त्यांना गांधींनी सांगितले की, याचे निदर्शन मुस्लिम बांधवांनी सूडाची व बदला घेण्याची वृत्ती सोडून देऊनच केले पाहिजे. तोपर्यंत मला माझे दिव्य करीत राहिले पाहिजे. तथापि गांधींच्या उपवासाने लोक ढवळून निघाले होते. सचिन मित्र व स्मृतीश बानर्जी हे शांतता पथकाचे काम करीत असता मारले गेले. मग मात्र दंगली ओसरल्या.

४ सप्टेंबर रोजी सरकारने व इतरांनी गांधींना कळविले की गेल्या चोवीस तासात काही अनुचित घडलेले नाही. लोक भेटायला येत. त्यांच्याशी मंद स्वरात गांधी बोलत. डॉ. सुनील बोस यांनी त्यांना विश्रांती घेण्यास व न बोलण्यास विनंती केली, परंतु त्यांनी तिकडे लक्ष दिले नाही. ते म्हणाले, "I cannot interrupt the work which has made me fast and which makes, me live. If my life ebbs away in the process, I would feel happy."

बेलिआघाटाचे लोक काही दिवसापूर्वी त्यांच्या कार्याकडे संशयाने पाहात होते, पण गांधींनी सुरू केलेल्या उपोषणामुळे ते अत्यंत प्रभावित झाले होते. शहरातील दांडग्या व बंडखोर लोकांवर ज्यांचा काबू आहे असे समजले जात होते अशा पन्नास जणांचा एक गट ४ सप्टेंबर रोजी गांधींच्या भेटीस आला आणि त्यांनी असे अभिवचन दिले की आम्ही सर्व दंगलीचे प्रकार थांबवितो.

गांधींनी त्यांना असा जबाब दिला की सगळा पश्चिम बंगाल आणि हिंदुस्तान जरी पेटला तरी कलकत्त्यास पुनः दंगल उद्भवणार नाही असे आश्वासन देत असाल आणि स्वतः मुसलमान त्यांजकडे येऊन सांगणार असतील की आम्ही अगदी खुशाल व सुरक्षित आहो आणि तुम्ही आपले उपोषण लांबविण्याचे कारण नाही तरच मी उपोषण संपवीन. अशी हमी देण्याचे सामर्थ्य नसल्याची जाणीव असल्याने ते शिष्टमंडळ परत गेले. पण काही वेळाने ज्या लोकांनी दंगलीत पुढाकार घेतला होता ते गांधींकडे आले व त्यांना शरण गेले. संध्याकाळी हिंदुमहासभेचे अध्यक्ष एन्. सी. चतर्जी व सेक्रेटरी डी. एन. मुकर्जी, सरदार निरंजनसिंग तालीब हे 'देशदर्पण' चे संपादक, मुस्लिम लीगचे डॉ. जिलानी, डॉ. अबदुर रशीद चौधरी आणि पाकिस्तान सीमेन्स युनिअनचे मोहिबुर रहमान यांनी सर्वत्र शांतता आहे असे सांगून उपोषण सोडण्याची विनंती केली. राजाजी, कृपलानी, डॉ. पी. सी. घोष आणि सुरावर्दी हेही तेथे होते. या सर्वांची गांधींबरोबर चर्चा झाली. सर्वांनी आपले प्राण पणाला लावून शांतता टिकविण्याची हमी दिली आणि तशी लेखी प्रतिज्ञा गांधींना लिहून दिली. तिचा मसुदा राजाजींनी केला आणि चतर्जी, मुकर्जी, जैडका, निरंजनसिंग तालीब, सुरावर्दी यांनी त्यावर सह्या केल्या. ४ सप्टेंबर रोजी सव्वानऊ वाजता ७३ तासानंतर उपोषण संपविले. ५ सप्टेंबरला गांधींना निरोप देण्याची सभा झाली. तेव्हा गांधींनी पुनः त्यांना आश्वासने देणाऱ्या सर्वांना बजाविले की शांतता रक्षणासाठी तुम्ही आपले प्राण पणाला लाविले आहेत हे लक्षात असू द्या. कलकत्त्याने आपले डोके ठिकाणावर ठेवण्याचे परिणाम लक्षात घ्या. त्यामुळे पूर्व व पश्चिम बंगाल, बिहार आणि पंजाब येथेही आपोआप शांतता नांदू लागेल. पंजाब एकदा शुद्धीवर आला की सारा हिंदुस्तान त्याचे अनुकरण करील. ईश्वर सर्वांना सुबुद्धी देवो, असे म्हणून गांधींनी आपले भाषण संपविले.

मुस्लिम लीगचे मुखपत्र 'मॉर्निंग न्यूज'ने कलकत्ता मुस्लिमजनांच्या वतीने गांधींना धन्यवाद देताना म्हटले, " He was ready to die so they might live peacefully. " आणि 'लंडन टाइम्स'च्या प्रतिनिधीने लिहिले की, " Gandhi had achieved more than would have been effected by several divisions of troops; "

राजाजी म्हणाले, " Gandhiji has achieved many things, but there has been nothing, not even independence which is so truly wonderful, as his victory over evil in Calcutta. "

लॉर्ड माऊंटबॅटन यांनी कृतज्ञतापूर्वक गांधीजींना लिहिले, "In the Punjab we have 50000 soldiers and large-seale rioting on our hands. In Bengal, our forces consist of one man and there is no rioting. As a serving officer as well as an administrator, may I be allowed to pay my tribute to the one-man boundary force."

७ सप्टेंबर रोजी कलकत्त्यास एक महिना राहून गांधींनी दिल्लीचे प्रस्थान ठेविले. यांपैकी २४ दिवस ते बेलियाघाटा येथील एका मुसलमानाच्या घरात आणि शहीद सुरावर्दींच्या संगतीत राहिले. त्यांचेकडे संदेश जेव्हा मागितला गेला तेव्हा बंगाली भाषेत त्यांनी लिहिले, "My life is my message."

पण दिल्लीस त्यांचेसाठी काय वाढून ठेविले होते? ९ सप्टेंबरच्या सकाळी ते जेव्हा दिल्लीस पोचले; तेव्हा या राजधानीच्या शहरी दंगा उद्भवला आहे हे त्यांना समजले !

■

# ९. निर्वासितांचा लोंढा —
# अखेरचे उपोषण - गांधी गेले!!

नेहरूंचे मंत्रिमंडळ पुरते महिनाभरही अधिकारावर नव्हते तेव्हा पश्चिम पंजाबातून येणाऱ्या निर्वासितांच्या लोंढ्यांनी त्याला 'त्राहि भगवन् ' करून सोडले. खून, जाळपोळी व लुटालूट यांचा कहर झाला होता. पंजाबातून आलेले हे निर्वासित हिंदू व शीख होते आणि पाकिस्तानात जीवन असह्य झाल्यानेच वैतागून ते आले होते. एवढ्या लोकांच्या कमीत कमी जेवणाखाणाची व्यवस्था लावणे जरूर होते, पण ते जर शिस्तीने न वागता हम करेसो कायदा असे वागू लागले तर सरकारलाही त्यांच्यापुढे हात टेकण्याची पाळी येणार! हे सर्व पाहून गांधींनी इतके ठरविले की दिल्लीत शांतता प्रस्थापित होऊन सगळे स्थिरस्थावर झाल्याशिवाय पंजाबात जाणे शक्य नाही. नेहरू एका रेडिओवरील भाषणात म्हणाले, गेले तीन आठवडे मी पूर्व व पश्चिम पंजाबात सर्वत्र हिंडत आहे आणि मी जे पाहातो त्यामुळे व ऐकतो त्यामुळे भयग्रस्ततेने माझे मन व्याकुळ होते. एकीकडे महात्मा गांधी व जवाहरलाल यांचा जयजयकार आणि दुसरीकडे मिळेल त्या हत्याराने रक्तपात करण्याचा सपाटा. गांधींनी आमच्यापुढे ठेविलेल्या ध्येयवादापासून व शिकवणीपासून आम्ही किती दूर गेलो आहो हे समजून शरमेने मान खाली जाते. १० सप्टेंबर रोजी चाळीस मैलांचा फेरफटका दिल्ली व ओखला येथे केला. एक प्रार्थनासभाही त्यांनी घेतली. तेथे केलेले हृदय हलवून सोडणारे त्यांचे भाषण रेडिओवरून देशभर प्रक्षेपित करण्यात आले. गांधींची राहाण्याची व्यवस्था यावेळी भंगी वसाहतीत नव्हती. बिर्ला हाऊसमध्ये त्यांना ठेवण्यात आले, कारण भंगी वसाहतीतील सगळी जागा निर्वासितांनी व्यापून टाकली होती. जीना, लियाकत अली, नेहरू, पटेल या सर्वांनी अल्पसंख्याना न्यायाने व समतेने वागविण्यात येईल अशा घोषणा पाकिस्तान व हिंदुस्तान यांच्या वतीने केलेल्या असता एवढे लक्षावधी निर्वासित आपली पिढीजात घरेदारे सोडून परागंदा होतात याचा अर्थ काय ? केलेल्या गोड घोषणा केवळ शोभेसाठी अथवा दुनियेला फसविण्यासाठी केल्या होत्या काय ? राज्यकर्त्यांनी आपआपल्या देशातील लोकांच्या दुर्वर्तनाची जबाबदारी पत्करली पाहिजे, असे गांधी म्हणाले. दिल्लीच्या फेरफटक्यात त्यांना ही नगरी मेल्यासारखी व सुतकी दिसली. सब्जी मंडीमध्ये भाजी आणि फळे मिळू

नयेत ही केवढी शरमेची बात आहे! हुमायूनच्या कबरीपाशी मेओ निर्वासितांच्या छावणीत गांधी गेले. तेथे त्यांना समजले की, अलवार व भरतपूर संस्थानांतून त्यांना हाकून लावण्यात आले होते. त्यांना पाकिस्तानात पळवून लावणे हा काही त्यावरचा उपाय नव्हे. त्यांना नीट वागणूक देऊन त्यांची नीट व्यवस्था लावणेच योग्य आहे, असे गांधी म्हणाले. दिल्लीच्या जामिया मिलिआमध्ये गेले. तेथे डॉ. जाकिर हुसेन यांची भेट झाली. पण त्यांनी निवेदन केलेल्या अनुभवांमुळे गांधी अत्यंत विषादग्रस्त झाले. जालंदर येथे काही कामाला गेले असता जाकीर हुसेन यांच्यावर प्राण गमावण्याची आलेली पाळी एका हिंदू रेल्वे कर्मचाऱ्याच्या व शीख सेनाधिकाऱ्याच्या हस्तक्षेपामुळे टळली. का? ते मुसलमान होते म्हणून. जामिया मिलियाच्या इमारतीत शंभरावर निर्वासित राहात होते. गांधींनी निर्वासितांना निर्भयपणे, कुणाचे वाईट न चिंतिता राहाण्याची विनवणी केली. १२ सप्टेंबर रोजी जुम्या मशीदीतील निर्वासितांच्या छावणीची पाहाणी करण्याला गांधी गेले. ३० हजार मुसलमान निर्वासित तेथे होते. पुरुष, स्त्रिया, मुले सर्व त्यांत होती. पुराना किला वसाहतीत ५० हजार मुसलमानांना आश्रय मिळाला होता. रिज व इदगा येथे हजारो मुसलमानांना तंबू उभारून त्यांत ठेवण्यात आले होते. दिल्लीच्या दुसऱ्या विभागात पश्चिम पंजाबातून आलेल्या हजारों हिंदूंची सोय केली होती. आठ लाख लोक पश्चिम पंजाबातून पूर्व पंजाबात जाण्यास निघाले होते आणि ते सर्व बिगर-मुसलमान होते. चिंता आणि संशय यांनी सर्व वातावरण भारून गेले होते. आता सरहद्द प्रांतातूनही अस्वस्थ करणाऱ्या बातम्या येऊ लागल्या. आपल्या १२ सप्टेंबरच्या प्रार्थनाप्रवचनात गांधींनी त्याबद्दल दुःख व्यक्त केले. एक माजी मंत्री गिरधारीलाल पुरी यांजकडून तार आली होती, त्यात त्यांनी त्यांना व त्यांच्या पत्नीला तावडतोब सोडवून घेण्याची विनंती केली होती. ही मोठी शरमेची बाब असून जीनांनी सर्व हिंदू व शीखांना मुस्लिमाप्रमाणे सुरक्षित ठेविले पाहिजे. असे गांधी म्हणाले. हे सर्व सांगत असता गांधी क्रोधाला व रागाला बळी पडू नका आणि सूड व बदला घेण्याचे मनात आणू नका, त्यामुळे कोणताच प्रश्न सुटत नाही असे बजावीत होते. एकाचे माथे फिरले तरी दुसऱ्याने आपले माथे फिरवून घेऊ नये. दिल्लीतील लोकांनी लवकर शांतता स्थापावी आणि मला पूर्व व पश्चिम पंजाबात जाऊ द्यावे, असे गांधी म्हणत होते. १३ सप्टेंबरच्या प्रार्थनासभेत गांधींनी हिंदुस्तानातून पाकिस्तानात जाणाऱ्या मुसलमानांसाठी निधी जमविण्याचे पत्रक काढले, पण त्यांत पाकिस्तानातील मुसलमानांच्या गैरवर्तनाबद्दल अवाक्षर काढले नाही, याबद्दल आश्चर्य प्रकट केले. दोनही डोमिनिअन देशांनी आपआपल्या देशातील बहुसंख्याच्या

दुष्कृत्यांची मोकळेपणाने व धैर्याने कबुली दिली पाहिजे. निर्वासितांच्या छावण्यांत माजलेला घाणेरडेपणा व गलिच्छपणा पाहून त्यांना वाटले, त्यांनी असे कां राहावे? घाण दूर करणे आणि स्वच्छता ठेवणे त्यांना कां अशक्य व्हावे? या बाबतीत हिंदु–मुसलमान दोघे सारखेच आहेत. हा राष्ट्रीय दुर्गुण आहे आणि स्वातंत्र्य मिळविलेल्यांनी तो झटकून टाकला पाहिजे. त्याचप्रमाणे कायदेकानून न पाळता बेबंद वर्तन करणे, विनापरवाना हिंसक शस्त्रे वापरण हे सगळे प्रकार ताबडतोब थांबले पाहिजेत, असे जीव तोडून गांधी सर्वांना सांगत होते. १५ सप्टेंबर रोजी सोमवार असल्याने त्यांचा लेखी संदेश वाचून दाखविण्यात आला.

त्या संदेशात त्यांनी म्हटले, "माझा सल्ला निश्चित स्वरूपाचा व ठाम आहे. तुमच्या सरकारावर विश्वास ठेवा. ते तुमचे रक्षण बरोबर करील. ज्या कोणाची मालमत्ता हिरावून घेतली गेली असेल त्या अल्पसंख्य लोकांना नुकसानभरपाई मिळेल. जे गतप्राण झाले आहेत त्यांना परत आणणे शक्य नाही. कोणत्याही सरकाराला दिल्लीचे लोक पाकिस्तानकडून न्याय मिळविणे कठीण करीत आहेत, ज्यांना न्यायाची मागणी करायची असते त्यांनी स्वतः न्याय केला पाहिजे व त्यांचे हात स्वच्छ असले पाहिजेत. ज्या मुसलमानांना त्यांच्या घरातून बाहेर काढून हाकून लाविले असेल त्यांनी शीखांनी व हिंदूंनी परत बोलावून त्यांची घरे त्यांच्या हवाली केली पाहिजेत. हे करण्याचे धैर्य ते दाखवतील तर निर्वासितांचा प्रश्न सोपा होईल. पाकिस्तानकडून, नव्हे सर्व जगाकडून त्यांना मान्यता मिळेल. ते दिल्लीची व हिंदुस्तानची बेअब्रू व नाश यांपासून सुटका करतील. लक्षावधी हिंदू, मुसलमान व शीख यांची अदलाबदल करणे विचार करण्याच्या पलीकडे आहे असे वाटते. ते साफ चुकीचेच आहे. पाकिस्तानने केलेली अन्यायी चूक आपण लोकसंख्येची अदलाबदल करण्याचे नाकारून दुरुस्त करता येईल, या विचाराला चिकटून राहाण्याचे धैर्य, माझ्यापाशी आहे, अशी मला आशा आहे. मग हा विचार माझा एकट्याचा का असे ना!"

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ५०० सदस्यांसमोर बोलताना गांधी म्हणाले, "अस्पृश्यता जर टिकणार असेल तर हिंदुत्वाचा नाश अटळ आहे. त्याचप्रमाणे हिंदूंना जर असे वाटत असेल त्यांच्याशिवाय कोणाला, विशेषतः मुसलमानांना या देशात राहाण्याला जागा नाही अथवा ते राहिलेच तर त्यांनी हिंदूंचे गुलाम म्हणून राहिले पाहिजे, तर हिंदुत्वाचा विनाश अटळ आहे. त्याचप्रमाणे पाकिस्तान जर असे म्हणत असेल की तेथे फक्त मुसलमानच राहातील आणि इतर

राहिलेच तर त्यांना गुलामांप्रमाणे राहावे लागेल तर इस्लामची मृत्युघंटा हिंदुस्तानात वाजेल असे खुशाल समजावे!"

गांधी पुढे म्हणाले, " पाकिस्तानने अन्यायाने व चुकीच्या वागण्यानेच कारभार चालविण्याचा हट्ट धरला तर पाकिस्तान व हिंदुस्तान यांमध्ये युद्ध झाल्यावाचून राहाणार नाही. माझ्या मनाप्रमाणे जर घडेल तर मी लष्कर व पोलीस ठेवणारच नाही. परंतु हे बोलणे फोल आहे, कारण मी म्हणजे काही सरकार नव्हे. पाकिस्तानने हिंदू व शीख लोकांना आपली घरेदारे सोडून जाऊ नका म्हणून कां सांगितले नाही व त्यांना सुरक्षिततेचे आश्वासन कां दिले नाही? इंडिअन युनियनमध्ये प्रत्येक मुसलमान सुरक्षित कां राहिला नाही? आज दोनही पक्ष माथेफिरू बनले आहेत. याचा परिणाम म्हणजे विनाश व यातना. राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर जे आरोप करण्यात त्यांच्या खरेखोटेपणाबद्दल मला काहीच माहीत नाही. पण त्यांनी प्रत्यक्ष वर्तनाने ते आरोप निराधार आहेत असे दाखवून दिले पाहिजे."

१६ सप्टेंबर रोजी गांधींना आपली प्रार्थना व सभा रद्द करणे भाग पडले. कारण काही शीखांनी कुराणातील काही मंत्र म्हणण्याला विरोध व अडथळा केला. १७ सप्टेंबरला दिल्लीच्या कापडगिरणीच्या कामगारांसमोर गांधींनी भाषण केले. ही सभा फार मोठी होती. इतर पुष्कळ लोकही सभेला आले होते. दोनही देशांत लोकांनी अन्यायी, जुलमी आणि द्वेषपूर्ण वर्तन केले ही गोष्ट दोनही देशांनी मान्य करावी आणि समेट घडवून आणावा. जरूर असेल तर लवादामार्फत न्याय करावा. यापैकी काही घडणार नसेल तर लढाई अटळ आहे, पण ती पाहाण्याला ईश्वराने मला जिवंत ठेवू नये अशी माझी प्रार्थना आहे, असे गांधी म्हणाले. कामगारांनी हिंदु-मुस्लिम भेद न मानता एकत्र काम करण्याचा प्रघात ठेविला होता याबद्दल गांधींनी त्यांचे अभिनंदन केले. काही मुसलमान मित्रांनी त्यांना दर्यागंज भागातील मुसलमान वस्तीत बोलाविले. त्याप्रमाणे १८ सप्टेंबरला ते तिकडे गेले. माणसे सोडून गेलेली घरे व दुकाने पाहून त्यांचे हृदय भरून आले. असफअलींच्या घरी शंभरएक लोक जमले होते. त्यांनी सांगितले की, आम्हांला निष्ठावंत नागरिक म्हणून येथेच राहायचे आहे, पण सुरक्षिततेचे आश्वासन विशेषत: पोलिसांकडून मिळाले पाहिजे. पाकिस्तानात मुसलमान करीत असलेल्या प्रकारांबद्दल त्यांनी नापसंती व्यक्त केली. पण निरपराधी लोकांना इतरांच्या अपराधांबद्दल शिक्षा होऊ नये असे त्यांचे म्हणणे होते. गांधी त्यांना म्हणाले, " तुम्ही धैर्याने आम्ही आपली घरेदारे सोडणार नाही असे म्हटले पाहिजे व ईश्वरावर भरंवसा

ठेविला पाहिजे. मी स्वतः माझे कर्तव्य करता करताच मरण्याचा निश्चय केला आहे. नोआखली, बिहार, कलकत्ता येथे जे करीत राहिलो तेच आता येथे दिल्लीस करीत आहे. काही लोक म्हणतात की, सरदार पटेल मुसलमानांना पाकिस्तानात जाण्याला उत्तेजन देतात, पण हे खरे नाही. येथे राहून देशाशी बेईमानी करू नका असे त्यांचे म्हणणे आहे ते बरोबरच आहे. येथे राहाणाऱ्या मुसलमानांनी हिंदुस्तानशी एकनिष्ठ राहिले पाहिजे ही गोष्ट सरळच आहे. येथील व पाकिस्तानातील हरएक मुसलमान, शीख, हिंदू कुटुंब पुनः प्रस्थापित झालेले पाहिल्याशिवाय मी राहाणार नाही. लष्कर व पोलीस पक्षपात करतात असे ऐकिवात आहे. ही गोष्ट खरी असेल तर फार दुःखद आहे. त्यांनी कोणताही भेदभाव न करता जनतेची सेवा करणे हे त्यांचे कर्तव्य आहे.''

कुचा ताराचंद म्हणून प्रामुख्याने हिंदू वस्ती असलेल्या भागात १९ सप्टेंबर रोजी गांधी गेले. हा भाग चारी बाजूंनी मुसलमानांच्या वस्तीने वेढलेला आहे. गांधींनी स्पष्टपणे तेथील हिंदूंच्या एका पुढाऱ्याला सांगितले की भारतातील सर्व मुसलमानांनी पाकिस्तानात जावे व पाकिस्तानातील सर्व हिंदू व शीख यांनी भारतात यावे अशा प्रस्तावाला माझी मान्यता कदापि मिळणार नाही. दोन चुकीच्या गोष्टी करून एक बरोबर गोष्ट होत नाही. म्हणून तेथे प्रार्थनेला जमलेल्या सर्वांना त्यांनी निर्भयपणे व शूरपणे वागण्याचा उपदेश केला. तेथील पतौडी हाऊसमधील अनाथालयात तेथून गेलेल्या सर्व निराश्रित मुलांना परत आणण्याची सूचना केली. ७ सप्टेंबर रोजी शेजारच्या मुसलमानांच्या घरातून गोळीबार होऊन एका मुलाचा मृत्यू झाला व दुसरे एक मूल जखमी झाले असे गांधींना सांगण्यात आले. त्यांच्याबरोबर मौलाना अहमद सईद व आणखी काही मुस्लिम मित्र होते. त्यांनी हमी दिली की, मुलांना काही इजा दुखापत होणार नाही. भार्गव नावाचे एकटेच हिंदू त्या मुसलमान वस्तीत होते व ते सुरक्षित होते याबद्दल गांधींना समाधान वाटले. २० सप्टेंबर रोजी प्रार्थनासभेत गांधी म्हणाले, पाकिस्तानात हिंदू व शीखांनी भयग्रस्त असावे ही गोष्ट पाकिस्तानला भूषणावह नाही व जीनांनी स्वतः दिलेल्या आश्वासनांशी विसंगत आहे. जालियनवाला बागेत जेथे हिंदू-मुसलमानांचे रक्त बरोबर सांडले त्याच लोकांमध्ये आता दुजाभाव उत्पन्न व्हावा याबद्दल गांधींना विस्मय व विषाद वाटत होता आणि माझा श्वास बंद होईपर्यंत ही फार चुकीची गोष्ट आहे असे मी म्हणत राहीन, असे गांधी म्हणाले. त्यांना कोणीतरी म्हटले की, भारतातील प्रत्येक मुसलमानाची निष्ठा

पाकिस्तानवर आहे, भारतावर नाही. तेव्हा त्यांनी याचा निषेध केला आणि आपला अनुभव वेगळा आहे, असे ठासून सांगितले.

अशा दंगेदंगलींच्या वातावरणात आणि अतिशय कामात गुंतले असता देखील आपल्या प्रचंड पत्रव्यवहाराकडे अथवा 'हरिजन'साठी मजकूर लिहिण्याकडे त्यांचे दुर्लक्ष नव्हते. सप्टेंबरच्या सुरुवातीला चीनमध्ये युनेस्को ( United Nations Economic, Social and Cultural Oraganisat on ) तर्फे रीजनल स्टडी कॉन्फरन्स ऑन फंडामेंटल एज्युकेशन भरली होती. तिला गांधींनी आपला संदेश पाठविला होता. तो वाचला जात असता सगळे सभागृह त्याचा आदर करण्यासाठी उठून उभे राहिले. संदेशाची भाषा अशी होती: " I am deeply interested in the efforts of the United Nations Economic, Social and Cultural Organisations to secure peace through educational and cultural activities. I fully appreciate that real security and lasting peace cannot be secured so long as extreme inequalities in education and culture exist, as they do among the nations of the world. Light must be carried even to the remotest homes in the less fortunate countries which are in comparative darkness and I think that in this cau)e, the nations which are economically and culturally advanced have special responsibilitys."

'हरिजन' मध्ये २१ सप्टेंबर रोजी लिहिलेल्या लेखात त्यांनी असा इशारा दिला की, केंद्रीय व प्रांतिक सरकारे आणि त्यांची मंत्रालये यांनी जागरूकता दाखविली नाही तर इंग्रजी भाषा हिंदुस्तानीची जागा बळकावून बसेल. 'माझे कर्तव्य' या मथळ्याखाली 'हरिजन'मध्ये लिहिलेल्या लेखात गांधी म्हणतात: माझे निधन तीन प्रकारांनी होऊ शकेल. (१) निसर्गत: वार्धक्यामुळे येणारे मरण (२) फक्त डोळे इकडेतिकडे पाहातात, पण विचारशक्ती नष्ट होते तेव्हा येणारे मरण (३) शरीर व मन कार्यक्षम असताही मी सार्वजनिक काम सोडून दिले तर येणारे मरण. तिसऱ्या प्रकाराचा फक्त विचार करणे योग्य होईल एकंदरीत शेवटचा श्वास चालू आहे तोपर्यंत मी काम करीत राहाणार. म्हणजे 'हरिजन' व संलग्न पत्रे मी असेपर्यंत चालू राहाणार. नवजीवन ट्रस्टकडे त्यांची मालकी आहे आणि ट्रस्टचा विचार ती चालू ठेवावी असाच आहे.

२१ सप्टेंबर रोजी फुल बागेश या मिश्रवस्तीच्या विभागात गांधी हिंडले. तेथील हिंदू-मुसलमानांच्या सभेत बोलताना ते म्हणाले, साडेचार कोटी मुसलमानांना घालवून देणे अथवा मारून टाकणे म्हणजे अशक्य गोष्ट आणि केवळ वेडेपणा आहे. डोके ठिकाणावर असलेला कोणीही माणूस हे कबूल करील. हिंदू,

शीख, मुसलमान सर्वांनी एकत्र व सलोख्याने नांदावे हाच शहाणपणा आहे. कुराणातील मंत्र म्हणण्याला कोणी एकाने हरकत घेतल्यामुळे गांधींनी प्रार्थना केली नाही. सरकारच्या अंगी तेवढी शक्ती नसेल अथवा लोक जर त्यांना न्यायाची योग्य गोष्ट करू देणार नसतील तर ज्यांच्या मनात सर्व मुसलमानांना हाकून देण्याची अथवा ठार करण्याची इच्छा आहे, त्यांच्या हाती राजीनामा देऊन सत्ता सोपवावी. एका वर्तमानपत्राने अशी सूचना केलेली मी पाहिली आहे, असे गांधी म्हणाले. हा सल्ला म्हणजे राष्ट्रीय आत्महत्या करण्याचा आणि हिंदुधर्म-संस्कृती उद्ध्वस्त करण्याचा सल्ला आहे. असे वर्तमानपत्र स्वतंत्र हिंदुस्तानात जिवंत राहावे काय? मुद्रणस्वातंत्र्य ते हेच काय? असे धोरण अनुसरले जावे असे ज्यांना वाटते त्यांनी सरकारचा राजीनामा मागावा. जग आजपर्यंत हिंदुस्तानकडे मार्गदर्शनासाठी पाहात होते ते आता यापुढे पाहाणार नाही आणि जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत अशा पिसाटपणाच्या उपदेशा-विरुद्ध माझा आवाज उठवीत राहीन, असे गांधीजी म्हणाले.

२२ सप्टेंबरच्या प्रार्थनासभेत गांधींनी विगरपरवाना शस्त्रे व बंदुका-पिस्तुले वगैरे चोरून बाळगणारांचा विषय चर्चेला घेतला. या सर्व लोकांना हुडकून काढून निःशस्त्र केलेच पाहिजे. अल्पसंख्य देशद्रोही असणारच असे गृहीत धरून बहुसंख्यांनी त्यांना ठार करणे अथवा हद्दपार करणे हे भेकडपणाचे लक्षण आहे. बहुसंख्यांनी अल्पसंख्यांच्या हक्कांना जपणे हेच त्यांना भूषणावह आहे. दिल्लीने देशाच्या इतर भागात काय चालले आहे ते विसरून जावे व आपले कर्तव्य करावे.

२३ सप्टेंबर रोजी रावळपिंडी व डेराइस्माइलखान येथून हिंदू व शीख लोकांची शिष्टमंडळे गांधींना भेटण्यास आली. त्यांनीच रावळपिंडीला आजच्या स्थितीला आणले आहे. आणि ते सर्व तेथे सुखात नांदत होते. पण आज ते निराधार निर्वासित झाले आहेत. त्याचप्रमाणे आजकालची दिल्ली उभी करण्यात मुसलमानांचा हिस्सा लहानसहान नाही. अशा रीतीने सर्व धर्मांच्या व जाती-जमातींच्या लोकांनी आजचा हिंदुस्तान घडविला आहे. पाकिस्तानने आपल्या हद्दीतील सर्व शीख आणि हिंदूंना पूर्ण संरक्षण दिले पाहिजे. सर्व अल्पसंख्यांना दोनही राज्यांत असे संरक्षण असले पाहिजे. रावळपिंडीत अजून १८ हजारां-पेक्षा जास्त शीख व हिंदू होते व वाहच्या छावणीत ३० हजारांहून अधिक होते.

२४ सप्टेंबरच्या प्रार्थनासभेत गांधी म्हणाले, "सूड व बदला घेण्याच्या वृत्तीने सर्व वातावरण व्यापून गेले आहे. दिल्लीच्या हिंदू-शीखांना मुसलमान आपल्या शहरात नको आहेत. आम्हाला जर पाकिस्तानातून हाकून दिले आहे

तर आम्ही तरी त्यांना येथे कशाला ठेवून घ्यावे? पण लोक जर कायदाकानून न पाळता आपसात लढत राहातील तर मिळालेले स्वातंत्र्य पचविण्याची पात्रता त्यांच्यामध्ये नाही एवढेच फक्त सिद्ध होईल. जर एक डोमिनिअन प्रदेश रास्त मार्गाने वागेल तर दुसऱ्याला तसे वागणे भागच पडेल. जुनागड येथे काय चालले आहे ते पाहा. जुनागड एकीकडे व काठियावाडातील इतर संस्थाने दुसरीकडे असा लढा सध्या चालू आहे. पण इतर सर्व संस्थानिक जर खरोखर एकजुटीने वागतील तर जुनागडला त्यापासून फटकून राहाता येणारच नाही. यासाठी कायदेकानून पाळणे आणि समंजसपणा दाखविणे अत्यावश्यक आहे."

२५ सप्टेंबरच्या प्रार्थनासभेत गांधींनी तेच विवेचन परोपरीने चालू ठेविले आणि सांगितले की, गव्हर्नर-जनरल लॉर्ड माऊंटबॅटनबरोबर झालेल्या भेटीत दिल्लीच्या पुढारी मंडळीच्या सभेत आणि काँग्रेस कार्यकारिणीच्या सभेत एकच निर्वासिताचा प्रश्न चर्चिला जात होता. मनुष्याच्या हाती फक्त आटोकाट शिकस्तीचा प्रयत्न करण्याचे आहे. बाकी पुढील सर्व ईश्वराची इच्छा असेल तसेच घडणार.

२६ सप्टेंबरच्या प्रार्थनासभेत गांधी म्हणाले, "मला सर्वांनी दिल्ली-मध्ये शांतता प्रस्थापित करण्याला प्रथम मदत करावी. मग मी पश्चिम पाकिस्तानात, मोठ्या जोमाने जाईन. लाहोर, रावळपिंडी, शेखपुरा व पश्चिम पंजाबातील इतर स्थळांना भेटी देईन. त्याचप्रमाणे सरहद्द प्रांतांत व सिंध प्रांतातही जाईन. मी सर्वांचा सेवक आहे आणि मला कोणी कोठे अडवणार नाही अशी माझी खात्री आहे. मी लष्करी अथवा पोलीस मदतीने कोठही जाणार नाही. मी माझे जीवित अगदी विश्वासाने लोकांच्या हाती सोपवीन."

पाकिस्तानातून आलेला प्रत्येक शीख व हिंदू पुनः आपल्या मूळच्या घरी प्रस्थापित झालेला पाहिल्याशिवाय मी विश्रांती घेणार नाही, असेही गांधींनी सांगितले.

२७ सप्टेंबरच्या प्रार्थनासभेत 'ग्रंथसाहेब' या गुरु नानकांच्या ग्रंथातील एक मंत्र घेऊन त्याचे विवरण केले. माणूस ईश्वराला भिन्न भिन्न नावे देतो, राम, खुदा वगैरे. कोणी यात्रेला एखाद्या नदीच्या तीरावर जातात, कोणी मक्केला जातात, कोणी मंदिरात त्याची पूजा करतात, कोणी मशिदीत तर कोणी नुसतेच नतमस्तक होतात. कोणी वेदपठण करतात, कोणी कुराणपठण करतात. कोणी निळा, कोणी पांढरा पोशाख करतात, कोणी आपल्याला हिंदू म्हणवितात, कोणी मुस्लिम म्हणवितात, गुरु नानक म्हणतात, जो कोणी ईश्वराचा कायदा मानतो तो त्याचे रहस्य ओळखतो. हिंदुधर्मात ही शिकवण

सार्वत्रिक आहे. म्हणून साडेचार कोटी मुसलमानांना देशाबाहेर घालविण्याचा पिसाटपणा समजणे खरोखर कठीण आहे, असे सांगून नंतर डॉ. राजकुमारी अमृत कौर यांजकडून ऐकलेली हकीकत सांगितली. त्या नेहरूंच्या मंत्रिमंडळात आरोग्यमंत्री आहेत. त्या धर्माने ख्रिस्ती आहेत आणि म्हणून आपल्याला हिंदू व शीख म्हणवितात. सर्व निर्वासित छावण्यात हिंदू–मुस्लिमांच्या कल्याणाकडे लक्ष पुरवितात. त्यांनी ख्रिस्ती मुलींचे व तरुणांचे एक पथक मुस्लिम निर्वासितांच्या छावणीत सेवेसाठी तयार केले. आता काही 'सतत आणि बेअकली लोकांनी ख्रिश्चनांना दमदाटी द्यायला सुरुवात केली आणि त्यांनी आपली घरे सोडली. राजकुमारी कौर यांजकडून समजले की काही हिंदूंनी गरीब ख्रिस्त्यांना संरक्षण दिले ही आनंदाची गोष्ट आहे. मला आशा आहे की ते लवकरच आपल्या घरी शांतपणे परततील.

२८ सप्टेंबरला नेहमीपेक्षा मोठा समुदाय प्रार्थनेसाठी जमला होता. दोन इसमांनी कुराणातील मंत्र वाचण्याला हरकत घेतली. गांधींनी ती मानली, पण दोन माणसांनी हजारो माणसांवर हा जुलूम करावा हे योग्य नाही, असे त्यांनी बजाविले. सद्यःपरिस्थितीबद्दल चर्चिल यांनी काढलेले उद्गार त्यांनी श्रोत्यांना नजर केले ते असे: " The fearful massacres which are occuring in India are no surprise to me. We are, of course, only at the beginning of these horrors and butcheries, perpetrated upon one another with the ferocity of cannibals by the races gifted with the capacities for highest culture and who had for generations dwelt side by side in general peace under the broad, to lerant and impartial rule of the British Crown and Parliament. I cannot but doubt Ithat the future will witness a vast abridgement of the population throughout, what has for sixty or seventy years been the most peaceful part of the world and that, at the same time, will come a retrogresssion of civilisation throughout these enormans regions, constituting one of the most melancholy tragedies which Asia has ever known. "

तारीख २९ सप्टेंबरच्या प्रार्थना-प्रवचनात गांधी म्हणाले, "काही वर्तमानपत्रांनी माझे म्हणून असे उद्गार छापले आहेत की त्यांनी मी इंडिया व पाकिस्तान यांमधील युद्धालाच उत्तजन देत आहे. पण भारताला आणि सर्व जगाला माहीत आहे, की असले यादवी युद्ध होऊ नये म्हणून मी आपली पराकाष्ठा करीत आहे. अहिंसेला वाहिलेला मनुष्य जेव्हा युद्धाचा उल्लेख करतो तेव्हा ते टाळण्याकरिता सर्वस्व पणाला लावण्याच्या निश्चयानेच करतो. ही माझी मूलभूत भूमिका आहे आणि तिच्यापासून मरेपर्यंत मी कधी ढळणार नाही.'

३० सप्टेंबरच्या प्रार्थनाप्रवचनात गांधींनी विचारले, "मुसलमानांवर होणारे हल्ले म्हणजे कोणावरचे हल्ले? हिंदुस्तानातील मुसलमान काही अरबस्तानातून आलेले नाहीत. कोटयवधी हिंदूंचेच धर्मांतरामुळे झालेले मुसलमान, म्हणजे भारतीय मसलमान. हिंदूंनीच अस्पृश्यांना मुसलमान होण्याला आपल्या वर्तणुकीने भाग पाडले आहे. त्या आपल्याच भावांबहिणीवर जुलूम करणे अथवा त्यांना ठार करणे हिंदूंना कधीच शोभणारे नाही."

१ ऑक्टोबरच्या प्रार्थनासभेत एक मनुष्य प्रश्न विचारण्याला म्हणून उभा राहिला, पण त्याने लहानसे भाषणच केले. तो म्हणाला, मुसलमानांबरोबर आम्ही शांततेने नांदू, पण त्यांनी इंडियन युनियनशी एकनिष्ठ राहिले पाहिजे आणि जवळ असलेली शस्त्रे, बंदुका, पिस्तुले वगैरे बिगरपरवाना आयुधे न मागताच टाकून दिली पाहिजेत.

गांधी म्हणाले, "हे अगदी बरोबर आहे. पण हे सर्व काम सरकारी हुकमतीने झाले पाहिजे, अशी तिसरी एक अट या गृहस्थांनी मान्य केली पाहिजे."

पुराना किल्लामध्ये ५० हजार मुसलमान निर्वासित राहात होते, तसेच हुमायूनच्या कबरीजवळ. पण तेथील राहणी विशेष काही चांगली नव्हती, ती चांगली करण्याकडे लक्ष पुरविणे जरूर होते. पाकिस्तानात हिंदू-शीख अशाच अवस्थेत होते असे म्हणणे हा काही त्यावर इलाज नव्हे. हिंदू व शीखांनी पुष्कळ हाल सोसले हे खरे. लाहोर येथे त्यांनी अनेक शैक्षणिक व इतर संस्था उभारल्या आणि त्या सर्व खाजगी प्रयत्नांनीच नावारूपास आल्या होत्या. पंजाबी लोकांनी पैसे खूप मिळविले व दानधर्मावर पुष्कळ खर्च केला. उत्तम प्रकारची इस्पितळे त्यांनी लाहोरास उभारली. ती सर्व योग्य त्या वारसांच्या हाती दिली गेली पाहिजेत. पण हे काम युनियन सरकारने पाकिस्तान सरकार-कडून करविण्याचे आहे. तसेच पाकिस्तानने युनियन सरकारकडून न्यायाची मागणी मुसलमानांसाठी करणे योग्य आहे. दिल्लीतील एका इस्पितळावर हल्ला करून चार रुग्णांना ठार केल्याची व नैनितालहून दिल्लीस येणाऱ्या चालत्या आगगाडीतील मुसलमान प्रवाशांना खाली ओढून जखमी केल्याची बातमी श्रोत्यांना सांगून गांधी म्हणाले, या अमानुष व राक्षसी कृत्यांची काही तर्क-संगतीच मला लागत नाही!

२ ऑक्टोबर रोजी गांधी ७८ वर्षांचे झाले तेव्हा त्यांना अनेक भारतीय व विदेशी थोर व्यक्ती व संस्था यांजकडून अभिनंदनपर पत्रे आणि तारा आल्या. प्रत्यक्ष येऊन अभिनंदन करणारांमध्ये लेडी माऊंटबॅटन या होत्या. पण गांधी

मात्र स्वतःच्या मनाशी खट्टू होते. ही अभिनंदने म्हणजे शोकसंदेशच आहेत असे त्यांना वाटले. त्यांच्या मनातील दुःखवेदना हिंदू-मुसलमानांमधील भडकलेल्या द्वेषभावनांमुळे अत्यंत तीव्र होत्या. नेहरूंनी गांधींचे ऐका म्हणून सर्वांची विनवणी केली. दिल्लीस या निमित्त जाहीर सभा झाली. श्रीमती सरोजिनी नायडू यांनी लक्षात राहाण्याजोगे भाषण केले. त्या म्हणाल्या, चमत्कारांचे युग संपले आहे असे म्हणणे चूक आहे. कारण गांधी हाच एक मोठा चमत्कार आहे. त्यांनी गांधींना 'माय लीडर, माय फ्रेंड, माय फादर' असे म्हणून अभिवादन केले.

एका अभिनंदनपर संदेशाला उत्तर देताना गांधीजींनी म्हटले, "The ideal thing would be neither to wish to live for 125 years nor to wish to die now. Mine must be a state of complete resignation to the Divine will."

३ ऑक्टोबर रोजी एका फ्रेंच माणसाचे पत्र गांधींना आले. त्यात त्याने ईश्वराने १२५ वर्षे आयुष्य त्यांना देऊन ईश्वरनियोजित कार्य करू द्यावे अशी सद्भावना व्यक्त केली होती. त्यावर गांधी म्हणाले, गोड शब्दांनी मी फसणार नाही. मी पूर्वी जे काही केले अथवा मिळविले असेल ते सर्व विसरले पाहिजे. यापुढे मी कितपत लोकसेवा करीन आणि माझ्या शब्दांना किती किंमत दिली जात आहे याबद्दल मला संशय उरलेला नाही. मी आता अधिक सेवा करू शकणार नसेन तरी ईश्वराने मला घेऊन जावे हेच उत्तम !

४ ऑक्टोबर रोजी कुरुक्षेत्र छावणीत २५ हजार हिंदू व शीख निर्वासितांसमोर गांधी म्हणाले, यांच्यासाठी व सतत येत असलेल्यासाठी तंबू उभारण्यात आले आहेत. पण सगळ्यांना आसरा देणे अशक्य आहे. त्यांना देण्यात येत असलेले म्हणजे मृत्यू न यावा आणि उपासमार न व्हावी इतक्याच बेताचे आहे. शिवाय त्याचा दर्जा पाहिला म्हणजे कुपोषण व रोगराई यांना निमंत्रण देण्याचा हा खासा उद्योग आहे असे वाटल्यावाचून राहात नाही. आता लवकरच दिल्लीची कडक थंडी सुरू होईल आणि निर्वासितांना शीतनिवारण्यासाठी गरम घोंगड्या व ब्लँकेटांचा पुरवठा करावा लागेल. तरी सर्वांनी या कामाकडे लक्ष द्यावे अशी विनंती गांधींनी केली.

६ ऑक्टोबरच्या प्रार्थनासभेत डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी अन्नपुरवठ्याच्या प्रश्नाबद्दल चालविलेल्या प्रयत्नांचा गांधींनी उल्लेख केला. त्यांच्या मते अन्नधान्यांचे केंद्रीकरण व रेशनिंग हे बरोबर उपाय नाहीत. पण सरकारच्या विशेषज्ञांना तेच उपाय परिणामकारक व उपयुक्त वाटत होते.

७ ऑक्टोबरच्या सभेत हाच विषय त्यांनी आणखी चर्चिला आणि सरदार पटेल व जवाहरलाल नेहरू यांच्या सरकारवर भरंवसा ठेवून त्यांच्यावरील निष्ठा ढळू देऊ नका, असा उपदेश केला.

९ ऑक्टोबरच्या सभेत गांधी म्हणाले, "माझे म्हणणे सर्व शांततेने एकतात, पण एवढ्याने भागणार नाही. पाकिस्तानातील हिंदू व शीख महान संकटात आहेत. त्यांना सर्वांना भारतात आणणे कठीण आहे. काही वाटेतच मृत्युमुखी पडतील. दोनही सरकारे समजूतदारपणे वागून हा निर्वासितांचा प्रश्न सोडविणार नसतील तर युद्ध अटळ दिसते, मग हा मार्ग माझ्या कितीही नापसंतीचा असो."

१० ऑक्टोबरला गरम कपडे, ब्लँकेट येऊ लागली आहेत असे गांधींनी जाहीर केले. अन्न व वस्त्र यांचा देशात तुटवडा आहे याबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. आपल्याकडे भरपूर सुपीक जमीन आहे आणि लोकसंख्या मोठी आहे. या दोहोंचा सरकारने संघटितपणे नीट उपयोग केला तर या वस्तूंवरील नियंत्रणे चालू ठेवावी लागणार नाहीत, असे गांधी म्हणाले.

१२ ऑक्टोबरला आणखी ब्लँकेटे आल्याचे गांधींनी सांगितले. निवसितांनी मद्यपानात, जुगारात व भांडणात वेळ घालवू नये, उपयुक्त मेहनत व काम करावे व शेजारच्या लोकांत मिसळून जावे. सर्वांच्या ठिकाणी कमालीची सहिष्णुता हवी ; म्हणजे सध्याच्या विपदेतून सगळ्यांना बाहेर पडता येईल, असे गांधी म्हणाले.

दररोज याचप्रकारचा उद्घोष गांधी सर्वांच्या कानीकपाळी घालीत होते. असे करताकरता ऑक्टोबरची २२ तारीख उगवली. दसरा व बकरी-ईद हे सण जवळ आले होते. प्रत्येक हिंदू, मुसलमान व शीख आपल्या घरी सुखाने परतल्याशिवाय माझे समाधान होणार नाही, असे गांधी म्हणाले. २३ ऑक्टोबरला एका निरपराध चष्म्याचे दुकान चालविणाऱ्या मुसलमानाचा तो आपले दुकान उघडीत असता अचानक खून करण्यात आला. पोलीस व लष्कर अशा वेळेला काय करीत असतात ? गांधींना असल्या बिनडोक हत्याकांडाचा काही उमजच पडत नव्हता. दिल्लीच्या सेंट्रल जेलमध्ये तेथे असलेल्या तीन हजार कैद्यांसमोर प्रार्थनासभा घेण्याची विनंती त्यांना करण्यात आली. त्यांनी आनंदाने तिला मान्यता दिली. मी एक निढावलेला कैदी आहे, असे सांगून त्यांनी आपले दक्षिण आफ्रिकेतील व या देशातील तुरुंगवासाचे अनुभव सांगितले.

२६ ऑक्टोबरच्या सभेत काश्मीरमध्ये काय चालले होते याचा ऊहापोह गांधींनी केला. काश्मीरला पाकिस्तानात सामील होण्याकरता पाकिस्तान जबरीचे उपाय

योजीत आहे अशा वार्ता वर्तमानपत्रांत आल्या होत्या. काश्मीर, जुनागड, हैदराबाद या संस्थानांवर अशा प्रकारचे दडपण कोणीही आणणे योग्य व न्याय्य नाही. त्यांनी सर्व राजेमहाराजांना सांगितले की, ते काही त्यांच्या संस्थानांचे खरे राज्यकर्ते नाहीत. सर्वजण ब्रिटिश साम्राज्यशाहीने निर्मिलेले राजे होते. ब्रिटिश सत्ता आता गेली. आता खरे राज्यकर्ते म्हणजे संस्थानी प्रजा. काश्मिरात प्रजेने कोणाचे दडपण न जुमानता स्वेच्छेने आपले भवितव्य ठरविले पाहिजे.

२७ ऑक्टोबरला प्रार्थनासभेत त्यांचे भाषण वाचून दाखविण्यात आले. त्यात त्यांनी म्हटले मुसलमानांना इंडियन युनियनमधून त्यांच्या घरादारातून बाहेर काढून पाकिस्तानात घालविण्यात येत आहे असे आरोप एकसारखे करण्यांत येत असल्याच्या तक्रारी येत आहेत. माझी पक्की खात्री आहे, की नेहरू मंत्रिमंडळाचे हे धोरण मुळीच नाही आणि संबंधितांनी मंत्र्यांकडे ताबडतोब दाद मागावी. कोणाची जबरदस्ती, सरकारी अधिकारी करीत असतील तर त्यांची सुद्धा मुळीच गय करू नये. २५ ऑक्टोबरच्या 'हरिजन'च्या अंकात गांधींनी भाषावार प्रांतरचना व भाषावार विद्यापीठे या दोनही कल्पनांना आपला पाठिंबा दर्शविला. मात्र सध्या काँग्रेसवर आणि तिच्या सरकारवर इतर गोष्टींचा फार भार पडत असल्याने या गोष्टी थोड्या दमानेच व सावकाशीने घ्याव्यात, असा अभिप्राय गांधींनी प्रकट केला.

२७ ऑक्टोबर, १९४७ रोजी काश्मीर इंडियन युनियनमध्ये सामील झाले. आणि भारतीय लष्कर श्रीनगरला रवाना करण्यात आले. कारण टोळीवाल्यांचे हल्ले त्या प्रदेशावर होऊ लागले होते आणि त्याचे आणि तेथील जनतेच्या जीवितवित्ताचे संरक्षण करणे निकडीचे होऊन बसले. काश्मीरच्या राज्यकर्त्याने इंडियन युनियनला तशी विनंती करून व काश्मिरी जनतेचे पुढारी शेख अब्दुल्ला यांना मुख्यमंत्री नेमण्याचे कबूल केल्यावर इंडियन युनियनला ही कृती करावी लागली. काश्मीर-मधील परिस्थितीवर बोलताना गांधीजी म्हणाले, काश्मीरच्या सत्ताधीशाने आपल्या संकटकाळी जेव्हा इंडिअन युनियनचे गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊंटबॅटन यांजकडे इंडियन युनियनमध्ये सामील होण्याचा आपला मनोदय व्यक्त केला, तेव्हा त्यांची विनंती त्यांना धुडकावून लावता येईना. भारत सरकारने विमानाने सैन्य काश्मिरात पाठविले आणि त्याचवेळी स्पष्ट केले, की हे सामीलीकरण हंगामी आहे; धर्माचा विचार न करता पुढे होणाऱ्या सार्वमताने ते सामीली-करण पक्के होईल. सार्वमत निःपक्षपाती असेल. काश्मीरच्या महाराजांनी शहाणपणाने शेख अब्दुल्ला यांना मुख्य मंत्री नेमले होते. त्यांनीही मनापासून महाराजांच्या निमंत्रणाचा स्वीकार केला होता. परिस्थिती कशा प्रकारची

होती? आफ्रिडी व इतर टोळ्यांचे बनलेले बंडखोर सैन्य, चांगल्या हपिसरांच्या नेतृत्वाखाली श्रीनगरावर चाल करून जात होते आणि वाटेत लागणाऱ्या खेड्यापाड्यांत लुटालूट करून व आगी लावीत ते पुढे सरकत होते. इलेक्ट्रिक पॉवर हाऊसचा विध्वंस करून श्रीनगरला काळोखात बुडविण्याचा या सैन्याचा संकल्प होता. पाकिस्तान सरकारकडून उत्तजन मिळाले असल्याशिवाय त्याचा शिरकाव होणे शक्य नव्हते. अशा वेळी इंडियन युनियन सरकारने थोडे का असेना, पण सैन्य काश्मीरकडे पाठविले हे योग्यच केले. शेख अब्दुल्ला व काश्मिरी जनता यांना धीर देण्याला ही कृती पुरेशी व अवश्य होती. आणि बंडखोर सैन्याला ताळ्यावर आणण्याला देखील तिचा उपयोग होता.

१ नोव्हेंबर रोजी आपल्या प्रार्थनासभेत गांधींनी आपल्या श्रोत्यांना काश्मीरचा नकाशा आपल्या मनःचक्षुंपुढे आणण्याची विनंती केली. जेव्हा सैन्य विमानातून काश्मीरकडे रवाना होत होते तेव्हा त्यांचे चित्त शेख अब्दुल्ला व तेथील जनता यांजकडे लागले होते. जे लोक काश्मिरातून भीतीने पळून इकडे येत होते, त्यांना निर्भयतेने आपली जागा सोडू नका असे सांगितले. काश्मीरचे रक्षण करता करता सगळे लष्कर व लोक कामास आले तरी हरकत नाही, पण स्त्रिया, मुले, पुरुष कोणी पळून जीव वाचवू नये. आफ्रिडी व इतर टोळीवाले काश्मिरींच्या वाटेस जाणार नाहीत अशी आशा त्यांनी व्यक्त केली. काश्मिरींना लष्करी मदत इंडियन युनियन सरकरने देणे व शेख अब्दुल्लांनी शस्त्रबलाचा वापर करणे गांधींना पसंत नव्हते तरी उभयतांनी दाखविलेल्या समयज्ञतेबद्दल व चोख वर्तनाबद्दल त्यांचे कौतुक करणे हे महात्मा गांधींना औचित्यपूर्ण वाटते.

३ नोव्हेंबर रोजी गांधींनी अन्नधान्यांवर नियंत्रणे बसविण्याच्या राजेंद्रप्रसादांच्या व इतर राज्य मुख्यमंत्र्यांच्या, उपक्रमांबद्दल नापसंती व्यक्त केली. ते म्हणाले, "नियंत्रणामुळे लबाडी, फसवणूक, सत्यापलाप, काळाबाजार आणि कृत्रिम टंचाई हे प्रकार सुरू होतात आणि माणसे निर्बल व परावलंबी बनतात. स्वावलंबन लयाला जाते. दुसऱ्या महायुद्धाने हे 'स्पून फीडिंग' म्हणजे सगळ्यांना चमच्याने भरविण्याचे दुष्ट चक्र सुरू केले. सरकारने उघड्या व मोकळ्या बाजारात धान्य खरेदी करून, त्याचे साठे करून ते कां विकू नये?"

४ नोव्हेंबर रोजी एकाने प्रश्न विचारला की डुकरांची कत्तल जर पाकिस्तानात बंद केली आहे तर गोहत्येला हिंदुस्तानात बंदी कां नसावी? गांधी म्हणाले, पाकिस्तानात सदरहू गोष्ट अंमलात आली असेल तर ते बरोबर नाही. इस्लामी कायद्याने डुकरांचे मांस मुस्लिमांना वर्ज्य ठरविले आहे हे खरे,

पण इतरांना, उदाहरणार्थ, ख्रिस्ती लोकांना त्यापासून वंचित कां ठेवावे? जीनांनी सांगितलेले आहे की पाकिस्तान हे धर्माधिष्ठित राज्य नाही, पण प्रत्यक्ष कृती मात्र या घोषणेला धरून झालेली नाही हे दुर्दैवाने खरे आहे. पण म्हणून इंडियन युनियनने धर्माधिष्ठित राज्य व्हावे काय आणि हिंदू धर्माच्या आज्ञा अहिंदूंवर लादाव्या काय ? क्षुद्र मनस्कता आणि धर्मवेडेपणा यांची अपेक्षा भारत आणि पाकिस्तान यांजकडून एशियाई व आफ्रिकी लोक करीत नाहीत तर उदारपणा आणि भलेपणा यांची अपेक्षा करतात.

५ नोव्हेंबरच्या प्रार्थनासभेत चर्चिल, हिटलर, मुसोलिनी यांना अहिंसेचे धडे देण्याचा प्रयत्न केल्याबद्दल एका पत्रलेखकाने त्यांची टर उडविण्याचा प्रयत्न केला होता, त्याची खबर गांधींनी घेतली. यापैकी कोणावर फार काय नेहरू-पटेलांवर देखील या कामी माझा काही प्रभाव पडत नाही हे मी खूप समजून आहे असे उत्तर गांधींनी दिले.

६ नोव्हेंबर रोजी वेगवेगळ्या राज्यात मंत्र्यांचे काम करीत असलेल्या गृहस्थांची भेट राजेंद्रप्रसादांच्या कृपेने झाली, असा निर्देश गांधींनी केला. अन्न-वस्त्र यांवर कसलीही नियंत्रणे नसावी हेच मत त्यांनी पुन: सर्वांपुढे सादर केले.

७ नोव्हेंबरला गांधी तेहार येथे मुसलमान वस्तीत गेले. दोन हजार माणसें त्यांच्याभोवती जमली. त्यांनी सांगितले की, आमचे आप्तेष्ट पाकिस्तानात गेले आहेत व आमची पण जाण्याची इच्छा आहे. गांधी म्हणाले, तुमचे म्हणणे मी नेहरू व पटेल यांजकडे पोचवीन. मला काही करण्याचा कसलाही अधिकार नाही. ९ नोव्हेंबरच्या सभेत गांधींनी सर्वांना विशेषत: स्त्रियांना असा सल्ला दिला, की सध्याच्या संकटकाळात दरवर्षाप्रमाणे दिवाळी साजरी करण्याचा हव्यास कोणी धरू नये. याच दिवशी जुनागड संस्थान सर्वांच्या संमतीने इंडियन युनियनमध्ये सामील झाले. जीनांचीही त्याला मान्यता असावी असे गांधीजींना वाटले, म्हणून ते म्हणाले की, आता काश्मीर व हैदराबाद यांचे प्रश्नही फार काळ रेंगाळत पडणार नाहीत. इतकेच काय, पण भारत व पाकिस्तान यांचे संबंधही स्नेहाचे व सहकार्याचे होण्याला आरंभ होईल, असा आशावाद गांधींनी १० नोव्हेंबरच्या सभेत प्रकट केला पण गांधींचा हा आनंद एक दिवस देखील टिकला नाही. ११ नोव्हेंबर रोजी त्यांनीच सांगितले की, जुनागडमध्ये सैन्य घुसविले, बेकायदा वर्तन केले, वगैरे निरर्गल आरोप पाकिस्तानने करून खूप आकांडतांडव केले. गांधींच्या मते यापैकी काही झाले नव्हते. जुनागडची ८० टक्के प्रजा हिंदू होती. तिची भारतात जुनागडने सामील व्हावे याला अनुमती होती. पूर्णपणे पगडी फिरविण्याचा प्रकार पाकिस्तानने व दिवाण भुत्तो यांनी केला होता. यात कोणाचे बरोबर व

कोणाचे चूक हे नि:पक्षपाती लवादच ठरवू शकेल. येथे असा लायक लवाद मिळत नसेल तर दुनियेच्या कोणत्याही भागातून तो पैदा करावा असे गांधींनी प्रतिपादन केले.

१२ नोव्हेंबरच्या सभेत गांधींनी नेहरूंच्या काश्मीर-भेटीचा उल्लेख केला. काँग्रेस कार्यकारिणीच्या सभेला नेहरू हजर राहू शकले नाहीत आणि पटेल जुनागडास गेले होते. त्याबद्दल जीना व भुत्तो दोघांना राग आला होता आणि भारत सरकारने जुनागडबाबत आपली फसवणूक केली अशी त्यांची भूमिका होती. १३ नोव्हेंबर रोजी काँग्रेस कार्यकारिणीची सभा झाली. धर्मजातिवंशनिरपेक्ष स्वातंत्र्य व समता जर सर्व नागरिकांना मिळणार नसेल तर असल्या स्वातंत्र्याची काँग्रेसला काही किंमत वाटत नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, काँग्रेस आणि तिचे प्रतिनिधित्व करणारे सरकार यांना लोकसत्ताक पद्धती आणि सर्वांना धर्माचरणाची अप्रतिहत मोकळीक देणे हे अवश्यमेव कर्तव्य वाटते, असे विचार सभेत व्यक्त झाले.

१४ नोव्हेंबरच्या प्रार्थनासभेत गांधी म्हणाले, पुरे तीन तास कार्यकारिणीने अखिल भारतीय काँग्रेस समितीपुढे ठेवावयाच्या ठरावांचा खल केला. पाकिस्तानने कशीही वर्तणूक अल्पसंख्याच्या संबंधात केली तरी भारताने 'उसने फेडण्याची' वृत्ती न ठेवता आपल्या अल्पसंख्यांना, न्यायाने माणुसकीने आणि समान नागरिकत्वाच्या नात्यानेच वागविले पाहिजे, हे गांधींचे म्हणणे कार्यकारिणीला सर्वस्वी मान्य होते. नंतरचे दोनतीन दिवस अन्न व वस्त्र यांवरील नियंत्रण या विषयावरच आपले विचार पिंजून पिंजून सांगत होते. अर्थात नियंत्रणाची कल्पनाच त्यांना अमान्य होती. स्वातंत्र्यानंतरची पहिली अखिल भारतीय काँग्रेस समितीची सभा दिल्लीस १५ नोव्हेंबरला सुरू झाली व १७ तारखेला संपली. कृपलानी यांनी पहिल्याच दिवशी आपला अध्यक्षपदाचा राजीनामा सादर केला. आपल्याला सरकार विचारीत नाही आणि विश्वासात घेत नाही, अशी त्यांची तक्रार होती. गांधी म्हणाले, त्यांचे म्हणणे बरोबर आहे व राजीनामा समर्थनीय आहे. आचार्य नरेंद्र हे अध्यक्ष व्हावे असे गांधी व नेहरू यांस वाटत होते. पण अखेरीस नेहरू व पटेल यांनी विनंती केल्यावरून राजेंद्रप्रसाद यांनी अध्यक्षपद स्वीकारण्यास संमती दिली. गांधींच्या मार्गदर्शनाखाली आय. सी. सी. ने निर्वासितांची परतपाठवणी, जातीय संस्था, संस्थाने आणि नियंत्रणे या विषयावर ठराव पास केले. काँग्रेसचे मूलभूत धोरण यावरील ठराव पुढीलप्रमाणे होता :

" At this moment of crisis, it is necessary that the Congress should declare its faith and policy in the clearest terms and that the people as well as, the Government should follow

that policy unswervingly. Even though the Congress agreed to a division of the country in the hope which thus far proved vain, that thereby the internal conflicts might cease, it has never accepted the theory that there are two or more nations in India. The Congress has firmly believed in the whole of India as a nation, bound together by indissoluble cultural and historical links, which had been further strengthened in the course of the national struggle for freedom. It was on the basis of this faith that the Congress grew up as a national institution open to all Indians, without difference of creed or religion. India is a land of many religions and many races and must remain so. Nevertheless, India has been and is a country with a fundamental unity and the aim of the Congress has been to develop this country as a whole as a democratic, secular state, where all the citizens enjoy full rights and are equally entitled to the protection of the State, irrespective of the religion to which they belong. The Constituent Assembly has accepted this as the basic principle of the Constitution. This lays on every Indian the obligation to honour it.

" The Congress wants to reassure the minorities in India that it will continue to protect, to the best of its ability, their citizen rights against any aggression. The Central Government as well as the Provincial Governments must accordingly make every effort to create conditions wherein all minorities and all citizens have security and opportunity for their progress. All citizens have also, on their part, not only to share in the benefits of freedom, but also to shoulder the burdens and the responsibility which accompany it and must above all, be loyal to India.

" The All India Congress Committee calls upon all Conessmen and the people of India to adhere to these well-established principles of the National Congress and not to allow themselves to be diverted into wrong channels by passion or prejudice, or by the tragic events that have happened. Real good and the progress of India have yet to be achieved and this can only be done by adhering to the ideals and the policy of the Congress and discarding and opposing all false doctrines which have done so much mischief to India and her people."

हा ठराव पास झाला. इतरही ठराव झाले. पण दिल्लीतील अंदाधुंदी, शीख व हिंदू यांचे मुसलमानांशी वर्तन यामध्ये सुधारणा होण्याची चिन्हे दिसेनात. गांधींच्या प्रार्थनासभा व प्रवचने दररोज चालूच होती. २७ नोव्हेंबर रोजी त्यांनी आपल्या श्रोत्यांना सांगितले की, गव्हर्नर-जनरलच्या भेटीस गेलो असता तेथे लियाकतअलीखाँ यांची भेट झाली. तेथे समजले की, दोनही डोमिनिअन देशांचे महामंत्री, सरदार पटेल आणि अर्थमंत्री यांनी एकत्र सल्लामसलत करून काही निर्णय घेतले आहेत. यामुळे दोनही देशांतील तंटेबखेडे मिटून शांतता नांदण्याची आशा निर्माण झाली आहे. प्रामाणिकपणे एकत्र बसून काम करणाऱ्यांना बखेड्यांतून समझोता निर्माण करणे केव्हाच अशक्य नसते, असे गांधी म्हणाले. नंतर आपली शेख अब्दुल्ला यांजबरोबर भेट झाली असे गांधी म्हणाले. ते आपल्याबरोबर सर्वांना घेऊन जातीय सलोख्याचा धडा सर्व देशालाच घालून देत आहेत, असे मत गांधींनी व्यक्त केले. काश्मीर व भारत यांजमधील दळणवळण व व्यापार नीट चालण्यासाठी पूर्व पंजाबातील परिस्थिती सुधारणे जरुरीचे आहे. तसे झाल्याखेरीज तेथील गरम कापड, फळे व इतर माल भारतात येणार नाही. आणि सध्याचा वेडगळ अडाणीपणा जर असाच चालू राहिला तर काश्मीरचे भारतात सामीलीकरण झाले याला काहीच अर्थ राहाणार नाही.

सगळा नोव्हेंबर व डिसेंबर महिना गांधींनी एकसारख्या ऐकू येणाऱ्या हिंदु-मुसलमानांनी परस्परांवर केलेल्या अत्याचारांच्या, हिंसाचारांच्या, परस्परांच्या मुली-स्त्रिया पळवून नेल्याच्या, त्यांचे जबरीने धर्मांतर केल्याच्या, मंदिरे व मशिदी यांच्या विध्वंसनाच्या बातम्याबद्दल आपल्या अंतःकरणाला कसा पीळ पडत होता याची विदारक विवेचने केली. एकदा एका मुसलमानाने फडक्यात गुंडाळून अर्धवट जाळलेली एक कुराणाची प्रत अश्रुपूर्ण नयनांनी गांधींना दाखविली आणि काही न बोलता निघून गेला. एकदा एकाने गांधींना येऊन सांगितले, सोमनाथ मंदिराच्या दुरुस्तीसाठी सरकारी तिजोरीतून पैसे खर्च करण्याला गृहमंत्री पटेल यांनी नकार दिला. मशिदी दुरुस्त करण्याला जर सरकारी पैसा खर्च केलेला चालतो, तर तो मंदिराच्या दुरुस्तीला सुद्धा का उपलब्ध होऊ नये, अशी त्याची पृच्छा होती. गांधींनी या तक्रार करणाऱ्यांचे म्हणणे बरोबर आहे, असा अभिप्राय दिला, काश्मीरसंबंधाने बोलत असता गांधींनी एकदा अगदी काकुळतीने प्रश्न केला, पाकिस्तान व हिंदुस्तान यांचे प्रवक्ते एकत्र बसून, निःक्षपाती गृहस्थांच्या मदतीने काश्मीर प्रश्नावर तडजोड कां करीत नाहीत ? इंडियामधून निःपक्षपातीत्व परागंदा झाले आहे काय ?

३ जानेवारीच्या प्रार्थनासभेत गांधींनी सर्वत्र लोक पाकिस्तान व भारत यांमध्ये लवकरच युद्ध होणार असे जे बोलत आहेत, त्याचा उल्लेख करून, गांधींनी पाकिस्तानच्या पुढाऱ्यांना बजाविले की, तुमच्या मर्जीप्रमाणे फाळणी होऊन पाकिस्तान झाल्यावर आता द्वेषाचे व आकसाचे कारण उरले कोठे? हिंदू व मुसलमानांनी क्रूर कृत्ये पुष्कळ केली, पण याचा अर्थ यापुढे हे असेच चालावे असा नाही. जर युद्ध झाले तर दोनही देश पुनः तिसऱ्या कोणाचे भक्ष्य बनतील. म्हणून डोकी ठिकाणावर ठेवून दोन्ही देशांनी समजूतदारपणा दाखवावा. सध्या कमालीचा ताण सहनशक्तीवर पडत आहे. पाकिस्तानचे पुढारी बेजबाबदार विधाने करीत आहेत. सरदार पटेलांनी कडक इषारा दिला आहे :

" If Pakistan does not change her ways, there may soon be a flare-up. The nation must be quite prepared for any emergency. Kashmir and Junagad are small matters and if the rulers of Pakistan want a trial of strength, India is ready. As far as India is concerned she wants Pakistan to grow into a strong and propsperours country. Some people talk of a possible reunion of the two countries. In fact, India does not desire a reunion just now, at least not until those who had clamoured for a separate homeland had reaped the harvest they had sown. The Muslims refuse to see hard facts. They thought with the establishment of Pakistan, their interests will be fully secure. The present position shows how ill-founded that hope was. "

निरनिराळ्या प्रश्नांना उत्तरे देण्याचा व आलेल्या पत्रांचा परामर्श घेण्याचा गांधींचा क्रम अव्याहत चालू होता. काँग्रेसमध्ये व काँग्रेसच्या सरकारामध्ये भ्रष्टाचार व स्वार्थलोलुपता वाढत असल्याच्या तक्रारीबद्दल गांधी म्हणाले, " Our moral standards are going down at such a rate that I can now see why our satyagraha fights in the past lacked the real content and were reduced to serve passive resistance of the weak. The only chance of saving the Congress is in having a president one who will act with firmness and impartiality in the midst of the grawing welter of confusion. For that the Congress organisation needs to be beyond the pulls and strains of power politics. Other wise the Congress will disintegrate, Rather than that fate should overtake it, it is much better to dissolve it. "

देशभक्त कोंडा वेंकटप्पय्या यांनी कथन केलेल्या कहाण्यांनी गांधी पार ढासळले होते. प्रस्तुतचा त्यांचा हा उद्रेक ११ जानेवारी १९४८ चा आहे. आता पुनः काही तरी अतिशय कडक उपाययोजना केल्याखेरीज बिघडत चाललेली परिस्थिती ताळ्यावर येणार नाही असे त्यांना तीव्रपणे वाटू लागले. एका मित्राशी बोलताना ते म्हणाले, "दिल्लीवरचा आपला काबू आपण अविरतपणे गमावीत आहो, तो जर पुरता गमावला तर हिन्दुस्तानही संपेल आणि जागतिक शांततेची अखेरची आशाही संपुष्टात येईल. उदाहरणार्थ, मला जेवढ्या मोकळेपणाने हवे तिकडे फिरता येते तेवढ्या मोकळेपणाने जर डॉ. जाकीर हुसेन किंवा शहीद सुरावर्दी यांना हिंडता आले नाही तर ते माझ्या सहनशक्तीच्या पलीकडचे आहे."

मुसलमानांचे एक शिष्टमंडळ गांधीजींकडे अशा तक्रारी घेऊन आले तेव्हा त्यांनी मंत्रिमंडळाच्या काही सभासदांशी त्यांची भेट करविली. पाकिस्तानातील अल्पसंख्याबद्दल त्यांना अशीच काळजी वाटत होती. त्यांच्या मदतीसाठी जाता येईल तर फार बरे असे त्यांना वाटत होते. पण दिल्लीतील अल्पसंख्यांची अशी परिस्थिती असता त्यांना कोणत्या तोंडाने पाकिस्तानात जाऊन शिष्टाई करता येणार ? अशी अगतिक अवस्था झाल्यावर त्यांना एकदम साक्षात्कार झाला की बेमुदत उपोषण हाच यावर इलाज आहे. याबद्दल कोणाला विचारण्याचा अथवा कोणाचे काही ऐकण्याचा प्रश्नच नव्हता. त्यांचा हा निर्णय झालेला असताही दोन तास अगोदर भेटून गेलेल्या नेहरू व पटेल यांना देखील त्यांनी याबद्दलची काही दाद लागू दिली नव्हती. १२ जानेवारी १९४८ रोजीच्या प्रार्थना प्रवचनात त्यांनी जाहीर केले की, १३ तारखेला माझा बेमुदत उपवास जातीजातींमधील अंतःकरणपूर्वक दिलजमाई होईपर्यंत चालू राहील. त्या दिवशी आपल्या श्रोतृगणांसमोर बोलताना गांधी म्हणाले, "अहिंसेच्या निःसीम भक्ताला समाजाने केलेल्या एखाद्या अन्यायाचा निषध करण्यासाठी उपोषणाशिवाय दुसरा पर्याय उरतच नाही आणि तशी माझी अवस्था आता झाली आहे. सप्टेंबरच्या ९ तारखेला मी कलकत्ता सोडून दिल्लीस आलो, तेव्हा पश्चिम पंजाबात जाण्याचा माझा हेतू होता. पण ते घडणार नव्हते. दिल्ली शहराला मरगळ आल्यासारखे वाटत होते. मी स्टेशनवर उतरलो तो मला सर्वत्र उदासीनता पसरल्यासारखी दिसली. सरदार पटेल यांनी नेहमी-प्रमाणे आनंददायक अशी काही थट्टामस्करी केली नाही. आणि माझ्या एकदम ध्यानात आले की. मला दिल्लीसच राहिले पाहिजे आणि तेही करेंगे या मरेंगे या करारावरच. लष्कर व पोलीस यांनी तावडतोब वरवर दिसणारी

शांतता प्रस्थापित केली आहे, पण आत मोठे वादळ दडून राहिले आहे. ते केव्हाही उसळून बाहेर पडेल. 'करेंगे' च्या व्रताची ही परिपूर्ती आहे असे मी समजत नाही आणि अशी परिपूर्तीच मला मृत्यूपासून वाचवू शकेल. मृत्यूला मी अतुलनीय मित्र समजतो. हिंदू, शीख व मुसलमान यांची अंतःकरणपूर्वक मैत्री असावी याकरिता माझा जीव तिळतिळ तुटतो. अगदी परवापरवापर्यंत ती शाबूद होती. आज ती नष्टप्राय झाली आहे. ही अवस्था कोणत्याही खऱ्या देशभक्ताला निमूटपणे पाहाता येत राहील अशी नाही. आतला आवाज दीर्घकाळ मला त्याची चिन्हे दाखवीत होता; परंतु माझ्या कानांनी तिकडे लक्ष दिले नाही, कारण तो सैतानाचा म्हणजेच माझ्या नबळाईचा आवाज आहे असे मी मानले. मला कधीच याला उपाय नाही असे वाटले नाही, सत्याग्रही माणसाला तसे वाटताच कामा नये. तरवारीऐवजी उपोषण हा त्यावरचा अखेरचा उपाय आहे. मला दररोज जे मुसलमान मित्र भेटतात त्यांना मला काही जबाब देता येत नाही. माझी दुर्बलता मला सारखी टोकरीत आहे. उपोषण सुरू केल्याबरोबर हे सगळे बंद होईल. गेले तीन दिवस मी सारखे याचे चिंतन करीत आहे. अखेर माझा निर्णय झाला आणि आता मला बरे वाटत आहे. ज्याचे मन शुद्ध आहे अशा माणसाला, त्याच्या प्राणांहून मौल्यवान असे देण्यासारखे काहीच नसते. मला अशी आशा आहे व मी प्रार्थना करतो की, तशी शुद्धता माझ्यापाशी आहे आणि म्हणून माझ्या या कृतीचे मी समर्थन करतो.

"आपणा सर्वांना मी विनवितो की, माझ्या या प्रयत्नाला आशीर्वाद असावा आणि आपण माझ्याकरिता आणि माझ्याबरोबर प्रार्थना करावी. उद्या सकाळच्या जेवणापासून हे उपोषण सुरू होईल. त्याची मुदत अनिश्चित आहे आणि उपोषणकालात मी लिंबाचा रस आणि मीठ घालून किंवा न घालता जलप्राशन करीत राहीन. जेव्हा माझी अशी खात्री होईल, की कोणाच्या दडपणामुळे नव्हे, तर कर्तव्यबजावणीची जाणीव झाल्यामुळे सर्व जातीजमातींचे अंतःकरणपूर्वक ऐक्य घडून आले आहे, तेव्हा मी उपोषण थांबवीन. याचे बक्षीस म्हणजे भारताची डगमगू लागलेली इभ्रत परत येईल आणि आशियाच्या हृदयावरील वर्चस्व मावळत होते ते परत तळपू लागेल. आशियामार्फत साऱ्या दुनियेच्याही दुःखाने व कटकटींनी व भुकी जगाची आशा नष्ट होणे म्हणजे भारताने आपला आत्मा हरविणे होय असा विश्वास बाळगण्यात मला फार संतोष वाटतो. माणसाचे मन ठिकाणावर आणण्यासाठी उपोषणाचा उपाय करणे या पद्धतीवर काही मित्रांचा भरंवसा नाही. ते माझ्याबद्दल सहिष्णु राहातील आणि आपण उपभोगीत असलेले कृतीस्वातंत्र्य मला नाकारणार नाहीत. ईश्वर हाच माझा सर्वश्रेष्ठ व एकमेव सल्लागार आहे आणि दुसऱ्या

कोणाचे न ऐकता मी निर्णय घेतला पाहिजे असे मला वाटते. मी जर चूक केली असेल आणि तसे जर माझ्या लक्षात येईल तर तसे जाहीर करण्याला व मागे फिरण्याला मी मुळीच कचरणार नाही. पण असा काही प्रकार होण्याचा मला फारसा संभव दिसत नाही. आतल्या आवाजाची स्पष्ट प्रेरणा मिळाली की तिचा प्रतिकार करता येत नाही. याबाबत कोणी काही युक्तिवाद करू नये आणि मला फक्त दुजोरा द्यावा. जर अखिल भारताने अथवा निदान दिल्लीने प्रतिसाद दिला तरी हे उपोषण लवकर संपेल.

"परंतु ते लवकर, उशिरा अथवा केव्हाच संपले नाही तरी ज्याला आणीबाणीचा प्रसंग म्हणतात तो आला तरी कोणी कचखाऊपणा दाखवू नये. टीकाकारांनी माझ्या पूर्वीच्या काही उपोषणांचे वर्णन ते जबरदस्ती करणारे होते असे केले आहे आणि केवळ गुणवत्तेच्या निकषांवर पाहून माझ्या भूमिके-विरुद्ध त्यांचा निकाल गेला असता. पण हेतू जेव्हा उघडपणे न्याय्य आहे तेव्हा प्रतिकूल टीकेला किती किंमत द्यावी? शुद्ध मनाने केलेले उपोषण म्हणजे कर्तव्य आणि त्यांचे बक्षीस कर्तव्य हेच असते. परिणाम काय घडेल याचा विचार करून मी उपोषणाला सुरुवात करीत नाही. केलाच पाहिजे असा अंतरात्म्याचा हुकूम मिळतो तेव्हाच मी तो करतो. म्हणून त्याचा हेतू काय आहे याची प्रत्येकाने निःपक्षपाती बुद्धीने परीक्षा करावी अशी माझी विनंती आहे आणि मला जरूर तर शांततेन मरू द्यावे. मरण म्हणजे मला वैभवशाली मोक्षच ठरेल. पण हिंदुत्व, शीखपंथ, इस्लाम आणि भारत यांच्या विध्वंसाचा साक्षीदार होण्याचे नशिबी नसावे आणि असा विध्वंस ठरलेलाच आहे, जर पाकिस्तानने समता आणि जीवितवित्ताची सुरक्षितता सर्वांना दिली नाही आणि भारतानेही त्याचेच अनुकरण केले तर.... असे झाले तर इस्लामची मृत्युघंटा पाकिस्तानात व हिंदुस्तानात घणघण वाजेल, पण साऱ्या दुनियेत मात्र नाही. हिंदुधर्म व शीखधर्म यांना हिंदुस्तानबाहेर कोठेही स्थान नाहीच. ज्यांना असे वाटत नाही त्यांचा मी त्यांच्या प्रतिकाराबद्दल आदर करतो. माझ्या उपोषणाने सदसद्विवेकबुद्धी जागी व्हावी, तिला मरगळ येऊ नये. सध्या हिंदुस्तानात जी दुर्दशा माजलेली आहे तिचा विचार करा, म्हणजे तुम्हाला आनंद होईल की हिंदुस्तानचा एक तरी नम्र पुत्र हे पाऊल उचलण्याला स्वतःला शुद्ध समजून उद्युक्त झाला आहे. तो शुद्ध नसेल आणि समर्थ नसेल तर धरतीला केवळ भारभूत आहे, म्हणून तो जितक्या लवकर नाहीसा होईल आणि वातावरण शुद्ध करील तितके त्याला व सगळ्यांनाच हितकर आहे.

"माझी सर्वांना विनंती आहे, की कोणी बिर्ला हाऊसवर गर्दी करू नये, माझी चिंता करू नये आणि उपोषण बंद करण्यासाठी माझे मन वळ-

विण्याचा यत्न करू नय. मी सर्वस्वी ईश्वराच्या हातात आहे. त्याऐवजी त्यांनी आपली अंतःपरीक्षा करावी, कारण या प्रसंगी सर्वांचीच कसोटी लागणार आहे. प्रत्येक जण आपआपल्या जागी राहून आपले कर्तव्य करीत राहील, तर मला त्याची मदत होईल व माझ्या कार्याला मदत होईल. उपोषण ही आत्मशुद्धीची एक प्रक्रिया आहे."

१३ जानेवारीला गांधींनी उपोषण सुरू केले. त्यापूर्वी पटेल, आजाद व नेहरू यांजबरोबर दीर्घ चर्चा केली आणि सर्व धर्मग्रंथातील उतारे असलेली प्रार्थना केली. गांधीजींचे चिरंजीव व राजाजींचे जामात देवदास गांधी यांनी त्यांना एक पत्र लिहिले आणि त्यामध्ये घाईने उपोषणाचा निर्णय घेतल्याबद्दल त्यांना दोष दिला, आणि उपोषण सोडण्याची विनंती केली.

गांधींनी त्यांना लिहिलेल्या उत्तरात या आरोपाचा साफ इन्कार केला. या पत्रातील एक वाक्य असे आहे. " It was only when in terms of human effort, I had exhausted all resources and realised my utter helplessness, that I put my head on God's lap. That is the inner meaning and the significance of my fast. If you read and ponder over the epic of Gajendra Moksha, you will be able to appraise my step."

एका शीख मित्राला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात : " My fast is against no party or group or individual exclusively, and yet it excludes nobody. It is addressed to the conscience of all, even the majority community in the other Dominion. If all or one of the groups fully respond, I know that the miracle will surely be achieved. For instance, if the Sikhs respond to my appeal as one man, I shall be wholly satisfied. I shall go and live in their midst in the Punjab, for the Sikhs are a brave people and I know that they can set an example in non-violence of the brave which will serve as an object-lesson to all the rest."

उपोषणाच्या पहिल्या दिवशी गांधीजी नेहमीप्रमाणे आपल्या प्रवचनात प्रत्येकाने आपले कर्तव्य चोखपणे बजावण्यात कसूर करू नये, असे सांगितले. सरदार पटेलांनी निरोप पाठविला की, आपल्या इच्छेप्रमाणे सर्व करण्यात येईल. याचे उत्तर म्हणून गांधींनी कळविले की, युनियन सरकारने 'कॅश ॲसेटस्' पैकी पाकिस्तानच्या हिश्श्याचे जे पैसे अद्यापि दिलेले नाहीत ते देऊन टाकण्याला अग्रक्रम द्यावा. चोवीस तास उपोषणाला पुरे होण्याच्या आतच युनियनचे

मंत्रिमंडळ त्यांच्याभोवती जमले आणि पाकिस्तानचा वाटा ठरविण्याला बसले. यामुळे मुसलमानांचे पक्षपाती हे गांधी आहेत म्हणून रागावलेले लोक आणखीच रागावले आणि गांधींचा शेवट करावा म्हणून कट करण्याला त्यातले काही उद्युक्त झाले. रात्री काही शीखांनी बिर्ला हाऊससमोर निदर्शने केली. 'आम्हाला सूड घ्यायचा आहे'; 'गांधींना खुशाल मरू द्या' 'रक्ताचा बदला रक्तानेच घेतला पाहिजे,' असा उद्घोष त्यांनी चालू ठेविला. काश्मीरबद्दलचा बखेडा उपस्थित झाल्यामुळे युनियन सरकारने पाकिस्तानला देण्यात येण्याचे पंचावन्न कोटी रुपये थोपवून धरले होते. १५ जानेवारीच्या रात्री ते तावडतोब देऊन टाकण्याचा निर्णय घेतला आणि संशयग्रस्ततेचे व संघर्षाचे एक कारण नाहीसे केले. याबाबत काढलेल्या पत्रकात म्हटले होते, "This decision fs the Government's contribution, to the best of their ability to the non-violent and noble effort made by Gandhrji in accordance with the glorious traditions of this great country or peace and goodwill."

कॅबिनेटच्या या निर्णयामुळे सरदार पटेल दुखावल्यासारखे झाले. धोरण ठरविण्याच्या काही बाबतीत त्यांचे आपल्या इतर सहकाऱ्यांबरोबर, विशेषतः नेहरूंबरोबर मतभेद होत, इतकेच नव्हे तर गांधीबरोबरही त्यांचा मतभेद होई. १६ जानेवारीला त्यांना काही महत्त्वाच्या कामासाठी काठेवाडात जाणे भाग होते आणि इकडे गांधी उपोषणाला बसलेले. पण कर्तव्यपालनापुढे इलाज नव्हता म्हणून जाण्याला निघण्यापूर्वी त्यांनी गांधींना पुढीलप्रमाणे पत्र लिहिले : "I have to leave for Kathiawad at 7 this morning. It is agonising beyond endurance to have to go away when you are fasting. But stern duty leaves no other course. The sight of your anguish had made me disconsolate. It has set me furiously thinking. The burden of work has become so heavy that I feel crushed under it. I now see that it would do no good to the country or to myself to carry on like this more. It might even do harm. I cannot do otherwise than I am doing now. And if thereby 'I becameburdensome to my life-long colleagues and a sowarce of distress to you and I still stick to office, it would mean that I let the bust of power blind my eyes and so not willing to quit. You should quickly deliver me from this intolerable position. I know it is no time for argument while you are fasting. But since I can be of no help even in ending your fast. I do not know what else there

is for me to do. I therefore, erarnestly beseech you to give up your fast and get this question settled soon. It may even help tremove the causes that have prompted your fast."

१६ जानेवारीच्या आपल्या प्रवचनात गांधींनी युनियन कॅबिनेटने पाकिस्तानचे ५५ कोटी रुपये देऊन टाकण्याचा निर्णय घेतला या गोष्टीचा उल्लेख करून म्हटले की, आता मी यामुळे उपोषण बंद करावे असे मला सांगण्यात येत आहे. पण दिल्ली शहरातील लोकांनी आपला हृदयपालट झाला आहे असा पुरावा मला सादर करीपर्यंत मला उपोषण सोडता येणार नाही. दोनही देशांतील लोकांनी सुद्धा असे दाखवून दिले पाहिजे, की कोणत्याही प्रकारचा त्रास न होता आपसांतील ये-जा सुरू झाली पाहिजे. गांधी असे म्हणत असताच कराचीहून तार आली, की दिल्लीहून घालवून दिलेले जे मुसलमान तेथे गेले होते त्यांना परत आपआपल्या घरी परतण्याची इच्छा आहे. त्यांच्या घरात जे हिंदु व शीख निर्वासित राहू लागले होते त्यांपैकी एक हजार लोकांनी तेथून निघून जाण्याचे आणि कराचीहून परत येणाऱ्यांना आपल्या मूळच्या घरात राहू देण्याची लेखी तयारी दाखविली. प्यारेलाल यांनीच त्यांची संमतिपत्रे आणली. यामुळे गांधींना समाधान वाटले.

१७ जानेवारीला गांधी म्हणाले, उपोषणाच्या दडपणामुळे काही होता कामा नये. ही एक राजकीय खेळी आहे असे कोणी समजू नये. या दिवशी संध्याकाळी त्यांची प्रकृती जास्त बिघडली. त्या दिवशी निघालेल्या डॉक्टरांच्या पत्रकात म्हटले होते, " It is our duty to tell the people to take immediate steps to produce the requisite conditions for ending the fast without delay."

एका शांततामेळाव्यासमोर बोलताना अबुल कलाम आजाद म्हणाले की, आज मी गांधींना भेटून आलो आणि त्यांना विनंती केली, की अशा नक्की शर्ती मला सांगा, की ज्या पुऱ्या झाल्या तर तुम्ही आपले उपोषण सोडण्याला तयार व्हाल. त्यावर त्यांनी सात शर्ती मला सांगितल्या आणि म्हणाले, त्याला सर्व पक्षांनी आपल्या सह्या दिल्या तर उपोषण सोडता येईल. गांधी पुढे म्हणाले, आश्वासने अशा जबाबदार लोकांकडून आली पाहिजेत, की जे त्यांची बरोबर पूर्तता होण्याबद्दलची हमी देतील. मौलानासाहेबांनी ताकीद दिली की, खोटी आश्वासने देण्यात येऊ नयेत. एक शांतता समिती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आली. तिचे १३० सभासद होते. राजेंद्रप्रसाद यांच्या वसतिस्थानी तिची सभा होऊन एक समाधानकारक ठराव पास करण्यात आला. जेव्हा १८ जानेवारीला १२-४५ वाजता गांधींचे उपोषण संपले, तेव्हा

देशभर पसरलेले चिंतेचे वातावरण निवळले. त्यापूर्वी करोलबाग, सबजी मंडी, पहाडगंज येथे छावणीत असलेल्या निर्वासितांचे प्रतिनिधी आणि शहरातील सर्व संघटनांचे प्रतिनिधी डॉ. राजेंद्रप्रसादांच्या अध्यक्षतेखाली एकत्र आले आणि त्यांनी सात कलमी घोषणेवर सह्या करून गांधींना उपोषण सोडण्याची विनंती केली. ती सात कलमी घोषणा येणेप्रमाणे होती :

" We wish to announce that it is our heart-felt desire that the Hindus, Muslims and Sikhs and members of other Communities should once again live in Delhi like brothers and in perfect amity, and we take the pledge that we shall protect the life, property and faith of Muslims and that the incidents which have taken place in Delhi will not happen again.

" We want to assure Gandhiji that the annual fair of Khwaja Kutab-ud-Din Mazar will be held this year as in previous years.

" The Muslims will be able to move about in Saliji Mandi, Karol Bagh, Pahar Gunj and other localities just as they could in the past.

" The mosques which have been left by the Muslims and which now are in the possession of the Hindus and the Sikhs will be returned. The areas which have been set apart for the Muslims will not be forcibly occupied.

" We shall not object to the return to Delhi of the Muslims who have migrated from here if they choose to come back and the Muslims shall be able to carry on their business as before.

" We assure that these things will be done by our personal efforts and not with the help of the police and the military.

" We request Mahatmaji to believe us and give up his fast and continue to lead us as he has done hitherto. "

गांधींनी सांगितल्यावरून हा दस्तऐवज नागरी व ऊर्दू अशा दोनही लिप्यांमध्ये लिहिण्यात आला. अबुल कलाम आजाद या सभेला हजर होते. जमियत-अल-उलेमाचे हिफजूर रहमान आणि अहमद सयीद व मौलाना

हबीब-ऊर-रहमान; हिंदुसभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे गोस्वामी गणेश दत्त, बसंतलाल व नारायणदास असे प्रतिनिधी होते. शीखांच्या संघटनाचे प्रतिनिधीही होते. हे शंभराहून अधिक लोक नंतर बिर्ला हाऊसमध्ये गांधींच्या दालनात गेले आणि त्यांनी गांधींना उपोषण सोडण्याची विनंती केली. नेहरू तेथ अगोदरच येऊन बसले होते. पाकिस्तानचे हायकमिशनर झहीद हुसेन हेही थोड्या वेळाने तेथे आले राजेंद्रप्रसादांनी आपल्या प्रारंभीच्या भाषणात सांगितले की, काँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने आपण सही केली आहे. गांधींनी समयोचित भाषण करून सर्वांना आपला शब्द पाळण्याची जाणीव करून दिली आणि सांगितले की पाटण्याच्या एका मुसलमान मित्राने मला एक पुस्तक पाठविले आहे. या पुस्तकात लेखकाने असे प्रतिपादन केले आहे की, कुराणाच्या मताने सर्व हिंदू हे काफर आहेत, विषारी सर्पापेक्षा वाईट आहेत आणि फक्त मारून नाहीसे करण्यालाच योग्य आहेत. यात काही पाप नाही व त्यासाठी सर्व प्रकारचे बळ व लबाडी करण्यात देखील काही गैर नाही. ईश्वराच्या नजरेत हे सर्व पुण्यकार्यच आहे.

गांधी म्हणाले, "कोणताही परमेश्वराला मानणारा मुसलमान या मताला दुजोरा देणार नाही. काही लोक हिंदूंना मूर्तिपूजक म्हणन क्षुद्र लेखतात. पण ते दगड किंवा लाकूड यांना पूजीत नसून त्यातील परमेश्वराला भजतात हे त्या वेड्यांना कळत नाही. कुराण आणि ग्रंथसाहेब तरी काय केवळ कागदच आहेत. पण त्यात असणाऱ्या ईश्वरालाच मुस्लिम अथवा शीख मानतात, हे सर्वांनी नीट समजून कोणाचा अधिक्षेप कोणीही न करता केलेल्या प्रतिज्ञा पाळाव्या. आपल्या अंतरात्म्याला साक्षी ठेवून वर्तावे," असे म्हणून गांधींनी आपले भाषण संपविले.

मौलाना अबुल कलाम आजाद यांना भाषण करण्याची विनंती केल्यामुळे ते म्हणाले, दिल्लीकरांनी उचललेली जबाबदारी पार पडावी. गांधींनी उल्लेख केलेल्या पुस्तकाचा समाचार घेणे जरूर आहे, असे सांगून ते म्हणाले की, हे पुस्तक म्हणजे इस्लामची नालस्ती आणि बदनामी आहे. त्यांनी कुराणातील एक मंत्र म्हणून त्याचा अर्थ सांगितला तो असा : सर्व माणसे ईश्वराची लेकरे व एकमेकांची भावंडे आहेत, मग ती कोणत्याही वंशाची, धर्माची वा देशाची असोत. इस्लामच्या शिकवणीशी पुरी विसंगत व त्याला कमीपणा आणणारी अशी गांधींनी दाखवून दिलेली त्या घाणेरड्या पुस्तकांतील वाक्ये आहेत. इतरही अनेक वक्त्यांची भाषणे झाल्यावर गांधींनी उपोषण सोडण्याची तयारी दर्शविली आणि सर्वधर्मीय प्रार्थना म्हणण्यात

आल्या. फळांच्या रसाचा पेला आजादांनी गांधींच्या हाती दिला व त्यांनी तो रस प्राशन केला. हजर असलेल्या सर्वांना फळे वाटण्यात आली. जमलेली मंडळी हळूहळू निघून गेली, पण नेहरू बसूनच होते. दोघेच राहिल्यावर नेहरूंनी गांधींना सांगितले की, गेले दोन दिवस मी पण तुमच्याबरोबर उपोषण करीत होतो. हे ऐकून गांधींना गहिंवर येऊन त्यांचा गळा दाटला. नेहरू निघून गेल्यावर त्यांना त्यांनी एक चिठ्ठी लिहिली. तीत म्हटले होते : " Now break your fast. May you live for many long years and continue to be **jawahar** (the jewel) of India. Bapu's blessings."

गांधींच्या या उपोषणाची साग्र हकीकत जगातील सर्व वर्तमानपत्रात ठळकपणे प्रसिद्ध झाली. पारिसच्या प्रसिद्ध लि मोंद (Le Mond) ने लिहिले : " Mahatma Gandhi's 'secret weapon' — that spiritual violence which was taught so long ago by gospels and the men of the gospels — will, perhaps, be the best reply to the atomic bombs. His voice carries far beyond the frontiers of India. If in our turbulent western world, it is still far from dominating the voice of violence, it is none the less among those voices to which we must listen and which will carry far beyond our times. Is not this a voice to which men will be forced to listen one day soon, in the atomic age ? Through Mahatma Gandhi, the East teaches us again that there exists another sort of revolution than the revolutions of hate. The good Gandhi, product of a country which is still wise enough to give itself the sages for the heroes — not the warriors and the politicions — shows himself once again to he the greatest rebel of our time."

विशेष लक्षात घेण्याजोगी गोष्ट म्हणजे पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री सर मोहमद जाफरउल्लाखान यांनी युनायटेड नेशनस् सिक्युरिटी कौन्सिलला लेक सक्सेस येथे कळविले की, " A new and tremendous wave of feeling and desire for friendship between India and Pakistan is sweeping the sub-continent in response to the fast."

हे उपोषण संपल्यावर दोन दिवसांनी २० जानेवारी १९४८ रोजी, गांधींवर बॉम्ब फेकण्याचा एक प्रयत्न करण्यात आला. गांधी बिर्ला हाऊसच्या पटांगणात आपल्या प्रार्थनासभेत बोलत होते. ते बसले होते तेथून सुमारे पंचवीस यार्ड अंतरावर तो फुटला, पण कोणाला काही दुखापत झाली नाही. पश्चिम

पंजाबमधून आलेला मदनलाल नावाचा एक निर्वासित होता. त्याला याबद्दल अटक झाली आणि एक न उडालेला हातबॉम्ब त्याच्याजवळ सापडला. उडालेल्या बॉम्बचा स्फोट बराच दूरवर ऐकू गेला. पण गांधी अविचलित होते. ते म्हणाले, "ऐका! ऐका सर्वजण! काहीही झालेले नाही!" नंतर ते म्हणाले, "पटेल, नेहरू व मी यांच्या विचारात काही फरक नाही. आम्हांपैकी कोणीही मुसलमानांचा शत्रू नाही. आता मला पाकिस्तानात जाण्याची इच्छा आहे. पण त्याला त्या देशाच्या सरकारची परवानगी पाहिजे. आणि मी शांततेचा खरा उपासक आणि त्यांचा मित्र आहे अशी त्यांची खात्री झाली नसेल तर मला ती परवानगी कशी मिळणार? सध्या काही दिवस मला जाताच येणार नाही असे डॉक्टर म्हणतात आणि ते बरोबर आहे."

२१ जानेवारी रोजी प्रार्थना आटोपल्यावर आदल्या दिवशीच्या बॉम्बस्फोटाबद्दल गांधी बोलले. मदनलालविषयी तिरस्कार अथवा द्वेषबुद्धी बाळगणे चुकीचे होईल. मशिदीत आश्रय घेणे आणि तेथून निघून जाण्याला सांगितल्यावर तो हुकूम न पाळणे या दोनही चुकीच्या गोष्टी त्याने केल्या. तथापि त्याला पोलिसांनी कठोरपणे वागवू नये, त्याचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करावा. त्याची चूक त्याला समजून येईल. अखेरीस आता मुसलमान दिल्ली शहरात सर्वत्र निर्भयपणे फिरत आहेत याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

२२ जानेवारीला प्रार्थनेच्या स्थळापर्यंत ते चालत गले आणि त्यांना वाटू लागले की, आता आपली प्रकृती लवकरच नेहमीसारखी होईल. केंद्रीय मंत्री, विशेषत: नेहरू आपल्या निवासस्थानी देशी-परदेशी पाहुण्यांची व निर्वासितांची वर्दळ खूप गैरसोय होत असताही सोशीत आणि सामान्य माणसांसारखे राहात आहेत, पण सरकारी नोकर मात्र आपल्या बढत्याकडे आणि पगारवाढीकडे डोळे लावून बसले आहेत याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. पूर्वी दोडशे रुपये पगार मिळविणाऱ्याने आता एकदम पाचशे रुपये मिळावे अशी अपेक्षा धरावी काय? २३ जानेवारी हा सुभाषचंद्र बोस यांचा स्मृतिदिन, त्यांनी त्यांचे प्रार्थनासभेत स्मरण करून पाळला. त्यांचा मार्ग पसंत नसला तरी देशभक्त म्हणून त्यानी त्यांचे कौतुक केले, संकुचित प्रांतीयता वा प्रादेशिकता यांपासून ते अलिप्त होते, परधर्माबद्दल आदर बाळगणारे अस्सल हिंदू होते, असे त्यांनी श्रोत्यांच्या नजरेस आणिले. २५ जानवारीला रविवार होता आणि त्या दिवशी प्रार्थनासभेला खूपच गर्दी लोटली होती. प्रत्येक हिंदू व शीख माणसाने बरोबर एक मुसलमान मित्र आणावा, असे गांधींनी आपल्या श्रोतृगणास सुचविले. मेहरावली येथे बखत्यार चिस्तीच्या दर्ग्याचा उरूस होता. दर्ग्याची जी मोडतोड झाली होती तिची दुरुस्ती करण्यात आली होती. पूर्वी-

प्रमाणेच हिंदू-मुसलमान उरुसाला जातील अशी आशा गांधींनी व्यक्त केली. उपोषणामुळे आता दोहोमधील तेढ निघून गेलेली होती. यामुळे गांधींना वाटले की वर्ध्याला किंवा पाकिस्तानात जाण्याला आपण आता मुक्त झालो. पाकिस्तानचे निमंत्रणच आपणाला यावे असे आता त्यांना वाटू लागले. काँग्रेसच्या कार्यकारिणीने भाषावार प्रांतरचना करण्याबाबत ठराव केला. त्याचे स्वागत करून गांधी म्हणाले, ब्रिटिश पद्धतीप्रमाणे बाउंडरी कमिशन वगैरे या कामासाठी नेमून कलागती उत्पन्न करू नयेत. आपआपसात विचारविनिमय करून संगनमताने व गुण्यागोविंदाने भाषावार प्रांतरचना व्हावी. भाषेचे सूत्र पकडून राज्यकारभाराच्या सोयीसाठी सरहद्दी ठरवावयाच्या आहेत आणि अखेरीस सर्व भारतीयच आहेत, हे न विसरता ही इष्ट सुधारणा घडवून आणावी, असे मत गांधीजींनी प्रकट केले. २६ जानेवारी हा स्वातंत्र्यदिन म्हणून आपण पाळीत आलो याची आठवण देऊन गांधी म्हणाले, अखंड असलेल्या भारताचे भूगोलाच्या व राजकारणाच्या दृष्टीने दोन तुकडे झाले असले तरी अंत:करणापासून आपण मित्र व बंधू म्हणूनच वागू आणि बाह्य जगाच्या दृष्टीन एक म्हणूनच ओळखले जाऊ.

दुसऱ्या दिवशी, अमेरिकन नीग्रो लोकांचे नेते व प्रवक्ते किंग्स्ले मार्टिन हे गांधींच्या भेटीला आले. त्यांना २७ जानवारी रोजी, गांधींनी आपल्या अहिंसात्मक लढ्याची माहिती दिली. आमची अहिंसा जर समर्थ लोकांची असती तर स्वातंत्र्योत्तर झालेले हत्याकांड झाले नसते. प्रत्यक्षात अहिंसा आम्ही दुर्बळ असल्याने सोयीखातर स्वीकारली होती हे माझ्या लक्षात नंतर आले. एक प्रकारे मी स्वत:ला फसविले होते, असे गांधी म्हणाले. काश्मीरचा प्रश्न व आदिवासींचा प्रश्न यावर उभयतांची खूप चर्चा झाली. त्यानंतर मार्टिन यांनी उद्‌गार काढले, "अरे अरे! केवढी दुर्दैवाची गोष्ट आहे की अमेरिकेत, पॅलेस्टाइन अथवा रशिया येथे भारतासारखा एक एक गांधी अवतरला नाही!" त्यावर गांधी म्हणाले, "त्यांचे दुर्दैव, दुसरे काय!" २७ जानवारी हा दिवस एक नवी घटना काँग्रेससाठी तयार करण्यात गांधींनी घालविला. काँग्रेस कार्यकारिणीच्या विनंतीवरून त्यांनी हे कार्य हाती घेतले होते. काँग्रेसने राजकीय स्वातंत्र्य मिळविले असले तरी देशाला आर्थिक, सामाजिक व नैतिक स्वातंत्र्य मिळवण्याचे बाकी होते. आणि हे कार्य केवळ विधायक स्वरूपाचे असल्यामुळे अधिक कठीण होते. नव्या घटनेचा मसुदा तयार करून काँग्रेसला लोकसेवक संघ हे नवे नाव देण्याचे त्यांनी योजिले होते आणि त्यांतच चरखा संघ, ग्रामोद्योग संघ, हिंदुस्तानी तालिमी संघ, हरिजन सेवक संघ आणि गोसेवा संघ यांची कामे एकवटण्याची त्यांची योजना होती. हा सगळा मसुदा प्यारेलालच्या हवाली करून त्याला तो तपासण्याला सांगितले.

काही उणिवा असल्या तर त्या काढून टाकायलाही सांगितले. २७, २८ आणि २९ या जानेवारीच्या तीनही दिवसात ते सारखे या ना त्या कामात पूर्णपणे गढून गेले होते. ३० तारीख हा त्यांचा या दुनियेतील शेवटचा दिवस असेल असे कोणाच्याही स्वप्नात सुद्धा येणे शक्य नव्हते. पण तसे घडले हे मात्र खरे.!

तो शुक्रवार होता. नेहमीप्रमाणे गांधी पहाटे साडेतीन वाजता उठले काही वेळ काम करून पुनः थोडा वेळ त्यांचा डोळा लागला. आठ वाजता ते मालीश करून घेण्यासाठी उठले. ते संपल्यावर ते प्यारेलाल यांना मद्रास-मधील अन्नपरिस्थितीवर एक टिपणी तयार करायला सांगितले. नोआखलीतील आपले अनुभव लक्षात ठेवून हे काम करावे अशी सूचना दिली. अन्नमंत्रालय उगाच घाबरत आहे, असे ते म्हणाले. निसर्गाने मद्रासला नारळीची झाडे केळयांची झाडे आणि भुईमुगाची भरपूर शेती, तसेच विविध प्रकारचे कंद व मुळे, दिली असता त्यांची उपासमार होण्याचे काहीच कारण नाही, असे आपले मत त्यांनी प्यारेलालला सांगितले, पण निसर्गाने दिलेल्या देणग्यांचा योग्य उपयोग करण्याची कुशलता हवी, अशी शेरेबाजीही त्यांनी केली. स्नान केल्यानंतर सगळा शीण निघून जाऊन त्यांना ताजेतवाने झाल्याचा अनुभव आला. साडेनऊ वाजता त्यांनी सकाळचे जेवण केले. मग नोआखलीत असल्यापासूनचा नवीन सुरू केलेला बंगाली लेखनाचा नवा उपक्रम त्या दिवशीही पाळला. जेवणात शेळीचे दूध, कच्च्या व उकडलेल्या भाज्या, संत्री आणि आले व लिंबू यांच्या रसाचे मिश्रण असे पदार्थ होते. जेवण झाल्यावर प्यारेलालने तपासून पुढे केलेला काग्रेसच्या संकल्पित घटनेचा मसुदा पाहिला, त्यात अवश्य ते फेरबदल केले, भर घातली आणि अंकांची बेरीज करण्यात झालेली एक चूकही दुरुस्त केली. दुपारी थोडी वामकुक्षी केल्यावर भेटायला आलेल्या लोकांचे एकामागून एक स्वागत केले. त्यात काही मुल्ला-मौलवी होते. त्यांनी गांधींना सांगितले की, आता तुम्ही खुशाल वर्ध्याला जाऊ शकता. गांधी म्हणाले, थोडे दिवस जाऊन परत येईन असे म्हणतो. ईश्वराच्या मनात असेल तसेच सर्व काही घडणार. मग त्यांनी शिल्लक असलेल्या पत्रांची उत्तरे लिहून संपविली. तिसरे प्रहरी चार वाजता सरदार पटेल त्यांना भेटायला आले. एक तास त्यांचे संभाषण चालले होते. उपोषणामुळे थंडावलेले नेहरू व पटेल यांचे भांडण गांधींना एक काळजीचा विषय झाले होते. त्यांनी एकमेकांना धरूनच राहिले पाहिजे, असे त्यांना वाटत होते. पाच वाजले, तेव्हा प्रार्थनेची वेळ झाली म्हणून पटेलांना रजा दिली. पाच वाजून दहा मिनिटांनी ते प्रार्थनास्थळाकडे जाण्यास निघाले. त्यांच्या नाती मनू व आभा त्यांजबरोबर होत्या. प्रार्थना संपल्यानंतर,

नेहरू व आजाद त्यांना यऊन भेटणार होते. लोकांच्या अभिवादनाचा स्वीकार करण्याकरिता महात्मा गांधींनी आपले हात जोडले. एवढयात एकाएकी जमलेल्या जनसंमर्दातून एक तरुण घाईने पुढे आला आणि गांधींना पदस्पर्शपूर्वक अभिवादन करावा म्हणून खाली वाकला. मनूने त्याला अडविले. तिचा हात झटकून टाकून त्याने थेट गांधींच्या अंगावर तीन गोळया एका सातबारी पिस्तुलातून झाडल्या. एक गोळी छातीखाली, दुसरी उजव्या बाजूला आणि तिसरी फुप्फुसात रुतून राहिली. गांधी कोलमडून खाली पडले. पडता पडता 'हे राम' असे उद्‌गार त्यांनी काढले. प्राणोत्क्रमण तत्काळ झाले होते. त्यांचा चेहरा एकदम राखेसारखा करडया रंगाचा दिसू लागला. पांढऱ्या स्वच्छ कपडयावर रक्ताचे डाग पडले होते. जेथे ते काम करीत बसत तेथल्याच जवळच्या खोलीत त्यांचे शव सतरंजीवर नऊन ठेवण्यात आले. जवाहरलाल नेहरू धावतच तेथे आले व एखाद्या लहान मुलासारखे स्फुंदूनस्फुंदून रडू लागले. सर्व जग दुःखार्णवात बुडाले. दुनियेत सर्व राष्ट्रांनी आपले ध्वज खाली उतरविले. रेडिओवरून बोलताना नेहरू म्हणाले : "The light has gone out of our lives................yet I am wrong, for the light that shone in this country was no ordinary light........and a thousand years later that light will still be seen in this country and the world will see it, for that light represented the living truth."

नथुराम गोडसे यांचे नाव गांधीजींचा हत्यारी म्हणून इतिहासात नोंदले जाणे अपरिहार्य आहे. कारण त्याने त्यांची हत्या जाणूनसवरून आणि पूर्वतयारीने व निर्धाराने केली आणि असे करण्यामध्ये आपण देशसेवाच बजावीत आहो असे त्याला वाटत होते. गांधींबद्दल व्यक्ती म्हणून त्याला अपरिमित आदर होता, त्यांचे देशाचे नेतृत्व त्याला घातक वाटत होते. त्यांच्यावर गोळया झाडताना त्यांना प्रणाम केला आणि त्यांचे देहपतन झाल्यावरही तो त्यांच्या पायाशी नम्र झाला. आपण केलेल्या कृतीबद्दल त्याला पश्चात्ताप वाटला नाही. तो स्वतः एका चित्पावन ब्राह्मण कुटुंबात, सुसंस्कृत व सद्‌गुणी वातावरणात वाढला होता आणि सुशिक्षित विचारवंत असल्याबद्दल त्याचा लौकिक होता. 'अग्रणी' नावाचे एक दैनिक पत्र तो चालवीत असे. ही सर्व पार्श्वभूमी ध्यानात घेतली म्हणजे निष्कर्ष असा निघतो की एका अगदी विरोधी विचारांचा उद्‌गाता व प्रवक्ता म्हणूनच तो गांधीजींना या दुनियेतून नाहीसे करण्याला प्रवृत्त झाला. त्याने न्यायालयात केलेले निवेदन कधीच प्रसिद्ध झाले नाही. पण अजूनही सरकारने त्याला प्रसिद्धी दिली तर त्याची विचारसरणी तरी काय होती हे जनतेला समजेल.

□

म. रा. ग्रा. सं. मं. ग्रंथालय
प्र/२५३
२
मं. शा. ब.